खंड
चार


# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

# पत्रसंग्रह

इ. स. १७९७ ते १८८५

संपादक
वा. वा. ठाकूर

सुधारित आवृत्तीचे संपादक
डॉ. देवीदास पोटे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## खंड चार

# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

## पत्रसंग्रह

### इ.स. १७९७ ते १८८५


संपादक

**वा. वा. ठाकूर**

दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादक

**डॉ. देवीदास पोटे**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव** : होळकरशाहीच्या इतिहासाची साधने : खंड चार
पत्रसंग्रह
Holkarshahichya Itihasachi Sadhane
Volume-Four
Patrasangraha

➢ **पहिल्या आवृत्तीचे संपादक** : वा. वा. ठाकूर

➢ **दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादक** : डॉ. देवीदास पोटे

➢ **प्रथमावृत्ती** : १९४५

➢ **दुसरी सुधारित आवृत्ती** : २०२१

➢ **प्रकाशक** :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन** :

➢ **मुखपृष्ठ** : सतीश भावसार

➢ **मुद्रक** :

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत** : रुपये ४८७.

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचे तोरण उभारले. लोककल्याणाचा आदर्श घालून दिलेल्या या राजाच्या लढवय्या शिलेदार-मावळ्यांनी पुढे अटकेपार स्वराज्याचा विस्तार केला. त्यात होते महाराजांचे मराठी सरदार शिंदे, घोरपडे, निंबाळकर, दाभाडे, गायकवाड आणि इंदूरचे होळकर. या होळकरशाहीचा इतिहास हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड होता. होळकर रियासत ही अखिल मराठेशाहीचे एक महत्त्वाचे अंग आणि आधारस्तंभ होती. होळकरशाहीत मल्हारराव होळकर आणि अहिल्याबाई होळकर यांचे कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. त्यात अहिल्याबाईंचा शासनकाळ हा तर होळकरशाहीचा सुवर्णकाळच मानला जातो.

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाई एका वैभवशाली होळकर राज्याच्या स्वामिनी बनल्या. त्या शूर लढवय्या, चांगल्या रणनीतिज्ञ आणि न्यायी वृत्तीच्या होत्या. त्यांच्या जीवनात आलेली अनेक संकटे, दुःखाला त्यांना सामोरे जावे लागले; पण प्रजेच्या कल्याणात आणि सेवेतच आपला मोक्ष आहे, हे ओळखून त्यांनी आयुष्यभर जनहिताची असंख्य कामे केली. अन्यायाची त्यांना चीड होती. त्यांनी धर्माचरण आणि राजकारणाची सुयोग्य सांगड घातली. कर्तव्यनिष्ठा, धर्मनिरपेक्षता आणि सात्त्विकता या गुणवैशिष्ट्यांमुळे त्या केवळ राजमाता न राहता पुण्यश्लोक लोकमाता ठरल्या. अत्यंत साधे निर्मळ जीवन आणि पराकोटीचे दातृत्व ही त्यांची जगावेगळी ओळख होती. काश्मीर ते कन्याकुमारी अन् द्वारका ते पूर्वेकडच्या देशभरातील अनेक मंदिरे, तीर्थस्थळे, नदीकाठ, धर्मशाळा, पिण्याच्या पाण्याचे हौद, विहीरी-बारवा त्यांनी बांधल्या, जगावेगळ्या दानशूरत्वाने देशभरात आपला कायमस्वरूपांचा ठसा उमटविणाऱ्या त्या एकमेव महाराणी आहेत. या देशात अनेक

राजे-रजवाड्यांनी आपापल्या राज्यात लोकोपयोगी कामे केली आहेत, हा इतिहास आहे; पण स्वत:च्या राज्याबाहेर देशभर जनसेवेची पाणपोई उभारणाऱ्या एकमेव अहिल्याबाईच होत्या. हिंदुस्थानच्या अनेक राजघराण्याच्या इतिहासात जनकल्याणाची कामे केल्याचा इतिहास बघायला मिळतो; पण आपल्या राज्याबाहेर सर्व जाती-धर्माच्या स्थळांच्या जीर्णोद्धारासाठी मदत केलेल्या अहिल्याबाईच दिसून येतात.

इंदूरच्या होळकर घराण्याचे मल्हारराव होळकर संस्थापक होते. त्यानंतर अहिल्याबाईंचा सुवर्णकाळ येतो. त्यांच्यानंतर यशवंतराव होळकरांनी हा वारसा सांभाळला. हा इसवी सन१६९३ पासूनचा हा दोनशे वर्षांचा इतिहास आहे. भारताच्या इतिहासातील होळकरशाहीचा इतिहास हा आपला एक सांस्कृतिक वारसा आहे. तो एकत्रित स्वरूपात पुनर्प्रकाशित करावा यासाठी आमचे मित्र डॉ. देवीदास पोटे हे प्रयत्न करत आहेत, ही गोष्ट माहीत असल्याने हे काम करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास द्या, अशी विनंती मी त्यांना केली. आणि त्यांनी ती स्वीकारून 'होळकरशाहीचा समग्र इतिहास' या प्रकल्पासाठी रात्रंदिवस झोकून देऊन काम केलें. माणसाने ठरविले आणि नियोजनपूर्वक ध्यास घेतला कीं, ते काम वेळीच पूर्ण होऊ शकते, हा अनुभव डॉ. देवीदास पोटे यांच्या कामातून दिसून आला. केवळ सुमारे दीड वर्षात एकहाती दहा खंड करणे, हे अवघड नाहीं, हे त्यांनी या दहा खंडातील सुमारे पाच हजार पानांच्या बृहद प्रकल्पाच्या उदाहरणातून दाखवून दिले आहे.

या समग्र इतिहासाचे प्रकाशन साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझ्या काळात होत असलेले दुसरे महत्त्वाचे काम आहे. असेच पहिले मोठे काम म्हणजे महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे बारा खंड तयार झाले आहेत. 'होळकरशाहीचा समग्र इतिहास' या प्रकल्पात पूर्वप्रकाशित खंडांचे लेखक तसेच प्रशासक आणि दूरदृष्टी असलेल्या दानशूर अहिल्याबाईंच्या अनोख्या पर्वाची ओळख सर्वांना होणार आहे.

इतिहास हा सरकारी दप्तरातील हुकूम, जाहीरनामे, सरकारी सनदा, दरबारातील खासगी जुन्या बारनिशा, कौटुंबिक समारंभाचे वृत्तांत, राजपुरुषांच्या वेळोवेळी केलेंल्या भाषणांतून विखुरलेला असतो. तसाच तो सर्व प्रकारच्या खासगी तसेच सरकारी पत्रलेखनातही दडलेला असतो. त्यामुळे पत्रसंग्रह हा कोणत्याही इतिहासाच्या साधनांतील एक महत्त्वाचा भाग असतो. होळकरशाहीच्या इतिहासातील महत्त्वाचे साधन असलेला पत्रव्यवहार खंड तीन आणि खंड चार मध्ये आला आहे. होळकरशाहीतील वेगवेगळ्या कालखंडातील दप्तरांत विखुरलेल्या पत्रांचा शोध, संकलन आणि संपादनाचे काम श्री. वा. वा. ठाकूर यांनी केले आहे. या कालखंडातील सर्व पत्रव्यवहार मोडी लिपीत होत असे. या मोडी लिपीत लिहिलेल्या पत्रांचे देवनागरी लिपीत पुनर्लेखन मूळ संपादकांनी केले आहे. एवढेच नाहीं तर या एकशे पासष्ट वर्षातील या पत्रांचा इंग्रजी संक्षिप्त अनुवाद करण्याचे

कामही श्री. वा. वा. ठाकूर यांनी केल्यामुळे हा पत्रसंग्रहाचा खजिना सर्वांसाठी उपलब्ध होऊ शकला. मूळ भाषेसोबत इंग्रजी अनुवाद असलेले संकलन-संपादन मराठेशाहीच्या इतर इतिहासात अन्यत्र फारसे कुठे आढळत नाहीं. या संपादनाचे हे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे.

होळकरशाहीतील अकरा राजपुरुषांच्या कालखंडातील ही पत्रे आहेत. या सर्व पत्रांतून त्या त्या वेळच्या प्रशासकांची प्रशासनाची दृष्टी, प्रशासनाच्या सूचना, न्यायवृत्ती, सोबतची उदारवृत्ती, कौटुंबिक दु:खातही राजकर्तव्याचे वर्तन दिसून येते. मल्हारराव होळकर ते दुसरे तुकोजीरावपर्यंतच्या होळकर राजांची ही पत्रे आहेत. मल्हारराव होळकरांनी अहिल्याबाईंस लिहिलेंली पत्रें म्हणजे एका उत्तम प्रशासक सासऱ्याने तरुण सूनबाईंना उत्तम प्रशासनाचा दिलेला पाठच आहे. त्यामुळे या संग्रहातील विविध पत्रांतून अहिल्याबाईंचे प्रशासन, राजकारणपटुत्व, मुत्सद्देगिरी, दातृत्व आणि दूरदृष्टी दिसून येते. पत्रसंग्रहाच्या अक्षरधनातून अभ्यासू साक्षेपी संपादक श्री. वा. वा. ठाकूरांनी साक्षेपीपणाने उपयुक्त पत्रांची निवड केली. यातून होळकरशाहीच्या सुवर्णकाळातील अनेक पैलू समोर येतात. हा सांस्कृतिक खजिना पुनर्प्रकाशित करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मिळत आहे, याचे खूप समाधान आहे. या निमित्ताने पूर्व प्रकाशित खंडांचे संपादक आणि या आवृत्तीचे संपादक डॉ. देवीदास पोटे आणि त्यांना मदत करणाऱ्या सर्व मित्रांचे आभार.

**बाबा भांड**

मुंबई, दि. २३ जुलै २०१८

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई

# प्रस्तावना

इतिहासाच्या अभ्यासात हुकूमनामा, सनद, बातमीपत्रे, शस्त्रे, नाणी याबरोबरच महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे पत्रव्यवहार. होळकर दरबारातील इतिहास विभागाचे प्रमुख श्री. वा. वा. ठाकूर यांनी होळकर घराण्यातील विविध राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीतील पत्रांचे सूक्ष्म अवलोकन आणि अभ्यास करून दोन खंडांतून ''होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें'' हा ग्रंथ सिद्ध केला. होळकर दरबारातील श्री. ठाकूर यांच्या महत्त्वाच्या पदामुळे त्यांना हे कागदपत्र आणि दस्तऐवज सहजपणे उपलब्ध होणे शक्य झाले.

श्री. ठाकूर यांनी मूळ मोडी लिपीत लिहिलेल्या या पत्रांचे मराठी देवनागरी लिपीत पुनर्लेखन करवून घेतले आणि अतिशय साक्षेपाने या पत्रांचे संकलन केले. पत्रांचा कालखंड इसवी सन १७२० पासून ते इसवी सन १८८५ पर्यंत म्हणजे एकशे पासष्ट वर्षांचा आहे.

या पत्रांचे संकलन आणि संपादन करताना त्यांनी आणखी एक महत्त्वाचे काम केलें. ते म्हणजे या पत्रांचा केलेंला इंग्रजी अनुवाद. मूळ पत्राचा महत्त्वाचा सारांश त्यांनी इंग्रजीत दिला आहे. यामुळें मराठी न जाणणाऱ्या अन्य भाषिक इतिहासकार आणि अभ्यासक यांची चांगली सोय झाली आहे. या ग्रंथाचे पुरःकथनकार वा प्रस्तावनाकार रियासतकार गो. स. सरदेसाई यांनीही श्री. ठाकूर यांच्या ग्रंथवैशिष्ट्याची मनापासून तारीफ केली आहे. अशा प्रकारचा द्वैभाषिक प्रयोग मराठेशाहीच्या इतिहासलेखनात अन्यत्र कुठे फारसा आढळत नाहीं. पेशव्यांच्या इतिहासाची साधनें, शिंदेशाहीच्या इतिहासाची साधनें, शिवशाहीतील इतिहासाची साधनें आदी ग्रंथ मराठीत लिहिलें गेले आहेत. मात्र ठाकूरांच्या या दोन खंडातील ग्रंथाचा द्विभाषा प्रयोग हा एक आगळावेगळा विशेष आहे, असे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

''इतिहास'' या विषयात राजकीय घडामोडींबरोबरच सामाजिक, आर्थिक, व्यापारविषयक, साहित्य, कला इत्यादी अनेक बाबींचा अंतर्भाव असतो. या पत्रसंग्रहात यापैकीं अनेक विषयांचे विवेचन त्या त्या प्रसंगानुरोधाने आले आहे. या ग्रंथात अकरा होळकर राज्यकर्त्यांच्या कारकीर्दी समाविष्ट आहेत. मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, मालेराव होळकर, प्रथम तुकोजीराव होळकर, काशीराव होळकर, यशवंतराव होळकर, द्वितीय मल्हारराव होळकर, मार्तंडराव होळकर, हरीराव होळकर, खंडेराव होळकर आणि द्वितीय तुकोजीराव होळकर. या पत्रसंग्रहांत मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आदी राज्यकर्त्यांना आलेली श्रीमंत पेशवे, सरदार, कमाविसदार, अन्य दरबारातील होळकरांचे वकील यांची पत्रे आहेत तशीच होळकर राज्यकर्त्यांनी लिहिलेंली पेशवे, सरदार, कमाविसदार, मंदिराचे पुजारी, कारभारी, भारमलदादा होळकर आदींना लिहिलेली पत्रे आहेत.

कमाविसदारांना लिहिलेल्या पत्रात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत आणि प्रामाणिकपणे वर्तणूक करण्याबाबत सूचना केल्या आहेत. आदेशाचे पालन न केल्यास काहीवेळा कडक कारवाईचा इशारा दिलेला आहे. या सूचनांमागे स्वच्छ प्रशासन, शिस्तबद्ध कारभार आणि प्रजाहिताची दृष्टी या बाबींचा ठाम विचार आहे हे स्पष्टपणे दिसून येते. त्यापैकी काही पत्रे खालीलप्रमाणे आहेत.

पत्र क्र. १३१ — इ. स. १७५८

राजश्री दामोदरपंत गोसावी यास मल्हारराव होळकर यांचे पत्र. ''या उपरी विलंब न लावतां यादीप्रमाणें कामकाजाचा गुंता उरकून जलद येणें. एक दिवस दिरंग कार्याचा नाहीं. जे याद ठरावून मुकरर करून दिली त्यापैकीं एक गोष्ट उणी अधिक केली तर कार्यास येणार नाहीं. विलंबाखाले घालून न राहणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. ८८-८९)

पत्र क्र. २५२ — ता. २० मे १७६६

राजश्री गोपाळ बल्लाळ कमाविसदार, सावेर यांस मालेराव होळकर यांचे पत्र. ''मागील बाकीचा ऐवज गडीमाणसाद्वारे तीर्थरूप मातोश्री आईंपाशी पावता करावा. त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. सरकारांत नेमणूकीचा आकार पोहोचविणें व इमानेंइतबारें वागावें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. १६३)

पत्र क्र. २८५ — ता. २८ फेब्रुवारी इ. स. १७७०

त्रिंबक राजदेव कमाविसदार, प्रगणे इंदूर यांस अहिल्याबाईंचे पत्र कीं, ''चिरंजीव तुकबांनीं लष्करातून नहेखान आरब याजला एक हजार रुपयांची वरात तुम्हावर दिली आहे. त्यासी ते वरातीचा ऐवज सरकारचे आज्ञेशिवाय आरब मजकुरास न देणें. दिलिया मुजरा पडणार नाहीं.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. १८७)

अ. क्र. ३३३ ता. ६ जून इ. स. १७७६

मामलेदार चांदवड यांस अहिल्याबाईंचे ताकीदपत्र.

ती. सुभेदारांनीं कोणकोणत्या प्रकारें आणून रयतेचे सांगोपन केले. अतःपर गैरवाजवी उपसर्ग लागूं नये. रयतेची दिलभरी करून हरएक प्रकारे गौर करीत जाणें. फिरून बोभाट आलिया उपयोगी पडणार नाहीं व परिणाम लागणार नाहीं. जाणिजे.

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. २१६)

अ. क्र. ८१ ता. १९ आगस्ट १८०७

रघुनाथ हरी दिमत पागा चिमणाजी कृष्ण यांस यशवंतराव होळकर यांचे पत्र. ''तुम्ही मशारनिल्हेचे पत्र त्यांजला देऊन सदरहू पांच खंड्या मेण निकट करून घेऊन भानपूरचे मुक्कामीं पोहोचवून देणें. या कामास दिवसगत लागल्यास मर्जी राहणार नाहीं. यावर तुम्हांकडून ढील झाल्यास ठीक नसे. हें खचित जाणोन कर्तव्य ते करणें.''

(खंड चार, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. ६३)

मल्हाररावांनी अहिल्याबाईंना लिहिलेली पत्रे म्हणजे त्यांनी अहिल्याबाईंना दिलेल्या प्रशासनिक शिक्षणाचा एक उत्तम नमुना होय. अहिल्याबाईंची क्षमता ओळखून मल्हाररावांनी त्यांच्यावर प्रशासन आणि युद्धनीतीच्या अनेक जबाबदाऱ्या वेळोवेळी सोपविल्या होत्या. त्यांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर आणि कार्यकुशलतेवर पूर्ण विश्वास होता. अहिल्याबाईंच्या चांगल्या कामगिरीबाबत ते त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत. मात्र काही चूक झाल्यास कठोरपणे समज देत.

दि. ३१ जानेवारी १७६५ रोजी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

''तुम्हांस जातेसमयीं सांगितले कीं मथुरेसी अगर आगऱ्यासी कांहीं मुक्काम न करितां भारीभारी मजली करून ग्वाल्हेरपर्यंत झाडून जाणें. म्हणून ऐसे असतां तुम्ही मथुरेसी दोन तीन मुक्काम करणार ऐसे ऐकिले. ऐसियासी जातेसमयीं समक्ष आज्ञा केली असतां त्या गोष्टी सर्व एकीकडे ठेवून मथुरेसी मुक्काम केलें हें उत्तम नसे. आम्ही सांगितले तें न करावे आणि आपल्याच चित्तास येईल तसे करणें असेल तरी सुखरूप तीर्थे करून असणें. इतकियावरी पाणी पिण्यासी देखील मथुरेस न राहतां थोर थोर मजला करून चंमल उतरून ग्वाल्हेरीस जाणें. तेथें बनेल तर पांच मुक्काम करावे. त्यास्थलीं थोर तोफखाना ठेवून त्याचे गोळे व जंबुरियाचे गोळ्याची तजवीज होईल तितके करावें. परंतु ग्वाल्हेरी अलीकडे एक मुक्काम न करणें. मागाहून वरचेवर लिहूं त्याप्रमाणें वर्तणूक करणें. तोफखाना थोर ग्वाल्हेरीस ठेवून त्याची महिन्याभराची बेगमी खर्चाची करून मग पुढें तुम्ही जाणें. चौकी पहारा मार्गाचा जाबता करीत जावा.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २११, पृ. १३८)

ता. २८ फेब्रवारी १७६५ च्या अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

''अतःपर आमचे मर्जीची दरकार आहे तर रा. बहिरो अनंत व गोविंद शामराज यांजबरोबर त्यांची (बनाबाई) रवानगी करून तुम्ही तोफखान्यासह सिरोंजेस जाणें. चिरंजीव मालबास वगैरे कोणी येऊं लागले तर कामास येणार नाहीं. लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. अबदाली सरहद्दीअलीकडे आला. सुजाउदौला वगैरे झाडून सारे गिलचे दिल्लीस येणार. पुढें मनसबा कसा काय आढळेल त्याप्रमाणें केला जाईल. तुम्ही एक घडीचा विलंब न करता सिरोंजेस जाणें. मधीं कोठें न उतरणें. लिहिल्याप्रमाणें रवानगी वाटेश्वरचे मार्गे करणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २२३, पृ. १४५-१४६)

या पत्रांवरून अहिल्याबाईंचे प्रशासन, युद्धनीती आदींबाबतचे शिक्षण किती कडक शिस्तीत झाले होते याची कल्पना येईल.

या पत्रांमधून होळकरशाहीच्या प्रशासनातील अनेक अंगांचे दर्शन होते. होळकर राज्यात धार्मिक बाबतीत सर्व धर्मांना सारखी वागणूक होती. म्हणजे सर्वधर्मसमभाव होता.

ता. २८ ऑक्टोबर इसवी सन १७६३ ला मल्हाररावांनी परगणे अंबाडच्या कमाविसदारास पत्र लिहिलें आहे. त्यात त्यांनी आदेश देत म्हटले आहे,

''सयद मोहीदिन व सयद यासीन पीरजादे अवलिया शाहअसरक यांची दरगाह कसबे अंबाडला आहे. यांनीं जाहीर केलें की पातशाही अंमलापासून इनाम जमीन चाहूर १ व चिरागचे तेल वजन आछेर आहे. तरी श्रीमंतांचे अंमलाप्रमाणें सुदामत चालत आलेप्रमाणें चालवावे.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. १८६, पृ. १२३-१२४)

मल्हाररावांप्रमाणे अहिल्याबाईंनीही हिंदूंच्या मंदिराच्या निर्माणाकरितां वा जीर्णोद्धाराकरता जशी आर्थिक मदत दिली तशीच मुसलमानांच्या दर्गा वा मशीदींच्या निर्माणाकरितां वा दुरुस्तीकरितां देणग्या दिल्या असे उल्लेख आले आहेत.

(खंड एक, होळकरशाहीचा इतिहास प्रकरण २५, पृ. २२१)

दि. ३ फेब्रुवारी १७६४ च्या पत्रात मल्हाररावांनी अंबाडच्या कमाविसदारांना पत्र लिहून वेदमूर्ती बाबा भट यांना मोगलांनी दिलेली सनद पुढें चालू ठेवावी याबाबत सूचना केल्या आहेत.

''वेदमूर्ती राजश्री बाबाभट बिन मुकुंदभट वैद्य गोत्र गार्ग्य, कसबे संगमनेर, यांनीं चांदवड मुक्कामीं विदित केलें कीं, प्रगणे मजकुरीं यजमानावर रोजीना चार आणे पूर्वी नबाब निजाम उलमुल्ख यांनी करून दिले. अलीकडे श्रीमंतांचा अंमल झाला. तरी आपण मोगलांची सनद पाहून कृपा करून रोजीना चालवावा म्हणजे स्नानसंध्या करून अभीष्टचिंतन करुं. म्हणून मनास आणितां थोर सत्पात्र स्नानसंध्याशील ब्राह्मण चालविण्यास

श्रेयस्कर जाणून प्रगणे मजकुरीं माल ऐवजी सदरहू चार आणे रोजीना वेदमूर्तीस पावीत जाणे. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न घेणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. १९३, पृ. १२७-१२८)

अहिल्याबाईंनी प्रशासनाबरोबर सैन्याबाबतही समतोलाचे धोरण आपल्या राज्यात अंगीकारले होते. पेशव्यांनाहीं त्यांनी जवळपास तीस हजारांचे सैन्य नेहमी जवळ बाळगांवे अशा प्रकारच्या सूचना वेळोवेळी दिल्या होत्या. मराठेशाहीचा खरा शत्रू इंग्रज आहे हे त्यांनी ओळखले होते. इंग्रज सत्ता एखाद्या अस्वलाप्रमाणे असून ती माणसाला गुदगुल्या करून संपवते अशा प्रकारचा इशारा त्यांनी पेशव्यांना आणि इतर संस्थानांना दिला होता. या पार्श्वभूमीवर पुणें दरबारातील होळकरांचे वकील अप्पाजी जाखदेव यांनी नाना फडणवीस यांना दि. १२ जुलाई १७८० (खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. ३७४, पृ. २४६-२४७) रोजी एक पत्र लिहिले. त्यात याच बाबीचा उहापोह केला आहे.

''१. इंग्रजांचा उत्कर्ष पाहून अहिल्याबाई पेशव्यांस वेळींच त्यांचा मोड करण्यास सुचविते.

२. अहिल्याबाई बोलत होती जे इंग्रजांनीं चहूंकडून प्रसार करण्याचा मनसबा केला आहे. तरी ह्या समयास श्रीमंतांनीं शिलेदारांचा व हुजरातीचा भरणा पुष्कळ करावा, आणि इंग्रज जागजागा कोठें दोन तीन पलटणे अशी तोड काढली आहे. अशांत जागजागा फौज पाठवून द्यावी म्हणजे मागल्यास दहशत पडेल. पुढें कोणी येऊ पावणार नाहीं. नबाब, भोसले सारे जमा होऊन इंग्रजांचे पारिपत्य करावें.''

मात्र अहिल्याबाईंनी केलेल्या या सूचनांची दखल न घेतल्यामुळे इंग्रज सत्तेने हळूहळू मराठी मुलखात आपले पाय रोवले. प्रथम यशवंतराव होळकर यांच्या (इसवी सन १७९८ - १८११) कारकीर्दीत यशवंतरावांनी इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यासाठी पेशवे, अन्य सरदार आणि भरतखंडातील अनेक राजांना साद घातली. पण त्यांना कुणीही प्रतिसाद दिला नाहीं. परिणामी इंग्रज सत्ता अधिकाधिक प्रबळ होत गेली आणि इसवी सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन इंग्रज सत्तेचा अंमल प्रस्थापित झाला.

मातोश्री अहिल्याबाई होळकर यांनी श्रीमंत पंतप्रधान व छत्रपती यांस पत्र लिहिण्याच्या पद्धतीविषयी मायने ठरविले होते. ते असे -

१. पंतप्रधानांस पत्र लिहिण्याचा मायना :

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं. विनंती सेवक अहिल्याबाई कृतानेक विज्ञापना. येथील क्षेत्र जाणोन स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष.

२. छत्रपती महाराजांस पत्र लिहिण्याचा मायना :

श्रीमंत महाराज छत्रपती स्वामींचे सेवेसीं. आज्ञाधारक अहिल्याबाई होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेत्र स्वामींचे कृपावलोकने करून यथास्थित असो विशेष.

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. ४०८, पृ. २६९-२७०)

अहिल्याबाईंचे प्रशासन, मुत्सद्देगिरी, राजकारणपटुत्व इतिहासप्रसिद्ध आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, प्रशासन, राजकीय धोरण याबाबत अनेकांनी तारीफ केली आहे. यापैकी तीन व्यक्तींचे उद्‌गार प्रातिनिधिक म्हणून पहाण्याजोगे आहेत. पहिले आहेत पेशवाईतले चाणक्य नाना फडणवीस. अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरी आणि साधेपणा या गुणवैशिष्ट्यांबाबत नाना फडणवीस म्हणतात,

''तुम्ही (=होळकर) व शिंदे श्रीमंतांचे बरोबरीचे सरदार. तुमचे व्यंग ते सरकारचे व्यंग. ये विषयींचा अर्थ पूर्णपणें बाईंचे ध्यानांत आहे. बाईंसारखी सावध व दूरदर्शी बाईच. श्रीमंतांचे सरकारांत वाघ व बकरी एक ठिकाणीं पाणी पितात.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ६४६, इसवी सन १७९२, पृ. ४२८)

अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरीची आणि राजकारणातील नेतृत्वाची प्रशंसा हैदराबादचे नबाब यांनीही केली आहे. आपल्या एका पत्रात ते म्हणतात,

''बायको असतां पुरुषांपेक्षां त्या मजला दूरदर्शी फार दिसोन झाल्या.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ५१३, नोव्हेंबर इ. स. १७८९, पृ. ३३८)

आपल्या दुसऱ्या दोन पत्रांत नबाबांनी अहिल्याबाईंची प्रशंसा केली आहे. त्यापैकीं एका पत्रात ते म्हणतात,

''अहिल्याबाई होळकर यांचे प्रतिमेस बायकांत किंवा दौलतवंतांत कोणी योग्यतेस नाहीं. कैलासवासी मल्हारराव होळकर यांची कमाई या बाईंनीं नेक जागीं खर्च करून आपला देह ईश्वरार्पण केला. ही उपमा त्यांची त्यासच.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ५७२, इसवी सन १७९०, पृ. ३८१)

उत्तरेकडील लोक दक्षिणी लोकांवर भरवसा करीत नाहींत. मात्र अहिल्याबाई या नियमाला अपवाद आहेत. चितोडहून भिकाजी गीते यांनी मेवाडच्या लोकांचे मराठ्यांबाबतचे मत कळविले. या पत्रात ते म्हणतात,

''दखनी लोकांचा भरवसा रतिमात्र न धरावा असे रांगडे म्हणतात. आम्ही चितोडास गेलो होतो. तेथें भीमसिंग, दुर्जनसिंग व संध्यागीर गोसावी हे म्हणो लागले कीं आम्हांस कित्येका गोष्टींनीं मातोश्री बाईसाहेबांचा भरोसा आहे. आम्ही कांहीं त्यास रतिमात्र अंतर करणार नाहीं.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ३२६, ता. २९ मार्च इ. स. १७७५, पृ. २१२)

रांगडे व रजपुत लोक मुली होतांच मारून टाकतात असा रिपोर्ट चिखलदे येथील कामविसदाराने केला होता. इसवी सन १८४३ सालीं होळकर दरबार आणि इंग्रज सरकार यांच्या विद्यमानें ही प्रथा बंद होण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार लोकांना ताकीद देवून कुणीही मुलींची हत्या करणार नाहीं असा बंदोबस्त ठेवावा अशा सरकारी सूचना गांवोगांव दिल्या होत्या.

( खंड चार, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २८५, इसवी सन १८४३, पृ. २३१)

अहिल्याबाईंच्या न्यायदानाची कीर्ती सर्वत्र पसरली होती. त्यामुळे इतर संस्थानातील राजे त्यांच्या राज्यातील अंतर्गत तंटे वा विवाद सोडविण्यासाठी अहिल्याबाईंचा सल्ला घेत आणि त्यांची मध्यस्थी वा निवाडा मान्य करीत. अशा संस्थानांपैकी बडवाणी, झाबुवा हे प्रमुख होत. बडवाणीच्या राणीने अहिल्याबाईंना लिहिलेले पत्र या दृष्टीने पहाण्याजोगे आहे.

''राणी बखतकुंवर बडवाणीकर यांजकडून मातुश्री अहिल्याबाई होळकर यांस. पूर्वी आपण आज्ञा केली होती कीं राज्य डामडोल आहे, त्याचा बंदोबस्त करणे. त्यास कामांत चित्त घालून बंदोबस्त थोडाबहुत केला. पण कित्येकांचे वैरी झालो. खरे बोलल्यास वाईट मानतात. याकरितां आपले अभयपत्र आल्यास चित्त समाधान पावेल. आपल्या वचनाचा आधार सर्व प्रकारें धरून आहो. आम्ही विनंती केली कीं आमचे राज्य फितुरी आहे. फितुर झाल्यास आम्हास आश्रय कोणाचा ? तेव्हां आपण वचन दिले कीं आम्ही बसलो आहोत. तुम्हांकडे कोण पाहिसा आहे ? तो प्रसंग आतां आला आहे. पूर्वी वचन दिले त्याचे स्मरण धरून साहित्य करणार आपण समर्थ आहात.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ४३१, ता. ३१ आक्टोबर इ. स. १७८६, पृ. २८४-२८५)

होळकरशाहीच्या वाटचालीत ज्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे अशा दोन व्यक्ती म्हणजे भारमलदादा होळकर आणि गोविंदपंत गानू. गोविंदपंतांकडे खासगीच्या कारभाराची दिवाणपणाची सूत्रे होती. अहिल्याबाईंनी भारतभर लोककल्याणाची जी कामे आपल्या खासगीच्या उत्पन्नातून केली, त्या सर्वांचे नियोजन, आर्थिक अंदाजपत्र, बांधकामे, कामावर देखरेख, कामाचा दर्जा, वेळेचे गणित, कामाची पूर्तता या सर्वांचे योग्य ते संतुलन आणि समन्वय साधण्याचे काम गोविंदपंत गानू यांनी केले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे पुत्र गोपाळराव गानू यांनी ही जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

भारमलदादा हे होळकर प्रशासनाचे पडद्याआडचे सूत्रधार. महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक आणि घरगुती बाबतीत अहिल्याबाई त्यांचा सल्ला घेत. अहिल्याबाईंवर त्यांची अपार श्रद्धा, भक्ती होती. अहिल्याबाईंना ते 'मातोश्री ' या नावाने संबोधित. भारमलदादांना शंभर वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. होळकरशाहीतील मल्हारराव, अहिल्याबाई, मालेराव, तुकोजीराव, काशीराव, यशवंतराव आणि द्वितीय मल्हारराव अशा सात राज्यकर्त्यांच्या

कार्यकाळात त्यांनी होळकरशाहीतील महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय कामांची धुरा सांभाळली. भारमलदादा हे आत्यंतिक निष्ठा, विवेक, समतोल आणि सात्त्विकता यांचे प्रतीक होते. ते होळकरशाहीचे जणू भीष्मपितामह होते.

या पत्रसंग्रहातील अहिल्याबाई, तुकोजीराव, यशवंतराव, तुळसाबाई, भीमाबाई, लाडाबाई यांनी भारमलदादा होळकर यांना लिहिलेली पत्रें पाहिली की अनेक प्रकारचे संघर्ष, चढउतार यातून त्यांनी होळकर राज्याची धुरा राजधानीत बसून त्यांनी समर्थपणे सांभाळली, हे लक्षात येते. ही पत्रे मुळातूनच वाचण्यासारखी आहेत. भारमलदादा हे कृतीशीलता आणि समर्पण यांचे दुसरे रूप होते. होळकरशाहीच्या सर्व सातही राज्यकर्त्यांचे ते आधाराचे खांब होते. होळकरशाहीच्या संघर्षाच्या काळात यशवंतराव होळकर यांनी राज्यकारभाराच्या प्रशासन, युद्धविषयक हालचाली, मोहिमा, लुटारूंचा उपद्रव, अहिल्याबाईंच्या छत्रीचे बांधकाम अशा विविध बाबींसंबंधात पत्रव्यवहार केला तो भारमलदादा होळकर यांच्याशी.

लोकहितकारी कामांचा अहिल्याबाईंच्या कारकीर्दीतील वारसा तिथेच थांबला नाही. तो तुकोजीराव, यशवंतराव, हरीराव आणि दुसरे तुकोजीराव यांनी सक्षमपणे पुढे चालवला. लोकहिताचे व्रत हा होळकरशाहीचा विशेष पैलू आहे. ही परंपरा दुसऱ्या तुकोजीरावांनंतर शिवाजीराव, तृतीय तुकोजीराव आणि द्वितीय यशवंतराव यांनी तितक्याच समर्थपणे पुढे चालविली.

हा पत्रसंग्रह श्री. वा. वा. ठाकूर यांची साक्षेपी निवड आणि नेटके संपादन यांचा उत्कृष्ट नमुना आहे. याकरिता मोडी लिपी ते मराठी देवनागरीत लेखन, मराठीतून प्रत्येक पत्राच्या महत्त्वाच्या मजकूराचा सारांशाने इंग्रजी अनुवाद अशा विविध प्रकारच्या दीर्घकालीन मेहनतीतून हे दोन्ही खंड साकार झाले आहेत. यातील अनेक दप्तरे, ग्रंथ पहाण्याचे आणि तपशील नोंदवण्याचे काम ठाकूर यांचे सहकारी आणि हुजूर सेवेतील मॅनेजर श्री. गणेश माधव विभूते यांनी केले आहे.

या पत्रसंग्रहातून होळकरशाहीचा एक दीर्घ पट आपल्यासमोर उलगडला गेला आहे. यात राजकीय इतिहास आहेच पण सांस्कृतिक, सामाजिक, इतिहासाचे अनेक पैलू यातून प्रकट झाले आहेत. होळकरशाहीतील राज्यकर्त्यांचा पराक्रम, दूरदृष्टी, लोकाभिमुख विचारधारा, सर्वधर्मसमभाव, न्यायनिष्ठा, मुत्सद्देगिरी, देशासाठी सर्वस्व पणाला लावण्याची जिद्द या गुणांचे दर्शन होते. अहिल्याबाई होळकरांनी तर राज्याच्या सीमारेषा ही संकल्पना दुय्यम ठरवून अवघे भरतखंड हे आपले कार्यक्षेत्र मानले.

पत्रांची भाषा तत्कालीन मराठी आहे. भाषेचे वळण जुने आहे. पत्रांमध्ये अनेक अरबी, फारसी, उर्दू भाषेचे शब्द आले आहेत. मराठेशाहीत पत्रव्यवहारात अरबी सन, शालिवाहन शक, संवत वर्ष आणि इसवी सन यांचा प्रयोग केलेला दिसून येतो. पत्राचे मायने आणि पत्रांचा शेवटही फारसी, अरबी पद्धतीने केलेला आढळतो.

पत्राच्या आरंभी श्री, श्री म्हाळसाकांत असे शुभवाचक शब्द आले आहेत. काही ठिकाणी श्री मार्तंड, श्री शंकर, श्री सरस्वत्यैनमः, श्री दत्त, श्री मोरया, श्रीराम असे शब्द आहेत. मल्हारराव, अहिल्याबाई आणि यशवंतराव या प्रमुख राज्यकर्त्यांच्या पत्रात मात्र 'श्री' हे शुभाक्षर वापरलेले आहे असे दिसून येते. होळकर घराणे शिवभक्त. श्री म्हाळसाकांत वा श्री मार्तंड म्हणजे खंडेराय. हे शिवाचेच रूप आहे. म्हणूनच श्री म्हाळसाकांत, श्री मार्तंड वा श्री शंकर हे शब्द वापरले असावेत, असे अनुमान करता येते.

'होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें' या ग्रंथाचे दोन खंड अनुक्रमे १९४४ आणि १९४५ या वर्षी प्रकाशित झाले होते. त्यानंतर सुमारे ७५ वर्षांचा काळ लोटला आहे. आता ते नव्याने सुधारित स्वरूपात पुन्हा प्रकाशित होत आहेत. त्यामुळे इतिहासकार, अभ्यासक आणि रसिक यांची मोठी सोय होईल, हे निश्चित. या ग्रंथांचा दुर्मीळपणा ही एक मोठी उणीव या ग्रंथांच्या प्रकाशनाने दूर होईल असा विश्वास वाटतो.

पूर्वसूरींचे ऋण मान्य करून या ग्रंथांचे पुन्हा संपादन करताना काही आवश्यक ते बदल केले आहेत. अभ्यासाच्या दृष्टीने अधिक सुलभ व्हावे म्हणून भाग १ व भाग २ एकत्र करून पत्रक्रमांक सलग घेतले आहेत. याशिवाय अभ्यासकांच्या आणि रसिकांच्या आकलनाच्या सुलभतेकरिता शब्दार्थ/टीपा, सूची, संदर्भग्रंथ सूची अशा विशेष बाबी सोबत जोडल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांनी होळकरशाहीच्या समग्र इतिहासाचा प्रकल्प संपादनासाठी माझ्याकडे सोपविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या ग्रंथांचे आवश्यक त्या ठिकाणी संपादन करून हे काम विहित कालवधीत पूर्ण करता आले याबाबत समाधान वाटते. या कामी अनेक नामवंत इतिहासकार, अभ्यासक, रसिक आणि सुहृद यांचे अनेक परींचे सहकार्य लाभले. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

मा. जयसिंगराव पवार (कोल्हापूर), प्रा. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. लीला गोविलकर (अहमदनगर), प्रा. ना. ग. काळे, राजेंद्र लाळगे, सुनील मतकर, सुभाष वाघमारे, विठ्ठलराव गावडे (इंदूर), वसंत महेश्वरकर (महेश्वर), रामभाऊ लांडे (अंबड, जि. जालना), डॉ. सुधीर तारे, डॉ. दिलीप बलसेकर, रवीन्द्र लाड, प्रतापराव पाटील, मुकुंद सराफ (मुंबई), डॉ. अरुणचंद्र पाठक, डॉ. गिरीश मांडके (पुणे) यांचे अनमोल सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासकार आणि साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेचा आणि मागदर्शनाचा संपादन कार्यात विशेष उपयोग झाला हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे आवश्यक आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.

या ग्रंथाच्या संपादनकार्यात अनेक इतिहासकार, अभ्यासक, तज्ज्ञ, रसिक आणि सुहृद यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**डॉ. देवीदास पोटे**

मुंबई, दि. १० जुलै २०१८ संपादक

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **अध्यक्षांचे मनोगत** | तीन |
| **प्रस्तावना** | सहा |
| **होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें**<br>पत्र अ. नं. १ ते ३४६ | १-२९७ |
| **संदर्भग्रंथ सूची** | २९८ |
| **शब्दार्थ/टीपा** | २९९ |
| **सूची** | ३०३ |
| **संपादक परिचय** | ३०९ |

# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

# भाग २ रा

( इ. स. १७९७-१८८६ )

---

## होळकर सरकारांच्या आज्ञेनें प्रसिद्ध झाला.

*Statements of facts and figures or opinions expressed by the author in the publication are not to be taken as an indication of any authority, sanction or commitment on the part of His Highness the Maharaja Holkar's Government.*

**संपादकः—वा. वा. ठाकूर, बी. ए.**

**इ. स. १९४५.**

होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदूर.

**अ. नं. १** **श्री**

इसवी सन १७९८

यादी पोथ्या, पुस्तकें संग्रह श्रीमंत मातुश्री अहिल्याबाईसाहेबांचे कडील :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गीत गोविंद सटीकपत्रें | १ | श्रीधरी अध्याय १८ |
| १ | चित्रपटी मीमांसा | १ | मुहूर्त चिंतामणि |
| १ | कान्यकुब्ज माहात्म्य | १ | नैमिषारण्य माहात्म्य |
| १ | निर्णयसिंधू | १ | महाराष्ट्र विराटपर्ववही |
| १ | व्यंकटेश स्तोत्र | १ | जन्माष्टमी पूजा |
| १ | जंबु मार्ग प्रस्ताव | १ | मथुरा माहात्म्य |
| १ | पुष्कर क्षेत्र माहात्म्य | १ | अध्यात्म रामायण सप्तकांड |
| १ | आश्रमवास पत्रें | १ | महाप्रस्थान पत्रें |
| १ | स्वर्गारोहण | १ | सभापर्व धाकटा साचा |
| १ | वनपर्व लहान सांचा | १ | विराटपर्व लहान साचा |
| १ | उद्योगपर्व लहान सांचा | १ | भीष्मपर्व |
| १ | द्रोणपर्व | १ | वेदाची पोथी |
| १ | ज्ञानेश्वरी पोथी | १ | रुक्मिणी स्वयंवर |
| १ | पंचरत्नीभगवत्‌गीता | १ | पूजा प्रकार |
| १ | ज्ञानेश्वर प्रार्थना | १ | श्रीदेवी मानसपूजा |
| १ | अणु वेदांत | १ | श्रीमद्‌भगवद्‌गीता |
| १ | विष्णुसहस्रनाम | १ | श्रीमल्हारी कवच |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मल्हारी स्तवराज | १ | श्रीविष्णु वर्म |
| १ | अपामार्जन | १ | चंडिका पूजा |
| १ | सिंहस्थ विधी | १ | रुद्र |
| १ | श्रीभैरव तंत्रोक्त सूक्त | १ | उपाकर्म |
| १ | सर्वसार तिथी निर्णय | १ | वापीकूपोत्सर्ग प्रयोग |
| १ | विष्णु प्रतिष्ठापद्धत | १ | श्रावणमास माहात्म्य |
| १ | चातुर्मास माहात्म्य | १ | रसमंजरी |
| १ | वायुस्तुती सटीक | १ | वैद्य ग्रंथ |
| १ | आन्हिक वेदोक्त | १ | रघुवंश सटीक |
| १ | दर्श पौर्णिमा | १ | पंचतंत्र |
| १ | शिक्षा उपनिषद्. प्रकृतीहोत्र | १ | ग्रहमख, नवग्रहयंत्र |
| १ | अमरकोष तीनकांडें | १ | पद्मपुराण, मल्हारीसहस्रनाम |
| १ | ब्रह्म पंचिका सटीक | १ | पंचक्रोशी माहात्म्य |
| १ | श्रीमद्भागवत द्वादशस्कंध | १ | श्री वाल्मिकीं रामायण सप्तकांड |
| १ | हरिवंश | ७ | मयुखे, शांति, समय, दान, श्राद्ध, |
| १ | कन्यादान विधी | | प्रायश्चित्त व उत्सर्ग मयूख इ. |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 1 1798 A.D.

List of books in the Library of Devi Shree Ahilyabai Holkar.

---

**अ. नं. २**

**श्री**

ता. ६ जानेवारी, इसवी सन १७९८

बाळाजी नारायण यांजकडून बाबाजी व बालाजीचे नावें पत्र विशेष. आपण तीन पत्रें यजमान आल्यावर पाठविलीं, ती पावलीं. सरकारची पत्रें सरकारांत निवेदन करीत गेलों. यजमान अद्यापि पळसीस आहेत. राजश्री मुकुंदरावजी बाजी येथें येऊन पुण्यांत गुप्त होते, ते काल सायंकाळीं लष्करांत आले आहेत. यजमानसाहेबांची भेट जाहली. रा. रामसिंग जाधव येथेंच आहेत. येथें नित्य नवे बूट निघतात. कोणी कोणांत नाहीं. दाजीबांनीं कांहींला घाटावर आणले होते. परंतु तेच दिवशीं रा. नानांची दशा जाहली. याजमुळें झाडून एकीकडे जाऊन पाहिल्यापेक्षाहीं कठीण जाले. रा. दाजीबाबा, कृष्णरावभाऊ व श्रीपतराव गांवांत गुप्त आहेत. नाना धरल्यापासोन कित्येकांचे घरीं चौक्या बसल्या.

लहान मोठे फेरियांत आले. रा. दादाजीचे व देवराव तात्यांचे घरीं रावतांच्या चौक्या बसल्या आहेत. वाकडे यांनीं टाळा दिला आहे. कोठें त्यांचा ठिकाणा नाहीं. हे परिहार कोठवर ल्याहावें ? परंतु हासिल वर्तमान काल प्रहर रात्रीं चंद्रोदयाचे समयीं आमचे येथें दरबाराहून रा. रघुपंत खंडेराव पालखींत बसोन गांवांत आपले घरीं जात होते. गांवासमीप नागझिरीवर ५०० माणूस छाप्याचे गुप्तरुपें होते. त्यांनीं पालखीचे भोई चार पांच व खाशाचे तीन तुकडे केलें. हें वर्तमान सरकारांत चौकीदारांनीं सांगितलें. त्यावरून श्रीमंतांनीं पन्नास माणूस त्याचे घरीं चौकीस पाठविलें. मुरदा रात्रीं तसाच ठेविला आहे. आज अद्यापि दहन झालें नाहीं. इतःपर होईल असें जालें, पुढें होईल तें पाहवें. तुम्ही सरकारांत पत्र लिहितां तशीं तपशीलवार लिहीतच असावी. ते पत्र पाहोत, अथवा न पाहोत, उत्तरें होतील तशी पाठवीत जाऊं. कळावे सेवेसीं बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 2 6-1-1798 A.D.

Balajee Narayan to Babajee and Balajee : Nana Fadnis is under arrest.

Uneasiness prevails everywhere. Raghupant Khanderao was assassinated while he was going home in a palanquin.

---

**अ. नं. ३** **श्री**

ता. २४ जानेवारी, इसवी सन १७९८

बालाजी नारायण व नारो खंडेराव यांजकडून बाबाजी व बाळाजीस पत्र. माघ शुद्ध ७ बुधवार. विशेष. काल पंचमीस श्रीमंतांनीं आपल्या वाड्यांत रंग केला. यामुळें सर्वांस बोलावणीं केली. त्यावरून लहानमोठे गेले होते. सोबतीही आले. आपले यजमानही गेले होते. रंग, गुलाल, नाच, दोन प्रहरापासोन अस्तमानपर्यंत झाला.

१ येथील प्रकार सर्वपरी व्हावा तसा विलक्षण झाला. ईश्वरच सर्वांची स्थिती कशी राखील ती राखो. उपाय काय ? सर्व मंडळी लहान थोर सर्वांचे नांवें मनस्वी आंख टाकले आहेत. आज तृतीय प्रहरीं दिवाण कारभारी यांस पुढें घालून नेले. तेही रात्रभर तेथेंच राहिले. याद झाली. तगादे होणार त्यामुळें राजश्री गोविंदराव रघुनाथ गानू गांवांत होते. त्यांनीं पुत्रासहित स्थलांतर केलें. येथील प्रकार कोणत्याही प्रकारें सोईचा दिसत नाहीं. थोडेंच लिहिलें यात फार समजावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 3 24-1-1798 A.D.

Balajee Narayan and Nato Khanderao to Babaji and Balajee : The Peshwa invited all the sardars for Ranga Panchami in the Wada. Scindia and Holkar both attended.

A list of general taxation-unbearable indeed-is prepared. Times all round are very hard.

---

**अ. नं. ४** **श्री**

ता. ११ फेब्रुवारी, इसवी सन १७९८

रामराव अप्पाजी यांजकडून बाबाजी व बाळाजी मुक्काम पुणें यांस विशेष. येथील प्रकार जो कांहीं झाला आहे, तो पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. महेश्वराची वार्ताही यांच्या गांवीं नाहीं. राजश्री संताजी बाबा व जीजीबाई वगैरेची रवानगी करू म्हणतात. दोनचार दिवसांत झाल्यास होईल, परंतु भरंवसा नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 4 11-2-1798 A.D.

Ramrao Appajee to Babaji and Balaji at Pune. Things here are undescribable. Santajee Baba and Jijabai will be sent away from here. Every thing is in a flutter.

---

**अ. नं. ५** **श्री**

ता. २४ मार्च, इसवी सन १७९८

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून दुदरनेक फरांसीस यांस विशेष. राजश्री पदमसी तिलोकसी सावकार याजकडील गुमास्ते पूरणमल, यांनीं सरकारांत विनंती केली कीं, आमचा कर्जाऊ ऐवज इंदुरांत लोकांकडे येणें व सरकारांतून वराता महालानिहाय मामलेदारांवर दिल्या त्याची बाकी राहिली तो ऐवज वसुलांत आला पाहिजे. कलमें येणेंप्रमाणें :

१ राजश्री आबाजी धोंडदेव कमाविसदार प्रगणे इंदूर यांजकडे साडेएकोणीस हजारांची बाकी राहिली तो ऐवज तुम्ही त्याजला ताकीद करून फडशा करून घेणें.

१ आमीचंद खुशालचंद पटवारी मौजे डकाच्या, बरलाई यांजकडे वरातीपैकीं साडेतीन हजार रुपये बाकी राहिली असेल, तिचा फडशा ताकीद करून निर्गम करून देवणें.

१ रा. भालचंद्र तान्हाजी कमाविसदार मौजे आटाहेडा, कर्नोदा वगैरे देह पांच ५ यांजवर चौदा हजारांची वरात सरकारांतून दिली. तो ऐवज अद्यापि आदा जाला नाहीं. त्यास तुम्ही ताकीद करून निर्गम करून देणें.

१ गंगा मुकाती मौजे राऊ हिजकडून वरातीपैकीं बाकीचा ऐवज येणें, तिजला ताकीद करून फडशा करून देणें.

१ किरकोळ कुळें सावकार मशालनिल्हे यांचा कर्जाऊ ऐवज येणें. ते सुरळीतपणें निकाल करीत नसल्यास तुम्ही ताकीद करून वाजवी खतपत्राचे रुईनें निर्गम करून देवणें.

१ उमर पटीचा सावकार मशारनिल्हे यांस तगादा करणें.

येकुण सहा कलमें अंमलात आणण्याविषयीं हे पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी सदरहूप्रमाणें अंमलात आणोन वाजवीचे रुईनें फडशे करून देवणें. येविषयींचा बोभाट सरकारांत न ये तें करणें. जाणिजे छ. ५ सवाल ज्यादा काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>तुकोजी सुत काशीराव होळकर |
|---|

No. 5 24-3-1798 A.D.

Srimant Kashirao Holkar to Dudernek : Send a list of debtors and their amounts, (submitted by Padamsey Tiloksey) and orders to take due measures for the recovery.

---

**अ. नं. ६** **श्री**

ता. ३० मार्च, इसवी सन १७९८

श्रीमंत काशीराव होळकरांकडून कमाविसदार परगणे पाटण यांस पत्र विशेष परगणे- मजकुराचा शेरी नजराणा साल मजकुर, साल मजकुर, साल गुदस्त रा. पदमसी राजसी सावकार यांजकडे देविला तो ऐवज अद्याप सावकारास पावला नाहीं म्हणोन हुजूर विदीत जालें त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी वरातीप्रमाणें ऐवज देऊन पावती घेणें. फिरोन बोभाट आल्यास परिछिन्न ठीक पडणार नाहीं. जाणिजे छ. ११ सवाल. मोर्तबसुद.

२ ह्याच मजकुराचे पत्र कमाविसदार झाबवे यांचे नांवें छ. मजकुरीं रवाना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 6 30-3-1798 A.D.

Srimant Kashirao Holkar to the Kamavisdar, Pargana. Patan: The

Sheri Nazrana of the Pargana of the last and current year has long been assigned to Padamsey Rajasey. He has not yet received it. Delay in payment will be taken into serious consideration.

A similar order was passed to the Kamavisdar, Pargana Zabuwa.

---

**अ. नं. ७** **श्री**

ता. ४ मे इसवी सन १७९८

रामराव अप्पाजीकडून पुण्यास बाबाजीचे नांवें पत्र विशेष. येथें तर तूर्त सोबत्याकडील देण्याचे वरात ऐवजी निकड आहे. येथील विचार पाहतां तेथील अगदींच विसर पडतो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 7 4-5-1798 A.D.

Ramrao Appajee to Babajee at Pune. The bills of payment due to Scindia are too hard pressing for us to think of things there.

---

**अ. नं. ८** **श्री**

ता. १० जून, इसवी सन १७९८

रा.संताजी होळकर यांजकडून पुणें येथें बाबाजीपंतांचे नांवें विशेष. कस्बे खरगोण येथील बनारसीदास शेठ व देवीदास निहालचंद वगैरे यांजविशीं तुम्हास कोणी गैरवाका समजाविला कीं उभयतां शेठ लयातें पावले. त्यांच्या स्त्रिया आहेत. त्यांचे पोटीं संतती नाहीं. सबब निवारसी माल सरकारांत घ्यावा. त्यांजवर तुम्ही नानाजी गंगाधर याची रवानगी करून उभयतां शेठ यांचे घरी दुकानाची जप्ती करवून अडीचशें रुपये घेतले. येणेंकरून दरोबस्त शहरांत हाकाहाक होऊन रयत दुबळी झाली आहे. तमाम सावकार मंडळी उठोन बऱ्हाणपुर अगर मंडलेश्वरास जाणार. शहराची वस्ती भंगल्यास पुढें आणावयासी दीर्घ प्रयत्न लागेल. खरगोण व इंदूर येथील रयतेची बरदास्त कोण्या प्रकारची कशी झाली, त्याची निभावणी केली हे आदिअंत तुम्हास माहितच आहे. कोणाचे गैरवाका समजाविल्यावर जाऊन त्याचे द्रव्याची अशी दुर्दशा करून याप्रमाणें करावें हें उचित नाहीं. तशांत कोणी हरामखोरानें पेशजी ती. कैलासवासी मातुश्रीसाहेबांस येविषयीं समजाविलें. त्यास ते समयीं समजाविणारास शिक्षापूर्वक ताकीद करून एक्या पैशाचा अभिलाष न करतां सावकाराचे लौकिकावर दृष्टी देऊन उभयतां सावकारांचा पैका समक्ष बोलावून त्यांची सर्वपरीनें

खातरजमा करून आज्ञा केली कीं, तुमचे पैशाची आशा दुराशा सरकारांत करावयाची नाहीं. तुम्ही आपले खातरजमेनें आपले द्रव्याचे व्यय ईश्वरप्रीत्यर्थ करून सुखैव नांदावे. याप्रमाणें समाधान करून बहुमान वस्त्रें देऊन बिदा केलें. मातुश्रीसाहेबांची आज्ञा प्रमाण मानून उभयतां बाया वर्तणूक करितांत. नंतर चिरंजीव काशीराव बाबा यांची स्वारी देशीं जाण्याचे उद्देशें बलकवाड्यास आली होती. ते समयीं पुण्य खर्च करणाराने केलें. परंतु चिरंजीवानीं मागील केलें ध्यानांत आणून चित्त न घालतां उफाटे सांगणारांस फजीत केलें. हे सर्व तुम्हांस माहीत आहे. तरी मातोश्रीसाहेबांचे केलें कामांत व्यत्यय पाडून याप्रमाणें घडावे हे उचित नाहीं. येणेंकरून लौकिकांत विपर्यास दिसून ठीक दिसत नाहीं. मातोश्रीसाहेबांनीं केलें असेल, ते विचारपूर्वक केलें असेल. याजकरितां हे पत्र. तुम्हांस लेखन केलें असे तर येविशींचा अंदेशा दूर करून ज्यांनीं गैरवाका समजाविला असेल त्यास शिक्षा करून, कारकून जप्तीस पाठविले आहे त्यास मना करून बोलावून घ्यावें. यांत सर्वात्मा चांगले आहे. नाहीं तर सर्व सावकार उठोन जातील. शहर उजाड होईल. वस्ती भंग पावल्यास जमणें कठीण जाईल. हल्लीं काल, देश, वर्तमान कोणत्या प्रकारचे याचा विचार करावा. सावकाराचें पत्र येथें आले. त्याची खातरजमा करून तुम्हांस लेखन केलें आहे. उत्तर ताबडतोब पाठविणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 8      10-6-1798 A.D.

Santajee Holkar to Babajee Pant at Pune : Misrepresentation of facts induced you to confiscate the shops of Banarase Shet and Devidas of Khargone. This action has resulted in unrest of the town. After ascertaining facts I write to you to revoke your former orders. The letter mentions the action taken by the late Devi Ahilyabai as a precedent to be followed.

---

**अ. नं. ९**      **श्री**

ता. १२ जुलाई, इसवी सन १७९८

रामराव अप्पाजीकडून बाबाजीस पत्र मुक्काम वडगांवनजीक विठ्ठलवाडी येथून विशेष. सोबत्यांचे गृहकृत्यामुळें अत्यंत त्रास झाला आहे. या अशा अन्यायाकरितां श्रीमंतास साह्य होणें प्राप्त झालें. याकरितां आपण तर अर्थातच आलों. दिवस प्रर्जन्यकाळ. आपला प्रकार तर असा बेसरंजाम. त्यात चालीचे प्रकार प्रसिद्धच आहेत. तुम्हीही तेथें येथले विचाराकरितांच अडचणींत, म्हणोन तुमची पत्रें किती आली आणि येतात. यास्तव आम्हीहि माहितगारीमुळें विनंती करीत असतां येथें नित्य नूतन विचार उत्पन्न होतात. यामुळें कोण्याहि गोष्टीचा उपयोग घडून येत नाहीं. आतांसी नेटाची काळजी लागली आहे त्याचाहि

निश्चितार्थ होऊन निदर्शनास येईल ते खरें. या समयांत तद्वेशचे महालचे सोबत्याकडील फौजेचे मनस्वी बोभाट, रोखे वगैरे केल्याचे आले. त्यावरून त्यांजकडील पत्रें व तुमचे नांवें सरकारी पत्रें पाठविलीं आहेत. त्याप्रमाणें सोबत्याचा सरंजाम जेथें असेल, ज्याजकडून महालोमहाल रोखे झाले असतील, त्यांजकडे पाठऊन आपले जिल्ह्यांत कोठें उपसर्ग न लागे ते करावे. वरकड मजकुर तुमचे घरू पत्रावरून समजतच असेल. कळावे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 9 12-7-1798 A.D.

Ramrao Appajee from Vitthalwadi to Babaji. The actions of Scindia are making it too hot for us. Bills of payment are sent to our Mahals in the South. Please see no harm is created.

---

**अ. नं. १०** **श्री**

ता. ३१ आगस्ट, इसवी सन १७९८

श्रीमंत राजश्री बाबाजी स्वामींचे सेवेसीं मैराळ गणेश. कृ. साष्टांग नमस्कार वि. मुक्काम ब्राह्मणगांव विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री यशवंतराव होळकर बागेत राजश्री नारायणराव अप्पा जवळ आहेत. त्यांची मर्जी ब्राह्मणगांव घ्यावे. रेवा उत्तरतीर घाटबंदी पवारांनीं केली. काम चालत नाहीं. गोवर्धन भील व त्याचा कारकून दोनचारशें माणसें असे येऊन शेतमळ्यापलीकडे दोन कोस आहे. त्याचे मनांत पागेवर पडावे. राजश्री यशवंतरावजींचे मनांत ब्राह्मणगांवावर पडावें. असें चहूकडून एकच झाले आहे. आम्हांस तर कोठें जाण्यास ठिकाण नाहीं. मुलालेकरांसुद्धा पेचांत पडलों. साहेबांस दहादा पत्रें लिहिलीं कीं, खरगोणचा संरजाम पाठवून देणें. पण साहेबांचे मर्जीस न आलें. आम्ही मात्र सर्वापरी मुकलों. उपर कांहींच होत नाहीं. असो. धनी आहेत. पिंगळे यांचा सरंजाम खिंडारीस गेला. बावळे तर मुलें सोडून येत नाहीं. रोजमुरा चंदी मात्र द्यावा. असा आमचा भोग आहे. तो भोगूं. आमचा उपर होत नाहीं. आतां तरी पागा शेपन्नास माणसें पाठवावे. खरगोणचा सरंजाम लौकर येईल असें करावें. महाल रहात नाहीं. धरमपुरीकर फितुर करितांत. कचेरीत राहून असें करावे हे काय ? रा. रा. नारायण अप्पास निक्षून लिहिणें. येथें कांहीं ताळ नाहीं. जैसे मर्जीस येईल तसें उत्तर पाठवावें. एक कचेरीची घाटबंदी झाल्यानें इकडे उपद्रव होणार नाहीं. आम्ही लिहावें परंतु समयास उपयोग नाहीं. ऐवज वसुलाचे वेळेस मात्र प्राण द्यावयास सिद्ध असूं. बंदोबस्त करणार धनी समर्थ आहेत. कोठारियासह सरंजाम गेला तर इकडे भिल्लांचा दबाव. याजकरितां बहुत विनंती पत्रें लिहिली आहेत. हल्लींही सेवेसीं लिहिलें आहे. मुलालेकरांची व रयतेची करुणा येऊन बंदोबस्त केला पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 10 31-8-1798 A.D.

Mairal Ganesh from Bramhangaon to Shrimant Rajeshri Babajee : Srimant Yeshwantrao Holkar aims at capturing this place. Govardhan Bhill with two to four hundred followers has the same aim: we are without men as well as ammunition. Letters have availed nothing till now.

---

**अ. नं. ११** **श्री**

आगस्ट, इसवी सन १७९८

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून बापूजी शिंदे यांस पत्र. विशेष. खासगीकडील धर्मादाय खर्चाचे गांव पांच तालुके माकडोन परगणे तराणे येथील तुम्हांकडील स्वार वराता घेऊन आले. गांवास मनस्वी उपसर्ग होऊन खर्च वगैरे व्यर्थ घेतात म्हणोन तालुके मजकुरचे पाटलांनी बोभाट लिहिला. त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे. प्रगणे मजकुरचे मामलेदार मल्हार बाबाजी यांनीं घासदाण्याचा फडशा केला असतां गांवास उपद्रव करावयाचे कारण काय ? कोणी गैरवाका वरात केली असेल ते मना करून स्वार बोलाऊन घेणें. बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 11 August, 1798 A.D.

Srimant Kashirao Holkar to Bapujee Shinde. Bills of payment were sent to five villages of Khasgi in Taluka Makadon. Villages are harrassed. Ghasdana is already paid. Why then this trouble ?

---

**अ. नं. १२** **श्री**

ता. ३० सप्टेंबर, इसवी सन १७९८

सौभाग्यवती लक्ष्मीबाई होळकर यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. बहुत दिवस जहाले तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यांस वरचेवर आपलेकडील वर्तमान लिहित जाणें. इकडील नवल विशेष लिहिणें योग्य नाहीं. परस्परें तुम्हांस समजतच असेल. रवाना चंद्र १९ रविलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**पळसी रेकॉर्ड**

No. 12 30-11-1798 A.D.

Saubhagyawati Laxmibai Holkar writes to Ramrao Appaji : For a long time we have received no news from you. You must have been already acquainted with the events as they pass here day by day.

---

**अ. नं. १३** **श्री**

ता. ४ नोव्हेंबर, इसवी सन १७९८

आबाजी खंडेराव यांजकडून आबाजीस पत्र. विशेष. येथील प्रकार नित्य नवा. आजपावेतों कोणतीही गोष्ट सोईची दिसून येत नाहीं. दौलत मोठी वाहात जाते. घडी लावणार मार्तंड समर्थ आहे. नवे जुने कारभार जाहले. परिणाम कसा होईल तो होवो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 13 4-11-1798 A.D.

Abajee Khanderao to Abajee : Every morning brings new arrangements in its train; wastage all round is writ large. God alone will bring order out of the present chaos.

---

**अ. नं. १४** **श्री**

ता. १४ नोव्हेंबर, इसवी सन १७९८

संताजी होळकर यांजकडून बाबाजी अनंत व आबाजी रणछोड यांस पत्र विशेष. राजश्री यशवंतराव होळकर यांनीं पवारास सामील करून, देपाळपूरास उपद्रव देऊन, ठाणें घेतले. पुढें उपक्रम करणार अर्थी कांहीं सरंजाम सिद्ध करून एखादा आळ्याचा माणूस समागमें देऊन, रात्रींचा दिवस करून येऊन परभारें बंदोबस्त होऊन अर्थ करावा म्हणोन लिहिलें ऐसियास सरंजाम इकडील पाठवितों. परंतु या प्रांतीं भिल्लांनीं उपद्रव बहुत आरंभिला आहे. दरोबस्त घाटचा मार्ग बंद पडून, तमाम गांव मारितात. लोकांनीं खाया खर्चाविशीं गवगवा आरंभिला आहे. त्यास देण्यास कोठें ऐवजाचा ठिकाण नाहीं. अशा परम अडचणींत लोकांस चाकरी सांगांवी, त्यास ते बिनाखाया खर्चाचे बेहबुदीवांचून ऐकत नाहींत. तशांत पुनः आणखी सिंहावलोकन राजश्री आबाजी लक्ष्मण यांनीं करून सावरून आले आहेत. त्याचें आमचें हाडींवैर. तो उपद्व्याप करावयास चुकणार नाहीं. हेहीं अरिष्ट थोरले आहे. याचे आदिअंत वर्तमान देशीहून राजश्री कृष्णजी मुकुंद आले ते आपल्यास सांगतील. याअर्थी आम्हाकडील

सरंजाम तर या शहास गुंतला. तुम्ही आपल्याकडील सरंजाम तयार करून शह घालून पवार यांजकडे पत्र लिहून त्याजकडील गांव सोडवून, ज्यात चिरंजीवाचे खूळ मोडे तो अर्थ करावा. फिरंगीही तुम्हांजवळ आहेत. त्यापक्षीं पारिपत्यास कमती न करावी. राा. छ. ५ जमादिलावल तिसातिसेन मयावअलफ. बहुत काय लिहिणें, हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 14 14-11-1798 A.D.

Santajee Holkar to Babajee Anant and Abajee Ranchhod : Pleads his inability to oppose Srimant Yeshwantrao Holkar who has advanced as far as Depalpur. He asks them to undertake the work themselves.

---

**अ. नं. १५** **श्री**

शके १७२१ संमत १८५६, इसवी सन १७९९

यादी श्रीमंत कैलासवासी मातोश्री अहिल्याबाईसाहेब होळकर खाजगीकडील शेरी नजराणा वगैरे आहेत त्याजबद्दल, शके १७२१.

८९३०९- ४-० शेरी नजराणा, २४१४५-९-० प्रांत स्वदेश,

७८६६-११-८ प्रांत नेमाड, ५७,२९७ प्रांत माळवा.

२४१४५-०९-० प्रांत स्वदेश

| | | | |
|---|---|---|---|
| ७०००-०-० | प्राा अंबाड | २३००-०-० | प्रगणे शेगांव |
| १५००-०-० | तालुके देपूर | ३००-०-० | प्रगणे चांदवड |
| ३००-०-० | प्राो गाळणे | ४०००-०-० | सुलतानपूर |
| ४०००-०-० | नंदुरबार | ५००-०-० | उत्राण |
| २४६-८-० | ता. वडेल | १४९९-१-० | थालनेर |
| १०००-०-० | प्राो अडावद | १०००-०-० | प्राो रावेर |
| ५००-०-० | ताो कोरहाळे | ०-०-० | लंग |

७८६६-११-० प्रांत नेमाड

| | | | |
|---|---|---|---|
| १०० | प्रगणे कानसूळ | ५०० | प्रगणे अंबा २०० व सेंधवे ३०० |
| ३०० | नागलवाडी | २०० | ब्राह्मणगांव |
| ४००० | सरकार बिजागड | १००० | कोठडा, नि. बुळे |
| १००० | प्राो, महेश्वर चोळी | ५०० | बागदरा |
| २६६-११-० | प्राो करहाई | ० | लंग |

५७२९७-००-० प्रांत माळवा

| | | | |
|---|---|---|---|
| ६०० | प्रगणे इंदूर, ऐवजी राहूगांव | ५४७ | प्रगो देपाळपूर |
| ७५०० | ,, रामपुरा | ३००० | ,, पिढावा |
| ४००० | ,, मल्हारगड | ४५० | ,, जार्डा कंजार्डा |
| ३०० | ,, नंदवाई | १००० | ,, जावरे |
| १५०० | ,, झाबुवा | १२०० | ,, हसलपूर |
| १२०० | ,, कायथा | २१०० | ,, महतपूर |
| १२५० | ,, पाटण, नि. बुळे | १००० | ,, जिरापूर |
| १००० | ,, माचलपूर | १६०० | ,, देवळे प्रतापगड |
| ४००० | ,, सिरोंज | ४००० | ,, टोंक, रामपूर |
| ५००० | ,, कोंच | ५००० | ,, संस्थान कोटा |
| ८०० | ,, संधारे | ६०० | ,, रायपूर |
| १००० | ,, अंतूर | ४५० | ,, बेटमे |
| २०० | प्रगणे सुंदरशी | ५०० | प्रगो पीपलोद |
| २००० | सेरीचा गल्ला, इंदूर, सावेर. | ० | ,, निंबाहेडा ऐवजी मौो पिपळा. |

..................

८९३०९-४-०

२७३१६-११-० शेरी नजराण्याऐवजी गांवें ११६६-११-० प्रांत दक्षिण, २६१५०-०-० प्रांत हिंदुस्थान.

११६६-११-० प्रांत दक्षिण परगणे थालनेर येथील मौजे जामटे व उखळवाडी गांव दोन.

२६१५०-००-० प्रांत हिंदुस्थान.

१३०००-००-० प्रगणे देपाळपूर, मौजे आटाहेडा वगैरे, शेरी नजराणा ऐवजी ४००० व खासगीचे ९०००

१५०-००-० प्रगणे करहई येथील बेलबावडीगांव शितोळे यांचे हिश्शाबद्दल लावून घेतला.

०-००-० तालुके मानपूर धुमाळ, शिंदे जहागीरदार.

११०००-००-० प्रगणे तराणा, तालुके करंजमाकडोन.

२००-००-० ,, नेमावर येथील तालुके हरणगांव.

.................

२६१५०-००-०

.....................

२७३१६-११-०

११३८०० चोळी ऐवजी फुटकळ गांवे. २६३०० प्रांत दक्षिण
८७५०० प्रांत माळवा.

२६३०० प्रांत दक्षिण.

७७०० प्रगणे चांदवडपैकीं, २१०० मौजे शिवडी, ५६०० मौजे नांदूर मध्यमेश्वर.

३०० मौजे तलवड, सामरगांव येथील मोकदमीबद्दल.

१०० मौजे बोहली, मौजे कासेगांव. श्री पंढरपूर येथील अन्नछत्राकडे नेमणूक परभारे.

८०० मौजे कुकरज, प्राो नंदूरबार.

२००० मौजे बलद, हतोड, गांव २ सुलतानपुर बारगळांकडील.

१३००० प्राो वेरुळ खालसा ४०००, वर्षासन ९०००.

१५०० कसबे थालनेर पेटे १००० अहिल्यापुरा, मजरेवाडी ५००.

..................

२६३००-००-०

८७५००-००-० प्रांत माळवा.

१९००० प्राो इंदूर.४००० मौजे काकरया, ४००० खजराणा, ५००० तिल्लोर,२००० मौ पिंपळदा, २७०० कळमनेर, १००० चोरड्या, १०० अहिल्यापुरा, २००, मौ. मालगंज.

१९००० प्राौ देपाळपूर, ७०००, मौ हतोद, १०००० मौ बनेड्या, २००० सगडोद.

१३५०० प्रगणे सांवेर, १००० पालाखेडी, १५०० दरजीकराड्या, व ११००० बरलाइ, डकाच्या.

७००० तालुके केली बिजोता, प्राो निंबाहेडा.

१००० तालुके मोमानी, प्रांत नरवर.

१००० मौ दुरजनपुरा उर्फ उमरकोट, प्राो हसलपुर.

१०००० प्राो लाहोरी (लाखेरी).

१५०० ताो चोरुपिंपळी, प्रांत जयपुर, गांवे तीन.

२००० मौजे सेत, गांगरसोली, वृंदावन येथील अन्नछत्राकडे.

.................

८७५००

....................

११३८००-००-०

तेरीज एकंदर ८९३०९-४-० शेरी नजराण्याबद्दल गांवे, ११३८००
फुटकर गांवे, २७,३१६-११-० प्रांत गांवगन्ना

......................
२,३०,४२५-१५-०

पैकीं वजा खर्च.............रुपये

११५०५५ धर्मादाय खर्च.

१२०० इच्छाभोजन. ३०००० श्रावणमास निमित्य खर्च.
१००० रामेश्वरच्या कावडी. ५०० देवस्थान उत्सव.
१५०० आगंतुक ब्राह्मण बिदागी. १५०० गोवर्धन उत्सव.
३१३०० अन्नछत्र हुजूर. ५०० आषाढी, कार्तिकीचे उत्सवाबद्दल दक्षिणा.

२२५०० भोजन दक्षिणा
१३५०० नित्य
९००० श्रावणमास ५००० वसंतपूजा वैशाखमास, दक्षिणी व रांगडे ब्राह्मण
५००० गोकुळ अष्टमी
१५०० पत्रावळी द्रोण ३००० नागपंचमी
३०० विड्याची पाने ३०० व्यतीपात
२००० शाकभाज्या वगैरे ३०० संक्रांतीबद्दल

...........
३१३००

१००० उभयतामुखी
२५ पांखरांस धान्य, घाटावर
६०० ग्रहणाबद्दल खर्च
१००० गोसावी, बैरागी, लोकांची बिदागी. ७२०० नित्यदाने सोमवार वगैरे.
४०० श्री तुळसी विवाह. ७०० सप्ताह भागवत.
१०० शिवरात्री, हुताशनी, रामनवमी वगैरे.
३७०३० तीर्थक्षेत्र, देवस्थान, अन्नछत्र, वगैरे.

३००० श्रीक्षेत्र रामेश्वर १८०० श्रीक्षेत्र द्वारका
४००० प्रगणे गया ३५०० श्रीक्षेत्र काशी
७००० ,, प्रयाग २००० श्रीक्षेत्र अयोध्या
१००० ,, पुष्कर ३००० श्रीक्षेत्र वृंदावन, २००० गांगरसोली भरतपूर, व १००० गदी
५०० श्रीक्षेत्र भीमाशंकर ५००० श्रीक्षेत्र पंढरपूर

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४००० गदी, |
| | | | १००० बोहली गांव |
| ११०० | श्रीक्षेत्र बद्रिकेश्वर | १२०० | श्रीक्षेत्र हरिद्वार |
| २००० | ,, चित्रकूट | ७०० | ,, जगन्नाथरायजी |
| ३० | ,, व्यंकटेशगिरी आरतीबद्दल | २५० | ,, श्री काळहस्ती, कर्नाटक |
| | | ५५६ | श्रीक्षेत्र ओंकारेश्वर नगारखाना घड्याळ, वगैरे |

...................

३७०३०

.....................

१,१५,०५५-००-०

इतर खर्च इंतजामी वगैरे.

| | |
|---|---|
| ६०००-०-० | बद्दल मुशाहिरे खर्च. आश्रित, कारकून, आचारी, पाणके, देवपूजा वगैरे. |
| १९८२५-०-० | खासगी गांवांचा गांवखर्च. नेमणुकीं, गवत कटाई, गाईचराई, क्षेत्रनिहाय ऐवज पाठविला जातो त्याचे हुंडणावळी बद्दल रु. ४००० व गांववारचे कमजास्तीबद्दल वगैरे. खासगी गांवची दामीजमीदार वगैरे मिळून. |
| ५५५१६-८-० | कोठीखर्च जिन्नस खरेदी. १६१३२ गहू, ९९२२ तांदूळ, ४५८१ डाळ तुरीची, ४८० चणे, ४५० ज्वारी, १३१६२ तूप खंडी ५०,७८० साखर खंडी ३,८४० गूळ खंडी १०,८४० तेल खंडी १०,३७५ उडीद, मुग; २७० कापूर दीपदानास. किराणा, हळद, हिंग, जिरे, तिखट, मीठ, खारका, सुपारी मिळून रु. १५०० इंदूर सर्वमाल आणावयास गाडी भाड्याबद्दल ५५०८ आंख. |
| २०४००-०-० | इतर खर्च तपशिलाप्रमाणें. १०० देणगी खर्च, ३०० दप्तर खर्च, १००० ओवाळणी, ४००० बागाकडेस, ३५००० कारखानेवार इमारती, बावड्या, दुरस्ती वगैरे खर्च. |

..................

२३०४२५-१५-०

बाकी शिल्लक ..................रुपये श्री :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 15 1799 A.D.

Income and Expenditure sheet of the Khasgi.

---

**अ. नं. १६** **श्री**

ता. ९ फेब्रुवारी, इसवी सन १७९९

यादी मीरखां पठाण जमादार पेठ हेडेकर शिलेदार सरकारांत आहे. त्यांची सालिना बोलीचा ठराव होऊन पट्टा करून द्यावा याचा तपशील सु. तिसातिसेन मयावअलफ. सन १२०८ फसली.

१५९०० ठराव.

| | | | |
|---|---|---|---|
| ८००० | खाशास. | १२०० | शेरदानखा असामी १ |
| १२०० | अहमदखान अ. १ | १२०० | महमद पीलखान अ. १ |
| २००० | गुलामीखान अ. १ | १३०० | पालख्या २ दर ६५० बद्दल. |
| १००० | हत्ती नग १ सालिना खर्चाबद्दल, माहूत, हत्ती. | | |
| ......... | | | |
| १५९०० | एकूण | | |

१ खेरीज स्वार हजेरीस येतील त्यांची बोली सालिना सरासरी दरअसामीस रुपये ८०० प्रमाणे करून दिले जातील. पाऊणशें रुपयाखालील घोडे हजेरीत लागू होणार नाहीं.

.................

१५९००

एकूण पंधरा हजार नऊशें रुपये खासे वगैरेस व स्वाराचे कलम एक. सालिना ऐवज वृंदावन चलणीचा यांस बट्टा दरशेकडा १२।। साडेबारा प्रमाणें. खेरीज दरक सर्वत्राअन्वयें वजा केला जाईल. रोजमुरा शाही शिरस्तेप्रमाणें पावेल. फौजेचे चालीअन्वयें हिशेब होऊन बाकी निघेल त्याचा फडशा होईल. हजेरी, गणती देत जावी, हजेरींत कमी येईल तसे वजा केलें जाईल. चाकरी इमानेइतबारें वर्तून करावी. रोजमुरा दरमहाचा आकार होईल त्यापैकीं तिजाई ठेऊन दोन हिश्शे पावत जातील. बाकी निघेल तिचा सालअखेर फडशा केला जाईल. येणेंप्रमाणें तैनात जाबता करून देवावा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 16 9-2-1799 A.D.

Memo of the annual payment to be made to Mirkhan Pathan Jamedar for self and followers, with details.

---

अ. नं. १७ **श्री**

ता. १ जुलाई, इसवी सन १७९९

विश्वासराव वकील भागानगर यांजकडून रावसाहेब यांस पत्र ज्येष्ठ वद्य १३ पुण्याचे वर्तमान हुजुरांत आले कीं, श्रीमंतांचे तपबळें करून तेज विशेष होत चाललें व शिंदे घरचे कलहामुळें निस्तेज झाले. यामुळें दूंरदेशीचे पोटीं सर्वांवर दबाब समजोन, येथील फौजा रवाना करणार.

**सरकारी रेकॉर्ड**

No.17 1-7-1799 A.D.

The Bhaganagar ( Hyderabad Deccan ) ambassador to Rao Saheb : Shinde, on account of family fractions, is lowered down in public estimation. The Peshwa's power is in ascendent.

---

अ. नं. १८ **श्री म्हाळसाकांत प्रसन्न**

ता. २४ जुलाई, इसवी सन १७९९

राजश्री मोरोपंत दादा गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित यशवंतराव होळकर दंडवत विनंती. उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत असले पाहिजे. आपण पुण्यास दाखल होऊन श्रीमंतांच्या भेटी जाल्याचें वर्तमान ऐकून बहुत संतोष जाहला. कैलासवासी तीर्थरूप बाबासाहेबांचा व आपला दुसरा अर्थ किमपिही नव्हता. त्यांचे मागें आम्हांस सर्वप्रकारें वडील आपण. आमचे वर्तमान राजश्री मल्हार शामजी यांनीं निवेदन केलेंच असेल चिरंजीव राजश्री खंडेराव होळकर तेथें आहेत. श्रीमंतांनीं लोभ करून सर्वप्रकारे संरक्षण केलें. त्यांचे नावें सरदारीचा बंदोबस्त करून देण्याविषयीं अभय आहेच. आपणही प्रसंगी आहां तेव्हां कोणेविशीं अवघड पडेल असें नाहीं. आम्ही सरकारचाकरी करून दाखवावी हें लक्ष धरून जिवाकडे न पाहतां देण्याचे पेंचात येऊन फौजेसुद्धां हजर आहो. दौलतीचा बंदोबस्त घडून वडिलांचे लौकिकाप्रमाणें सेवा घडे ते करणें आपल्याकडेस आहे. सविस्तरें मशारनिल्हे बोलतील. सर्वदा पत्रीं सांभाळीत असावें. चंद्र २० सफर सु।। मयातेनअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 18 24-7-1799 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Moropant (Fadnis) : Asks him to

intervene, and plead for the Holkar cause, with the Peshwa.

---

**अ. नं. १९** **श्री**

ता. १२ आगस्ट, इसवी सन १७९९

श्रीमंत खंडेराव होळकर यांजकडून फूलण फरांसीस, जप्ती, सावेर यांस विशेष. प्रगणे मजकुरीं खासगीकडील गांव पूर्वीपासून आहेत, ते सोडून जप्ती करावी, या विषयीं तुम्हांस आज्ञा केली आहे. त्यास खासगीकडील गांव पूर्ववत्प्रमाणें खासगीकडे ठेऊन तेथील वहिवाट रा. भारमल होळकर यांचे हातें करावी. असे ठरवून हें पत्र तुम्हांस सादर केलें आहे. तरी तुम्ही खासगीचे गांवची जप्ती न करितां मशारनिल्हेचे जिम्मेस करून देणें. तेथील लावणी उगांवणीची वहिवाट ते करतील. जाणिजे छ. १७ रविलावल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

मल्हारराव सुत
खंडेराव होळकर

No. 19 12-8-1799 A.D.

Shrimant Khanderao Holkar to Fransis : You were ordered to confiscate Khasgi villages. Hereby it is ordered that Bharmal Holkar will manage, as before, those villages.The former order is hereby revoked.

---

**अ. नं. २०** **श्री**

ता. १६ आक्टोबर, इसवी सन १७९९

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस. विशेष कैलासवासी तीर्थरूप मातोश्री बाईसाहेब (अहिल्याबाई) ह्यांचे छत्रीचा कारखाना चालू करावयाविशीं तुम्हास विजयादशमीचे दिवशीं पत्र लिहून रवाना केलें आहे तें पावलेच असेल. हल्लीं भूधर गजधर (मिस्तरी) याजला पाठवून हे पत्र लेखन केलें असे. तरी तुम्ही जागा पूर्वपश्चिम दक्षिणउत्तर मोजून छत्रीचे स्थलापासून राजश्री रामराव अप्पाजीचे हवेलीपर्यंत पाया धरून खिडकीचे सुमारें शिवघाटाचा बेत ठेऊन बाकीच्या पायांत देऊळ व बाग, नगारखाना करावा. श्री काशीविश्वेश्वरांचें देवालयाबरोबर जमीनीची भोये बांधून जाल्यानंतर पुढें देवालयाचे काम

चालेल. कामाचा नक्षा ही भूघरानें येथें समजावून तिकडे घेऊन आला आहे. तुम्ही तेथील सोईने पाहून काम चांगले मातोश्रीसाहेबांचे लौकिकाप्रमाणें ज्यांत कांहीं कसर न राहता जो पाहील तो मान डोलावेल असें करावें. सिद्धीस नेणार त्यांचें पुण्य आहे. आमचें लक्ष त्यांचे चरणीं अंतःकरणपूर्वक आहे. त्यापक्षीं त्यांच्या आशीर्वादेकरून सर्व घडेल. भूधर पूर्वीपासून सरकारचे पदरचा आहे. त्यास काम त्याचे हातें घेऊन कारखानियाचा बंदोबस्त चांगला राहून काम सत्वर चालतें करणें. खर्चाची योजनाही मागाहून केली जाईल. रा. छ. १६ जमादिलावल. सु।। मयातेन व अलफ. कळावें बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 20 16-10-1799 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : Bhudhar Gajdhar is sent for constructing the Chhatri of the late Devi Ahilyabai. Please see that the work commenced according to the plan approved.

---

**अ. नं. २१** **श्री**

ता. १५ नोव्हेंबर, इसवी सन १७९९

बाळाजी कृष्ण मुकाम उज्जनीहून भारमल होळकरांस विशेष. लाख फौजेचा सरदार अनुकूल होऊन मरण्या मारण्यास सामील असतां मनस्वी होऊन शेवटीं फौज फोडावी, दगा करावा अशा चाली दिसो लागल्या तेव्हां त्यांच्या करण्याचे फळ त्यांस प्राप्त झालें. आपला सर्व भरंवसा मार्तंडावर व कै. मा. बाईसाहेबांच्या पुण्यावर आहे. तोच सर्व गोष्ट पारंगत करील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 21 15-11-1799 A.D.

Balajee Krishan from Ujjain to Bharmal Holkar : A well-equipped army with a superior general at the head comes to nothing ! We are sure God Martand and Devi Ahilyabai are our support to the last.

---

**अ. नं. २२** **श्री**

ता. १७ डिसेंबर, इसवी सन १७९९

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून नाना फडणवीस यांस पत्र विशेष. कैलासवासी

मातोश्री बाईसाहेब (अहिल्याबाई) यांचे मागें संस्थान महेश्वर येथील धर्मकृत्ये वगैरे यथास्थित चालावे ऐसियासी श्रीमंत मातोश्रीसाहेबांचे मानस होतें. येविशीं ती रा.संताजीबाबा होळकर यांस समक्ष आज्ञा केलीं कीं, ''आपल्या पदरची माणसे यांचे चालत आल्याप्रमाणें चालून धर्मकृत्यात न्यून पडो न देतां श्रीमंतांचे चरणांसीं लक्ष ठेऊन यथासांग स्वामीसेवा घडोन दौलतीचे कल्याण होऊन कोणेविषयीं कमी न पडो'' ऐसें बोलून देह विसर्जन केला. नंतर कांहीं दिवस चालले. मधी नाना प्रकारचे बखेडे पडोन सर्व राहिल्यामुळें हल्लीं कैलासवासी मातोश्रींचे आज्ञेवर लक्ष ठेऊन राजश्री भारमल होळकर यांजकडे स्वतंत्र संस्थानचे काम सांगोन खर्चास खरगोण व नागलवाडी व ब्राह्मणगांव व महेश्वर हे चार महाल नेमणूक करून देऊन रवानगी केली. ते महेश्वरीं गेल्यावर पूर्ववत्प्रमाणें धर्मकृत्य चालते होऊन राहील. तेही पुढें चालावे, रयत व सावकार यांची खातरजमा करून तेही आबाद होऊन पुढें वेध न पडावा हें चालविणें आपल्याकडे आहे. रवाना. छ.१९ बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 22 17-12-1799 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar to Nana Fadnavis : Reports the last words of Devi Ahilyabai. I have deputed Bharmal Holkar on that mission. Your help will facilitate our work.

---

## अ. नं. २३ श्री

ता. ३१ डिसेंबर, इसवी सन १७९९

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. जेतकर्ण मंडलोई प्रगणे इंदूर यांनीं स्वारींत येऊन विदित केलें कीं, प्रगणे मजकुरचे गांव खासगीकडे आहेत. तेथील आमचे दामीदस्तूरची वहिवाट पेशजीपासोन चालत आली. असे असतां नवीन महेश्वरींहून अंमलदार आले ते सरकारपत्रांची अपेक्षा घेतात. त्याजला आज्ञा झाली पाहिजे, म्हणोन हे पत्र सादर केलें असें. तरी येविषयींचा मजकूर समजोन पूर्वीचे वहिवाटींत दिक्कत न करितां पुढें चालविणें. छ.४ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 23 31-12-1799 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : The Mandloi of Indore complains that his old rights of Dami over Khasgi villages in the

Indore Pargana are questioned. Please make inquiries and see that old usages are respected.

---

अ. नं. २४ **श्री**

ता. १५ मार्च, इसवी सन १८००

पंतप्रधान बाजीराव रघुनाथ पेशवे यांजकडून देशमुख देशपांडे प्रांत खानदेश यांस विशेष. प्रांत मजकुरीं दौलतराव शिंदे यांचे महाल व गांवखेडीं आहेत. हे सरकार चाकरीस हरामखोरी करूं लागले, सबब त्या सरंजामाची जप्ती करून तिकडील महाल मुलूख दरोबस्त शिंदे यांजकडील राजश्री खंडेराव होळकर यांजकडेस सरंजामास देऊन हे पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही महालनिहायसुद्धां जमीदार व रयत मशारनिल्हेकडील यशवंतराव होळकर फौजेसुद्धां तिकडे आहेत. त्यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. दरम्यान खलेल केल्यास पारिपत्य केलें जाईल. जाणिजे छ.२९ सवाल.

आज्ञाप्रमाण.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 24 15-3-1800 A.D.

Pantpradhan Bajirao Raghunathrao Peshwa to Deshmukhs and Deshpaneds. Prant Khandesh. Daulatrao Scindia holds a number of Mahals and villages in your territory. He has turned treacherous to the Sarkar. You are, hereby, ordered to hand over the authority of the said villages etc. to Yeshwantrao Holkar.

---

अ. नं. २५ **श्री नाथ**

ता. २२ मार्च, इसवी सन १८००

| |
|---|
| श्री जोतीस्वरूप चरणीं तत्पर महादजी<br>सुत दौलतराव शिंदे निरंतर |

राजश्री काशीराव होळकर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती. उपरि इहिदे मयातेनवआलफ. चंद्र २१ साबानचे पत्र पुणें मुक्कामींहून आल्यांत होळकर राज्यांत दौलत व खासगी हे पृथक असून तुम्ही

एकत्र करून खासगीचे ऐवजाची तोडमोड केली. त्यास खंडेराव होळकर यांचे मातोश्रीचे अधिकार खासगीवर आहेत. याजकरितां निक्षून ताकीद करून देणें, म्हणोन आल्यावरून आपल्यास पूर्वी ताकीदीनें लिहून पाठविले आहे. हल्लीं पुन्हा लिहून आल्याप्रमाणें खासगीचे महाल जे असतील, त्याचे ऐवज घेतले असतील ते खंडेराव होळकर यांचे मातोश्रीचे हवाली करून द्यावे. यामध्यें दिवसगत लावूं नये. आपसांत घरचा खिस्सा आणि आमची बदनामी आहे. हे मनांत आणोन आतां पत्र पावतांच खासगीचा जिम्मा मशारनिल्हेचा करून इकडेस कळवितील. रवाना छ.२५ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 25 22-3-1800 A.D.

Daulatrao Scindia to Kashirao Holkar : I am informed from Pune that " the Khasgi and Daulat of the Holkar State are separate and distinct departments. The mother of Khanderao Holkar holds authority over the Khasgi. Please, therefore, return the rights to the proper authorities.

---

**अ. नं. २६** **श्री**

आगस्ट, इसवी सन १८००

देवीदास व बनारसीदास व निहालचंद सावकार निसबत सरकार बिजागड या त्रिवर्गाची नक्कल झाली. पोटी संतान नाहीं. सबब त्रिवर्गाच्या स्त्रियांपासून सरकार नजरेचा ऐवज घेणें ठरवून पुत्र द्यावयाची पत्रें सरकारांतून करून दिली. नजरेचे ऐवजाचा ठराव समक्ष महेश्वरचे मुक्कामीं येणेंप्रमाणें.

४००० लाडूबाई जोजे देवीदास.

३३०० कुंवरबाई जोजे बनारसीदास.

२७०० कृष्णाबाई जोजे निहालचंद.

सदरहू ऐवज परभारें पोताकडे आला त्याचा तपशील सदरी प्रो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 26 August, 1800 A.D.

Three Sowkars died leaving no issue. Their widows were permitted to adopt., after certain payment being made to (mentioned in the order) the State.

---

अ. नं. २७ **श्री**

ता. १७ आगस्ट, इसवी सन १८००

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. तुम्ही पत्र पाठविलें ते पावून लेखनार्थ अवगत जाहला. खासगीकडील गांव प्रो इंदूर, देपाळपूर व सावेर येथील आहेत त्याप्रमाणें उपसर्ग न लागे असा बंदोबस्त केला पाहिजे म्हणोन लिहिलें. कंचनसिंग येथें आहेत. खासगीकडील गांवचा बोभाट सांगतो त्याप्रमाणें महेश्वरचे आसपास भिलांचा बोभाट फार. त्याची सावधानी केल्याशिवाय बंदोबस्त राहणार नाहीं. त्यास पागेचा सरंजाम व कर्नाटकी माणसें घेऊन बाहेर निघोन, कांहीं घाव, डाव, पाहून पारिपत्य करून पुन्हा लबाडी न करतील असें करणें. बसले ठिकाणाहून बंदोबस्त करूं म्हणाल तर होणार नाहीं. बाहेर निघाल्यानें त्रास पडून हरामखोरी करूं पावणार नाहींत. कोणी त्यांजला आसरा देतील, त्यांजकडोन चार रुपये घेतल्याने खर्चासही जागा होईल. केल्यानें सर्व घडतें. येविशीं आळस न करितां भिल्लांचे पारिपत्य होऊन चांगला बंदोबस्त राहे ते करणें. तेथील पागे जे उपयोगी नसतील त्यांची घोडीं घेऊन जो उपयोगी पडेल त्याजला घेऊन सरकार कामाचा बंदोबस्त ठेऊन दाब ठेऊन चार रुपये पैदा करून लिहिल्याअन्वयें करणें. येविशीं समक्ष सांगितलेंच आहे. विषाद मानू नये, यास्तव लिहिलें आहे. रा छ २२ जिल्काद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 27 17-8-1800 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : In reply to the latter’s complaint against the revages of the Bhills to the Khasgi villages he is ordered to move about, and attack them; those who shelter the ravagers should be punished and fined.

---

अ. नं. २८ **श्री**

इ.स. १८०१

बाजीराव रघुनाथ पेशवे यांजकडून दौलतराव शिंदे यांस विशेष. यशवंतराव होळकर व तुमचे सरदार सरजेराव घाडगे यांची लढाई होऊन त्यांचे इंदूर शहर तुम्ही लुटलें व उज्जेन होळकरांनीं लुटण्याकरितां सावकार व रैयत लोकांकडून मातब्बर खंड घेतला. हें नीट नाहीं. दुसरें, काशीराव होळकरांस तुम्ही कर्ज पंधरा लक्षांचे ऐवजापैकीं अंबाड व माळव्यांतील महाल लावून घेतले. परंतु सौ. आनंदीबाई होळकर यांचा खासगी खर्चाचा इनामी तालुका हातोद सरजेराव घाडगे यानें लुटून ऐवज वसूल करण्याकरितां मामलेदार नेमला. त्यास

खाजगीवर दौलतीचे कर्जाचा कांहीं एक संसर्ग नसतां तुम्ही मामलेदार उठवून खासगीचे जागेवर काडीमात्र दखल न देतां पूर्वापार चालत आलेप्रमाणें सरजेराव यांस निक्षून ताकीद देऊन घेतलेला वसूल माघारी देणें. बोभाट न ये.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 28 1801 A.D.

Srimant Bajirao Peshwa to Daulatrao Scindia : Relations between you and Yeshwantrao Holkar are not smooth. Indore and Ujjain have suffered thereby. This is not a happy state of affairs. Again, you can not claim the "Khasgi" of the Holkar State in satisfaction of your debt. Please see that, that property is returned to the proper authorities.

---

**अ. नं. २९** **श्री**

ता. १६ मार्च, इसवी सन १८०१

कबुलायत असालतखान किफयतखान - रामपुर टोंक. श्री खंडेराव होळकरांचे नांवें कबुलायत असलातखां वल्द किफायतखां साकिन रामपुर टोंक गंगापार प्रांत रोहिलखंड शिलेदार सरकारांतून आज्ञा जहाली कीं, चाकरीस हजर राहणें त्याजवरून चाकरीस हजर असों. सरकारांतोन रोजमुरा ठेरावून दिला. साल बोली रुपये २००० करार करून राहिलों. बारमाही चाकरी ग्यारमाही रोजमुरा, दरमहा हिस्सेरसीनें जे होईल ते घेत जाऊं. चाकरी स्वदेशी, परदेशी इमानेंइतबारें करीत जाऊं. साहेबांच्या पायाशीं अंतर करणार नाहीं. कोण्हाचे फितुरांत मिळून मलई केली तो सरकारचे गुन्हेगार. आम्हाकडे सरकारचे फाजील देणें रुपये २२०० आहेत ते दरमहा देत जाऊं. आम्ही दरमहा रुपये १३० घेत जाऊं. फाजलाचा ऐवज फिटेतोपावेतों चाकरीस हजर राहूं. सही. मि. चैत्र शुद्ध २ संमत १८५७ जिल्काद छ.१ मुक्काम महेश्वर हस्ताक्षर मुकुंद बाळाजी मुंजे. निस्वत रघुनाथसिंग मंडलोई बासवा सरकार बिजागड.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 29 16-3-1801 A.D.

Agreement passed by Asalatkhan to the Sarkar of Khanderao Holkar : Agrees, in writing, to serve the Sarkar loyally and faithfully, on an annual salary of Rs. 2,000, wherever ordered.

---

**अ. नं. ३०** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. आजपर्यंत दुसऱ्याचे नादीं लागून घरची माणसें मारवून दौलतीची धूळधाणी केली. पुढेंही तोच प्रकार घडल्यानें दौलत खराबीत येऊन वडिलांचे लौकिकांत चांगले दिसत नाहीं. याअर्थी घरचे घरांत समजून दुसरियाचें पाऊल शिरूं न देतां बंदोबस्त घडल्यानें सर्वोपरी चांगलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 30 29-3-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : Reviews past conduct with its evil effects. Desires reconciliation at home, and prestige abroad.

---

**अ. नं. ३१** **श्री**

ता. १ जून, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून गोविंद रघुनाथ गानू यांस पत्र विशेष. बहुत दिवस जाहलें तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी असे न करितां सर्वदा पत्र पाठवून संतोषवित जाणें. तुम्ही पूर्वीपासोन सरकार पदरचे. कैलासवासी तीर्थरूप मातोश्रीसाहेबांचे (अहिल्याबाई) हातचे दौलतीतील कोणताही अर्थ तुम्हास लोपला ऐसें नाहीं. दौलत कांहीं सर्वांनी मिळोन कायम राखोन वडिलांचा लौकिक जतन राखावा. यांत इहपर दोनही चांगलें आहे. तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब श्रीमंतांची आज्ञा घेऊन इकडे यावयास निघाले. तेथें होते तोंपर्यंत त्यांचे मनात संशयच होता. परंतु आम्हांस ते वडील तीर्थरुपजीचे ठिकाणीं. त्यांनी लोभ करावा. आम्ही सेवा करून दाखवावी सर्वांनीं एकदिल होऊन दौलतीचा बंदोबस्त करून श्रीमंतांची सेवा करावी. यात सर्वतोपरी चांगलें. तीर्थरूप विठ्ठलरावदादानीं (विठूजी) श्री पंढरपुराकडे जाऊन क्षेत्रास उपद्रव दिल्यामुळें श्रीमंतांची इतराजी होऊन अर्थ घडला तो समजला. त्याजकडून अंतर घडलें तेव्हां कोणास काय म्हणावे ? तत्रापि श्रीमंतांचे हातें कशीही गोष्ट घडली तरी आम्हास श्रेयस्करच आहे. त्यांचे मनांत आम्हाविसीं हा प्रकार घडल्यामुळें संशय आला असेल तो दूर होऊन कैलासवासी वडिलांवर लोभ करीत आले त्याप्रमाणें करावा. आम्ही चाकरीस हजर असावें हेच लक्ष आहे. त्यांचे मनातील संशय दूर होऊन मर्जीचे भाव समजावे यास्तव श्रीमंतांस पत्र आलाहिदा लिहून हे पत्र तुम्हांस लेखन केलें असे. तरी तुम्ही पत्र पावतें करून लिहिल्याअन्वयें बोलण्यांत आणून उत्तर घेऊन पाठवावें. तीर्थस्वरूप श्री. बाळासाहेबांविसीं

आमचें लक्ष दुसरें नाहीं. त्यांचाही लोभ आहे. तुम्ही कोणेविसीं संशय न धरितां तेथील संधान राखून उत्तरें पाठवावी. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 31 1-6-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Govind Raghunath Ganu : Asks Ganu to speak on his behalf to the Peshwa and Kashirao. He expresses his respect for both of them, and his desire to serve without reserve; he desires the old relations to be continued.

---

**अ. नं. ३२** **श्री**

ता. १७ जून, इसवी सन १८०१

श्री. पंतप्रधानांचे सेवेसीं श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून विशेषः इकडून विनंती पत्रें वरचेवर पाठवितों परंतु उत्तराचे आज्ञा होत नाहीं. याजमुळें चित्त सापेक्षित असे. तरी स्वामींनीं कृपा करून पत्रोत्तराची आज्ञा केली पाहिजे. तीर्थस्वरूप विठ्ठलराव होळकर यांनीं स्वामींची आज्ञा न घेतां श्री पंढरपुराकडे जाऊन क्षेत्रास उपसर्ग दिल्यामुळें इतराजी होऊन प्रकार घडला तो समजला. त्यास देवाची जागा तेथें उपद्रव दिला. तेव्हां श्रींचे इच्छेनें घडले त्यास उपाय काय ? तथापि स्वामींचे हातें जें घडलें ते सेवक लोकांस श्रेयस्करच आहे. आमचें लक्ष कै. वडिलांनीं सेवा केली त्याप्रमाणेंच जपून सेवा करून दाखवावी हेच आहे. यदाकदाचित आम्हापासोन कोठें कांहीं आधिकउणें दिसोन आल्यास आज्ञापत्रीं सूचना करून मार्गास लावून लोभ करून सेवा घ्यावी हेंच विहीत. वडिलांनीं एकनिष्ठपणें चाकरी केली आणि पूर्वीपासोन लोभ संपादन केला त्याप्रमाणें आम्हीही चाकरीची उमेद धरून आहो. तेव्हां स्वामींचेही मनांत ईश्वर प्रेरणा करून लोभच करतील. तीर्थस्वरूप रा. काशीराव बाबा स्वामींची आज्ञा घेऊन इकडे येतात. आम्हांस वडिलांचे ठिकाणीं तेच आहेत. पूर्वीपासोन त्यांचा लोभ आमचे ठाई व आमचीही निष्ठा त्यांचे ठिकाणीं अंतःकरणपूर्वक आहे. सर्वांनीं एकदिल राहून स्वामीसेवेव्यतिरिक्त दुसरा अर्थ किमपि नाहीं. इकडील संशय कोणेविशीं तिळप्राय मनात न आणितां लोभयुक्त उत्तराची आज्ञा होऊन उमेदीनें चाकरी घडे ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 32 17-6-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Pant Pradhan Peshwa : Expresses

his respect for the Peshwa and his own elder brother Kashirao; notices with regret the cruel fate of Vithojee, and with satisfaction the intended arrival of Kashirao in Malwa; expresses a strong desire to serve the Peshwa as faithfully and diligenly as his forefathers did.

---

**अ. नं. ३३** **श्री**

ता. २० जून, इसवी सन १८०१

भारमल होळकरांचे गोविंद रघुनाथ गानूंस पत्र विशेष. विठोजी होळकर यांचा प्रकार श्रीमंतांनीं रुष्ट होऊन केला. येणेंकरून लौकिकांत फारच व्यंग दिसोन आले. कै. वडिलांनीं एकनिष्ठपणें सेवा कशी केली तो अर्थ ध्यानांत न ठेवितां असा प्रकार केला अस्तु. धनी आहेत. लोभही त्यांचेवाचून कोण करितों ? घडणार तसें घडलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 33 20-6-1801 A.D.

Bharmal Holkar to Govind Raghunath, Ganu : The cruel treatment of Vithojee Holkar at the hands of the Peshwa has evoked general condemnation. Past excellent service rendered by the House was altogether ignored.

---

**अ. नं. ३४** **श्री**

ता. २० जून, इसवी सन १८०१

भारमल होळकरांकडून गोविंद रघुनाथ गानूंस पत्र विशेष : बहुत दिवस झाले आपलेकडून पत्र येऊन कुशल कळत नाहीं तरी सर्वदा पत्र पाठवून आपलेकडील वृत्त लिहून संतोषवीत जावें. यानंतर इकडील वृत्त समजलियांत येत असेल. कै. तीर्थरूप मातोश्री बाईसाहेबांचे मागें सर्व गोष्टी व्यंग पडल्या. परंतु त्यांचे पुण्येंकरून श्री. रा. यशवंतराव बाबा यांनीं जमावांत गोष्ट आणली. मातोश्रीसाहेबांचे संस्थानाची जागा, त्यांचे धर्मकृत्य चालवावे, याअर्थी आम्हांस येथें (महेश्वरीं) ठेविले. त्यास त्यांचे पुण्येंकरून आजपर्यंत थोड्याबहुतानें चालतें. पुढेंही पार पाडणार तेच आहेत. परंतु प्रस्तुतचा प्रकार बहुत विलक्षण दिसतो. आम्हांस काळजी रात्रंदिवस हेच कीं, मातोश्रीसाहेबांचे धर्मकृत्यांत वेध न पडावा याअर्थी बहुत संकटांत अहोंत. ईश्वरकृपेकरून त्यांचे पुण्याईने चालेल. घरचे बखेड्यामुळें सोबत्याचे प्राबल्य होऊन दौलत खराबींत आली. कांहीं मुलखाची धूळधाणी जाहली.

रयतेचा नाश जाहला. पदरचीं चार माणसें चौठिकाणीं लागून ओढींत आलीं. होश कोणांत राहिला नाहीं. घरचे बखेड्याचा समेट झाल्यानीं सर्वोपरी चांगलें. यास्तव श्री. यशवंतराव यांची पत्रें श्रीमंत बाळासाहेब यांजला जात गेलीं. उभयपक्षीं राज्याचा समेट करावा हे ठरलियांत येऊन श्री. बाळासाहेब देशींहून निघोन चांदवड गाळणा येथें कांहीं दिवस राहून सेंधव्यास दाखल जाहले. इकडून रा. लक्ष्मण मल्हार याजला श्री. यशवंतराव बाबांनीं त्यांजकडे पाठविलें आहे. त्यांचे बोलणें होऊन पोक्त मनुष्य येऊन भेटी व्हाव्यात असें ठरलें आहे. सोबत्यांकडून लगट फार जाहला, कीं, श्री. बाळासो (काशीराव) आपलेकडे घेऊन जावें. परंतु त्यांनीं तिकडील संधान न ठेवितां घरचे बखेड्याचा समेट करावा हे चित्तांत आणून इकडे आले. तेव्हां थोडक्याच दिवसांत भेटी होऊन ऐक्यता घडेल ऐसें आहे. श्री. खंडेराव बाबासो हे त्यांचे (शिंद्यांचे) कबजांत आहेत, त्यांची मुक्तता जाली पाहिजे याअर्थी त्यांजलाही श्रीमंत रा. यशवंतराव बाबांची जरबच आहे. फौज सरंजामही बहुत जमा केला आहे. सोबत्याशीं गांठ घालावी हा इरादा आहे. मातुश्रीसाहेबांचे पुण्येंकरून सर्व चांगलेंच घडून येईल. मुख्य पाया श्रीमंतांपासून तेथील संधान असलिया सर्वपरी नीट. त्यास तूर्तचे काळीं त्यांजकडील संधानास तेथें कोणी वजनदार मनुष्य नाहीं, तेव्हां संधान कसे राहते? आलीकडे कागदपत्राचा सिलसिलाही राहिला नाहीं. विठोजी होळकर यांचा प्रकार त्यांनीं रुष्ट होऊन केला. येणेंकरून लौकिकांत फारच व्यंग दिसोन आले. कै. वडिल यांनीं एकनिष्ठपणें सेवा कशी केली तो अर्थ ध्यानांत न ठेवितां असा प्रकार केला. अस्तु. धनी आहेत. लोभही त्यांजवाचून कोण करितों ? घडणार तसें घडलें. परंतु आतां त्या गोष्टीची क्षित न करितां त्यांचे साधन करोन आम्हांस पल्ल्यावर आणावें. या अर्थीं राजश्री यशवंतराव बाबा यांनीं विचार करून श्रीमंतांस पत्रलेखन करून आपल्यास पत्र लिहिलें आहे. आपण पूर्वीपासोन वडिलांचे हातचे केलेले पुरुष सर्व गोष्टींची माहिती, प्रामाणिकता दरबारात वळण सर्व गोष्टीविसीं खातरजमा, आपला भरंवसा जाणोन योजना करून पत्र पाठविलें आहे. त्यातील अर्थ ध्यानांत आणून ज्याद्वारें करून श्रीमंत आपल्या पल्ल्यावर येऊन त्यांचे मनात किंतु न राहे, ती गोष्ट करावी. आपल्यास ल्याहावें ऐसा अर्थ नाहीं. आपण मातोश्रीसाहेबांचे अन्न भक्षिलें आहे तेव्हां त्यांच्या दौलतीची काळजी आपल्यास आहेच. आपण कामांत पडल्यावर जरब बसेल हा भरंवसा आहे. सरदारांचेही चित्ताची स्थिरता होऊन श्रीमंतांचे चरणीं लक्ष ठेऊन आहेत. त्यापक्षीं आपले साधनानें सर्व गोष्टी नीट घडोन आपल्यासच यश, मातोश्रीसाहेब देतील ऐसे दिसते. फार काय ल्याहावे, आपण सूज्ञ आहात. फार पाहिले, बहुत केलें. सर्व ध्यानांत. सारांश, श्रीमंतांचे साधनाची गोष्ट घडोन कागदपत्राचा सिलसिला चालोन ये तो अर्थ करावा. वरकड सर्व मजकूर राजश्री बाबांच्या लिहिल्यावरून ध्यानांत येईल. मुख्य काळजी हेच कीं, मातुश्रीसाहेबांचे धर्मकृत्यांत वेध न पडावा. त्यांचे हातची चार माणसें चार ठिकाणीं लागली ती येथें नजीक होऊन दौलतीचा बंदोबस्त घडावा हे चांगले. जे घडणें ते त्यांचे पुण्यवर्तनें घडेल. त्यांचे पदरीं आहे. तेव्हां यत्न करावा हा सेवाधर्म आहे. कळावे बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 34 20-6-1801 A.D.

Bharmal Holkar to Govind Raghunath Ganu : Enumerates all the evils that have sprung up owing to disunion at home and disrupture between Holkar and Scindia. Enumerates all the merits of Ganu and requests him to bring about reconciliation all round. His sole desire and anxiety is to preserve and continue the old order of the times of the Devi.

---

**अ. नं. ३५** **श्री**

ता. २५ जून, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष : ती. रा. काशीराव यांजपाशी हत्ती, घोडे, उंट नाहींत व खर्चाची तारांबळ म्हणोन लिहिलें. त्यावरून दोन हत्ती, वीस उंट, पाठविले आहेत. पंचवीस घोडीं तुम्ही तेथून पागेपैकीं देणें. खर्चास रु.१०००० पाठविले आहेत. तीर्थस्वरूप निखालस इकडे लक्ष ठेऊन येतात. ते दुसरें दाखवावयाचे नाहीं. तुम्ही त्यांजला भेटून किल्ल्यावर वाड्यांत घेऊन येणें. २७ सफर (ता.९ जुलाई सन १८०१). वरातचिठ्ठी परभारें करूं नये. आज्ञा करणें आम्हांसच करावी, या अन्वयें वडिलांस लिहिलें आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 35 25-6-1801 A.D.

Srimant Yashwantrao Holkar to Bharmal Holkar : Orders princely provision to be made for his brother Kashirao when he comes to Maheshwar. He should put up in the Fort palace. Bills should not be sent elsewhere; I am ready to serve. A similar note was also addressed to Kashirao.

---

**अ. नं. ३६** **श्री**

ता. १६ जुलाई, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस. विशेष. लढाई होऊन पलटणांचा रेच मोडल्याचे वर्तमान तीनचार वेळां लिहिलेंच आहे.

१ तीर्थस्वरूप बापूजी होळकर निधन पावल्याचें लिहिलें तें समजलें. ईश्वरसत्ता प्रमाण.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 36 16-7-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar. Notes the death of Bapurao Holkar, and defeat of the enemy.

---

**अ. नं. ३७** **श्री**

ता. १८ जुलाई, इसवी सन १८०१

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून भिकणदास याचे नांवें विशेष. तुम्ही कार्यकर्ते जाणून प्रगणे ब्राह्मणगांव येथील मामलत साल मजकुरापासोन सरकारांतून तुम्हाकडे सांगोन हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही इमानें इतबारें वर्तून महालची आबादी उत्तम प्रकारें करणें. जाणिजे छ.६ रविलावल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 37 18-7-1801 A.D.

Srimant Kashirao Holkar to Bhikandas : The Mammlat of Brahmangaon is granted to Bhikandas and he is ordered to see that the Mahal flourishes.

---

**अ. नं. ३८** **श्री**

ता. १८ जुलाई, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. खासी स्वारी देवासे जवळ होऊन कूच काल आषाढ शुद्ध ७ भृगुवारीं दो प्रहरां उज्जनीनजिक दाखल होऊन तेव्हांपासून वाकडे व पलटणें यांसीं लढाई सुरू झाली. अस्तमानपर्यंत दोन्हींकडून तोफांची लढाई होऊन स्वारी रात्रीं चौफेर घेरे घालून मोर्चे कायम करून होती. प्रातःकाळपासून दोन्ही कंपूंच्या तोफा चालू झाल्या. प्रहर दिवसपर्यंत चहूंकडून हल्ला करून पलटणें कापून काढून तोफा दरोबस्त घेऊन पांचसात फिरंगी गोरे मारले गेले व पांच धरून आणिले. खासासाहेब व वाकडे गांवांत पळून गेले. सहा पलटणें देवजी गौळी याचा पुत्र वगैरे दोन चार हजार फौज होती. त्यांनीं लढाई चांगली केली. ईश्वर सत्तेनें श्री लक्ष्मीकांत सहाय

होऊन यश आपल्यास आलें. इकडील कोणी जाया झाले नाहीं. लोकांनीं शर्थ केली. तुम्हांस कळावें. सेंधव्याचीं पत्रें पुढें जलदी रवाना करणें. रा छ.६ रविलावल इसन मयातेनवआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 38 18-7-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar writes to Bharmal Holkar, describing his grand success near Ujjain.

---

**अ. नं. ३९** **श्री**

ता. २२ जुलाई, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. पंधरा वीस दिवसात तीन लढाया होऊन त्याचेच शिष्टकृत्य श्री लक्ष्मीकांतानें केलें हे अगोदर लिहिलेंच आहे, त्यावरून समजलेंच असेल. सर्जेरावही श्रीमंतांनीं ज्ञानमठीं बसविले तेव्हां त्यांचा घडा भरलासा दिसतो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 39 22-7-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : Within a fortnight we won three victories over the enemy. Sarjerao Ghatge is imprisoned by the Peshwa.

---

**अ. नं. ४०** **श्री**

ता. १५ आगस्ट, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून काशीराव होळकरांस पत्र अडीच प्रहर दिवसपावेतों वडिलांचे आशीर्वादेकरून सुखरूप असो विशेष. वडिलांकडून छ.७ रावलचे पत्र आलें त्याचे उत्तर अगोदर रवाना केलेंच आहे. त्यावरून ध्यानांत येईल. श्रावण शुद्ध २ द्वितीया भौमवारीं सेंधव्याहून स्वारीचें कूच होऊन गुरुवार शुद्ध ४ चे दिवशीं नावडातावडीस मुक्काम झाला. भृगुवारीं शुद्ध ५ स उत्तरतीरीं येणार. रेवेस पाणी बहुत आहे. नावा चालतात म्हणोन भारमल होळकर व अमृतराव रामचंद्र यांनीं लिहिलें होतें. त्यास वडिलांकडून छ.२५ रावलची पत्रें त्रयोदशीच्या मुहूर्तें निघोन येतो, असा

लेख झाला होता. त्याजवर तूर्त मासपक्ष तेथेंच असावे असें लिहिलें होतें, ते पत्र पोहचलें नाहीं तोच स्वारीचे कूच होऊन आलीकडे आल्यावर पत्र पावलें असेल. तेव्हां माघारें जाणें हे नीट नव्हे. क्षेत्रास आला हा विचार बराच केला. मुहूर्तानिशीं काल उत्तरतीरीं येणार होता त्याप्रमाणें आलाच असाल. तेथें भारमल आदिकरून सर्व आहेत ते आपले आज्ञेविरहित नाहींत. वडिलीं सर्वांचा सांभाळ करावा. खर्चाची ओढ सर्वा ठिकाणीं एकसारखीच आहे. त्यात तिकडे कोठें वरात करावयास जागा राहिली नाहीं. इकडून कांहीं सरबरा करून दिली तो ऐवज राजश्री पांडुरंग शंकर व लक्ष्मण मल्हार आपल्यास पावतां करतील. बरोबरील फौज गडाखालीच उतरवून शागीर्दपेशा जवळ राहणार तो मात्र किल्ल्यांत ठेवावा. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 40 15-8-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Kashirao : I am glad you have come to Maheshwar. Please keep the army below the fort. Arrangements for your expenses have been made. Please order no bills.

---

**अ. नं. ४१** **श्री**

ता. २३ आगस्ट, इसवी सन १८०१

लक्ष्मण मल्हार व बाळाजी कृष्ण यांजकडून भारमल होळकरांस विशेष : श्रावण शुद्ध १३ मुक्काम नजीक उज्जनी दोन कोस उंडाशाचे तलावापुढें. तुम्ही श्रावण शुद्ध ७-८ ची पत्रें पाठविली ती पावून लेखनार्थ अवगत जाहला. सरकार श्रवण करून उत्तरें अलाहिदा पाठविली आहेत त्यावरून कळेल. तुम्ही येथील प्रसंगास जपून संधानास ठीक पडून त्यांच्या यांच्या भेटी होऊन दौलतींतील बखेडे तुटून राजमार्गांवर गोष्ट येऊन सर्वांचे संगोपन ज्याचे त्याजपरी घडे यांस जपावें. कैलासवासी मातोश्री बाईसाहेबांचे वेळीं त्यांनीं अंतःकरणपूर्वक आमरणपर्यंत लोभ केला. अलीकडे काय अवस्था आहे ! ईश्वर जसें ठेवील तसे राहून आयुष्याचे दिवस घालवितो. त्राता म्हणावा तर ईश्वर किंवा मातोश्रीसाहेबांचे पुण्य आहे. सर्वदा पत्रीं सांभाळीत असावे. येथील तेथील शुद्धता राहून दिवसेंदिवस लोभाची वृद्धी होऊन दौलतीस उचित दिसे तें जपावें बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 41 23-8-1801 A.D.

Laxman Malhar and Balaji Krishna to Bharmal Holkar : Please try

to bring about reconciliation between the two brothers ( Kashirao and Yeshwantrao ). We all desire and pray for the peace and continuity of the times of the Devi.

---

**अ. नं. ४२** **श्री**

ता. २३ आगस्ट, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष : तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब (काशीराव) मुहूर्तेंकरून डेरा बाहेर देऊन स्वारी तिकडे जात असतां मार्गी पेंढारियाचे स्वार चाल करून त्यांनीं कटकट केली. घोड्यावरून खाली आले. परंतु जवळ माणसें होती त्यांनीं जलदी करून हात्तीवर बसवून घेऊन आले. मोठें अरिष्ट चुकलें म्हणोन लिहिलें. ऐसियासी दिवस काल एकप्रकारचा. कोठें कोणाची इमान क्रिया ठिकाणीं राहिली नाहीं. तशांत सोबती छलदृष्टी. कोणाकडून काय फंदफितूर करवितील याचे शाश्वत नाहीं. ईश्वरें मोठी खैर केली. याउपरि तुम्ही रात्रंदिवस सावधानी राखीत जावी. बाहेर कोठें जाऊं येऊ लागल्यास चार माणसें भरवशाचीं असल्याखेरीज जाऊं नये, अशी विनंती करीत जावी. आमची चित्तवृत्ती रात्रंदिवस वडिलांपाशीं लागली आहे. भेट घडेल तेव्हां समाधान घडेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 42 23-8-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : I was grieved to hear of the attack made on my brother (Kashirao) by the Pendharis. Please provide him always with faithful guards. I am very anxious to meet him soon.

---

**अ. नं. ४३** **श्री**

ता. ३० आगस्ट, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकर यांस. विशेष. तुमचे श्रावण वद्य ३ तृतीयेचे पत्र वद्य पंचमी शुक्रवारीं अस्तमानीं पाऊन लेखनार्थ अवगत झाला. तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब यांना बोलावून भेटीचा योग सत्वर घडावा. आम्ही येथोन इंदुरीं येतो. तिकडून तुम्ही यावें म्हणजे भेटी होतील, अशी आज्ञा केली. याप्रमाणें घडावे म्हणोन विस्तारें करून लिहिलें. ऐसियासी वडिलांचे येणें जवळ झालें असून भेटीस लांबण लागते हेही चित्तास प्रशस्त वाटत नाहीं. हल्ली वडिलांनींच येतो म्हणून आज्ञा केली त्यावरून

बहुत संतोष झाला. वद्य द्वादशी श्रावण शुक्रवारीं पुष्य नक्षत्रावर मुहूर्त चांगला आहे. अवकाश केवळ थोडा. दोन दिवसांत पत्रें पावतील. तीन दिवसांत त्यांनीं यावें, असें घडलें पाहिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 43 30-8-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal Holkar that he would be very happy to see Kashirao on a very auspicious day which was just then approaching.

---

**अ. नं. ४४** **श्री**

आगस्ट, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस. विशेष. तीर्थस्वरूप बाळासाहेब यांजला महेश्वरीहून समागमें घेऊन सेंधव्याजवळील मुक्कामापर्यंत आले. सर्व प्रकारें वडीलपण त्यांजकडे. दौलत त्यांची. इकडून त्यांचे मर्यादेस व मर्जीस जपावयास कमती न जाहली. परंतु वडिलांनीं कोणाचे कुबुद्धिस लागून कोताई मनात आणून काल शुद्ध २ इंदुवारीं दोन प्रहर रात्रौ अंधारांत मशाल देखील न लावितां ती. सौ. मा. लक्ष्मीबाई लेकरासुद्धां व सादत वगैरे चार लुच्चे समागमें घेऊन किल्ल्यात गेले. त्यांचा यांचा संदर्भ अगोदरच होता. आमचे मनांत त्याविशीं दुसरा अर्थ असतां तर जाबता ठेविला असता. मनांत संशय किंवा द्वैतार्थच नाहीं. त्यांनीं काय समजून हा विचार केला असेल न कळे. अस्तु, चिंता नाहीं. आमचाही श्री लक्ष्मीकांत आहे. ती. बाळासाहेबांचे संधान सोबत्याकडे आहे. कागदपत्रास मार्ग मिळून कागदपत्र अगर कोणी येईल जाईल त्याचा जाबता राहिला पाहिजे. यास्तव हें पत्र लेखन केलें असे. तरी हा विचार बाह्यात्कारें कोणास न समजतां नावा घाटावर व जांबच्या घाटासुद्धां कागदपत्रांची व माणसांची चौकशी ठेऊन सोबत्याकडील पत्रें, माणसे येतील जातील त्यास अटकेंत ठेवीत जाणें. संस्थानचा बंदोबस्त हुशारीने, चहूकडील बातमी ठेऊन वरचेवर वर्तमान कळवीत जाणें. खासी स्वारी उदईक घाटाखालीं जात आहे. रा छ १ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 44 August, 1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : Kashirao with his wife and retinue has gone away while we were marching. He seems to have reverted to his former relations with Scindia. Please be on the alert,

and keep watch on letters and men passing between them.

---

**अ. नं. ४५** **श्री**

ता. २० सप्टेंबर, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून रघुजी होळकर दिमत पागा विशेष. तुम्हांस तीर्थरूप राजश्री बाबासाहेबांनीं पागासरंजामसुद्धां रेवा दक्षिणतीरास सरकार कामगिरीवर ठेविले असतां तुम्ही मद्य प्राशन करून एक बारगीर बिना अपराध बेशुद्धींत मारला. हे वर्तमान वडिलास कळतां तुम्हास कैद केलें, म्हणोन समजलें. त्या वरून आश्चर्य वाटले. तेथें भरंवशाचे तुम्हांस मोजीत होतो. तर तुमचे करणें या चालीचें. अस्तु. आतां कामाचा प्रसंग, सहस्त्र अपराध जरी आहेत, तरी तुम्हास माफ करून पूर्ववत काम सांगांवयासी तीर्थस्वरूपजीस अलाहिदा पत्रीं लिहून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी घडला प्रकार मनांत न ठेवितां, वडिलांचे पायीं मस्तक ठेऊन इतःपर मद्याचा सहवास न करितां, चाकरी करून दाखविणें. पुनश्च बोभाट ऐकल्यास इकडून मुलाहिजा कदापि होणार नाहीं.

मोर्तब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 45 20-9-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Raghujee Holkar that he was very much grieved to hear of the latter’s drunkenness. Yeshwantrao wrote to his brother Kashirao to forgive the offender, and urged Raghujee to be careful in the future.

---

**अ. नं. ४६** **श्री**

बातमी पत्र : उज्जनीची लढाई ता. २२ सप्टेंबर, इसवी सन १८०१

विशेष. खासेही काल गांवांत गेले आहेत घडेल तें खरे. शंकरास रयतेची दया येत नाहीं. फकीरावर मर्जी फार. त्यांनीं पांढरी ढाल पिराची उभी करावयास सांगितली आज्ञेप्रमाणें तयार करून नगारखान्याजवळ उभी करून पांच रुपये दररोज मध्यान्हकाळास चौऱ्यावर करून दिले. ब्राह्मणास तर यमधर्म आहेत. शिक्षा तर होतच आहे. स्त्रियांस श्रीकृष्ण कृपा करून रक्षितील ते मात्र खरें. यजमानसाहेब दैववान. कोणत्या गोष्टीचे अवघड न पडतां द्रव्यलाभ शंकर देत आहे.

सरकारांत आठवा हिस्साहि न आला. शहर शुद्ध झालें. सर्व गोष्टींची महागाई होऊन गरीबांस अन्न न मिळतां शंकराचे घरीं जातील. इच्छा त्यांची.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 46 22-9-1801 A.D.

News-letter states the attitude of Maharaja Yeshwantrao towards Fakirs as well as towards Hindu residents of Ujjain after the battle was over.

---

**अ. नं. ४७** **श्री**

ता. १ आक्टोबर, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. मंगळवारीं भाद्रपद वद्य ७ सप्तमीस खासा स्वारीचे कूच होऊन इंदुरीं येऊन बुणगे तिकडे लावून आम्ही सडे देवाशाकडे जावयाचे करतों.

दूदरनेकास कोटेकरांनीं सोडून दिले व फूलणही त्यातच मिळाला. त्यामुळें दोन्ही कंपूंचा बंदोबस्त सरकारांतून करून एक कंपू राजश्री शामराव महाडिक घेऊन येतात. फुलणकडील कंपूत फिरंगी होते ते धरून कैद करून सरकारचा बंदोबस्त केला. तिन्ही कंपू लेश आहेत. जिकडे जसा उपयोग पाहूं तिकडे आणून घेऊं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 47 1-10-1801 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal of his intended march towards Dewas. Dudernec and Fullen have submitted.

---

**अ. नं. ४८** **श्री**

ता. ७ आक्टोबर, इसवी सन १८०१

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस. विशेष त्यांजकडील दरकूच करून इंदुरास येतील, म्हणोन तोंडावर आलों. आपली लढाई लागली आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 48 7-10-1801 A.D.

Srimant Yeshwantrao informs Bharmal Holkar the beginning of the war between Holkar and Scindia.

---

**अ. नं. ४९** **श्री**

ता. १५ जानेवारी, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस. विशेष. स्वारी प्रतापगडास जाऊन तिकडून खंडणीचा वगैरे गुंता उरकोन मंदोसरानजीक आली. राजश्री लखबादादाही इकडे आला आहे. त्याची व इकडील भेट रामपुरियाचे आसपास होऊन तिकडे स्वारी सत्वरच येत आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 49 15-1-1802 A.D.

Srimant Yeshwantrao informs Bharmal of his intended march towards Pratapgad and Mandosar.

---

**अ. नं. ५०** **श्री**

ता. १७ मे, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. आपणाकडील महाल नेमाड, माळवा मोकळे झाले आहेत. थोडे बहुताने जैशी जिकडून सोय पडेल तशी पाडून घेऊन तेथील निर्वाह घडून महालचा बंदोबस्त घडून येत तें करणें. अगोदरच महाल खराब त्यांत अलीकडे सात आठ महिने मक्त्यांचे होते. वहिवाट पडली तेव्हां खराबी हें उघडच दिसतें. सोबत्याकडील महालांत कोठेंही उपसर्ग लागू न देतां कोठीलही बोभाट त्यांजकडे न जाय असा जाप्ता ठेऊन वर्तणूक करावयाशीं निक्षून सांगून पुन्हा लिहिणें न पडे तें करणें.

(१) ज्येष्ठाकडील वर्तमान लिहिलें ते कळलें. इकडे परस्परेंही वृत्त समजतें. इकडील फौजा त्या जिल्ह्यांत गेल्या आहेत. तेव्हां त्यांस शहर जवळच करणें प्राप्त होईल. त्यांनी इकडील लक्ष धरून राहिले असतां उत्तम तेंच घडेल.

(२) फत्तेसिंग माने याजला चौघडा आदि मरातब बरोबरीची सरदारी वाढविली असतां

त्यांनीं मनांत अवक्रिया आणून कोणासही कळूं न देतां सालप्याचे घाटानें श्रीमंतांकडे जाऊं लागले. हे चाल. त्यांचे फौजेतील पठाण लोकांस कळतां तलबेचा तंटा काढून कैद करून राजश्री नबाब अमिरुद्दौले यांजकडे घेऊन आले.

(३) औरंगाबादनजीक स्वारीचा मुक्काम येऊन, बाब तांब्रास अनुकूल होऊन ऊन स्वराज्यावर मसलत करितांत. याजकरितां वैजापूर शहर येथें येऊन घासदाणा थोडाबहुत घेतला. शाहमतखां संगमनेरानजीक आहेत. चिरंजीव हरनाथ पागा व लक्ष्मण कंपू व कृष्णकंपू घेऊन मालेगांवचे सुमारें आहेत.

(४) सारांश पाहतां मार्गाचा जाबसाल कांहीं एक नसतां कल्पना वाढाव्या असेच भाव दिसण्यांत आले. आपसांतील कलह मोडून मसलत प्राप्त जाहली ते संभाळावी हे चाल दिसेना. ये समयीं आपल्याकडून ओढ धरून मसलतीचे दुर्निमित्य हे सल्ला नाहीं, असें जाणोन राजश्री सेनासाहेबसुभा यांजवर भार देऊन तूर्तचे प्रसंगीं समेट प्रकरणीं जाबसाल सर्व मोघम ठेऊन तूर्त चिरंजीव खंडेराव यांजला मंडळीसह आम्हाकडे पाठवून देऊन त्रिवर्गानीं एकविचारें मसलत सांभाळून स्वराज्य राखावें याचे पोटीं सर्व जाबसाल आहेत. सर्वांनीं एकविचारें त्याजवर चाल केली असतां त्यांचाही प्रसर होऊ पावणार नाहीं. हें कार्य झाल्यानंतर आम्हाकडील जाबसाल निर्गम व्हावे याचा जिम्मा भोसले यांनीं घेतल्यास आम्ही मसलतीस अनुकूल होऊं. हें न घडल्यास दिसेल तसें करावयास येईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 50 17-5-1802 A.D.

Srimant Yeshwantrao informs Bharmal of his own policy towards Scindia, Bhonsale and Kashirao.

---

**अ. नं. ५१** **श्री**

ता. ६ जून, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. सांप्रत स्वारी समागमें बाड वगैरे खटले आले आहे. कासारीण बरोबर नाहीं. घरांत बांगड्या भरावयाची अडचण पडली. तरी कासारीण इजला जल्द पाठवावें.

१ मातुश्री म्हाळसाबाई व उभयतां वडिलांस बहिणीसुद्धां बोलाविलें. त्यांचे उत्तर हेंच कीं, मजला धामधूम सहन होत नाहीं. त्यापक्षीं मी येथेंच राहीन, म्हणोन लेख व निरोप आले. परंतु चहूंकडे राजधानी व सोबत्याकडे धावधूप कमी करीत नाहींत. अस्तु. ही दौलत श्री लक्ष्मीकांताची आहे तोच रक्षण करील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 51 6-6-1802 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar informs Bharmal Holkar that Kashirao, though invited by himself, is keeping himself away and is in touch with Scindia and the Peshwa.

---

**अ. नं. ५२** **श्री**

ता. २ आगस्ट, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. संगमनेर प्रवरा दक्षिणतीरीं आलों. येथून सडे होऊन एक मुक्काम मध्यें करून दुसरें दिवशीं फौजेंत सडे दाखल होऊन गांव घालून ज्यांत परामर्श तेंच श्री लक्ष्मीकांताचे कृपेनें घडेल..

**सरकारी रेकॉर्ड**

No. 52 2-8-1802 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that he himself has encamped at Sangamner, and that he would shortly meet the army.

---

**अ. नं. ५३** **श्री**

ता. २२ आगस्ट, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. कैलासवासी मातोश्री प्रतापें अरिष्ट निरसन होईल. ज्याची जसी चाल दृष्टीस पडेल त्याची तशी स्थिती होईल. फलदाता श्री लक्ष्मीकांत आहे. उत्तम तेंच करील.

१ प्रांत माळवा एक दो रोजांत हस्तगत होईल. चांदवड हस्तगत झालें.

२ राजश्री विठ्ठल महादेव यांनीं सावधानी करून कंपूचा बंदोबस्त ठेविला आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 53 22-8-1802 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that he has already captured Chandwad, and Malwa will soon follow suit.

---

अ. नं. ५४ **श्री**

ता. १३ सप्टेंबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. खासा स्वारी चेनपुराहून कूच होऊन गाळणा व चांदवड येथील किल्ले वगैरेचा जातीने बंदोबस्त करून जनस्थानास आलों. येथून स्वारी कूच करून फौज मीरखान, इरामतखान व नागो जिवाजी, यांजला सोबत्याचे फौजेच्या मुकाबल्यास पाठवून खासा स्वारी त्यांचे उपळ्यास आहे. श्री लक्ष्मीकांताचे कृपें उत्तम तेच घडेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 54 13-9-1802 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that he has, after settling the affairs of Galna and Chandwad, reached Nasik. He further intends to send his army under Mirkhan and others against Scindia.

---

अ. नं. ५५ **श्री**

ता. १५ सप्टेंबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून रा.भारमल होळकरांस विशेष. श्रीमंतांकडील संधान राखून त्यांचे विचारें सोबत्यास जरब बसोन ज्यात दौलतीचा बंदोबस्त घडे तो विचार करावयात सर्व आहे, म्हणोन लिहिलें. त्यास श्रीमंतांचे संधान राखून त्यांचे मर्जीने जसे घडेल तसें करावें, या विचारास जपत असतां बाहेरून बोलणें समेट करितों असें होऊन दिवस काढून सोबत्याची फौज पलटणें आणून लढाई पाडली. माने याजवर राजश्री पांडोजी कुंजीर व मानकरी वगैरे पाठविले. तेव्हां त्यांचें अंतःकरण शुद्ध नाहीं. त्याप्रमाणें फळेंही निदर्शनास येतात. इकडून जपावयास कमी करीत नाहीं. श्रीकृपेने घडेल ते खरे. मान्यांच्या भेटी करकंब देवीच्या पायानजीक जाहल्या. एकदो रोजा सडे होऊन मुकाबल्यास जाऊं. श्रीमंतासीं आपल्याकडून वाकडे दाखवीत नाहीं. त्यांजला सोबत्याचे कारभारी व कुंजर जसे भासवितात तसें करितात. त्यास उपाय काय ?

**सरकारी रेकॉर्ड**

No. 55 15.9.1802 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar : I agree with your sentiment that we should, in no way, displease the Peshwa, and that

through him we should bring pressure on Scindia. In spite of all my efforts in that direction, nothing tangible is turning out.

---

अ. नं. ५६ **श्री**

ता. १९ सप्टेंबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडोन भारमल होळकरांस विशेष. सोबत्याची फौज गंगा पैठणापासोन पलीकडे उतरतात आणि आपली फौज प्रवरातीरीं आहे.

राजश्री गोपाळराव गोविंद गानू यांजला श्रीमंतांनीं पाठविले आहे ते आज येथें येतील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 56 19-9-1802 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that his own army is on the banks of the Prawara and that of Scindia is on the other side of Paithan. Gopalrao Ganu sent by the Peshwa-will arrive here today.

---

अ. नं. ५७ **श्री**

ता. २५ आक्टोबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून रा.भारमल होळकरांस विशेष. नारायण बाबुराव वैद्य, रघुनाथ धोंडदेव भागवत, पाराशर दादाजी आणि गोपाळराव गोविंद गानु त्यांत कांहीं जीव दिसेना तेव्हां त्यांजला मार्गस्थ करून आश्विन वद्य १४ इंदुवारीं प्रातःकाळापासून दोन प्रहरपर्यंत लढाई होऊन तोफा व फौजेची शर्थ दोन्हीकडून चांगलीच जाहली. शेवटीं जातीनिशीं फौजेसह हल्ला केला. श्री लक्ष्मीकांत कृपेनें त्यांची फौज पलटणे दरोबस्त गारद जाहलीं. तोफा अगदी सांडविल्या. फौजेपैकीं कांहीं सडे मात्र जीव घेऊन गेले. बाकी सर्व लुटून घेतलें. आमचे हातास मात्र तीन जखमा तरवारीच्या हलक्याच लागल्या आहेत. खैर मोठी जाहली. जखमा सत्वरीच बऱ्या होतील.

श्रीमंत फौजेसह बाहेर निघाले. कुठें जमून असावें किंवा वाड्यांत राहवें तें न करितां सिंहगडाचें सुमारें गेले. इकडून ओढ आजपर्यंत जाहली नाहीं व पुढें होणार नाहीं.

No. 57 25.10.1802 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal Holkar of the

incidents of the Pune war : The Peshwa has fled after his crushing defeat.

---

**अ. नं. ५८** **श्री**

ता. २५ आक्टोबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून रा.बळवंतराव गोविंद यांस विशेष. आपल्याकडे एकदोन पत्राच्या रवानग्या केल्या त्यावरून सविस्तरें ध्यानास आलेच असेल. श्री जेजुरीची यात्रा करून थेऊरनजीक आलो श्रीमंतांकडून राजश्री नारायणराव वैद्य व रघुनाथ धोंडदेव भागवत, बोलावयास आले होते. त्यातील अर्थ दिवस काहडावे इतकाच दिसला. तेव्हां त्यांसीं मार्गस्थ करून आश्विन वद्य १४ छ २७ जमादिलाखर इंदुवारीं प्रातःकाळींपासोन लढाई सुरू होऊन दोन प्रहरपर्यंत दुतर्फा जितकी शर्थ तित्की जाहली. शेवटीं आम्ही जातीनें फौजेसह हल्ला करून श्रीकृपेनें दरोबस्त फौज व पलटणें गारद केली. तोफा आगदी सांडविल्या. फौजेपैकीं कांहीं सडे जीव घेऊन पळून गेले. वरकड सर्व लुटून घेतले. श्रीमंत सिंहगडांकडे गेले. आपण याउपरी कोणेविशीं संशय मनांत न आणितां सत्वर यावयाचें करावें. रवाना छ २९ जमादिलाखर, सलासमयाते वअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 58 25.10.1802 A.D.

Shrimant Yeshwantrao Holkar gives the same news as above (of the Pune war) to Balwantrao Govind.

---

**अ. नं. ५९** **श्री**

आक्टोबर, इसवी सन १८०२

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून रा. भारमल होळकरांस विशेष. सारांश ज्या ठिकाणीं शत्रूशीं मुकाबले पडत गेले तेथें रुबरुच पडत गेले. तोफांचे गोळे व बंदुकांच्या गोळ्यांची पर्जन्यवृष्टी होत गेली. त्या ठिकाणीं जागाजागा स्वारीखालील घोडेही गोळे लागून कामास येत गेले. गोळे आंगरखे, पागोटे, यांस आसपास लागून गेले. त्या काळीं श्रीनेंच सुदर्शन चक्र सभोवतें फेरवून संरक्षण केलें, यात शंका नाहीं, त्याप्रमाणें पुढेंही सर्वोपरि त्याचाच भरंवसा आहे. कोणेविषयीं काळजी न करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 59 October, 1802 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal how he was saved by the grace of God in the Pune war.

---

**अ. नं. ६०** **श्री**

इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. उभयतांनीं (शिंदे, भोसले) सलूक केल्यानें वाच्चाई फार झाली इकडून जो क्रम आहे त्यांत अंतर नाहीं.

(१) आतां यापुढें खटले मारवाडांत ठेऊं, सडे होऊन गनीमी करावी हाच इरादा आहे. श्रीकृपें उत्तम तेंच घडेल.

याच अर्थाची पत्रें रा. गंगाराम कोठारी, काशीनाथ अप्पाजी, रामचंद्रराव भुसकुटे यांना पाठविलीं गेलीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 60 1803 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that treaty made by Scindia and Bhonsale has, no doubt, weekened his own position. He would, however, continue his chalked out policy, choosing the practice of the Guerrilla warfare.

---

**अ. नं. ६१** **श्री**

इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. समेटाचें बोलणें लागल्यापासोन त्यांचे महालास इकडूनही उपसर्ग लागूं पावला नाहीं. यामुळें त्यांचें जपणें पडते. आपल्या कडील महालीं जप्त्या होत्या त्याही उठवितात. तुम्ही दो पलटणाचा जमाव करून सोबत्याकडील महालमुलखांत कांहीं एक तोषीस लागू न देतां बचाव करून आपल्या कडील महालांचा चांगला बंदोबस्त करूल रैयत जेथील तेथें आबाद होऊन लावणी दरोबस्त महालीं होय तें करणें. कमाविसदार पाठविणें तें जमाखर्चाचीच बेरीज दाखविणारे पाठवूं नये समजून खातरजमेचे पाठविणें.

No. 61                    1803 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar.

Reconciliation has commenced. We should, therefore try to give no harm to Scindia's Mahals. Our Kamavisdars must be chosen to suit the occasion.

---

**अ. नं. ६२**          **श्री**

ता. २ मार्च, इसवी सन १८०३

यादी मोजदाद तोफखाना तटबंदी वगैरे किल्ले महेश्वर विद्यमान राजश्री बाळाजी भास्कर दिमत राजश्री अंबोजी इंगळे. सुरुसन सलासमयातेन व अलफ. छ ७ माहे जिल्काद शके १७२४

१० तोफा सुमारी

| | |
|---|---|
| १ दक्षिणेस श्री गणपतीचे जवळ. लोखंडी. | १ ईशान्य कोनाचे बुरूजावर, |
| १ उत्तरेकडे तटबंदी बुरूजावर लोखंडी. | १ दिल्ली दरवाजाबाहेर, धातूची. |
| ४ दिल्ली दरवाजापुढें, | १ दिल्ली दरवाजाचे उजवे बाजूस. बुरूजावर लोखंडी. |
| १ पंचरसी मोठी तोफ. | |
| १ शेरबचनावाची पंचरसी. | १ उत्तरेकडील बुरूजावर पीराजवळ. |
| १ लहान लोखंडी. | १ कमानी दरवाजाजवळ, तटबंद पंचधातूची. |
| १ पंचधातूची लहान. | |
| .......... ४ | १ उत्तरेकडील कमानी दरवाजाचे उजवे बाजूस तटबंदी, पंचधातू. |
| २ अग्निकोण बुरूजावर तटबंदीस लोखंडी लहान व मध्यम. | १ दक्षिणेकडील बागली बुरूजावर लोखंडी. |
| ...... ८ | .......... ७ |

येकुण १५ पंधरा

पैकीं वजा साहेब फिरंगी यांजकडे कंपूत आल्या सुमारी ५ पांच दिल्ली दरवाजा पुढील चार ४ व दिल्ली दरवाजाबाहेर लंब छड १ येकुण पांचः बाकी किल्ले मजकुरीं बुरूजावर वगैरे १० दहा :

३० भालेकरी दरवाजावर

१ जंबुरेची गोळी २१ जजाली सुमारी. ६ जंबुरे लहान, १ सिंगाडा.

१ गोळ्या सुमारी ४०० कचेरीत.

येणेंप्रमाणें कचेरीत ३० तीस.

१ नगारियाची जोडी लोखंडी श्री गणपतीमागें.

५ गंजीफा गाड्या दिल्ली दरवाजापुढें.

५ जंबुरे सुमारी ५ बागली बुरूजावर ३ व मंडळ खोर दरवाजा २ येकुण ५.

२ नैऋत्य कोनी बुरूजावर जेजाली सुमारी २.

.........

५३

येकुण त्रेपन्न दागिने आहेत. शिवाय जंबुरे १०६ पैकीं सरकारांत पाठविले. २५ बाकी आहेत व गोळे वगैरेची मोजदार करून दिलीच नाहीं ती करून लिहून घेणें.

**पळसी रेकार्ड**

No. 62 2-3-1803 A.D.

List of guns, ammunition, etc., on the fort of Maheshwar.

---

**अ. नं. ६३** **श्री**

ता. १ एप्रिल, इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. सोबत्याकडील आपल्या महालच्या सोडचिठ्ठ्या दिवसगत न लागतां श्री लक्ष्मीकांताचें कृपेनें व कैलासवासी तीर्थस्वरूप मातोश्री बाईसाहेबांचे पुण्यप्रतापेकरून व कै. थोरले सुभेदारसाहेबांचे आशिर्वादेंकरून लौकरच येतील. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 63 1-4-1803 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal; expresses a hope that Scindia would soon release their lost territory.

---

**अ. नं. ६४** **श्री**

ता. १९ मे, इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. सरकार बिजागड, संस्थान महेश्वर व मालवा या जागेचा बंदोबस्त करावयाविषयीं सांगोन रवाना करणें.

(२) सोबत्याकडील महाली उपसर्ग न देतां आपले महालचा बंदोबस्त करणें.

(३) ताप्ती चांगदेवनजीक चहूकडून मसलत प्रकरणीं औडंबरें आलीं आहेत.

कोणाचा विश्वास न धरितां सावधानीनें असावे म्हणोन लिहिलें. त्यास नबाब, इंग्रज एक होऊन पलटणीं पुण्यास दाखल जाहल्या. श्रीमंतही येऊन पोहोचले असतील. सर्व सरदारांनीं एकत्र होऊन परराष्ट्राचा प्रसर न व्हावा या अर्थी रा. भोसले यांचे विद्यमानें बोलणीं लागली आहेत. आम्ही स्वराज्याचे बंदोबस्तास अनुकूल आहोत. अंतःकरणापासोन सफाईने समेट झाल्यास दुसरें दाखवावयाचे नाहीं. त्यांजकडून चालींत एक, बोलण्यांत एक दिसूं लागल्यास आमचाही भार श्रीलक्ष्मीकांतावर आहे. तो उत्तमच करील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 64 19-5-1803 A.D.

Srimant Yeshwantrao expresses his resolve to Bharmal that he would join the party of the Sardars in case they show sincerity for the defence and protection of Swarajya.

---

**अ. नं. ६५** **श्री**

ता. ३१ जुलाई, इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. मुक्काम राहुरीहून बेलापुराकडे उदईक जाऊं व तेथून चांदवड, खानदेश प्रांतीं. तांब्राचे वसांत श्रीमंतांसह बंधु जाऊन पडल्यामुळें त्यांचें हातें दस्ताऐवज लिहून घेऊन त्यांजला चाल तर कर्तव्यच होती, परंतु अनायासे निमित्य होती. निकडीनें करहाड प्रांतांत पलटणें व तुरक स्वार येऊन पोहचले. आठ पंधरा दिवसांत पुण्यास दाखल होतीलसें दिसते. सोबत्याकडून व भोसल्याकडून पत्रें येतात कीं घरांतील समेट होऊन येईल, तूर्त जागा सोडूं नये पुण्यासच असावे. जड भारी पडूं लागल्यास कुमकेस फौज पाठवूं, निदान आम्ही येऊं, अशीं येतात. याचा विचार पाहतां अद्यापि तर घरांतील कलह मिटला नाहीं. तो तांब्रासीं मुकाबला करण्यास उभें राहणें शक्य नाहीं. कलमबंदीप्रमाणें मुद्देहाशील होऊन बंदोबस्त झाल्यानंतर सर्वांचे एकदिलतेनें कांहीं अवघड पडूं पावणार नाहीं. श्री लक्ष्मीकांताचे कृपेने जें घडून येईल ते खरे. नबाबाचे सूत्र तांब्रांशीं लागले आहे. आपलेकडील पठाणास पत्रें पाठवून फोडाफोड करितांत, परंतु साधत नाहीं. कारस्थानें चाललीच आहेत. स्वारी तूर्त चांदवड खानदेशांत येत आहे. समेटीची भोसल्यावर

मुखत्यारी. कसें ठरवितात याप्रमाणें समजून कर्तव्य तें करावयास येईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 65 31-7-1803 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar :

The Peshwa has entered into treaty with the Company. I have authorized Bhonsale to bring about our reconciliation. Until our house is set in order, it is no use to stand against the Foreigner.

---

**अ. नं. ६६** **श्री**

ता. २५ डिसेंबर, इसवी सन १८०३

श्रीमंत यशवंतराव होळकरांकडून रा. भारमल होळकरांस विशेष. अखेर ज्येष्ठ दुर्गांतून निघून गोपाळराव चिटणीस याजपाशी गेले. ज्येष्ठांनीं परवसांत जाऊन पडावयाचे कारण नव्हते. असो. त्यांनीं काय विचार केला असेल नकळे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 66 25-12-1803 A.D.

Srimant Yeshwantrao Holkar informs Bharmal that Kashirao has, at last, gone to join Gopalrao Chitnis (Shinde's party). He knows best the cause.

---

**अ. नं. ६७** **श्री**

| |
|---|
| श्रीलक्ष्मीकांत शाह आलम बादशहा ग़ाजीका,<br>फरजंद, अरजुमंद बहादुरल मुल्क, जबदतल उमरा,<br>महाराजाधिराज राज राजेश्वर, जसवंतराव होळकर सुभेदार,<br>आलिजाह, नुसरत जंग बहादूर |

ता. ३० सप्टेंबर, इसवी सन १८०४

श्रीमंत राजाधिराज राजराजेश्वर महाराज यशवंतराव होळकर यांजकडून वासुदेव रघुनाथ कमाविसदार प्रगणे पाटण श्री केशवराय यांस विशेष. वेदमूर्ती राजश्री अमर कृष्ण

जोशी सुरुंजकर यांजला सरकारांतून प्रगणे मजकुर पैकीं मौजे निमोदा हा गांव साल मजकुरीं धर्मार्थ लावून दिला व सनदापत्रें वर्तमानभावी वगैरेचे नावें करून दिले. त्याप्रमाणें वहिवाट मशारनिल्हेची व्हावी. तो साल मजकुरीं प्रगणे मजकुराचा मुक्ता तुम्हांकडे ठराऊन महाल लावून दिला. गांव सनदेप्रमाणें जोशी बाबाकडे चालू न होय याजकरितां स्वारींत मथुरेच्या मुक्कामीं आले. तेव्हां मौजे मजकुराचा ऐवज तुमचे मख्त्यांत मुजरा देऊन गांव जोशीबाबाकडे चालवावा असें ठराऊन हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी तुम्ही मौजे मजकुर येथील साल मजकुराचा ऐवज जमेंत वजा घालून गांव पेशजीचे सनदेप्रमाणें मशारनिल्हेकडे दुमाला करून देऊन सालमजकूर ऐवजीं वसूल घेतला असेल तोही माघारे देऊन खर्ची लिहिणें. हिशेबीं मजरा दिला जाईल. जोशी मजकुर यांस कसबे मजकुरीं रहावयास जागा देविली आहे. त्यास सरकारची जागा इमल्यासहित, जेथें बाळाजी गुणाजी राहत होते ते जागा, देऊन हरएकविसीं गौरबरदास्त करणें. जाणिजे छ २५ जमादिलाखर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद. बार.

**कोटा येथील गुलगुले दप्तर**

No. 67 30-9-1804 A.D.

The Kamavisdar, Pargana Patan Sri Keshavrai is ordered by Maharajadhiraj Yeshwantrao Holkar to hand over the revenue of Mauza Nimoda to Vedamurti Amar Krishna Joshi, as the said village is given in charity to him.

---

**अ. नं. ६८** **श्री**

ज्येष्ठ शुद्ध १२, ता. ८ जून, इसवी सन १८०५

श्रीमंत भीमाबाई बुळे यांचे आपले वडिलांस, (म्हणजे महाराज यशवंतराव होळकरांस) पत्र. मुक्काम चेनपुरा नजीक जोधपुर मारवाडहून. विशेष. वडिलीं छ २६ व छ २७ माहे सफरचीं पत्रें पाठविली ते छ८ रविलावलीं पावून लेखनार्थ अवगत जाहला. त्याचीं उत्तरे येणेंप्रमाणें.

१ सोबती यांच्या भेटी जाहल्यावर मेवाड प्रांतीं उभयतांनीं जावे असे बोलणेंत आले त्यावरून तुम्हांस कृष्णगडचे सुमारें यावयाविशीं लिहिलें होते मागून मसलतीचे अन्वयें शत्रूकडील जाबसाल एकेदेठीं लागल्याखेरीज बोलो देणें ठीक नाहीं, असे समजून येणें महकूफ करून दोन जोड्या रवाना केल्या. त्या पावल्याच असतील. त्याप्रमाणें करणें म्हणोन आज्ञा. ऐसियासि आगोदरील पत्रांची उत्तरें पाठवून सिद्धताही केली होती. मागून महकुफीचीं पत्रें आली त्यावरून स्थिरता

केली. पुढें जशी आज्ञा येईल तैसे केलें जाईल. कलम

२ घाणेरियाचे जमियतीविशीं आगोदर पत्रें पाठविली होतीं तेथें गुजारा चालून निरवाह घडत असल्यास राहिली तरी चिंता नाहीं. तेथें गुजारा होत नसल्यास परस्थलीं राहून बखेडा करावा हें चांगलें नाहीं. अर्जुन पलटन व शिलेदार याची रवानगी करणें. पुढें तुम्हास बोलावून घेणे तेव्हां आणखी फौज पाठविली जाईल म्हणोन आज्ञा ऐसियासि. आगोदर वडिलीं पत्रें पाठविली ते येतांच येथून राजश्री आप्पाजी परशराम यांजला रवाना करून चिरंजीव चेनसिंग यांस वडिलांचे आज्ञेप्रमाणें दोही वकिलांची रवानगी करावयाविशीं पत्रें लिहून दिलीं. मशारनिल्हे तेथें गेल्यावर राजाजीकडील कारभारी राजश्री साहेबचंद यांनीं महालोभ दाखवून ठेऊन घेतलें आलीकडे घाणेरियाचा ठाकूर चेनसिंगाचे बहादुरीनें भेटून जागा सोडून निघोन गेला. ठाणे राजाचें कायम झालें. तेव्हां परदेशी फौजेस निरोप देतात आपलेही फौजेचा जाल्या दिवसांचा निर्गम करून देऊन पलटन व शिलेदार यांजला मेडत्यावरून स्वारींत रवाना करून देऊन चेनसिंगानीं येथें यावे ऐसे ठेरावून राजाजींनीं आपले कारभारी यांस पत्र लिहून पाठविलें. येथूनही चेनसिंगास पत्र सदरू अन्वयें लिहून त्याजकडील कारकुन रा. बाबाजी रामचंद्र यांची रवानगी केली. तेथील जाबसाल तुटक जाहला. तेव्हां निष्कारण जमियत ठेऊन घेऊन बखेडा करावा हें चांगलें नाहीं. शिलेदार व अर्जुन पलटणचे लोकांत आळा बसोन अथवा रीतभात मर्यादा कांहीं राहिलीच नाहीं. याजकरितां रवाना करावयाविशीं लिहिलें आहे. तेथें घडेल तैसे मागाहून लिहून पाठऊं. कलम

३ येथील संस्थानिकास घरची मसलत उभी राहून दिडवाणे ठाणें घेऊन दौलतपुरी यांस मोर्चे लाविले. हे वर्तमान येतांच त्यांनीं आपली फौज रवाना करून आपल्याकडीलही फौज रा.जिवलालसिंग यांजकडून जावी याअन्वयें येथें बोलून त्यांनीं आपले खलिते व आमची पत्रें घेऊन वडिलाकडे दोन तीन रवानग्या लगट केल्या. ते पत्र पावल्यावर घरोब्याचे रीतिनें ते किती जपतात तेव्हां आपण उपराळा करावा हें उचित जाणोन रा.कृष्णाजी महाडिक यांची कंपूसह रवानगीकरून राजश्री जिवलाल सिंग यांजकडे राजश्री बलवंत साबाजी यांजला पाठवून इकडे खलित्यांचे जाब व आमचे पत्राचीं उत्तरें पाठविलीं. ते आल्यापूर्वीच सेखावटीतील जमियत आली होती. त्याची व राजाजींचे जमियतीची लढाई होऊन सेखावटीची जमियत सिकस्त खाऊन निघोन गेली. दिडवाणेस ठाणें यांचें कायम जालें. यांची फौज तिकडेच आहे. तूर्त आपले फौजेचे प्रयोजन नाहीं. काम लागल्यास बोलावून घेऊं. परवानगीचा अक्षेप न घेत अशी आज्ञा असावी. याअन्वयें येथें बोलण्यांत आणून वडिलांचे खलित्याचा जाब लिहून रवाना केला. त्याअन्वयें येथून ही राजश्री कृष्णाजी महाडिक व जिवलालसिंग व बळवंतराव

साबाजी यांजला जेथील तेथेंच असावें याभावीं पत्रें लिहून रवाना केलीं. वडिलींही तेथून लिहावें. कलम

४ तेथील प्रासंगिक मजकूर लिहिला तो समजला. आजपर्यंत इंगळे यांजकडील ऐवज वसूल होऊन पुढील बेत कूच मुक्कामाचा ठरला असेल त्याप्रमाणें लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. कलम

५ रामपुरियास पेस्तर साल ऐवजीं वरात तीन लक्षांची कोठारी यांचे नांवें करून पाठविली ते पावली. गिरमाचे विद्यमानें महालीं रवाना करून तगादा लावितों ऐवज येईल तैसे लिहून पाठऊं. कलम

६ येथील सर्व मंडळी लहानथोर कुशलरूप आहेत. वडिलीं काळजी न करितां तिकडील साद्यंत लेखन करीत असावें. कलम

७ चौकी पाहारियाचा जाबता वर्दीप्रमाणें यथास्थित आहे. कलम

येकुण सात कलमें मनन करून उत्तराची आज्ञा केली पाहिजे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्त छ २० रविलावल सन १२१५ फसली. ता.१८ जून इसवी सन १८०५

**सरकारी रेकॉर्ड**

No. 68 8-6-1805 A.D.

Srimant Bhimabai Bulye replies from camp Chenpura (near Jodhpur) to her father, Maharaja Yeshwantrao Holkar.

News of Ghaneria, Daulatpuri, and bill of payment on Rampura Pargana are referred to.

---

**अ. नं. ६९** **श्री**

ता. ९ जून, इसवी सन १८०५

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस बनास नदी चार कोस नजीक मांडळगड मेवाड प्रांत. विशेष. येथेंही पुण्याप्रमाणेंच ज्या ठिकाणीं शत्रूशीं मुकाबले पडत गेले, तेथें रुबरुच पडत गेले. तोफांचे गोळे व बंदुकीच्या गोळ्यांची पर्जन्यवृष्टीच होत गेली. त्या ठिकाणीं जागजागां स्वारीखालील घोडेही कामास येत गेले गोळ्या अंगरखे पागोट्यास लागून गेल्या. त्याकाळीं श्रीनेंच सुदर्शनचक्र सभोवती फेरवून संरक्षण केलें. पुढेंही सर्वोपरी त्याचाच भरवंसा आहे. कोणेविशीं काळजी न करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 69 9-6-1805 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar encamped on the Banas river in Mewar informs Bharmal of the incidents of the war; Says Pune events repeated themselves. He himself was saved by God's grace.

---

**अ. नं. ७०** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १८०५

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून रा.भारमल होळकरांस विशेष इकडील वर्तमान पटयाल्यापावेतों स्वारी आल्याचे वर्तमान पेशजी लिहिलेंच आहे, त्यावरून कळेल. पतियालेकर राजे आदिकरून शिखांच्या भेटी जाहल्या. मसलतीस अनुकूल, परंतु त्यांचें घरांत राणी कुबेर एक होऊन कलह पडला त्यांची समजुती करावी यानिमित्त आठ पंधरा दिवस मुक्कामही करून राहिलों. दोहीकडून ताला न पडे, असें पाहून दोहीकडेही एकेकास ठेऊन लाहोरवाल्यांची संधानें आलीं व शहाकडीलही पत्रें आली. त्यांजला सामील करून घेऊन पुन्हा माघारें शत्रूचे मुकाबल्यास जावे, या विचारें पतियाल्याहून कूच करून दरकूच छ.१ रमजानीस (१३-११-१८०५) सतलज नदी उत्तरतीरास फौजे कंपूसहित आलो. तेथून शहाकडील पत्रें आलीं कीं, अटक नदीचा पूल तयार होऊन दोन तीन दस्ते पार उतरले. आणखीही उतारा चाललाच आहे. दरोबस्त फौजेसुद्धां सत्वरच येऊन पोहचेल. याभावीं लिहिल्यावरून नदीतीराहून पुढें अमृतसर लाहोरच्या जिल्ह्यांत येऊन पोहचलों. लाहोरवाले राजश्री रणजीतसिंग आदिकरून दरोबस्त शीख सामील झालेत. इतःपर थोडक्याच दिवसांत अवघ्यास एकत्र करून श्री लक्ष्मीकांताचे कृपें शत्रूचा पराभव करून इंद्रप्रस्थ श्री मथुरा ह्या जिल्ह्यांत येऊन पोहोचतो. याकाळीं सोबती अनुकूल असते तर बहुतच उपयोग होता त्यांचे मनांत न येतां इकडील निसरसांड करून कारभारी यांचे विचारें लोभदृष्टीवर पडले. शत्रूशीं ऐक्यता केली. त्याजला आप्तकी दिसोन यावी याजकरितां राजश्री सखाराम घाटगे, सर्जेराव, जिवलाल सिंग, इकडील तर्फे जे माळवे प्रांतीं होते त्यांजवर तिकडील महाली उपद्रव लागल्याचें निमित्य करून फौजा व पेंढारी रवाना करून, इकडील महालमुलखाची खराबीं करितात, हे बोभाट हुजूर आल्यावरून सोबत याजला लिहिणें ते लिहिलें आहे. निदर्शनास येईल तें खरें. राजश्री श्री खंडो महादेव व कुंजर आदिकरून मंडळी राजधानीत पोचून तेथील पत्रें आलीं असतील, अथवा येतील. तिकडील वर्तमान सविस्तर हर पल्लेहून पत्रांच्या रवानग्या मारवाडांतून करीत जाणें, म्हणजे पत्रें स्वारींत पोहचत जातील रवाना छ ७ रमजान सुरू सन सीतमयातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 70 29-11-1805 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar informs Bharmal of his visit to the Courts of Patiala and Lahore. Incidentally he mentions the negotiations of the Afgan Durbar.

---

**अ. नं. ७१** **श्री**

ता. २४ डिसेंबर, इसवी सन १८०५

तहनामा सरकार कंपनी इंग्रज बहाद्दर यांचे सरदारासीं व महाराजांचे मवसुफ यांसीं कित्येक प्रकारें जुदाई झाली होती. सांप्रत उभयपक्षीं दोस्ती मुकरर जहाली. त्यास गव्हर्नर जनरल सर जार्ज हलरोबार्लो बारोनेटसाहेब बहादूर यांजकडील मुखत्यार लार्ड लिकसाहेब बहादुर त्याजकडील मुखत्यार कर्नल जान मालकमसाहेब बहादूर यांचे विद्यमानें व महाराज यशवंतराव होळकर यांजकडील शेख हबीबुल्ला व बाळाराम शेठ यांचे विद्यमानें करार ठरला. करारनामेचीं कलमें ठरलीं तीं बीतपसील.

१ **कलम पहिलें** : सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांजकडील सरदार करार करितांत कीं, महाराज यशवंतराव होळकर यांसीं लढाई मोकुफ जाहली. पुढें महाराज मोसुफ करार करितांत कीं सरकार कंपनी इंग्रज बहादूर यांसीं व त्यांचे इलाखेदारासीं व दोस्तासीं कोणे प्रकारें शत्रुत्वाची मसलत करणार नाहीं व ज्यामध्ये त्यांचें नुकसान तें करणार नाहीं.

२. **कलम दुसरें** : महाराज यशवंतराव होळकर करार करतात कीं, रामपुरा व टोंक व बुंदी व लाखेरी व समधी व मालेगांव व दतिया वगैरे मुलूख बुंदीचे पहाडाचे उत्तरेस आहे तो आजपर्यंत सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बहादुर यांचे इलाख्यांत कायम आहे त्या मुलखाचा दावा करणार नाहीं व आस्था धरणार नाहीं.

३. **कलम तिसरें** : सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांचे सरदार करार करीत आहेत कीं होळकरांचे खानदानाचा कदीम तालुका व मुलूख माळव्यांत व दुसरें राजे मेवाड व मारवाड व हाडोती व चंबल नदीचे दक्षिणेस राजे आहेत त्यांचे मुलुखांत, त्यांस उपद्रव देणार नाहीं व अंमल दखल करणार नाहीं आणखी करार करीत आहेत की होळकरांचे तालुक्यांचा मुलूख तापी नदीचे दक्षिणेस व दक्षिण प्रांतीं आहे तो अद्याप सरकार कंपनी इंग्रज बाहदुर यांजकडील सरदाराचे हस्तगत आहे तो महाराज यशवंतराव होळकर यांचे सरकारांत

माघारा द्यावा. मगर चांदवड किल्ला व परगणा अंबाड व शेवगांव व गंगा गोदावरीचे दक्षिणेकडील गांवही. घरे मात्र सरकार कंपनी इंग्रज बहादूर यांचे स्वाधीन राहतील. परंतु होळकरांचे खानदानाचे थोरपणावर नजर देऊन करार केला जातो. महाराज यशवंतराव होळकर यांजकडून दोस्ती कायम राहील व कोणेएक प्रकारें सरकार कंपनी इंग्रज बहादूर व त्यांजकडील इलाखेदार व दोस्त यांचे तालुक्यांत उपद्रव न लागल्यास मुलूख मजकुरही दीढा वर्षांनीं महाराज यशवंतराव होळकर यांचे स्वाधीन केला जाईल.

४. **कलम चवथें** : महाराज यशवंतराव होळकर करार करितांत कीं, परगणे कोंच बुंदेलखंडाचा जिल्हा आम्ही सोडला. याचा दावा करणार नाहीं. परंतु सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांचे सरदार करार करितात कीं, महाराज मवसुफ यांजकडील दोस्तीची मजबुती यथास्थित राहिल्यास ज्याप्रमाणें, बाळाबाईस जहागीर दिली आहे त्याप्रमाणे कोंच, महाराज मवसूफ यांची कन्या भीमाबाई यांस दोन वर्षांनंतर कंपनी सरकारांतून जहागीर दिला जाईल.

५. **कलम पांचवें** : महाराज यशवंतराव होळकर करार करितांत कीं, सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांचा मुलूख व यांचे सरदारांनीं घेतलेला मुलूख व त्यांचे इलाखेदार व दोस्त यांचे तालुकियासी कोणेविसीं दावा करणार नाहीं.

६. **कलम सहावें** : महाराज यशवंतराव होळकर करार करितांत कीं, सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांचे रजाबंदीशिवाय कधींही कोणेएक फिरंगी यांचे मुलखांतील माणूस नोकर ठेवणार नाहीं.

७. **कलम सातवें** : महाराज यशवंतराव होळकर करार करितांत कीं, सर्जेराव घाटगे यांनीं लबाडी करून मुलखाची खराबीं केली त्याहीमध्यें सरकार कंपनी इंग्रज बहादुर यांसी लबाड्या बहुत अयोग्य केल्या. याजकरितां सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बहादूर यांचे सरदारांनीं त्याबदजाताचे लबाडीचा इस्तहारनामा लिहून पाठविला. यास्तव सर्जेराव मजकुर याजला आपले इलाख्याचे मुलखाचे मसलतींत घेणार नाहीं व चाकरीस ठेवणार नाहीं.

८. **कलम आठवें** : सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बहादुर यांजकडील सरदार करार करितांत कीं, महाराज यशवंतराव होळकर सलाह मुकरर करून तहनामे दुरस्त जाहल्यावर आपले तालुक्याकडे कूच करून जातील. त्यांस आम्हाकडून कोणही मुजाहिम होणार नाहीं. कोणे गोष्टीविषयीं अडथळा होणार नाहीं व त्यांचे कोणत्याही कामात दखल करणार नाहीं. परंतु यांस शर्थ कीं त्यांनीं आपला तहनामा दुरुस्त होतांच पटियाले व खटल वगैरे तालुके सरकार व जयपूरचे राजे डावे हाताकडे टाकून दरकूच आपले तालुक्यांत जावे. मार्गामधीं सरकार वगैरे मुलुख लागल्यास रयतीस कोणेविशीं उपद्रव होऊं न पावे आपले फौजेपासून

त्याची रखवाली करावी.

९. येणेंप्रमाणें तहनामा नौ कलमाचा छ २ शवाल ता. २४ डिसेंबर सन १८०५ इसवी सन १२२० हिजरी बियास नदीचे तीरी रायपूरचे घाटावर उभयपक्षीं मसलितीनें लिहिण्यांत आला. महाराज यशवंतराव होळकर यांचे मुखत्यार शेख हबिबुल्ला व बाळाराम शेठ यांचे मोहर दस्कतानिशीं लिहून जनरल लार्ड लीकसाहेब बहादूर यांचे हवाला केला व एक कर्नेल मालकमसाहेब बहादूर यांचे मोहर दस्तखतीनिशीं लिहून होळकरांकडील मुखत्यारास दिला.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 71 24-12-1805 A.D.

Treaty of the Raipur Ghat (on the Bias river) between Maharaja Yeshwantrao Holkar and the East India Company.

---

**अ. नं. ७२** **श्री**

इसवी सन १८०५

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. तुम्ही गेल्या-तागाइत पत्रें आली नाहींत. बऱ्हाणपुरपावेतों गेल्याचें वर्तमान महेश्वरचे पत्रावरून कळलें. आजपर्यंत ठिकाणसीर पावोन सर्व अर्थ ध्यानास आले असतील, त्याप्रमाणें कळविणें. शत्रूचें प्राबल्य जाहलें. मुकाबल्याचे प्रसंग न पावतां मसलतीचे अन्वयें पगडीबंद वगैरे अनुकूल करून एकदो जागा पायबंद होऊन त्याजला ओढ पाडावी. तुमची रवानगी संस्थानीं जाहली तिकडोन समेटाचा विचार करावा. यांत लक्ष राहून आपले काबूतील हे सर्व तुमचे विद्यमानें बोलणें. याचे भाव निश्चयात्मक त्यावर होते. वृश्चिक अग्रसर जाहले. त्यांचा व्यत्यय दृष्टीस येऊं लागला. यास्तव अजमेरीकडे येणें जाहलें. त्याजकडोन पत्रें व बोलणें आजपर्यंत मसलतीचे मिळतें आले. त्यावरून दिल्लीकडे जाण्याचा सुमार धरला. सोबती मागें ओढ लावतील ही खातरजमा असोन कारभारी यांनीं दुराशा दाखवून पुन्हा समेट केला. त्याच्या हुकुमावरून इकडील महालाच्या जप्त्या केल्या. स्वारी अमृतसरपावेतों आली. शीख वगैरे अनुकूल. परंतु घरफुटीमुळें याजलाही विचार पडून जमीदारीचे काव्यानें जलचर व आम्हासी बोलणें लागले. ज्यांनी स्वराज्याचे मसलतीस हमराह असावें ते आपले जीव रक्षितात तेपक्षीं इतरांचे कारण काय ? ये समयीं हिंदू धर्मास कोणाचीही हुशारी नाहीं. आपले महाल मुलूख परस्वाधीन करून फौज हातावर वागवून मुकाबल्याचे मागे फिरावे. लाखो रुपयांचें पेंचात यावें. इतक्याचें कारण नाहीं असे समजून कळेल त्या रीतीनें इंग्रजासीं समेट करून घेतलें. ते कूच

करून दिल्लीचे सामोरे गेले. स्वारीचे कूच होऊन सत्वरच तिकडे येणें घडेल. स्वदेशांतील महालचे बंदोबस्त जाहले पाहिजेत यास्तव चिरंजीव हरनाथ याची रवानगी केली आहे. तांब्रानीं वसलीसाहेब (वेलस्ली) यांचे नांवें चकती दिली आहे. तुम्हापासीं पावेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 72 1805 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar :

Writes in a despondent tone, reviewing his own actions and the consequent losses. Everyone is trying to save his own skin. He is, therefore, forced to enter into treaty with the English.

---

**अ. नं. ७३** **श्री**

इसवी सन १८०५

महाराजा दौलतराव शिंदे यांजकडून महाराज यशवंतराव होळकर यांस विशेष. आपलेकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं त्यास हरघडी पत्र पाठवून साकल्यार्थ लिहीत असलें पाहिजे. या नंतर सबलगडचे मुक्कामीं भेटी जाहल्यापासोन मेवाडांत ये तोंपावेतों दोन्ही दौलतींत पूर्व सांप्रदायानुरूप ऐक्यभाव चालून सर्व गोष्टीचा रबाब पडून परस्परें पदरचें व रफीकांचे संतोष व शत्रूस मसलत प्राप्त जाहली. वडिलांचे चालीप्रमाणें श्रीमंतांचे राज्यांत किलाफ न वाढतां सेवा घडत आली तैसी घडावी यांत कळेल त्याप्रमाणें ताम्रांचा रहास करावा हाच विचार दृढ निश्चयाचा होऊन फौजेत खर्चाची ओढ. फौजा देशीं वगैरे असतां दोन्ही दौलतीचे मामले इंगले यांजकडे. त्याचा हिशेब वगैरे कांहीं ध्यानास आणिला नसतां त्या ऐवजीं चार रुपये मशारनिल्हेपासोन घेतले. पदरचे माणूस बिघडू नये यास्तव कामाचें ओझें त्याचेच माथा दिल्हें. जुने कार्यकर्ते जें करणे ते दौलतीचे ताळेमाळे येऊन रफतीप्रमाणें करतील हा भरंवसा असतां त्यांचेच सांगितल्याअन्वयें चार आत्मिक दूर केलें असोन द्रव्याचे वैषम्य मनांत आणून शत्रूचा अनुषंग धरून पैशाचे वगैरे लोभास आणिले त्याची नमूद महाल मुलखाची आशा दाखविली. मसलतीचे अन्वयें जाब समेटून घ्यावे हेंही प्रशस्त वाटलें. इकडील पक्काई जाली म्हणजे दोन्ही कडील अर्थ साधतात. त्यामुळें आपल्यासही अजमेरचे पुढें जाऊं नये म्हणोन पत्रें पाठवीत गेलों. त्याअन्वयें येथें कांहीं नमुदांत न येतां त्यांचे हुकुमावर कुच मुक्काम जागा सांगतील तेथें राहवे हेच दिसण्यांत येऊन वहिवाटीस लागले. यांतील क्रियेचे वगैरे अर्थ समजण्यांत तथा राहिली नाहीं. बऱ्हाणपुरचे प्रसंग येऊन वाज खाल्ला अस्तु. हल्ली राजश्री सर्जेराव यांजकडे तीन चार सूचना गेल्यामुळें मशारनिल्हे चितोडपावेतों आले, सत्वरच येऊन मिळतील. बाह्यात्कार व्यंग दिसूं न देतां वृश्चिकाचा

जाब तो लवकरच होईल. लोकांची वगैरे दिलभरी करून जयपूरवाले वगैरे सामील होतील तितकीं करून आग्रे, दिल्लीचे मैदानांत येऊन पायबंद देतों. आपण पंजाबापर्यंत गेलांत उत्तम जाहलें. राजश्री रणजीतसिंग वगैरे सर्वांच्या भेटी जाल्या असतील. कळेल त्या रीतीनें त्यांची खात्री करून शत्रूचे मुकाबल्याचा विचार घडावा. सारांश, आपले एक अनुमत जाहलें असतां हिंदुधर्माची सर्वांस शरम पडून पगडीबंद सामील होतील. अतःपर इकडील संशय किमपी न ठेवितां शीखांची पक्काई जाली आहे, तीच इकडील जाणोन जें करणे तें आपले विचाराखेरीज दुसरें घडावयाचे नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 73 1805 A.D.

Maharaja Daulatrao Scindia to Maharaja Yeshwantrao Holkar :

Writes in tone of reconciliation and union; expresses his satisfaction at the meeting of Ranjitsingh with Holkar. “Please try to bring him over to our side. I am, in all matters, with you.”

---

**अ. नं. ७४** **श्री**

ता. २८ मार्च, इसवी सन १८०६

महाराज यशवंतराव होळकरांचे चि. हरनाथ होळकरांस विशेष. तुम्हांकडोन पौषवद्य ९ व ११ व १३ व माघ वद्य २ अशी पत्रें आलीं ती पाऊन लेखनार्थ अवगत जाहला. त्यांचीं उत्तरें येणेंप्रमाणें –

१ स्वारीतून जासूद जोडी ३ संक्रमणाचें पत्र घेऊन आलेप्रमाणें पुण्यास मार्गस्थ केलें तें उत्तम केलें.

२. सेंधवे प्रकरणीं मजकूर लिहिला त्यास रघुजी होळकर व दिनकर भिवराव व सेंधवेकर कारकून यांचें बोलण्यांतील भाव सर्व समजून घेतले. स्वारी दरकूच कोटयास येत आहे. तेथें दाखल जाल्यावर एकादो दिवसांत तुमचे लिहिल्याअन्वयें कारकूनाची खातरजमा करून तुम्हाकडे रवानगी सत्वर केली जाईल.

कलम

३. साहोत्र्याकडील भुजंगराव व बारभाई व पेंढारी इकडील महालीं उपसर्ग लावितात. येविषयीं सरकारानीं त्यांजकडील वकिलासीं बोलून बंदोबस्त करावा म्हणोन विस्तारेंकरून लिहिलें. ऐसियास येथे त्याजकडून रा.रामचंद्र मोरेश्वर आले आहेत. त्यांसी समक्ष बोलणें बोलून शिंदे यांजला सरकारांतून व

त्यांजकडून लिहिणें. तें लिहिलें आहे व तुमची पत्रें गेली आहेत. बंदोबस्त होऊन आल्यास उत्तम न आल्यास चालीची वहिवाट पाहून कर्तव्य तसे करावयासी येईल. हल्ली त्यांचे नांवें पत्र अलाहिदा पाठविले आहे. कलम

४. पवाराकडील महालाचा मजकुर लिहिला यांस इकडील ठाणीं बसली असतां त्यांनी तेथें ------ हें नीट नाहीं. तत्रापि तें ओढ करितांत त्याअर्थी खलेल न होतां इकडील ठाणीं आगाऊ बसलीं असतील तेथें तुम्हीं उपद्रव न देतां परस्परें ऐक्यता पाहून वहिवाट चाले तो अर्थ करावा. यावर त्यांजकडील ओढच पडूं लागल्यास आपल्यासही कर्तव्य तसें करावयासी येईल. आपलीं ठाणीं बसलीं असतो त्यांनीं अंमल केला तो काहडून तुम्ही अंमल करून वहिवाट करणें. कलम

५. छत्रपूरचे व गुजराथ प्रांतींचे व्यापारी माल घेऊन इंदुरास येतात त्यांजला पवार व भोपालवाल्याकडून उपद्रव होतो. त्यांजला पत्रें सरकारांतून लिहिणेंत यावीं, म्हणोन लिहिलें. त्यास तुमचे लिहिण्यावरून उभयतांस पत्रें लिहिलीं आहेत. ही त्यांजकडे पाठवून व्यापारियास कोणेविसीं दिक्कत न पडे तें करणें. शिंदे भोपालपासून पलीकडे सागर मल्हारगड या जिल्ह्यांत आहेत. तेव्हां त्यांजला येविषयीं पत्र लिहावयाचे कारण नाहीं म्हणोन लिहिलें. पवाराचे महाल नजीक म्हणोन त्यांजला पत्र लिहिणें सलाह नाहीं, असे समजोन पत्र न पाठविणें. कलम

६. सरकारांत ऐवज आला त्याचे भरण्याची यादी पाठविली ती पावलीं. एक दो दिवसा कोट्यानजीक आगरवाले स्वारीत आल्यानंतर यादीप्रमाणें ऐवजाची रुजुवात करून तुम्हांस लिहिण्यात येईल. कलम

७ वाघमारे याजकडील महालासंबंधीं व पथकासंबंधीं मजकुर लिहिला त्यास महालाचा आजमास पाहून त्यांत पथकाचा व त्याजकडील खर्चाचा बंदोबस्त होय असा अजमास पाहून कराराप्रमाणें पथकानिशीं चाकरी सांगोन येत तें करावें. कलम

८. राजश्री गोपाळ पांडुरंग यांनीं बसंती कच्चेबुटीचा पोषाख व उदामंदील व कुसुंबी दुपट्टा येथें चार सणगे पाठविली ती बापूजी होळकर यांनी सरकारांत पावतीं केली.

कलम

९. ज्येष्ठ प्रकरणीं मजकुर लिहिला त्यास येविषयींची सावधानीच आहे. कोणेविशीं काळजी न करणें. कलम

१०. इंदूरकर सावकार, बोहरी यांजकडील मजकुर लिहिला त्यास येविशीं सविस्तर मागाहून लिहिण्यांत येईल तसें करणें. बोहरियांची ओढ असल्यास त्यांजविरहित सर्वांस आणून घेणें. कलम

११. राजश्री रंगो आबाजी पुण्याहून राजश्री खंडोपंतबाबाकडून आले ते हुजूर गेल्यानंतर बाबाजी पत्रें व दादो मैराळ यांजकडील दोन रवानग्यांचीं पत्रें आली ती पाठविलीं आहेत. त्यांजवरून ध्यानास येईल. उत्तर यावे म्हणोन लिहिलें. त्यास रंगो आबाजी पोहचून याचे बोलण्यांतील अर्थ समजल्यांत आले. त्यांचीं उत्तरें कोट्याचे मुक्कामीं पोहचल्यावर त्यांसी बोलण्यांत येऊन आठचौ दिवसांत लौकरच रवानगी केली जाईल. मागील दोन रवानग्यांचे पत्रांपैकीं वकिलाची पत्रें पावली. त्यांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. खंडो महादेव यांचे पत्र आलें नाहीं. तेथें राहिलें असल्यास शोध करून पाठविणें. कलम

१२. खानदेशांत कांहीं ऐवज जमला आहे तो हुंड्याकरून आणावा तरी हुंडणावळ बट्टा कसर पडती याजकरितां त्यांस तिकडे कोणास द्यावयाचें असल्यास द्याव्या म्हणोन लिहिलें. त्यास तुम्हांपासीं जमियतस्वार पलटणें असून हुंडणावळ बट्टा कसर द्यावयाचें कारण काय ? पोख्त जमियत पाठवून मार्गाचे जाबत्याने एक दोन वेळ मिळोन रोकडे ऐवज आणवून घेणें. तिकडे वरात कोणी घेत नाहीं. कलम

१३. बारेखां व गुलाबराव शिंदे यांजकडील स्वारीचा मजकूर लिहिला त्यास स्वार हुजूर जलद येऊन पोंहचत ते करणें. येथें आले म्हणजे फौजशिरस्तेप्रमाणें कबजाचा फडशा केला जाईल. वसूल व घोडे मैयत वगैरे तपशीलवार याद पाठवून देणें.

कलम

येकुण तेरा कलमें पाहून लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे छ.७ मोहरम.- बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 74 28-3-1806 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Harnath Holkar :

Miscellaneous matters covering 13 points in the letters addressed by the latter from time to time are replied to by the former. There are inter-state matters relating to Scindia, Pawar, and Nabab of Bhopal also.

अ. नं. ७५ **श्री**

ता. ९ एप्रिल, इसवी सन १८०६

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळकृष्ण वासुदेव कमाविसदार पाटण वगैरे प्रगणे मजकुरचा ऐवज तुम्हाकडून सरकारांत येणें तो राजश्री बाळाराम आगरवाले यांनीं समजून घेतला रु.

१८०००-८-० अठरा हजार तुम्हाकडून आले. सदरहू रुपये तपशीलवार चि. रा. हरनाथ होळकर यांचे स्वारीकडे जमा असें. तपशील.

१५७८७-८-० बाळाराम यांजकडे दिले रु.१३००० प्राो पाटण येथील वसूल इंग्रजाकडे जाऊन बाकी राहिली. रु.२७८७-८-० तुम्हापासोन नजर दाखल घेणें ठरलें. येकुण सदरीं.

२२२-८-० संस्थान इंद्रगड पैकीं राजपुरा, निमसराय, खातोली ऐवजी ठरविले याची चिठ्ठी इंग्रजाची आणून द्यावी.

-----------

१८०००-०-० (बेरजेंत फरक आहे. - संपादक)

जाणिजे छ.१२ मोहरम बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद. बार.

**कोटा दप्तर**

No. 75 9.4.1806 A.D.

Receipt of Rs. 18,000/- (with details) passed to the Kamavisdar Patan by Maharaja Yeshwantrao Holkar.

---

अ. नं. ७६ **श्री**

शिक्का गव्हर्नमेंट ता. २४ डिसेंबर, इसवी सन १८०६

इंग्रज कंपनी व यशवंतराव होळकर यांचा सलुख जाहला. गुजारत कर्नल मालकम व शेख हबीबुल्ला व बाळाराम शेठ निसबत यशवंतराव होळकर कलमवार येणेंप्रमाणें.

१. उभयपक्षीं करार केला कीं, इंग्रज कंपनी व त्यांचे बावस्ते वगैरे यांजवर बद सलुखेंत चालू नये व त्याचप्रमाणे इंग्रजाहीं चालावें. कलम

२. प्राचीन ठिकाणें होळकर यांचे कुटुंबाची आहेत येणेंप्रमाणें : मेवाड व माळवा व हाडोती व कित्येक राज्यांसुद्धां चमेली नदीचे उत्तरभागीं तीं ठिकाणें इंग्रज

कंपनी कबूल करितांत कीं, तेच क्षणीं यशवंतराव होळकर यांचें हवालीं करावी. याशिवाय दक्षिणेमध्यें होळकर यांची ठिकाणे तापीचे उत्तर भागी आहेत तीं पण द्यावींत व चांदवडचा किल्ला व परगणा अंबाड शेवगांव व गांवे परगणे गोदावरीचे उत्तर भागी आहेत ते होळकर सल्लेच्या कराराप्रमाणें चालल्यानें तारीख मजकूर पासून आठरावे महिन्यांनीं होळकर यांचे कबिल्याचे हवालीं करावींत कां जर सदरहू ठिकाणें गोदावरीचे उत्तर भागी होळकर यांचे कुटुंबियांची प्राचीन होती, सबब. कलम

३. बंदेलखंडामध्ये कोंचचे प्रगणे इंग्रज कंपनी यांस यशवंतराव होळकर याहीं दिले. तो मुलूख कंपनी याहीं आपले ताबेंत ठेऊन त्याचा उपर भीमाबाई, यशवंतराव होळकर यांची कन्येस आपले सल्लेच्या कराराप्रमाणें चालल्यास सदरहू उपर चालू करावे. जसे बाळाबाईचे चालविले त्याप्रमाणें. कलम

४. यशवंतराव होळकर यांनीं कबुलात केली कीं, टोपीकर हरएक जातीचा इंग्रज आपले नौकरीस इंग्रजांचे अनुमतीशिवाय ठेऊं नये. कलम

५. सर्जेराव घाटगे यांस यशवंतराव होळकर यांनीं आपले मसलतीस अथवा चाकरीस ठेऊं नये. कारण तो इंग्रजाचा उघडा दुश्मन आहे, सबब. कलम

६. वरील कराराप्रमाणें यशवंतराव होळकर यांसीं परवानगी आहे कीं, हिंदुस्थानमध्यें यावें त्यांस इंग्रजानीं मुजाहिम होऊं नये व त्या मार्गांत आले असतां इंग्रजांनीं यशवंतराव होळकर यांचे मसलतीस अथवा हरएक बाबे सामील न व्हावें ऐसे असोन करार केला कीं, यशवंतराव होळकर कलमबंदीचे कागदावर सही केल्या नंतर तात्काल हिंदुस्थानांत राहदारीमध्ये शहर पटियाला, पाटण, झिंद व इंग्रजांचा मुलूख व राजा जयपूर हीं ठिकाणें डावे हातावर सोडून जावे. त्यास यशवंतराव होळकर कबूल करितांत कीं, मार्गी चालतां आपले फौजेला मना केलें ज्या मार्गे जाणें होईल तेथें लुटपाट लढाई वगैरे तुफान करणार नाहीं. कलम

७. टोंक व रामपुरा व बुंदी व लाखेरी व सुमोदी व भिकनगांव वडाई वगैरे ठिकाणें बुंदीचे डोगरांचे उत्तर दिशेस इंग्रज कंपनी याजवळ कबजे होतीं तीं ठिकाणें दरोबस्त यशवंतराव होळकरांस दिलीं. कलम

**सरकारी रेकॉर्ड**

No. 76 24-12-1806 A.D.

Treaty between Maharaja Yeshwantrao Holkar and the East India Company.

---

अ. नं. ७७ **श्री**

इसवी सन १८०६

पुणें वकिलाकडून महाराज यशवंतराव होळकरांस विशेष. मीरखान कोटा येथें प्राणपूजा करून आहेत. पेंढारी लोकासंबंधात शिंद्यांसीं वाटाघाटी करीत आहेत. दौलतराव शिंदे यांस तांब्रानीं ९ नऊ लाखाचा मुलूख जास्त दिला आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 77 1806 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar is addressed by his Pune ambassador : Mirkhan is holding meetings with Scindia, and talking over Pendhari affairs. Scindia gets territory of additional nine lacs from the East India Company.

---

अ. नं. ७८ **श्री**

ता १८ एप्रिल, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळाराम अगरवाल यांस विशेष. तुम्ही अमृतसरचे मुक्कामीं स्वारीत असतां विदीत केलें कीं, आम्हांस सरकारांनीं कंपनी इंग्रज बहादूर यांचा सरकारशीं सलूख होण्यास्तव जनरल लेकसाहेब यांजकडे पाठविलें. तेथें जाऊन सरकार आज्ञेअन्वयें जाबसाल होऊन तहनामे झाले. सरकारांनीं कृपावंत होऊन आमचे घराण्याची योजना करून देविली पाहिजे. म्हणोन त्याजवरून मनास आणितां तुम्ही सरकारपदरचे चाकरीस उपयोगी जाणोन इनामी गांव तीन घरखर्चाचे बेगमीस प्रांत खानदेश पैकीं.

(१) मौजे चंदनपुरी प्रगणे निंबाइत.
(२) मौजे काष्टी प्रगणे गाळणा.
(३) मौजे वडेल प्रगणे गाळणा.

येकुण देह तीन सन १२१६ फसलीचे सालापासून जकात उभामार्ग व इनामदार खेरीजकरून तुम्हाकडे करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही साल मजकुरपासोन तीन्ही गांवची वहिवाट वंशपरंपरेंकरून उपभोगीत जाणें. जाणिजे छ. ९ सफर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 78 18-4-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar grants a Sanad of three villages in the Khandesh District to Balaram Agarwale for his services in the late treaty concluded with the East India Company.

---

अ. नं. ७९ **श्री म्हाळसाकांत**

ता. ८ जून, इसवी सन १८०७

| शिक्का यशवंतराव महाराज होळकर |
|---|

अज सरकार राजश्री यशवंतराव होळकर ता. मोकदम मौजे हनुमंतपुरा प्रगणे कोंच सु।। समान मयातेन व आलफ मौजे मजकुर हा गांव वेदशास्त्रसंपन्न राजश्री भवदेव मिश्र यांजकडे सरकारांतून धर्मार्थ इनाम चालत आहे. मौजे मजकुरीं श्री हनुमंत स्थळ जागृत पाहून मिश्रजींनीं देवालयाचा जीर्णोद्धार करून गांवनाव ताहरपुरा होते, ते मोडून सर्वानुमतें हनुमंतपुरा नाम ठेऊन प्रसिद्धीस आणलें आहे. या नांवें सनदपत्र करून दिलें पाहिजे म्हणोन भटजीकडून स्वारींत विदीत झालें त्यावरून मनात आणितां मिश्रजी ब्राह्मण थोर यांनी ठेविलेले नांव हनुमंतपुरा हेच प्रसिद्धीस आणावयाचे ठरून वर्तमान भावी कमाविसदार प्रगणे मजकूर यांचे नांवें अलहिदा सनद करून हा रोखा तुम्हास सादर केला असे. तरी कागदोपत्रीं हणुमंतपुरा हे नांव विख्यात करून भटजीकडे धर्मार्थ इनाम सुदामत भोगवटा चालत आला आहे त्याप्रमाणें चालविणें. प्रतिवर्षी पत्राचा आक्षेप न करणें. जाणिजे छ १ रविलाखर. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 79 8-6-1807 A.D.

The Mokadam Mauza Taharpura (Pargana Konch) is ordered by Maharaja Yeshwantrao Holkar to note that the name of the said Mauza is changed, and that it in named “ Hanmantpura “ at the request of Mr. Bhavadeva Misra who holds the Mauza Inam in Charity.

---

**अ. नं. ८०** **श्री**

ता. १७ जून, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळोजी कुंजर यांस विशेष. तुम्हाकडून राजश्री त्रिंबकराव यशवंत आले होते, त्यासी सर्व अर्थ बोलून मशारनिल्हेंची रवानगी तुम्हाकडे झाली आहे. भेट झाली असतां आद्योपांत त्यांनीं सांगितलेंच असेल. प्रस्तुत राजश्री उमाजी पाटील आले, त्यांनींही तेथील भावगर्भ सांगितले. त्याचीं उत्तरे व कित्येक पैरवीच्या गोष्टी बोलणेंत आल्या. हेही तुम्हापाशीं आल्यावर सर्व अर्थ सांगतील. सारांश मिळोन, पूर्वकर्मानुरूप थराचा चिरा थरी बसावा यांत सर्व गोडपणा आहे. रवाना चंद्र १० रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 80 17-6-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Balojee Kunjar. The sum and substance of all my letters and messages is that every one should be replaced in his former proper position.

---

**अ. नं. ८१** **श्री**

ता. १९ आगस्ट, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होलकर यांजकडून रघुनाथ हरी दिमत पागा चिमणाजी कृष्ण यांस विशेष. सरकारांत नव्या तोफा ढालावयाच्या. याजकरितां सांचे करावयास मेण वजन पांच खंड्या देवळे, प्रतापगड वगैरे जागा खरेदी करून जल्द पाठवून देण्याविषयीं राजश्री लखमीधर मुरलीधर याचे नांवें अलाहिदा पत्र लेहून हे पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी तुम्ही मशारनिल्हेचें पत्र त्याजला देऊन सदरहू पांच खंड्या मेण निकट करून घेऊन भानपूरचे मुक्कामीं पोहचवून देणें. या कामास दिवसगत लागल्यास मर्जी राहणार नाहीं. असें समजोन मेण जसजसें मिळत जाईल तसें वरचेवर पाठवून देणें. म्हणजे काम चालू होईल. यावर तुम्हांकडून ढील जाहल्यास ठीक नसे. हें खचित जाणोन कर्तव्य तें करणें. जाणिजे छ. १४ जमादिलाखर बहुत काय लिहिणें मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 81 19-8-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Raghunath Hari (serving under Chimnajee Krishna) to despatch wax weighing 5 Khandis required

for ammunition-work, from Devale Pratapgad and the neighbouring territory.

---

**अ. नं. ८२** **श्री**

ता. २५ आगस्ट, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून अंबोजी इंगळे यांस विशेष. साल गुदस्तां मेवाडात स्वारी होती ते समयीं तेथील खंडणी ऐवजी राजश्री लखमीधर मुरलीधर सावकार यांजकडे हवाले देवविले. त्यापैकीं कांहीं ऐवज मशारनिल्हेचा वसूल झाला व राहील तो त्यांचे पदरीं पडला पाहिजे. यास्तव हे पत्र तुम्हास लेखन केलें असे. तरी तुम्ही आपल्याकडील कारकुनास ताकीद करून सावकार यांचा ऐवज झाडबाकीनिसीं पदरीं पडें तें करून हरएकविशीं उपर राहे ते करणें. येविशीं तुमच्या भरंवशावर असो. छ. २० जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 82 25-8-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Ambojee Ingle to complete the monetary transactions of Mewad entered into with Lakhamidhar Murlidhar last year.

---

**अ. नं. ८३** **श्री**

ता. २ नोव्हेंबर, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून व्यंकटराव कृष्ण यांस विशेष. तुम्ही मुजरद आजुरदारा समागमें छ.२६ चीं पत्रें पाठविलीं तीं छ.२५ साबानीं पावोन लेखनार्थ अवगत जाहला. त्यांचीं उत्तरें.

१. कोट्यानजीक मुक्काम असतां पत्राच्या रवानग्या झाल्या व भानपुरेचे मुक्कामाहून दोन तीन पत्रें रवाना झाली ती पावलींच असतील व प्रस्तुतही तुमचे लिहिण्यावरून सेनासाहेब सुभा यांसीं व श्रीधरपंत यांजला पत्रें अलाहिदा पाठविलीं आहेत. ज्याचीं त्यास देऊन उत्तर पाठविणें.

२. स्वारी इंदुराकडे आली. पुढें कदाचित सेंधव्यापावेतों जाण्याचा बेत घडेल ऐसें ऐकण्यांत आल्याचें लिहिलें. त्यास भानपुरियास आल्यानंतर अडीच मासपावेतों

मुक्काम गांवांत होता, फौज वगैरे कारखाना बाहेर होता, विजयादशमीचे मुहूर्त अदकोसाचें कूच होऊन, मासपक्ष मुक्काम येथेंचा आहे. तूर्त इंदुरास व सेंधव्यास जाण्याचे कारण नाहीं. सेंधव्याचा बंदोबस्त येथूनच होणें तो होईल.

३. इंग्रजाकडील वकिलांनीं फरांशिसाकडील लढाईचे वर्तमान सांगितल्याचा मजकुर लिहिला तो समजला.

४. पुण्याकडील वर्तमान ऐकिल्यावर पुरवणींत लिहिलें, ते समजलें. त्यास स्वकीय परकीवाले बाजे लोभ करूं लागल्यास त्यांचे धनीपणास विदितच आहे. पुरी हिताची समजूत ज्याचे त्याजपरी ही नीटच आहे.

५. सेनासाहेब सुभा यांची दौलत वाड्यांत असतां, कोणीही कोठील आला त्याचें संगोपन ज्याचे त्याजपरी करून कोणासही विन्मुख जाऊं देत नाहींत म्हणोन लिहिलें, त्यास दौलतीच्या चाली पूर्वापार अशाच आहेत. हिम्मत मात्र असावी. तो अवलंब त्यांनीं धरला आहे. तेव्हां उत्तम तेंच घडेल.

६. राजश्री दौलतराव शिंदे यांजकडील स्नेहलोभाचे चालीचा मजकुर लिहिला तो समजला, त्यास त्याचा प्रत्यय पुढें अनुभवांत येईल तो खरा. परस्परें स्नेह घरोबा अत्यंत ठेवतात, हें युक्तच आहे. इकडील विचार उभयतांशिवाय नाहीं. सारासार वरचेवर समजण्यांत आल्यानें मसलतीचें धोरण राहतें, तर दूरंदेश समजोनच कर्तव्य तेंच करतील.

७. सेनाधुरंधर यांनीं वाकडे शिवरामसुत याजला लग्गी लावून त्यांचे संतोषास बहुत जपतात, यांस वाकडे दौलतीचे उपयोगी असें जाणोन सेनाधुरंधर त्यांचे मनोगत राखितात, हेही चाल मार्गाचीच आहे. काल माहात्म्यानुरूप बुद्धी होऊन येते. तेही कुलीन, तेव्हां उचितास चुकणार नाहींत. घडेल तसे वरचेवर लिहून कळवीत जावे.

८. फौजेंत फितूर झाल्याचे वर्तमान ऐकून बहुत काळजी करून लिहिलें, त्यास पलटणवाल्यानीं खायाखर्चाकरितां दंगा केला होता, त्याचा फडशा करून दिला. प्रस्तुत बंदोबस्तच आहे.

९. देशचे महालीं सरकारची ठाणीं बसून लावणीचाही बंदोबस्त जाहला. सेवकाची नेमणुक चिरंजीवासहित पहिल्यापासोन प्रगणे अंबाड येथें आहे. तें पुनः प्राप्त व्हावी. तरी तुम्हापासीं नेमणुकीचे सनदेची नक्कल असेल त्याची प्रत पाठवून देणें, अथवा तुमचें येणें लवकरच झाल्यास समागमें घेऊन येणें, म्हणजे पाहणेंत येऊन पुढील बंदोबस्त करणें तसा करून देण्यांत येईल.

१०. सेनासाहेब सुभा यांनीं उभयतांचे चालीचा स्तव वारंवार केल्याचा मजकुर लिहिला, त्यास तिन्हीं दौलतींत वडिल माणूस, तेव्हां त्यांजवेगळें प्रसंगीं संतोष मानून द्यावयास त्यांजविरहित कोण आहे ? येथेंही माणसास कमी नाहीं. वडिलांचे

वेळेची बहुत आहेत. परंतु कालमाहात्म्यनुरूप वर्तून चावा घेतात, ते अर्थी वर्ष-दोन वर्षपावेतों जोवरी त्यांच्या मनाच्या प्रवर्ती होतात, तोंवरी त्यांचे मनोगत राखणें प्राप्त. आगमनाचींही संधाने येतात, आल्यास अव्हेर न होतां संगोपनही चालीनें होणें तसें होईल. दहा वर्षांमागें सर्व लहान मोठे होते. त्याणीं दौलत संरक्षण करण्यांत ठेविली नव्हती, परंतु श्रीलक्ष्मीकांताचे कृपेनें जें झाले तेंही प्रख्यातच आहे. तेव्हां विस्तारें काय लिहावें ? सोबत यांजपाशीं माणसांची जथ चांगली आणि तेही त्यांचे अनुसंगानें चालून दौलत करितांत हेंही युक्तच आहे. दुतर्फांही बोज राखण्यास जागा मिळोन सेनासाहेब सुभा हेच आहेत.

११. कोट्यानजीक असतां व भानपुरियास मुक्काम आल्यावर एकदोन वेळां पत्राच्या रवानग्या तिकडील जासूद जोड्या व इकडील एकदोन जोड्या समागमें करून सारांश लेखनांत आला. परंतु तुमची पत्रें एका महिन्यानीं आलीं त्यांत बहुत दिवस पत्र न आल्याचें लिहिलें. त्यास इकडील जोडी कदाचित मध्यंतरी राहिली किंवा काय झालें असेल ते असो. परंतु तेथील जोड्या तरी पोहचल्याच असतील. पत्रोत्तर नाहीं, तेव्हां संदेह प्राप्त होतो.

१२. भानपुरियास आल्यावर नवीन तोफा जिनसीच्या पंचवीस व पलटणीच्या शंभर येकुण सव्वाशें तोफा ढाळावयाचे ठरून धातू वगैरेचा सरंजामाचा मेळ पाहून कारखाना चालून पंचवीस, तीस तोफा तयार झाल्या. बाकीच्याही तयार होतील. पेशजीचे दोन कंपू होते, त्यातून निवडक माणसें छाटून सहा पलटणें पुरीं भरलीं व आणिक जागीहून निवडक माणसांची भरती आणोन सहा पलटणी तेही भरल्या. येकुण बारा पलटणीं व सामान दारुगोळ्यासह तयार आहेत; व आणखीही पांचसहा पलटणींची भरती आणावयास आफिसर लोक जागोजाग गेले आहेत. फौज मराठी दरोबस्त व कांहीं पठाण आहेत. देशींहूनही चारपांच हजार फौज येणार आहे. मसलतसीर फायदा पडल्यास कर्तव्य तें करावे. उभयतांचे सल्लेखेरीज दुसरा विचार नाहीं. येकुण कलमें ११ पाहिल्यावर कळोन येईल. छ १ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 83 2-11-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Vyankatrao Krishna. A reply of 11 articles on miscellaneous matters addressed by the latter to the former.

The 12th article mentions Holkar's war-preparation; guns and enlistment of the army.

अ. नं. ८४ **श्री**

ता. ६ डिसेंबर, इसवी सन १८०७

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून रावत सामंतसिंगजी संस्थान देवळे प्रतापगड यांस. विशेष सरकारांत फरासखान्याकडे डेरियास खांब पाहिजेत यास्तव चिमण फरास यांस रवाना करून हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी तुम्ही फरास सांगेल त्याबेताचे सरकार उपयोगी खांब आजमासे १०० शंभर सुके लाकडाचे मेळवून त्यांस भारबदारीस छकडे लागतील ते देऊन स्वारीत पावते करून देणें. खांब फरासाचे परिक्षेस येतील ते पाठविणें. या कामाची सुस्ती एक दिवसाचीही न करणें. रवाना छ ६ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 84 6-12-1807 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orderes Rawat Samatsingjee of Deole Pratapgad to send him one hundred pillars for tents such as may be selected by Chiman Faras in the Sarkar's service.

---

अ. नं. ८५ **श्री**

ता. २६ एप्रिल, इसवी सन १८०८

महाराजा यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. संस्थान महेश्वरीं ती. कैलासवासी मातुश्री बाईसाहेबांचे छत्री नजीक आसपास सोयवार जागा पाहोन तेथें कैलासवासी बाळासाहेब व सौ. लक्ष्मीबाई व चि. खंडेराव त्रिवर्ग मिळोन एक छत्री जाहली पाहिजे. यास्तव हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी तुम्ही लेखनाअन्वयें मातुश्रीसाहेबांचे छत्रीनजीक जागा मनास आणून तेथें त्रिवर्गाची छत्री मुहूर्तेकरून कारखान्यांस प्रारंभ करणें आणि आजमासें पंचवीस हजार २५००० पावेतों चौत्रा छत्री मिळोन एकंदर काम बनून ये तें करणे. पुन्हा येविशीं लिहिण्याचा अक्षेप न करितां कारखाना चालू करणें. जाणिजे छ २९ सफर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 85 26-4-1808 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Bharmal Holkar to erect a Chhatri for the late Maharaja Balasaheb, Saubhagyawati Laxmibai and Khanderao together, costing about Rs. 25,000/-in all.

---

**अ. नं. ८६** **श्री**

इसवी सन १८०८

पुणें वकिलाकडून महाराज यशवंतराव होळकरांस विशेष. खासे प्रातःकाळीं बाहेर येतात ते हजेरीस अस्तमानपर्यंत बसून वाड्यांत जाऊन क्षणांत माघारें येऊन पलटणाच्या चिठ्ठ्या दोन प्रहररात्रपर्यंत देत बसतात. याप्रमाणें मेहनत दररोज होत आहे. यामुळें दुसरें काम सुचत नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 86 1808 A.D.

The Pune ambassador informs Mahraja Yeshwantrao Holkar that Peshwa Bajirao is very busy from morn to dust, enlisting men for the army.

---

**अ. नं. ८७** **श्री**

ता. ४ आक्टोबर, इसवी सन १८०८

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>तुकोजी सुत यशवंतराव होळकर |

मश्रुल अनाम मंडलोई व कानुगो प्रगणे महेश्वर यांसी यशवंतराव होळकर सु।। तिसा मयातेन व आलफ. श्री नर्मदेस महापूर येऊन शहर वाहून गेलें, गांवखेड्यांची वगैरे फार नुकसानी झाली म्हणोन राजश्री चिमणाजी कृष्ण स्वारींत आले. त्यांनीं सर्व विदित केलें व परभारेंही वर्तमान कळले. त्यास गांवगन्नाची रैयत व शहरचे लोक फार उदास म्हणोन कळले. त्यास ईश्वरीं क्षोभास उपाय नाहीं. हल्लीं तुमची सर्वांची खातर दिलभरी व्हावी. गांवखेड्यांचीं आबादी होऊन शहरची वस्ती चांगली पूर्ववत व्हावी यास्तव सरकारांतून राजश्री रामराव त्रिंबक रवाना करून हें पत्र तुम्हास सादर केलें असें. तरी पत्र पावलियावर तुम्ही गांवगन्ना रयतची व शहरांत शेठ सावकार वाणी उदमी व मारु वगैरे आडाणी लोक, सर्वांची दिलभरी करून प्रगणे मजकुरची आबादी होऊन शहर घरें दुकानें मागती पूर्ववत्प्रमाणें करणें. जाणिजे छ.१३ साबान मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 87 4-10-1808 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders the Mandloi and Kango of

Pargana Maheshwar to re-settle the villages and the town of Maheshwar harmed and harrassed by the recent floods of river Narbada.

---

अ. नं. ८८ **श्री**

ता. ५ डिसेंबर, इसवी सन १८०८

महाराजा यशवंतराव होळकर यांजकडून सिदो बापूजी बेलसरे श्री क्षेत्र जेजुरी यांस : विशेष : सरकारांतून पेशजी तुम्हाकडे क्षेत्र श्री जेजुरी येथील श्री मार्तंडाची पूजाआर्च्या बमय कडेपठार व श्री मल्हार गोतमैश्वर महादेव कैलासवासी ती. सुभेदारसाहेब यांचे छत्रीतील पूजा, मूर्तीसमवेत व सरकारी तलाव बाग कुरणें वगैरे आहेत यांचे कामकाज चालत आलें, त्याप्रमाणें साल मजकुरपासून तुमचे तुम्हांकडेसच बहाल ठेऊन प्रगणे सुपे बारामती येथील सरगांवकडीचे वतनाची गुमास्तेगिरी गुदस्तां राजश्री यमाजी ठोणे यांजकडे सांगितली होती ते दूर करून सनमजकुरीं तुम्हांकडे चालवून त्याचे उत्पन्नाचा ऐवज क्षेत्र मजकुरचे कारखान्याकडे खर्चास लावून द्यावयाचें ठरून हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी तुम्ही क्षेत्र मजकुरीं श्रीची पूजाअर्चा व तलाव, वाडा, कुरणें सरकारी कारखाना वगैरे काम पहिलेपासून ज्याअन्वयें करीत आला त्याप्रमाणें साल मजकुरापासोन तुमचे तुम्हींच इमानें इतबारें करीत जाऊन हल्लीं पाो सुपे येथील सरगांवडकीची गुमास्तेगिरी सांगितली आहे. तेथील वहिवाट सत्क्रियेनें करून उत्पन्नाचा ऐवज होईल त्यांत गुमास्त्याचे वेतन खेरीजकरून बाकी नेमणूकी बरहुकूम खर्च करीत जाऊन शिवाय ऐवज राहील तो क्षेत्राचे खर्चास घेत जाणें आणि सुदामत पूजाआर्च्या, नंदादीप श्रीपासील मानपान चालत आल्याअन्वयें करीत जाऊन अखेरसालीं कच्चाहिशेब सरकारांत समजावीत जाणें. बागाची लावणी उत्तमप्रकारें घडून बेल, फुले श्रीचे उपयोगात लावीत जाऊन तलाव कुरणाची निगेबानी उत्तमप्रकारें ठेवीत जाणें. श्रींचें जवाहीर, कापड, भांडे, वगैरे सरकारी आसबाब तुम्हाजवळ असेल त्याची मोजदाद राजश्री खंडोमहादेव याचे विद्यमानें करून तपशीलवार यादी करून हुजूर पाठविणें. तुम्ही आपले वेतनाबाबत तीनशें रुपये हरसाल घेत जाऊन बाकीचा खर्च श्रीजीकडे करीत जाणे. शिवाय एक पैसा घेतला असता मजरा पडणार नाहीं. आलंकारवस्त्रें तिथीपर्वणीस व सणवारास देवास घालीत जाऊन मागती आटोपून ठेवतेसमयीं जाबत्यानें सांभाळून ठेवीत जाणें. कांहीं अफरातफर झाल्यास मर्जी राहणार नाहीं. समजून वर्तणूक करणें. जाणिजे छ १६ शवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 88 5-12-1808 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Siddo Bapujee Belsare of Jejuree :

Sanad granting the Sargawadki of Parganas Supa and Baramati for the worship of Shree Martand and other gods of Jejuree. Details of management of the Sansthan are metioned.

---

**अ. नं. ८९** **श्री**

ता. १६ सप्टेंबर, इसवी सन १८०९

माधवराव यशवंत यांजकडून भारमल होळकरांस विशेष. मुक्काम लष्कर नजीक मंगलरूप. पुण्याहून पत्रें आपलेकडे येऊन येथें आली ते श्रवण करून, इकडील वर्तमान प्रस्तुत राजश्री आबाजी खंडेराव यांची रवानगी सोबत्याकडे दोन्ही दौलतीचे ऐक्य. नागपुरचा स्नेह, राजधानीचे लक्ष येऊन इंग्रजांचे दोस्तीस जपण्याचे भाव बोलण्यांत आणून शुद्ध २ स रवाना केली आहे सत्वरच पावतील. वकिलीचें काम रा.रावजी गोविंदाकडे आहे. आबाजी तेथें पाऊन उत्तरें आल्यावर सविस्तर कळवीन. सरकार प्रकृतीस श्री एकलिंगजीस गोसावी आहेत. त्यांचे आज्ञेवरून उपचार होतात. दर्शनास ही स्वारी जाईल ऐसें वाटते. नबाबसाहेब कारभारी एक विचारें सरकार मर्जीने काम चालवून आहे. परंतु नबाबाचे पठाणाच्या चिठ्ठया शेठजीवर, याजमुळें शेठजीस संकट बहुत म्हणून नबाबाचे लष्करांतही गेले होते. तूर्त नबाब सरकारचें विचारें पठाणाचे उपद्रवामुळें शेठजीस लष्करानजीक पलटणांत येऊन तिकडून इकडून कारभारी येऊन जाऊन शेठजीचें सल्हेनीं कारभाराचा ओघ. मुखत्यारी शेठजीकडे परन्तु पठाणाच्या चिठ्ठ्यांमुळें कांहीं सुचत नाहीं. जयपुराकडे नबाब व शेठजीनें जावें हाही बेत. जें घडेल तें मागाहून कळेल व सविस्तरें रा. आबाजीपंत दादा लिहितील. शास्त्रीबाबा गेले तरी असतील. राजश्री बाबाही पुण्यास दाखल झाले असतील. शिंद्यांचा मुक्काम तूर्त नरवर वर मोर्चे देऊन जागा तमाम नरवरचे आसपास अंमल करून किल्ल्यासीं मोर्चे आहेत. खंडोजी इंगळे झासीस आहे. त्यांचें म्हणणें माझे पोटाची बेगमी एखादी जागा करून द्यावी म्हणजे या जागेविषयीं माझा आग्रह कांहीं नाहीं, ऐसें आहे. सेवेसीं बहुत काय लिहिणें. पुण्याची पत्रें श्रवणात आली. श्रीमंत पंढरपुरीहून पुण्यास जाऊन श्रावणमासचे दक्षिणेचा समारंभ ब्राह्मणांचा यथास्थित चालू जाहला. कर्नल कलू (क्लोज) साहेब गेल्यावर मिस्टर रसूल स।। आले तेही हैद्राबादेस जाणार व तेथें दिल्लीहून अलफिस्टन येणार असा लेख आपणाकडे अलीकडे कांहीं आला असल्यास कळवावें. कृपालोभ असावा हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 89 16-9-1809 A.D.

Madhaorao Yeshwant to Bharmal Holkar :

Measures are being taken to bring about reconciliation among Holkar, Scindia and Bhonsale.

Pathan and Agarwale are carrying on, administration; the latter. however, is being daily vexed by the number of bills of payment showered on him. Scindia and Ingle are also mentioned in the letter with their side-activities.

---

**अ. नं. ९०** **श्री**

ता. १२ आक्टोबर, इसवी सन १८०९

बातमीदाराचें, पत्र दिवाण पळसीकरांस विशेष. भाद्रपद शुद्ध ५ मुक्काम महू प्रगणे इंदूर मी यात्राकरून येथें आलियावर श्रीमंत यजमानसाहेब यांचे दर्शन होऊन आज्ञा जाली वगैरे जो मजकुर जाहला तो दोनतीन पत्री वडिलांस सविस्तरें लेखन केला. त्याचे प्रत्योत्तराची मार्गप्रतीक्षा करितों, तीन महिने होत आले. उत्तर आलें नाहीं ऐसे हयगयखालीं न टाकितां सविस्तर लेखन करावे.

सांप्रत श्रीमंत राजश्री गणपतराव दिवाण यांजसमागमें फौजपलटणें देऊन मेवाड प्रांतीं वगैरे मोहिमेस रवाना करावें ऐसे ठरोन रावसाहेबांस वस्त्रें होऊन हत्ती, घोडा तैनात करून कूच करविलें. इंदूरपर्यंत ते गेले. पलटणें सात व पागा व शिलेदार यांची रवानगी व्हावयाची. त्यांचे मागील देण्याचा जाबसाल पडला आहे. कारभारी बोलतात एखादी तोड निघून ठरल्याप्रमाणें सर्वांचें जाणें लौकरच होईल. श्रीमंत यजमानसाहेब व सौभाग्यवती मातुश्री बयासाहेब यांचा मुक्काम जांब वगैरे जागा आहे. त्यातून रहावयाजोगें स्थळ पाहून तेथें रहावयाचें होईल. हुजूर पांच पलटणें व पागा व शिलेदार राहतात. त्यांचा बंदोबस्त करावयाकरितां धर्माजी कुंवरदादा यांनीं रहावें. येथें रावसाहेब यांजबरोबर राजश्री बाळारामभाई अगरवाले व भास्करभाऊ व कुशाबा बापू बक्षी आदीकरून कारभारी मंडळीनीं जावें. एक एक कारकून आपलाले ओहद्यावर धन्याजवळ ठेवावा, याप्रमाणें बेत ठरला आहे. मजला रावसाहेबाबरोबर चलावें म्हणतात. चाकरी, तेव्हां आज्ञा होईल त्यास उजुर नाहीं. येथे कोणास ठेवावें, बरोबर कोणास न्यावें, उंट, तट्टू, राहुटी कांहीं एक नाहीं. यात्रेची चारपांच घोडीं आहेत, तीं तट्टें आहेत. माणसें पाहिजेत. प्राप्तीचा अंश काळानुरूप थोडेंफार साहित्य दोही जागा पाहिजे. आपल्यास पत्रें पाठविली त्याचे उत्तर येईना तेव्हां लाचार. आपण उपेक्षा करावी ऐसें न व्हावें. मर्जीस काय आले असेल तें लिहिलेंवर समजेल. येथील मजकुर असा आहे. ध्यानास आणोन तजवीज ठेवावी. हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 90 12-10-1809 A.D.

Correspondent to Diwan Palshikar :

(i) Ganpatrao Diwan is ordered to march to Mewar.

(ii) Maharaja is encamped at Jamb.

(iii) Officers are being stationed at various quarters.

---

**अ. नं. ९१** **श्री**

आक्टोबर, इसवी सन १८०९

बातमीदार, नारोबा व येसोबा यांजकडून दिवाण पळसीकरांस विशेष. मुक्काम लष्कर नजीक भानपुरा; इकडील मजकुर होत गेला तसा सेवेसीं लिहीत गेलो त्याजवरून ध्यानास आलेच असेल. संस्थान जयपूर येथील सरकार मामला समजून घ्यावयाचा याजकरितां नबाब आमिरुलद्दौले फौजेसहित त्या प्रांतीं कमकसर वर्ष जाहले शह देऊन आहेत. दरम्यान मध्यवर्ती राठोड वगैरे यांचे विद्यमानें बोलण्याचा क्रम घालोन ठरावांतही आणलें परंतु निदर्शनास कांहींएक नाहीं. याजमुळें आमिरुलदौले याचे जरबेंत आहेत. होईल तें खरें. येथील वास्तविक राजश्री आबाजी खंडेराव सोबती यांचे लष्करांत इकडून आहेत. तेथून राजश्री मोरो हरी यांनीं येथे यावें असा क्रम कागदोपत्रीं चालला आहे. निदर्शनास येईल तें खरें. कारभारी यांचे काया, वाचा, मनें करून ज्यांत दौलतीचा ओघ सनातन चालत आला त्यांत कमी पडल्यास लौकिकांत चांगलें नाहीं हें मनांत दृढतर वागून यातायात करीत आहे. श्री मार्तंडाचे कृपें चांगलें तेंच घडेल. राजश्री दाजी बऱ्हाणपुरीहून कांहीं कामाचे उद्देशे आले आहेत. ते काम करून जातील. त्यांनींही अलाहिदा पत्र लिहिलें आहे त्यावरून सर्व ध्यानास येईल. सेवेसीं श्रुत होय.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 91 October, 1809 A.D.

Diwan Palshikar is informed by correspondents encamped near Bhanpura :

The Nabab has encamped for nearly one complete year near Jeypore. Nothing very tangible has yet come about.

---

अ. नं. ९२ **श्री**

ता. ४ डिसेंबर, इसवी सन १८०९

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून कमाविसदार चांदवड यांस विशेष. चिरंजीव सौभाग्यवती भीमाबाई बुळे यांजला खासगत खर्चाचे बेगमीस प्रगणे मजकुर येथील, १ मोजे देवगांव, १ मौ. राई, ३ मौ. महलखेडी : येणें प्राो तीन गांव साल मजकुरपासोन खेरीज परअंमल व हकदार, इनामदार, जकात, उभामार्ग करून बाकी सरकार अंमल दरोबस्त लाऊन हे सनद सादर केली असे. तरी गांवे सौभाग्यवतीचे दुमाला करून गांवची वहिवाट बिन दिक्कत चालविणें. पुन्हा पत्राचा आक्षेप न घेतां याची प्रत घेऊन अस्सल सनद भोगवटियास परतोन देणें. जाणिजे छ.२५ सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद. (शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 92 4-12-1809 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders the Kamavisdar, Chandwad that 3 villages (mentioned in the Sanad) have been granted by Sanad to his daughter Saubhagyawati Bhimabai for her maintenance.

---

अ. नं. ९३ **श्री**

ता. २७ जानेवारी, इसवी सन १८१०

रामचंद्रराव पवार यांजकडून भारमलदादा होळकरांस विशेष. बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं त्यास स्नेहाचें नातें असें नसावें. वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत जावे. यानंतर मुरारराव पवार रा. अलिजाबहादुर यांचे लष्करात वर्षभर जाऊन राहिले परंतु तेथें पेश न आले तेव्हां न पुसतां मशारनिल्हे निघोन या प्रांतीं आले. मागें आलिजा बहादुर यांनीं आपले महालोमहालीं पत्रें पाठविलीं कीं, यांजला थारा देऊं नये. त्याजवरून डोगरांत भूम्याचे आश्रयास आले. येथें सखाराम दिवाणजी यांचा पौ.शु.११ स काळ जाहला. या बखेड्यामुळें ते नेमाड प्रांतीं उतरोन धरमपुरीस सरंजामाची कमती म्हणोन तेथें ठाणें बसले. ऐसियास तुम्ही इकडून अगत्यवादी समीप असतां उपराळा होऊन पारिपत्य करण्यास न आलें हें अपूर्व. ही दौलत आणि सुभेदार यांची दौलत दोन नाहींत. एकच मानून सुभेदार बरदास्त राखीत आले. हें तुम्हास गैरमाहीत नाहीं. तुम्हीही समयोचित उपयोगच करीत आहा. यांस हल्ली रा. येसाजी शिलेदार कामदार ठाणें धरमपुरी याचा उपराळा करून ठाणें मशारनिल्हेचे हस्तगत करून घ्यावें. तिकडील महालाचे जाबत्याविसीं सर्वपरी भरंवसा तुमचा आहे. इकडील सरंजाम बदनावराकडे महालचे बंदोबस्ताकरितां अगाऊच गेला होता. तोही मागें

बोलावून नेमाड प्रांतीं रवाना होत आहे. परंतु याजला आठ-चार दिवसांचा अवकाश पडेल. यास्तव तुम्ही उपराळा करून जरुर मशारनिल्हेचें पारिपत्य करण्यास यावे. येविसीं तुम्हास सुभेदार यांजकडील पत्रेंही लवकरच येतील. परंतु मुराराव याचा जमाव विशेष होत जातो. यास्तव पारिपत्य लवकर करण्यात यावें. तुम्हाकडील चेतराम होळकरही त्यास सामील होणार म्हणून ऐकितों. यांजकरितां त्याजलाही ताकीद करून सामील होऊ देऊं नये. मुरारराव याचे चालीची माहिती पहिलेपासोन तुम्हास आहेच त्यापेक्षां विशेष काय लिहावें? ठाणें मजकुरचा उपराळा होऊन उत्तर सत्वर यावे रा छ २१ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती.

| |
|---|
| श्री भवानी शंकर चरणीं तत्पर<br>खंडेराव सुत आनंदराव पवार |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 93 — 27-1-1810 A.D.

Srimant Ramchandrarao Pawar to Bharmal Holkar :

Murarrao Pawar has become turbulent and has stationed himself at Dharampuri. Holkar and Pawar relations have been well-known to you. I, therefore, hopefully request you to take necessary steps against Murarrao.

---

**अ. नं. ९४** **श्री**

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १८१०

मैनाबाई पवार यांजकडून रा.भारमल होळकरांस विशेष. मुरारराव पवार यांनीं धरमपुरीकडे बखेडा केला याजकरितां मशारनिल्हेचें पारिपत्य करण्याविशीं तुम्हांस लिहिलें आहे व रा. येसाजी शिलेदार ही बोलतात. त्यास हा विचार जरूर करावा. मौजे बालसभद्र हा गांव शास्त्रीबाबाकडील त्यांनीं मारला. दिवसेंदिवस जमाव पडोन फैल करितांत. हे तुम्हांसही जड व आम्हांसही आहेच. ऐशास भुम्याचें पारिपत्य करण्याचे अवश्यमेव तुम्हांस आहेच. त्याचे पोटीं हेंही काम होईल. त्यास मनावर धरून मशारनिल्हेचें खात्रीने पारिपत्य करणें येविसीं तुम्हास विशेष ल्याहावें असें नाहीं. त्यास इतःपर दिवसगत लागली असतां त्याचा जमाव विशेष होऊन उपद्रव करण्यास चुकणार नाहीं. यांजकरितां पोक्त सरंजाम पाठवून पारिपत्य बरेवजेनें करावें. यात तुमचाही नक्ष आहे. त्यापेक्षां पारिपत्यास दिवसगत लाऊं नये. रवाना छ २४ जिल्हेज बहुत काय

लिहिणें लोभ करावा हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 94 31-1-1810 A.D.

Mainabai Pawar to Bharmal Holkar :

Murarrao Pawar is growing turbulent day by day. The Bhumia also is following suit. It is to your advantage to punish these rebels. Do not put off till to-morrow what can be done today.

---

**अ. नं. ९५** **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १८१०

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून रामचंद्र भगवंत निसबत बुळे कमाविसदार, संस्थान नरसिंगगड यांस विशेष. चिरंजीव राजश्री गोविंदराव बुळे यांजकडे संस्थान झाबुवे येथील ऐवज येणें त्याऐवजीं मशारनिल्हेनीं तुम्हांकडून संस्थान मजकुरचा ऐवज देविला त्यापैकीं शिलेदार, पठाण मंडळपैकीं मीर मर्दानअली यांजकडे कबजाचे बाकी ऐवजी रुपये प्रत १९००० व ६००० असे तुम्हांकडून देविले असे. तरी सदरहू पंचवीस हजार चांदवड शिक्का मशारनिल्हेस देऊन कबज घेणें. जाणिजे. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 95 12-2-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Ramachandra Bhagwant in the service of Bulye :

Pay Rs. 25,000/- to Mir Mardanali, and secure receipt thereof. The amount is really due from Govindrao Bulye, and is being paid out of the income of Sansthan Zabuwa.

---

**अ. नं. ९६** **श्री**

ता. ६ मार्च, इसवी सन १८१०

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळकृष्ण वासुदेव कमाविसदार यांस. विशेष. राजश्री सखाराम जगजीवन यांची रवानगी पुणियास श्रीमंतांकडे सरकारांतून केली आहे

समागमें हुजरातपागा दिली आहे. त्याचे चंदीची वगैरे खर्चाकरितां रु. ४०० चारशें तुम्हाकडे महाल आहेत तेथील सन अशेरमयातेन साल मजकुर पैकीं देविले आसे. तरी सदरहू चारशें रुपये तुम्ही मशारनिल्हेचे विद्यमानें देऊन कबज घेणें. या कामास घटकेचा विलंब न करणें. रवाना छ.२९ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तबसुद.

**कोटा दप्तर.**

No. 96 6-3-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orderes Balkrishna Wasudeo Kamavisdar to pay Rs. 400/- to Sakharam Jagajiwan who was deputed by the Sarkar to proceed to the Pune Court with Huzurat Paga.

---

**अ. नं. ९७** **श्री**

ता. ४ एप्रिल, इसवी सन १८१०

महाराज यशवंतराव होळकराकडून अवचितराव वाघमारे यांस. विशेष : तुम्हांकडे नजराण्याचा ऐवज येणें त्यापैकीं पेस्तर सालचे हप्त्याऐवजी तूर्त आजमासें कंपूकडे खर्चास रु.५००० पांच हजार तुम्हाकडून देविले असे तरी तुम्ही सदरहू पांच हजार राजश्री विठ्ठल महादेव यांचे विद्यमानें देऊन कबज घेणें. रा छ २९ सफर आशरमयातेन-आलफ. मोर्तबसुद.

२ रें पत्र महाराज यशवंतराव होळकर यांजकडून प्रतापराव वाघ यांस विशेष : कंपूकडील तलबेऐवजीं अजमासे राजश्री विठ्ठल महादेव यांजकडे रुपये २००० दोन हजार तुम्हांकडून देविले असे तरी तुम्ही सदरहू दोन हजार मशारनिल्हेकडे देऊन कबज घेणें रा छ २९ सफर आशरमयातेन बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 97 4-4-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Avachitrao Waghmare to pay Rs. 5,000/-to Vithal Mahadeo, out of the Nazrana that was due. The amount will be spent on behalf of the Kampu.

(2) Prataprao Wagh is similarly ordered to pay Rs. 2000/- to Vithal Tatya.

---

अ. नं. ९८ **श्री**

ता. १० एप्रिल, इसवी सन १८१०

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. तुम्ही स्वार होऊन गेल्यावर मार्गाहून अथवा थेटपासून पत्रें पाठविलीं नाहींत. संस्थान महेश्वर येथें दाखल जाहला. चोळीस मुक्काम आहे म्हणून राजश्री आबाजी गोविंद यांस तुमचें पत्र येऊन मशारनिल्हेनीं सरकारांत वर्तमान विदित केलें. ऐसियासीं तुमचे पत्र आजपर्यंत न यावयाचें कारण काय ? यावर पत्राच्या रवानग्या वरचेवर होइन वर्तमान कळवीत जाणें. राजश्री रामराव त्रिंबक व रामदिन नवीन शिबंदी ठेऊन ठाणें देऊं नये या विचारांत मशारनिल्हेनीं तुमचे पत्राचा भाव कळविला त्यास उभयतां चालीचीं माणसें सरकार लक्षांत आहेत. इतःपर त्यांचें पारिपत्य होऊन त्यांचे हस्तगत व्हावें. तुम्हापासीं जमियत नाहीं यास्तव सरकारांतून राजश्री कृष्णाजी महाडिक याजला लिहिलें आहे. तुम्ही बोभाट होऊं न देतां महाडिक यांजकडे सरकारचे पत्र पाठवून बातमी उभयतांची कळऊन ते बाहेर जाऊं न पावतां कळेल त्या सोईनें हस्तगत करून घेऊन दरोबस्त चीजवस्तू घोडीं वगैरा कागदपत्रसहित जप्तीस ठेवणें. कदाचित महाडिक येण्यास दिवसगत लागले तर लिहिल्याप्रमाणें तुम्ही बेत राखून कैद करणें. दोन्ही जागा अंमल हस्तगत करून साल मजकुरीं गांवगन्नावार वसूल येणें असेल तो माजीकडील कागदपत्रअन्वयें जमीदार यांचे दाखल्यानें रुजुवात वाजवी करून सरकारांत लिहून पाठविणें. सारांश, दिवसगत न लावितां महालीं अंमला फैला करून धर्माकुंवर व सोभाराम यांची अनन्वित वर्तणूक पाहून गेलाच होता. अलीकडेस बहुतच चढास लागून अनेक तऱ्हेचे विचार दिसून आले. दरम्यान नबाबासीं रूप वाढवून लढाई सन्मुख जाहले. पांचसात रोजा ते गोळाही सुरू होता, तेव्हां निमकहरामीचा विचार ध्यानास येऊन पलटणचे लोकांत फोडा तोडा करून दोन्ही हरामखोर हस्तगत करून घेऊन नेस्तनाबूद करण्यांत आले. सांप्रत पलटणवाले यांचा कराराप्रमाणें फडशा होत आहे. राजश्री नबाबाची भेट जाली. त्यासीही बोलण्यांत येऊन उचित विचार तोच घडेल. वरकड सविस्तर आबाजी गोविंद याचे पत्रावरून कळेल. रवाना छ.५ रविलावल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 98 10-4-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Bharmal Holkar to take severe steps against Ramrao Trimbak and Ramdin.

Dharma Kuwar and Sobharam joined the Nabab against the Sarkar

but they were severely punished.

---

**अ. नं. ९९** **श्री**

ता. १९ जुलाई, इसवी सन १८१०

सौ. लाडाबाई व तुळसाबाई होळकर यांजकडून राजश्री भारमल होळकरांस विशेष. खासगीकडे गांवखेडीं पहिलेपासोन वहिवाटींत कोणकोणतीं व तेथील नेमणूक सालिना कशी याचा तपशील समजला पाहिजे. याजकरितां हे पत्र लिहिलें असे. तरी तुम्ही येविषयीं तेथें खासगीकडील राजश्री गोविंदपंतांकडील कारकून व मुकुंद जिवाजी कडील, यांजला पुसून तपशीलवार गांवखेडी व शेरी नजराणा वगैरे कैलासवासी मातुश्री मासाहेब यांचे वेळेस खासगीकडे वहिवाट चालत होती त्याचा कच्चा दाखला दप्तरीं पाहून तपशीलवार स्वदेश, खानदेश, माळवा, वगैरेसुद्धां दाखला लिहून पाठविणें. रवाना छ १६ जमादिलाखर सुरुसन इहिदे आशर मयातैन व आलफ सन १२२० फसली. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 99 19-7-1810 A.D.

Saubhagyawati Ladabai and Tulsabai Holkar order Bharmal Holkar to submit a complete list of the villages, under Khasgi, in Swadesh, Khandesh. Malwa etc., with all the details of income etc., from the records of Devi Ahilyabai.

---

**अ. नं. १००** **श्री**

ता. १७ आगस्ट, इसवी सन १८१०

विठूजी बुळे यांजकडून भारमल होळकर यांस विशेष. रा. आनंदराव माधव पुन्हा जमाव करून आल्याचें वर्तमान पेशजी तुम्हांस लिहिलेंच आहे. आज छ. मजकुरीं पंत मशारनिल्हे सिद्धीसुद्धां कूच करून मौजे चिखली येथें मुक्कामास आले आहेत. शिबंदी, आरब व पूर्वे व सिद्धी, पठाण ऐसे एक हजार माणसें १००० व ३०० तीनशें स्वार ऐसा भरणा खचित आहे. मौजे हलासी प्रगणे कोठडे येथून एक कोसाचें अंतर आहे. त्यांचा जोर बहुत दिसतो. आमचेजवळ स्वारांचा भरणा माफक आहे. यास्तव महेश्वरचा सरंजाम ब्राह्मणगांवचे उपराळ्यास आला आहे त्याजला ताकीद होऊन सरंजाम इकडे आला तर तो व आम्हांकडील सरंजाम एकत्र करून त्यांचे निराकरण करूं. चिखलीहून पुढें कोठडे प्रगण्यांत येण्यास आवकाश नाहीं यास्तव तुम्हांस लिहिलें आहे. रवाना छ.१६ माहे रजब

बहुत काय लिहिणें हे विनंती. श्री मोर्तबसुद.

No. 100 17-8-1810 A.D.

Vithojee Bulye asks Bharmal Holkar to order the army already stationed at Bramhangaon to go over to his aid against Anandrao Madhao encamped at Chikhali.

---

## अ. नं. १०१ श्री म्हाळसाकांत

ता. १४ सप्टेंबर, इसवी सन १८१०

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>तुकोजी सुत यशवंतराव होळकर |
|---|

अजसरकार राजश्री यशवंतराव होळकर ताह शिवजीराम कंदोई प्रगणे रामपुरा सु।। इहिदे अशरमयातेनअलफ भीवा हुजरया निसबत सरकार याचा ऐवज गव्हाबद्दल तुजकडे येणें त्याजपैकीं वसूल देऊन सादडीचे मुक्कामीं बाकीचा ऐवज आठ रोजा द्यावयाचा करार करून राजश्री अमृतराव नानाजी पाशी फडशा करितों ऐसे बोलून गेला असतां त्यासीं सातआठ मास होत आले. अद्याप निर्गवा करीत नाहींस त्यावरून हें पत्र तुजला सादर केलें असे. तरी हुजऱ्या मजकुर यांसीं वायदा करून गेलास त्याप्रमाणें बाकीचे ऐवजाचा व्याजासुद्धां फडशा करणें. पुन्हा बोभाट आल्यास कामीं न पडतां पलटणचे पाहरे पाठवून बेमुलाजा फडशा करून घेतला जाईल. जाणिजे छ १४ साबान मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 101 14-9-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Shivajeeram Kandoee to make immediate payment of his due, the performance of which he had promised to Bhiwa Huzrya.

---

## अ. नं. १०२ श्री

ता. १७ सप्टेंबर, इसवी सन १८१०

खंडो महादेव मुक्काम पुणें यांजकडून भारमल होळकरांस विशेष. सारांश अर्थ सर्व

पाहतां आर्द्रता कांहीं नाहीं. आजपावेतों खरे लटके बोलून तालावर आणलें आहे.
पुढें पाहावें :

No. 102 17-9-1810 A.D.

Khando Mahadeo from Pune informs Bharmal Holkar that very little of sincerity and activity is noticeable there in spite of all his efforts.

---

अ. नं. १०३ **श्री**

ता. ७ नोव्हेंबर, इसवी सन १८१०

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळकृष्ण वासुदेव कमाविसदार रामपुरा यांस विशेष. भरतपुर व हिंडोनपैकीं बारुद खातेचे दास्तान सरकारी किल्ले रामपुरा येथें आहे. त्याजपैकीं हुजूरचे तोफखान्याकडे बारुद वजन २५० अडीचशे मण याची वरात पेशजीं छ.२९ जमादिलाखरीं जाहली. ते गैरविलेस पडली सबब हल्लीं बारुद सरकारी दास्ताना पैकीं हुजूरचे तोफखान्याकडे राजश्री विठ्ठल महादेव जोग यांचे विद्यमानें देऊन पावती घेणें. रवाना छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 103 7-11-1810 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders the Kamavisdar, Rampura, to secure receipt from Huzur Artillery through Vithal Mahadeo Jog (Kibe) for the explosives supplied by the Kamavisdar.

---

अ. नं. १०४ **श्री**

इसवी सन १८१०

सही फारशींत, नबाब गफुरखांचे पत्र
गफूरखां इप्तखार दौले.

राजश्री भारमलदादा होळकर गोसावी यांस अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित नबाब गफूरखां इप्तखार दौले सलाम विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री चिमणाजी कृष्ण यांचे पागेंत किल्ले सेंधवे येथें फकीर महंमद पीरजादे याच्या घोड्या रास दोन आहेत. यांजविशीं सरकारचीं पत्रेंही आपणास आहेत तरी किल्ल्याहून घोड्या आल्या म्हणजे वाटेचा जाबता व खर्चाची बेगमी देऊन जावरे येथें पोहचवून द्याव्या.

१ राजश्री रामराव सदाशिव यांचा ऐवज राजश्री आनुपचंद यांजकडे तुमचे कारकीर्दीतील पंचमसिंग याचे विद्यमानें अनामत ठेव रु. ९०० आहेत. याजविशीं दोन तीन वेळां लिहिलें परंतु मशारनिल्हेस रुपये पावले नाहींत. तरी सावकार मजकूर याजला ताकीद करून ऐवज नऊशें व्याजसुद्धां वसूल करून रावजीचे नावें सावकारीजमा ऐसें केलें पाहिजे.

१ रामदीन व रामराव त्रिंबक यांचा आम्ही पंचवीस हजाराचा जिम्मा घेतला आहे त्याचे वहिवाटीचे रुजुवातीस सरकारचे कारकून राजश्री नरहर रघुनाथ व दिनकर टुलाजी पाठविले आहेत. त्यास खरगोण, महेश्वर, ब्राह्मणगांव येथील जमीदार यांची वतनें सोडून दिलीं त्याबद्दल ऐवज येणें रुपये दहा हजार व अंमलाथा यांजकडे बाकीचा ऐवज साडेसोळाशें येणें तो ऐवज वसूल करून पंचविसाचें पेट्यांत द्यावा लागतो. यास्तव लिहिलें असें. तरी आपण घरचें काम जाणोन चित्त पुरवून ऐवज वसूल करून बिजेचंद मुलचंद याचे दुकानीं भरून पावती पाठवून द्यावी व रावजीचे नऊशें रुपये आनुपचंद यांजकडून व्याजसुद्धां घेऊन सावकारी जमेची चिठ्ठी पाठवून द्यावी.

पीरजादे याची घोडीं जावरे येथें पोहचती जाली पाहिजे व जमीदारास दहा हजार रुपये वसूल करण्याविसीं आनमान करूं नये. बेजरब ऐवज वसुलांत आणावा. आनमान केला तर येथून स्वार पाठवून जमीदार हुजूर आणविले जातील. महेश्वर, खरगोण वगैरे कोठेंही कोणी जाणता चांगला प्रखर शोध करून जरूर येथें पाठवून द्यावा. येविसीं सरकारचें पत्र लिहिलेंच आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 104 1810 A.D.

Nabab Gafurkhan writes to Bhamal Holkar to send two mares of Pirjade to Jaora with the necessary provision of food and money on the road.

"Ramdin and Ramarao Trimbak are taken under protection by the Nabab under certain conditions. Partial fulfilment of which is entrusted to you."

---

**अ. नं. १०५** **श्री**

ता. २ जानेवारी, इसवी सन १८११

खंडो महादेव यांजकडून महाराज यशवंतराव होळकर यांस विशेष. कै. श्री. नाना फडणीस व हरीपंत तात्या आदीकरून कारभारी यांजला आपले सरकारांतून गांव होते.

त्यांचा तसा प्रकार झाल्यावर सरकारचे सरकारांत आले. सांप्रत सर्वांचे ठिकाणीं राजश्री सदाशिवपंत भाऊ (माणकेश्वर) आहेत. त्यांचे वारंवार गांवाविषयीं म्हणणें पडलें. त्याचें उत्तर आजपावेतों टाळून गाळूनच होत गेलें. तूर्तचे काळीं कामाचे नमुदाची वेळ. यांत शेवटपर्यंत तसेच म्हणणें म्हटल्यास चांगलें नाहीं. याकरितां सध्यां त्यापैकीं कांहीं गांव लावून द्यावे म्हणजे बोलण्यास नीट पडून पुढें कामाचेही उपयोगाचीच गोष्ट होईल. हरीपंत तात्यांकडे शेवगांव प्रगण्यातील गांव होते. ते याकाळीं बहुत करून उजाड. कांहीं लावणी तेही शेपन्नासाचे आकाराचे असतील. पुढील उपयोगाचे ध्यानांत ठेऊन सदाशिवपंत भाऊकडे ते गांव लावून द्यावयाची आज्ञा मर्जीस आल्यास द्यावी. साल मजकूर तरी उगवलेंच आहे. पेस्तर सालापासूनच लावणी होऊन आकारास यावयास किती दिवस पाहिजेत. तोंवर कोणत्या घाटास कसें येतें याचा नेम तो काय ? सध्या दिलेसें त्यांस वाटून आपलाही उपयोग. हे सर्व साहेबांचे ध्यानांत नाहीं असें नाहीं. कळावें, सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 105 2-1-1811 A.D.

Khando Mahadeo requests Maharaja Yeshwantrao Holkar to assign some of the villages (formerly held by the late Nana Fadnis and Haripant Phadke) to Sadashivarao Mankeshwar who is asking for some grant, and who now wields influential power in the Pune Court.

---

**अ. नं. १०६** **श्री**

ता.७ फेब्रुवारी, इसवी सन १८११

खंडो महादेव, जगजीवन यांजकडून महाराज यशवंतराव महाराजांस विशेष माणकेश्वरची देवी व गर्ग्याची सटवाई, दोन्ही देवतांची स्थापना कैलासवासी श्रीमंत सौ. मातोश्री गौतमाबाईसाहेब यांनीं वाफगांवचे बागांत केली. आपले घरच्या मुलांची जावळें वगैरे यात्रेचा विधी येथेंच होत असतो. कै. श्री. मल्हाररावबावा व सौ. बाईंच्याही यात्रा येथेंच जाहल्या, असें येथें जुनी पुराणीं माणसें सरकार पदरचीं आहेत, ते सांगतात.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 106 7-2-1811 A.D.

Khando Mahadeo informs Maharaja Yeshwantrao that Mankeshwar Devi and other goddesses were established in the Wafgaon Gardens by the late Saubhaghyawati Gautamabai; and that head-shaving ceremony of the children of the Royal family was usually

performed there. Such is the report of old local residents.

---

**अ. नं. १०७** **श्री**

ता. १३ मार्च, इसवी सन १८११

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून रा. बाळाराम अगरवाल कमाविसदार प्रगणे इंदूर यांस विशेष. महेश्वरीं गंगाभारथी गोसावी यांचा मठ तेथें श्री रेवातीरीं आहे. त्याजला मौजे सिणगुण प्रगणे बलकबाडा सरकार बिजागड येथें रतनाभिलाळा यानें दंगा करून रेवाभारथी मारले गेले. पुढें मठाधिकार सरकारांतून महंत खुशालभारती यांस द्यावयाचा ठराव होऊन राजश्री भारमल होळकर यांस लिहून हें पत्र तुम्हास लिहिलें असे तरी तुम्ही इंदुरीं किसनभारथी व भैरवभारथी आहेत त्यांजला समजून सांगावें कीं, सरकारांतून खुशालभारथी पट द्यावयाचा ठरविला तो तेथें जाऊन पटाधिकार करवणें. याप्रमाणे मंडलोई, कानगो यांजला लिहून सांगविणें. सारांश मठाची पूर्ववत् वहिवाट चाले ते करणें. रवाना छ.१७ सफर सु. इंहिदेआशर मयातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>तुकोजी सुत यशवंतराव होळकर |
|---|

**सरकारी रेकॉर्ड**

No. 107 13-3-1811 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Balaram Agarwal : Rewa Bharti-Head of the Ganga Bharti monastery at Maheshwar-lost his life in the turbulence of Ratna Bhillala. Khushal Bharti is appointed by the Sarkar to the vacant Seat. Please ask Kisan Bharti and Bhairava Bharti of Indore to perform the necessary rites.

---

**अ. नं. १०८** **श्री**

ता. ३० मार्च, इसवी सन १८११

खंडो महादेव व सखाराम जगजीवन यांजकडून पुरवणी पत्र : वेदशास्त्रसंपन्न राजश्री अंबाराम शास्त्री यांची व मुख्याची भेट प्रथम झाली. यावर आपले सरकारप्रकरणीं एकदोन

वेळ बोलणीं झालीं. परंतु संकलितार्थ उभयपक्षीं भाषण झालें. खुलासा पूर्णपणें निघाला नाहीं. याजवर एके दिवशीं विश्रामबागेत जाऊन श्रीमंतांची गांठ घालून चार घटका उभयतांच बसोन आपलेकडील सरळतेचे भाव विशुद्धपूर्वक निवेदन केलें. त्याजवर त्यांनीं ऐकून घेऊन जे जे संशयाची कारणे होती त्याचा उपक्रम केला, तितक्यांचे निराकरण यांनीं केलें. चार घटका उहापोह बराच झाला. खातरजमा होऊन, आतां त्या दौलतीविषयीं मनात किंतु कोणताही राहिला नाहीं, असें स्वमुखें भाव बोलण्यांत आलें. शास्त्रीजीनेही बोलिले अर्थाची पक्काईविषयीं पुन्हा बोलोन निरोप घेऊन आले. सदरहुप्रमाणें जाब मजकुर सांगितला तो सेवेसीं लेखन केला आहे व शास्त्रीही लिहितील. या उपरी पुढील बोलण्याचा क्रम चालू होऊन निश्चयांत येईल ते सेवेसीं मागून पत्र लेखन होईल. हे विज्ञापना : पैवस्त छ ५ रविलावल चैत्रमास सन १२२० फसल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 108 30-3-1811 A.D.

Khando Mahadeo and Sakharam Jugjiwan write in a supplementary note : Ambaram Shastree saw the Peshwa and cleared all the points of doubts against our Daulat raised by the latter. The Peshwa then expressed his satisfaction at this clearance. The Shastree got the remarks reassured, and then returned.

---

**अ. नं. १०९** **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १८११

खंडो महादेव यांजकडून महाराज यशवंतराव होळकर यांस विशेष. उभयपक्षीं ओढाताड पडून निघाले असतील. आणिकही कांहीं कारणें असतील तीं असोत. परन्तु सरळपणें निरोप घेऊन जाणें झालें नाहीं. त्यापक्षीं त्याचा इतल्ला सोबत्यास द्यावा. त्यांचा आपला एकोपा तेव्हां जें करणे दुतर्फे एकविचारें होत असावें. वरकड तिकडील मनुष्यास कांहीं वाकडें तिकडें दिसल्यास आपले सरदारींत बचाव. इकडल्यास तिकडे आधार असें पूर्वीपासोन मागे चालत आले आहे त्याच अन्वयें आतांही मजकूर तिकडे कळवून उभयपक्षीं स्वच्छता झाल्यास मेळ करून घेणें चांगलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 109 31-3-1811 A.D.

Khando Mahadeo to Maharaja Yeshwantrao Holkar. The parting

meeting did not take place as it usually does. The matter should be brought to the notice of the "Companion". Both parties have, until now, proved "protection" one to the other. The same should be the procedure for the future.

---

**अ. नं. ११०** **श्री**

ता. २० एप्रिल, इसवी सन १८११

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून जगन्नाथ राजाराम यांस विशेष. राजश्री विठ्ठल यशवंत शिवपंथी यांनीं सरकारांत विदीत केलें कीं, तालुके पिंपलोदा प्रगणे मंडावल येथील मामलत राजश्री संभाजी परशराम यांजकडून केली त्या कारकीर्दीचे फाजील अडीच हजार रुपये माझे मशारनिल्हेकडून येणें आहेत व प्रगणे तालमंडावल येथे शिंदे यांजकडील बारभाई वगैरे याचे फौजेचे जमाव महालीं येत गेले त्यासंबंधीं खर्चवेचाकरितां सावकारी चालीनें महालचे जमीदारानीं ऐवज घेतला. त्याची खतें पत्रें असतां फडशा करून देत नाहींत, घटाईच्या गोष्टी सांगतात. यांजकरितां राजश्री जगन्नाथ राजाराम याजला सरकार आज्ञा होऊन ऐवज वसूल करून देविल्यास ऐवजाची चौथाई सरकारांत हजर करीन म्हणोन. त्याजवरोन हें पत्र सादर केलें असे तरी संभाजी परशराम व जमीदार यांजला सरकारांतून ताकीदपत्रें अलाहिदा सादर झालीं आहेत. तुम्ही मशारनिल्हेस व हरदूमहालाचे जमीदारांस जरब देऊन वाजवी खतापत्राचे रुईने शिवपंथी याचा ऐवज वसुलांत आणोन त्याप्रमाणें सरकार चौथाई घेऊन बाकी ऐवज त्याचा त्याजला देणें. पुन्हा बोभाट न ये तें करणें. जाणिजे छ.२६ रविलावल बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 110 20-4-1811 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Jagannath Rajaram :

Vithal Yeshwant Shivapanthi is to receive certain amounts from Sambhajee Parashram and the Mahal Jamedars. He has promised to pay one-fourth of the amount to the Sarkar. Arrange to secure him the due amounts.

---

अ. नं. १११ श्री

ता. २९ एप्रिल, इसवी सन १८११

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून बाळकृष्ण वासुदेव यांस विशेष : जिनसी पलटणाकडे हिंडोणचे बारुदपैकीं पेशजीं साठ मणांची वरात केली. त्याप्रमाणें दारू अद्याप पावत नाहीं म्हणोन बोभाट आला. तरी जिनसी पलटणाकडे हिंडोणचे दारूपैकीं साठ मण देविली, त्याप्रमाणें बिनदिक्कत, दुसरें पत्रांचा आक्षेप न घेतां, दोहीकडे देऊन पावत्या घेणें. र.छ.५ रा.ख. पावती : सदरहू बारुद हिंडोणपैकीं पलटण जिनसीकडील कारकून निसबत परशराम होळकर हस्तें रामचंद्र गोविंद बारुद ऐसी ते तोलने वजन मण ५० पन्नास भरून पावलो. छ.३ जमादिलाखर थैले सुमारी २९ ता २६ मे १८११.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 111 29-4-1811 A.D.

Receipt of 50 Maunds of gun-powder in 29 bags.

---

अ. नं. ११२ श्री

ता. ३० सप्टेंबर, इसवी सन १८११

महाराजा यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष : तालुके चोळी प्रगणे महेश्वर येथील मामलत तुम्हांकडे सांगितली होती ती दूर करून साल मजकुरपासून खाजगीकडे लावून देऊन हे पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुम्हीं तालुके मजकुरची दखलगिरी न करितां ठाणें खासगीकडे लावून खासगीकडील कारकुनाचे स्वाधीन करून कबज घेणें. र.छ.११ रमजान इसने अशर मयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 112 30-9-1811 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar orders Bharmal Holkar that Taluka Choli is transferred to the Khasgi.

---

अ. नं. ११३ श्री

ता. ६ आक्टोबर, इसवी सन १८११

महाराज यशवंतराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष : तालुके बागदरा प्रगणे महेश्वर येथें अलीकडे उजाडी होऊन भिलाभामरास जागा होऊन रस्ता चालत नाहीं, यास्तव तालुके मजकुरचे इस्तबारीचे कामी व भिलांचा धारा नाबूद झाला पाहिजे. यांजकरितां खासगीचे कामांतून तुम्हांस मुक्त करून, खासगीकडील वहिवाट खासगीचे कारकुनाचे स्वाधीन करून देऊन कबज घेणें. छ १७ रमजान इसने अशर मयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 113 6-10-1811 A.D.

Maharaja Yeshwantrao Holkar to Bharmal Holkar :

Taluka Bagdara of Pargana Maheswar has. recently, been depopulated owing to the turbulence of the Bhills. You are, therefore, ordered to proceed there and bring order out of chaos. The " Khasgi " will be looked after by the clerks of the Department for the time being.

---

**अ. नं. ११४** **श्री**

ता. १४ आक्टोबर, इसवी सन १९११

सौ. लाडाबाई व तुळसाबाई होळकर यांजकडून रा. भारमल होळकरांस पत्र : विशेष : तालुके चोळी सुदामत खासगीकडे चालत आली. तालुके बागदऱ्याची आबादी होणें सबब दोन्ही तालुके सरकारांतून खासगीकडे लावून देण्यांत आले. त्यावरून हरदु तालुक्यांची वहिवाट खासगीचे तर्फेने राजश्री खंडेराव लक्ष्मण यांजकडे सांगून हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी दोनी तालुक्यांत तुम्ही दखलगिरी न करितां, ठाणें मशारनिल्हेचे स्वाधीन करून साल मजकुरचा वसूल तुम्हाकडे पडला असेल तो शिबंदी खर्चाबद्दल हिस्सेरसीने वजा होऊन बाकी ऐवज जमीदारांचे दाखल्याने मशारनिल्हेकडे देऊन कबज घेणे. रवाना छ.२५ रमजान बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 114 14-10-1811 A.D.

Saubhagyawati Ladabai and Tulsabai Holkar to Bharmal Holkar :

Taluka Bagadaraya is now assigned under " Khasgi. " You are to hand over the charge of this Taluka and that of Choli to Khanderao Laxman.

---

**अ. नं. ११५** **श्री**

कार्तिक शुद्ध ११, ता. २७ आक्टोबर, इसवी सन १८११

बातमीदाराचे पत्र विशेष : मुक्काम भानपुरा : कालपासोन श्रीमंत राजश्री यशवंतराव महाराजांस श्वास उठला होता. आज एकादशी भानुवार पावणेदोन प्रहरीं महाराजांस देवआज्ञा झाली. मोठा अनर्थ जाहला. ईश्वर इच्छेपुढें उपाय नाहीं. मागाहून जें वृत्त होईल तें लिहून कळवूं. मोहनलाल व राधाप्पा यांस इकडे येऊं देऊं नये. महेश्वरीं कासीदाची जोडी सहा रोजा करारानें पाठविली आहे.

(२) दुसरें पत्र : पत्रीं मनन करितां धैर्याची गोष्ट न राहतां परमदुःख जाहलें. मोठी अनर्थाची गोष्ट जाली. त्याजसारखा वीर, पराक्रमी, मागेहीं जाहला नाहीं आणि पुढेंही व्हावयाचा नाहीं. सर्वांवर जरब ठेऊन, जलचरें आदिकरून सर्वांस जेरबंद करून वडिलांचे नांवाची शर्थ केली. गैरआरामांत जरी होते तरी सर्वांस दहशत होती. ईश्वर इच्छेपुढें कोणाचा उपाय नाहीं. त्यांनीं कोण प्रकारें लोभ करून संगोपन केलें त्याचा विसर पडावा ऐसे कालत्रयीं होणें नाहीं. त्यात आम्हांस आतां त्यांचे ठिकाणीं बालमहाराज आहेत तेव्हां ते संगोपन करतीलच. (अपूर्ण)

**सरकारी जळालेल्या रेकॉर्डपैकीं**

No. 115 27-10-1811 A.D.

Correspondence letters : Grieved greatly at the news of the death of Maharaja Yeshwantrao Holkar. The young Maharaja is now our protector. We look up to him for all that is dear and near to us.

---

**अ. नं. ११६** **श्री म्हाळसाकांत**

ता. २७ आक्टोबर, इसवी सन १८११

छ. ९ सवाल, फसली सन १२२१

राजश्री भारमल होळकर गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारराव होलकर विनंती उपरी. तीर्थरूप बाबासाहेबांची प्रकृती बेआराम होतीच. कार्तिक शुद्ध १० शनिवारीं वायूचा प्रकोप जास्ती होऊन अंग उडूं लागलें. यापूर्वीं पांचचार वेळां

वाखा याप्रमाणेंच झाला. श्रीमार्तंडजीचे कृपें आराम होत गेला. त्यासाठीं जें उपचार होणें तें झाले. शेवट शनिवार सायंकाळीं ज्वरांश वाढला. मागील चार घटका रात्र राहतां श्वासाचा उपद्रव पाहून तुला, गोदानें, इत्यादि दानधर्म चालून पोथी पुस्तकाचे पाठ व नामस्मरण, त्यांत दैवी, मानवी, उपचार ही जाहले. परंतु गुणास न येतां शुद्ध ११ प्रथम ११ घटका दिवस चढतां परलोक पावले. या खेदाचा विस्तार पत्रीं कोठवर लिहावा. वर्तमान कळतांच तुम्हांसही खेदाचे पर्वत. परंतु आयुष्यमर्यादा. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. यास्तव मनाचें शांतवन करून कोणेविशीं उदास न राहतां इकडेही धैर्याचीं पत्रें पाठवून संस्थान नाके, घाट, यांचा जापता यथास्थित ठेऊन सरकारांत दरपेश वर्तमान कळवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 116 27-10-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar informs Bharmal Holkar the sad news of the death of Maharaja Yeshwantrao on the 11th day of the bright half of Kartik. (27 th October 1811 A.D.)

---

**अ. नं. ११७** **श्री**

ता. ११ नोव्हेंबर, इसवी सन १८११

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. मजकुर कळला. हल्ली निवाड होऊन चोळी बागदरा वगैरे निराळा खासगीचा कमाविसदार आला. त्यामुळें तुमची निराशा जाहली, हे काय समजून मनांत आणिले? त्यास कोणताही अंदेशा मनांत न आणितां खात्री ठेऊन चोळी, महेश्वर वगैरे जागा तीर्थरूप मातोश्रीसाहेबांकडील कारकून आले आहेत त्यांचा अंमल करून देऊन हरएकविसीं उपर ठेवीत जाऊन सरकारांत लिहून पाठविणें. छ २४ सवाल. इसने अशरमयातेन वअलफ. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

No. 117 11-11-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar to Bharmal :

You have no reason to be dissatisfied for the appointment of a new Kamavisdar for Choli and Bagdara, we assure you. Hand over the charge, please.

---

**अ. नं. ११८** **श्री**

ता. १२ नोव्हेंबर, इसवी सन १८११

महाराज मल्हारराव होळकरांकडून भारमल होळकरांस विशेष. चोळी, बागदरा वगैरे साल मजकुरापासोन पूर्व वहिवाटनरूप खासगीकडे लावून देऊन, खासगीकडील वहिवाट राजश्री खंडेराव लक्ष्मण यांजकडे सांगितली आहे. महालाची वहिवाट सुरळीतपणें चालून तुम्हांकडून उपर राहिला पाहिजे. तरी सरकार सनदेअन्वयें, खासगीकडील कमाविसदार महालची वहिवाट करतील व तुम्ही उपर ठेवीत जाऊन सरकारांत कोणेविषयींचा बोभाट न ये तें करणें. अलाहिदा लिहिलेंच आहे. तेंच मनांत ठेऊन टाळाटाळ करूं नये. ज्याचे त्याचपरी घडत आहे तरी खासगी वहिवाट चालू करून सरकारांत लिहून पाठविणें. रवाना छ २५ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद. (शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 118 12-11-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Bharmal simply to supervise the work of the Khasgi Kamavisdars. The latter will do all the necessary detailed work.

---

**अ. नं. ११९** **श्री**

ता. २१ डिसेंबर, इसवी सन १८११

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून मुक्काम कोहळानजीक भानपुरा : आबाजी खंडेराव व रावजी गोविंद यांस : विशेष : तीर्थरूप बाबासाहेबांचे प्रकृतीस विजयादशमीपासून विकृती झाली. फक्त दुग्धावर होते. तेही दिवसेंदिवस सुटून ग्लानी फार आली. कोणत्या समयीं कसें होईल. फौज पलटणे दरोबस्त बाहेर. कांहीं सरंजाम जवळ असावा, याजकरितां राजश्री जगन्नाथ राजाराम पेंढारियांचे मुकाबल्यास होते. त्यांजला बोलावून घेऊन बापू विष्णू यांजला फौजेसुद्धां पेंढारियांकडे आणविलें. जगन्नाथ राजाराम कार्तिक शुद्ध ८ स गरोठचे मुक्कामीं येऊन पावलें आणि एकादशीस तीर्थरूपजींचा काळ जाहला. बारा तेरा दिवस

होऊन सांप्रदायानुरूप सर्वांची खात्री करण्यांत आली. नंतर पलटणवाल्यांनीं तलबेचे बोलणें लाविलें. त्याची खात्री तोडजोड गरोठचे मुक्कामीं लाऊन एक दोन कंपन्या स्वारीत आणवून वाटणी सुरू केली असतां, राजश्री जोत्याजी व कृष्णराव पाटणकर यांचा मजकुर पेशजी लिहिलाच आहे. उभयतां ४, ६ मास उद्योगांत होतेच. पलटणे नजीक आल्यावर पाटणकर व आणखीही त्यांचे नादांतील त्यांनीं पलटणांत पैगाम लावल्यामुळें त्यांची आपसांत गंगाकुराण होऊन मार्गशीर्ष शुद्ध ४ स गरोठचे मुक्कामीं पलटणची तैयारी केली. सरकारांत बातमी येतांच राजश्री कृष्णाजी मुकुंद समजुतीस पाठविले. त्यांनीं तोफा दुराणीवर धरून देवडीवर येण्याची चाल केली. मागाहून राजश्री गणपतराव नारायण व बाळाराम आगरवाले व नबाब गफूरखां व मयफौज रवाना केलें. तिमाही तलब करून फडशा होतो. कांहीं त्यापैकीं बाकी रोज चढले होते. त्याची तोडजोड समजूत पाडण्याची तरहा केली होती. तितकी बोलण्यांत आणली. परंतु कोणत्याही तोडीवर येईनात. तेव्हां बारीक शोध पाहतां फितुराचा विचार सर्व कळून पलटणें हरामखोरीस प्रवृत्त झालीं. हे जाणोन फौज व कारभारी त्याचे मुकाबल्यास भानपुरियास ठेऊन खासा स्वारी रामपुरियास आली. तिही पलटणेंचे शिपाई बापू विष्णु यांचे पलटणांत जाऊन त्याजला आपले नादास आणोन दरकूच भानपुरीं घेऊन आले. पांच पलटणांचा एक्का पूर्ववत जमला. फितुराचा डौल बळाऊनच होते. हरामखोरांचें पारिपत्य करून बरबाद करावें. घरचे फौजेशीं लढाई हे लोकेषणांत दुर्वार्ता व फितुरी निवडले असतां ५-५० निघतील तितक्याकरितां सर्वांची बदनामी करतां हे चांगलें नाहीं व दौलतीचे ओघास आर्धा तलब करावा. यास्तव पांच वीस रोजे देऊन व कांहींस घेराघेरीची जरब दाखवून फितुरी माणसें होतीं तितकी हस्तगत करून घेतली. बापू विष्णू कडील पलटणें फारशी फंदांत नव्हती. त्यांजला भानपुरींच ठेऊन तिन्हीं पलटणांपैकीं दोन पलटणांस बासवाड्याची कमान (नोकरी) सांगोन रवानगी केली. एक पलटण गुगरछबड्याकडे पाठविली. त्याचा मुक्काम ४-५ कोसांचा करून दुसरें दिवशीं रा. गणपतराव नारायण व बक्षी व नबाब फौजेसुद्धां जाऊन गुगरछबड्यास पलटण रवाना झालें ते घेरून धरून सरकाराचा असबाबात आणखी फितुरी दंडेली माणसें निवडून घेऊन वरकड शिपाई त्यांचे वस्त्र पात्रसहित काहडून दिल्हे. त्याप्रमाणेंच दोन पलटणें सितामहूस गेली होती, तीही आटोपून सदरहू अन्वयेंच करण्यांत आले. यामुळें वरकड पलटणांत दबाव पडून सारे आपापलें पापपुण्य सांगून सरळ आहेत. तीन पलटणें मोडली. त्याचे बदली आणखी भरती सुरूं आहे. पलटणवाल्यांनीं हमामखोरींत कसर ठेविली नाहीं. परंतु श्री मार्तंडकृपेने व ती. कै. वडिलांचे पुण्यें संकटांचे निरसन होऊन सरकारांतून बंदोबस्त यथास्थित केला. इतःपर फितुरी हस्तगत आहेत. त्याची चौकशी करून व जसा ज्याचा आचार तसें शासन करण्यांत येईल. तेथें परस्परें अखबारी येऊन वर्तमान कळेल. यास्तव वास्तविक विस्तारें लिहिलें आहे. इकडील सुक्तासूक्तांचा इतल्ला तिकडे असावा. दोन्ही दौलती सांभाळून न्यूनाधिक्य सुचवून त्याची पैरवी राखणें येविषयींची काळजी इकडे करावयाची नाहीं. पुण्याहून उभयतांची पत्रें निकडीची येतात. त्यांचा विचार येथूनही घडतच

आहे. या संधीस तेथूनही हातचिठ्ठ्या व देशमुखास पत्रें लगट जाऊन वडीलपणे येथील मनोदय सिद्धीस नेणे उचित आहे. राजश्री मोरो हरी यांचे येण्याचा विचार कसा ठरला हे एकवेळीं उगवून लिहिणें. वरकड सविस्तरें राजश्री माधवराव गोविंद यांचे पत्रावरून कळेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 119 21-12-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar (encamped at Kohala near Bhanpura) to Abajee Khanderao and Raojee Govind:

After the death of Maharajara Yeshwantrao the army had grown turbulent: efforts to bring them under check were successful at last.

---

**अ. नं. १२०** **श्री**

ता. २१ डिसेंबर, इसवी सन १८११

महाराज मल्हारराव होळकर मुक्काम कोहला नजीक भानपुरा यांजकडून आबाजी खंडेराव व रावजी गोविंद यांस विशेष. नागपूरचा व आपला मेळ असावा, हें जातेसमयीं तुम्हांसी बोलण्यांत आलें होतें. त्यावरून तिकडील वकिलासी तुमचे स्नेहाचे अन्वयें होऊन सरकारची पत्रें आणविलीं. त्यावरून ती. कै. बाबासाहेब विद्यमान असतां राजश्री सेनासाहेब सुभा यांचे नांवे स्नेह घरोब्याचे चालीप्रमाणें पत्रें पाठवून उभयतां वकिलांस लिहिलेंलीं पत्रें फणिपुरास पावोन त्यांनीं आपले मतलबाचा अर्थ पाहून पावती अन्वयें मसुदा लिहून पाठविला. त्यात राजश्री नबाब अमीइद्दौले याचीही खात्री आणविली व त्याच अन्वयें राजश्री केशवराव व्यंकटेश वकील यांचे विद्यमानें पत्रें आलीं. इतक्यांचें कारण नव्हतें. ज्याचें त्यास घरचें नफानुकसान पाहणें प्राप्तच आहे. घरोब्याचे जागा लढे ठेवणें हेंही अप्रशस्तच आहे. येविषयीं त्यांनीं मनोदय समजून उचित करणें ते करावे, अगर परस्परें समयानुरूप उपर ठेऊन ओघास आणून नमुदीचे पोटांत तिकडील इकडील विचार दोन नाहींत. इतकी दुरंदेशी न पाहिली. अस्तु. राजश्री खंडो महादेव व सखाराम जगजीवन राजधानीस आहेत. तेथील बोलणें ओझ्याचें आपल्यास मर्जी ठेवणें युक्त परंतु ओढीमुळें तदन्वयें घडून येईना. अशा प्रसंगीं दवलतीस एकमेकांचा उपर राहत आला व रहावा. स्नेह घरोब्याचे येथील वागण्यांतच उपयोग. यांत व नागपुरचे अनुषंगे पुण्याकडून इकडील मनोरथ सिद्धीस नेण्यास लौकिकांत चांगले. त्यांचे आपले घरोब्याचे मेळांत सारे सुधरून मागील पुढील अंदेशा न राहतां लेखाप्रमाणेच निदर्शनास येईल या अन्वयें राजश्री बाळाजी यशवंत व बापूजी मतकर उभयतांशी बोलोन त्यांचीं पत्रें सेनासाहेब यांस उगवून जाऊन प्रत्योत्तरें खचित येऊन पैरवीची नमुदी दिनावधी

न लागतां घडावी. इकडून सेनासाहेब व श्रीधरपंत यांचे नांवें संकलित पत्रें पाठविली आहेत. ती वकिलांचे स्वाधीन करून जाब आणवून उभयतांसीं तुमचें बोलणें जालियावर खात्री कशी करितांत ती सविस्तर लिहून पाठविणें. रवाना छ १२ जिलकाद सुरुसन इहिदेअशरमयातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 120 21-12-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar (encamped at Kohala near Bhanpura) to Abajee Khanderao and Raojee Govind : There was no necessity of joining a note from the Nawab with the letters of Senasaheb Subha. Former relations with the Sena Saheb are to be retained, but with a due regard to our present position. Through the Sena Saheb we have to strengthen our position in the Pune Court. Letters are addressed to Sena Saheb and Shridharpant.

---

**अ. नं. १२१** **श्री**

ता. २१ डिसेंबर, इसवी सन १८११

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून खंडो महादेव व सखाराम जगजीवन यांस पत्र. विशेष तुम्ही मार्गशीर्ष शुद्ध ११ व वद्य २ ची पत्रें पाठविली ती पावोन सविस्तर विदित जाहली. सरकारांत विचार ठरून ५ पांच कलमांची याद येऊन आज्ञेचे भाव उभयतांनीं लिहिलें, त्यापैकीं ४ चार कलमें सांप्रतचे समयास विचार करण्याजोगीच आहेत. पांचवें कलमाचा पर्याय चांगला परंतु पांच लाख पूर्वीपासोन लिहिलें, समयास लाख पन्नास शिवाय जास्त लागतील, येकुण सहापर्यंत मेळ लागून लवकर यावें. नजरेचे आखांस कारभारियाकडून वारंवार बोलणें पडतच आहे. आम्ही पांचाचे पाऊल दाखविलें. त्यांची उडी तर बहुतच. सरकारचे ओढीचे प्रकार बोलतच आहो. कबूल केलें नाहीं तर, सरदारीचे आगत्यवादे बोलणीं गोड पडतात. एखादा निश्चय ठरून लिहिण्यांत येईल. मेजवानीचा मेळ लवकर पडोन यावा. नजरेचे कारभारियाचे अनुमते ठराव होईल तो लिहूं. पांचाचा आंख बोलण्यात आला त्यावेळीं श्रीमंत यजमानसाहेब विद्यमान होते. अलीकडे नजरेचे बोलणें चढाचें दिसते. इकडील संतोष व आपला देशकाल पाहून ठरण्यांत येईल तो मागाहून लिहून पाठवूं. दिवस बहुत गुदरले. यावर लांबणीवर न पडावें म्हणोन विस्तारपूर्वक लिहिलें. ऐसियासी.

आजपर्यंत तुमचीं पत्रें तिकडील स्थलशुद्धी, चांगली मेजवानी व नजरेचे बोलणें दिसण्यांत आलें तसें लिहित गेलों. दरम्यान मेजवानीचा आंखही लिहिला. एकवेळ वास्तविक कळून निश्चयात आणावें अशी प्रतीक्षा होती, ती रा. खंडो रामाजी येऊन

पावल्यावर तेथील साधकबाधक, कोणते सारें मनांत आणोन तुम्हास कच्चा इतल्ला व्हावा याकरितां पांच कलमांची याद ठरवून पाठविली. ज्या कलमाचे अंदेश तुमचे मनात ५ पांचवें कलमांचा पर्याय प्रशस्त सुचवून भाव लिहिलें. ते येथेंही दृढतर आहेत. पांचाशिवाय जास्त एकाचा मेळ लिहिला त्यास या समयांत आपल्याकडून होईल तितकें गोड, परंतु लोभ करून बाहेर थोड्यांचें फार दाखवून सनातन विचार, भाजीचा देठही गोडच केला आहे. ती. कै. वडिलांनीं श्रमसाहस करून एक सरकार कृपेचा अर्थ संपादिला. सर्व भिस्त महालांवर. ते फौजेचे खर्चांत आगाऊच गुंतले आहेत. घरची ओढतोड, बाहेर लिहून फलादेश काय ? तथापि आपले राजधानीस सक्तासक्त कोणतें लाभेल व वास्तविक तें सुचविलेंही पाहिजे. कमबेश जेथवर कसर न होता लागेल तितकी लागून येत आहे म्हणोन पेशजी तुम्हांस लिहिलें. दरम्यान एक मास पलटणाचा खिस्सा पुरवला. यामुळें सवड न पडली. सांप्रत ती सिद्धता होऊनच आहे. नजरेचें बोलणें पेशजी लिहिणेंत आलेंच आहे. त्याअन्वयें कारभाऱ्यांचा अनुसंग होऊन त्याचे व्यवस्थेची याद तुमची सत्वर यावी. त्या यादीची प्रतीक्षा आहे. दौलतीचें अंगीकरण सर्वोपरी कारभाऱ्याकडे. कै. नाना फडणिसांनीं ओघ चालविला त्यांचे जागीं राजश्री भाऊ तेही मनःपूर्वक लोभ करितांत. ती. बाबासाहेब विद्यमान होते. हल्लीं असा प्रकार झालेमुळें नजरेचे पाऊल जास्ती पडतें. त्यांची आज्ञा बोलणें विहितच. वडील वर्तमान असतां विनंतीचे कारण नाहीं. आतां वडील व धनी दोन्ही अधिकार श्रीमंतांकडे. तेव्हां अभिमानपूर्वक साहेब चाकरी घडवून स्वामींकडे आहे. इकडील पुढें चाकरी राखून नजरेचा जाब पेशजीचे लेखाप्रमाणें मान्य व्हावा. हे पर्याय येथून लिहून तुम्ही बोलाल ऐसें नाहीं. कूर्मदृष्टीचे पाहण्यांत सर्व श्रीमंत व कारभारी यांचे मनांत वागत आहे. तुम्ही प्रसंगोचित बोलून ज्यात सरकार संतोष आहे, आपल्यावर ओझें विशेष न पडे, बोलण्यांत येऊन करार ठरेल त्याची निभावणी इकडून अक्लेश व्हावी. आपले बोलणें करण्याची पत वाढावी व प्रमाणतेची कामे सेवकधर्मास दर पै आहेतच. सांप्रत आपले मतलबाकरितां लपेट्यानें करणें चांगले नाहीं. वडिलांमागे आपली पत, उम्मेद व तेथील लोभ, दिवसेंदिवस वृद्धिंगत व्हावा. यास्तव सविस्तरें कारभारियास सुचवून त्यांचे माथा ओझें आहेच. नजरेची याद सदरीं लिहिल्याप्रमाणें ठरून त्याजला सहासात सालाचे हप्ते लागावे त्याप्रमाणें भरण्यास इकडून एखादा महाल हप्त्याचे जमेजोगतां पाहून तेथील कमाविसदाराकडून पेस्तर सालापासून सालाचे साल ठरावाप्रमाणें ऐवज बिनदिक्कत पावता होईल याकरितां यावर दिवसगत न लावितां राजश्री भाऊशीं लगट बोलोन याद फार जलद तयार करून लौकर पाठवावी. याद येऊन पावल्यावर येथून लिहिल्याप्रमाणें महालाचा ऐवज मामलेदाराकडून द्यावयास येईल. कळावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 121 21-12-1811 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Khando Mahadeo and Sakharam Jagajiwan to settle as early as possible, the amount of Nazar to be made to the Peshwa.

---

**अ. नं. १२२** **श्री**

सन १२२१ फसली, इसवी सन १८११-१२

सुभा राजश्री मल्हारराव होळकर आवर्जा इजाफतजमा :

१ नबाब मीरखान आमिरुदौले माहे मोहरम माघ मास.

२०००० छ १ ता।। छ ५ मशारनिल्हेकडे सरकारांत पुणें प्रकरणी : तीन लक्ष रु. खर्चास घेणे ठरलें त्यापैकीं नबाब गफूरखां पावती पावती राजे जालमसिंगजीचे नांवें चांदवडी शिक्का. म्हणोन गफूरखांचें नांवें. दादो भगवंत निसबत गफूरखां.

१ संस्थान डोंगरपूर विद्यमान राव जसवंतसिंग.

५०००० माहे जिल्हेज पौषमास : जगन्नाथ राजाराम यांस फौज पलटणसमवेत रवाना केलें - यांजकडेस खर्चाकरितां पन्नास हजार तुम्हाकडून देविले :

१ संस्थान बांसवाडा विद्यमान कुंवर उमेदसिंग.

५०००० माहे जिल्हेज पौषमास : जगन्नाथ राजाराम यांस फौज पलटणसह रवाना केलें - सबब खर्चास :

१ संस्थान देवळे प्रतापगड विद्यमान रावत सामतसिंग :

चैत्रमास छ ११ सरकारांत हलकारियांच्या छड्या पाहिजेत यास्तव मुजरद जोडी पाठविली आहे तरी हलकारियांच्या छड्या सुमारी ३०० चांगल्या बासाच्या खरेदी करून रंगवून तयार करून स्वारीत पावत्या करणें. काळूराम हलकारे -

१ संस्थान नरसिंगगडपाटण विद्यमान दिवाण सोभागसिंग.

३१००० माहे जिल्हेज पौषमास छ ६ ताा छ १० बापू विष्णु यांजकडे पलटणाचे तनखेऐवजी रु.३०००० तुम्हाकडून देविले असे. तरी ऐवज जमा करून बापूचे नांवें लिहिणें. खंडो त्रिंबक यांजला कामगिरीमुळें नबाब मीरखां यांजकडे पाठविलें होते तेथें खर्चास पावले नाहीं. सबब मशारनिल्हेचे ऐवजी मोहगम खर्चास एक हजार रुपये तुम्हांकडून देविले असे तरी सदरहू संस्थान मजकुरीं महाल चलणी देऊन कबज घेणें. म्हणोन :

**हुजूर फडणीसी रेकार्ड सरकारी**

**सरकारी रेकॉर्ड**

No. 122 1811-12 A.D.

Account-sheet showing monetary transactions with (a) Nawab Mirkhan, (b) Sansthan Dongarpur. (c) Sansthan Baswada, (d) Sansthan Deole Pratapgad, and (e) Sansthan Narsinggad Patan.

---

**अ. नं. १२३** **श्री**

ता. १५ जानेवारी, इसवी सन १८१२

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

महाराज मल्हारराव होलकर यांजकडून वर्तमानभावी कमाविसदार सरकार बिजागड यांस.

शके १७१३ रेवा उत्तरतीरीं चित्रभानु नामसंवत्सरे कार्तिक शुद्ध ११ रविवारीं तीर्थरूप बाबासाहेब कैलासवासी झाले त्यांचे परत्र साधनास ग्रामदानाचा संकल्प जाहला तो वेदमूर्ती राजश्री बापूभट बिन कोंडभट अग्निहोत्री गोत्र पाराशर सूत्र कात्यायन शाखा वाजसनीय वास्तव्य कसबे जाफराबाद पूर्णातीर हे ब्राह्मण सत्पात्र स्नानसंध्याशील कुटुंबवत्छल जाणोन यांजला मौजे टेमला परगणे खरगोन सरकार मजकुर हा गांव खेरीज परअंमल व हक्कदार व इनामदार, जकात, उभामार्ग करून बाकी सरकार अमंल, दरोबस्त जल, तरु, तृण, काष्टपाषाण निधी निक्षेप, सहित द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी लेखनाअन्वयें साल मजकुरपासोन भटजी यांचे दुमाला करून हे व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें गांवचा भोगवटा बिनदिक्कत निर्वेधपणें चालवीत जाऊन प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न घेतां सनदेची नक्कल लिहून घेऊन हे अस्सल सनद भोगवटियास भटजी यांजला परतोन देणें जाणिजे छ २९ जिल्हेज बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 123 15-1-1812 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the present and future Kamavisdars, Sarkar Bijagad that the village Tembla (Pargana Khargone) is granted in charity hereditarily to Vedmurti Bapubhatta Agnihotree for the soul of salvation of the late Maharaja Yeshwantrao Holkar.

---

**अ. नं. १२४** **श्री**

ता. २७ जानेवारी, इसवी सन १८१२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून मोघाजी संक्राजी बारगळ यांस विशेष. अनवरखां जमीदार परगणे नारायणगड व मल्हारगड येथील त्याजकडे हरदु महालची दोन गांवे इनामी चालत आली आहेत. सरकारांतून जमीदारापासून चार रुपये घेण्यांत आले असतां परगणे नारायणगडचा गांव तुम्ही जप्त केला म्हणून सरकारांत विदित झाले. त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी अनवरखां जमीदारापासून चार रुपये एकवेळ घेणेंत आले त्यावर तुम्ही गांवची जप्ती केली ही चाल कोठील ? इतःपर जमीदार याचे गांवास एकरूप उपद्रव न देतां गांवची जप्ती उठवून गांव जमीदाराचे स्वाधीन करून देणें येविषयींचा पुनः बोभाट न येतां जमीदारास तोषीस न लावितां पत्र पाहतांच जप्तीची माणसें उठवून घेणें. पुन्हा लिहिणें न पडे ते करणें. रवाना छ१२ मोहरम इसने अशर मयातेनवआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 124 27-1-1812 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Moghajee Sankarajee Bargal to remove the consfiscation of the village Narayangad, and hand it over to the Jamidar without delay.

---

**अ. नं. १२५** **श्री**

ता. १५ फेब्रुवारी, इसवी सन १८१२

लाडाबाई व तुळसाबाई होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष. अलीकडे तुमचीं पत्रें वरचेवर न येतां मास पक्षात तेही संकलित, त्यावरून उदासीचे भाव दिसोन येतात. याचें कारण काय ? सरकार परलोक पावले त्यांचे मागें सर्व प्रकारें हिम्मत देणें दूरंदेशीनें पोक्त सलाह सांगून वडीलपणें न्यूनाधिक पाहणें, समयोचित सलाह सुचविणें येविषयीं भरोसा तुमचा. तुमचें येणें स्वारीत होऊन सर्वांस दिलासा देऊन दौलतीचा लौकिक चिरंजीवाचे हाते वृद्धिंगत नेणें हे उचित असोन येण्याचा आळस केला. सरकार वियोगामुळें उदासी किंवा अन्यत्र, अंदेशा मनांत. याचें वास्तविक कारण कळत नाहीं. दौलतीचें सर्वपरी छत्र गेलें या खेदास पारावार नाहीं. तुम्ही त्यांचे लोभांतील तेव्हां उदासीचेही आश्चर्य नाहीं. परंतु दौलतीचे ओघास तुम्हासारख्यानीं आलग असावें हे अप्रशस्त. यावर मनांत कोणतीही कल्पना न आणितां तेथील कामकाजाचा बंदोबस्त

करून एकवेळ स्वारींत जरुर यावयाचे करावें. यावेळीं खिन्न रहावे असा समय नाहीं. तरी काडीमात्र संशय न आणितां पत्रदर्शनीं स्वार होऊन पोहचणें. प्रगणे ब्राह्मणगांव, बागदरा, चेनपुर येथील सनदापत्रें पाठविली आहेत. मशारनिल्हे सुचवितील हे वास्तविक जाणोन सरकार मार्गे सुचविणें. यास्तव शपथपूर्वक, सहस्त्र अंदेशे, उदासी, एकीकडे ठेऊन आगोदर येण्याचे बेत जरुरीने करून, प्रशस्त अंतःकरणें जलद येऊन पोहचणें. र.छ.सफर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 125 15-2-1812 A.D.

Ladabai and Tulsabai request Bharmal Holkar to see them in camp without delay and without any apprehensions.

They all look up to him for guidance and counsel under the present circumstances of the State and the House.

---

**अ. नं. १२६** **श्री**

ता.६ एप्रिल, इसवी सन १८१२

श्रीमंत भीमाबाई बुळे यांचे ती. भारमलदादास पत्रः चैत्र वद्य ९ पर्यंत यथास्थित असो विशेष : आपले पत्र पावून मजकुर मनन केला. शिखानष्ट तिकडे आले ते पुन्हा इकडे येणार असें ऐकतो (अमीरखां) येविषयींचे तथ्य लिहावें म्हणून लिहिलें त्यास शिखानष्ट त्याजपासून रुकसत होऊन आले हे तिकडे येत नाहींत. बापू रघुनाथ यानें इकडे दंगा केला. कनवाडा घेऊन गोवर्धन गढींतील चीजवस्त लाखो रुपयांची नुकसानी केली. याचा बदला जाहला पाहिजे. सबब कांहीं सरंजाम आम्ही ठेविला. प्रसंगी हेही आले याजला अटकावून ठेऊन घेतले. तिकडे येणार नाहींत दुसरें, चिखलदे महालचा बंदोबस्त होणें. कोणी सालस कर्ता असल्यास जागेचें रूप आहे. आम्हांस तर स्वारीस गेलें पाहिजे. महालचा बंदोबस्त आपणाविना होणार नाहीं. ये अर्थी पेशजी लिहिलें होते व हल्लींही लिहिलें आहे. त्यास आपले खातरजमेचा ग्रहस्थ कोणी लवकर पाठवून द्यावा म्हणजे महालची सोप त्यांजकडे सोपवून देऊं. याजकरितां खोळंबून मार्ग पाहत आहोत. पत्र पावतांच विलंब न करितां लवकर कोणास तरी पाठवून द्यावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 126 6-4-1812 A.D.

Shrimant Bhimabai Bulye to Bharmal Holkar : She intends to go out

on war, and desires therefore, Bharmal to depute some faithful person to manage the Pargana during her absence.

---

अ. नं. १२७ श्री

ता. १६ जुलाई, इसवी सन १८१२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून कुंवर शिवलाल कमाविसदार गरोठ यांस विशेष. तालुके मजकुर येथील मामलत सरकारांतून साल मजकुरीं तुम्हाकडे मखत्यानें आहे तरी तालुके मजकुर येथील गांव तीर्थरूप कैलासवासी बाबासाहेब (यशवंतराव) होळकर यांचे छत्रीचे खर्चाकरितां खासगीकडे मौजे साठखेडा व मौजे शेमळीरुपांची, येकुण दोन गांवे लावून दिलीं आहेत. दोन्ही गांवचा ऐवज मख्त्यांत मुजरा दिला जाईल. जाणिजे छ६ रजब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 127 16-7-1812 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the Kamavisdar Garoth that two of the villages under him are assigned to the Khasgi for the expenses of the Chhatri of the late Maharaja Yeshwantrao.

---

अ. नं. १२८ **श्री म्हाळसाकांत**

(शिक्का) ता. २० जानेवारी, इसवी सन १८१३

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी व जहागिरदार व जमीदार व गिरासे, भोमे पलटनवाले, पागे, पतके, शिलेदार, वगैरे हिंदू मुसलमान परगणे सावेर यांसी मल्हारराव होळकर सु. सलासअशरीन मयातेनवअलफ, शके १७३४ गुरुभक्त भागचंद गुरु श्रीचंद जती उपासरा कसबे सावेर यांनी सरकारांत स्वारींत हुजूर विदित केलें कीं आमचे परंपरा गुरू अमीचंद व मुलुकचंद जती यांस मौजे कायथखेडी परगणे मजकुर हा गांव श्रीमंत कैलासवासी थोरले सुभेदारसाहेबांनीं सूर्य पर्वासमयीं सनद करून दिली, त्याप्रमाणें वहिवाट चालत आहे परंतु गांवास उपद्रव मनस्वी लागतो, येविषयीं ताकीद होऊन बचाव झाला पाहिजे म्हणोन त्यावरून जतीथोर, ती. कै. थोरले सुभेदार यांनीं गांव दिला, त्याप्रमाणें जती यांजकडे गांव चालविण्याचे ठरोन, गांवास उपद्रव न लागांवा म्हणोन फारसी, रांगडी, दक्षिणी सनदा अलाहिदा लिहून देऊन हें पत्र सादर केलें आहे. तरी तुम्ही जती याजकडील गांवास इतःपर

एक पैशाचा उपद्रव न देतां, फडफर्मास कांहीं घेऊं नये. उपसर्ग दिल्यास परिछिन्न कामीं पडणार नाहीं. जती यांचे गांवाचा बचाव शिष्यशाखा परंपरा करीत जाऊन पुनः येविषयीं सरकारांत बोभाट न ये तें करणे. जाणिजे मोहरम छ. २३. मोर्तबसुद.

**जतीयांचे दप्तर**

No. 128 20-1-1813 A.D.

Maharajo Malharrao Holkar orders Kamavisdars and all the residents etc. of Pargana Sawer Mauza Kayathakhedi of the said Pargana should no way be disturbed in as much as it was granted in charity to Amichand Jati and Mulukchand Jati by the late Subhedar Malharrao Holkar I. The present occupant of the Gadi Bhagchand Jati is granted Sanads now in Farsi, Rangadi and Daxini languages.

---

**अ. नं. १२९** **श्री**

ता. ३ मे, इसवी सन १८१३

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून बाळकृष्ण वासुदेव यांस विशेष : सरकारांत ओढीचा प्रकार यास्तव कोटे मुक्कामीं राजश्री राजे जालमसिंगजी तेथें असतां राजश्री बाळाराम आगरवाल व विठ्ठल महादेव यांची रवानगी स्वारींतून जाहली व राजश्री नबाब गफूरखां व माधवराव गोविंद तेथेंच होते. महालसंबंधीं चार रुपये उभयतांकडील देणें, त्याचा पर्याय निघोन पुढें आणखी चार रुपये घ्यावे येविषयीं आज्ञाअन्वयें कारभारी यांनीं बोलणें केलें. त्यात कोणताही व्यत्यय न आढळतां राजे जालमसिंगजी यांचे म्हणणे दोहीकडील (शिंदे होळकर) जाबसाल एकविचारें घडेल. त्याखात्रीवर हल्लीं नबाब गफूरखां व विठ्ठल महादेव जोग यांची रवानगी जाहली. राजश्री माधवराव गोविंद तेथें होते. गरोठच्या ऐवजाबद्दल साल मजकुरीं महालचा ऐवज येणें तो लावून देण्यांत येईल. पण पूर्वसंकेताप्रमाणें आणखी चार रुपयेचें काम करावे. याप्रमाणें त्रिवर्गाचें बोलणे पडलें असतां कोटे मुक्कामचा जाब कोणताही न राहतां वोढीचा प्रकार बोलण्यांत आला. ऐसियासी सरकार चाकरीविषयीं तुमचें लक्ष याचे निदर्शन घडत आलें, तोच क्रम चालून दिवसेंदिवस प्रत्यय यावा, हे मनोगत असोन ओढीचे जाब करण्यांस तुम्हास काय प्रशस्त वाटलें असेल न कळे. विचार केला तो समजून करून तुटला जाब जाहला असें दिसतें. असो. सालमजकुरीं महालचा ऐवज येणें यात गरोठ व नेमणुकीखर्च वगैरे जाईल. राहता मागील हिशेब होऊन बाकी देणें निघाली आहे. त्यास पुढें निखालस तुम्हास महाल करणें नाहीं हे खचित दिसण्यांत आलें. तेव्हां सरकारांतून महालचा बंदोबस्त होऊन दोन महिन्यांत मागील देण्यात वजा

जाऊन बाकी तुम्हाकडील देणें निघेल त्याची शक्कल काढून ज्यांत तुमचे ऐवजाची निर्गती सत्वर घडेल तेच सरकारांतून घडण्यांत येईल. रवाना छ २ जमादिलावल. सलासआशरमयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 129 3-5-1813 A.D.

Maharaja Malharrao Holkar expresses his disappointment to Balkrishna Vasudeo in monetary matters. The latter is informed that within two months all accounts will be squared and he will be relieved of the Mahal work for the future.

---

**अ. नं. १३०** **श्री**

ता. २० सप्टेंबर, इसवी सन १८१३

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून गोविंदराव बुळे यांस विशेष. संस्थान नरसिंगगड येथील सरकार मामल्याची वहिवाट सरकारांतून तुम्हांकडे सांगांवयाचा करार करून हे सनद लिहिली असे. तरी तुम्ही संस्थान मजकुरचे मामल्याचे कामाची वहिवाट पेशजीप्रमाणें करीत जाऊन सरंजामानिशीं सरकारचाकरी करीत जाणें. रवाना छ २४

रमजान, अर्बाअशर.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 130 20-09-1813 A.D.

Maharaja Malharrao Holkar grants a Sanad for the management of Sansthan Narsinggad to Govindrao Bulye.

---

**अ. नं. १३१** **श्री**

ता. १६ जून, इसवी सन १८१४

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून माखनलाल जोशी कमाविसदार प्रगणे इंदूर यांस विशेष. बापूजी आनंदराव निसबत शागर्दपेशा यांजकडे मौजे पिंपलिया व सुकल्या हरदु गांवची जमीन चालत आलीं. हल्लीं तुम्हाकडील अडथळा पडतो म्हणोन पंत

मशारनिल्हेंनीं इंदूर मुक्कामीं विदित केलें. ऐसियासी यांजपाशीं कैलासवासी मातुश्री बाईसाहेबांच्या सनदा आहेत त्याअन्वयें वहिवाट चालत आली त्याप्रमाणें चालवून पुढें दिक्कत न पडे व पुन्हा बोभाट न ये ते करावे जाणिजे. छ २७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 131 16-6-1814 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the Kamavisdar Pargana Indore that Bapujee Anandrao should be allowed to continue his possession of land in Piplia and Suklya as he holds the sanads thereof from the times of Devi Ahilyabai.

---

**अ. नं. १३२** **श्री**

ता. १८ नोव्हेंबर, इसवी सन १८१४

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून रा. गोविंदराव बुळे यांस विशेष :तीर्थस्वरूप सौभाग्यवती बाळाबाई प्रसूत होऊन पुत्र जाहला सबब सरकारांतून सालमजकुरीं ऐनजमेवर दरसदे रुपये ३ तीनप्रमाणें आहेर पट्टीबद्दल ऐवज घ्यावयाचा तो राजश्री रावजी गोविंद निसबत खासगी यांचे तसलमातीस आजमासें येणेंप्रमाणें बाा यादी रु.२००० प्रगणे चिखलदे. २००० संस्थान झाबवे. २००० संस्थान नरसिंगगड पाटण येकुण सहा हजार ६००० रुपये तुम्हांकडून देविले असे तरी तुम्ही सदरहू रुपये महालचलणीं मशारनिल्हेकडे देऊन कबज घेणें. रवाना छ ५ जिल्हेज खमसअशर मयातेनवअलफ बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद :

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 132 18-11-1814 A.D.

Maharaja Malharrao Holkar to Govindrao Bulye. You are to pay Rs. 6.000/- as Aher in honour of the son born to Saubhagyawati Balabai. Details of individual Parganas are mentioned.

---

**अ. नं. १३३** **श्री**

ता. १-३-१८१५

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून रा.कृष्णराव माधव भुसकुटे सरमंडलोई, सरकार बिजागड यांस विशेष. रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांचा काळ जाहला, स्त्रीनें सहगमन केलें. त्यांचे पोटी पुत्र संतान नाहीं. भुसकुटे सरकार पदरचे. वृत्तीचा वगैरे अधिकार त्यांच्या त्यांजकडे चालविणें हें आवश्यक जाणोन मशारनिल्हेचे ज्येष्ठ बंधु माधवराव कृष्ण यांची स्त्री गंगाजळनिर्मल राधाबाई यांचे मांडीवर तुम्हास देऊन दत्तविधान करून स्थापिले. त्याप्रमाणें भुसकुटे यांचे वतनाचा वगैरे अधिकार तुम्हाकडे चालावा याजकरितां हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी तुम्ही सरकार मजकुर येथील सरमंडलोईपणाचे वतनाचा व त्या संबंधीं नानकार व इनामीबाग, शेतमळे व जिरायत व घर हवेल्या यांची वहिवाट पूर्वीपासून श्रीमंत पंतप्रधान स्वामींच्या सनदा पूर्वीच्या व इकडून ही करून दिल्या त्याजअन्वयें सुदामत भोगवटा चालत आला असेल त्याप्रमाणें तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि अनुभव घेत जाऊन सरकारचाकरी करीत आला त्याप्रमाणें करीत जाणें जाणिजे छ१ रविलावल, बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**जहागीर रेकॉर्ड**

No. 133 1-3-1815 A.D.

Maharaja Malharro Holkar grants a Sanad to Krishnarao Madhava Bhuskute Sarmandloi of Sarkar Bigyagarh - who was adopted by the widow of Madhavrao Krishna Bhuskute. The Sanad confirms the grant of the Peshwas and that of the Holkars already granted to that house.

---

**अ. नं. १३४** **श्री**

ता. ३० एप्रिल, इसवी सन १८१५

तुळसाबाई होळकर यांजकडून केशवराव राम यांस विशेष - आपले येथे चिरंजीव राजश्री मल्हाररावबाबा यांचे लग्नाचा निश्चय वैशाख कृष्ण २ द्वितीया गुरुवारीं होऊन शरीरसंबंध राजश्री त्रिंबकराव देशगांवडे बीडकर यांची कन्या वधु नेमस्त केली आहे. तरी तुम्हीं सहपरिवारें येऊन मंडप शोभिवंत करणें र. छ १९ जमादिलावल खमस आशर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सं.पळसी रेकॉर्ड**

No. 134 30-4-1815 A.D.

Tulsabai Holkar sends an invitation-letter to Keshaorao Ram of the marriage of Maharaja Malharrao with the daughter of Trimbakrao Deshgawade Bidkar, to be celebrated on the second day of the latter half of Vaishakha.

---

**अ. नं. १३५** **श्री**

ता. २५ नोव्हेंबर, इसवी सन १८१५

मैनाबाई होळकर यांजकडून ति. हरीबादादांस विशेष : पेशजी समक्ष राजकारभारासंबंधीं बोलणीं जाहली होती. तेव्हां आपण रुकार भरला कीं, सावकार एखादा उभा करूं. त्याजवरून हल्लीं लिहिलें आहे तरी आपण व वेदमूर्ती राजश्री जोशीबाबा व चि. रामदीन दिक्षित एकविचारें होऊन तीनचार सावकार पेट्यांत घेऊन दोन तीन लक्षांचा मेळ लावून लिहिण्यांत यावें. हा ऐवज सरकारांत लागला जाईल. परंतु या कामांत आळस करूं नये. सरकारांत ओढ किती आहे हे पत्रीं लिहितां येत नाहीं. सरकारांनीं रुबरु सांगितलें तेपक्षीं ना म्हणतां येत नाहीं. तरी त्रिवर्ग एकविचारें होऊन दिवसगत न लावितां सत्वर मेळ लावून येतें करावें. वरकड कांहीं एक आंदेशा न आणितां सरकारांनीं शब्द टाकिला त्यास आपण नकार करणार नाहीं. त्यास कैसेंही करून निदान दोचा तरी मेळ लावून पाठविणें. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ती.

**सरकारी रेकार्ड**

No. 135 25-11-1815 A.D.

Mainabai Holkar presses the urgency of procuring money for the Sarkar, on the mind of Hariba Dada.

---

**अ. नं. १३६** **श्री**

ता. १३ डिसेंबर, इसवी सन १८१५

तुळसाबाई होळकर यांजकडून कृष्णभक्त हरीबाबा आकुलनेरकर यांस विशेष. लष्करांत लोकांचा बखेडा, त्यात आळा बंधन राहिले नाहीं. याजमुळें माणूसमात्र काबूंत

न राहतां आपले जागा विचार करून सर्वत्रांचे गंगाकुराण होऊन दंगा करण्याचा प्रयत्न. याप्रसंगास अनुसरून सरकारांत फौजेचे आगत्य व सरदारींत ओढताण आहे. तेव्हां ज्याचे त्यापरी राखून खर्चाचीही सरबरा होत गेली. तथापि लोकांची निकड विशेष जाणून प्राणांत संकट पाहून सडेस्वारीनें ठाणें गंगराडें येथें येणें जाहलें हें वर्तमान परस्परें तुम्हास कळेल. रुपयाचे जागा दोन देऊन पुरे पडावयाचे नाहीं असें पाहून असा विचार करणें प्राप्त झालें. इतःपर या संकटाचें परिमार्जन होऊन सरकारनक्ष दाब राहिला पाहिजे यास्तव हें पत्र सादर केलें असे तरी पत्र पावताच सरकारखात्रीअन्वयें तसा यत्न करून एक दिवसाची ढील न करितां लाख दीडलाख पावेतों ऐवजाची सरबरा करून हुजूर यावयाचें करणें. समय संकटास कोठूनही काम होऊन येणें सर्व तुमचे ध्यानांत व तुमचाही विचार सरकारचे लक्षांत. परंतु या समयास बाहेर लिहिणें बोलणें यांस ठिकाणच नाहीं. याचें पुरतें मनन करून सदरीं लिहिल्याअन्वयें बेत करून फार लौकर येऊन पोहचणें. याशिवाय एकदोन सावकार चांगले पतीचे तुमचे खातरीचे असतील त्यांस बोलून बरोबर घेऊन येणें. ते व तुम्ही आलियावर तुमचें विचारें सावकाराकडे महालचा वगैरे ऐवज लावून देऊन त्यांसी व्यवहार करण्यांत येईल. सरकारांतून केल्या व्यवहाराची निभावणी करण्यांत येईल. या अन्वयें त्यांसी बोलून घेऊन येणें. चिरंजीव बाबासाहेब लेकरूं. आम्ही केलें पाहिलें नाहीं. प्राप्त प्रसंगीं तुमचा भरंवसा. त्याप्रमाणें निदर्शनास घडून पत्रोत्तर पर्याये न येतां लिहिल्या घाटाअन्वयें ऐवजाची सजल पाडून एक क्षणाचा विलंब न करितां येऊन पोहचावें. जाणिजे छ ११ मोहरम बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 136 13-12-1815 A.D.

Tulsabai Holkar requests Hari Baba Akulnerkar to secure, anyhow, a sum of Rupees two lacs or so to satisfy the pressure of the army. The times are hard, and he must find out a way.

---

**अ. नं. १३७** **श्री**

इ.स.१८१६

रोजकीर्द श्रीमंत मल्हारराव होळकर टाक्याबद्दल.

७२७०० संस्थान देवळे प्रतापगड येथील सरकार टाक्याचा ऐवज सदरीं लिहिल्या सालीं घेणें. अलीकडे फौजेचा उपद्रव बहुत, आफतसुलतानी, वगैरे याजमुळें मुलूख पायमलीत आला. सालाबाद ऐवजाची सरबरा होय. यासंबंधांत सरकारांतून फसली सन १२२६ चे सालापासून संस्थानिकांचे विचारें येणेंप्रमाणें,

| आकार | संमत | फसली सन | ऐन | तहकूब | बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ५०००० | १८७३, | १२२६ | ७२७०० | २२७०० | ५०००० |
| ५५७०० | १८७४, | १२२७ | ७२७०० | १७००० | ५५७०० |
| ५७७०० | १८७५, | १२२८ | ७२७०० | १५००० | ५७७०० |
| ५९७०० | १८७६, | १२२९ | ७२७०० | १३००० | ५९७०० |
| ६०४०० | १८७७, | १२३० | ७२७०० | १२३०० | ६०४०० |
| --------- | ------ | ------ | ------ | ------ | ------ |
| २८३५०० | | | ३६३५०० | ८०००० | २८३५०० |

या शिवाय वहिवाट कलमें. बाजारचुंगी, सूरजपोळ दरवाजावर हुकूम सरकारचा. किल्ल्या सरकारांत राहतात.

२०७०० संस्थान सोपूर येथील सरकारी वहिवाट संमत १८६० (सन १८०३) विद्यमान भवानराव पांडुरंग. सदरहू वहिवाटींत संस्थानिकानीं गांवदेह ११ लावून दिले. त्यांची लावणी सरकारांत करावी. ऐवजाचा आंख राजानीं बांधून द्यावा. त्याप्रमाणें वसूल घेणें. बाकी राहिली तर देवाळ संस्थानिक अलीकडे दंगा झाला व जानबत्तीस यांचा अंमल झाल्यापासून वसूल न आला.

७५००० संस्थान झाबवे येथील तीन हिस्से अंमल सरकारचा व एक हिस्सा राजाकडील जाऊन सरकारी अंमल परभारे बुळे यांजकडे. १५००० खालसेगांवचा अंमल. ३५००० उमराव, कोठड्यांचा टाका सुदामतप्रमाणें. २५००० जकात सायर पैकीं एक हिस्सा जाऊन बाकी सरकार अंमल येकुण रु.पंचाहत्तर हजार ७५००० शिवाय आपले अंमलापैकीं गांवे राजानी दाबली, ती सुटणे, सिंवगड व रंभापूर कुंवर प्रतापसिंगाकडे. काळिया पिटोल वगैरे दोन गांवें राजाचा दिवाण कोठारी यांजकडे ती घेणें आहे. ह्या परगण्याची हद्द रतलामपासोन दाहोदपावेतों लांबी कोस २५ पंचवीस.

८५००० संस्थान नरसिंगगड येथील ठराव कैलासवासी महाराजांचे वेळीं ठरला. अलीकडे नदी अलीकडे खुजनेर येथें सरकारचें ठाणें राहून त्याखाली गांवें २४० पहिले पाटणांत सरकारी हवेली तेथें कमाविसदार राहत असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 137 1816 A.D.

Account-sheet exhibiting the Tanka due from (1) Deole-Pratapgad, (2) Sopur, (3) Zabwa, and (4) Narsinggad.

The sheet incidentally mentions villages lost or misplaced due to mismanagement or negligence.

## अ. नं. १३८ श्री

ता. १७ जून, इसवी सन १८१६

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून रावजी गोविंद कमाविसदार नि.दिवाण खासगी. विशेष : कैलासवासी तीर्थस्वरूप मातोश्री बाईसाहेब (अहिल्याबाई) यांचे छत्रीचें व घाटाचें काम बंद आहे. तेथील टांकी चालू झाली पाहिजे सबब कारखान्याचे खर्चाकरितां प्रगणे मर्दानापैकीं गांव मौजे तेलिये भटयान, मौजे पिंपलधुन हे दोन गांव कारखान्याच्या खर्चाकरितां साल मजकुरापासोन राजश्री भारमल होळकर यांजकडे लावून द्यावयाचा करार करून हे पत्र तुम्हांस लिहिलें असे. तरी तुम्ही मौजे तेलियाभटयान व पिंपळधुन प्रगणे मर्दाना सरकार बिजागड हे दोन्हीं गांव कैलासवासी मातोश्री बाईसाहेब यांजकडील छत्री व घाटाचे कारखान्याचे खर्चाकरितां मशारनिल्हे यांचे दुमाला करून देऊन साल मजकुरापासोन दरसाल वहिवाट चालविणें रवाना छ २१ साबान सबाअशर मयातेनअलफ बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 138 17-6-1816 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Raojee Govind clerk of the Khasgi that two Villages of Pargana Mardana are assigned for the expenses of the Chhatri and Ghat of the late revered Devi Ahilyabai. Bharmal Holkar is entrusted with the work.

---

## अ. नं. १३९ श्री

ता. १६ आक्टोबर, इसवी सन १८१६

श्रीमंत भीमाबाई बुळे यांजकडून भारमलदादा होळकर यांस विशेष शिबंदीचे देण्याचा पेच, याजकरितां संस्थान संबंधें तुम्हाकडून कांहीं तोड होऊन आली पाहिजे. येविषयीं तुम्हास पूर्वी सुचविले आहेच. त्यावेळेस हयगईच केली. आजपर्यंत आम्हीही धकविले. आतां देण्याचा निकट बहुत, सबब सुचविलें आहे. त्यास सदरहू देण्याचे अडचणीची योजना तुम्हांकडून झालीच पाहिजे तर ठीक आहे. चौघांचे नादी लागून भरीस पडून जाग्याची नुकसानी करवूं नये यांत चांगलें आहे. आम्हीतर लेकरें आहों. आमचे संकट तुम्हीच परिहार करणार. आमचा मानपान, अपमान सर्व कैलासवासी बाबासाहेबच आहे. आज बाबासाहेब असते तर इतकें संकट आम्हास न पडतें. हर कसे करून योजना करून द्यावी. सूज्ञास आम्ही लेकरांनीं अधिक ते काय ल्याहावें. आमचे जिवाभावाचे

संकट ते तुम्हांसही अवघडच आहे, ते पक्षीं एखादा मार्ग काढून समजुती केल्यातच योग्य आहे. हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 139 16-10-1816 A.D.

Srimant Bhimabai Bulye entreats Bharmal Holkar to find out a way out of the present fixture of her Sansthan.

---

**अ. नं. १४०** **श्री**

ता. २६ नोव्हेंबर, इसवी सन १८१६

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष : मौजे बडगोंदा प्रगणे इंदूर येथील गुरे गाई, म्हशी, वगैरे नादरिया भील घेऊन गेला त्यांपैकीं कांहीं म्हशी वोळखून माणसें पाहून आलीं. त्या म्हशी पुन्हा बडगोंद्यास आल्या पाहिजेत व अलीकडे जांबचा घाट बंद पडून+++ तरी जांबचा घाट सुरळीतपणें चालावयाकरितां तिकडून बेपारी यांची खातरी करून त्यांजला जाबत्यानें जांबास पोहचवित जाणें. तेथून माखनलाल जोशी घेऊन जाऊन पुन्हा पोहचवीत जातील. घाटाचे कामास कोणेविशीं दिक्कत न पडतां रस्ता आम खास चालू होय तें करणें. रवाना छ ६ मोहरम सबाअशर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

शिक्का

**सरकारी रेकॉर्ड**

No. 140 26-11-1816 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Bharmal Holkar to check the raids of Nadaria Bhill, and also to see that the Jam-Ghat road is made,and kept safe for travellers and traders.

---

**अ. नं. १४१** **श्री**

ता. ४ डिसेंबर, इसवी सन १८१६

ज्योती नाईक यांजकडून भारमल होळकर यांस विशेष : मुक्काम नजीक गंगराड : आम्हाकडील वर्तमान मार्गशीर्ष शुद्ध १५ बुधवारीं तीन प्रहर रात्रीं पलटण व जिनसीवाल्यांनीं

बेहदा किल्ल्याचे आसपास केला. नंतर गुरुवारीं प्रातःकाळीं आम्हास बातमी येतांच पांच पन्नास बारगीर घेऊन, दरवाजे पळटणवाल्याचे स्वाधीन. तेव्हां कोट कुदून गेलों. चबुतऱ्यापाशीं देवालयाजवळ आल्यावर पलटवाल्याशीं जाब केला कीं, धन्यापाशी जाऊं द्यावें. तेव्हां ते मानीनात. बंदूक चालविली. मग आम्हीही तरवारी काढल्या. देवळापाशीं चबुतऱ्याजवळ पांच सात ठार केलें व बाजारांत रंगरेज यांचे खुंटापाशीं पांचचार मारले. पांचपंचवीस जखमी करून, मग पलटणचे शिपाई पळाले, नाल्याचे बाहेर गेले. मग किल्ल्यावर यजमानापासीं गेलो, किल्ल्याचे दरवाजाखालील चांदणीचे तेथें उजवे हातास जखम अंगोठा व अंगोळी कापल्या गेल्या आहेत, आपले कृपें आराम होईल. यजमानाचे पायापाशीं एकनिष्ठें गेल्यामुळें पार पडलों. बारगीर पांचसहा जखमी झाले. आराम होईल. हमेशा पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. लोभ असावा हे विनंती.

स्नेहांकित बाळाजी बापूजी आशीर्वाद. पत्रावरून मजकुर ध्यानास येईल. वासुदेवपंतांचा तंटा तोडला यामुळें पानसे आर्श झाले. बडवानीचे सालाचे, किती दिवस झाले हें पाहून जें आपण कराल तें मान्य आहे. ऐवज पटला म्हणजे कबजा पाठवून देतों, खतही काढून देऊं. कृपा करून पत्राचे उत्तर पाठविण्याची आज्ञा व्हावी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 141 4-12-1816 A.D.

Jyoti Naik from Gangarad informs Bharmal Holkar of the skirmish that took place between his party and the Paltan. His party at last reached the residence of the Maharaja.

---

**अ. नं. १४२** **श्री**

ता. १५ मार्च, इसवी सन १८१७

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून, माखनलाल जोशी कमाविसदार प्रगणे इंदूर यांस : विशेष : बागलीवाला सालमसिंग याचा करार राजश्री सुभानजी पाटील याचे मारफतीने ठरला कीं, सरकारी फौजेचा उपसर्ग हरदम आम्हास लागतो तो लागूं नये. आम्हीही मवासांचा उपद्रव परगण्यात लागूं देणार नाहीं. असें ठरलें असतां हल्लीं उम्मेदसिंग बडवाहावाला मवासांत सामल राहून परगण्यांत धाडे घालून कसबे कंपेल हा गांव लुटून बरबाद करून गांवची ढोरें, गुरें व घोडीं व नंदवाणा यांच्या बायका घेऊन जाऊन ऐवज मागतात म्हणोन सरकारांत विदित झाले. त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी बागलीवाले यांचे विद्यमानें करार जाहला, असें असतां उमेदसिंग यानें धाड घालून कसबे मजकुरची नुकसानी वगैरे करावयाचें कारण काय? तरी तुम्ही

सालमसिंग याजला ताकीद करून कसबे मजकुर येथील गुरेंढोरें व घोडीं व नंदवाणा याच्या बायका नेल्या आहेत त्या सोडून देणें व पुढें उमेदसिंग आणखी धाडधपट परगण्यांत आणील त्याची बातमी राखून पारिपत्य करून पुनः त्याचा उपसर्ग न लागतां बागलीवाल्यास निक्षून ताकीद करावी कीं, तुझे विद्यमानचा जाब असून धाडे पडून गांवची नुकसानी होती याचा पर्याय कसा ? पुन्हा बोभाट न ये तें करणें. रवाना छ २६ रविलाखल हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड** (शिक्का)

No. 142 15-3-1817 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the Kamavisdar, Indore that Salamsing of Bagle should be requisitioned to state why Umedsing of Barwaha troubled the residents of Kampel. Salamsing ought, in future, to respect the agreement he has entered into.

---

**अ. नं. १४३** **श्री**

ता. ११ जुलाई, इसवी सन १८१७

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून बापूजी रघुनाथ यांस विशेष : तुम्ही सरंजाम सुद्धां सरकार महालांत येऊन, महेश्वरनजीक मुक्काम करून तालुके चोळी येथें जमियत पाठवून गांव दरोबस्त लुटून बरबाद केला व पुढें संस्थानाकडे वगैरे उपसर्ग द्यावयाचा बेत म्हणोन सरकारांत विदीत झालें. ऐसियासी इकडील महालीं उपसर्ग देऊं नये, असे सरकारांतून एकदोन वेळां लिहिण्यांत आलें असतां अद्यापवर सरकार महालचा शह न सुटतां परगण्यांत धूम चाललीच आहे. यातील परिणाम कसा याची योजना झालीच असेल. आजपावेतों इकडील महालीं उपसर्ग तुम्हाकडील लागला त्याची सबुरीच झाली. त्यावर पुन्हा आगळीक होऊं लागली याजकरितां हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी सरकारांतून पेशजी लिहिण्यांत आलें असतां परतोन महालांत उपद्रव देण्याचे कारण काय ? इतक्यावर संस्थाननजीक मुक्काम आहे तेथून महेश्वरीं वगैरे महालीं गांवगन्ना कोठें काडीमात्र उजाड, बिघाड, न होतां चिजवस्तू, गुरेंढोरें, नेली असतील ती माघारीं देऊन, दुसरें मार्गे कूच करून जाणें. येविषयींचा पुन्हा बोभाट आला असता परिच्छिन्न सरकार उपयोगी न पडतां सरंजाम रवाना करण्यांत येईल. हे स्पष्ट समजून फिरोन लिहिणें न पडे तें करणें. जाणिजे. छ २५ साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

(शिक्का)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 143 11-7-1817 A.D.

Maharaja Malharrao Holkar reminds Bapujee Raghunath of former orders issued to him. In spite of those orders he has not ceased his raids in the Pargana. He is again warned.

---

**अ. नं. १४४** **श्री**

ता. ११ जुलाई, इसवी सन १८१७

तुळसाबाई होळकर यांजकडून चि.भीमाबाई बुळे यांस विशेष : तुम्ही सरंजाम सुद्धां नावडा तावडीवर मुक्काम करून राहिला. शिबंदीचें कोंचवणींत आल्यामुळें राजश्री भारमल होळकर यांजला संस्थानीं लिहून त्यांजपाशीं ऐवज मागतां म्हणोन समजण्यांत आले. ऐसियासी तुम्ही सरंजाम घेऊन पवाराचे महालीं गेला, त्यामुळें पवाराकडील बापू रघुनाथ तालुके चोळीकडे येऊन तेथील बरबादी करून सरंजामसुद्धां बारद्वारीसीं मुक्काम करून संस्थानावर रुख दिला. पेशजी एकवेळ येऊन महालाची नुकसानी केली. पुनः आतां तुम्हाकडून त्यांचे पारिपत्य न होतां अधिक उपद्रवाचे मात्र कारण केल्यांत विशेष काय ? इकडून तुमचा उपद्रव व तिकडून त्याचा उपद्रव, दोन्हीकडून संस्थानचे जागेची खराबी. रा. भारमल होळकर संस्थानीं, तेथील मर्यादा राहील यांत कल्याण. ती गोष्ट मनांत न आणितां त्याजला कोंचवण करणें हें चांगलें नाहीं. इतःपर संस्थानीं व सरकार बिजागड वगैरे जागीं काडीमात्र तोशीस लागू न पावतां पत्र पावतांच कूच करून चिखलद्याकडे जों. येविषयीं लिहिणें न पडे तें करावें रवाना. छ २५ साबान बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**महेश्वर दप्तर**

No. 144 11-7- 1817 A.D.

Srimant Bhimabai Bulye is warned by Tulsabai Holkar against the fixture she is putting Bharmal Holkar into. Her activities have made Pawars foes. She is, therefore, ordered to march to Chikhalda without further delay.

---

**अ. नं. १४५** **श्री**

ता. १८ जुलाई, इसवी सन १८१७

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस

विशेष. बाळाजी यादव यांचे कुटुंब गंगाभागीरथी मुक्ताबाई यांनीं बहुत दिवस महेश्वरीं राहून कोतवालीचे काम करून सरकार चाकरी करीत आले दरम्यान कामाची घालमेल जाहली. सबब बाई स्वारींत आली. त्यांजला परभारें तुमचें पत्र खातरजमेचें आलें कीं, तुमचे काम तुम्हांकडे सांगू. कोणताही अंदेशा न घेतां येथें येणें त्यावरून बाईं तुम्हांजवळ आली. असें असतां काम दुसरियाकडे सांगितलें. तेव्हां बाईचा निर्वाह कशानें व्हावा ? तुम्ही त्यांचा अगत्यवाद ठेऊन काम सांगतों म्हणोन बोलावून नेलें. तेंही दुसरियाकडे मक्त्यानें सांगाल त्याप्रमाणे बाईही करावयास राजी. तेव्हां दिक्कत ती कोणती ? तुमचे त्यांचे बोलण्यांत आले असेल त्याप्रमाणें कोतवालीचें काम बाईकडे सांगण्यांत आलें पाहिजे. याजकरितां हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी तुम्ही खातरी करून बाईस बोलावून सोईनें काम त्यांजकडे सांगून हरएक विषयीं उपर ठेऊन निर्वाह चालेल तें करून पुनः लिहिणें न पडे तें करणें, र.छ.३ रमजान सु।। सन समान अशर मयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसुद ः

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 145 18-7- 1817 A.D.

Maharaja Malharrao Holkar asks Bharmal Holkar to contiue the work of Kotwalship at the hands of the widow of Balajee Yadav.

---

**अ. नं. १४६** **श्री**

ता. ३० डिसेंबर, इसवी सन १८१७

बातमीदाराकडून होळकर दरबारांत विशेष. मुक्काम भाऊगड प्रगणे मंदसोर इकडील वर्तमान दोन पत्रीं आपल्यास तपसिले लिहिल्यावरून श्रवणांत आलेच असेल. सारांश, श्रीजींनी शरीरें ठेविली आहेत वरकड त्राण कोणांत नाहीं. कारभारी कैद करून लढाई घेतली. ती बहिरीसी जाहली. यामुळें लष्कर बरबाद जाहलें. शेवटीं लष्करास आधार कोणाचा नाहीं. तेव्हां पुन्हा कारभारीयांची मुक्तता करून वस्त्रें देऊन बहाल केलें. आतां सर्वानुमतें कोणांतही हिम्मत राहिली नाहीं. यामुळें राजश्री तात्या मंदोसरीं जाऊन साहेबासीं मेळ केला. जसें त्यांनीं लिहून घेतलें तसें दिलें. याचा तपशील ही कळेल. उदईक येथे साहेबांस घेऊन येणार. भेटी जाल्यावर जेथें राहण्याचें सांगतील तेथें राहणें प्राप्त. आतां कुचाचे मुक्काम त्यांचे हुकमाखेरीज नाहीं. साहेब दोन पलटणें घेऊन नेहमी राहणार असें जाहलें

आहे. वरकड मागाहून लिहिण्यांत येईल. मोहना रामपुरेकर व बासवेकरांनीं सनाथ केला. सर्वांचेंच आकर्षण जाले. त्यांत मोहनाचे माहात्म्य काय ? असो. श्रीजीची इच्छा ! कळावे बहुत काय लिहिणें. सर्व काळ पत्रोत्तरीं सांभाळ करीत असावा हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 146 30-12-1817 A.D.

Correspondence letter (from Bhowgad in Pargana Mandosar) :

The Karbhari was imprisoned, and war issued. The army was helpless. Tatya has proceeded to Mandosar, and is likely to enter into treaty with the British.

---

**अ. नं. १४७** **श्री**

ता. ६ जानेवारी, इसवी सन १८१८

श्रीमंत महाराज मल्हारराव होळकर यांसी जाहलेला तहनामा : आनरेबल ईस्ट इंडिया कंपनी आणि सरकार महाराज मल्हारराव होळकर व त्यांचे वारीस व पुढें त्यांचे जागीं होणार ते यांमध्ये ठरविला. ब्रिगेडियर जनरल सर जान मालकम पोलिटिकल एजंट, गव्हर्नर जनरल ईस्ट इंडिया कंपनीचे तरफेनें सर जान मालकम हे, लेप्टनेंट जनरल सर टामस हिस्लाप बारोनेट सेनापती मद्रास आणि दक्षिण फौज, त्यांचे आज्ञेवरून संपूर्ण मुखत्यारी मोस्ट नोबल फरासीस मारक्वीस हेस्टींग्ज इंग्रज पाछयाचे मंत्री गव्हर्नर जनरल कौन्सिल कंपनी बहादूर यांनीं नेमलेले सारे हिंदुस्थानचे कारभारावर यांजकडून आणि तात्या जोग पूर्ण मुखत्यार महाराज मल्हारराव होळकर यांजकडून :

१. महाराज मल्हारराव होळकरांचा सल्ला जाहला. कंपनी सरकार कबूल होतात कीं, हरएक राजा व हरएक तुफान लढाई सरकार महाराज मल्हारराव होळकर यांचे मुलखांत करतील त्यासी शिक्षा केल्याविना सोडणार नाहीं. महाराज या कारणावरून कबूल होतात कीं, माझी फौज लावून हरएक दुसरें रीतीनें ज्याप्रमाणें लागेल त्याप्रमाणें सहाय्य होईन आणि इंग्रज सरकार वारंवार तद्वत सहाय होतील. महाराज मल्हारराव होळकरांचे मुलखांत : कलम

२. महाराज मल्हारराव होळकर कबूल होतात कीं, इंग्रज सरकारानीं नबाब मीरखानांसी बंदोबस्त केला आहे तो आम्हांस मान्य आहे. इंग्रज सरकारनें जामीनगिरी, नबाब अमीरखान व त्याचे वारीस यांजवर आमचा दावा बेदावा केला आहे. कलम

३. प्रगणे पंचपाहाड व डीग व गंगराड व आहूर वगैरे जे राजा जालमसिंग कोटेवाले

यांस भाड्यानें दिली आहे ती महाराज मल्हारराव होळकरानें त्या सरदारास आक्षय देऊन आपला संबंध सारा प्रगणें सोडून दिले. कलम

४. मल्हारराव होळकर कबूल होतात कीं, माझें सारें घेणें खंडणीचे आणि सर्वे रीतीचे जमाबंदीचे जे मजकडे आहेत किंवा होते, राजपुतान्यांत ह्या रीतीचे राजे उदेपूर, जयपूर, जोतपूर, कोटे, बुंदी, करोली, वगैरे सारे इंग्रज सरकारांस देतो. कलम

५. रामपुराबसंत, रानीपुरा, बेलिया, भीमसराई, इंद्रगड, बुंदी, लाखेरी, समेदी बनयगांव वगैरे ठिकाण बुंदीचे पहाडाचे उत्तरेस आहेत त्या गांवांवरून मल्हारराव होळकर आपली सत्ता सोडून देतात. कलम

६. सातपुड्याचे पहाडाचे दक्षिण देशास सर्व जी गांवें आहेत व त्यावरील सारी सत्ता सेंधव्याचें किल्ल्याचें सहवर्तमान दोन हजार वासलातसुद्धां आणि खानदेशातील गांव जे आहेत ते आणि दुसरें गांव आंबाड व निजाम व पेशवे यांचे मुलुखांत मिश्रित जाहले आहेत ते इंग्रज सरकारास सोडून देतात. कलम

७. मल्हारराव होळकरांचे मुलखांतील सलामती ठेवण्याकरितां परके दुष्मन दूर ठेवावयाकरितां फौजेची साह्यता करावी. ही फौज अशी सामर्थ्यांची असावी कीं जी योग्य आसेल. जेथें इंग्रज सरकार निश्चय करील कीं जागा बरी आहे तेथें आणि महाराज मल्हारराव होळकर कबूल होतात कीं, कांहीं चांगली जागा बंदोबस्ताची तिचे सरंजाम ठेवावयास द्यावी. कलम

८. महाराज आज्ञा देतात कीं, इंग्रजी फौज जी कांहीं आपले मुलखासंबंधीं लढणार तिनें सर्व प्रकाराचें सामान विकत घ्यावें. दाणा आणि खान्याचा रकमा आणि सर्व जातीच्या वस्तु, पोशाख, गुरें, गाडे, उंट ह्या फौजेंत लागतील तेवढे यांजवर जकात घेऊं नये. कलम

९. मल्हारराव होळकर लिहून देतात कीं, कंपनी सरकार दोस्त व आश्रित व हरएक दुसरें राजे यांजवर कोणे एक प्रकारें लढाई करूं नये. कदाचित वाद पडल्यास कंपनी सरकार काट्यांत तोलून जें ठरवील तें महाराजांनीं मान्य करावें. महाराज कबूल करतात कीं, इंग्रज सरकारचे मान्यतेविना वकील हरएक परराज्यांत पाठवूं नये आणि येऊं देऊं नये व परराज्यासीं व्यवहार ठेऊं नये. कलम

१०. इंग्रज सरकार कबूल करितांत कीं, महाराज यांचे मुलें, सोइरे, आश्रित, रैयत, सेवक ह्यांचा कोणे रीतीनें आम्हांसी संबंध नाहीं, त्यांस महाराज मुखत्यार आहेत. कलम

११. महाराज मल्हारराव होळकर कबूल होतात कीं, फौज आहे ती काहडून टाकावी जमाबंदीच्यानें सामावेल यापेक्षां अधिक ठेऊं नये तीन हजार घोड्यांपेक्षां चाकरींत कमी ठेऊं नये. जी इंग्रज सरकारचे फौजेसंगें लढेल त्या फौजेचा रोजमुऱ्याचा चांगला बंदोबस्त केला पाहिजे. कलम

१२. महाराज कबूल करितांत कीं, इंग्रज सरकार बाहदरी देतात कीं नबाब गफूरखां त्याची सांप्रत जायदाद संजीत, मल्हारीगड, ताल, मंडावल व जाबरा, बर्डावदा हे सर्व गांव पिंपल्याखंडणी आणि सर्वांचे उत्पन्न हा मुलुख त्यांचे वंशपरंपरा नबाब आणि त्याचे वारसास शिबंदी प्रगण्याची आणि स्वतःचे चाकर याशिवाय सरकारचे चाकरीस सहाशें घोडे निव्वळ चाकरीकरितां हमेश ठेवावे आणि गांवांचे उत्पन्न वाढल्यास फौजही वाढवीत जावी. कलम

१३. इंग्रज सरकारचे हुकुमाशिवाय मल्हारराव होळकर कबूल होतात कीं, चाकरीस विलायती, मकरानी लोक ठेऊं नये. कलम

१४. ह्याप्रमाणें करून दोस्तीचा संबंध जाहला आहे, तो वृद्धी होऊन चालावा म्हणोन कबुलायत जाहली आहे कीं, इंग्रज सरकारचा एक अब्रूदार मंत्री महाराज यांजकडे राहावा आणि महाराजांस आज्ञा आहे कीं, आपला वकील गव्हर्नर जनरलाकडेस पाठवावा. कलम

**सरकारी रेकॉर्ड**

No. 147 6-1-1818 A.D.

Terms of the treaty of Mandosar.

---

**अ. नं. १४८** **श्री**

इसवी सन १८१८

राजश्री विठ्ठल श्री महादेव यांजकडून होळकर दरबारांत.
नबाब मीरखां व गफूरखां यांचा करार.

सेवेसीं विठ्ठल महादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल पोष कृष्ण एकादशीपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष :

१ नबाब मीरखान यांजकडे महाल, महाराज पंजाबांतून माघारे फिरल्यावर सांगोल्याचे मुक्कामीं त्यांचा करार करून कागदपत्र जाहांल्यांत येणेंप्रमाणें.

१ प्रो सिंरोज, १ प्रो टोंक, १ संस्थान कोट्याचा मामला, १ कोंच १ व प्रो पिढावे येकुण पांच.

हे महाल घेऊन सरकारांत पाहिजे ते वेळेस चाकरींत हाजर व्हावें. याप्रमाणें करार. पुढें महाराज यांनीं अंगरेज बहादुर यांस लिहून कोंच भीमाबाई यांचे नांवें करून आणोन सरकारांत ठेविली. ऐवज सरकारांत घेत होते. नबाबाचा व भीमाबाईचा इतला नाहीं. पुढें महाराज अस्वस्थ जाहल्यावर धर्म्याचे वेळेस नबाब स्वारींत आले.

त्यावेळीं निंबाहेडा कमाविसीनें करून घेतला. कोंचबद्दल कारभारी यांसी बोलणें घेतले. त्याजवर कांहीं ऐवज घेत गेले. निंबाहेडा कमाविसीनें करून घेतला. त्याजबद्दल सरकारांत दिला नाहीं. पुढें निंबाहेडा कोंच ऐवजी लावून घेऊन कोंचेच्या बाकीच्या ऐवजांत गुगरछबडा लावून घेतला.

१ नबाब गफूरखां हे महाराज अस्वस्थ जाले ते वेळेस नबाब मीरखां बरोबर स्वारींत हेही आले. सरकारांत कोणी समक्ष असावें असें ठरून गफूरखा यांजला वीस हजार रुपये दरमहा देऊन हजार स्वारानिशीं चाकरी करावी ऐसे ठरलें. कांहीं दिवस चाकरी प्रमाण ऐवजी पावत गेला. नंतर परगणे जावरे देऊन येथें ठेविलें. पुढें धर्म्याचे यांचे न बनलें. त्यांनीं काहडून देऊन महाल जप्त केला. त्याजवर नबाब मीरखाचे स्वारीत धर्म्यांचे पारिपत्य जाल्यावर आले, तेव्हां पुनः गफूरखांस येथें ठेऊन कारभारी याजकडील महाल येणेंप्रमाणें देविले. १ प्रातो जावरे १ प्रातो बर्डावद, १ प्रातो पिंपळोदा, १ प्रातो ताल मंडावल व १ प्रातो संजीत. येकुण पांच परगणे. कलम १

याप्रमाणें महाल लाऊन घेऊन एक पलटण हजार स्वारानिसीं चाकरी करावी हा करार पुढें कोहळ्याचे मुक्कामीं तालुके संजीत येथील उभा मार्ग रामगुरयात लागत होता तोही घेतला. कलम २

सदरहू दोन्हीं कलमें तुमचे लिहिल्याअन्वयें आहेत. महाल कमाविसीनें व दरखदार व पेशकसी व दंडफुरोई, वगैरेचा ऐवज त्याचा पगडा जबरदस्तीचे पोटीं कोणतेंही घडण्यांत आलें नाहीं. पेशकसी सरकार निसबत होते परंतु कोणतेही जबरीमुळें अंमलात आलें नाहीं. जिकरही कोठें नाहीं. फुकट महाल खात गेले. चारशे तीनशे स्वार रहात गेले. तेही सरकार चाकरीस नबाबाचे स्वारीबराबर मात्र चालावे असा व्यवहार. सरकारांत जागा राहिली ही साहेबांस लोपली नाहीं. खर्च आज पंचवीसाचा आहे. आम्ही त्यांनीं म्हटलें तसें करून तह केला. साहेबाची मर्जी ठेविली, पुढें लोभ करूनही दौलत चालविणें त्यांजकडे आहे. त्यांच्याच भरंवशावर आहों हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 148 1818 A.D.

Report of Vithal Mahadeo Jog (Kibe) to the Holkar Durbar regarding the agreements of Nawab Mir Khan and Gafur Khan.

---

**अ. नं. १४९** **श्री**

ता. १४ जानेवारी, इसवी सन १८१८

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून भारमल होळकरांस विशेष : सरकारची व कंपनी

इंग्रज बहादूर यांची दोस्ती होऊन कोणे गोष्टीचा किलाफ राहिला नाहीं. त्यांजकडील सरंजाम नेमाड प्रांतांत महेश्वरावरून हरएक कामानिमित्य येतील जातील त्यांची हरएक विषयीं बरदास्त राहून कोणेविषयीं व्यंग न पडे यास्तव हें पत्र लिहिलें आहे. तरी दोस्ताकडील कोणीही आले असतां रसद फर्मास करतील. त्यास जपून कोणेंविषयी बोभाट न ये तें करणे. सरकार जिल्ह्यांतही कोणी हरामखोरीस प्रवृत्तक होईल त्याचेही पारिपत्याविषयीं सुचविलें असतां त्याचेही पारिपत्य चुकावयाचें नाहीं. कोणेविषयीं द्वैतार्थ न ठेवितां बरदास्त राखणें. रवाना छ ६ रविलावल समान आशेर मयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
यशवंतराव सुत मल्हारराव होळकर

श्री मोर्तबसुद

**सरकारी रेकॉर्ड**

No. 149 14-1-1818 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Bharmal Holkar to treat the servants and the Saranjam of the East India Company hospitably and on friendly terms since the Company and the Sarkar have entered into friendly treaty.

---

**अ. नं. १५०** **श्री**

ता. ३० जानेवारी, इसवी सन १८१८

होळकरशाही मुलुखाची जमाबंदी. शके १७३९ संमत १८७४ ता. ३० जानेवारी सन १८१८ शुक्रवार यादी जमा महालानिहाय सरकार राजश्री मल्हारराव होळकर सुरुसन समान अशेर मयातेनवआलफ सन १२२७ फसली मि. पौष वद्य ८ मुक्काम चर्मन्वती तीर.

कमाल जमेची बेरीज रुपये

| खालसा अंमल | | कंपनी इंग्रजाकडे | |
|---|---|---|---|
| ५००००० | परगणे रामपुरा | १०५००० | संस्थान बुंदी लाखेरी वगैरे |
| २६००० | ,, संधारे | २०००० | ,, डोंगरपुर, बांसवाडे |
| २५००० | ,, सुनेल | २०००० | ,, सोपूर |
| १५००० | ,, रायपूर | १५०००० | ,, कोटे खंडणी |
| २०००० | ,, कोठडी | ३५०००० | ,, जयपूर खंडणी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४०००० | '' जिरापूर | १२५००० | परगणे थालनेर |
| ४०००० | '' माचलपूर | २५०००० | '' सुलतानपूर |
| ८०००० | '' नारायणगड | ३००००० | '' नंदुरबार |
| ७०००० | '' संस्थान देवळे प्रतापगड | ५०००० | '' रावेर |
| ८५००० | '' नरसिंगगड | ३०००० | '' अडावद |
| २०००० | प्रगणे नेमावर पंचमहाल | २५००० | '' न्हाळोद वगैरे देह ५ |
| ४००० | '' सुंदरसी | ७५००० | '' उत्रान |
| ३०००० | '' पाटण केशवराय | ४०००० | '' गाळणा |
| २५०००० | '' इंदूर | १७५००० | '' चांदवड |
| १५०००० | '' देपाळपूर | ३००००० | '' अंबाड |
| ६०००० | '' सावेर | ४०००० | '' शेवगांव |
| २५००० | '' बेटमे | २०००० | '' कोरहाळे |
| १५००० | '' कायथे | ५०००० | '' देपूर |
| १५०००० | '' तराणे | २५००० | '' वेरुळ |
| २००००० | '' महतपूर | ३०००० | '' सिऊर, घोघलगांव |
| १०००० | '' ब्राह्मणगांव | ४००० | मौजे अडगांव |
| १५०००० | '' सरकार बिजागड | ३००० | '' बडझिरे, पाडे देह ५ |
| १०००० | परगणे हसलपूर | ८००० | '' कसबे नगरसूल |
| ५०००० | '' आलमपूर सालोन | ४००० | '' काठापूर प्रांत दक्षिण |
| २७५००० | '' कोंच | ५००० | '' काष्टी चंदनपूर |
| ५०००० | '' वाफगांव वगैरे देह ९ | १२००० | '' जांबगांव |
| ३०८२० | '' चांदवडपैकीं सहानकीदेह | २०००० | सं. इंद्रगड खातोली |
| ० | मौजे आडगांव पाो नासिक ४००० | २५००० | पाो. अंतूर |
| ० | मौजे वडझिरे, पाडेनेर देह २ | ८०००० | प्राो. पंचपाहाड |
| ० | पैकीं डिंडोर ३००० | १००००० | प्राो डग |
| ० | मौजे तळेन लाटा हेडी देह १ | १२५००० | ,, गंगराड |
| ............... | | ............... | |
| २३,७९,८२० | | २५,६६,००० | |

चि. भीमाबाई बुळे, नबाब मीरखान व नबाब गफूरखान यांजकडे ते सदरीं चि.भीमाबाई बुळे यांजकडे.

| | | | |
|---|---|---|---|
| ४०००० | संस्थान झाबवे व | २५००० | परगणे चिखलदे |

............
६५०००

नबाब मीरखान यांजकडे

१०३५००० आकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १००००० | परगणे पिढावे | १००००० | परगणे गुगलछबडा |
| २७५००० | ,, टोंक | ३००००० | ,, सिरोंज |
| १७५००० | ,, निंबाहेडा | ८५००० | ,, रामपुरा खुर्द |
| ४१०००० | नबाब गफूरखान यांजकडे आकारी | १२५००० | ,, जावरे |
| ८०००० | परगणे मल्हारगड | ३०००० | ,, पिंपळोदा |
| ३०००० | ,, बर्डावद | ४५००० | ,, संजीत |
| १००००० | ,, ताल, मंडावल | | |

.............

१४४५०००

| | |
|---|---|
| ६४५५८२० | रुपये. तेरीज एकंदर |
| २३७९८२० | खालसा अंमल |
| ६५००० | श्रीमंत भीमाबाई बुळे |
| २५६६००० | कंपनी अंग्रेज |
| १४४५००० | नबाब मीरखान १०३५००० व गफूरखान ४१०००० |

..............

६४,५५,८२०

**सरकारी रेकॉर्ड व बुळे दप्तर**

No. 150 30-1-1818 A.D.

A sheet exhibiting the territorial possessions of the Holkar State as well as those granted to the East India Company, Srimant Bhimabai Bulye, Nawab Mirkhan and Nawab Gafurkhan with their estimated annual incomes.

---

**अ. नं. १५१** **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १८१८

विठ्ठल महादेव (किबे) यांजकडून भारमल दादा होळकरांस : विशेष : आपण माघ शुद्ध ७ चे पत्र पाठविलें ते पाऊन अर्थाशय मनन जाले. संस्थानीं पागा सरंजाम शिंबदी वगैरे खर्चायास जागा ४ चार गांव व शहरची सोय तितक्यानें गुजारा चालत नाहीं व बैद्याब खेड्यामुळें चार गांवडीं त्यांचा ही तसनस. ठिकाणा खर्चास नाहीं कर्जही कोणी देत नाहीं. तेव्हां आधार

भरंवसा तर सारा आपलाच. या प्रसंगीं आपणही पेंचात, न लिहावें परंतु दुसऱ्या कोणास लिहावें? जाणोन नाईलाज विनंती लिहिली. ही ध्यानीं आणोन गुजारियाची योजना व्हावी. श्रीमंत मातुश्री कैलासवासी यांचे घाटाचे काम चालू केलें त्याचे खर्चास सरकारांतून दोन गांव लाऊन दिले. ते फौजेचे बखेड्यामुळें बरबाद जाहले. तेव्हां तेथील पैसा उत्पन्न होऊन घाटांचे काम चालतें हे कळतच आहे. येविसीचें मनावर धरलें असता दौलतीस श्रेयस्कर. आपल्यास यश म्हणोन विस्तारपूर्वक लिहिलें. ऐसियाय त्यास तेथील जालें वृत्त आपल्यास कळलेंच असेल. दौलतीत जीव कोठून असावा ? बारामास जाले. फौजेचे व आपसाचे बखेड्यांत महाल मुलखाची बरबादी किती ? चवघे हरामखोर मिळून दौलतीची व्यवस्था करण्यांत कसर न केली त्याच योगें घरांत वास्तव्य दुसरियाचें होऊन राहिलें. दौलतीची वारापाणी जाहली. तेव्हां सर्वस्वी माथ्यावर घेऊन सावकाराचे पेचांत येऊन कैलासवासियांचें पुण्यप्रतापेंकरून ताम्राचा दौलतीचा प्रसर दिवसेंदिवस वृद्धिंगत. अशा प्रकारे त्याचेच अनुमतें कीं, सरदारांचे मूळ दौलतीचा बंदोबस्त करावा. या कारस्थानानें बंदोबस्तास प्रवर्तक होऊन फक्त सावकाराचेंच पेचांत. हे आपलेही ध्यानांत. तेव्हां विस्तार लिहून तो काय ? संस्थानचे खर्चास चार गांव व घाटाचे खर्चास दोन गांव सरकारांतून लाऊन दिले. त्याचीच आबादी इस्तवारी चांगली करावी आणि जिकडील तिकडे खर्चाची व्यवस्था होत जावी. आतां फौजफाट्याचा बखेडा तर राहिला नाहींच. श्री. भीमाबाई बुळे यांजलाही तांब्रांनीं भेटीस बोलावून आदर सत्कार चांगला करून लष्करांत पाठविणार. आतील बाहेरील उपद्रव महाल मुलखास कोणताही राहिला नाहीं. फक्त आबादीच करून महाल जमेवर बाद बसे असें करावें. यांतच गुजारा सर्वत्रांचा. इकडून मातोश्रीसाहेबांचे कामास व आपले कामास आळस होणार नाहीं हें खचित समजावें. सुबत्ता जाली म्हणजे इकडून बनेल तो उपर खर्चाचा घडून येईल. आपण चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 151 — 12-2-1818 A.D.

Vithal Mahadeo’s reply to Bharmal Holkar : Summing up the whole financial position of the State, and advising careful management of villages already granted for the expenditure and upkeep of the Chhatri and Sansthan of Devi Ahilyabai.

---

## अ. नं. १५२ — श्री म्हाळसाकांत

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |

ता. १४ मार्च, इसवी सन १८१८

राजश्री विठ्ठल महादेव गोसावी यांसी अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य : स्नेहांकित मल्हारराव होळकर दंडवत विनंती उपरी. तुम्ही सरकार चाकरीचे उपयोगी, पहिलेपासून पदरचे, तुमचे हातून कंपनी इंग्रज बहादूर यांजकडील मसलत समेटात होऊन दौलतीस उपयोग बहुत पडला, सबब सालमजकूर पासून देह येणेंप्रमाणें :

१ मौजे राऊ प्राो इंदूर. १ मौजे बनेड्या प्राो देपाळपूर. येकुण दोन गांव तुम्हास इनामी सरकारांतून द्यावयाचा करार करून अलहिदा वर्तमान भावी कमाविसदार यांचे नांवें सनदा सादर होऊन हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी तुम्ही देहायमजकूर खेरीज हक्कदार, इनामदार, बाकी सरकारी अंमल बमय जकार उभामार्ग थलमोड थलभरित सुद्धां आपले दुमाला करून घेऊन याचा अनुभव तुम्हीं व तुमचे वंशपरंपरा घेणें व सरकारांतून ही पुस्तदरपुस्त कोणेविशीं मुजाहिम न होतां निर्वेध चालविलें जाईल. रवाना छ जमादिलावल सु. समान आशेर मयातेनवआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. श्री मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 152 14-3-1818 A.D.

Maharaja Malaharrao Holkar grants hereditarily two villages ( Rau and Banedya ) in Inam to Vithal Mahadeo in recognition of his valuable state services, specially in bringing about amicable relations between the East India Company and the Holkar State.

---

**अ. नं. १५३** **श्री**

ता. २० एप्रिल, इसवी सन १८१९

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून बाजी यशवंत यांस विशेष. श्रीक्षेत्र जेजुरी येथील बाग, तलाव सरकारांतून बळवंतराव सिद्धेश्वर यांचेकडे; त्यांचा काळ झाल्यावर, तुम्ही त्यांचे पुतणे वहिवाट तुमचेकडे असावी म्हणोन विदित झाले त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी कैलासवासी बळवंतराव सिद्धेश्वर परलोक जाहल्यामुळें तुम्ही उदास न राहतां खातरजमेनें सरकारतर्फेचें बाग तलाव वगैरे क्षेत्रीं जागा. त्याची वहिवाट मशारनिल्हे करीत होते त्याप्रमाणें राजश्री खंडो महादेव यांचे विद्यमानें तुम्ही देखरेख करीत जाऊन वर्तमान लिहित जावें. जाणिजे छ १३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**जेजुरी दप्तर**

No. 153 20-4-1819 A.D.

Maharaja Holkar orders Baji Yeshavant to look after the gardens and tanks of Jejuree just as his late uncle Balwantrao Sidheshwar used to do. You will consult Khando Mahadeo and continue the supervision and correspondence.

---

**अ. नं. १५४** **श्री**

ता. २३ जुलाई, इसवी सन १८१९

कप्तान हेन्री पाटिंजर कलेक्टर अहमदनगर यांजकडून कमाविसदार पाटोदे यांसी. विशेष. मुक्काम पुणेंहून : पेठ येवलें येथील पाटीलकी निम्मे होळकरसाहेबांची व निम्मे राजाराम नाईकाची. त्यास विठोजी नाईक भांडत आहे, पंचाईत अदालतींत व्हावी. तरी निम्मे पाटीलकी होळकर सरकारची चालविण्याविषयीं ताकीद झाली पाहिजे म्हणोन वकील निसबत मशारनिल्हे यांनीं जाहीर केलें. त्याजवरून हुकुम केला जातो कीं, राजाराम नाईक व विठोजी नाईक हे आपसांत भांडत असल्यास त्यांचा फैसल अदालतींत होईल. लेकिन होळकरसाहेबांची निम्मे पाटीलकीस हरकत करणेचें कारण नाहीं. मामूल चालत आल्याप्रमाणें चालविणें व मौजे नगरसूल येथीलही पाटीलकी दरोबस्त होळकर सरकारची आहे. त्याचेही मामूलप्रमाणें मानपान, लवाजमा, चालत आल्याप्रमाणे चालविणें. जाणिजे.

सही इंग्रजी हेन्रीसाहेब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 154 23-7-1819 A.D.

Capt. Henry Pottinger, Collector Ahmednagar orders the Kamavisdar of Patoda : Half of the Patilship of Yevala, as well as the entire Patilship of Mauza Nagarsul should be upheld on behalf of the Holkar Sarkar, as of before.

---

**अ. नं. १५५** **श्री**

ता. ३ सप्टेंबर, इसवी सन १८१९

सर जान मालकमसाहेब यांजकडून भीमाबाई बुळे यांस विशेष. आपले पत्र योग्य-काळीं पोहचून खुशी जाहली. आपण लिहिलें की बापू रामचंद्र यांचे कर्ज अदा करणें,

कारण आपला सर्व प्रांत त्यांजकडे कर्जापेटें जप्त आहे, म्हणोन वगैरे. आम्ही आपले आज्ञेचे बाहेर नाहीं. परंतु आपली इज्जत, नावलौकिक, कायम ठेवणेसाठीं आम्हास आपला निकाल करणें अवश्य आहे. याजकरितां निकाल करितों ऐसाजे कीं,

१ तमाम इलाखा आपला महाराजसाहेब होळकर यांजकडे रुपयाची फेड होई तो पावेतों राहील. दीड वर्षांत सहा किस्तीनें रुपयांची फेड होईल. या दरम्यान बाकी राहिली तर तात्या जोग आपले खर्चाचा इंतजाम करतील व सर्व कर्ज अदा जाल्यावर आपला सर्व इलाखा आपल्या सुप्रद केला जाईल. हें आपणास इतलेभावीं कळविले आहे. जादा काय लिहिणें, हे विनंती. ता.३ सप्टेंबर सन १८१९ इ.छ.१२ जिल्काद सन १२३४ हिजरी.

सही इंग्रजी सर जान मालकम.

**सरदार बुळे दप्तर**

No. 155 — 3-9-1819 A. D

Sir John Malcolm informs Bhimabai Bulye that her territorial possessions will remain with the Holkar State till the debt is discharged.

---

## अ. नं. १५६ — श्री म्हाळसाकांत

ता. ७ सप्टेंबर, इसवी सन १८१९

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

अज सरकार राजश्री मल्हारराव होळकर ताह सालमसिंग ठाकूर सुरुसन आशरीन मयातेनवअलफ, तुम्हाकडोन सरकारांत इंदूर मुक्कामीं विनंती जाहली कीं, मौजे लालगड ऊर्फ भानपुरा व नागगुराड्या परगणे महतपूर हे दोन्ही गांव बहुत दिवस आमचे वहिवाटींत चालत आले. सालगुदस्त सरकारांत जप्ती करून छत्री भानपुरा येथील इमारत कारखान्याचे खर्चास लावून देऊन व महालीं आम्ही गांवगन्ना गिरास घेत होतों ते मना करून कप्तान केसाहेब दिमत जनरल मालकमसाहेब यांचे विद्यमानें महालांत हरगांवीं वगैरे उपसर्ग न लागतां गांवगन्ना गिरासाबद्दल परभारे एक पैसा घेऊं नये, सरकार कचेरीतून सालिना रु.१००० एक हजार रुपया व मौजे कछाल्या हा गांव आम्हास लावून देऊन हजार रुपये दरसाल देणेंविषयीं महालीं कमाविसदारास पत्र लिहून देण्यांत आलें, परंतु दोन्ही गांव आम्हाकडे इस्तमुरारी बहुत दिवस चालत आले. सरकारांतून मौजे कछाल्या व एक हजार रु.दरसाल नेमून दिले त्याप्रमाणें वहिवाट चालतच आहे. परंतु या शिवाय हरदु गांव आम्हाकडे इजारा इस्तमुरार पट्टाकरून देविल्यास घासलकडी इत्यादी उपयोगी व महालचे कचेरीतून हजार

रुपये नेमणुकीचे घेतात ते गांवचे मक्त्यात घेत जाऊन बाकी गांवचा ऐवज पट्याबद्दल जिकडे सरकार देतील तिकडे देत जाऊं. याअन्वयें वेलजलीसाहेब यांजकडे बोलणें करून त्याजकडीलही सरकारांत सांगणें व तुमचे विदीत केल्यावरून हरदु गांवचा इस्तमुरारी पट्टा देणेंचा करार साल मजकुर पासून रुपये २२५१

सन १२२९ संमत १८७६ चे साली हरदु गांवचा मक्ता इस्तमुरार रुपये
साल १२३० संमत १८७७ चे सालीं. २४०१

.......

४६५२

पैकीं वजा दरसाल टाक्याबद्दल कचेरीतून न घेतां गांव ऐवजी हजार रुपये महाल चलन घेत जाऊन बाकीचा ऐवज साल मजकुरीं बाराशें एकावन्न व पेस्तर सन बाराशें तीसाचे सालीं पासोन दरसाल चौदाशें एक रुपया जिकडे सरकारांतून देविले जातील तिकडे बिन दिक्कत निखर्ची महाल चलन देत जाऊन कबज घेत जाणें. जाणिजे. छ १६ जिल्काद मोर्तबसुद.

**जहागीर दप्तर.**

No. 156 7-9-1819 A.D.

Salamsing Thakur Istamurardar's agreement with the State, forego-ing his former taxation on every village for a stipulated annual grant.

---

**अ. नं. १५७** **श्री**

ता. २७ सप्टेंबर, इसवी सन १८१९

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून कृष्णाजी विठ्ठल कमाविसदार परगणे देपाळपूर यांसी विशेष. सावंतसिंग गिराशे याचा टाका परगणे मजकुरीं आजपर्यंत लागोन गांवखेड्यासंबंधी उपद्रव होता. सांप्रत त्याचा परभारें कोठें एक पैसा न घेतां गांवखेड्यातून घेऊं नये. ऐवज महालचे कचेरींतून घेत जाऊन परगण्याची चाकरी करीत जाऊन महालचा जाप्ता ठेवावा. याअन्वयें बोलण्यांत येऊन सन १२२८ फसलीचे सालापासून सांवतसिंग गिराशे याचा ठराव सर जान मालकमसाहेब यांचे विद्यमानें गांवगन्ना कचेरीतून रु.८३२-८-० आठशे बत्तीस, आठ आणे टाक्याबाबत प्रगणे मजकुर येथील कचेरीतून सालिना देत जाऊन कबज घेत जाणें जाणिजे. छ १५ माहे रजब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**जहागिरी दप्तर**

No. 157 27-9-1819 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the Kamavisdar Pargana Depalpur to pay an annual stipulated sum of Rs 832/8/-to Sawantsing Girasha, the

said Girasha foregoing his village taxation so long in vogue.

---

अ. नं. १५८ **श्री**

ता. ११ आक्टोबर, इसवी सन १८१९

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून वर्तमानभावी कमाविसदार सरकार बिजागड यांस विशेष. शके १७४१. श्री ओंकारेश्वर क्षेत्र श्री नर्मदा उत्तरतीर यांजकडे सरकारी पूजा, नैवेद्य, नंदादीप व चौघडा इत्यादि सरकार बिजागड येथील नेमणुकीअन्वयें पेशजीपासून चालत आली. आलीकडे दंग्याबेहद्यामुळे वर्ष दोन वर्षे सरकार मजकुर येथून ऐवज वेळेस न पावल्यामुळें चौघडा चालविण्यास दिक्कत पडली, म्हणोन राजश्री रामभट यांनीं स्वारींत इंदूर मुक्कामीं येऊन विदित केलें त्याजवरून मनास आणितां श्रीकडील पूजा, नैवेद्य, नंदादीप व चौघडा सरकारतर्फेचा पेशजीपासून चालत आल्याअन्वयें चालवावयाचें करून नेमणुकीचा तपशील येणेंप्रमाणें :

३६ नंदादीपास तूप रोजीना पावशेरप्रमाणें एकमाही साडेसात शेर, बारमाही सवादोन मण.

६४ नैवेद्यास रोजीना जिन्नस. कणिक, दाळ, तुरीची, तांदूळ, मीठ, तूप, साखर, बेसन, वगैरे बारामाही खर्च.

६ पूजा साहित्य. चंदन, कापूर, अक्षता, वगेरे दरमहा आठ आणेप्रमाणें.

६१ शिवरात्रीबद्दल रु.११ लघुरुद्र आभिषेक व ब्राह्मणभोजनास रु.५० येकुण.

२६४ नगारखान्याकडे.

०८-०-० सनईवाले असामी २ दरमहा रु.४ प्रमाणें.

१४-०-० नगारची असामी १ दरमाह ३-८-० व झांजवाला अ.१ दहमाह ३-८-० व नौबत्या असामी १ दरमाह ३-८-० व घड्याळची इसम १ दरमाह रु. ३-८-० येकुण रु.२२.

............

२२-०-०

१०० पुजारी ब्राह्मण.

५ नौबत मढाईबद्दल.

.........

५३६ रु.

येकुण पांचशें छत्तीस रुपये पेशजीप्रमाणें द्यावयाचे करून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही सरकार मजकुर ऐवज सालिना पांचशें छत्तीस घेऊन पैकीं निम्मे माघ मासीं व निम्मे वैशाख मासीं महाल चलन श्रीकडे साल दरसाल देत जाऊन प्रतिवर्षी नवीन पत्राचा

आक्षेप न घेतां या सनदेची प्रत लिहून घेऊन अस्सल भोगवटियास पुजारी ब्राह्मण यांजकडेस परतोन देणें. छ २२ जिल्हेज. मोर्तबसुद.

**जहागिरदार दप्तर**

No. 158 11-10-1819 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders the Kamavisdars of Sarkar Bijyagad to pay annually the sum of Rs. 536/- to the Pujari of Shree Onkareshwar as per details marked in the Sanad.

---

**अ. नं. १५९** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १८१९

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून, गोपाळराव भगवंत यांस विशेष. तुम्हाकडून, इंदूर मुक्कामीं स्वारी असतां सरकारांत हुजूर विदीत केलें कीं, पेशजी खरगोन येथे रत्न्या भिलाला यानें धाड घालून ठाण्यावर दंगा केला त्यासमयीं आमचे तीर्थरूप भगवंतराव गोविंद यांनी जमामर्दीनें ठाण्याचा नक्ष राखून हरामखोराचें पारिपत्य केलें, त्यासालीं राजश्री चिमणाजी कृष्ण यांजकडे सरकार बिजागडची मामलत होती. त्यांनी मौजे सोनवाडा तालुके रसीदपूर सरकार मजकुर हा गांव इनाम करून दिला होता. हे कृत्य सरकारांत समजोन न आल्यामुळें गांवची जप्ती सांप्रत जालीं. येविषयीं कृपावंत होऊन त्यागांवचे बदला दुसरा गांव देविल्यास उत्तम आहे. म्हणोन त्यावरून मनास आणितां तुमचे वडील सरकार उपयोगी पाहून साल मजकुरीं त्या गांवचे मुबादला कुटुंबाचे बेगमीस मौजे भडलेन परगणे चेनपूर सरकार मजकुर हा गांव इनामी तुम्हास द्यावयाचा ठरून अलाहिदा भोगवटियास वर्तमानभावीं कमाविसदारांचे नांवें सनद देऊन हें पत्र सादर केलें आहे, तरी मौजे मजकुर गांव-हक्कदार, इनामदार, पर अंमल, जकात, उभा मार्ग खेरीज करून अनुभव गांवचा घेणें. सरकारांतून निभावणी होईल. जाणिजे. छ १० सफर मोर्तबसुद.

**जहागीर दप्तर**

No. 159 29-11-1819 A.D.

Maharaja Malharrao Holkar grants the village Bhadlen ( Pargana Chenpur ) to Gopalrao Bhagwant in Inam, in lieu of the old grant of Mauza Sonawada ordered in favour of his late father for State-service rendered during the raids of Ratnya Bhillala.

---

अ. नं. १६० **श्री**

इसवी सन १८१९

रोजकीर्द मल्हारराव होळकर इ.स.१८१९ पैकीं निवड उतारे :

१ बाळाराम मलुकचंद आगरवाले हुजूर आले सबब वस्त्रें ७

१ मातुश्री तुळसाबाई यांची व राजी पोर यांचे (ही पोर त्यांचेबरोबर मारली गेली) क्रियासंबंधीं खर्च रु.१०२९-४-९

१ महतपूरचे लढाईत कुलस्वामी देव गहाळ झाले होते. ते शोधून आणले सबब बक्षीस खर्च रु.१२५

१ मल्हारराव महाराजांचे द्वितीय लग्न दिवाण सीवदानसिंग शिरवी, मौजे भिलाडा, प्रांत मारवाड हल्लीं वस्ती अल्हेड परगणा रामपुरा यांचे भगिनीसी निश्चयांत येऊन खांडा विवाह वैशाख शुद्ध नवमी इंदुवारी मघा नक्षत्री गोधुलीस जाहला सबब खर्च रु. ५७७९३-१२-०

१ जखमींना खर्च व इनाम. शामराव माधव याचे पागेपैकीं इमामखां आजमखां बारगीर रामपुरेकर यांनीं दतोद्याचे लढाईंत नादरभूम्याचे धाडीवर दौड करून गेल्यानें तेथें जखम गोळीची आली. सबब इंदूरपैकीं. २५ जखमींना, २५ चीं वस्त्रें, ५० बक्षीस, येकुण १०० मार्फत माधवराव गणेश.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 160 1819 A.D.

Miscellaneous items from the Government account books :

(I) Dress of honour to Balaram Agarwala.

(II) A prize of Rs. 125/- for the discovery of god-idols of the Sarkar missed during the Mahatpur battle.

(III) Second marriage of the Maharaja with the sister of Diwan Siwadansing Shirvi.

(IV) Medicine for healing wounds, and rewards to Bargirs who faced the ravages of Nadar Bhumia.

---

अ. नं. १६१ **श्री**

इसवी सन १८१९

संस्थान नरसिंगगड प्रकरणीं मजकूर.

७९२५१ ऐनटाका सुदामत वहिवाट रुपये बुंदी शिक्का.
४३५० शिवाय कलमें सुदामत. १३५० सेरी नजराणा, २००० दरबार खर्च सरकार व १००० दिवाण फडणीस रु व फडफर्मास व
......... भेटी कमाविसदार.
८३६०१

१ अलीकडे संमत १८७४ सालीं (इ.स.१८१७-१८) लढाई जाहल्यावर ठराव जाहला. विद्यमान राजश्री विठ्ठल महादेव जोग (किबे) यांजकडे रुपराम बोहरा (नरसिंगगडचा कारभारी) यानें येऊन अर्ज केला कीं, मुलखाची खराबी जाहलियामुळे टाका पुरा पडत नाहीं. कुंवर चैनसिंग सरकारांत कैद झाले. सबब सहा साला जाब बोलण्यांत आणला. सालोसाल किस्तबंदी ठरावून दिली. रुपये सालमशाही रु.८५००० किस्तबंदी बरहुकुम घेत जावें. पुढें सहा साले पुरी जाहल्यावर सुदामत टाका चालत आल्याप्रमाणें रुपये घ्यावे. बाकी राहिले ते सालें पुर्ण जाहल्यावर निकास करून घ्यावा. येणेंप्रमाणें करार. सालें तपशील.

२५००० संमत १८७४, ३५००० संमत १८७५,४५००० संमत १८७६,५५००० सं. १८७७, ६५००० संमत १८७८, ७५००० संमत १८७९, ८५००० संमत १८८०, (इसवी सन १८२४) पुरा टाका. येकुण तीन लक्ष रुपये. कमाविसदाराचे नेमणुकीसुद्धां करार.

२ किता ठराव जाहला ते समयीं. १ विठ्ठल महादेव यांजकडील, जहागीर गांव मौजे कासरोद देऊन पत्र करून दिले. गांव अदमासे रु.२०००, (२) रावजी त्रिंबक याजला सालाबादी देणेंचे करार रु.५०० पांचशे.

७ शिवाय कलमें

| | |
|---|---|
| १ गांवगन्ना सूत अधोडी. | १ मामलेदारास भेटी गांवगन्ना. |
| १ फड फरमास. | १ सरकारांत पुत्रोत्सव, लग्नकार्य, जाहले तर आहेर घोडा नजर व जवाहीर. |
| १ पट्टी, दिपवाळी वगैरे. | |
| १ सांप्रत राजाचे वंशाची नक्कल झाली. नवीन स्थापना जाहली सबब नजराणा, दरबार खर्च व्हावा. | १ प्रगण्याची तहसील लावून दिली असतां-स्वार, प्यादे यांचे रोज खुराक. |
| ...... | ..... |
| ४ | ३ |

येकुण कलमें ७

**सरकारी रेकॉर्ड**

No. 161 1819 A.D.

Agreement newly entered into by the Sansthan Narsinggad with the Holkar State. The Sansthan agrees to pay a stipulated amount annually as tribute.

अ. नं. १६२ **श्री**

ता. २० जानेवारी, इसवी सन १८२०

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून राजश्री भीमसिंगजी संस्थान झाबवे यांसी विशेष. प्रगणे थांदले वगैरे जिल्ह्यांत राणगेवाले मवास यांनीं मनस्वी उपसर्ग मांडला. त्यांजला सामल तुमचे जिल्ह्यांतील भिल आहेत. त्यांचे पारिपत्याविसीं धोंडो सदाशिव दरखी मामलेदार यांनीं तुम्हास सांगितले असतां तुम्हांकडून टाळाटाळी होते. याजमुळें मवास भिल्लांसुद्धां परगण्यांत गांवगन्ना उपद्रव करितांत. या बहद्यामुळें आबादीस दिक्कत पडती. ह्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे तरी तुमचे जिल्ह्यांतील भिल्ल राणगेवाले यांस सामल राहून परगण्यांत धूम करितांत त्यांचे पारिपत्याकरितां मामलेदारानीं सांगितलें असतां बंदोबस्त न झाला. तुमचे करारांत भिल्लांचा बंदोबस्त ठेऊं असें असून चोरांचा मुलाहिजा होतो हें कसें ? तरी राणगेवाल्यांचे पारिपत्यासाठीं मामलेदार यांस लिहिण्यांत आलें आहे. तुम्हीही त्यांजला सामल होऊन भिल्लांचे पारिपत्य करावें परगण्यांत कोठेंही उपसर्ग न लागे तें करणें. सालाबादी टाक्याचा ऐवज येणें त्याचा सुरळीतपणें फडशा मामलेदाराकडे करून देणें. पुन्हा येविषयीं बोभाट सरकारांत न येऊं देणें. रवाना छ ३ रविलाखर इहिदेअशरीन मयातेनवअलफ बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 162 20-1-1820 A.D.

Maharaja Malharrao Holkar writes to Bhimsingjee of Sansthan Zabwa:

In spite of your agreement with the State, and in spite of the advice rendered to you by the Mamlatdar, you took no steps to check the turbulance of the Ranagewalas. You are hereby ordered to assist the Mamlatdar in checking these disturbances, Diligently pay the tribute to the Mamlatdar.

---

अ. नं. १६३ **श्री**

ता. १७ मे, इसवी सन १८२०

दफाते बारनिसी कारकीर्द श्रीमंत मल्हारराव होळकर विशेष. वरात रा. विठ्ठल महादेव यांचे नांवे. नानाभाई नगरशेठ इंदूरकर याचे चिरंजीवाचे लग्नाकरितां खर्च रु.१००० रुपया

उज्जैनी शिक्का देऊन कबज घेणें. छ ४ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 163 17-5-1820 A.D.

Note of payment ordered on Vithal Mahadeo to pay Rs. 1,000/- for the marriage of the son of Nanabhai Nagarshet.

---

**अ. नं. १६४** **श्री**

ता. २२ मे, इसवी सन १८२०

दफाते बारनिसी वरून. विशेष. वरात विठ्ठल महादेव यांचे नांवें. सरकारांत जवाहीरखातें इंग्रज बहादुर यांजकडील बेलीसाहेब यांस द्यावयाकरितां गुजारत भगवतीदास वैशाख शुद्ध ६.

९०० कंठी मोत्यांची चौकडे १२ ची. ३५४ शिरपेंच हिरकण्याचा १ येकुण रुपये १२५४ चे दागिने दोन छ ९ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 164 22-5-1820 A.D.

Present of ornaments worth Rs. 1254/- to Mr. Bailley.

---

**अ. नं. १६५** **श्री**

ता. ३० मे, इसवी सन १८२०

दफाते बारनिसी वरून. विशेष. वरात विठ्ठल महादेव यांजकडे. इंदूर मुक्कामीं पाळा बांधून पाण्याचा रहाट वगैरे केला. त्यांत कला, कुशलता चांगली केली हें ध्यानास आणून इनाम रु.८०० हल्लीं शिक्का संडीसाहेबांस दिले. वैशाख वद्य १ छ १७ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 165 30-5-1820 A.D.

Mr. Sandey was paid Rs. 800/- for his Engineering skill.

---

अ. नं. १६६ **श्री**

ता. ७ जून, इसवी सन १८२०

तहनामा, होळकर सरकार तर्फे सरंजामी जहागिरदार श्रीमंत भीमाबाई बुळे, संस्थान झाबवे येथील भीमसिंगजीराजे यांचे तंट्याचा निकाल. मुक्काम नालछा मांडवनजीक. सर जान मालकमसाहेब व धोंडो सदाशिव दरखदार यांचे विद्यमानें.

१ तहनामा कलमवार बोलणें ठराव प्राो झाबवे. श्रीमंत भीमाबाई बुळे विद्यमान विठ्ठल केशव पंडित, संमत १८७७ साबान. अधिक ज्येष्ठमास मुक्काम नालछे. इंग्रज बहादूर सर जान मालकमसाहेब यांचे रुबरु राजश्री झाबवेकर भीमसिंगजी समक्ष बोलणें ठरले. विद्यमान धोंडो सदाशिव आमीन दरखदार प्रगणे मजकूर.

२ प्राो मजकुरची वाटणी राजाजींची व सरकारची झाली, ते वेळेस उमराव यांच्या कोठड्या (जागा) सर्व सरकारांत लागल्या. त्याजवर राजाजींचा फक्त भेटीचा आहे. राजाजींची भेट टाक्या प्राो दिली जाईल. राजेसाहेबांकडून गैरचालीचा उपद्रव होऊं नये आणि ठाकूर लोकांनीं हुकमाप्रमाणें चालावे. न चालल्यास आबादी होणें कठीण आहे. येविषयीं हुकुम काय होणें तो होऊन दोन्हींकडे ताकीद जाहली पाहिजे.

हुकुम कीं, राजाजीकडून उपद्रव होणार नाहीं व टाका शिरस्तेभेट घेतील. उमराव ठाकूर हुकुमांत राहतील तर उत्तमच. नाहींतर जागा जप्त करून त्यांचे गुजारयाची तजवीज करून द्यावी.

३ खालसे गांव सरकारी त्यांजवर तडवीभेट सुदामत राजाजींची आहे. ती न घेतां त्यांचे ठाणेदार तडव्यास (गांवचे पाटलास) दिक्कत करितांत, त्यामुळें ते परांगदा होतात. तडव्यांवाचून गांववस्ती राहत नाहीं. येविषयीं हुकुम झाला पाहिजे.

हुकुम कीं, राजाजींकडून उपद्रव होणार नाहीं. तडव्याची भेट तुमचे खालसे गांवची तुमचे हातून राजाजीस देत जावी परभारें घेणार नाहीं.

४ उमराव, ठाकूर यांचा दस्तूर सुदामत आहे कीं, परगण्यांत भील मिराशे यांजवर स्वारी करावी लागल्यास, ठाकूर लोकांनीं आपले जमियतीनिशीं, राजाजी किंवा सरकारकडे काम पडल्यास कमाविसदारास सामील राहून चाकरी करावी. येविषयीं आज्ञा काय ?

हुकुम कीं, सुदामतप्रमाणें चाकरी करतील. हुकुमअदूल होणार नाहींत. केल्यास सजा होईल.

५ तालुके रंभापूर व तालुके खंडाळे व ठाठणवासा, माथासुळा वगैरे गांवें राजाजींनीं दाबली आहेत. रंभापूर कुंवर प्रतापसिंगास राजाकडे महाल इजारियानें होते तेव्हां दिले आणि दुसऱ्या जागा राणापूर तालुक्यांत घातल्या, त्याची चौकशी होऊन

सरकारी जागा देवविल्या पाहिजेत, अगर टाका देवविला पाहिजे. हक्क सरकारचा वाजवी आहे, येविषयींचा हुकुम झाला पाहिजे.

हुकुम कीं, तुमचे मालक (होळकर) मुलखाची मालकी करीत होते त्यांचेनीं त्यावेळीं जागा घेवविली नाहीं. मुरवत करीत गेले. आतां आम्ही कशी देववावी ? वीस वर्षांची वहिवाट आतां बदलत नाहीं. ते तुमचेच आहेत. त्यांजवर मेहरबानी ठेवावी.

६ प्रगणेसंबंधीं सर्व मजकुर व किरकोळ कलमा बोलण्यांत आल्या. येकुण ११ कलमासंबंधी बोलणें झाले याप्रमाणें निभावणी होण्याकरितां दोन्हीकडे ताकीद आपले सरकारांतून असावी. भोपावर छावणीचे एजंट साहेबाकडे लिहिलें जाऊन तेथून उपर रहावा.

१ लाला ख्यालीराम निसबत जनरल मालकमसाहेब.
१ नारोपंत नाना काठाफोडकर नि. सो.
१ बापू रामचंद्र मामलेदार प्रगणे रतलामकर.
२ हुजूर इंदूर सरकारचे वकील. १ ब्रम्हगीर निंबाजी. १ लाला किसनप्रसाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 166 7-6-1820 A.D.

Terms of agreement arrived at between Saranjami Jahagirdar Bhimabai Bulye on one hand and Bhimsingjee Raje of Zabwa on the other hand.

In the presence of Sir John Malcolm and Dhondo Sadashiv, Darakdar Camp Nalchha near Mandava.

---

**अ. नं. १६७** **श्री**

ता. १३-६-१८२०

रोजकीर्द सुभा श्रीमंत मल्हारराव होळकर, ज्येष्ठ मास इसवी सन १८२०

११८३३-७-९ इजाफत जमा विठ्ठल महादेव यांजकडील.
जनरल मालकमसाहेब विलायतेस जातात. सरकारांत निरोप घेण्यास आले सबब. बहुमान देणेंकरितां जवाहीर वगैरे खरीद.
२५०० पोची हिरकण्याची गुजारत राजाराम संभुराम.
११०० कंठी मोत्यांची एकसरी मोती ४२ पन्हे ५ हिरे ९.

६० पदक हिरकण्याचे लालसुमारी ९ गुजारत हिरालाल.

.................

३६६०

८१७३-७-९ खासगीकडील दागिने खरीदी. विद्यमान गोपाळराव गोविंद खासगी दिवाण.

३०००-०-० आंगठी हिऱ्याची नवीन खरीद.

८००-०-० कांकण जोड हिरे माणकाचा उज्जनीपैकीं.

१३००-०-० शिरपेंच हिरकण्या व पन्ह्याचा.

२२५०-०-० इंग्रजांचे मेजवानीचे वेळीं.

१८०० भुजबंद हिरकण्याचा.

४५० पोची हिरकण्याची.

.......

२२५०

२७५-०-० कंठी मोत्यांची भगवतीदासपैकीं.

३८३-७-९ शिरपेंच जयपुरी, जोरावरमलपैकीं.

१६५-०-० चांदीचा सरंजाम. घोड्यास दिला.

...................

८१७३-७-९

.....................

११८३३-७-९

**सरकारी रेकार्ड**

No. 167 13-6-1820 A.D.

List of presents made to Sir John Malcolm on the eve of his departure for England; Purchase of ornaments made by Khasgi Diwan.

---

## अ. नं. १६८ श्री म्हाळसाकांत

शके १७४२, इसवी सन १८२०

यादी श्रावणमासाबद्दल ब्राह्मण अनुष्ठानास बसवून श्रेय संपादन घेऊन दक्षिणा दिली. श्रीदेवी अहिल्याबाई कारकीर्द, मातोश्री कृष्णाबाई होळकर सु।। इहिदेअशरीन

मयातेनवअलाफ. माहे जिल्काद श्रावणमास. मुक्काम इंदूर.

२०२९-८-० श्रीमंत सरकार बाबासाहेब याचेतर्फेने अनुष्ठानें वगैरे.

२५९-८-० श्रीकुलस्वामी श्री मार्तंडांकडे.

८२-८-० महिम्नचा अभिषेक असामी ११

७-८-० शंकरभट नि. उपाध्ये.

७-८-० तुकारामभट येवतीकर.

७-८-० हरभट तेलंग, हैदराबादकर.

७-८-० राजेश्वरभट तेलंग मथनकर.

७-८-० जीऊभट सप्तश्रृंगकर.

७-८-० रघुपती दीक्षित उज्जनीकर.

७-८-० मारुतीभट पोळ पारनेरकर.

७-८-० बाबाभट भास्करी महेश्वरकर.

७-८-० बाबाभट निसबत काशीनाथ बाबा महेश्वरकर.

७-८-० बापाभट नाशिककर.

७-८-० नाना वैद्य जुने इंदूरकर.

..............

८२-०-०

५५-०-० बिल्वपत्रें वाहणार असामी ११ दर असामी ५ रु. १ रामभट गर्गे, लखमापुरकर, २ चिमणभट नेवासकर एकाक्ष, ३ गोपाळभट मांडे सेंदुणाकर, ४ नरसिंव्हभट तेलंग धरमपुरीकर, ५ रावजीभट पारोंडेकर, ६ केशवभट नवाथे जालवणकर, ७ सखारामभट महेश्वरकर, ८ शेषंभट तेलंग कृष्णातीरकर, ९ बाबाभट गांडापुरकर, १० मार्तंडभट महेश्वरकर, ११ नरहरभट अवसरकर

३८-०-० मल्हारी सहस्रनाम पाठाकडे असामी ५ नरहरभट हातवळणे, ७ रु. विठ्ठलभट जुने इंदूर ७, गोविंद बाबा चांदवडकर ७, बापूभट अग्निहोत्री महेश्वरकर १०, राजाबापू पुराणिक ७ रु.

८४-०-० श्री विष्णुसहस्र नामपाठाकडे १२ असामी दर असामी दक्षिणा रु. ७ प्रमाणें. रामचंद्र टोके पुणतांबेकर, अण्णाभट वैष्णव प्रवरासंगमकर, आयाश्रोती निस्बत सूर्यनारायण शास्री, नागेश्वरभट पोळ महेश्वरकर, रामचंद्रभट चांदवडकर, मोरभट अयाचित उमडेकर,

पुरषोत्तमभट वैद्य इंदूर बोधणेकर, रघुपत देव, निळकंटभट गुरु, सखारामभट तेलंग, मुरारीभट वैद्य चांदवडकर, मोरभट उज्जैनकर.

७७-०-० श्रीशिवकवच पाठ असामी ११ दर रु ७ प्रमाणें; बाळंभट मालखेडकर, लक्ष्मणभट निघोजकर, आत्माराम पुराणिक पुणेंकर, आत्माराम भट महादेव शेंदुर्णीकर, नाना वैद्य कान्हूरकर, सखाराम जोशी पैठणकर, सुभावधानी द्रवीड कांचीकर, नारायणीभट द्रवीड ताम्रपर्णीतीर, रंगनाथभट द्रवीड श्रीरंगकर, रामचंद्र भट द्रवीड चिंदबरक्षेत्र; व्यंकटभट द्रवीड मंडलेश्वरकर.

१२०-०-० श्रीसूर्यनारायणाचे ब्राह्मण असामीं १२ नमस्कारांबद्दल दर असामीस रु. १० प्रमाणे. १ यज्ञेश्वरदेव बेटावदकर, २ खंडभट तारे अंमलनेरकर, ३ नरहरभट गोरे बऱ्हाणपुरकर, सदाशिव भट टटू महेश्वरकर, ५ त्रिंबकभट कोरान्ने महेश्वरकर ६ केशवभट वैष्ण्व जुने इंदूर, ७ भटंभट घाणेकर, ८ रामभट तेलंग सरस्वतीकर, ९ दाजीभट महादेव नसीराबादकर, १ रघुनाथभट खेर बऱ्हाणपुरकर, ११ गंगाधरभट वेरुळकर, १२ रामचंद्रभट तारे अंध. येकुण असामी १२.

८४-०-० अर्ध्य प्रदानास ब्राह्मण असामी १२ दर ७ रु. प्रमाणें १ हरभट वरखेडकर, २ व्यंकटभट वेरुळकर, ३ बालंभट मांत्रिक जुने इंदुरकर, ४ वासुदेवभट तारे अमळनेरकर, ५ मनोहरभट तेलंग निसबत बापू रामचंद्र, ६ नारायणभट मांडे, निसबत बापू रामचंद्र, ७ विनायकभट जोशी, नाशिककर, ८ त्रिंबकभट पुरकर, महेश्वरकर, ९ तान्होबा शुक्ल रतलामकर, १० सितारामभट गलगटे अंबाडकर, ११ आत्मारामभट नवाथे, १२ त्रिंबकभट श्रीगोंदेकर. येकुण असामी १२

८४-०-० श्रीमृत्युंजयास ब्राह्मण असामी १२ जपास. दर असामी दक्षिणा ७ रुपये प्रमाणें. १ जयरामभट खोचे जांबगांवकर, २ तात्याभट पोळ पारनेरकर, ३ अप्पाभट दीक्षित भडकमकर, ४ नरसिंहभट तेलंग कुशतर्पणेकर, ५ शंकरभट तेलंग कुशतर्पणेकर, ६ चिमणभट गांडापूरकर, ७ बाबाभट देव जोशी जालणापुरकर, ८ नानाभट

कायथेकर, ९ भाऊभट पाठक पुणतांबेकर, १० श्री निवास द्रवीड, ११ राघवभट कांबळे उज्जैनकर, १२ सुब्बाभट क्रमपाठी मंडलेश्वरकर.

७५-०-० श्रीसप्तशती पाठास ब्राह्मण असामी ५ दर १५ रु.प्रमाणें १ जिजाबा पुराणिक, २ सोनभट गुरु पुरकर, ३ गंगाधरभट घायाळ उज्जेनकर, ४ वासुदेवभट बापट निसबत खासगीवाले ५ गणेशभट गोरे बऱ्हाणपुरकर.

३५-०-० श्रीगणपती सहस्त्रनामाचे पाठास असामी ५ दर ७ प्रा़े. १ गोविंदभट चांदवडकर, २ मोहनीराजभट सोलेगांवकर, ३ गजाननभट जोशी, ४ रामचंद्रभट रामदासी महेश्वरकर, ५ बापूभट बाबरकर.

४५-०-० श्री नवग्रहाचे जपास ब्राह्मण असामी ९ दर ५.रु.प्रमाणें

१ सूर्याचे जपास, जटाशंकर जोशी
२ चंद्राचे जपास, मेघःश्यामभट जुने इंदुरकर
३ मंगळाचे जपास, नारायणभट जोशी
४ बुधाचे जपास, मुरलीधर जोशी, इंदूर
५ गुरुचे जपास, खुशालभट जोशी, जुने इंदूर
६ शुक्राचे जपास, शंकरभट जोशी, इंदूर
७ शनीचे जपास, दीनानाथ परसाई
८ राहूचे जपास, विनायकभट जोशी, धारकर
९ केतूचे जपास, गिरधरभट परसाई महेश्वरकर

६२५-०-० श्रीलघु लिंगाकडे (लिंगार्चन) ब्राह्मण १२५ दर असामी रु.५ प्रमाणें आकार रु. ६२५ सर्व ज्ञातीतील ब्राह्मण मंडळी १२५

६२५-०-० श्रीशिवपंचाक्षरी जपास ब्राह्मण असामी सु.१२५ दरदक्षिणा रु.५ प्रमाणें दक्षिणी, माळवी, नेमाडी, गुजराथी, पंचद्रावीड, वगैरे मंडळी जपास.

.............
२०२९-०-०

५००३-०-० श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांचे तर्फे अनुष्ठानादि जप वगैरे :

४०-०-० बाडांत श्रीदेवाकडे अभिषेकास ब्राह्मण आसामी ५ दर ८ प्र. १ यशवंतभट रावबा, २ बाबाभट चौधरी कोपरगांवकर, ३ नारायण भट रोडे संवत्छर कोकमठाणकर, ४ वासुदेवभट दीक्षित चांदवडकर, ५ विठ्ठलभट वैद्य चांदवडकर.

१५४-०-० श्रीशिवकवच पाठ दोन येकुण ब्राह्मण असामी २२ दरदक्षिणा ७ प्रमाणें. ही ब्राह्मण मंडळी उज्जैन, इंदूर, खानदेश, वऱ्हाड पुणेंकडील सर्वत्र शिवउपासक.

६६-०-० श्रीपार्थिव लिंगाकडे ब्राह्मण असामी ११ दर असामी दक्षिणा रु.६ १ मोहनीराजभट लोणकर, २ महिपतभट निसबत फडणीस, ३ व्यंकटभट फेरीवाले, ४ रामकृष्णभट व्यास उज्जनीकर, ५ धोंडभट आवटे राहुरीकर, ६ नारायणभट तेलंग मंडलेश्वरकर, ७ कचेश्वरभट नाशिककर, ८ विठ्ठलभट नेवासकर ९ रामचंद्रभट बडोदेकर, १० विठ्ठलभट सोलेगांवकर बडोदकर, ११ बालंभट वरीकर बडोदे.

२५-०-० श्रीतुळसी प्रदिक्षणेस ब्राह्मण असामी ५ दर ५ रु.प्रमाणें दक्षिणा. १ बाळंभट महेश्वरकर, २ मैराळभट सिहूरकर, ३ गोपालभट राजपूरकर, ४ केशवभट लोंढे अष्टेकर. ५ भिऊभट बीडकर.

२५-०-० श्रीअश्वस्थ प्रदक्षिणेस ब्राह्मण असामी ५ दर रु. ५ प्रमाणें १ त्रिंबकभट गोसावी महेश्वरकर, २ भिकंभट पंढरपूरकर, ३ रंगभट श्रीगोंदेकर ४ सीताराम नेवासकर. ५ शामभट द्रावीड.

३५-०-० श्रीगीतापाठास ब्राह्मण असामी ५ दर, ७ रुपये प्रमाणें : १ दामोदरभट नाशिककर, २ रघुनाथभट लोणकर, ३ सदाशिव भट औरंगाबादकर, ५ गोपाळभट नवाथे टोंकेकर, ५ नारायणभट महतपूरकर.

८-०-० श्रीरुख्मिणी स्वयंवरपाठास, त्रिंबकभट पुणतांबेकर हालवस्ती उज्जनी.

३५-०-० श्री आदित्यपाठास (आदित्यहृदय) ब्राह्मण आसामी ५ दर ७ रुपये प्रमाणें.

१ विश्वनाथभट नारायणगांवकर, २ अप्पाभट महेश्वरकर ३ सखारामभट औरंगाबादकर, ४ पंढरीनाथभट पंढरपूरकर, ५ पांडुरंगभट कोपरगांवकर.

१५-०-० श्रीभागवतांतर्गत दशमस्कंन्धपाठास विनायकभट पुराणिक नेरकर.

७७-०-० श्री महिम्नपाठास ब्राह्मण असामी ११ दर ७ प्रमाणें. १ द्वारकानाथभट जोशी, २ केशवभट तापीकर, ३

सखारामभट धनेश्वर खरगोणकर, ४ वासुदेवभट बेडेकर, ५ गणेशभट पारोळकर, ६ व्यंकटभट खरगोणकर निस्बत दाजी ७ रावजीभट उपासनी उज्जनी, ८ बाळंभट सांब महेश्वरकर, ९ रामभट तेलंग खोजे, १० गणेशभट पारोलकर, ११ नारायणभट पुणतांबेकर.

२१-०-० श्रीव्यंकटेशस्तोत्र पाठास आसामी ३ दर ७ रुपये प्रमाणें. १ सिद्धेश्वरभट गोसावी, २ काकंभट, ३ गोविंदभट.

६-०-० श्रीरामनामजपास अमृतभट निसबत पीतांबरशास्त्री.

१०-०-० श्रीअध्यात्मरामायण पारायणास, राधाकृष्ण जोशी बंधू

५४०-०-० श्रीलघुलिंगाकडे (लिंगार्चनाकडे) ब्राह्मण असामी १०६ दर ५ प्रमाणे दक्षिणा. महाराष्ट्रीय, मालवीय, गुजराथी, नेमाडी, खानदेशी वगैरे ब्राह्मण असून दर ५ रुपयेप्रमाणें दक्षिणा. आकार १३० जास्त आकार १० एकंदर ५४० रुपये.

८१२-०-० श्रीशिवपंचाक्षरी जपास ब्राह्मण १६१ ही सर्व शिवभक्त मंडळी.

५६५-०-० आश्रित मंडळी असामी ३७ यांस बिदागी. रामचंद्रभट उपाध्ये रु.२५ व हस्तक इसम २ यांस १०, दाजीपुराणिक खुद २५ व पुत्रास १५, वेणीमाधव पुराणिकास २५, मुग्दल नाना पुराणिक रु.२५, व्यंकटराम शास्त्री २५, बापू शास्त्री रामपुरेकरास खुद व पुत्रास रु. ५५, सूर्यनारायण शास्त्री खुद व पुत्र रु. ७५, दुबे शास्त्री २५, पितांबर शास्त्री चोपडेकर २५, काशीनाथबुवा १५, मोतीराम जोशी १५, अयाचित तेलंग असामी २ रु. २५, चिमणभट शास्त्री पितांबर शास्त्रीचे बंधु रु.२०, राधाकृष्ण जोशी कोचकर रु.१५, दुर्गाशंकर जोशी गुजराथी रु.१५, गजाननभट भानपुर येथील छत्रीकडील रु.१०, बालंभट जोशी खेडकर निसबत खासगीवाले १०, चंद्रभान जोशी रामपुरेकर १५, नाना दीक्षित पटवर्धन २०, राघवभट खेडावाल, सं. विठ्ठल मंदिर २०, जयकृष्णशास्त्री २५, उदेराम जोशी रामपुरेकर १०, हरीराम वैद्य महेश्वर १०, घट्याळची, रामलाल नागू,

जंगलानागू वगैरे यांस १०.

१३०७-०-० शिष्टमंडळी (वर नाव निर्देश जाहल्यांपैकीं) जटापाठी, घनपाठी, विद्वान ब्रम्हवृंदास जादा बहुमान.

५७२-०-० श्रीदेवस्थानें निहाय चातुर्मास्य. बेल, तुळसी, फुले, समर्पण करण्यास इसम ६८, देवस्थानें, श्री इंद्रेश्वर, श्री हरसिद्धी, श्री विठ्ठल मंदिर, श्री सूर्यकुंड, श्री कृष्ण मंदिर, -जुने इंदूर, श्री राम मंदिर,- जुने इंदूर, श्री खंडेश्वर महादेव छत्रीनजीक, श्री गणपती मंदिर, जुने इंदूर, श्री खेडापती मारुती, श्री भैरव विठ्ठलाच्या मागे, श्री जगन्नाथराय - टाकसळेनजीक, श्री बाणेश्वर बाणगंगा, श्रीराम मंदिर, माणिक चौक, श्रीराम मंदिर चौत्र्यानजीक, श्री देवगुराड्या घुटकेश्वर. श्री हतोद येथील श्री घमंडेश्वर व श्री नीलकंठेश्वर, गौतमपुर गांवीं श्री गौतमेश्वर महादेव, जांबघाट येथील कैलासकुंडावर कैलासपती महादेव, शेमरुड येथील नीलकंठेश्वर, श्री ओंकारेश्वरीं लक्ष बेलपत्र, श्री लक्ष्मी नारायण नर्मदा दक्षिणतीर, श्री विमलेश्वर महादेव, श्री ओंकारेश्वरीं अभिषेकास ब्राह्मण, श्री क्षेत्र उज्जेनास श्री महांकाळेश्वरास लक्ष बेलपत्र, श्री हरसिद्धी देवी, श्री अगस्तेश्वर, श्री नागचंडेश्वर, श्री कालिका, श्री बृहस्पतेश्वर, श्री मंगळेश्वर, श्री काळभैरव, श्री चिंतामणी गणपती, श्री मनकामेश्वर, श्री जबरेश्वर, श्री गणपती विठ्ठल महादेवांनीं स्थापिला तो, वगैरे देवतांकडे अर्चाबद्दल खर्चसदरी.

४०-०-० कन्यादान, ब्राह्मण निसबत लाला ख्यालिराम, निसबत जनरल मालकम.

३७५-०-० संस्थान महेश्वर येथील देवस्थानांकडे पूजा, अर्चा, बेल, तुळसी, लक्ष वहाण्याकडे व अनुष्ठानाकडे व सिध्या सामानाकडे खर्च मार्फत राजश्री गोपाळ गोविंद दिवाण खासगी.

२५०-०-० ब्राह्मण मंडळी, चातुर्मास समाप्तीचे दिवशीं, आशीर्वाद देण्यास आली त्यावेळेस भूयसी दक्षिणा वाटली.

-----------

५००३-०-०

५३-०-० आचारी, पंक्तीकडे. शंकरभट, नरसिंव्ह भट कानडा, गणेशभट कामरगांवकर व अन्नसत्राकडे रामभट तैलंग सितामहूकर, बापूभट, महिपतभट.

३२-०-० खटपटे आसामी ११ पाणके आसामी ४ शेवटीं अन्नसंतर्पणाचे दिवशीं.

----------

७१३३-८-०

येकुण सदरीलप्रमाणें श्रावणमास निमित्य खर्च श्रीदेवी अहिल्या मातोश्रींचे कारकीर्दीप्रमाणें चालू आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 168 1820 A.D.

A full account of the expenses incurred in the Sravan Month on behalf of the Ruler and his mother. The various forms of worship together with a detailed list of the Bramhins engaged in the service, hailing from all holy places of India is the noteworthy feature of the list.

---

**अ. नं. १६९** **श्री**

इसवी सन १८२०

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. चौथे जार्ज गादीवर आले. त्यांचे तर्फेने सर जान मालकमसाहेब वकील आहेत. सबब ३४५० इजाफत जमा विठ्ठल महादेव यांजकडील : नवे पातशहा गादीवर बसले सबब बहुमान पोषाख वगैरे.

२७०० मालकमसाहेबांस कंठी मोत्यांची रुपये १०००, शिरपेंच ५०० रुपये व हत्ती रुपये १२००

७०० वेलस्लीसाहेबास कंठी मोत्यांची रुपये ३५०, शिरपेंच रुपये ३५०

ह्याप्रमाणें दिले. विद्यमान राजश्री गोपाळराव गोविंद खाजगीवाले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 169 1820 A.D.

List of presents to Sir John Malcolm as Ambassador of His Majesty George IV on his accession-day, and to Wellesley.

---

अ. नं. १७० **श्री**

ता. २० डिसेंबर, इसवी सन १८२०

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. वरात विठ्ठल महादेव यांचे नांवें. सरकारांत जागा खरेदी महालवाड्याचे लगती दक्षिणचे बाजूची त्याचे किंमतीबद्दल असामीवार हल्लीं शिक्का.

| | | | |
|---|---|---|---|
| ६५ | भवानी सोनार ऐन ४० बक्षीस २५, | ६६ | नाथू पहाडी ऐन ४१ बक्षीस २५ |
| २०० | नगजीराम जती ऐन ७५ बक्षीस १२५, | ६३ | भवानी सोनार ऐन ३८ बक्षीस २५ |
| ७४ | नाथू ओसवाल ऐन ४५ बक्षीस २५ | | |

सदरहू चारशें चौसष्ट रुपये हल्लीं शिक्का छ २४ मार्गशीर्ष वद्य १

**सरकारी रेकॉर्ड**

No. 170 20-12-1820 A.D.

New plots of land purchased round about the Palace for Rs. 464/-, paid to their respective holders.

---

अ. नं. १७१ **श्री**

इसवी सन १८२१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. रामचंद्र पंडित नरसिंगपूरकर, कोल्हापूरचे बाबा महाराज राजगुरु, ही मंडळी आली सबब संभावनाय; खासे गुरुस ५००, रामचंद्र जोशी १००, गोपीनाथ शास्त्री वाईकर १०० व शिष्ट ब्राह्मणांस १३० व इतर ब्राह्मण, बायकांस वाटले ५४७; येकुण रु.१३७७.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 171 1821 A.D.

Rupees 1,377/- were distributed among the Brahmins learned as well as otherwise who came here from Kolhapur. The Rajguru was one of the recipients of the honour.

---

अ. नं. १७२ **श्री**

इसवी सन १८२१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. रु.१०० इजाफत जमा विठ्ठल महादेव; नागार्जुन भारती संस्थान श्रीमातापुर माहूर यांजकडे भंडारा जाहला. हिरापुरी हुजूर पत्र घेऊन आले. सबब रुपये हल्लीं शिक्का, मिती आषाढ शुद्ध ५ स तुम्हांकडून देवविले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 172 — 1821 A.D.

Rupees 100/- were paid to Hirapuri who came here from Sansthan Sri Matapur, Mahur, where food was already distributed.

---

**अ. नं. १७३ — श्री**

इसवी सन १८२१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. पावती संस्थान नरसिंगगड येथील सरकारचा ठराव सालगुदस्त संमत १८७७ चे सालाबद्दल घेणें रु. ४८००० हजार सालमशाही जमा असे. छ ५ सवाल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 173 — 1821 A.D.

The tribute Rs. 48,000/- for Samvat 1877 - from Sansthan Narsinggad was received and receipt passed.

---

**अ. नं. १७४ — श्री**

विशेष. नादार भुमिया याचा टाका प्रगणे महेश्वर, चोळी, बागदरा वगैरे ठिकाणीं आहे. त्याजबद्दल जनरल मालकमसाहेब यांनीं ठराऊन दिला रुपये ४४५ टाका.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 174

The Sum of Rs. 445/- was agreed to, as compensation to Nadar Bhumia for his Tanka on Maheshwar. Choli, Bagdara etc, according to the decision of Sir John Malcolm.

---

अ. नं. १७५ **श्री**

माहे चैत्र १२३१, इसवी सन१८२१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. मेजवानी जनरल आक्टर लोणीसाहेब दिल्लीहून आले, त्यांनीं खाशास (श्रीमंत मल्हारराव होळकरांस) इंदूर छावणींत जाफयत (मेजवानी) केली व श्रीमंतांस दागिने दिले त्याचे किंमतीबद्दल.

२८५५ खाशाकडे जवाहीराचे दागिने कंठी, शिरपेंच, मोत्यांचा तुरा, पोच्या, जमा.

७५ घोड्यास चांदीचे दागिने (खाशाचे)

.........

२९३०

**सरकारी रेकॉर्ड**

No. 175 1821 A.D.

General Octorlonee offered a banquet to the Maharaja and presented ornaments worth Rs. 2,930/-.

---

अ. नं. १७६ **श्री**

इ. स. १८२१

रोजकीर्द सन १८२१ इसवी सालचे.

८५६-१०-० गजदान सकलपीडा परिहारार्थ देणें. अरुणाचल शास्त्री, मार्फत सूर्यनारायण शास्त्री काशीकर.

० -४-० श्रीगणपती पूजन

११-६-० प्रतिमा पवित्र सोने वजन मासे १०

१-०-० शस्त्रे, ढाल, तरवारीबद्दल

८००-०-० दक्षिणा गजापुढें ५०, ब्राह्मणाचे पूजेस २५ दान सांगता ७२५

४४-०-० भूयसी दक्षिणा शिष्ट ब्राह्मण रु. ४० इतर ४

.................

८५६-१०-०

**सरकारी रेकॉर्ड**

No. 176 1821 A.D.

Charity of an elephant made to a Shastree for the removal of all

evils. Details of expenses come up to the sum of Rs. 856-10-0

---

अ. नं. १७७ **श्री**

इ.स.१८२१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. मातोश्री कृष्णा मासाहेब होळकर यांजकरितां श्री मुरलीधराची मूर्ती सोने तोळे ७ ची मार्फत कृष्णाजी विठ्ठल वरात विठ्ठल महादेव यांचे नांवें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 177 1821 A.D.

Purchase of a gold idol of Shree Murlidhar for Srimant Krishan Ma Saheba Holkar.

---

अ. नं. १७८ **श्री**

ता. ४ एप्रिल, इसवी सन १८२२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून बजाजी गणेश कमाविसदार वाफगांव वगेरे यांसी. विशेष. मौजे कोरेगांव भीमातीर हा गांव सरकार इनामी व तेथील पाटीलकी सरकारची देशमुखी दुसरियाची. देशमुखीचे कर्जामुळें देशमुखीचे वतन फरोक्त करितांत. येविषयीं इंग्रज सरकाराकडे जाहीर करून आमचेकडे विचारणा आली कीं, गांव तुमचा व मोकदमीही तुमची, तरी देशमुखी तुम्हीच खरीदी करावी हे उचित. किंमत ३५०० साडेतीन हजार ठरली.

एक महिन्याची मुदत ठराऊन सरकारांत विनंती लिहिली आहे, तरी आज्ञा यावी. ऐसियास गांव आपला मोकदमीसह. ते पक्षीं देशमुखी दुसरें खरीदी करतील असे होऊं नये. फरोक्त करणारासीं बोलून किंमत कांहीं कमी करून वतन खरेदी करावें. खरेदीखत कागदपत्र जमीदारासह पक्का बंदोबस्ते करून, इंग्रजीत इतल्ला देऊन त्यांचे सल्ल्यानीं किंमतीचा ऐवज जो देणें ठरेल त्याजबद्दल तुमचें पत्र आले म्हणजे सरकारांतून सरबरा करून ऐवज पाठविला जाईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 178 4-4-1822 A.D.

The Kamavisdar of Wafgaon etc. is ordered by Maharaja Malharrao

Holkar that the Deshmukhi Vatan of Koregaon is out for sale. It is Convenient for us to purchase the same. Make proper inquiries and let us know the price of the said Vatan.

---

**अ. नं. १७९** **श्री**

ता. १० एप्रिल, इसवी सन १८२२

श्रीमंत महाराज मल्हारराव होळकर यांजकडून रतनचंद कोठारी यांस विशेष. तालुके नंदवाई (मेवाड) येथे कसब्यांत सरकारी ठाणें आहे. तेथील गढी जीर्ण होऊन पडली. मजबूत जागा नाहीं. रांगड्यांचा नेहमी उपद्रव, यास्तव गढी चांगली मजबूत बांधावयाची ठरून त्याचे खर्चाचा अंदाज रुपये तीन हजार ३००० पर्यंत लावून चांगली गढी तयार करावी. छ १७ रजब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 179 10-4-1822 A.D.

Ratanchand Kothari is ordered by Maharaja Malharrao Holkar to repair the fortress of Kasba Nandwai at a cost of about Rs. 3,000/-

---

**अ. नं. १८०** **श्री**

ता. २७ जून, इसवी सन १८२२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून वर्तमान भावी कमाविसदार प्राो अंबाड यांसी विशेष. कृष्णभक्त गोपीराजबाबा सदावर्ती मौजे ढाकफळे प्राो मजकुर यांनीं सरकारांत विदित केलें कीं, आम्ही आल्यागेल्या अतिथीस सदावर्त देत असतो यास्तव सरकारांतून नूतन वार्षिक करून दिल्यास श्रेयस्कर होऊन श्रेय सरकारांस आहे म्हणोन त्याज वरून : गोपीनाथ बाबा यांजकडे परगणे मजकुर येथील रैयत निसबत सालिना रु ५० पन्नास द्यावयाचे करार करून हे सनद सादर केली असे दरसाल सदावर्त निमित्य गोपीनाथ बाबांस शिष्यपरंपरें देत जाऊन नवीन पत्रांचा आक्षेप न करितां या सनदेची प्रत लिहून घेऊन अस्सल पत्र बाबांकडे भोगवटियास परतोन देणें. छ ७ सवाल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 180 27-6-1822 A.D.

The Khmavisdars of Ambad (present and future) are ordered by

Maharaja Malharrao Holkar to pay annually Rs. 50/- to Gopiraj Baba Sadawarti on behalf of the Ryots of the Pargana, for distribution of corn etc. to strangers visiting the locality. The gift is to continue from disciple to disciple.

---

**अ. नं. १८१** **श्री**

ता. २१ फेब्रुवारी, इसवी सन १८२३

| श्री एकवीरादेवी चरणीं तत्पर<br>विठ्ठल महादेव निरंतर |
|---|

रा.विठ्ठल महादेव यांजकडून. मंडलोई, कानुगो प्रगणे बासवा सरकार बिजागड, यांस विशेष. राजश्री कृष्णराव माधव सरमंडलोई सरकार मजकुर यांसी मौजे सनावद परगणे मजकुर येथें इनाम जमीन बाग करावयास बिघे सुमारी ३० तीस जमीन रैयती, बंजड, द्यावयाचा ठराव करून हे पत्र तुम्हास सादर केलें असे, तरी सदरहू ३० बिघे जमीन चतुःसीमा हदहदुद मोजून चकनामा करून देणें, या पत्राची नक्कल करून घेऊन अस्सल भोगवटियास माघारीं परतोन देणें. जाणिजे छ ९ जमादिलाखर. मोर्तबसुद.

**जहागीर रेकार्ड**

No. 181 21-2-1823 A.D.

The Mandloi, and Kanungo, of Pargana Baswa (Sarkar Bijyagad) is informed by Vithal Mahadeo that land measuring 30 Bighas is granted Inam for gardening to Krishnarao Mahadeo Sarmandloi; the officers are asked to take the necessary steps as usual.

---

**अ. नं. १८२** **श्री**

ता. २७ आगस्ट, इसवी सन १८२३

रा.विठ्ठल महादेव यांजकडून उमेदसिंग कानुगो प्राो चोळी मुक्काम महेश्वर यांसी विशेष : मौजे बरड्या व कानाखेडी ताो चोळी येथें पटवारी कोणी राहिला नाहीं. गांव उद्ध्वस्त जाहले, ते आबाद होऊन सरकारी जमा उत्पन्न झाली पाहिजे म्हणोन समजलें. यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी हरदु गांवीं इस्तवारी करून वस्ती करणें. तेथील

पटवारपणाचा हक्क रुसूम सिरस्ते माफिक घेत जाऊन खातरजमेनें सरकारी जमा कायम करावी. मागेपुढें पटवारपणाचा दावा कोणी करील त्यास ताकीद केली जाईल. हरएक विषयीं अंदेशा न ठेवितां गांवची आबादी करणें. संमत १८७९ जाणिजे छ. १८ जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**महेश्वर रेकॉर्ड**

No. 182 27-8-1823 A.D.

The Kanungo of Pargana Choli is ordered to populate Mauzas Baradya and Kanakhedi as they are at present, quite deserted. The Patwariship is granted to you. Try to make the villages abound with product and population.

---

**अ. नं. १८३** **श्री**

ता. २९ आगस्ट, इसवी सन १८२४

विठ्ठल महादेव यांजकडून राव नाहरसिंग (चंद्रावत) रामपुरा यांसी विशेष. तुम्ही दसरा रामपुऱ्यास वेगळा करून हेला मारूं नये म्हणोन पत्र पाठविले होते. परंतु त्या पत्राचे उत्तर देखील न देतां, वेगळा दसरा करून हेला मारिला. याजकरितां साल मजकुरीं गुदस्ताप्रमाणें कराल यास्तव आगाऊ सूचनार्थ लिहिलें आहे. तरी रामपुरियांस वेगळा दसरा न करितां हेला मारूं नये कदाचित वेगळा दसरा करणेच असेल तर तुमचे जहागिरीचे गांव आहेत तेथें जाऊन दसरा करून हेला मारावा. रामपुरियास करणें तर कमाविसदारा समागमें शिलंगणास जाऊन ते सरकारांतून हेला मारतील त्याव्यतिरिक्त दुसरा तुम्ही मारूं नये. यावर तुम्ही वेगळा दसरा करून हेला मारल्यास उत्तम होणार नाहीं. परवानगीखेरीज होऊं पावणार नाहीं. हा मजकुर आम्ही येथें बडेसाहेबांसही सांगितला आहे. यावर तुम्ही हेला मारलाच तर तेथें सरकारी पागा आहे ते मना करतील. तुम्हांस हेला मारूं देणार नाहींत. बहुत काय लिहिणें हे विनंती. सन १२३४ मिती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 183 29-8-1824 A.D.

Rao Naharsing Chandrawat of Rampura is taken to task by Vithal Mahadeo Jog for setting aside the Court order regarding Dasera

celebrating and the killing of a buffalo last year. He is pre-warned this year with the cognizsance of the English Resident.

---

**अ. नं. १८४** **श्री**

१५ आक्टोबर, इसवी सन १८२४

विठ्ठल महादेव यांजकडून राव नाहरसिंग चंद्रावतांस विशेष. तुम्हांस ताकीद केली असतां तुम्ही पत्र पाठवून कळविलें कीं, आम्ही हेला आमचे दाराशीं मारला. सदर संबंधात इकडून व साहेबांकडून तुम्हास लिहिलें गेलें असतां तुम्ही ध्यानांत न आणितां गांवांत म्हैसा मारिला. त्यास येथील व साहेबांकडील लिहिणें व्यर्थ जाहलें. तुमचे विचारास आलें त्याप्रमाणें केलें. हर हमेश तुम्ही गैरमार्गे चालितां याचा विचार करून बंदोबस्त करावा लागेल. शहरांत राहून सरकार-हुकमाखेरीज वर्तणूक तुम्ही करूं लागल्यास पार पडणार नाहीं. हे पुरतेपणें ध्यानास आणून हलके माणसांचे नादीं न लागतां मार्गानेच चालावें यात तुमची दुरस्ती आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 184 15-10-1824 A.D.

Rao Naharsing Chandrawat is reprimanded by Vithal Mahadeo for setting aside the pre-warned notice regarding the slaughter of a buffalo in Rampura.

---

**अ. नं. १८५** **श्री**

ता.५ एप्रिल, इसवी सन १८२५

| श्रीम्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून वे.शा.सं.विश्वेश्वर शास्त्री वास्तव्य श्री क्षेत्र काशी यांस विशेष. शके १७४७ पार्थिवनाम संवत्सरे तुम्ही इंदुरचे मुक्कामीं हुजूर येऊन विदीत केलें कीं, आमचे वडिलांस कै. थोरले मुभेदार यांनीं मौजे गंगापूरा व मौजे अवरंगपुरा, प्रगणे टोंक हे गांव धर्मार्थ दिले होते. त्याची वहिवाट बहुत दिवस चालली, आलीकडे तो महाल नबाब मीरखां यांजकडे सरकारांतून दिल्यावर त्यांनीं गांवची वहिवाट चालू दिली

नाहीं. सरकारांतून ताकीद करण्यांत आली असतांही गांव न सोडले. सबब सरकारांतून कृपा करून हरदुगांवचे मुबादला दुसरें जागा आधार अवलंब करून दिल्यास त्याजवर योगक्षेम चालवून स्नानसंध्या घडून सरकारचे अभीष्टचिंतन करीत जाऊं. म्हणोन मनास आणितां तुम्ही ब्राह्मण सत्पात्र स्नानसंध्याशील षट्कर्मी तुमचें चालविणें आवश्यक, सरकार दौलतीस श्रेयस्कर जाणोन मौजे सुजानपुरा तालुके भानपुरा हा गांव हक्कदार व इनामदार व जकात उभा मार्ग खेरीजकरून थलमोड, थलभरीतसुद्धां साल मजकुर पासोन धर्मार्थ इनाम देण्याचे ठरून अलाहिदा भोगवटियासी वर्तमानभावीं कमाविसदार यांचे नांवें सनदा पत्रें लिहून देऊन हें पत्र तुम्हास लेखन केलें असे. तरी तुम्ही मौजे मजकुर हा गांव तुम्ही आपले दुमाला करून घेऊन अनुभवीत, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें जाणें. छ १५ साबान श्री मोर्तब.

**जहागिरदार रेकार्ड**

No. 185 5-4-1825 A.D.

Vishweshwar Shastree resident of Benares is granted hereditarily Mauza Sujanpura (Taluka Bhanpura) by Maharaja Malharrao Holkar in lieu of the old granted villages now transferred under Nawab Mir Khan's rule.

---

**अ. नं. १८६** **श्री म्हाळसाकांत**

ता. २६ जून, इसवी सन १८२६

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर निसबत रावजी त्रिंबक यांचे कारकीर्दीचा जमा खर्च सन १२३५ चैत्र ताा माहे ज्येष्ठ सन १२३६.

जमा :

१३८६१०-१४-३ शिवाय जमा.

१०४३४०-००-० नजराणा.

१००००००-०-० नबाब गफूरखां मृत्यु पावले त्यांजला दत्तक पुत्र केला सबब ठराव हल्लीं शिक्का रु. २०००००० यांसीं भरणा. १९७२२२-३-० प्रत हल्लीं शिक्का २७७७-१३-० प्रत वैशाख शुद्ध ....... १० हल्लीं शिक्का २०००००-०-० पैकीं

वजा खासगीकडे रुपये १००००० बाकी.

४३४०-०-० इतर जमीदार वगैरे लोकांकडील नजराणा (कागद जळाला सबब नांवाचा खुलासा करण्यास साधन नाहीं.)

.....................

१०४३४०-०-०

४४४०-००-० दरबार खर्चाबाबत.

१०५०-००-० खुर्द्याचे टाकसाळीपैकीं.

५६०५-००-० सरकारी आहेरा बाा ऐवज वसूल आला तो.

२२४८-००-० कसरखातें जमा.

३६२०-००-० गुन्हेगारी बाा १७७५, रोजीन्या ब।। २५१,देपालपूर १५०३ बाळाजी गोपाल, मीठाचे हसीला बाा ९१, येकुण सदरी.

३६-००-० कबाले, जागेचे कसबे इंदूर येथील.

१०८-१०-० कर्ज चौथान चंदोडी कुणबीन रामपुरेकर इचें कर्ज वसूल केलें.

१२९६३-०४-३ आफिम इजारा ५००, आफिम जप्ती. ८३७३-१२-६ कलाली २७७५, चौत्रा लष्कर बाजार १३१७-७-९, येकुण.

४२००-००-० वणजारियांचा तांडा सरकार हद्दीतून गेला, महसूल.

२८२-०६-० व्याज खर्च, कामगारी इंग्रज सरकारचे लाट साो कडे नजराणा पाठविला त्याचा खर्च. सावकार गणेश विठ्ठल, मगनीराम जोरावरमल यांचे ऐवजाचे व्याज.

..................

१३८६१०-१४-३

येणेंप्रमाणें असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 186 26-6-1826 A.D.

A part of the Account-sheet of the State in 1826 A.D.

---

अ. नं. १८७ श्री

ता. २९ सप्टेंबर, इसवी सन १८२६

कप्तान इसपीयर साहेब बहादुर भोपावराहून गोपाळ त्रिंबक-होळकर सरकारचे वकील यांसी विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पाऊन मजकुर ध्यानीं आला. त्यास पेशजी मोतीकुंवर झाबल्यास होते ते वेळेस मोतीकुंवराचा कांहीं बंदोबस्त जाहला नाहीं. त्यामागें राजगड पाटणास आपले मामाकडे मोतीकुंवर गेले, इतके दिवस तेथेंच होते, परंतु बडेसाहेबांची स्वारी भेलशाकडे गेली त्यावेळीं मोतीकुंवर बडेसाहेबाशीं भेटला, साहेबाबरोबर इंदुरास आला. त्यावरून बडेसाहेबांनीं आम्हास लिहिलें कीं, मोतीकुंवराचा बंदोबस्त करून देणें. त्याजवरून आम्ही झाबव्यास राजास व कुंवरजीस लिहून पाठविलें, परंतु झाबवेवाल्यानीं कांहींच बंदोबस्त केला नाहीं. त्यावरून बडेसाहेबास कळविलें कीं, झांबवेवाले कांहींच बंदोबस्त करीत नाहीं, परंतु एक तजवीज आहे कीं, खवासा तालुका मोतीकुंवरास देवावा. त्याजवरून होळकर सरकार तर्फे बोलण्यांत आले कीं, आम्ही राजी आहोंत आमचे २२०० रुपये टाक्याचे आले म्हणजे झाले. तेव्हां बडेसाहेबांनीं बावीसशें रुपये टाका ठराऊन आम्हास लिहून पाठविलें, त्यावरून खवासा येथील सनदापत्रें होऊन वर्तमान तुम्हास लिहून पाठविलें आहे. हल्लीं टाका रुपये १५०० व दरसाल टाका रुपये १०० वाढत जाऊन सात वर्षांनीं बावीसशें रुपये पूर्ण होतील. म्हणोन बडेसाहेबांनीं ठराव करून दिला. तुम्ही लिखतंग करून घेऊन नकला इकडेस पाठविणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 187 29-9-1826 A.D.

The ambassadar of the Holkar Goverment is informed by the English Resident of Bhopawar. It is decided, with the consent of the Holkar Government that Moti Kuwar be granted Khawasa Taluka, on condition of his paying an annual Tanka of Rs. 1,500/-, gradually rising up to Rs. 2,200/- within 7 years.

---

अ. नं. १८८ श्री

ता.८ डिसेंबर, इसवी सन १८२६

महाराज मल्हारराव होळकर यांचे रोजकीर्दीवरून विशेष. श्री जगन्नाथ, हरिद्वार, वगैरे उत्तर प्रांतीं व दक्षिणेस तुळजापूर पंढरपूर वगैरे क्षेत्रीं कै.बाईसाहेबांनीं (अहिल्याबाईनीं) जागा बांधिल्या व बाग तळे, मळे वगैरे केलें आहेत. तेथील वहिवाटीस कोठेंकोठें खलेल पडते.

ते न पडतां पेशजीप्रमाणें वहिवाट चालावी. तीर्थस्वरूप कै. खंडेरावबाबा यांची छत्री कुंभेरीस आहे. तेथील खर्चास भरतपुरकर यांनीं तीन गांव लावून दिले आहेत. ते चालत आले असतां अलीकडे भरतपूरकरांचे गृहकलहामुळें कारभारी यानें गांव जप्त करून ठेविले. त्याजकरितां लाला लडेतीलाल येथील चकत्या देऊन पाठविले आहे. गांव मोकळे होऊन छत्रीचे खर्चास लागले नाहींत. पुजारी वगेरे इंदूर मुक्कामीं येऊन बसले आहेत. याजकरितां गांव मोकळे होऊन तेथील खर्चाची व्यवस्था चालवावी. म्हणोन वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 188 8-12-1826 A.D.

It is noted that the Charitable Institutions of the late Devi Ahilyabai are receiving a set-back in Sri Jagannath and Hardwar in the North, as well as at Tuljapur and Pandharpur etc. in the south. The Chhatri of the late Khanderao Baba has also come under the same category. Steps are taken to relieve the granted villages now confiscated.

---

**अ. नं. १८९** **श्री**

इ.स.१८२७

हुजूरदाराकडून होळकर दरबाराकडे पत्र दिवाणाकडे. स्वामींचे सेवेसीं सेवक माधवराव मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल मार्गशीर्ष शु.१ पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजें. विशेष इकडील मजकुर.

१ लाट गव्हर्नरसाहेब हल्लीं येणार म्हणोन वर्तमान. संकेताप्रमाणें येतील. पूर्वी संमत १८८३ चे सालीं एक वेळां आगऱ्यास आले होते ते समयीं आपले सरकारांतून त्यांचे सामोरे मंडळी बहुमानास रवाना झाली त्याचअन्वयें येथूनही बुळे यांजला रवाना केलें होते. त्या वेळची माहिती आपणास आहेच. हल्लीं लाटसाहेब येणार तेव्हां आपलेकडून बेत केलाच असेल. त्या अन्वयें येथेंही कळेल म्हणजे येथीलही तयारी करून रवानगीचा बेत करावयासी येईल. यास्तव मुद्दाम डाकेंत पत्रोत्तर यावें. पूर्वक्रमाप्रमाणेंच किंवा कमजास्ती जसे तेथें नेमांत आलें असेल तसें कळवावें म्हणजे येथील ही तयारी करावयासी नीट पडेल.

१ क्षेत्र वृंदावन येथील गांव बैरागियाने दाबले त्याजविषयीं आपणास पत्रें लिहून बुधसिंगाची रवानगी केली. आपण येविषयींचा पक्का पुरकस करून शिंदेसाहेबांच्या सनदा बैराग्यापाशीं त्या खोट्या ठरविल्या म्हणोन बुधसिंग यानें सरकारांत लिहून कळविले. ऐसियासी यत्न केल्यासारखी गांवची मोकळीक

जाली पाहिजे. यास्तव लिहिलें आहे. तरी या संबंधीं दोन रुपये खर्च पडले त्यास हजार पांचशेंपर्यंत पडल्यास आपण देऊन गांवे आपले काबूत करून घ्यावे. जो ऐवज खर्च होईल तो आलमपुराहून देण्यांत येईल. सरकार आज्ञाही याच अन्वयें जाहल्यावरून लेखन केलें आहे.

१ संदलपुरवाले यांनीं अद्यापी बेपाऱ्यांची हडपे परत दिली नाहींत. तरी ताकीद करून वारंवार किस्सा न राहे तें करणें.

१ संस्थान अंगपातचे बागाकडे नजीक जमीन आहे ती बागाकडे लागांवी येविषयीं आशय पूर्वपत्रीं लिहिलाच आहे. ते पक्षीं जमीनीचा किस्सा पुनः न राहतां बागाकडे लागावी म्हणोन निखालस तजवीज जाहली पाहिजे.

१ पाटणकर याचे खटल्याबरोबर कारकून आपल्याकडील बालकृष्ण अबा व सरकारी सरंजामही आहे. तिकडून येतां खर्चास लागल्यास त्याचा बेत ठेवणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 189 1827 A.D.

Madhavrao Malhar inquires about the arrangement to be made respecting the arrival of the Viceroy.

Kshetras (Holy places) Brindaban and Angapat are noticed, and some new plans are suggested.

---

**अ. नं. १९०** **श्री**

इसवी सन १८२७

(लाटसाहेबांकडे डेप्युटेशन)

यादी आनरेबल नबाब लाटसाहेब बहादूर यांची मुलाखत :

१ प्रथम संमत् १८८३ इसवी सन १८२७ सालीं आयास स्वारी गेली तेसमयीं येथें रेसिडेंट मेहरबान वेलस्लीसाहेब व होळकर सरकारचे कारभारी रावजी त्रिंबक होते व स्वारीबरोबर बोर्तीकसाहेब होते. (डेप्युटेशनांत मंडळी रवाना झाली.) तपशील :

१ खुद अप्पासाहेब बुळे, २ दाजी मुनसी सरकारांतून, ३ आनंदराव बापूजी, जोग (किबे) यांजकडून होते. ४ म्हाळोजी बुळे, ५ गुलाम महमद साहेबजादे रिसालदार.

येणेंप्रमाणें रवाना झाले. तेथें लाटसाहेबांच्या दोन मुलाखाती जाहल्या. तेथून खिल्लत मार्फत राबीनसनसाहेब व दुयम बोर्तीकसाहेब.

१ खुद्द अप्पासाहेबांस, कंठी १ शिरपेंच जडावू १ व वस्त्रें ५ शालजोडी, दुपटा

तिवट, किनखाप महमुदी.

१ श्रीमंत होलकर सरकारांस कंठी मोत्याची १ शिरपेंच १ पोच्या २ रायफल १ व येक सोन्याची घडी व कांचेची चमणी भपका १.

१ साडेतीन वस्त्रें म्हाळोजीबाबांस. याप्रमाणें होऊन नंतर इंदूरचे छावणीत वेलस्ली-साहेबांचे भेटीस स्वारी गेली. त्यावेळीं होळकर सरकारांस बहुमान वर दाखविल्याप्रमाणें मिळाला व नंतर बडेसाहेब व बोर्तीकसाहेबाची स्वारी दरबारांत आली होती (महाराजांस पोहचविण्यास).

**श्री बुळे रेकॉर्ड**

No. 190 — 1827 A.D.

List of Sardars and others who waited in deputation on the Viceroy as Agra where the Maharaja paid a visit. Presents made are marked in detail.

---

## अ. नं. १९१ — श्री म्हाळसाकांत

इसवी सन १८२९

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

झडती महाल प्रगणे महेश्वर वगैरे सुभा राजश्री मल्हारराव होळकर विद्यमान शंकर त्रिंबक सुरुसन सलासीनमयातेनवआलफ. सन १२३९ संमत १८८६ छ ३ जिल्हेज ज्येष्ठमास ताा छ १३ जिल्हेज ज्येष्ठमास मुदतमास १२ दिवस जमा.

२४२७-२-० बाकी सालगुदस्त.

१४२१४-७-० जमा साल मजकुर ऐन जमा ९४४४-९-० इजाफत जमा रु. ४७६९-८-०.

................

१६६४१-९-०

प्रगणे महेश्वर येथील देह एकंदर ८७.

४० तालुके चोळी देह २० तालुके बागदरा देह २०

५ दिगर इनामी देह वगैरे.

१ मौजे खारिया श्री राजराजेश्वर महादेवाकडे.

१ मौजे बडवी समस्त ब्राह्मणांस.

१ मौजे मंडलेश्वर श्रीमंतांकडे.

१ मौजे जलकोटी भवानी नाइकाकडे (भोई).
१ मौजे असापूर ढोकलसिंग भूम्याकडे.
...
५
३ दाखली देह तीन. १ रहिमतपूर, १ गोरखपूर, १ रसूलपूर
१५ उजाड देह.
१ परगरसी देह मौजे समस्तपूर.
२३ बाकी आकारी देह २३ यांसी आकार.
१९ परगणे करही पैकीं वजा देह ७ सात.
२ परभारे वहिवाटीस. १ मौजे कुलात्या आबाकडे. १ मौजे बेलबावडी खासगीकडे.
५ उजाडी देह पांच.
१२ बाकी वसूली देह बारा.
....
१९
....
८७

शिवाय जमा. कलाली, पांढरी, जकात, राबणुक, गुन्हेगारी, घरभाडे वगैरे.
आकार १५७०-१२
इजाफत जमा रुपये २३५१
सरकारी कलमाबद्दल नादर भुम्या जामणेकर गुदस्तपैकीं रुपये १६६, फणशाचे छत्रीचे रुपये १५३, तगाई हुजूरहून देवविली रु २०३२-७-९
सावकारी देणें ते जमेस. गणेशदास किसनाजी, हरलाल सराफ, २४१८ ६-३ आत्माराम जीवन.
येकुण रु. १६६४१-०९-०
१३३२८-१३-३ ऐनखर्च.
११६-०४-३ मुजाफत खर्च.
..................
१३४४५-०१-६

श्रीमंत मातोश्री रेवाबाईसाहेब हरीराव होळकर यांजकडे खर्च रु.३०५-१४ मुदबक, तैवजखर्च, रोशनाई, शागीर्दपेशा पैकीं हुजरे वगैरे.

हुजरात पागा वगैरे कारखानेवार खर्च. रु.६२८९-०-९ पीलखाना सुद्धां किरकोळ मोघमपैकीं मजरा रुपये १५५-५-९.

६२-१३-० श्रीराजराजेश्वरमहादेव (कार्तवीर्य,) यांजवर मद्याचा अभिषेक ब्राह्मणाने चोरून केला सबब श्रीजीची अर्चा अभिषेकपूर्वक केली.

४२-१०-९ श्रीकृष्णदेव पूजा, सरकार कार्यानिमित्य.
४९-१४-० इतर खर्च जिन्नस वगैरे.

..................

१५५-५-९

२१०-११-० वे.शा.सं.बापू मोघे संस्थानीं आहेत त्यांजकडे सालाबादी :
श्री दत्तजयंती, श्री महाशिवरात्र, श्री गुरुपुण्य तिथी फालगुन शु.२ बद्दल व गाईस घासाबद्दल.

१८५२-०-० सरकार निसबत खर्च.

३० माधवराव मुकुंद यांस जमिनीबद्दल.
२०० गोपाळराव गोविंद, नि. बळवंतराव मल्हार फडणीस.
२२२ ९ ९ कारकून असामी २ रघुनाथ भोगाजी व रंगो लक्ष्मण.
१३९-१४-३ घडण्याबद्दल.
१५१-११-९ तासे मर्फेवाले असामी ४ बाबत.
५४०-५-० खासबरदार असामी १२
४२-९-० तोफखान्यानिसबत.
३७८-१-९ शागीर्दपेशा असामी १३
१२२-७-३ नांवेंकडे नावडे असामी २, गस्तवान असामी १ पखालची १
४८-१०-६ २४-९-६ ४९-३-३
२४-५-३ कुरण्या असामी १

................

१८५२-०-०

३८०५-७-३ संस्थानसंबंधीं खर्च, बद्दल मुशाहिरे व खेरीज मुशाहिरे खाते
................ २८०८-३-९ ९९७-३-६

१३४४५-१-६ येकुण खर्च.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 191 1829 A.D.

An Annual Account-sheet of Pargana Maheshwar etc., together with the list of villages as well.

---

**अ. नं. १९२** **श्री**

ता. १४ फेब्रुवारी, इसवी सन १८२९

आप्पाजी कृष्णराव यांजकडून त्रिंबकरावजीस विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावून मजकुर कळला. त्याचीं उत्तरें.

१ माजीचे कारकीर्दीची कच्चे झडतीची नक्कल पाठविली आहे. चौकशी करून जलद लिहून पाठवावें.

२ मौजे गढी येथील नाक्याचा मजकूर लिहिला तो कळला. व्यापारी गढीचे मागून धारेस जातात, त्यामुळें आपले नुकसान फार होतें. यास्तव नाकेदारास सक्त ताकीद असावी कीं एक असामी जर त्यामार्गे गेला तर दरोबस्त नुकसान भरून घेऊं.

३ सरकारवाड्यांत देवपूजेजवळ एक साहेब (फिरंगी) मनन करीत असतां गेला. तरी पेशजी एकचकती वाड्यांत कोणी जाऊं नये म्हणोन बडेसाहेबांची घेऊन पाठविली आहे. ती रा. लक्ष्मणपंतांस पुसोन जे साहेबलोक येतील त्यांस दाखवीत जावी, म्हणजे उपद्रव होणार नाहीं व बंगला तयार होईतोपावेतों मावशीबाईची जागा नीट करून ठेवावी. तेथें साहेबलोकांस उतरवीत जावे. उगीच खिस्सा करीत जाऊं नये.

४ हरीबा होळकर यांचा गदेला फाटला आहे तरी दुसरा करून द्यावा.

५ खासगीचे गांवचा मजकुर लिहिला त्यास ते गांव सरकारी वहिवाटीत किंवा परभारें हे समजून घेऊन लिहून पाठवूं. कळावें.

**महेश्वर येथील विठ्ठलराय कानुगो याचे दप्तर**

No. 192 14-2-1829 A.D.

Appaji Krishna's detailed reply to Trimbakraoji : customs question, as well as matter of entrance of Europeans into God's chamber are touched upon.

---

**अ. नं. १९३** **श्री**

ता. ३० डिसेंबर, इसवी सन १८३०

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर : भवानीराम कोठारी कमाविसदार रामपुरा यांस. हिंदू, मुसलमान या उभयतांचा किस्सा पेशजीपासून चालत आला. हल्लीं त्यांची समजूत ठरली त्यांतील अभिप्राय. हिंदूकडील श्री मारुतीची अर्चा करून देवालयास कोट बांधून द्यावा व ब्राह्मणांकडील शिवालय नूतन बांधून द्यावें व मारुती जवळील महजत पाडली गेली ती बांधून द्यावी व दुसरी मेहजत निमाज पढावयास नूतन करून द्यावी. याजला खर्च जुजरसीनें करणें. अडीच तीन हजार पावेतों लागेल मुजरा देण्यांत येईल. मारुतीजवळील महजतींत मात्र मुसलमानानीं जाऊं नये. नवीन महजतींत जात जावे. येविषयीं लिहून घेणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 193 30-12-1830 A.D.

The disputes between Hindus and Moslems of Rampura were settled

by Government orders for building a new temple and a new mosque etc.

---

**अ. नं. १९४** **श्री**

ता. ३० डिसेंबर, इसवी सन १८३०

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. विशेष वेदमूर्ती सदाशिव शंकरबिन देवीशंकर, विश्वनाथभट व रामशंकरभट इंद्रजीतभट पुरोहित क्षेत्र अनूप शहर व कर्णवास, श्री गंगातीर तुम्ही इंदुरीं सरकारांत येऊन विदीत केलें कीं, क्षेत्र मजकुर येथील पुरोहितपण आमचे वडिलांस कै. तुकोजीबाबा होळकर यांनी थोरले सुभेदार यांचें पत्र पाहून लिहून दिलें आहे ते आपण पाहून नूतन पत्र वहिवाटीस करून दिलें पाहिजे म्हणोन. त्याजवरून मनास आणितां उभयतां कैलासवासी तीर्थरुपजीनीं क्षेत्र मजकुरचें पुरोहितपण तुम्हास लिहून दिलें तें पाहून हें पत्र लेखन केलें असे. तरी आमचे वंशाचा जो कोणी क्षेत्रीं येईल तो तुमचे वंशपरंपरा पूजन करील. चंद्र ३ रजबः मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 194 30-12-1830 A.D.

Sadashiv Shankar and others are granted a Sanad of Tirtha-Purohit-Ship of Anup and Karnavas by Maharaja Malharrao Holkar. The grantees possessed previous orders to the same effect from Subhedars Malhar Rao I and Tukoji Rao I.

---

**अ. नं. १९५** **श्री**

ता. १० मार्च, इसवी सन १८३१

यादी महाल मौजे ऐवज खर्च झाला. ज्येष्ठ मास रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर.

५०० नारायणराव राम पळसीकर चिरंजीवाचे मुंजीकरितां बक्षीस.
७००० बळवंतराव मल्हारराव फडणीस. नातीचे लग्नास मोहगम.
३०० बापूजी बल्लाळ शिक्केनवीस. चिरंजीवाचे लग्नाकरितां.
८०० जिवाजी गाढवे. उभयतां कन्येचे लग्नाकरितां.
२०० लक्ष्मण प्रल्हाद निसबत तिसरा मजला. चिरंजीवाचे लग्नाकरितां.
...........

१८५० निसबत शागीर्दपेशा.

१००० काशीबा वाहूळ हुजऱ्या.

५०० धोंडु कदम हुजऱ्या.

१५० कृष्णाजी त्रिंबक नाइक जासुद. कन्येचे लग्नास.

२०० तान्हाजी जासूद पुत्राचे लग्नाकरितां.

......

१८५०

५० बापू होळकर. नागबली, नारायणबली करितां उज्जेनीस जातांना बक्षीस.

१०० बापू कुंवर दिमत मोती तबेला यांचे मातोश्रीचे वर्षश्राद्धाकरितां.

४० फागखर्च कायस्थ लोकांकडे, गोठा (शेहली) निमित्य हस्ते लाला शिवरामदास.

.............

१०८४०

येकुण दहा हजार आठशें चाळीस रुपये हल्लीं शिक्का यांची चिठ्ठी महाल पोत्यावर लिहून द्यावी म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 195 10-3-1831 A.D.

Certain items of expenditure ordered by the Maharaja for marriage and such other religious rites in the families of hereditary Sardars, near relatives and servants.

---

**अ. नं. १९६** **श्री**

ता. २१ मार्च, इसवी सन १८३१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर यांजकडून चिटको बल्लाळ कमाविसदार देपाळपूर, बेटमे यांस विशेष मौजे पिंपळदा परगणे इंदूर येथे नवीन गोशाळा तयार होत आहे यास्तव हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी हरदु महालांपैकीं गांवगन्ना बेगारीचे सुतार असामी ४ चार दोन महिनेपावेतों तेथें पाठवून देणें. पंधरा दिवसानंतर फेरपाळी करून दुसरें बदली पाठवीत जाणें, म्हणजे काम जलद करतील, सुतार लोकांस ताकीद करीत जाणें म्हणोन. छ ६ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 196 21-3-1831 A.D.

The Kamavisdar of Depalpur is ordered by the Sarkar to despatch 4 carpenters, by turns., to work on the cow-shed newly being erected at Pimpalda (Pargana Indore.)

---

अ. नं. १९७ **श्री**

ता. २९ मे, इसवी सन १८३१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. बजाजी गणेश कमाविसदार वाफगांव वगैरे यांसी खाली लिहिलेंले सरकारी हक्क अलीकडे बंद आहेत ते चालू होय तें करणे.

१ मौजे करवंदी प्रा़ो थालनेर प्रांत खानदेश येथील राऊळकी निम्मे सरकारची तेथील वहिवाट इंग्रजीत होऊन साहेब मौजे मजकुरीं जाऊन सरकारची भेट घेतली ती आपले सरकारचा हक्क कायम होय तें करणें.

२ वनचराईचा हक्क स्वदेश, खानदेश प्रांतीं आहे. इंग्रजी अंमलापासून बंद आहे तो पूर्ववत कायम करविणें.

३ प्रा़ो संगमनेर येथील सरगाऊडकी सरकारची. तेथील वहिवाट अलीकडे बंद आहे ती मोकळीक होय तें करणे.

४ कसबे नगरसूल येथील मोकदमीचा हिशेब इंग्रजी अंमलापासून सन १२४० पावेतोंचे वहिवाटीचा ऐवजासह हुजूर पाठविणें.

५ मौजे पारनेर आंबाड येथील मोकदमी दरोबस्त सरकारची. गुमास्तेगिरीचे कामावर नारो नथो देवधर आहेत त्यांजला ताकीद करून इसवी सन १२२८ ते सन १२४० पावेतों हिशेब बमय ऐवजासह हुजूर पाठवून देणें.

६ प्रा़ो सुपे येथील गाउडकीचे कामावर नारायणराव अंबीकर आहेत. हिशेब सन १२२८ ताा सन १२४० पर्यंत मशारनिल्हेकडून आला नाहीं त्यास तुम्ही हलकारा पाठवून सक्त ताकीद करून बमयऐवजासह हिशेब हुजुर पाठवून देणें.

येकुण कलमें लिहिलें अन्वयें बंदोबस्त व जेथे वहिवाटी चालू नाहींत तेथें गुमास्ते पाठवून चालू करणें व बंद आहेत त्यांचा उद्योग करून मोकळीक होय तें करणे व सरकारांत लिहून पाठविणें. वहिवाटी चालू आहेत तेथील हिशेब गुमास्ते यांजकडून आणवून बमय ऐवजासह दिवसगत न लावितां सत्वर सरकारांत पाठवून देणें. ज्या ठिकाणचा हिशेब न येईल त्या ठिकाणीं जप्ती करणें. सदरहू लिहिलेअन्वयें देहानिहाय बंदोबस्त पत्र पावतांच करून सत्वर सरकारांत लिहून पाठविणें. म्हणोन छ १ रजब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 197 29-5-1831 A.D.

Cartain rights and dues of the Holkar State specially in the Khandesh District were in abeyance. Attention of the Kamavisdar of Wafgaon is drawn thereto.

---

**अ. नं. १९८** **श्री**

ता. २९ मे, इसवी सन १८३१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर विशेष. (बजाजी गणेश कमाविसदार वाफगांव वगैरे यांसी) कीं, श्रीमंत मातुश्रीसाहेब यांचे प्रकृतीस गैरआराम, आरोग्यता व्हावी यास्तव श्री मार्तंडजी संस्थान जेजुरी येथें मल्हार सहस्त्रनामाचे पाठ ब्राह्मणाकडून करावयाचे यास्तव हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी एक ब्राह्मण चांगला विद्वान यथासांग अनुष्ठान करणारा असा योजून त्याजकडून नित्यशः अकरा सहस्त्रनामाचे पाठ श्रीपासीं करवीत जाऊन दरमहा दक्षिणा पंधरा रुपये तुम्ही बिनदिक्कत देत जाऊन सरकारी अन्नछत्रांत भोजन घालत जावें. पत्र पावतांच अनुष्ठानास आरंभ करून देणें व ब्राह्मणाची बदली दरमहाचे दरमाह करीत जाणें. म्हणोन छ १६ जिल्हेज.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 198 29-5-1831 A.D.

The Kamavisdar of Wafgaon is ordered to engage the services of a learned and pious Bramhin to repeat the names of Malhar at Jejuree for the recovery of Maharaja Malharrao's mother's health.

**अ. नं. १९९** **श्री**

ता. ४ जून, इसवी सन १८३१

दस्तक : सरकारी बागाकडे हरजिनसी फूल, फुलावणीची झाडें कोकण प्रांताहून खरीदी बंग्या ५ पांच व बैले, तट्टे रास ८ भरून हुजूर आणविली आहेत. त्याजला मार्गी कोठें हसीलाविषयीं मुजाहिम न होतां रात्रौ पहारा देऊन आपआपले हद्दपार देणें. म्हणोन पत्र छ २२ जिल्हेज.

**सरकारी रेकार्ड**

No. 199 4-6-1831 A.D.

Orders are issued that " Ward and Watch " should be provided to 5 parcels of flowers etc. on their way to Indore form Konkan. No duty shall be exacted thereon.

---

**अ. नं. २००** **श्री**

ता. ११ आगस्ट, इसवी सन १८३१

रोजकीर्द श्रीमंत मल्हारराव होळकर विशेष. महालानिहाय कमाविसदारांस पत्रें जारी झालीं कीं, श्रावण व भाद्रपद या दोन महिन्यांत कलाल, भडमुंज्याच्या भट्या बंद असाव्या व खाटिक, महार, यांनीं हिंसा करू नये तरी महालीं गांवगन्ना ताकीद करून दोन महिनेपावेतों भट्या व हिंसा बंद राहील असा बंदोबस्त ठेवणें म्हणोन पत्रें रवाना छ २ रविलावल श्रावणमास.

**सरकारी रेकॉर्ड.**

No. 200 11-8-1831 A.D.

Orders were issued to Kamavisdars all round that pans of brewers and Bhad-bhunjas should not work during Shravan aud Bhadrapad months.

Butchers should also cease from slaughter of animals during the period.

---

**अ. नं. २०१** **श्री**

ता. ११ आगस्ट, इसवी सन १८३१

रोजकीर्द श्रीमंत मल्हारराव होळकर विशेष. बजाजी गणेश कमाविसदारास पत्र. विशेष. सरकारांतून श्री मार्तंडजीस अर्पण करावयास एक हत्ती व दोन घोडे रवाना केलें आहेत ते वाफगांवीं पोहचतील. तरी घोड्याचे मोतदार व माहूत हेच राहत असल्यास ठीक. नाहींपेक्षां दुसरें चांगले इसम ठेऊन व्यवस्था करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 201 11-8-1831 A.D.

Kamavisdar of Wafgaon is ordered that one elephant and two horses are despatched from here as present to Sri Martand. He is asked to engage new servants if those that are sent are unwilling to continue the service.

---

अ. नं. २०२ **श्री**

ता. ६ डिसेंबर, इसवी सन १८३१

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. वेदशास्त्रसंपन्न पीतांबर शास्त्री बिन सखाराम शास्त्री टिल्लू वास्तव्य कसबे चोपडे हे थोर, सत्पात्र, स्नानसंध्यादि षटकर्मे नीरत, करितां यांजला प्रगणे इंदूर येथील सायर जकातपैकीं सालाबाद वर्षासन महालचलणी रुपये ४०० चारशें द्यावयाचे ठरवून अलाहिदा वहिवाटीस वर्तमान भावी कमाविसदार याचे नांवें सनद लिहून दिली असे. तरी सायरजकातीपैकीं चारशें रुपये सालदरसाल महालचलणी साल मजकुरापासोन देत जाऊन वहिवाट चालवीत जाणें. म्हणोन छ १ रजब.

**दिवाण पळसी रेकॉर्ड**

No. 202 6-12-1831 A.D.

Sanad granting Rupees 400/- annually to Pitamber Shastree Tillu out of the Sayar income of Pargana Indore is passed by Maharaja Malharrao Holkar.

---

अ. नं. २०३ **श्री**

ता. ६ डिसेंबर, इसवी सन १८३१

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून बजाजी गणेश कमाविसदार यांस. ज्या वहिवाटी बंद आहेत त्याजविषयीं प्रयत्न करून मोकळीक होय तें करणे त्या सदरीं :

१ मौजे बाभूळगांव, नागलवाडी, फलटणपैकीं. २ होळमुरुम नीरातीर येथील चौघुलकी ३ मौजे अंबे परगणे सुपे येथील मोकदमी निम्मे. ४ मौजे धोद परगणे पारनेर येथील मोकदमी निम्मे. ५ मौजे कमालपूर ऊर्फ डोमग्राम परगणे वैजापूर येथील मोकदमी निम्मे. ६ मौजे होळनाथ फलटण देश येथील मोकदमी निम्मे. ७ मौजे पायगांव तालुके करहाड येथील पाटीलकी निम्मे.

सदरहू गुमास्तेगिरीचे काम सरकारांतून भीवजी नाईक यांजकडे आहे. त्यास दूर करून तेथें दुसरा गुमास्ता पाठवून बंदोबस्त ठेवणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 203 6-12-1831 A.D.

Bajaji Ganesh Kamavisdar is ordered by Maharaja Malharrao Holkar to try to regain certain rights and dues for the present lost to the Government.

---

अ. नं. २०४ **श्री**

ता. २६ डिसेंबर, इसवी सन १८३१

महाराज मल्हारराव होळकर. धोंडो जनार्दन कमाविसदार सावेर यांस विशेष. तुम्ही विदित केलें कीं, महालीं शिक्का नाहीं त्यामुळें रयतीस पट्टे वगैरे देण्यास राजचिन्ह पाहिजे, तसेंच चोपदार आहे परंतु चांदीची छडी नाहीं. तरी परवानगी झाली पाहिजे म्हणोन त्यास : शिक्के दोन वजन भार रुपये २५ व छडी चोपदाराची वजन भार रुपये ५० येकुण ७५ रुपयेत शिक्के व छडीकरून आबादी इस्तवारी रयतीची खात्री करून उत्तम होय तें करणे. छ.२१ रजब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 204 26-12-1831 A.D.

Rupees 75/- are sanctioned by the Sarkar to the Kamavisdar of Sawer, for purchase of seals, and a silver cane to the Chobdar.

---

अ. नं. २०५ **श्री**

इसवी सन १८३१

आबाजी बल्लाळ यांस प्रगणे महतपूर येथील मामल्याची वहिवाट कमाविसदार याचे निसबतीने तुम्हाकडे होती. सालमजकुरीं अर्ज केल्यावरून पांचसाला इस्ताव्यानें मक्त्याचें काम तुम्हाकडे सांगून ठरावाबद्दल यादी मखलसीची.

| बरहुकुम गुदस्त | इजाफा | येकुण आकार |
|---|---|---|
| १६३९७६ | २५८४ | १६६५६० |
| १६६५६० | २६०० | १६९१६० |
| १६९१६० | ३१०० | १७२२६० |
| १७२२६० | ३५०० | १७५७६० |
| १७५७६० | ३८०१ | १७९५६१ |

येकुण पांच साल मख्ता आठ लक्ष त्रेसष्ट हजार तीनशें एक रुपया करार करून अलाहिदा खर्चाची याद व बेहडा जमेची कलमबंदी ठरावून हें सनद तुम्हांस सादर केली असे. तरी तुम्ही सालदरसाल किस्तबंदीप्रमाणें ऐवजाचा भरणा सरकारांत करीत जाऊन कबज घेत जाणें. महालाची आबादी, इस्तवारी, उत्तम प्रकारें ठेऊन रयत राजी राखून आखरसालीं जमा कायम करून सालदरसाल हिशेब सरकारांत समजावीत जाणें.

छ. १ जिल्हेज.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 205 1831 A.D.

Abajee Ballal is granted Kamavishi of Pargana Mahatpur for a period of 5 years on an annually increasing grade.

---

**अ. नं. २०६** **श्री म्हाळसाकांत**

इ.स. १८३१

श्रीमंत गुरुभक्तीपरायण, वर्तमान सकल ऐश्वर्यनिधान, धर्मपरायण, धर्मसरंक्षक, सदा यशवंत, रमाविराजित राजमान्य राजश्री कृष्णाबाई होळकर यांसी प्रती शुभचिंतक कल्याणवांछित दिवाकर बाल महतमचान महानुभाव संस्थान मठ हरजागा कारळ. आशीर्वाद उपरी : येथील तागाईत फाल्गुन वद्य ३ स्वकीय स्वानंद वैभव विलेखणी संतोषास कारण होत जावे. विशेष. आम्ही आपणापासोन स्वार जहालो ते अती दुर्गम मार्ग कसून श्री गुरुप्रतापे करून पौष वद्य ५ पंचमीस कसबे कारळ मठ मजकुरीं सुरक्षित असो. यानंतर भागानगरास जाण्याचा निश्चय चैत्रमासीं केला आहे. तेथें गेल्यावर आपण आज्ञा केली होती त्याचा उद्योग राजेसाहेब राजे चंदूलाल बहादुर यांसी भाषण करून अवंतर मजकुर निवेदन करून त्याप्रमाणें आपले कार्य करायचे, त्याप्रमाणें तेथील मजकुर जो होईल तो लिहिण्यांत येईल.

आपण भक्तपरायण आहांत तेव्हां हें कार्य श्री गुरु कृपेंकरून होऊन येईल. वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत असावें, म्हणजे चित्तास संतोष होईल. कळावें बहुत काय लिहिणें, ममतेची वृद्धी असावी हा आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 206 1831 A.D.

The monk of the monastary Kasba Karal sends his blessings to Shreemant Krishna Ma Saheba Holkar, and says that he will, after his going to Hyderabad (Deccan), open the subject to Raja Chandulal Bahadur.

---

**अ. नं. २०७** **श्री**

ता. २९ जानेवारी, इसवी सन १८३२

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. शहर इंदूर येथील सरकारी बागा सुमारी पंधरा १५ बद्दल याद.

| | | |
|---|---|---|
| २ छत्रीबाग दोन. | १ रखमाबाईसाहेबांचा बाग एक. | |
| २ बाळासाहेबांचे बाग दोन. | १ शरीफभाईचा बाग एक. | |
| १ हनुमंत बाग एक. | १ कृष्णबाग एक. | |
| १ विनायक बाग एक. | १ नजरबाग एक. | |
| १ बाणगंगा बाग एक. | १ बेलबाग एक. | |
| १ गणेशबाग एक. | १ गोपाळबाग. | |
| १ रामबाग एक. | | |
| .... | .... | .... |
| ९ | ६ | १५ |

**सरकारी रेकार्ड**

No. 207 29-1-1832 A.D.

The list of Government gardens in the city of Indore, numbering 15, with their names.

---

**अ. नं. २०८** **श्री**

ता. २९ जानेवारी, इसवी सन १८३२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून कृष्णाजी मुकुंद यांसी विशेष. तुम्ही विनंती केली कीं, आम्हास राहावयास जागेची अडचण, यास्तव खावंदांनीं एखादी जागा बखळ देवविल्यास इमारत बांधून रहावयाची सोय करून घेऊं म्हणोन. त्याजवरून खाशाघोड्याचे पागेचे उत्तरेस सरकारी जागा आहे. त्यास पूर्वेस रस्ता, पलीकडे पारनेरकर फडणीस वगैरे ब्राह्मण मंडळीचे वाडे, दक्षिणेस सरकारी खासे घोड्याची पायगा, पश्चिमेस कृष्णराव गोपाळ यांचा वाडा, उत्तरेस जुना वाडा दिवाणाचा, सदरहू जाग्याची बखळ तुम्हास देण्याचा करार करून हें पत्र लेखन केलें असे. तरी सदरहू लिहिल्याअन्वयें तुम्हीं इमारत बांधून राहण्याची सोय करणें. रवाना छ२५ साबान सुरू इसनेसलासीन मयातेनवअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 208 29-1-1832 A.D.

Grant of a plot of land (for building purposes) on the northern side

of Huzur Horse Paga, to Krishnajee Mukund by Maharaja Malharrao Holkar.

---

## अ. नं. २०९ श्री म्हाळसाकांत

जानेवारी, इसवी सन १८३२

कैफियत (यादी) श्रीमंत होळकर सरकारचे दौलतीपैकीं नर्मदा दक्षिणतीर, स्वदेशांतील, वगैरे महाल सरकार कंपनी इंग्रजेबहादूर यांनीं महतपूर नजीकची लढाई जाहलियावर गैर इनसाफाने घेतले. त्याजबद्दल तपशील सुरु सन इसने सलासीन मयातेन व आलफ सन १२४१ फसली. माहे साबान ऊर्फ पौषमास शके १८५३ मुक्काम इंदूर.

१ पेशजी श्रीमंत कैलासवासी यशवंतराव महाराज यांचा व सरकार कंपनीचा तह अजम लीकसाहेब व मालकमसाहेब कंपनीकडील व बाळाराम केसोराम आगरवाले, होळकर सरकारांकडून ह्यांचे विद्यमानें अमृतसरचे मुक्कामीं सन १८०५ चे पौषमासीं होऊन स्वदेशांतील महाल नर्मदा दक्षिणतीर, पेशवे सरकारानें जप्त केलें होते ते तहबरहुकूम सोडल्यावर उभयतां सरकारची दोस्ती सन १२२७ कार्तिक अखेर चालली. सदरहू तहनाम्यांत पेशवे सरकार यांचे नेकीस, अगर बदीस सामल नाहीं.

२ सदर तह अमृतसरचे मुक्कामीं होळकर सरकारचा व कंपनी सरकारचा जाहलेवर महाराजांची स्वारी फौजेसुद्धा सन १२१५ (इसवी सन १८०५) माघमासीं निघोन सन १२१७ चे अवलीस भानपुरियास दाखल जाहल्यावर सन १२१८ चे सालीं तब्येत बिघडून सन १२२१ के कार्तिकमासीं (इसवी सन १८११) महाराज देवलोक झाले. मागें मल्हारराव महाराज यांचे वय तीन वर्षांचे. कारभारी गणपतराव नारायण दिवाण, बाळारामशेठ आगरवाले व माधवराव गोविंद आळेकर व विठ्ठल महादेव किबे होते. फौज पलटणें मुबलक, फौजेचा गुजारा मोहिमसीर. तो अर्थ राहून खासगी महालच्या लावण्या बंडामुळें पडून इस्तेवारी न होतां कोट्यावधी रुपयाचे पेंचात दौलत आली. फौज, पलटणीची तनखा देण्यास कोठें थारा नाहीं. गवगवा मनस्वी जाहल्यामुळें विठ्ठल महादेव यांनीं आपले जागा विचार करून लाला ठाकूरदास अखबारनीस निसबत कंपनी सरकार यांचेमार्फत धोरण लाविलें कीं फौज, पलटणे मुबलग देणें लाखो रुपयांचे. यांस जागा नाहीं तुम्ही दोस्त, ह्याकाळीं मुबाल्यास ऐवज द्यावा, म्हणजे बंदोबस्त करून माफक खर्च ठेऊं, म्हणोन सरकार बोलण्याचा क्रम लाविला. हा मजकुर हुजुर पलटणें होती यांस जाहीर होताच पलटणवाल्यानीं दिवाणावर गर्दी गंगराड मुक्कामीं सन १२२६ त करून दिवाण हस्तगत करून पलटणांत नेऊन ठेवल्यावर सरकारानीं तनखेचा फैसला, दिवाणास सोडविलें. याची बातमी मुलकी पलटणें आणखी होती. यांस कळतांच चाल करून सरकाराशीं मुकाबला सन १२२६ चे माघमासीं शुद्ध १५ स केला, सरकारही टाळा देऊन दहा कोसाचे छेटीने निघून गेले. त्यावर कांहीं एक

दिवसांनीं विठ्ठल महादेव जोग भोज्याखेडीचे मुक्कामीं अकबारनीस यांजकडील राजकारण पक्कें करून घेणेकरितां राजे जालमसिंग यांजजवळ गंगरुणचे छावणींत मुक्काम करून राहिले. तेथून जाहल्या संकेताची बळकटी करावी या भावी किशोरीलाल मुनशी निसबत होळकर सरकार याज कडून लिफाफे करून वर सरकारी मोहरा करून छावणींत आपले जवळ घेऊन गेले. खलित्यांस मजकूर यांचे मनसब्या आलें तसे लिहित गेले. यातील वास्तविकार्थ हुजुरात रोशन नाहीं. फक्त मशारनिल्हेचे भरवशांवर नजर देऊन मोहरा करून देविल्या. यावर जोग यांनीं सरकार पायाशीं लक्ष ठेऊन लिफाप्यांत काय मजकुर लिहून अकबारनिसाचे मार्फतीनें रवाना केलें असतील ते जाणोत. नंतर विठ्ठल महादेव यांनीं राजे जालमसिंगजी याचे विद्यमानें फौज पलटणीची समजूत काहडून जोग फौजेसुद्धां हुजूर स्वारींत दाखल जाहले. मागाहून पलटणेंही येऊन मिळाली. उभय सरकारची दोस्ती, फौज पलटणांत बहदा, मल्हारराव महाराज वयें करून लहान, प्रसंगीं दोस्ताकडून पुरवणी होईल हे खातरखां जाणोन, विठ्ठल महादेव यांचे हातें अखबारनिसाकडून उपयोग करविला असतां कंपनी सरकारांतून मुबादल्याची मदत जाहली नाहीं. सदरहू कच्चे मजकुराचे माहितगार विठ्ठल महादेव व लाला ठाकूरदास उभयताही मैयत जहालियामुळें. कलम दखलबाद.

३ स्वदेशांत होळकर व शिंदेशाहीचे पेंढारी जाऊन तमाम मुलूख बरबाद करूं लागल्यामुळे पेंढारियांचा बंदोबस्त व्हावा, सरदारानीं लक्षात वागांवे या भावी श्रीमंतांनीं वकील नाशिक मुक्कामींहून शके १७३७ चे वैशाख मासीं उभयतां सरदारांकडे राजश्री गणेश कृष्ण पिंटके होळकराकडील व शिदे यांजकडे रा. गोविंदपंत जोशी, रवाना केलें. त्यावर दिवसेंदिवस पेशवे सरकारचे व कंपनी सरकारची राजकारणनिमित्य आतून चुरस चालू जाहल्यानें पेशवे सरकारचे मनांत सरदारांनीं वख्तसीर उपयोगी पडावे म्हणोन शिंदे अलिजा बहादूर यांजकडे रवानग्या होत गेल्या. त्यांजकडील ही स्वदस्तूरच्या चिठ्ठ्या हरदम दमबाजीच्या येत गेल्या कीं, जलदीने येतों म्हणोन वकिलांकडोन वर्तमान येते गेले. सन १२२७ त होळकरसाहेबांचा मुक्काम रायपुरास असतां फौज पलटणीची जबानी समजूत विठ्ठल महादेव यांनीं करून स्वारींत आल्यावर पलटणीच्या भेटी, नजरा जाहल्या. त्या संधीस श्रीमंत पेशवे सरकारचें व कंपनी सरकारचे पुष्कळच वांकडें पडून हडपसर मुक्कामीं जंग सुरू होऊन एक लढाई जाहली. त्या अवसरांत होळकरांसही खर्चाकरितां जुजबी ऐवजाच्या हुंड्या पाठविल्यावर थोडीबहुत खर्ची करून नर्मदातीरीं येऊन मुक्काम करावा यांत श्रीमंतांचे मर्जीचा संतोष आणि दिलांत मनसबा कीं, पेशवे सरकारचा व कंपनी सरकारचा तह आपण करून द्यावा म्हणोन रायपुराहून दरकूच महतपुरास स्वारी होळकरसाहेबांची दाखल झाली. हें वर्तमान कंपनी सरकारची फौजेतील मुखत्यार टाम हिसलापसाहेब, जनरल मालकमसाहेब होते. त्यांस कळून साहेबाचा मुक्काम पानबिहारवर होता. होळकर सरकारांस साहेबाकडून खलिता आला कीं आपले कडील वकील कोण्ही बोलावयास पाठवावा. त्या वरून राजश्री बहिरो अनंत सबनीस, नबाब गफूरखाकडील जाफरअल्ली व दिवाणाकडील यशवंत बाबूराव साहेबांकडे पाठविले. त्यांच्या भेटी होऊन साहेब बहादुराचे बोलणें पडलें कीं, तुम्ही पेशवे

सरकारांत सामील होऊ नये. अगोदर पेंढारियांचे पारिपत्य करणेबद्दल गाळणा किल्ला तुमचा आम्हास द्यावा. पारिपत्याबाबद तुमचा तुम्हांस देऊं, म्हणोन बोलणें पडल्यावर बहिरो अनंत यांनी साहेबांस जाब दिला कीं, सल्ला तर नेक आहे. परंतु फौज आमचे आळयांत राहिली नाहीं, तनखा देणें चढली आहे यास्तव आम्हास पंधरा लाख रुपये तुम्ही द्यावे म्हणजे थोपाथोप करूं. याजवर साहेबांचा रुकार पडला कीं, ऐवज देववितों, याचे मुबादला, तुमचा ऐवज रजवाडे यांजकडे खंडणीबद्दल घेणें तो लावून देऊन ऐवज घ्यावा. तुमचे लोक आमचे लोकासीं आघाडी पिछाडीस लूट लबाडी करितांत हे चांगलें नाहीं. याचा बंदोबस्त ठेवावा. असें बोलणें होऊन मशारनिल्हेनीं जाहला मजकूर हुजूर विदित केला. तों लष्करांत एकच गर्दी होऊन मार्गशीर्ष शुद्ध नवमीचे रोजीं दिवाणास पलटणवाल्यांनीं व हुजूरतवाल्यांनीं धरून नेले. दुसरें दिवशीं शुद्ध एकादशीस विठ्ठल महादेव हेही धरले गेले. नंतर आघाडी, पिछाडी कूच होऊन शुद्ध त्रयोदशीस सरकार कंपनीचे पलटणासी मुकाबला जाहला. होळकर सरकारचे फौजेंत रोशनबेग वगैरे आप अखत्यार होऊन जंग सुरू केला. त्यावख्तीं नबाब गफूरखां यांनीं पेशजी सरकारचे वकिलाबरोबर आपले तर्फेचा वकील जाफरअलीस बोलणें बोलण्यास साहेबांकडे पाठविले होते. त्यांनीं प्रथक भीतरपेटे आपले जायदादीचे बोलणें लावून मेळ घातला. नबाबांनीं समयास पळ काढला. धनी मल्हारराव महाराजास वय १० दहा वर्षाचें. कारभारी कैदेत, सारांश, धन्याचे व कारभारी यांचे हुकमाने लढाई जाहली नाहीं.

४ लढाई बाद फौज तारबेताल होऊन दौलतीचा खराबा जाहला. कारभारी दिवाण, जोग यांजला मोकळे करून मार्गशीर्ष शुद्ध १५ चे दिवशीं समजुतीबद्दल बहुमान दिल्यावर होळकर सरकारचे कूच प्रतापगडाहून भाऊगडनजीक मुक्काम जाहला. ते काळीं खर्चास ठिकाण नाहीं. लोक हवालदील जाहले. महालचा पैका कोणे रीतीनें येतो, दोस्ताचे दोस्तींत फौजवाले यांनी हुकूम न मानितां आपआखत्यारीनें लढाई घेऊन मुद्दाम खलेल आणिल्यासारखे जाहीर जाहलेबद्दल साहेबलोकांस कच्चा मजकुर वाजवी समजाविण्यास विठ्ठल महादेव पाठविले. समागमें नबाब गफूरखां यांनी आपलेकडील जाफरअली दिले. उभयतां तेथें जाऊन साहेबांच्या भेटी जाहल्या. ते वेळीं साहेबांचे बोलणें पडलें कीं, तुम्हाजवळ पेंढारी आहेत ते यावेळेस काहडून द्यावे. पुढें बोलणे बोलूं. त्यावरून मशारनिल्हेनीं सरकारांत लिहिल्यावर पेंढारी यांजकडील जमादार वगैरे लोक होते ते लष्करांबाहेर काढून देऊन जाब पाठविला. यावर साहेबलोकांचें म्हणणें पडलें कीं दौलतीपैकीं बोलण्यास मुखत्यार कोण ? तो नेमून द्या. त्याजवरून दौलतींत मुखत्यार गणपतराव नारायण दिवाण व हस्तकी विठ्ठल महादेव. दिवाणास तर हुजूर असले पाहिजे तेव्हां जोग यांचे नावें मुखत्यारनामा लिहून पाठविल्यावर सत्रा कलमें साहेबांनीं लिहून मागितलीं तशीं देऊन तहनामा हुजूर पुरे करावयास पाठविल्यावर, गणपतराव नारायण दिवाण यांचे हातें तारीख करून मशारनिल्हेकडे पाठविला. तो तहनामा तेथें देऊन दोस्ताकडील अहदनामा विठ्ठल महादेव स्वारींत घेऊन आल्यावर स्वदेशांतील महालच्या सोडचिठ्ठ्या दिल्या. सदरहू तहनामा झाला तो कायदेशीर जाहला नाहीं. याचा तपशील :

१ लढाईचे वख्तीं मल्हारराव महाराज यांचें वय दहा वर्षांचें, सरकार कंपनी शेंकडो वर्षांची डोलदार, कायदेही त्यांचेच येथील, मामूलपासून चालू पुरुषांचे अंगीं मालकी मध्यम सोळा वर्षाचें वय जाहल्यावर, वीस वर्षांचे वयानंतर मालकीचा करीणा, लोकांत मंजूर पडतो. त्या कायद्यांत ते वक्ती महाराजांची उम्मर नाहीं.

२ श्रीमंत तुळसाबाईसाहेब लढाई अगोदर दोन दिवस देवलोक जाहल्या. त्यांचे अनुमतें लढाई जाहली नाहीं.

३ कारभारी गणपतराव नारायण दिवाण व विठ्ठल महादेव जोग, उभयतां ही लढाई अगोदरपासून कैदेंत फौजवाल्यानीं ठेविले, याजमुळें कारभारियांच्या अनुमतें जंग सुरूं जाहला नाहीं.

४ श्रीमंत मातुश्री तुळसाबाईसाहेब यांजला पेशजीपासून राजकारणाची माहिती, ती परलोकवासी जाहली. मागें मातोश्री मासाहेब. दोस्तांचे दोस्तींत फौजवाल्यांनीं भालेराई करून फरक आणिल्यामुळें दौलत कोट्यावधी रुपयांची गारद जाहली. कैलासवासी महाराजांनीं दोस्ती केली, त्या दोस्तीवर कंपनी सरकारानीं नजर देऊन व मल्हारराव महाराजांचे उमरीवर नेक नजरेनें पाहतील हें खातरखां जाणोन जोग यांजकडे मुखत्यारनामा पाठवून मशारनिल्हेकडून वास्तविक साहेब लोकांस समजाविण्यांत आणला असतां कंपनी सरकारकडील साहेबांनी दर्याप्ती न करितां मतलबावर नजर देऊन कैलासवासी यशवंतराव महाराजांचे वेळेस तह होऊन दोस्ती जाहली, यावर लक्ष न देतां स्वदेशातील महाल लावून घेतले.

५ नबाब अमीरुद्दौले मीरखान यांजला कैलासवासी महाराजापासून महाल सरंजामात लावून दिल्हे. महाराजांचे पश्चात नबाब गफूरखांकडेही चाकरीबद्दल महाल लावून देऊन अमीरुदौले नबाब यांनीं प्रसंगीं हजर असावें व नबाब गफूरखां तर सरंजामानिशीं होतेच. दरम्यान लढाईपूर्वी अमीरुदौले यांनीं सरकार कंपनीचे साधन करून तह करून घेतला. राहतांना गफूरखां यांनीं जाफरअली विठ्ठल महादेवाबरोबर पाठवून सरकारासीं अलग होऊन तह करून घेऊन सरकार तहनाम्यांत कलमें जायदादीची घालविलीं. उभयतां पठाण सरदार सरंजामी, सरकारी ठेवणुकींतील नौकरी करून सरकारचे नफा नुकसानींत सामील असावे ते एकीकडे राहून सरकार दौलत मुळापासोन फितुरीनें बुडवून परभारें तह करून घेण्यास त्यांजकडे लायकी कोणती? व कंपनी सरकारानींही या सरकारास सोडून त्यांस जायदादी पुस्तदरपुस्त करून देण्यास कंपनी सरकारचा मालकपणास नाहीं.

६ कोटेवाले यांजकडे सरकारी महाल कमाविसीनें, सरकारचा व त्यांचा लाग नसतां कंपनी सरकारांतून तहनाम्यात कोटेवाल्यास बक्षिसीदाखल म्हणोन लिहून घेतले. हा इनसाफ नाहीं.

येकुण सहाजाब मिळोन कलमें.

६ होळकर सरकार फौजबंद, खालशांतील कोट्यवधीचा खर्च कैलासवासी महाराजांचे मागें, फौजेचा खर्च तोडण्यांत आला नाहीं, समयास श्रीमंतांची थोडी बहुत खर्चाची मदत केली ते कंपनी सरकारचे दोस्तीवर नजर ठेऊन आला पैसा परत करावा हे बेहत्तर, सरकार कंपनी दौलतदार, पुणें मुक्कामीं पेशवे सरकारचे व कंपनी सरकारचे दोस्तीत खलष उत्पन्न व्हावयाचे समयीं पेशवे सरकारानीं कंपनी सरकारचे पलटणीतील आफीसर, वगैरे लोक फितवून हजारो रुपये ऋषीवत वेदमूर्ती राजश्री विनायक नाना श्रोतीबाबा यांचे हातें लोकांस भीतरपेटे देऊन आपले - तर्फेने पलटणांत फोडाफोडी केली असतां कंपनी सरकारचे लोक खानदानी माणसें त्यांनीं तो ऐवज घेऊन अजम एलफिनस्टीन साहेबाजवळ दिला असतां तो ऐवज साहेबाकडून पेशवे सरकारांत माघारी जावा तो गेला नाहीं; तेव्हां ही सरदारी वोढग्रस्तच, परत कोठून जाणार ?

७ पेशवे सरकारचे सरदार लोक कंपनी सरकारास सामील न होतां श्रीमंतांबरोबर कांहीं दिवस राहून संस्थानें कायम ठेविली (कंपनी सरकारनीं)

१ अप्पाजीराव सरलष्कर निपाणीकर श्रीमंतांस एक लढाईबाद सामील होऊन पांचचार महिने सोबत देऊन दोन रुपये खर्चवेचांत श्रीमंतांनीं सरदारी ठेवली असतां श्रीमंतांची आज्ञा न घेतां, श्रीमंत चिमाजी अप्पासाहेब बरोबर फुलगांव व आपटीचे मुक्कामीं गेल्यावर पेशजी श्रीमंत बाजीरावसाहेबांचे कारकीर्दीत त्यांजकडे संस्थान कायम होतें त्याप्रमाणें चालविले.

२ मिरजकर सरदारांपैकीं राजेश्री चिंतामणराव अप्पा लढाईपूर्वी थोड्या सरंजामानिसीं श्रीमंतांस अनुकुळ होऊन, सलामनसब्याचे विचारांत स्वारीबरोबर थोडे दिवस राहून पुढें प्रकृतीचे निमित्यानें निघून गेल्यावर सरकार कंपनीकडून मेहरबानगी होऊन मिरजकर संस्थानिकास पेशजीचा मुलूख कायम ठेऊन आणखी दोन लक्षाचे महाल जायदादीस दिले. सदरहू जाबदोन.

८ गोपाळराव त्रिंबक राजे बहादूर यांजवळ मालेगांव किल्ल्यांत आरबांचा जमाव होऊन सरकार कंपनीचे पलटणासीं मुकाबला करून पलटणाचा बहुत खराबा केला. गोपाळराव बाबासाहेबचे मनातून सरकार कंपनीसीं लढाई करू नये असें असतां राजेबहादूर यांस कैदे दाखल ठेऊन आरबांनीं शिपाईगिरी करून दाखविली. सरकार कंपनीचा सरंजाम मुबलक याजमुळें किल्ला घेऊन ठाणें बसविल्यावर राजेबहादूर बाबांसाहेब यांजला श्रीमंत बाबासाहेबांचे कारकीर्दीत गांवखेडी मेहरबानीने चालविली.

१ लढाईबाद तहनामा झाला त्यात कलकत्यास वकील पाठवूं नये, म्हणोन कलम लिहिलें गेलें यांस सरकार कंपनीचा अंमल जाहल्यापासून बडे लोकांचा इनसाफ कोर्टातील रसीडेंटचे साहेबाखेरीज आपलाले योग्यतेअनुसार वकील कलकत्यांस पाठवून इनसाफ, गैरइनसाफ थेटवर जाऊं नये हे अंदेशे साहेब लोकानीं हे कलम लिहून घेतलें हें शिस्तवार नाहीं.

येकुण कलमें मनन करितां सारांश कंपनीसरकाराकडील साहेब लोकांनी दर्याप्ती न करतां होळकर सरकारचे महाल स्वदेशांतील वगैरे गैरइनसाफाने घेतले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 209 January, 1832 A.D.

An appeal of 8 items by Shrimant Krishna Ma-Saheb against the East India Company's acts during the minority of Maharaja Malharrao Holkar.

---

**अ. नं. २१०** **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १८३२

दफाते श्रीमंत महाराज मल्हारराव होळकर सन १२४१ फसली (बंदोबस्त, निसबत सोदे, गिराशे बद्दल) परगणे रामपुरा, परगणे जिरापूर, परगणे कायथे, परगणे महतपूर, परगणे रायपुरा व परगणे सुनेल वगैरे. कमाविसदारांचे नांवें ताकीद पत्रें. माळवे प्रांतीं सोदे गिराशे यांचा दंगा फार झाल्यानीं, सरंजामासुद्धां रा.बापू कुंवर यांची रवानगी बंदोबस्ताकरितां केली आहे. तरी तुम्ही महालानिहाय ताकीद करून सोदे, गिराशे यांची बातमी ठेऊन तेच वखती खबर कुंवर यांचे सरंजामांत देत जाणें. या गोष्टीची सुस्ती करूं नये. जर तुमचे महालीं सोदे गिराशे थागा घेऊन गेले व त्याची बातमी न पोहचल्यास नुकसानीचा जाब तुम्हास द्यावा लागेल. हें खचित समजून हर वक्त बातमी पोहचवीत जाणें म्हणोन.

**सरकारी रेकार्ड**

No. 210 12-2-1832 A.D.

Orders passed to the Kamavisdars of Parganas Rampura, Jirapur, Kayathe, Mahatpur, Raipur and Sunel that Bapu Kuwar at the head of an army has been deputed by the Sarkar to check the raids of Sondes, Girashas etc., in the above mentioned Parganas. The Kamavisdars must supply intelligence to the said officer in due time.

---

**अ. नं. २११** **श्री म्हाळसाकांत**

ता. २२ फेब्रुवारी, इसवी सन १८३२

राजश्री वर्तमान भावी कमाविसदार प्रगणे रामपुरा यांस संमत १८८८ शुभकृतनाम संवछरे रेवा उत्तरतीरे. वेदमूर्ती राजश्री गोपाळभट बिन पृथ्वीराजभट गोत्र भारद्वाज यजुर्वेदी वास्तव्य कसबे मजकुर यांनीं विदित केलें कीं, श्री चौमुखेश्वर महादेव, श्री जगन्नाथ नारायणजी सन्निध कसबे मजकुरीं आहे. तेथील पूजा, नैवेद्यानिमित्य कैलासवासी श्रीमंत मातोश्री अहिल्याबाईंसाहेबांनीं आमचे तीर्थरुपांस बत्तीसडा तालुके हवेली येथें माळेत्रु जमीन बिघे २५ व मौजे संदलपूर ताो भानपुरा येथें जमीन बिघे २७ येकुण ५२ बावन बिघेपैकीं अडाण बिघे २ व माळेतु बिघे ५० संमत १८४१ चे सालीं सनदापत्रें करून दिली होतीं. त्याप्रमाणें भोगवटा चालत आहे. परंतु संमत १८७८ चे सालीं आवळीचा वृक्ष घरावर पडून दरोबस्त जिंदगी खराब झाली म्हणून. त्यावरून मनास आणितां श्रीचे पूजा नैवेद्या बद्दल कै. मातोश्रीसाहेबांनीं करून दिल्याप्रमाणें निरंतर चालावयास्तव हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी श्रीचे पूजा नैवेद्या निमित्य पुत्र-पौत्रादि वंशपरंपरा चालून नूतन पत्राचा आक्षेप न घेतां असल सनद भोगवटियास परतोन देणें जाणिजे. छ१९ रमजान. श्री मोर्तबसुद.

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत मल्हारराव होळकर |
|---|

**सरकारी रेकॉर्ड**

No. 211 22-2-1832 A.D.

Renewal of an old Sanad granting 52 bighas of land to Gopalbhatt son of Prithwirajbhatt for the worship, dish etc., of Shree Chaumukheshwar Mahadeo by Maharaja Malharrao Holkar.

---

**अ. नं. २१२** **श्री**

ता. २४ फेब्रुवारी, इसवी सन १८३२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून लक्ष्मण सदाशिव कमाविसदार महेश्वर यांस विशेष. श्री कृष्णजीस घर्म आला होता त्याची शांति झाली पाहिजे यास्तव हें पत्र सादर केलें असे. तरी गडावरील मंदिरांत देवास घर्म आला तेथें शांती करणें व खेरीज ५० ब्राह्मणांस भोजन पुर्णावरणाचे साहित्य देऊन करविणें. म्हणोन छ २१ रमजान.

**सरकारी रेकार्ड**

No. 212 24-2-1832 A.D.

The Kamavisdar at Maheshwar is ordered to perform certain religious rites to pacify future evil effects due to the perspiration of the idol of Shree Krishna.

---

**अ. नं. २१३** **श्री**

ता. ५ एप्रिल, इसवी सन १८३२

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर बजाजी गणेश यांस विशेष. मातोश्रीसाहेबांचे प्रकृतीस गैरआराम सबब आरोग्य व्हावें येविषयीं, सहस्त्रभोजन व श्रीस वस्त्रें, अर्पण होतील म्हणोन श्री जेजुरीचे मार्तंडास नवस तुम्ही केला. श्रीप्रतापे आरोग्यता झाली. बोलल्याप्रमाणें व्हावे म्हणोन तुम्ही राजश्री गोपाळराव गोविंद खासगीवाले यांस लिहिलें तें सरकारांत विदीत झाले. तरी पूर्णता करण्याचें ठरून हे पत्र तुम्हास सादर केले असें तरी तुम्ही जातीनें श्रीपाशीं जाऊन सहस्त्रभोजन, चांगले प्रकारें पूजाअर्चासह करून हुजरून वस्त्रें देवतेस छत्रासह पाठविली आहेत, यादीअन्वयें सांभाळून घेऊन श्रीदेवतेस अर्पण करून केल्या नवसाची पूर्णता झाल्याचे वर्तमान सरकारांत लिहून पाठविणें. तुम्हाकरितां सरकारांतून बहुमान तिवट, शाल, पाठविली आहे म्हणोन छ ३ जिलकाद चैत्रमास.

**सरकारी रेकार्ड**

No. 213 5-4-1832 A.D.

Bajaji Ganesh is ordered by the Maharaja that dress sent for Shree Martand should be submitted by him personally. All other items of the vow made by him for the recovery of the Royal-mother should be scrupulously fulfilled. He himself is also honoured by grant of dress from the Maharaja.

---

**अ. नं. २१४** **श्री**

ता. १४ एप्रिल, इसवी सन १८३२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून रामचंद्र यांस विशेष. चांदवडचे किल्ल्यावर श्री चंद्रेश्वर महादेवाचें देवालय आहे. तेथील पूजा पूर्वीपासून वेदमूर्ती राजश्री पुंडलिकभट जोशी वणकर करीत आले असतां हल्लीं कोणी त्यांचे सांवसर्गिक जोशी पूजेविषयीं किस्सा करितांत म्हणोन हुजूर विदित झाले. त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी पुंडलिक

भटासी कोणी किस्सा करीत असतील त्यांजला ताकीद करून श्रीचे पुजेआर्चेची वहिवाट पूर्वीपासोन पुंडलिक भटजीकडे चालत आल्याप्रमाणें चालवून पुनः बोभाटा हुजूर न ये ते करणें. छ १२ जिलकाद ऊर्फ चैत्रमास मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 214 14-4-1832 A.D.

Maharaja Malharrao Holkar orders Ramchandra Krishna that Pundalik Bhatt Joshi should no way be molested by any one in his long-standing practice of worshipping Shree Chandreshwar Mahadeo in the Chandwad Fort-practice followed by Huzur order.

---

**अ. नं. २१५** **श्री**

ता. ३० एप्रिल, इसवी सन १८३२

महाराज मल्हारराव होळकर यांजकडून माधवराव गणेश कमाविसदार सरकार बिजागड यांस विशेष खाली लिहिल्याप्रमाणें व्यवस्था करणें.

१ श्री ओंकारेश्वर येथील धर्मशाळा दुरुस्तीस खर्च अजमास रु.३००-४०० चा आहे. लाकडें खरीद करून काम जुजरसीनें करून इत्तल्ला देणें.

२ श्री विमलेश्वर देवालयाचे कमानीचे दगड महेश्वरीहून मागवून सिलावट खरगोणचे कारागीर महेश्वरीं आहेत, त्यांस बोलावून सभामंडपांचे काम सत्वर करून इत्तल्ला देणें.

३ श्री ओंकारेश्वराचे बागांतील कुव्वा निखालस आटला आहे. झाडें सुकतात तरी पखाली, हेल्याच्या करून झाडें न सुकतील ते करणें.

४ ओंकारेश्वराचे मार्गात गंगाबावडी आहे. ती जमीन सरकारी आहे. परंतु त्या गांवची जमीन इंग्रज पगरसीनें देतात, तरी घेऊन जमीन विहीत करणें व झाडेंझुडें योग्य तीं लावावीं व उष्णकाळीं पाणी मिळेल अशी व्यवस्था करावी.

५ श्री ओंकारेश्वराचे पालखीचा वास मोडला आहे. त्यास दांडी, बन्नात, वगैरे-वकिलाचे जिम्मेस केलें आहे तें कळावें.

येणेंप्रमाणें वर्तणूक करणें. म्हणोन पत्र छ.२६ सवाल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 215 30-4-1832 A.D.

Orders for certain repairs, additions etc., of the Onkareshwar temple

and the surrounding ground.

---

**अ. नं. २१६** **श्री**

ता. १८ आगस्ट, इसवी सन १८३२

सिद्धश्री इंदूर महाशुभसंस्थाने सर्वोपमालायक सदाविराजमान राजेश्री महाराजाधिराज राजराजेश्वर सुभेदार सवाई मल्हाररावजी होळकर अलिजाबहादूर. यांचे सेवेसीं.

झाबव्याहून महाराज राजे प्रतापसिंगजी कुंवर रतनसिंगजी राम राम विज्ञापना. इकडील मजकूर श्रीजीचे कृपेकरून उत्तम आहे. आपलें नेहमी आरोग्य चिंतितो. या नंतर इकडील मजकुर कीं, थांदल्याचे मामलेदार भाऊ गोपाळरावजी तसेच पेटलावद येथील दरखदार धोंडो सदाशिव विभूते मामलेदार हे आमच्या विरुद्ध श्रीमंतांस कांहीं लिहितील तर आमची बाजू ऐकून महाराजांनीं विचार करावा. आमची व या प्रगण्याची लाज, शरम सर्व आपले हातीं आहे. सर्व आम्हीं आपलेच असून आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. आषाढ वद्य ७ संमत १८८८

**सरकारी रेकॉर्ड**

No. 216 18-8-1832 A.D.

The Maharaja Raje of Zabwa acknowledges the authority of the Holkar Government and requests the Maharaja to give him a patient hearing in case complaints be filed against him by His Highness officers.

---

**अ. नं. २१७** **श्री**

ता. ११ डिसेंबर, इसवी सन १८३२

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोपाळराव बाबा स्वामींचे सेवेसीं सेवक माधवराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल मार्गशीर्ष शु.१ पावेतों यथास्थित असो विशेष. आज प्रातःकाळीं रहदारी याजकडील दोन उंट मिळाले ते आपल्याकडे रवाना केलें पोहचतील. काकाजी मालेगांवकर याचे खर्चाची तजवीज लाऊन बिदा केला तोही येऊन पोहचेल. बडेसाहेबांनीं लाटसाहेबास चकती दिली ती काकाजींबरोबर आपलेकडे पाठविली आहे. आपल्याच मुकदम्याचा मजकुर लिहिला आहे. सांभाळून घेऊन समयास द्यावी दोन घोडे काकाजींबरोबर पाठविले आहेत. एक कृष्णाकुंवर यांस व एक उपाध्येबुवास द्यावे. बुळे यांचे सोन्याचे तोडे करविले ते जाले म्हणजे भालवणसह

रवाना करून देऊं. सरकार स्वारी लवकर दाखल होईल. तिकडील प्रासंगिक होत जाईल तसें लेखन होत जावे. तहनाम्याची नक्कल यादी आल्या नाहींत. आम्ही कागदपत्र घेऊन आपलेकडे पाठवून देतों. हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 217 11-12-1832 A.D.

Madhavrao Malhar to Gopalrao Baba (Khasgiwale) The Note addressed to the Viceroy by the Resident is sent herewith. It refers to our case.

---

**अ. नं. २१८** **श्री**

संमत १८८८, इसवी सन १८३२

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर. सरकारी ठाणें खुजनेर संस्थान नरसिंगगड येथें आहे. तेथील कामावर राजश्री जनार्दन मोरेश्वर यांजला सरकारांतून ठेवावयाचे ठरून बारमाही नेमणुक संमत १८८८ पासून ठराव मुक्काम इंदूर.

६८२ बद्दलमुशाहिरे. जातीस वेतन, भोजन, शागीर्दपेशा, सह रुपये ३०० व कारकून खंडो सदाशिव यांस वेतन, भोजन खर्चासह रु.१६० शिबंदी
माणसे चार ४ बारमाही रु.१४४ शागीर्दपेशा आसामी २ दोन दरमहा ६ प्र. रु.७२ भंगी असामी १ रु.६

११८ खेरीजमुशाहिरे. सरकार निस्बत ठाणें मजकुर, दरवाजावर ज्वारी भिकारी भणंगास वाटण्यास, सालिना झेंडेखर्च, कचेरींत जाजम तकिये,
रु.५० मरामत खर्च सरकारी जागेची दरसाल रु.१५, रोषणाई तेल १२ दप्तर खर्च कागद शाई वगैरे रु.५, देवस्थान ठाणें मजकुरीं आहे त्यांजकडे श्री रामनवमी, जन्माष्टमी उत्सवास रु.५, पीर ठाणें मजकुरीं आहे त्यास गलेफ ताजिया, खर्चाबद्दल रु.१०, फागखर्च, संवत्सर प्रतिपदा दसरा, दिपवाळी वगैरे खर्च रु.११

.......
८००

येकुण आठशें रुपये महालचलणी देवविणें. (जनार्दन मोरेश्वर यांस)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 218 1832 A.D.

Janardan Moreshwar is appointed as Thanedar at Khujner (Sansthan Narsinggad on Rs. 800/- (annual expenditure - personal as well as official). The details are minutely marked.

---

शहर इंदूर येथील श्री गोपालकृष्ण मंदिरांतील शिलालेख इ.स.१८३२

**अ. नं. २१९** **श्री गणेशायनमः**

श्रीगोपालकृष्णायनमः स्नुषा तुकोजीरावस्य यशवंत प्रभोः प्रिया. ।। कृष्णाख्या मंदिरं चक्रे सुंदरं कृष्ण भक्तितः ।।१।। तत्रश्री विक्रमशके नवाष्टाष्टेंदु १८८९ संमिते ।। शालिवाहनतो वेदशर शैलधरा १७५४ मित्ते ।।२।। संवत्सरे शोभनाख्ये चैत्रकृष्णादिने तिथौ ।। सोमेस्वातौ सिद्धियोगे करणे तैतिलसति ।। गोपालकृष्णं मिथुनेलग्ने सा स्थापयत्सति ।। अनेन गोपिकानाथः प्रियतां भक्तवत्सलः ।। संवत १८८९।।

**सरकारी रेकार्ड**

No. 219 1832 A.D.

Inscription on the wall of the temple of Gopal Krishna built in Indore by Krishna Ma-Saheb.

---

**अ. नं. २२०** **श्री**

इ.स.१८३२

रोजकीर्द महाराज मल्हारराव होळकर.

१ अनुष्ठानें सरकारी श्री सप्तश्रृंग व कचेश्वर, शुक्लेश्वर येथें चालू आहेत. तेथील ब्राह्मणांनीं पत्रें व प्रसाद, अंगारा पाठविले आहेत.

२ अनुष्ठानाकडील खर्चाचा बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेऊन एकाग्रचित्तें ब्राह्मणाकडून अनुष्ठान श्रीपाशीं नियमित करवीत जाऊन कांहीं एक न्यूनता न पडतां वरचेवर कळवीत जाणें म्हणोन रामचंद्र कृष्ण यांस पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 220 1832 A.D.

The Sarkar has engaged the services of Bramhins at Sapta Sringa, Kacheshwar and Shukaleshwar to perform religious rites. Received from the Bramhins letters as well as prasad.

Ramchandra Krishna is ordered to look to the comforts of the Bramhins, and see that the rites are performed diligently.

---

**अ. नं. २२१** **श्री**

मार्गशीर्ष शके १७५४, डिसेंबर, इसवी सन १८३२

यादी : सागर मुक्कामीं मेहरबान लाटसाहेब यांजकडे जवाहीर वगैरे राजश्री चिमाजीराव बुळे यांजबरोबर पाठविले ते.

| | |
|---|---|
| १५२३२-१५-३ | जवाहीर खुद्द साहेबांकडे अलंकार.<br>१९९६-००-० शिरपेंच १  ३५०० बाजू मर्दानी<br>५१३७-०८-० कंठी मोत्यांची  ३६३५ पोच्या जोड<br>९६४-०७-३ तुरा मोत्यांचा<br>...............<br>१५२३२-१५-३ |
| २३०-१०-० | चांदीचे दागिने तबक, १०१-८-० चौफुला, ४४-१०-० गुलाबदाणी, ३९-०८-०, हजारा व प्याला. ४५-०-०<br>..............<br>२३०-१०-० |
| ३७८९-१-६ | हत्ती नग २ मय सामान, रकमा. चांदीचा हौदा, १६८१-५-६ हातणी १६३६ एक खरीदी, झुला, कलाबतु रेशमी, ४७१-१२-० |
| १३१३-५-० | घोडेरास दोन. प्रत रु. ४०० व प्रत रु. ३५० येकुण ७५० चे व चांदीचा सरंजाम, रु. ५६३-५-० |
| १८-१२-० | छत्रीचा कळस मुलामेदार. |
| २००-१०-० | ढाल, तलवारी, कडे, सोने वगैरे. |
| ५०६-८-० | पाटल्या जोड हिऱ्याच्या मेमसाहेबाकडे. |
| ११००-०-० | लफा हिऱ्याचा बीबीकडे (मेमसाहेबाकडे). |
| ६७५-०-० | बांगड्या जोड मोत्यांच्या. |
| १४-३-३ | दागिन्यास फुंदे वगैरे जरीचे मुलाम्यासह. |
| ................. | |
| २३०८१-१-० | |

६३१०-१२-३ कापड जामदारखान्यापैकीं.

| | |
|---|---|
| ३१३४-२-० | खुद्द साहेबाकडे, मंदील नग तीन ४१०-११-० तिवट १, २७-३-०,शाल ९०५, दुपट्टे नग २ ५३४-३-०, किनखाप भारी १०७३-९-०, महमुद्या १८३-८-०. |
| १३५६-१४-० | बीबी (मेम) पातळ, खण, किनखाप, महमुद्या. |
| २९८-६-० | घोड्यांकडे सरंजाम. |
| १३४५-१-६ | हत्तीकडे झुली नवीन करविल्या. |
| ६०-१३-६ | ढालीच्या गवसण्या. |
| ३२-५-३ | तरवारीकडे गवसण्या वगैरे. |
| ११-१३-० | दस्तीकडे कापड वगैरे. |
| ६८-११-० | हातबासणे पोशाखाचे, मश्रुचे. |
| २-८-० | नजराण्याचा सरंजाम बांधावयास दादी वगैरे. |
| .............. | |
| ६३१०-१२-३ | |

...................

२९७०२-१३-६

येणेंप्रमाणें खर्च असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 221 December 1832 A.D.

List of expenditure incurred for presents made to the Viceroy at Sagar through Chimajirao Bulye : details are minutely marked.

---

**अ. नं. २२२** **श्री**

संमत १८८९, इसवी सन १८३२

सागर मुक्कामीं जातेसमयीं रेसिडेंट मारटीनसाहेब होते. बरोबर रेबीनसनसाहेब आले होते. इंदूरहून मंडळी रवाना झाली तपशील.

१ आप्पासाहेब बुळे, २ गोपाळरावबाबा खासगीवाले, ३ सखाराम बापू कापडनीस, ४ गोविंदराव मुनसी, ५ गोविंदराव ब्रम्हगिरी, ६ शिवरामदास मुनसी, ७ मुकुंदराव कुंवर सावेरवाले, ८ रुस्तमखा निसबत गुलाममहमद रिसालदार.

ह्याप्रमाणें मंडळी सागरास पोंहचल्यावर शहरांत स्वारी जातांच किल्लेदार यांनीं सलामीच्या तोफा पांच केल्या. नंतर लाटसाहेब यांचे मुलाखतीस मंडळी गेली. ते समयीं पेशवाई व सलामी जाहली तो तपशील येणेंप्रमाणें.

१ एक गोळीचे टप्प्यावर दोन साहेब हत्तीवर बसून पेशवाईस आले होते.

१ आणखीन पुढें गेल्यावर खुद्द राबिनसनसाहेब व आणखी एकसाहेब हात्तीवर आले होते.

१ कोठीवर स्वारी दाखल जाहल्यावर लाटसाहेब खुद्द कोठीतून जमीनपावेतों पेशवाईस आले व अप्पासाहेबांचा हात धरून दरबारांत घेऊन जाऊन खुर्चीवर बसविले व इतर मंडळीसही योग्यतेनरूप बसविले. नंतर श्रीमंत होळकर सरकारचे मिजाजीचा हाल विचारला. नंतर मेघटनसाहेब बोलेलें कीं, तुम्ही प्राचीन वेळचे आहांत. यानंतर नजर नजराणा, अत्तरपान, होऊन सलामीच्या तोफा जातां येतां २१ एकवीस जहाल्या म्हणजे एकंदर आवाज ४२ जाहले.

**सरदार बुळे रेकार्ड**

No. 222 1832 A.D.

Description of the Second deputation at Sagar headed by Appa Saheb Bulye in 1832 A.D.

---

**अ. नं. २२३** **श्री**

इसवी सन १८३२-३३

सागर डेप्युटेशन संबंधीं लाटसाहेबाकडे इंदूरहून मंडळी गेली त्याजबद्दल खुलासेवार. लाट गव्हर्नर ग्वाल्हेरीस येऊन तेथें सात मुक्काम करून झांसीस आले, तेथेंही एकदोन मुक्काम करून सागर छावणीस इंदूरवाले आदिकरून भोपाळवाल्यांच्या भेटी व्हाव्या म्हणोन ठरले. बरोबर मकनाटसाहेब मुख्य कारभारी व रेबीनसनसाहेब, असे दोन मुख्य होते. सागर प्रांत बुंदेलखंड येथील छावणींत कोठींत दाखल झाले छ.९ मार्गशीर्ष शुद्ध १० सन १२४२. त्यांचे भेटीस सरंजाम घेऊन जाण्याची योजना होऊन खलित्यांत नांवें सदरील.

१ चिमाजीराव बुळे १ गोपाळराव गोविंद गानू खासगीवाले

१ सखाराम बापू कापडनीस १ गोविंदराव वासुदेव मुनशी

येकुण चार जणांचीं नांवें लिहून खलिता तयार झाला. इंदूर मुक्कामहून सरकारस्वारी भानपुरियास जाणार म्हणोन लाटसाहेबाकडील मेजवाणीचा सरंजाम हत्ती, घोडे, वस्त्रें, दागिने आदि करून सरंजाम तयार करविला तो इंदूर छावणींत बडेसाहेबांस दाखवावा येविषयीं

व स्वारी भानपूर येथें जाती तेव्हां भेट होऊन मग निघणें व्हावे आणि लाटसाहेबास इकडील दौलत प्रकरणीं मजकुर साहेबांचे हाते लिहून बंदोबस्त, जास्ती महाल मुलूखसंबंधीं घडावे येतदर्थ बडेसाहेब मार्डिनसाहेब यांजला सरकार वाडियांत भेटीस बोलाविले. बडेसाहेब व रेबीनसनसाहेब वगैरे चार पांच साहेब वाड्यांत येऊन थोरले कचेरींत बडेसाहेबांसुद्धां बसून सरकारची भेट होऊन महाराज व बडेसाहेब उभयतां कचेरीतील मागील खोलीत एकांत जाहला. एकांतानंतर गोपाळरावबाबा खासगीवाले यांस बोलाविलें. त्रिवर्ग अर्धघटका खोलीत बसून नंतर त्रिवर्गही मासाहेबांकडे गेले. तेथें मासाहेबांसह चौघांनीं एकांत केला. माधवराव, खंडोपंत निसबत फडणीस व काशीबा आदिकरून कोणासही जवळ येऊं दिले नाहीं. त्यावर लाटसाहेबाकडे नेण्याचा सरंजाम वस्त्रें, दागिने वगैरे. बापू भिकाजी पोतनीस, माधवराव फडणीस, हे घेऊन आले. ते दाखवून बोलणें चालणें उघड व्हावयाचे ते होऊन कप्तान राबिनसनसाहेबांची योजना लाटसाहेबांकडे जाण्याची सांगून, बोर्तीकसाहेबास स्वारीबरोबर भानपुऱ्यास जाण्याचें सांगितले. नंतर साहेबांनीं वाड्यांत खाना खाऊन प्रहर रात्रींस छावणींत गेले.

पुढें सरकारस्वारी भानपुऱ्यास जाण्याकरितां कार्तिक शुद्ध २ गुरुवारीं मागील दीडप्रहर रात्रींस निघून बाणगंगेवर मुक्कामास गेली. तेथें दोन मुक्काम होऊन पुढें चालती झाली. गोपाळराव गानू , बुळेसाहेब, सखाराम बापू, यांनीं इंदुरींसच राहून साहेब निघण्याचे संधीस बराबर जावें याप्रमाणें सरकार आज्ञा. साहेबाचेंही सांगणें त्याजवरून बुळेसाहेब, सखारामबापू, गोविंदराव मुनशी, इंदुरीं राहिले व गोपाळराव गानू स्वारीसमागमें भानपुऱ्यास गेले. महतपूर मुक्कामीं बोर्तिकसाहबाची भेट सरकारची होऊन पांच मुक्काम महतपुरीं राहून नंतर चालू झाले. स्वारी जातेसमयीं बोर्तिकसाहेब, मासाहेब, महाराजसाहेब, यांचे एकांत दोन चार वेळां जाहले. गोपाळरावबाबा गानूचे ठिकाणीं विश्वास यामुळें एकांताचे वेळीं साहेब बोलावीत गेले. कामाकाजाचे कागद बाबाचेच नांवें पाठवीत असत. भानपुऱ्यास स्वारी पोहचल्यावर गोपाळराव बाबांस सरकारांतून लाटसाहेबांकडे जाण्याकरितां पालखी देण्याची परवानगी होऊन, इंदुरीं माधवरावांस पत्रें लिहून दिली, नंतर छ २० जमादिलाखर कार्तिक वद्य ६ प्रहर रात्रींस सरकारचा निरोप घेऊन शालजोडी, पागोटें देऊन रवाना केलें. सखारामबापू इंदुरीं होते. सबब त्यांजलाहीं वस्त्रें असावी म्हणोन बाबा बोलले. त्याजवरोन सरकारांनीं शालजोडी, पागोटे त्यांसही दिलें. इंदुरीं आलेवर राबीनसनसाहेब व बडेसाहेबाची भेट घेतली व पालखी तयार करविली.

साहेबांचे निघण्याचा बेत तारीख १ जानेवारी सन १८३३ मार्गशीर्ष शु.९ स ठरला. त्याजवरून इंदुरींहून असबाबसुद्धां मुहुर्ते करून साहेबांकडे जाणेस निघाले. मुहूर्ताप्रमाणें मार्गशीर्ष शु.६ दीड घटका दिवस येतां प्रातःकाळीं गोपाळरावबाबा, सखारामबापू, उभयतां हत्ती, घोडे, पलटण, पागा, शिलेदार, वगैरे सरंजामासुद्धां इंदूरनजीक छावणींत गणेश विठ्ठल किबे यांचे बंगल्याजवळ आमराईत मुक्काम करून होते. बुळे यांचे निघण्याचा मुहूर्त शु.७ गुरुवारीं होता. त्याप्रमाणें तेही दुसरें दिवशीं यांचे डेऱ्याचे डावे बाजूस डेरा

देऊन राहिले. साहेबाचे निघण्यावर तीन दिवस छावणींत मुक्काम झाले. तो भानपुऱ्याहून सरकारचीं पत्रें घेऊन शिवरामदास मुनसी सामील झाले. छावणींत बडेसाहेबांचा निरोप घेऊन नजराण्याचे सामान दाखविणेकरितां खालील मंडळीसह नजराण्याचे घोडे, हत्ती वगैरे दाखविणेस नेले.

१ चिमाजी अप्पा बुळे, १ गोपाळरावबाबा खासगीवाले, १ सखाराम बापू कापडनीस, १ गोविंदराव वासुदेव मुनसी, १ गोविंदराव ब्रम्हगिरी, १ मुकुंदराव कुंवर सावेरकर, १ सीवरामदास मुनसी. येणेंप्रमाणें मंडळी निरोप घेऊन आल्यावर दुसरें दिवशीं छ ८ रजब रोज शनिवारीं कप्तान राबीनसनसाहेबाचे कूच होऊन भीचोलीस मुक्कामास गेले व मंडळीनीं अश्रावदेस मुक्काम केला. याप्रमाणें दरकूच मुक्काम साहेबाचे आसपास करीत जात. चिमाजीराव अप्पाकडील मोदीखाना वगैरे बेत निराळाच होता. बाकी सर्वांचे एकच मुदबक होतें.

साहेबाकडे नजराण्याकरितां सरंजाम इंदुरींहून बरोबर येणेंप्रमाणें.

२ हत्ती, त्यापैकीं खुला एक हौद्याचा व चांदीचे मुलामेदार हौदा एक सोनेरी.

२ घोडे रास, त्यांस सरंजाम, चांदीचा कंठा, दुमची सरोवर, माळा, वगैरे घोड्यावरील सामान.

८ दागिने लाटसाहेबाकडे, कंठी, शिरपेंच, भुजबंद, पोवच्या जोड, तुरा मोती दाणे ४६० बीबीकडे : पाटल्याची जोड हिऱ्याच्या, बांगड्या जोड मोती, लफा हिऱ्याचा.

९ जिनसा चांदीच्या, तबक, चौफुला, अत्तरदाणी, गुलाबदाणी, हजारा, तरवार, ढाल, चांदीचा पेला, छत्री कळसदार, वगैरे.

१ कापड किनखाप, महमुद्या, दुपटे, मंदील, शालजोड्या, खण, नजराण्याचे समयीं ढाला ११ भरून नेल्या.

१ सुगंधी सरंजाम, तैवज खर्चाकडील व फळफळनवळ मेवामिठाई, वगैरे सरंजाम.

मंडळी बरोबर सरकारी इंतजाम हत्ती दोन, चांदीच्या हौद्याचा एक व लाकडी हौद्याचा एक, पागा २ नगारानिशाण, गोपाळराव मैराळ बडोदेकर व मुकुंदराव कुंवर सावेरकर, पलटणापैकीं कंपन्या २ बजरंग पलटण सुभेदार गजराजसिंग, हवालदार छदासिंग, महाराज पलटण सुभेदार देवीसिंग, जमादार गुलाबसिंग. शिलेदारपैकीं रिसाल गुलाम महंमदपैकीं खार ५० बाबाजी मेमणपैकीं खार ५ पलटणापैकीं कडाबीन पहारे २ हवालदार खुशालसिंग, ठोकळसिंग. किता पाहारा जमादार इसरी.

१ शागीर्दपेशापैकीं लोक. चोबदार, भालदार, हुजरे सखाराम व गंगाजी, जासूद बहरु व कासीबा. हलकारे चार. मेवाती इसम पांच, सांडस्वार मंगल, सरदारखां, भालेकरी, लगीवाले, मशालची, कामाठी दोन, बेलदार, भीस्ती, आचारी दोन, पाणके दोन.

१ भारबदारीकडे उंट नग ३६ मंडळीचे बाडबिस्तर वाहणेसाठीं.

१ फरासखाना चांदणी, डेरे जाजमे, गालीचे, चादरी, गाशे, पंखे, वगैरे.

१ भांडी मुदबकाकडे व भोजनाकडे थाळे, वाट्या वगैरे.

१ इतर सामान पाट, कावडी, लाकडी पेट्या, रस्त्या डबे वगैरे सामान.

येकुण जिनसा व इतमामासुद्धां छावणीहून मार्गशीर्ष शु. ९स कूच करून फडणिसाकडील गांव अश्रावदेस मुक्काम करून नंतर दरकूच सागराजवळ पौष शुद्ध ७ मंदवारीं एकत्र होऊन हत्तीवर चांदीचे हौद्यांत बुळेसाहेब, दुसरें हत्तीवर लाकडी हौद्यांत गोपाळरावबाबा, सखारामबापू, असे शहरांतून चालून राबिनसनसाहेबांनीं मुक्काम केला त्याचे पूर्वेस नाल्याचे काठीं मुक्काम केला. ही जागा शहरापासून एक कोस होती नंतर छ ९ मंगळवारीं बडे लाटसाहेब चारघटका दिवसा प्रातःकाळीं दोघे मुसाहेबांसुद्धा कोठींत दाखल झाले. कोठीजवळ बाहुटा उभा करून सलामीच्या तोफा झाल्या. त्यानंतर आमचेकडील मंडळीचीं भोजनें होत आहेत तोंच राबिनसनसाहेबांकडील नोकर येऊन बोलला कीं, गोपाळरावबाबांस साहेबांनीं बोलावलें आहे. भोजन होतांच बाबासाहेबांकडे गेले. तो राबिनसनसाहेबांनीं सांगितलें कीं तुम्ही लाटसाहेबांकडे जाण्याची तैयारी करावी. प्रथम तुमची भेट होऊन नंतर इतर संस्थानिकांच्या भेटी होतील. गोपाळरावबाबा बोललें कीं आज नुसती भेट घेऊं व जाबजबाबाकरितां उदईक भेटूं. चार वाजतांचा टाईम ठरला. भेटीचे वेळीं दोघे मुसाहेब सामोरे येतील.

त्यावरून नजराण्याची सर्व सिद्धता करून हत्ती लवाजम्यानिशीं चांदीचे हौद्यांत बुळेसाहेब, दुसरें हौद्यांत गोपाळरावबाबा, श्रीपतराव, दाजी दिवाणाकडील बरोबर होते ते व सखारामबापू म्यान्यांत बसून, बाकी मंडळी घोड्यावर आपआपले इतमामाप्रमाणें निघाले. ते कोठीपासून निम्मे मार्गावर गेले तों लाटसाहेबाकडून छोटे मुसाहब, बुरणसाहेब दोघे एका हत्तीवर बसून व राबिनसनसाहेब एकावर असे सामना झाले व हत्तीवर उभे राहून राबिनसन व मुसाहेब यांनीं बुळेसाहेब व गोपाळरावबाबांस सलाम करून डावे बाजूस हत्तीबरोबर झाले. कोठीचे दरवाजापाशीं राबिनसनसाहेब व मुसाहेब हत्तीवरून उतरून आपलेकडील हत्ती खाली बसविले, तों लाटसाहेब व बडेमुसाहेब, कोठींतून बाहेर दरवाजापाशीं आले. तों बुळे व बाबा हत्तीवरून उतरतांच लाटसाहेबांनीं सलाम करून बुळे व बाबांचा हात धरून कोठींत घेऊन गेले व सलामीच्या तोफा साहेबांकडून अकरा जाहल्या.

लाटसाहेबानीं आपले उजवे बाजूस चिमाजी अप्पा बुळे यांस व डावे बाजूस गोपाळरावबाबा गानूस बसवून आपण मध्यें बसले. बुळ्याचे उजवे बाजूस मकनाटसाहेब मुख्य कारभारी व राबीनसनसाहेब, रिसालदार वगैरे व गोपाळरावबाबांचे डावे बाजूस श्रीपतराव नाना, सखाराम बापू, गोविंदराव मुनशी, शिवरामदास मुनशी व गोविंदराव ब्रम्हगिरी, मुकुंदराव कुंवर, रिसालदार येणेंप्रमाणें इकडील मंडळीस ९ नऊ खुर्च्या मिळाल्या.

लाटसाहेबांनीं चिमाजी अप्पांस विचारलें कीं महाराजसाहेब व मासाहेब मजेंत आहेत? परंतु वर्णोच्चार स्पष्ट नव्हते. कारण साहेबांचें वय ८०. सबब मकनाटसाहेबानीं

गोपाळरावबाबांस पुसले कीं लाटसाहेब विचारतात कीं, महाराजसाहेब व मासाहेब खुशींत आहेत ना ? होय म्हणून बाबा बोलले. नंतर आब, हवा वगैरे बोलणें होऊन नंतर खिल्लत जडजवाहीर फळफळावळ मेवामिठाई, पोशाखाची तातें वगैरे साहेबांपुढें ठेवल्यावर लाटसाहेबांनीं सर्वांवर आपली नजर फिरवून हास्यवदन केलें. नंतर मेमसाहेबांचे दागिने पोशाखाचीं तातें पुढें ठेविलीं. तीं त्यांजकडील मुनशीनीं सरंजाम मेमसाहेबांकडे नेला. दाजी दिवाणाकडून खिल्लत श्रीपतराव नानांनीं पुढें ठेवल्यावर ही खिल्लत विठ्ठलपंत तात्यांचे मुलानीं ही मेजवानी पाठविली आहे. यानंतर साहेबांकडून विडे पान सोनेरी, रुपेरी वर्खाचे देऊन अत्तर लाविलें व मंडळी उठली व साहेब (लाट) हे दरवाजापर्यंत जाऊन सलाम करून मागें फिरले. राबिनसन, मकनाट हे पुढील दरवाजापावेतों येऊन सलाम केला. हत्ती, घोडे सरंजामासुद्धां मकनाटसाहेबांचे सुप्रत केलें व साहेबांकडील मुनशीनीं सर्व सरंजामाची मोजदाद करून यादी तयार होत आहे तोंच देवासकरांकडील घोडा सुटून दोन घटका कोठीचे आसपास गोंधळ केला. असो.

दुसरें दिवशीं भोपालवाले व इतर राजे यांच्या भेटी नजराणे जाहले व तिसरें दिवशीं सर्वांची कूच होणार. तहनाम्यासंबंधीं व हक्कासंबंधीं लाटसाहेबांशीं बोलणें परंतु कागदपत्र मागाहून पाठवितों म्हणोन महाराजांनीं सांगितलें परंतु ह्यावेळपावेतों कागदपत्र आले नाहींत, परंतु माहितगारीनें गोपाळरावबाबांनीं टिप्पण करून कार्याकारण तह झाला, कोटेकरांस कमाविसीनें महाल सांगितले तेच त्यांनीं दाबले. लढाई जाहली तेवेळीं यजमानाचें वय लहान, कारभारी कैदेत, अशा कारणानें सरकारचें प्रांताचें फार नुकसान झालें. कृपावंत होऊन पहिलेपासून उभयतां सरकारची दोस्ती तरी महाल गेलेले परत मिळावे म्हणोन कैफियत लिहून पेश करण्याचें ठरलें. यांजकरितां प्रातःकाळीं स्नानसंध्या करून गोपाळरावबाबा राबिनसन साहेबाकडे गेले व सांगितलें कीं, आम्हांस कैफियत पेश करून लाटसाहेबांशी नफानुकसानी संबंधांत बोलणें आहे. त्यावर राबिनसनसाहेब म्हणाले की साहेबांचे कानावर तुमचा मजकूर घातला आहे. हल्लीं लाटसाहेब यांस वेळ नाहीं. तरी तुम्ही तुमचे हक्काची कैफियत मार्डिनसाहेबांस इंदूरचे छावणींत पेश करावी म्हणजे ते लाटसाहेबांस लिहितील. त्यावरून योग्य विचार केला जाईल. त्याप्रमाणें यादी त्यांचे जिम्मेस करून सर्व मंडळी मुक्कामीं आली. दुसरें दिवशीं दोन प्रहरीं लाटसाहेबांची भेट झाली. पूर्व दिवसाप्रमाणेंच बैठकीची व्यवस्था होती. लाटसाहेब बोलले कीं आम्ही लोखंडाचा पूल करविला आहे व चांदी टाकसाळ आहे, ती तुमचे पाहण्यांत नसेल. काम बहुत चांगले झाले आहे. इंदूर येथेंही तलाव किंवा नदी असल्यास याप्रमाणें कामाचा नकाशा लक्षांत ठेवावा. याप्रमाणें लाटसाहब बोलले व पीकपाण्याच्या गोष्टी जाहल्यावर साहेबांकडून परत आहेर व मेजवानी, वगैरेच्या ढाला भरून लोकांनीं पुढें आणून ठेविल्या. जिनसा खालीलप्रमाणें :

सरकार व मासाहेबां करितां, (दागिने) कंठी, मोत्यांची दुहेरी दाणे ४६ व पन्हे ९ माणकें १२ हिरे पदकास ९ व शिरपेंच १ कलगी, पोवची, मासाहेबांकडे तितरपंखी पांचुचे हिऱ्याचा जोड. कापड तिवटे, शालजोडा, दुपटे, महमुद्या चंदेरी, किनखाप, पटका वगैरेंः

येकुण जिनसा देऊन साहेब बोलले कीं, महाराज साहेबांस व मासाहेबांस योग्य जिनसा त्यांचे लायक नाहीं. परन्तु प्रसंगीं होत्या त्या दिल्या, म्हणोन मकनाटसाहेब बोलले. उत्तर केलें की हेही चांगलेच आहे. बाबा खासगीवाले बोललें कीं पहिलेपासून इंग्रज सरकारची दोस्ती आहे तशीच कायम राहावी. त्यावर लाटसाहेब बोललें कीं महाराज काम पाहतांत किंवा मासाहेब पाहतांत ? त्यावर बाबा बोललें कीं आमचे महाराजसाहेब बहुत हुशार आहेत. सर्व काम पाहतात. परन्तु मासाहेब वडील. सबब त्यांजवर सर्व विश्वास आहे. यानंतर विडे अत्तरपान लाटसाहेबांनीं करून इतरांस मकनाटनीं करून सलाम केल्यावर लाटसाहेब दरवाजापावेतों येऊन हात्ती, घोडे आहेत ते महाराजसाहेबांकरितां घेऊन जावे हे सांगोन माघारी फिरले व मकनाटसाहेब हत्तीपावेतों येऊन सलाम करून गेले. मंडळी डेऱ्यास आली. रात्रौ साहेबांनीं कूच करून जबलपुराकडे निघून गेले. चिमाजी अप्पांस कंठी मोत्याची, शिरपेंच, एक शालजोड व गोपाळरावबाबा, सखाराम बापू, गोविन्दराव मुनशी यांजकरितां पटके अंगठ्या, राबीनसनमार्फत लाटसाहेबांना पाठविले. बहुमान पाहून प्रत्येकास आश्चर्य वाटले. तेच दिवशीं साहेबांकडील चोपदार वगैरे मंडळी बक्षिसें घेण्यास आली. त्यांचे योग्यतेप्रमाणें तजवीज करून मार्गस्थ केलें.

तों दुसरें दिवशीं इंदूराहून सांडस्वार महालसंबंधी याद, साहेबांस दाखविण्यास खंडोपंतानीं सरकारचे पत्रासुद्धां पाठविली, परंतु आतां उपयोग काय ?

लाटसाहेबांनीं शिफारस केल्याप्रमाणें लोखंडी पूल व चांदी टाकसाळ पाहून घेतली. सागरास मुक्काम ९ दिवस झाला. दहावें दिवशीं छ १५ इंदुवासर माहे साबान पौष वद्य १ राबिनसनसाहेब कूच करून गेले. भोजनोत्तर आपलेकडील मंडळीची तयारी झाली. शहरांत लक्ष्मीनारायण वैद्य सागरकर यांजकडे पानसुपारी चिमाजी अप्पासुद्धा झाली व दरकूच दरमुक्काम इंदुराकडे निघालों.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 223 1832-33 A.D.

Detailed account of the visit of 9 days of the Indore Deputation that waited upon the Viceroy at Sagar.

---

**अ. नं. २२४** **श्री**

ता. २ जानेवारी, इसवी सन १८३३

सागर मुक्कामींहून गोपाळराव गोविंद गानू यांचे पत्र. पौष शुद्ध ११ सोमवार पावेतों मुक्काम छावणीं नजीक सागर येथे स्वस्तीक्षेम असों विशेष. आज्ञा घेऊन निघालो ते संकेताप्रमाणें मंडळीसह साहेबांबरोबर दरकूच त्यांचे अनुषंगानें शुद्ध ७

मंदवारीं मुक्काम मजकुरीं दाखल जाहलों. इकडे आलों त्यादिवसापासोन आज्ञापत्र येऊन कुशलार्थ कळत नाहीं येणेंकरून चैन पडत नाहीं. सरकार स्वारी इंदूरास दाखल जाहली म्हणोन साहेबांकडून समजलें. परंतु आद्योपांत कळण्यांत आलें नाहीं त्यास पत्रीं साकल्यार्थ लिहून कळविण्याविषयीं आज्ञा व्हावी. यानंतर इकडील मजकुर.

१ लाटसाहेब काल शुद्ध १० प्रातःकाळीं चारघटका दिवस चढतां येऊन कोठींत दाखल जाहले. भेटीचा योग कालच त्रितियप्रहरीं होऊन मेजवानीसह सरंजाम आदिकरून हात्ती, घोडे, जवाहीर, सुद्धा प्रथम भेटीसच नजराणा करून मुलाखात उत्तम प्रकारें झाली. त्यांजकडील दोन मुसाहेब सामोरे येऊन हात्तीवरच भेट होऊन नंतर कोठींत लाटसाहेबांची भेट मकनाटसाहेब हे मुख्य कारभारी मुसाहेब आहेत. हे बाहेर येऊन आंत घेऊन गेले.

१ साहेबांनीं सरकारकडील वर्तमान पुसून बहुत खुशवक्तीनें बोलणें झालें. आपलेकडील मजकुर बोलावयाचा त्याची यादी करून फारशी तरजुमा राबिनसनसाहेबास समजाविला. त्यांनी मकनाटसाहेबासीं दाखवून, बोलणें करवितों असें बोलले.

१ काल भेट जाहली. आज यादी समजाविण्याची आहे. इतक्यावर घडेल तसें मागाहून डांकमार्गे सेवेसीं कळविण्यांत येईल. लाटसाहेब परवाचे दिवशीं जाणार. खटले वगैरे आजबाब आज सर्व निघून गेला. सडेसाहेब मात्र आहेत. धारवाले व देवासवाले यांच्या भेटी कालच जाहल्या. भोपाळवाले वगैरे यांच्या भेटी आज होणार. उदईक आपलेकडील परत मेजवानी होऊन परवाचे दिवशीं जातील. येथें मेवा चांगला मिळाला. शेवफळ मेवा दाणे शंभर १०० सेवेसीं हलकारियाबरोबर देऊन भोयासमागमें पाठविले आहेत. प्रविष्ट होऊन उत्तराची आज्ञा व्हावी. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 224 2-1-1833 A.D.

Letter of Gopalrao Ganu giving short details of the interview with the Viceroy at Sagar.

---

**अ. नं. २२५** **श्री**

ता. १४ जानेवारी, इसवी सन १८३३

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री गोपाळरावबाबा व बापू सेवक माधवराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आपण सागरास पोहचून साहेबांच्या भेटीचें वगैरे वर्तमान

कळत नाहीं. सरकारांनीं एकदोन वेळां विचारलें परंतु आपला लेखच नाहीं तेव्हां विनंती काय करावी. यास्तव आळस न होतां जाहलें वर्तमान वरचेवर लिहिण्यांत येऊन, येण्याचा बेत कळवावा. आपले घरची मंडळी सुखरूप आहे.

येथून सांडस्वारासमागमें, महालची यादी व बुळे यांजकडील तोडे रवाना केलें ते पावलेच असतील. साहेबांचे भेटीचा समारंभ कसा झाला, सरकारी कामाचे बोलणें काय झाले ते सविस्तर कळवावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकार्ड**

No. 225 14-1-1833 A.D.

Madhavrao Malhar anxiously inquires about the interview as the Maharaja himself inquired about it more than once. Gopalrao Baba (the addressee) is requested to be more alert.

---

**अ. नं. २२६** **श्री**

ता. १७ जानेवारी, इसवी सन १८३४

यादी : सरकार राजश्री मार्तंडराव होळकर मुहूर्तांने प्रथम गादीवर बसले सु।। अर्बासलासीन मयातेनवआलफ. सन १२४३ फसली. रमजान ऊर्फ पौष मास चंद्र ६ शुद्ध ७ शुक्रवार दोन प्रहर आभिजित मुहूर्तावर. सबब नजरा जाहल्या :

| नांव. | मोहरा | पुतळ्या |
|---|---|---|
| १ गणेश विठ्ठल किबे पोशाख व | १ | ० |
| १ नारायणराव राम पळसीकर | १ | ० |
| १ गोपाळराव गोविंद खासगीवाले | १ | ० |
| १ बळवंतराव मल्हार हुजूर फडणीस | १ | ० |
| १ .... मुकुंद | १ | ० |
| १ निळकंठ गिरमाजी चिटणीस हुजूर | १ | ० |
| १ दाजी रघुनाथ | १ | ० |
| १ गोविंदराव मुनशी | ० | १ |
| १ .... अनंत सबनीस | १ | ० |
| १ रघुपत हरीहर नि. टाकसाळ | ० | १ |
| १ आबाजी बल्लाल | २ | ० |
| १ माधवराव गणेश सरकार बिजागड | १ | ० |
| १ माणिक शिवराम किल्ले हिंगलाजगड | १ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धोंडो सदाशिव दरखी आमीन पेटलावद थांदले | १ | ० |
| १ | विठ्ठल केशव पंडित कमाविसदार नि. बुळे | १ | ० |
| १ | मैराळ मागोजी | ० | १ |
| १ | रावजी बापूजी | ० | १ |
| १ | शिवचंद कोठारी | ७ | ० |
| १ | रतनचंद कोठारी. नंदवाई | १ | ० |
| १ | मल्हार निंबाजी प्रो नेमावर | १ | ० |

श्रीमंत मार्तंडराव होळकर गादीवर बसले सबब कापड जामदारखान्याकडील खर्च. बहुमान कापड, पोशाख, आश्रित मंडळी, सरंजामी, संस्थानिक, कमाविसदार, कारकून, शागीर्दपेशा, सोयरेमंडळ, गणपतीबुआ बडोदेकर, धर्मादाय फौज, जरीपटका, शिलेदार, सावकार, वगैरे मंडळीस बहुमान वस्त्रें दिली. त्याचा आकार रु.६९६५६-१३-९ खर्च असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 226 — 17-1-1834 A.D.

List of presents made by Mutsaddis, Sardars etc., to Sarkar Martandrao Holkar on the Coronation-day; Dresses presented to various officers etc.

---

**अ. नं. २२७** — **श्री**

ता. २ मार्च, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकर यांजकडून खंडो पांडुरंग यांस. विशेष. तुम्हाविशीं ताईसाहेबांनीं खात्रीकरून पत्र लिहिलें तें पावलें आणि पूर्वी रघुकुंवर यानें मजकुर सरकार स्वारीत रुजू झाल्याबद्दल लिहिलाच होता, त्यावरून आमची खात्री होऊन हें पत्र सादर केलें असे. तरी खातरजमा ठेऊन सरकारस्वारी रघुकुंवर व उदेसिंग राऊळ सांगतील त्याप्रमाणें इमानेइतबारें करून बंदोबस्त ठेवणें. इकडून कोणेविशीं अंदेशा न वागवितां खुलाशा मनानें कामकाज करीत जाणें. बाडाचा बंदोबस्त चांगला ठेवावा र.छ २० माहे सवाल. बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतरावसुत हरीराव होळकर

**सरकारी रेकॉर्ड**

No. 227 2-3-1834 A.D.

Letter of assurance and confidence to Khando Pandurang from Maharaja Harirao Holkar.

---

**अ. नं. २२८** **श्री**

ता. १३ एप्रिल, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरांकडून चिमाजीराव बुळे यांस. विशेष. तुम्हाकडील सरंजामांत सरकारांतून प्रगणे चिखलदे, प्राो थांदले, हे दोन महाल पूर्वीपासोन होते दरम्यान महालचे वहिवाटीस मामलेदार खासगीचे इतल्ल्यानें पाठवून तुमचे खर्चाचा बंदोबस्त ठेवण्यांत येत गेला. सांप्रत तुम्ही विनंती केल्यावरून तुमचे महाल पूर्ववत कायम ठेऊन सरंजामानिसीं सरकारचाकरी करीत जावी, असें ठरावून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही हरदु महालचा बंदोबस्त उत्तम ठेऊन सुदामतप्रमाणें सरकार लक्ष ठेऊन सरंजामानिसीं चाकरी करीत आल्याप्रमाणे करीत जाणें. र.छ ३ जिल्हेज मोर्तबसुद.

सदरहूची नक्कल रेसिडेंट बहादुराकडे रवान छ २४ जमादिलाखर हस्ते रामप्रसाद वकिलाचे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 228 13-4-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar renews the Sanad of Parganas Chikhalda, and Thandle to Chimajirao Bulye on condition of loyal service as before. The Parganas had, for some time past, been resumed by the Holkar Sarkar.

Copy of this was forwarded to the English Resident.

---

**अ. नं. २२९** **श्री**

ता. २९ जून, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरकडून चिटको बल्लाळ कमाविसदार देपाळपूर यांसी. विशेष. संस्थान अंगपात क्षेत्र अवंतिका येथील खर्चाची नेमणूक सालिना रु. चारशें पन्नास ४५० प्रगणे मजकुर ऐवजी सरकारांतून करून दिली. त्याप्रमाणें पावले. साल मजकुरीं तुम्ही पत्राचा अक्षेप घेतला म्हणोन हुजुर विदीत जहालें. त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केलें असे.

तरी संस्थान मजकुरचे खर्चाची नेमणुक पूर्वीपासोन चालत आहे त्याअन्वयें साल मजकुरचा ऐवज देऊन पुन्हा बोभाट न ये तें करणें. छ.२१

**सरकारी रेकॉर्ड**

No. 229 29-6-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders the Kamavisdar of Depalpur to continue the annual payment of Rs. 450/- to Sansthan Angapat of Avantika (Ujjain) as before.

---

**अ. नं. २३०** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १८३४

दफाते महाराज हरीराव होळकर. खंडेराव बळवंत कमाविसदार आलमपूर यांसी. विशेष. तालुके मजकुरीं संस्थान आयोध्या व चित्रकोट वगैरे नेमणुकदार यांच्या नेमणुका सरकारांतून करून दिल्या असता माजी कमाविसदार आनंदराव यादवानीं दुसाला ऐवज दिला नाहीं म्हणोन हुजूर बोभाट आल्यावरून, मशारनिल्हेचे नांवें अलाहिदा पत्र सादर केले असून तुम्हांस लिहिण्यांत येतें कीं, नेमणुकदारांची चौकसी करून ऐवज देणें राहिला असेल येविशीं माजी मामलेदारास ताकीद करून संस्थान अयोध्या, चित्रकोट वगैरे नेमणुकदार यांजला देविविणें येविशीं पुनः बोभाट न येतां वास्तविक ऐवज माजीकडून ज्याचा त्यास देवविणें. छ १३ रविलावल.

**दिवाण पळसीकर रेकॉर्ड**

No. 230 21-7-1834 A.D.

The Kamavisdar of Alampur is ordered to see that his predecessor pays the usual amounts of Sansthan Ayodhya. Chitrakut etc... Amounts of two years are reported to be arrears.

---

**अ. नं. २३१** **श्री**

ता. २५ जुलाई, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकर : खंडेराव बळवंत कमाविसदार आलमपूर यांस. विशेष. श्रीक्षेत्र वृंदावन, येथें चेनघाट व कुंज व श्री चेनबिहारीचें मंदिर आहे. तेथील पूजा वेदमूर्ती जुगलकिशोर पुराणिक यांजकडे होती. दरम्यान त्याजकडून सरकारी जागेची कांहीं नुकसानी झाल्यामुळें मोहनदासाकडे पूजा सांगण्यांत आली. हल्लीं पुराणिक हुजूर येऊन नुकसानीपैकीं,

घाट व कुंज दरम्यान नवीन कुव्वा कोणी बांधला आहे, त्यावर गोविंदजीचे सत्याचा दगड लाविला आहे. तो उखडून टाकावा व फुलझाडाचे जागीं कोणाचे छप्पर आहे ते काहडून द्यावें. असे लिहून देऊन पूजा आमची आम्हास सांगांवी म्हणोन रदबदली केल्यावरून पूजा फक्त पुराणिकाकडे सांगोन, मोहनदास बैरागी याचें पत्र लिहून हे पत्र तुम्हास सादर केलें असे, तरी कोणी शहाणा कारकून वृंदावनास पाठवून कुव्यावरील दगड व फुलवाडी बागेंत छप्पर आहे ते काहडून टाकावे. ते काहडली म्हणजे श्रीची पूजा यांजकडे चालू करून देवविणें. म्हणोन पत्र छ १७ राबल.

**सरकारी रेकार्ड**

No. 231 25-7-1834 A.D.

The Kamavisdar of Alampur is ordered to hand over the service of worship of Shree Chenbihari at Brindaban to Jugal Kishore Puranik, after certain possessions of State property are recovered.

---

## अ. नं. २३२ श्री म्हाळसाकांत

ता. ११ आगस्ट, इसवी सन १८३४

राजश्री दिवाण हणमंतसिंगजी संस्थान नरसिंहगड यांस कीं, संस्थान मजकुर येथील टाक्याचा ऐवज तुम्हाकडून सरकारांत येणें तो तुम्ही साहेबाचे विद्यमानें जमा केला त्याचा तपशील खालीलप्रमाणें :

८५००० संमत १८८६ सन १२३९ फसली ८५००० संमत १८८७ सन १२४० फसली.
८५००० संमत १८८८ सन १२४१ फसली ८५००० संमत १८८९ सन १२४२ फसली.
८५००० संमत १८९० सन १२४३ फसली. ० लंग

येकुण चार लक्ष पंचवीस हजार रुपये पांच साला शिक्का सालमशाही. तुम्हांकडून टाक्याचे सालोसालचा भरणा झाला ते साहेबाचे विद्यमानें सरकारांत जमा असे म्हणोन पत्र छ ५ रविलाखर.

**दिवाण पळसीकर रेकॉर्ड**

No. 232 11-8-1834 A.D.

Receipt of Rs. 4,25,000/- (Salamshahi) through the British Resident into the Holkar Treasury as tribute of 5 years (Samvat 1886-1890 both inclusive), from Sansthan of Narsinggad.

---

अ. नं. २३३ **श्री**

ता. १७ आगस्ट, इसवी सन १८३४

श्रीमंत हरीराव महाराजांकडून : लाला लडेतीलाल यांस विशेष. मौजे अहिल्यागंज व मौजे धुरेरा व सूमगांव प्रगणे मथुरा हे तीन गांव श्रीक्षेत्र वृंदावन येथील कुंज वगैरे खर्चाकरितां असोन रामदास बैरागी भातरोडकर यांजकडे होते. ते पूर्ववत सरकारांत वहिवाटीस आले. तेथील मक्ता पांचसाला ठरावून दिल्यास गांवची आबादी ठेऊन मक्त्याचा ऐवज दरसाल सरकारांत दाखल करीत जाऊं म्हणोन तुम्ही विनंती केली. त्यावरून गांवचे आबादीवर नजर देऊन साल मजकुर संमत १८९१ तागायत संमत १८९५ पावेतों पांच साला निखर्ची दरसाल कलदार शिक्का रुपये ८४० प्रमाणें पांचसाला ४२०० यादी मखलासीची चार हजार दोनशें निखर्ची सरकारांत घ्यावयाचें ठरून हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी तुम्ही तीनही गांवची वहिवाट साल मजकुर पासून करीत जाऊन गांवची रैयत राजी राखून दरसाल रुपये ८४० सरकारांत दाखल करीत जाऊन रसीद घेता जाणें व अखेरसालीं हिशेब समजावीत जाणें म्हणोन छ.११ रविलाखर.

**पळसीकर रेकार्ड**

No. 233 17-8-1834 A.D.

Grant of a Sanad of 5 years to Lala Ladetilal by Maharaja Harirao Holkar. Three villages mentioned in the Sanad (Ahilyaganj, Dhurera and Sumgaon) have been resumed by the Sarkar and handed over to the grantee for the upkeep of State temples etc., at Brindaban. He is to pay Rs. 840/- annually to the Sarkar, after defraying the expenses of the temples etc.

---

अ. नं. २३४ **श्री**

ता. २२ सप्टेंबर, इसवी सन १८३४

दफाते श्रीमंत महाराज हरीराव होळकरः इफाजत जमा. शाळीग्राम मंत्री यांजकडील देवविले संस्थान महेश्वर येथें महापूर श्री नर्मदेस येऊन रैयतीचीं घरें व दुकानें वाहून गेलीं. सबब नूतन इस्तवारीस विद्यमान गोविंदराव वासुदेव निसबत खासगीवाले हल्लीं शिक्का रुपये ५००० पांच हजार तुम्हांकडून देवविले असे. तरी सदरहू पांच हजार मशारनिल्हेचे देऊन कबज घेणें. म्हणोन चिठ्ठी. छ १८ जमादिलावल.

**सरकारी रेकार्ड**

No. 234 22-9-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Rs. 5,000/- in payment for the loss incurred by the residents of Maheshwar in the heavy floods of river Narbada.

---

**अ. नं. २३५** **श्री**

ता.६ आक्टोबर, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरांकडून : रघुनाथ महादेव छत्री भानपुरा, यांसी. विशेष. येथोन श्री नर्मदेतील सहस्त्रधारेतील बाण व कैलासवासी ती. बाईसाहेबांची मूर्ती छत्रीवर धर्मशाळेत कैलासवासी ती. बाबासाहेबांसनिध स्थापनेकरितां पाठवून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी बाण व मूर्ती तेथें पावल्यावर सुमुहूर्ते पाऊणशें शंभर रुपये पावेतों स्थापनेस खर्च करून उत्तम प्रकारें अर्चा करून स्थापना जाहलियावर खर्चाची यादी हुजूर पाठवून देणें. म्हणोन पत्र छ २ जमादिलावल.

**सरकारी रेकार्ड**

No. 235 6-10-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar sends a Bana of the Narmada and a statue of Devi Ahilyabai for installation in the Chhatri of Yeshwantrao Maharaja at Bhanpura. A decent sum is sanctioned for the ceremony.

---

**अ. नं. २३६** **श्री**

ता. ७ आक्टोबर, इसवी सन १८३४

श्रीमंत हरीराव महाराजांकडून कमाविसदार इंदूर यांस. संमत १८९१ विश्वावसूनाम संवत्छरी रेवाउत्तरतीर मुक्कामीं कैलासवासी श्री मल्हारराव बाबासाहेब होळकर यांचे उत्तरकार्य जाले ते समयीं भूमीदानाचा संकल्प करून वेदमूर्ती राजश्री विश्वनाथभट बिन महादेवभट उपनाम घाणेकर गोत्र गार्ग्य, सूत्र अश्वलायन, वास्तव्य अंबेर तर्फ पावस तालुके रत्नागिरी प्रांत राजापूर हल्लीं वास्तव्य कसबे मजकुर यांचे हातावर उदक घातलें. ती जमीन मौजे बरोदा दौलत प्रगणे मजकुर येथें द्यावयाची. यादी मखलसीची बिघे सुमारें १० तलावानजीक अडाण कायम, ९० माळेत्रु जिराइत. येकुण शंभर बिघे जमीन धर्मार्थ देऊन हे सनद सादर केली असे. तरी तुम्हीं हक्कदाराखेरीज निवारसी जमीन पडीत बंजर पैकीं शंभर बिघे चतुःसीमापूर्वक भटजीचे दुमाला करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरे वहिवाट चालवीत जाऊन प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न घेतां

या सनदेची प्रती लिहून अस्सल परतोन देणें, म्हणोन छ ३ जनादिलाखर. सदरहूसंबंधीं जमीदार, कानगी, खुद्द विश्वनाथ भट, यांजकडेस पत्रें जारी झाली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 236 7-10-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders the Kamavisdar of Indore, that a piece of land Measuring 100 Bighas in Mauza Baroda has been granted hereditarily in charity to Vishwanath Bhatt Ghanekar for the salvation of the soul of the late Maharaja Malharrao II.

---

**अ. नं. २३७** **श्री**

ता. २० आक्टोबर, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरांकडून : गणपतराव फणसे संस्थान महेश्वर यांस. विशेष. श्री ओंकारेश्वर नर्मदा उत्तरतीर येथील मोतीगीर गोसावी यांनी हुजूर विदीत केलें कीं, घाटावर उतारियास नाव होती. ती फुटून गेली. यास्तव दुसरी नाव सरकारांतून देवविली पाहिजे म्हणोन. त्याजवरोन तुम्हांस लिहिलें असे. तरी संस्थान मजकुरीं नावा आहेत, त्यांपैकीं एक नाव लहान, चांगली मजबूत पाहून श्रीजवळ उताऱ्याकरितां गोसावीबाबा यांजकडे देणें. म्हणोन छ १६

**सरकारी रेकॉर्ड**

No. 237 20-10-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Ganpatrao Phanse to hand over a small but strong boat to Motigir Gosavi for the use of pilgrims visiting Shree Onkareshwar temple on the bank of the Narbada, as the old one is broken.

---

**अ. नं. २३८** **श्री**

ता. २१ आक्टोबर, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरांकडून : वर्तमानभावीं कमाविसदार परगणे रामपुरा यांसी. विशेष. परशराम बिन हरनाथ ब्राह्मण गौड राहणार कसबे मजकुर यांनी हुजूर इंदूर मुक्कामीं स्वारींत येऊन अर्ज केला कीं, पूर्वी जयपूरवाले राजे यांजकडे महाल होता त्यांनीं माझे वडिलांस कसबे मजकुरचे कोतवालीचें काम सांगोन नेमणूक सनदापत्रें करून दिल्ही आहे.

त्याप्रमाणे वहिवाट चालली. पुढें महाल चंद्रावतांकडे येऊन नंतर सरकारांत आला. खावंदांनीं माझे हातून काम घेऊन मुलामाणसांचा गुजारा चालविला पाहिजे. म्हणोन, त्याजवरून कोतवाली चौत्राकडील जमादारीचें काम सांगोन दरमहा रुपये १३ महालचलणी ठरून हे सनद सादर केली असे. तरी कोतवालीचे शिबंदी जमादाराचे काम यांचे हाते घेऊन दरमहा तेरा महालचलण पुस्तदरपुस्त देत जाऊन महाली खर्च लिहित जाणें. प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न घेतां याची प्रत घेऊन अस्सल भोगवटियास परतोन देणें. म्हणोनः छ १७ जमादिलाखर.

**सरकारी रेकार्ड**

No. 238 21-10-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Kamavisdars of Pargana Rampura to engage the services of Parashram Harnath Bramhin as Jamadar on Kotwali Chautra at Rs. 13/- per mensum. The service will be hereditary in consideration of past history narrated in the order.

---

**अ. नं. २३९** **श्री**

ता. २२ आक्टोबर, इसवी सन १८३४

महाराज हरीराव होळकरांकडून : राजोजी फणसे यांस. विशेष. मोरो अनंत कुळकर्णी मौजे नांदूर मध्यमेश्वर यांनीं येऊन विदित केलें कीं, मौजे मजकुरचे कुळकर्णी गणेश उमाजी व कोन्हेर गिरमाजी व रामचंद्र कृष्ण. त्रिवर्गापैकीं रामचंद्र कृष्ण पूर्वीपासून विभक्त व कोन्हेर गिरमाजी व गणेशा उमाजी हे उभयतां एकत्र. त्यांत कोन्हेर गिरमाजी याचे पोटीं संतान नाहीं. वृद्धापकाळ जाणोन गणेश उमाजी याचा कनिष्ठ बंधु याजला दत्तक घेऊन वृतबंध त्यांनीं आपले मांडीवर करून, कागदपत्र वृत्तीचें करून दिले. नंतर सहा वर्ष उपरांतिक माळवे प्रांतीं त्यांजला देवआज्ञा जाहली. त्यांचे वृत्तीची वहिवाट दत्तकाकडे चालवावी ते न करितां रामचंद्र कृष्ण यांनी गैरवाका समजाऊन दरोबस्त वहिवाट तेच करितांत. येविषयीं ताकीदपत्रेंही नेलीं, परंतु निवाड केला नाहीं. येविषयीं चौकशी करून आमची वृत्ती चालविली पाहिजे. म्हणोन त्याजवरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे तरी तुम्ही येविशींची चौकशी करून कोन्हेर गिरमाजी यांनी दत्तक घेतला असें वास्तविक असल्यास रामचंद्र कृष्ण याजला ताकीद करून याचे वृत्तीची वहिवाट यांजकडे चालविणें. पुनः बोभाट हुजुर न ये तें करणें. म्हणोन पत्र. छ १८ माहे जमादिलाखर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 239 22-10-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Rajoji Phanse to make inquiries into the disputed case of Kulkarni brothers regarding the Vritti of Madhyameshwar at Nandur.

---

**अ. नं. २४०** **श्री**

ता.५ डिसेंबर, इसवी सन १८३४

रोजकीर्द श्रीमंत होळकर सरकार : राजश्री चिमणराय साहेबराय यांस कीं, तुम्हांकडून बाळाजी रामचंद्र यांजकडे ऐवज देवविला त्याबद्दल यादी मखलासीची हल्लीं शिक्का रुपये २०४३०० त्याचे मुबादल्यास इंग्रज बहादुर यांजकडील टाक्याचा ऐवज येणें तो लावून दिला येणेंप्रमाणें.

| | |
|---|---|
| ९१५५३-०-९ | परगणे कोंच मिती आश्विन शुद्ध १५ संमत १८९१ कलदार. |
| २९४४३-८-० | संस्थान देवळे प्रतापगड मिती माघ शुद्ध १५ संमत १८९१ हल्लीं. |
| ३००००-०-० | परगणे पाटण केशवरायजीचे मिती ज्येष्ठ शुद्ध १५ संमत १८९१. |
| ६००००-०-० | संस्थान नरसिंगगड येथील कार्तिक शुद्ध १५ तागायत फाल्गुन शुद्ध. १५ पावेतों हप्ते पांच दर १२००० प्रमाणे हल्लीं शिक्का. |
| ............... | |
| २१०९९६-८-९ | |

तपशील :

| | |
|---|---|
| २०४३००-०-० | ऐनरदकर्जी |
| ६६९६-८-९ | तहकूब मुबादल्यास ऐवज मितीवार लावून दिला आहे. परंतु ऐवज ज्या मितीस पटेल त्या मितीपावेतों व्याजाचा हिशेब दरसदे एकोत्र्या प्रमाणें होणें सबब. |
| ................ | |
| २१०९९६-८-९ | |

दोन लक्ष दहा हजार नऊशें शहाण्यव रुपये पावणेनऊ आणे शिक्केवार लावून देण्यांत येऊन तुम्हाकडून दोन लक्ष चार हजार तीनशें रुपये हल्लीं शिक्का मशारनिल्हेकडे देवविले असे. तरी सदरहू दोन लक्ष त्रेचाळीसें रुपये देऊन कबज घेणें व सदरीं लिहिल्याअन्वयें टाक्याचा ऐवज पटवून दिल्यावर तहकूब ऐवजाचा हिशेब समजाऊन घेतला जाईल. म्हणोन पत्र छ ३ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 240 5-12-1834 A.D.

Chimanrai Sahebrai is informed that the amount of Rs. 2,04,300/- paid to Balaji Ramchandra through him may be recovered out of the Tanka due to the Sarkar through the East India Company. The details of the Tanka are marked in the letter.

---

**अ. नं. २४१** **श्री**

ता. ७ डिसेंबर, इसवी सन १८३४

दफाते श्रीमंत हरीराव महाराज होळकर इजाफतजमा. बाळाजी रामचंद्र यांजकडील देवविले. चिरंजीव सौभाग्यवती सकूबाई फणसे (हरीराव महाराजांची कन्या) महेश्वरास देवदर्शनास ज्येष्ठमासीं गेले. तेथें बागजी रतनजी याचे दुकानींहून कापड खरीदी करून खर्च झाला हल्लीं शिक्का रुपये १९०३-६-९ सदरहू रुपये तुम्हांकडून देविले असे तरी सदरहू रुपये मशारनिल्हेस देऊन कबज घेणें. छ ३ जमादिलावल.

**सरकारी रेकार्ड**

No. 241 7-12-1834 A.D.

Maharaja Harirao Holkar orders payment of Rs. 1,903/- expenditure incurred by his daughter when she visited the Maheshwar temples.

---

**अ. नं. २४२** **श्री**

इ.स.१८३४

यादी पोता व पलटणीकडे वगैरे खर्चास माहे जमादिलावल ऊर्फ भाद्रपदमास सु।। खमस सलासीन मयातेनवअलफ. सन १२४४ आकार हल्लीं शिक्के.

४००० पोताकडे. ३००० माहे मजकुर खर्चाबदल. १००० विजयादशमी निमित्त.

१३०० पलटणाकडे दसऱ्यानिमित्य वगैरे.

१५०-००-० टोप्या सफेत पंच, कुंडल व चांद नवीन. आफिसर लोकांच्या टोप्या सुमारी पांच करावयास चांदी.

३०-००-० रेशीम विलायती. आफिसर लोकांच्या कुडत्या, ३० व तुरुक स्वारांच्या तुकड्यास कुडते शिवविले त्यास कोर सोनेरी व रुपेरी लावली त्यांस शिवावऱ्यास तोळे ३०

कोर, दरतोळा १ प्रमाणें खरीदी गुजारत मलजी दरजी.

१५-००-० धागा मारवाडी वजन कुडते शिवावयास. दरशेरी दीडप्रमाणें खरेदी मलजी दरजी.

१००-००-० बुदाम सोनेरी व रुपेरी डजन ८० (बटन) सव्वाप्रमाणें मलजी दरजी.

५-५-० दोरण पिवळी तुरुकस्वारांच्या कुडत्यास लावणेस गज १७५.

५७-००-० बुदाम (बटन) कुडत्या सुमारी ९०० बटणास कथील वजन मण.

३९३-१२-० कलाबतु सोनेरी व रुपेरी आफिसर लोकांच्या सुमारी ३० त्यांजकडे तोळे १६० सोनेरी तोळे ८० आकार २३३-१२-० व रुपेरीस तोळे ८० आकार १६०.

५००-००-० पितळ टोप्यांकडे वजन गुजारत मनसुखदास कसारा.

................

१३००-००-०

१२८०-४-० दप्तर खर्चाकडे कागद तोगड्या गुजारत जीवनभाई कागदी. उत्तम, मध्यम.

११९०-०-० ऐन जिनसी खातें गुजारत जीवा बोहरी बरहुकूम हिशेब.

...............

७७७०-४-०

येकुण सात हजार सातशें सत्तर रुपये चार आणे. याची चिठ्ठी बाळाजी रामचन्द्र यांजवर करून देवावी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 242 1834 A.D.

List of expenditure incurred for military dresses, and Dasra Daftar, Rs. 7,770/-

---

**अ. नं. २४३** **श्री**

इसवी सन १८३४

दफाते महाराज हरीराव होळकर सन १२४४ फसली. १ दस्तक आप्पाजी कृष्णराव कांहीं दिवस दिवाणगिरीवर होते. त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला व उज्जेनीस समाधिस्त जाहले. त्यांचे समाधीकरितां सागवानी लांकडे, पाट, वगैरे सावळीगडाहून गाडे भरून उज्जेनीस

जातील, त्याजला मार्गी हासिलविषयीं मुजाहिम न होतां मुक्कामीं चौकी पाहरा देऊन आपआपले हद्दपार करून देत जाणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 243 1834 A.D.

Orders of the Holkar Sarkar that carts carrying wooden posts from Sawaligad to Ujjain for the Samadhi building of the late Appaji Krishnarao should be exempted from tax. At one time he was Karbhari of the State.

---

**अ. नं. २४४** **श्री**

इसवी सन१८३४

विनायक मोरेश्वर फडके निसबत कैलासवासी हरीपंत तात्या फडके : यांजकडून श्री हरीराव महाराजांस. विशेष. सरकारची स्वारी इंदूर मुक्कामीं दाखल जाहली, हें वर्तमान पुण्यास समजल्यावर श्री. पांडुरंगबाबा फडके यांनीं मला आज्ञापत्र पाठविलें कीं, होळकर सरकारचा व आपला घरोबा, यास्तव तुम्ही इंदूरास जाऊन सविस्तर समजाऊन लिहून पाठवावें. त्याप्रमाणें मीच येणार परंतु बडोद्यास गायकवाड सरकारांत ऐवज घेणें, त्याचे जाबसाल चालू होते, यास्तव मला दिनावधीं लागला. यास्तव गणेश बापूजी मेहेंदळे यांस पत्र लिहिलें. त्यांचे उत्तर आलें कीं, यावेळेस इंदूर सरकारास पोतदाराची जरुरी आहे. कोणी सावकाराची तजवीज होऊन येणें जाहल्यास घरोब्यात विशेष महत्व आहे. त्यावरून आम्ही येथील सावकाराशीं बोलणें करून पांच चार लक्षापावेतों देणारे सावकार पाहून सरकारास थैली आजम बिंलदखां जमादार समागमें पाठविली आहे. सरकारांनीं मनन करून आज्ञापत्र व जाबत्यास स्वार पाठविण्याची तजवीज करावी. सरकार चाकरी करून दाखवावी ही उम्मेद आहे. पत्राचे उत्तरास आज्ञा त्वरित जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 244 1834 A.D.

Vinayak Moreshwar Phadke from Baroda informs Harirao Maharaja that he has in view some Sowkars who would willingly serve the Maharaja, in monetary matters.

---

अ. नं. २४५ **श्री**

इसवी सन १८३४

मेहरबान ब्ल्याकसाहेब यांच्याशीं बुळेसाहेबांचे संबंधांत जाब. विद्यमान राजश्री गणपतरावजी वकील संमत १८९०.

१ प्रथम मजकुर जानसनसाहेब यांच्याशीं जाब केला कीं, होळकर सरकारांकडून महाल जप्त झाले पुढें विचार काय ? उत्तर केलें कीं, आधीं एक सवाल सांगतों कीं, तुम्ही कंपनी सरकारचें होऊन रहावे. त्याजवरून श्रीमंत चिमाजी अप्पास विचारलें तेव्हां त्यांनी उत्तर केलें कीं, आम्हांस मंजूर आहे. पुन्हा दुसरें दिवशीं साहेबांकडे गेलों. त्यांजला मजकुर निवेदन केला, परत त्यांनीं जाब दिला कीं, कोंच महालचा ऐवज होळकर सरकारांत जातो. हा तुमचा तुमचेकडे येईल. परंतु आम्ही हल्लीं विलायतेस जातो व तेथून तुमचे नांवें बंदोबस्त करून पाठवितों.

१ त्यावर येकुण वीस मासांनीं परभारें ब्ल्याकसाहेबाकडे जाब आला. त्यांनीं वकिलास बोलाविलें, तिसरें प्रहरीं छावणींत गेलों, बडेसाहेबांची गांठ पडली. त्यांनी जाब केला कीं, सदरेहून तुमचे बंदोबस्ताविषयीं लिहून आलें. त्यास अप्पासाहेबांना विचारावें कीं, तुम्हांस मंजूर आहे किंवा नाहीं. तेव्हां दुसरें दिवशीं जाब दिला कीं, परस्पर होळकर सरकार व आम्ही सोयरे, तेव्हां बहुतेक वाकडे न येतां काम जहालें पाहिजे. नंतर त्यांनीं जाब केला कीं, उत्तर केव्हां सांगणार त्यावर एक मासाची मुद्दत केली.

१ तदोत्तर श्रीमंत मासाहेब व ताईसाहेब श्रीमंत हरीराव महाराज व आदिकरून कारभारी लोकांस हा मजकुर दरखदारासुद्धां जाहीर करून वेगळें पुसले. त्यांस बहुतेक जाब जाहले ते कोठवर ल्याहावें. शेवटीं सर्वानुमते साहेब सांगेल तसेंच करावे इतका हाकार करून नंतर अप्पासाहेबास घेऊन जाऊन पुन्हा विनंती केली कीं, हे मालक आहेत, यांस हुकुम दिला पाहिजे.

१ साहेबांचा शिपाई वकिलांस बोलावण्यास आला. त्यावरून गेलो. साहेबाने प्रश्न केला कीं, तिकडील गुंता उरकला (होळकर सरकार). उत्तर केलें कीं, स्वच्छ सफाई करून आलों, तेव्हां साहेबाचा जाब पडला कीं, तूर्त तुमचा बंदोबस्त खर्चापुरता होईल. कबूल केलें. पुन्हा साहेबांनीं जाब केला कीं, इंग्रजांचा रुपया तुमचे घरांत आल्यावर नजर फिरोन मस्त व्हाल. याजकरितां एकदम देणें चांगलें नाहीं. सांप्रत मेजखर्च बाईसाहेबांकडे रु.१५०० व अप्पासाहेबांकडे रु १००० येकुण २५०० दरमहा देऊं. तेव्हां वकील बोलले कीं इतक्यांत कसें होईल ? उत्तर केलें कीं नेमित्तिक कार्य उत्पन्न झाल्यास तितका ऐवज देत जाऊं.

१ साहेबाचे बोलणें पडलें कीं बाईसाहेब आहेत तोंपर्यंत (भीमाबाई) कार चालेल. ह्यावर जाब दिला कीं, पुढें अप्पासाहेबांनीं काय करावें ? तुमचा ऐवज जो

जमा होईल त्यात सुताचा (व्याजाचा) आकार तुम्हास देत जाऊं. त्यात गुजारा होईल. तेव्हां वकिलाकडून जाब पडला कीं, हे तर गरीबगुरबाचे व्यवहार आले. त्यात कांहीं सरदारीचा तोल राहिला नाहीं. जास्त बोललो तर कदाचित खपा व्हाल, तेव्हां खात्री केली कीं, खपा होणार नाहीं. मग विनंती केली कीं कोंच तर बाईसाहेबांबद्दल, परंतु बुळ्यांचे महाल परगणे थांदले पेटलावद, चिखलदे व नरसिंगगड टाका हे तर होळकरांचे अव्वल दौलतीपासोन चालत आले. कोंच तर यशवंतराव महाराजांचे तहाणसोन आहे. याचा पूर्ण विचार करून उत्तर दिलें पाहिजे. तेव्हां साहेबांनीं उत्तर केलें कीं, बाईसाहेब हीनहयात तोंपर्यंत कार केला तसा चालेल. कोंचाबद्दल पन्नास किंवा साठ हजार देत जाऊं, अगर होळकर सरकारांकडून एखादा महाल चांगला देववूं.

१ साहेबांनीं म्हटले कीं तुम्ही आम्हास अडीच हजाराचे प्रकरण वगैरे आम्हीं सांगतो असें लिहून द्यावें व आम्हीही तुम्हास लिहून देतों. तेव्हां जाब केला कीं, आपलें लिहिणें आपण न पाळले तर आपलेपेक्षां कोण जबर आहे. त्यापक्षीं राहिल्यास इकडील, तिकडील लेखाचें कारणच नाहीं. खुशी होऊन अच्छा म्हणोन उठलें, कलम.

**बुळे सरदारांचे रेकार्ड**

No. 245 1834 A.D.

Discussion regarding " Bulye Settlement " between the representative of the East India Company and Ganpatraoji Vakil.

---

**अ. नं. २४६** **श्री**

इसवी सन १८३४

दफाते श्रीमंत महाराज हरीराव होळकर. राजश्री लाला लडेतीलाल यांस कीं, तुम्ही हुजूर येऊन विनंती केली कीं, परगणे कुंभेर पैकीं मौजे तमरेल, मौजे गंगरसोली व मौजे सेत. येकुण देह तीन ३ व मौजे सेत येथील मिठाचें आगर कैलासवासी श्रीमंत खंडेराव महाराज होळकर यांचे छत्रीकडील वगैरे खर्चास आहेत त्यांची वहिवाट मक्त्यानें आम्हांकडे सांगितल्यास गांवची व आगराची उस्तवारी उत्तम प्रकारें ठेऊन ठरावाप्रमाणें ऐवज साल-दरसाल सरकारांत दाखल करीत जाऊं म्हणोन. त्यावरून गांवाचे व आगराचे उस्तवारीवर नजर देऊन साल मजकुर संमत १८९१ सन १२४४ तागायत संमत १९०२ बारासाला ठराव सालिना महालचलणी जमा तुमचे समजाविल्यावरून.

४००० देह तीन येकुण आकार रु.२१०० मौजे तमरेल, ११०० सेत, ८०० गांगरसोल.

१०००० मिठाचे आगर मौजे सेत येथें आहे त्याबद्दल.

........

१४०००

पैकीं वजा परभारें रु. ५९००

९०० तिन्ही गांव निसबत दामी जमीदार वगैरे ४०० व टाका भरतपूर संस्थानिकाचा रु.५०० येकुण ९००

५००० मिठाचे आगराचे उत्पन्नपैकीं.

१००० दामीजमीदार वगैरे.

४००० सरकारांत परवर्षीबद्दल.

१००० बाहद्दरखां चौधरी खुरजेकर.

१००० राव थानसिंग भरतपूरकर.

५०० राव रघुनाथसिंग भरतपूरकर.

१००० भोलानाथदिवाण भरतपूरकर.

५०० दिलसुखराय मुन्शी भरतपूरकर.

......

४०००

.......

५०००

...........

५९००

१९७१ सरकार निसबत.

४०० वर्षासन, धर्मादाय, सनदापत्रें पाहून.

१२५ छत्रीकडील मूर्तीस पोशाख.

२१६ बागाकडील माळी असामी ४ दरमाह १२ प्रमाणें बारमाही आकार १४४ व दाणा बैलांस बारमाही रु. ७२ येकुण २१६.

१०० खैरात खर्च लागेल तसा.

१५० खेरीज सालिना खर्च होईल तसा.

९८० बद्दल मुशाहिरे : जातीस वेतन, खेरीजमुशाहिरें सुद्धां ५००, शिबंदी असामी १० दरमाह रु.४ प्रमाणें बारमाही ४८०.

......

१९७१

........

७८७१

बाकी खर्च वजा होऊन बाकी निव्वळ रु.६१२९ यांसी किस्त येणेंप्रमाणें रु.२०० कार्तिकमास. २०० मार्गशीर्षमास. १५० पौषमास. १९०० चैत्रमास. १९०० वैशाखमास. रु. १७७९ ज्येष्ठअखेर. येकुण रु. ६१२९.

सदरहू अन्वयें बारासाला ठराव रुपये ७३५४८ निखर्ची त्र्याहत्तरहजार, पांचशें अठ्ठेचाळीस रु. मक्ता ठरावून देऊन हे सनद सादर केली असे. तरी सदरहू ठराव महाल चलणीपैकीं दरसाल सहा हजार एकशें एकोणतीस रुपये सरकार खजिना दाखल करून रसीद घेत जाणें. दरम्यान घालमेल होणार नाहीं. घालमेल करणें जहाल्यास मिठाचे आगराकडे उस्तवारीमुळें ऐवज लागत लागल्यास गांववाले वगैरेचे रुजुवातीनें चौकशी होऊन देण्यांत येईल. खातरजमेनें गांवाची आबादी उस्तवारी उत्तम प्रकारें करून रयतीस गैरवाजवी तोशीस न लावितां वहिवाट करून सालअखेरसालीं वहिवाटीचा हिशेब सरकारांत समजावीत जाणे. म्हणोन सनद छ ९ रविलाखर.

**पळसीकर रेकार्ड**

No. 246 1834 A.D.

Agreement of Lala Ladetilal to the Holkar Sarkar passed for 12 years. The three villages Tamrel, Gangarsoli and Sheta, and salt-pan at Sheta are all granted for the upkeep of the Chhatri of the late Khanderao Maharaja Holkar.

All these are taken charge of by the Lala. Out of the revenue he would defray the Chhatri expenses and make payments marked in detail. He would regularly pay Rs. 6,129/- net into the Holkar Treasury annually.

---

**अ. नं. २४७** **श्री**

ता. २३ जानेवारी इसवी सन १८३५

महाराज हरीराव होळकरांकडून गोपाळ कृष्ण कमाविसदार कायथे यांस वेदमूर्ती राजश्री जटाशंकरभट बिन जनार्दनभट कसबे इंदूर यांनीं हुजूर विदित केलें कीं, श्रीहर सिद्धीभवानी स्थान कसबे मजकुरीं येथें सरकारांतून नंदादीपांची नेमणूक सालिना रुपये पंचवीस व पंधरा रुपये पुजारियास येकुण रुपये ४० चाळीस प्रगणे मजकुरीं नेमून देऊन श्रीमंत कैलासवासी सुभेदारसाहेबांनीं वर्तमान भावी कमाविसदाराचे नांवें सनद लिहून दिली. त्याप्रमाणें वहिवाट चालत आली. सांप्रत नेमणुक चालत नाहीं. कृपावंत होऊन पेशजीचे सनदेअन्वयें नेमणुक चालविली पाहिजे म्हणोन. त्यावरून तीर्थरूप कैलासवासी यांनीं सनद करून दिली, ती पाहण्यांत येऊन त्या अन्वयें नेमणूक चालवावयाचा ठराव.

२५ श्रीहरसिद्धी माता भवानीकडे नंदादीपास तूप व रुई.
१५ वेदमूर्ती जटाशंकर बिनजनार्दन भट पूजा करितांत त्यांजकडे
दरमहा रु. १-४-० सव्वा.
....
४०

चाळीस रुपये साल मजकुरपासोन दर साल चालवावयाचे ठरून हे पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी सदरहू ४० रुपये प्रगणे मजकुर ऐवजी देत जाऊन खर्ची लिहीत जाणें. छ.२३ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 247 — 23-1-1835 A.D.

Maharaja Harirao Holkar orders the Kamavisdar of Kayatha that the old Sanad granting Rs. 40/- annually should be continued, as before, in favour of Jata Shankar Bhatt for the light and worship of Shree Harsiddhi Bhawani of Indore.

---

**अ. नं. २४८** **श्री**

ता. २५ जानेवारी, इसवी सन १८३५

महाराज हरीराव महाराजांकडून वर्तमानभावी कमाविसदार नेमावर पंच महाल यांसी. महंत मुकुंदपुरी गोसावी संस्थान श्री सिद्धेश्वर श्रीनर्मदानाभीस्थान यांजकडून इंदुर मुक्कामीं विदीत झालें कीं, श्रीचे पूजा नैवेद्य, नंदादीप व अन्नसत्र, सदावर्त व घाट कारखाना मरामतखर्च नेमावर पंचमहाल पैकीं देहे वहिवाटीस आहेत : १ मौजे मुरझाला, १ दुधल्या, १ आमवीरा, १ मचगांव, १ करवंद्या व १ मौजे सुभानखेडी. येकुण गांवें सहा इनाम करून देऊन भोगवटीयास श्रीमंतांचे सरकारांतून व आपले सरकारांतून, सनदा श्रीमंत कैलासवासी थोरले सुभेदार व तुकोजीराव सुभेदार यांनीं करून दिल्या आहेत. त्याप्रमाणें भोगवटा चालत आला आहे. तरी नूतन सनद करून दिली पाहिजे, म्हणोन त्यावरून. सदरहू सहा गांवे हक्कदार, इनामदार, जकात, उभा मार्ग, खेरीज करून सरकारी अंमलाची वहिवाट श्रीकडे चालत आल्याप्रमाणें चालवून प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न घेतां या सनदेची प्रती घेऊन अस्सल भोगवटियास परतोन देणें. छ १५ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 248 — 25-1-1835 A.D.

Maharaja Harirao Holkar orders the Kamavisdars of Nemawar

Panch-mahals that the old grant of 6 villages (mentioned in the Sanad) for the worship, light and food expenses of Shree Siddheshwar on the Narbada is upheld by this Sanad. The grant of villages was formerly ordered by Peshwas, Subhedars Malharrao I, and Tukojirao I.

---

**अ. नं. २४९** **श्री**

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १८३५

महाराज हरीराव महाराज होळकर यांजकडून : दौलतसिंग ओंकारमांधाता यांस विशेषः श्री ओंकारेश्वराचा चांदीचा मुखवटा, कैलासवासी ती. मातोश्री बाईसाहेबांनीं वेदमूर्ती देवराम दीक्षित यांचे वडिलांचे जिम्मेस केला आहे. हल्लीं तुम्ही हरबाहण्याने मागतां म्हणोन विदित जाहल्याने हें पत्र लिहिण्यांत येतें कीं, तुम्हांस भटजी मुखवटा देणार नाहींत. तिथी पर्वणीस वगैरेवर कैलासवासी यांचे आज्ञेअन्वयें देवावर घालीत जाणें. नवीन कांहीं होणार नाहीं. तुम्ही कांहीं मागूं नये. त्यांचे तेथें आहे तसाच राहील. म्हणोन पत्र छ १ सवाल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 249 31-1-1835 A.D.

Daulatsing Onkar Mandhata is ordered by Maharaja Holkar that the Silver face of Shree Onkareshwar was handed over to the father of Devaram Dixit by the late Devi Ahilyabai. It shall remain in his charge.

---

**अ. नं. २५०** **श्री**

ता. १८ मार्च, इसवी सन १८३५

दफाते श्रीमंत सरकार तर्फे चिमाजी अप्पा बुळे यांजकडून राजश्री धोंडोपंत अण्णा थांदले, पेटलावद यांस विशेष. तुम्ही राजश्री रामभाऊस पत्र बहुत उदास होऊन लिहिलें ते मशारनिल्हेनीं श्रीमंत महाराजांस व आम्हांस समजाविल्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी तेथें कोणी हलकी माणसें वाच्यांश करितांत त्यांजवर नजर न देतां आतरीनें कामकाज पूर्वीपासोन करीत आलां त्याअन्वयें निःसंशय करीत जाणें. एकवेळ आभय दिल्यावर विस्मृती पडणार नाहीं हें खचित समजावे. रवाना छ १७ जिल्काद सुरुसन खमससलासमयातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

श्री मार्तंड चरणीं तत्पर
यशवंतराव सुत हरीराव होळकर

No. 250 18-3-1835 A.D.

Dhondopant Anna of Thandle is assured of Government confidence and protection by Chimajee Appa Bulye on behalf of Government.

---

**अ. नं. २५१** **श्री**

ता. १९ जून, इसवी सन १८३५

दफाते महाराज हरीराव होळकर : रुख्मादास आगरवाले यांस विशेष. मौजे वडेल, काष्टी, चंदनपुरी हे तीन गांव सरकारांतून कैलासवासी बाळाराम आगरवाले यांजकडे संसार-बेगमीस लावून दिले. त्याअन्वयें वहिवाट तुम्हाकडे चालत आली. कै. यांचे कुटुंब हुजूर होते. त्यांजकडे गांवपैकीं ऐवज तुम्ही दिला नाहीं, म्हणोन हुजूर विदीत झालें. त्याजवरून चुनीलाल बखतराम व गोपालदास टीकाराम यांस रवाना करून हे पत्र सादर केलें असे. तरी चंदनपुरी हा गांव चुनीलाल बखतराम यांजकडेस चालविणें व वडेल, काष्टी दोन गांवची वहिवाट सामलांत ठेऊन निम्मेनिमे उत्पन्नाचा ऐवज गोपालदास व तुम्ही घेत जाणें. येविषयीं पुन्हा बोभाट न येतां सदरीं अन्वयें वर्तणूक करणें. छ २१ सफर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 251 19-6-1835 A.D.

Rukhamadas Agarwala is commanded by Maharaja Harirao Holkar that Mauzas Vadel, Kashti and Chandanpuri were granted to the late Balaram Agarwalla for the maintenance of the family. Of late you are not observing the order. Chandanpuri shall, henceforth, be held by Chunilal, the two other villages shall be held in common by Gopaldas and yourself.

---

**अ. नं. २५२** **श्री म्हाळसाकांत**

ता. २६ जुलाई, इसवी सन १८३५

राजश्री गणपतराव फणसे यांस श्रीमंत हरीराव महाराजांकडून : मौजे वाफगांव वगैरे देह नव येथील जहागिरी अंमलाचा व देह सात येथील वतन बाबतचे गुमास्तेगिरीचे काम तुम्हाकडे कमाविसीने सांगोन हे सनद लेखन केली असे. तरी तुम्ही देहाय

मजकूर येथील लावणी, आबादी, उत्तम प्रकारें करून रयत राजी राखून जमा साल दरसाल जास्त जुजरसीनें आकारून वतनसंबंधी कानुकायद्याची दुरुस्ती ठेऊन वहिवाट इमानेंइतबारें करून अखेरसालीं कच्चे वहिवाटीचा हिशेब सरकारांत समजावीत जाणें. महाल मजकुर खर्चाची नेमणुक अलाहिदा करून देण्यांत येईल. त्याप्रमाणें खर्च देहाय मजकुरचे हिशेबीं खर्ची लिहित जाणें. म्हणोन सनद छ २९ रविलावल श्रावण शुद्ध २ मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 252 26-7-1835 A.D.

Maharaja Harirao Holkar grants a Sanad to Ganpatrao Phanse, handing over to him the Kamavishi of the Jagirship of Wafgaon and other nine villages, together with that ot the Vatanship of seven villages.

---

**अ. नं. २५३** **श्री**

ता. २६ जुलाई, इसवी सन १८३५

दफाते महाराज हरीराव होळकर : राजेश्री राजोजीराव फणसे यांस कीं, प्रांत खानदेश वगैरे गांवगन्ना खाजगत वतनबाब, देशमुख्या, मोकदम्या, राउळक्या, वगैरे आहेत. तेथील गुमास्तेगिरीचे काम राजश्री जनार्दन गोपाळ विंझे यांजकडे होते ते दूर करून साल मजकुरपासून गुमास्तेगिरीचे काम तुम्हाकडे सांगोन यादी मखलासाची येणेंप्रमाणें.

७ प्रगणे थालनेर

| | |
|---|---|
| १ कसबे मजकुर, मोकदमी निम्मे. | १ मौजे वनावल, मोकदमी निम्मे. |
| १ मौजे टेकखेड, मोकदमी निम्मे. | १ मौजे कुरखळी, मोकदमी. |
| १ मौजे होळ, मोकदमी निम्मे. | १ मौजे नानथे, मोकदमी निम्मे. |
| १ मौजे करवंदी येथील राउळकी. | |
| .... | .... |
| ४ | ३ |

७ मौजे न्याहाळोद वगैरे देह. ३ परगणे सोनगीरपैकीं देह व मोकदमी निम्मे व

१ मौजे न्याहळोद, १ कापडणे, १ मौजे निमखेडी. परगणे ललिंगपैकीं देह ३ मुंगटी वडजाइ, पिंपरी व परगणे डांगरीपैकीं मांडल व मोकदमी.

३ परगणे देहेरपैकीं देह तीन. पीलखोड, तलवाडे, सावरगांव व मोकदमी.

२ ,, उत्राणपैकीं. कहटेर, मुदाने व मोकदमी.

३ ,, नंदुरबारपैकीं देह व मोकदमी. पाटण, वळदे व वीरदेल.

५ ,, सुलतानपूर, पैकीं देह, मोकदमी. प्रकाशे, नादरखेड, सारंगखेड, काली व सारंगखेड येथील राऊळकी.

२ मौजे काष्टी, चंदनपुरी देह दोनपैकीं गाळणे व निंबाइत मोकदमी.

१ ,, हासवाहल पैकीं चीखवाहल मोकदमी.

१ ,, मदाणे पैकीं नेर येथील मोकदमी.

.....

३१

स्वदेश प्रांत

१८ मौजे जांबगांव परगणे गांडापुर मोकदमी निम्मे, १ परगणे येथील सरगाउडकीं, १ मौजे पारनेर अंबाड येथील मोकदमी. ३ अडगांव, पाडेल, वडझिरे परगणे नाशिक व दिंडोरी येथील मोकदमी. १ मौजे धोत्रे मोकदमी, १ होळमुरुम येथील चौगुलकी १ होळफलटण, पाटीलकीं, १ बाभूळगांवापरचे, मोकदमी १ कमालपुर डोमेग्राम, मोकदमी १ रायगांव मोकदमी १ अंबे मोकदमी येकुण १४.

४ वतनजप्तीस आहे त्याजविषयीं यत्न करून चालू करणे. १ वनचराई स्वदेश व खानदेश, १ पेठ येवले मोकदमी दरोबस्त पैकीं निम्मे. १ कसबे नगरसूल मोकदमी दरोबस्त. १ परगणे संगमनेर सरगाउडकी.

....

१८

येणेंप्रमाणें वतनबाबीची वहिवाट पाहत जाऊन हिशेब भुक्तावीत जाणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 253 26-7-1835 A.D.

Maharaja Harirao Holkar hands over the management of Vatan, Deshmukhi, Mokadami, Raulki etc. in Khandesh and Swadesh to Rajojirao Phanse. He is also ordered to try to recover certain rights lying in abeyance.

---

**अ. नं. २५४** **श्री**

ता. २८ आगस्ट, इसवी सन १८३५

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडून गणपतराव फणसे, संस्थान महेश्वर यांस. विशेष. कैलासवासी ती. विठूजी होळकर बाबासाहेब यांचे छत्रीचे काम सत्वर तयार झाले पाहिजे. यास्तव हें पत्र लिहिलें आहे तरी कारखान्यावरील दरोबस्तराज, मजूर, माणसें

छत्रीकडे कामावर पाठवून महिन्यां दीड महिन्यांत तयार होईल असें करणें. पुढें स्वारी तेथें येण्याचा बेत, तरी काम जलदीने तयार करविणें. म्हणोन पत्र छ ४ जमादिलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 254 28-8-1835 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Ganpatrao Phanse that the work of the Chhatri of the late Vithojee Babasaheb Holkar must be quickly completed, say within a month or a month and a half.

---

**अ. नं. २५५** **श्री**

ता. २ सप्टेंबर, इसवी सन १८३५

महाराज हरीराव होळकरांकडून आबाजी बल्लाळ कमाविसदार रामपुरा. विशेष. खंडो पांडुरंग व रघुकुंवर फितूर करून महालवाड्यांत चालून आले. त्यांचे पारिपत्य करून कत्तल केली. बहराम खाजबरदाराचें पारिपत्य होऊन हे पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी रखमाबाईकडील दुकानें संस्थान मजकुरीं व तालुकेनिहाय आहेत. त्यांची जप्ती करावयास खुमानजी कुंवर पाठविला आहे. तुम्ही अनुकूल राहून दुकानची रक्कम आफरातफर न होतां, दामदस्त जप्तींत ठेऊन गुमास्ते याजला अटकेंत करून चीजवस्तू, गुमास्ते परागंदा न होतां बंदोबस्त करून हुजूर इतल्ला करणें. या गोष्टीस सुस्ती होऊन कमजास्त समजल्यास, त्याचा जाब तुम्हांस द्यावा लागेल. हें स्पष्ट समजोन सदरीं लिहिल्याअन्वयें करणें म्हणोन पत्र छ १५ जमादिलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 255 2-9-1835 A.D.

The Kamavisdar of Rampura is commanded by Harirao Maharaja that Khando Pandurang, Raghu Kuwar and Bahram Khasbardar turned treacherous. They are all punished. Khumanjee Kuwar is despatched from here to confiscate all the shops of Rakhmabai in the Sansthan and Talukas. The Kamavisdar should give him all the aid possible.

---

**अ. नं. २५६** **श्री**

इसवी सन १८३५

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोपाळरावबाबा खासगीवाले खामींचे सेवेसीं. पोष्य रामचंद्र बल्लाळ काकीर्डे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाइत माघ वद्य १४ मुक्काम पुणें येथें कृपेकरून सुखरूप असो विशेष. शुद्ध ५ माहे मजकुरचें पत्र पाठविलें ते पावोन परमानंद जहाला. पत्रीं मजकुर कीं, पेशवे यांचे मूळ पुरुषानें दौलत संपादन करून अव्वल अखेरीचा इतिहास आपलेपाशीं आहे म्हणोन लिहिलें. त्यास आमचे जवळ इतिहास चारशें बंदाचा आहे. परंतु मेहरबान अलपिस्टनसाहेब बहादुर यांनीं राज्य घेतल्यावर पेशवे सरकार व होळकर, शिंदे, भोसले, गायकवाड, हैदराबादवाले वगैरे राज्याचे इतिहास यथातथ्य तीथवार महिने शके वेळसुद्धां लिहून बुकें तयार केली आणि विलायतेस पाठविली, कांहीं बडे लोकांस, माणकेश्वर, ढमढेरे यांसही दिली. ती हल्लीं हातीं आली असतां आपलेकडे लिहून पाठवावयास ठीक. नाहींतर उगीच गैरलगामी पाठवून तेथें कोणी शह ठेविल्यास गैरशिस्त पडेल. वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 256 1835 A.D.

Gopalrao Baba Khasgiwale is informed by Mr. Kakirde from Pune that the latter had written a complete history of the Peshwa in 400 sheets. Mr. Elphinstone has written the histories of the Peshwa, Holkars, Scindias, Bhonsales, Gaikwads and the Nizams of Hyderabad. Copies thereof are sent to England. In case the writer obtains a copy thereof he would send it to the addressee.

---

**अ. नं. २५७** **श्री**

ता. २८ फेब्रुवारी, इसवी सन १८३६

महाराज हरीराव होळकरांकडून दिवाण हणमंतसिंगजी संस्थान नरसिंगगड यांस. विशेष. राजश्री लक्ष्मणराव बापूजी कमाविसदार माकडोन यांजकडील कारकून सारंगपूरास कुटुंबासुद्धां जात होता, मार्गांत सारंगपुरचे अलीकडे चोरांशीं गांठ पडून कारकुनास जखमी करून घोडीं व तटु आसबाबासह चोरांनीं नेले. त्याचा ठिकाणा लावितांना मौजे खेरखेडी व मौजे झीकड्या परगणे नरसिंगगड येथील चोर मुद्यापत्यासहित ठावे होऊन सरकारांत कमाविसदारानीं विदीत केलें त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी तुम्हाकडील इलाख्यांत चोरांनीं राहून मार्ग लुटावा हे नीट नाहीं. यावर पत्र पावतांच चोरासह माल घोडीं, तटू आसबाब आणवून कमाविसदार यांचे स्वाधीन करून चोरांचे

पारिपत्य करणे म्हणोन पत्र छ १० जिलकाद मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 257 28-2-1836 A.D.

Maharaja Harirao Holkar orders Diwan Hanmantsing of Narsinggad to hand over the robbers who robbed the clerk of Makadon on his way. The Kamavisear of Makadon has traced the robbers with the articles of theft.

---

**अ. नं. २५८** **श्री**

ता. २५ मार्च, इसवी सन १८३६

श्रीमंत हरीराव महाराजांकडूनः तेजकर्ण मंडलोई जुने इंदूर यांस विशेष. तुम्ही हुजूर विनंती केली कीं, सरकारांतून आम्हास हत्ती बक्षीस दिला, त्याचे भूषणास नगारानिशाण असावे यास्तव सरकारांनीं कृपा करून आमचे येथें कदीम नगारा निशाण आहे, हल्लीं चालू नाहीं. तरी तो समागमें चालविण्यास परवानगी दिली पाहिजे म्हणोन. त्याजवरून मनास आणितां तुम्ही सरकार पदरचे व सरकारांतून हत्ती बक्षीस दिला ते पक्षीं तुमची विनंती ध्यानास आणून हे पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही तुमचे समागमें नगारा, निशाण चालवीत जाणें म्हणोन पत्र छ. ७ जिल्हेज.

**सरकारी रेकार्ड**

No. 258 25-3-1836 A.D.

Tejkaran Mandloi is ordered by Maharaja Harirao to recontinue the accompaniment of Nagara and Nishan with the elephant presented to him by the Sarkar.

---

**अ. नं. २५९** **श्री मार्तंड**

ता. १० जुलाई, इसवी सन १८३६

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी प्रगणे थांदलें, पेटलावद गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित चिमाजीराव बुळे निसबत श्रीमंत महाराज हरीराव होळकर) दंडवत. अनुक्रमे रामराम. सु।। सबासलासीन मयातेन व आलफ शके १७५८

राजश्री धोंडो सदाशिव यांनीं हुजूर इंदूर मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, प्रगणे मजकुर येथील अमीनीची असामी देऊन सनदापत्रें तीर्थस्वरूप कैलासवासी मोठे सुभेदारसाहेब यांनीं करून दिल्या होत्या. त्या मध्यंतरीं भुजंगराव पवार यांनीं कसबे मजकुरीं येऊन गर्दी करोन गांव दग्ध केला त्यास आमचे गृहासही अग्निउपद्रव होवून, कागदपत्र भस्म जाहलें. त्यास कृपा करून नवीन पत्रें झाली पाहिजेत त्या वरोन मनात आणिता पंत मशारनिल्हे पूर्वापार पदरचे. यांचे चालविणें प्राप्त जाणोन मागील वहिवाट चालत आली ती पाहून पुनः नेमणुक येणेंप्रमाणें. सरकार माल ऐवजीं.

२५० वेतन जातीस.

५१ माणूस एक बारमाही.

.......

३०१

येकुण तीनशें एक रुपये महालचलणी व शिवाय गांवगन्ना भेटी शिरस्ते बरहुकुम सदरहू तीनशें एक शिवाय भेटी पंत मशारनिल्हे यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा देत जावून लिहिल्याचा दाखला देत जाणें. पुन्हा नवीन पत्राचा आक्षेप न घेतां या सनदेची नक्कल घेऊन हे अस्सल पत्र भोगवटियास पंत मजकुराजवळ परतोन देणें. रा छ २५ रविलावल बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

श्री मार्तंड चरणीं तत्पर
यशवंतराव सुत हरीराव होळकर

**दरखी अमीन विभूते दप्तर**

No. 259 — 10-7-1836 A.D.

The Kamavisdars of Pargana Thandala are ordered by Chimajirao Bulye on behalf of Maharaja Harirao that Dhondo Sadashiv should be paid Rs. 30/- annually and hereditarily. All other rights of presents etc., should be upheld.

---

**अ. नं. २६०** **श्री**

ता.४ आगस्ट, इसवी सन १८३७

कबुलायत थांदले, पेटलावद, प्रगण्याचा इजारा झाबवे राजाकडे पांच साल मक्त्यानें दिल्याबद्दल. सिद्धश्री इंदूर महाशुभ संस्थान सर्व उपमालायक, सदाविराजमान राजश्री, महाराजाधिराज श्रीमंत सुभेदार श्री हरीरावजी होळकर सरकार बहादूर झाबव्याहून महाराज

रतनसिंगजी यांचा कृतानेक रामराम विज्ञापना.

१ कबुलायत लिहून देत अहो ऐसीजे कीं, परगणे थांदले पेटलावदची मामलत आमचेकडे राजमान्य राजेश्री बडेसाहेब जानबक्ससाहेब बहादूर रेसीदेन्ट इंदूर यांचे मार्फतीने पांचसाला ठराव झाला तो खाली लिहिल्याप्रमाणें :

१७५००१पांचसाला मुखत्यारी महालखर्च व देवस्थान, धर्मादाय व इनाम जमीन. व नेमणुक वगैरे खेरीज. याप्रमाणे ठराव केला त्याचा तपशील.

३५००० संमत १८९४ सन १२४७ फसली. ३५००० संमत १८९५

३५००० संमत १८९६ सन १२४९ फसली. ३५००० सं.१८९७, फ.१२५०

३५००० संमत १८९८ सन १२५१ फसली. ० लंग.

..............

१७५००१

सदरचा वसूल दोन किस्तीनें, १७५०० कार्तिक शुद्ध १५ व १७५०० चैत्र शुद्ध १५ येकुण ३५००० अक्षरी पस्तीस हजार रुपये महालचलणी सालमशाही, ठरल्याप्रमाणें हप्त्याने सरकार महाली खजिन्यात भरणा करूं. हप्त्यावर नच भरणा केल्यास शिरस्तेप्रमाणें व्याज देऊं. या शिवाय कलमा खालीलप्रमाणें.

१ महाल किंवा सायर नाके सुदामतप्रमाणें आहेत त्याप्रमाणें राहतील. रयतीस जुलूम जास्ती करणार नाहीं.

१ महाली सरकारी निशाण, झेंडे आहेत ते तसेंच कायम ठेऊं.

१ प्रगण्यांतील इनाम, देवस्थान, वर्षासनदार, नेमणुकदार, वगैरे हक्क सुदामतप्रमाणें पाळले जातील.

१ पांचसाला पट्टा आम्हास करून दिला आहे. याची साले पुरी होतांच सरकारांतून मामलेदार येतील त्यांचे सुप्रद बिनादिक्कत ठाणें खाली करून देऊं.

१ महालची आबादी ठेऊन जास्त आबादीबद्दल कोशीस करूं.

सदरहू मक्त्याचे हप्ते साहेब बहादुर यांचे मार्फतीनें जमा करीत जाऊं आणि पोटकलमा कबूल केल्याप्रमाणें वर्तणूक ठेऊं. कमजास्त करणार नाहीं. ता.१ जमादिलावल सन १२४७ फसली. संमत १८९३-९४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 260 4-8-1837 A.D.

Agreement made by Maharaja Ratansingjee of Zabwa (through the Indore Resident) with Maharaja Harirao's Government. The Mamalat of Parganas Thandle and Petlawad is granted for five years on an annual payment of Rs. 35,000/- (Salamshahi), into the Holkar Treasury. Items of payment and management are given in detail in the agreement.

---

अ. नं. २६१ **श्री**

ता. १४ सप्टेंबर, इसवी सन १८३८

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री आबाजी (किबे) स्वामींचे सेवेसीं पोष्य गंगाधर शिवराम साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल, भाद्रपद शुद्ध ५ पावेतों यथास्थित असो विशेष. संस्थानीं दरम्यान कामाकाजांत प्रबुद्ध कोणी नव्हता यामुळें कामाचा ओघ सुरळीत न चाले. हें सरकारांचे ध्यानांत येऊन आपली योजना होऊन आषाढ वद्य ६ गुरुवारी बहुमान वस्त्रें होऊन कामकाजाचा मार्ग पूर्वीसारखा चालला. हें वर्तमान राजश्री गोपाळरावजी गानूंनीं लिहिलें त्यावरून बहुत संतोष जहाला. आपली पूर्वीपासोन दरबारांत वागणूक ते पक्षीं माहितीतच कैलासवासी विठ्ठलपंत तात्या यांचे सांप्रदायाप्रमाणेंच स्नेह वृद्धी ठेऊन वरचेवर पत्रें पाठविण्यांत यावीं. वरकड मजकुर राजश्री, इकडून तिकडील संस्थानीं कैलासवासी थोरले सुभेदार व बाईसाहेब यांचे कारकीर्दीपासोन आहेत. आपल्यासही माहित आसेलच ते सांगतील. त्याजवरून सविस्तर समजेल. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 261 14-9-1838 A.D.

Gangadhar Shivram congratulates Abajee Kibe on his appointment as Karbhari. The writer hopes that Abajee will continue the policy of the late Vithal Tatya.

---

अ. नं. २६२ **श्री रामजी**

ता.६ जानेवारी, इसवी सन १८४०

सिद्धश्री इंदूर महासुभस्थान सर्व उपमालायक सदाविराजमान राजश्री महाराजधिराज श्रीमंत हरीरावजी महाराज होळकर आलिजा बहादूर यांचे सेवेसी, झाबव्याहून महाराज रतनसिंग याचा रामराम इकडील समाचार श्रीजींचें कृपेंकरून उत्तम आहे. आपलें नेहमी हित चिंतितो. आपल्याशिवाय दुसरी गोष्ट नाहीं. उपरि. आमचेकडे फाल्गुन वद्य ३ चे लग्न आहे व माघ शुद्ध १ मंगळवारीं मांडवा आहे. आपण आमचे मालक असल्याने चार दिवस पूर्वी येथें आगमन झाल्यास विशेष शोभा येणार आहे. येथें सर्व आपल्या हुकमाच्या गोष्टी आहे आमचेवर नेहमी कृपादृष्टी राहत जावी. हे विज्ञापना. मिती पौष शुद्ध २ संमत १८९६

**सरकारी रेकार्ड**

No. 262 6-1-1840 A.D.

Maharaja Ratansingjee of Zabwa acknowledges the authority of Harirao Maharaja and invites him for marriage ceremony.

---

**अ. नं. २६३** **श्री**

ता. १७ एप्रिल, इसवी सन १८४०

दफाते श्रीमंत महाराज हरीराव होळकर : कैलासवासी विठुजी होळकर यांचे छत्रीची जन्मगाठीनिमित्य त्यांची मूर्ती गांवांत मिरवणुकीबद्दल फाल्गुन शुद्ध १० मल्हारपलटण पैकीं शंकरसिंग सुभेदार याचे कंपनीपैकीं शिपाई स्वारीसमागमें घेणें. आवाज करणेस बारुद वजन मण १ शेर २ छटाक ९ दरमणी रुपये १७ प्रमाणें आकार रु.१८ मंजूर केला जाईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 263 17-4-1840 A.D.

Harirao Maharaja orders that the anniversary day of the Chhatri of the late Vithojee Baba Holkar (Falgun, 10th of the bright half) should be observed. The statue should be taken round in the city in a palanquin escorted by the Malhar Paltan.

---

**अ. नं. २६४** **श्री**

ता. ८ मे, इसवी सन १८४०

राजश्री मिश्रीप्रसाद इसरीप्रसाद कमाविसदार महेश्वर यांस. सेवक आबाजी बल्लाळ (किबे) साष्टांग नमस्कार विनंती उपरि. सन १२४९ वैशाख शुद्ध ७ उपरी. पोरक्या पोरके कोणी विकील अगर विकत घेईल त्यास सरकारांतून नसियत केली जाईल, म्हणोन महालीं गांवगन्ना जाहीर करावयाचे यास्तव तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुम्ही महालीं गांवगन्ना जाहीर करून माणसें फरोक्त (विक्री) न होय, असा बंदोबस्त ठेवावा. याविषयीं गाफली जाहल्यास उपयोगी पडणार नाहीं. कळावे हे विनंती. मोर्तब.

**सरकारी रेकार्ड,**

No. 264 8-5-1840 A.D.

The Kamavisdar of Maheshwar is informed by Abajee Ballal Kibe that Government have ordered that no orphans shall be sold in the State. The Kamavisdar will see to it throughout the Pargana.

---

**अ. नं. २६५** **श्री**

ता. १९ जुलाई, इसवी सन १८४०

दफाते श्रीमंत महाराज हरीराव होळकर राजश्री धोंडो विश्वनाथ यांसी. तुम्ही लिहिण्याचे कामांत बहुत हुशार जाणोन तुम्हास शहर इंदूर येथील अदालतीवर मराठी मोडी लिहिण्याचे कामास योजून अव्वल दप्तर तुम्हांकडे सांगोन दरमहा हल्लीं शिक्का रुपये २० वीस नेमून देऊन हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही लिहिण्याचें काम बहुत दुरुस्त ठेऊन मुकदम्याचे कामाचे कागदपत्राचे बहुत हुशारीनें करीत जाणें. दरमहाशिवाय कोणतेही गोष्टीचा मतलब न ठेवितां सदरी लिहिल्याप्रमाणें अंमल करणे. जाणिजे छ १९ जमादिलावल मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 265 19-7-1840 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Dhondo Vishwanath avval-daftardar on a monthly salary of Rs. 20/- He is warned against corruption of any kind.

---

**अ. नं. २६६** **श्री**

(शिक्का फारशी) ता. १९ जुलाई, इसवी सन १८४०

श्रीमंत महाराज हरीराव महाराजाकडून : आमदन्यारखांस. विशेष. तुम्हांस बहुत हुशार समजून कसबे इंदूर येथील कोतवालीचे काम सांगोन दरमहा रु.४० चाळीस मुकरर करून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही कोतवालीचे काम बहुत खबरदारीनें व बंदोबस्त चौकी व गस्त फिरणें रात्रींची निगेबानी कैद्यावर ठेऊन, फौजदारी मुकदमे फैसल करणें. जुरबाना दंड रु ५ व सात दिवस कैद करणेचा अधिकार तुमचा आहे. शिवाय मोठा मुकदमा असल्यास तुम्ही आपले मार्फतीनें अदालत शहर इंदुरकडे सोपवून द्यावा आणि अदालतींतून जसा हुकुम होत जाईल तसें करीत जाणें व शहरचे चोरीचा बंदोबस्त चांगला ठेऊन कामकाजांत रिश्वत कोणाकडून न घेतां, दरमाहाशिवाय कोणतेही गोष्टीची गरज न ठेवितां

अंमल करणें. जाणिजे छ.१९ जमांदिलावल मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 266 19-7-1840 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Amadanya Khan as Kotwal of Indore on a monthly salary of Rs. 40/- He is also warned against all sort of corruption.

---

**अ. नं. २६७** **श्री**

(शिक्का फारसी) ता.६ डिसेंबर, इसवी सन १८४०

श्रीमंत महाराज हरीराव होळकरांकडूनः राजश्री रतनचंद कोठारी यांस. तुमची परवर्षी करणें सरकारांस मंजूर होऊन तुम्ही शिपाईगिरीचे कामात हुशार व वख्तावर आपले जिवाकडे पाहणार नाहींत अशी खातरी जाणोन कुमेदानी हुद्दा रिजमेंट दुसरीचा तुम्हाकडे मुकरर करून दरमाह रु. १०० शंभर नेमून दिला आहे. तुम्ही आपलें काम खबरदारपणें, सामान दुरुस्त पाहणे, घोडे दुबळे न होय व हत्यार वगैरे पाहणें, कवायत वख्तसीर घेणें वगैरे कामें खबरदारीनें करून कीं ज्यांत तुमची नेकनामी जाहिरांत येईल असे करणे. तुमची तारीख सुरू छ १ सवाल मार्गशीर्ष पासून चालू. जाणिजे. छ ११ सवाल. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 267 6-12-1840 A.D.

Maharaja Harirao Bestows Commandership of the second Regiment with a monthly salary of Rs. 100/- on Ratanchand Kotharee in appreciation of his services. He is exhorted to procecd in his office with diligence all round.

---

**अ. नं. २६८** **श्री**

(शिक्का फारसी) ता. ६ डिसेंबर, इसवी सन १८४०

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडूनः राजश्री अबदुल रहिमानखां यांस. सरकारांत तुमचे लिहिणें पसंत होऊन तुम्हावर खाविंदी करून सरकारांत मुनशीगिरीचें काम तुम्हांकडे मुकरर करून दरमाह हल्ली शिक्का रु.१०० शंभर नेमून देऊन हे पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही मुनशीगिरीचे काम हुशारीनें व खबरदारीनें करीत जाणें. बेमुनासिब

कामापासून दूर राहणें. शंभर रुपये तनखेशिवाय कोणे गोष्टीची दरकार न ठेवितां सदरीं लिहिल्याप्रमाणे अंमलात आणोन, तुमची तारीख छ १ रमजान कार्तिक मासापासून चालू असे. छ ११ सवाल मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 268 6-12-1840 A.D.

Maharaja Harirao appoints Abdul Rahiman Khan as his Munshi on a monthly salary of Rs. 100/-

---

**अ. नं. २६९** **श्री**

(शिक्का फारसी) ता. ६ डिसेंबर, इसवी सन १८४०

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडून : राजश्री हाफिजखां यांस. तुम्ही सरकार पदरचे पुराणे चाकर व मेहनती सबब सरकारांतून तुमची परवर्ष करणें मंजूर होऊन तुम्हांकडे कायम मुक्काम बक्षीगीरीचे काम मुकरर करून सारे लोकांत तुमची इज्जत वाढविली, तुम्हांस लायक आहे कीं, आपले काम तनखेची वाटणी फौजेची व बंदोबस्त दप्तर, बक्षीगिरी वगैरे ओहद्याचे काम हुशारीने करणें. जे खराब असेल त्यात कधीही दखल न करणें. तुमचे जातीस तनखा रुपये २०० दोनशें हल्ली शिक्का दरमहा मुकरर करून दिला आहे. या शिवाय तुम्ही कोणतेही गोष्टीस दरकार न ठेवितां, सदरीं लिहिलेंप्रमाणें अंमलात आणावे. तुमची तारीख सुरू छ १ सवाल मार्गशीर्ष जाणिजे छ ११ सवाल मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 269 6-12-1840 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Hafiz khan as Baxi on a monthly salary of Rs. 200/-

---

**अ. नं. २७०** **श्री**

(शिक्का फारसी) ता. १९ डिसेंबर, इसवी सन १८४०

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडून : त्रिंबक गिरमाजी विशेष. तुम्ही पूर्वीपासून सरकार पदरचे व इतबारी, करितां चिटणिसी ओहद्याचे काम याजवर मुकरर करून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुम्हास मुनासिब आहे कीं, ओहद्याचा कारभार म्हणजे कोणता कीं, लिहिणें, पत्रें सनदा, दस्ताऐवज, मालीमुलकीं, वगैरे दरोबस्त आपले चिटणवीसीचे

इलाख्यांत आहेत, ते खूब खबरदारीनें करावे. खराब, बाद लाच वगैरेपासून वेगळे राहून कोणतेही गोष्टीची गरज न ठेवितां, शिवाय आपली तनखा दरमहा हल्लीं शिक्का रुपये १०० घेत जाऊन सदरीं लिहिल्याअन्वयें अंमलात आणावे. रवाना छ २४ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 270 19-12-1840 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Trimbak Girmajee as Chitnis on a monthly salary of Rs. 100/-

---

**अ. नं. २७१** **श्री म्हाळसाकांत**

(शिक्का महाराज हरीराव होळकर) ता.६ जानेवारी, इसवी सन १८४१

श्रीमंत हरीराव महाराजांकडून : गंगादीन जमादार. कमाविसदार, नागलवाडी सेंधवे यांसी. साहेब बहादुर यांजकडून कैफियत आल्यांत मजमून कीं, सरकार इलाख्यांत टाकेदार लोक किती व त्यांस सरकारी चाकरीबद्दल टाका काय? व कोणते कामगिरीबद्दल? जात, नांव, ठिकाण, याचें पत्रक खुलासेवार साहेब बहादुर चाहतात, तरी तुम्ही सविस्तर खुलासेवार पत्रक तयार करून आठ दिवसांचे आंत हुजूर पाठविणें. यांत हयगय करूं नये. मात्र सविस्तर खुलासा पूर्ण चौकशी महालचे जमीदार, कानगो, दरखदार मंडलोई यांचे माहितीने तयार करून पाठवावे म्हणोन : सदरप्रमाणें जरुरी पत्रें महालवार मामलेदारांस रवाना गेलीं आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 271 6-1-1841 A.D.

The Kamavisdar of Pargana Nagalwadi is ordered by Maharaja Harirao Holkar to prepare a complete list of Takedars, with their Takas, their castes and residence etc. : The list is required by the Resident.

Similar orders were also despatched to all the Mamlatdars of Mahals.

---

**अ. नं. २७२** **श्री**

ता. १ फेब्रुवारी, इसवी सन १८४१

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडून : चि. बाळा नाईक यांस. विशेष. तुम्ही खैरख्वाह, इमानदार जाणून मेहरबानी होऊन तुम्हास ओहदे शागीर्दपेशाचें काम मुकरर करून दरमहा रु. २०० हल्लीं शिक्का कायम करून ही सनद सादर केली असे. तरी दप्तरची दुरस्ती ठेऊन काम करीत जाणें. तनखेशिवाय कोणतेही गोष्टीची गरज ठेऊं नये. गफलत व सुस्ती न ठेवितां काम करीत जाणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 272 1-2-1841 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Bala Naik as Household officer on a montly salary of Rs. 200/-.

---

**अ. नं. २७३** **श्री म्हाळसाकांत**

(शिक्का फारशीत) ता. २२ जून, इसवी सन १८४१

श्रीमंत महाराज हरीराव होळकरांकडूनः नारायणराव पळसीकर यांस. विशेष. तुम्ही जुने नोकर व खेरख्वाह जादा, सरकारांत परवर्षी करणें फार जरुर आहे. यास्तव नायब दिवाणाचा ओहदा तुम्हाकडे आहे तो महकूब करून, पुरा दिवाणगिरीचा वोहदा तुम्हांस देण्यांत येऊन पांचशें हल्लीं शिक्का ५०० तुम्हास दरमहा तनखा नेमणुक मुकरर करण्यात येऊन हे सनद लिहिली आहे. तरी तुम्ही दिवाणगिरीचे कारभारांत बहुत खबरदारी राखून मुलखाचे आबादीस व रयतीचे तकलिफीस बहुतसी कोशीस करीत जाऊन दरोबस्त दिवाणगिरीचे काम फार होशियारीनें करावें. शिवाय आपले तनख्याचे खेरीज बिनाहुकूम सरकारचे कोणतेही गोष्टीची गरज व मतलब न ठेवितां लिहिल्या बमुजीब अंमलांत आणल्यास तुमचा इतबार दिवसेंदिवस जादा सरकारांत होईल. तरी सदरीं लिहिल्याअन्वयें कामाची दुरस्ती ठेवीत जावी. जाणिजे छ २ जमादिलावल हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 273 22-6-1841 A.D.

Maharaja Harirao Holkar Promotes Narayan Ram Palshikar to the post of Diwan on a monthly salary of Rs. 500/-

---

**अ. नं. २७४** **श्री**

ता. २२ जून, इसवी सन १८४१

श्रीमंत महाराज हरीराव होळकरांकडून : हाफीजखां बक्षीस यांसी. विशेष. तुम्ही जुने चाकर व नेक चलन पाहून तुम्हाकडे कायम मुक्काम बक्षीगिरीचा ओहदा मुकरर करण्यांत आला होता, ओहद्याचें काम तुम्ही फार चांगले केलें, यास्तव आम्ही आपले खुशीनें पुरे बक्षीगिरीचे काम तुम्हाकडे सांगून दरमहा तनखा रुपये ३०० तीनशें हल्लीं शिक्का करून देण्यांत येऊन ही सनद लिहिली आहे. तरी तुम्हास मुनासिब आहे कीं, फौजेची तनखा वाटणी व पाहणें, स्वारांचे वर्दी, हत्यारांची पहाणी व दुरस्ती व घोडे मोठें तन्दुरस्त ठेवणें व कवाईत घेत जाणें, स्वारांपासून हप्त्यातून दोन वेळां येणेंप्रमाणें कामाचा जिम्मा तुमचा जाणोन सदरी लिहिल्याअन्वयें दुरस्ती ठेवीत जाऊन शिवाय आपले तनखेचे आणखी कोणतीही गरज व मतलब न ठेवितां काम करीत जाणें. ताकीद जाणून लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. छ २ जमादिलावलः मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 274 22-6-1841 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Hafij Khan permanently to the post of Baxi on a monthly salary of Rs. 300/-.

---

**अ. नं. २७५** **श्री**

३० जून, इसवी सन १८४१

नारायणराव राम पळसीकरांचें आपले मातुश्रीसः वडिलांचे आशीर्वादें इंदूर येथे सुखरूप असो विशेष. आम्हांस सालगुदस्तापासून नायब दिवाणगिरीचें काम सांगितले. हल्लीं वैशाख वद्य १३ बुधवारीं स्वारी शरीर गैर आरामीमुळें बाणगंगेस रहावयास गेली. नंतर ज्येष्ठ वद्यपक्षीं छावणीतील रेसिडेंट बडेसाहेब यजमानसाहेबांकडे बाणगंगेस येऊन विचार ठरला कीं फणसे सरकारचे जावई, त्यांजला दिवाणगिरी सांगणें नीट नाहीं. नायब दिवाण आहेत, परंतु मुख्य दिवाण कोणी असावा, म्हणजे कंपनी सरकारांतून कागदपत्र त्याचे नांवें हरएक बाबतीत लिहिण्यास ठीक सरकारमर्जी असल्यास माजी दिवाण आबाजी बल्लाळ किबे हल्लीं इतराजींत आहेत, त्यांजवर मेहरबानी होऊन वस्त्रें द्यावी. सरकारांनीं प्रत्युत्तर केलें कीं, आबाजींनीं लाचलुचपती बहुत खाऊन सरकार नुकसान केलें. त्यांजला काम सहसा सांगांवयाचें नाहीं. तुमचा आग्रह दिवाण करण्याचा आहे, त्यापेक्षां सरकार दौलतीतील पुरातन चार पिढीचे दिवाण पळसीकर आहेत. त्यांजला काम सांगू. तेव्हां रेसिडेंट वेटसाहेब बोलले कीं, आम्हास मान्य आहे. आम्हास मिनहू शुद्ध २ सोमवारीं फणसे यांजबरोबर छावणीत बोलावून नेलें आणि बहुत खात्री करून सांगितलें कीं, तुम्ही

होळकर सरकारचे पुरातन इतबारी पिढीजात जाणोन, होळकर महाराज व कंपनी सरकार तुम्हास दिवाणगिरी सांगत आहे, सरकार नुकसानी न होतां महालानिहायची आबादी, इस्तवारी, उत्तम प्रकारें करून कामकाजास जपत जाऊन वेतनाखेरीज लाचलुचपत कांहीं एक कोणापासून घेऊं नये. कळल्यास कंपनी सरकारचा व होळकर सरकारचा विश्वास तुम्हांवर राहणार नाहीं असे साहेबांनीं सांगितले. त्यावर आम्ही जाब दिला कीं, श्रीमंत कैलासवासी मोठे सुभेदारांपासून पिढीजात आजपर्यंत ११० वर्षे जाहली. खावंदानीं कामें सांगितली ती करीत आलों व पुढेंही करूं. होळकर सरकार व कंपनी सरकार आम्हास दोन नाहींत. कोणतेही काम करण्यास सिद्ध आहोंत. आजपर्यंत आबरूच मेळविली आहे. असा जाब दिल्यावर साहेबांनीं सांगितलें कीं, तुमचा भरंवसा जाणून कामाची योजना केली, कोणेविषयीं अंदेशा ठेऊं नये. फणसे हे सरकारचे जावई हे मुखत्यार. तुम्ही कारभार करून यांजला समजावित जावें व प्रति सोमवारीं छावणीस यांजबरोबर येऊन आम्हांस भेटत जावे. अशी बोलणीं जाहल्यावर साहेबांनीं आपला चोपदार बाणगंगेस श्रीमंत सरकार साहेबांकडे पाठवून, आम्हासही जाण्यास सांगितलें. फणसे व आम्ही यजमानसाहेबांपाशीं जातांच आमची खात्री करून दिवाणगिरीची वस्त्रें साडेतीन. तिवट, शालजोडी, महमुदी, किनखाप, येकुण साडेतीन वस्त्रें देऊन कलमदान चांदीचे नवीन दिले व दरमाह रु.५०० आषाढापासून पावत जाणेबद्दल सनद करून दिली. चोपदार, हलकारे जासूद, माणसे तैनातीस दिलीं. म्याना खरेदी व भोई यांचा रोजमुरा नेमणुकींत खर्च करीत जावा. याप्रमाणें फणसे यांनीं सांगितले. त्याअन्वयें एक म्याना खरेदी करून भोई असाम्या ९ नायकासुद्धां चाकर ठेविल्या. कामाचा ओघ साहेबांनीं सांगितलेप्रमाणें अद्याप चालू झाला नाहीं. शुद्ध २ सह ३ सोमवारी अस्तमानीं धन लग्नावर कलमदान व वस्त्रें मिळाली. मुहूर्ताचा आक्षेप घेणें तरी यजमान साहेबांची प्रकृती दिक्क. साहेबांकडील त्वरा झाल्यामुळें कांहीं एक बोलावयास अवसर न झाला तेव्हां श्री जगदंब स्मरण हाच मुहूर्त समजून वस्त्रें घेतली.

सरकारांस पांच मोहरा नजर केल्या. घरीं येऊन शागीर्दपेशा वगैरे लोकांस इनाम व धर्मादाय वगैरे ब्राह्मणांस दिले. एकंदर हजार बाराशेंचा खर्च करणें प्राप्त जाहलें, तूर्त कर्ज भरीत आहोंत. श्री जगदंब लवकरच कर्जमुक्त करणार समर्थ आहे.

प्रस्तुत श्रीमंत सरकारची प्रकृती आरोग्य जाहली नाहीं. ही मोठी काळजी वागवीत आहों. सनद मिळाली तिची नक्कल वडिलांस अवलोकनास पाठविली आहे. मालकांस नळसंग्रहणीचा रोग होऊन दिवसेदिवस प्रकृती बिघडत चालली आहे. दुर्धर घोर निर्माण जाहला. फणसे यांचे मनांत मुख्य दिवाणगिरी आपणाकडे असावी, परंतु बाह्यात्कारी वांकडेपणा न दाखवितां आंतून हरएक कामीं उपमर्द आरंभिला आहे. आम्ही चहूंकडून निराधार, मालक अस्वस्थ व साहेबांकडे फणशांची नालस्ती करणें अप्रशस्त. तूर्त स्तब्धता ठेवली असून फणसे जसें सांगतील तेच धोरण ठेवलें आहे. वडिलांस विनंती कीं, कोणी तिकडील मंडळींनीं शिफारस पत्र मागितलें तर देऊं नये. तूर्त दुवक्त कचेरीत जाऊन एक वेळ

बाणगंगेवर जावें लागतें.

शुद्ध १० सोमवारीं प्रातःकाळीं फणसे व हाफीजखांभाई बक्षी छावणीत साहेबांकडे जाऊन सरकारचा निरोप व प्रकृतीचे मान समजाऊन दत्तक पुत्र घ्यावा असें ठरविल. बाणगंगेहून सर्वत्र दरखदार मंडळीस बोलावून सांगितलें कीं, सरकारमर्जी मार्तंडराव होळकर याची पेशजी फारकती झाली सबब संताजी होळकर यांचा पुतण्या खंडेराव अकरा वर्षांचे वयाचा आहे. हा मुलगा दत्तक घेण्याचा आहे. तुम्ही सर्व दरखदार सरकारपदरचे तुमची राय काय आहे ? त्यावरून सर्व दरखदारांनीं आम्ही प्रत्युतर केलें कीं, सरकार व बडेसाहेबांचे विचारांत आलें असेल तें आम्हास अवघ्यांस मान्यच आहे. इतकें बोलणें झालेवर संताजी होळकरांचा पुतण्या खंडेराव यांस पाहण्यास आणलें. तेव्हां मंडळींत प्रारब्धयोगांच्या गोष्टी निघाल्या. ''मार्तंडराव होळकर व हरीराव महाराजासंबंधी'' दत्तविधानही लौकरच होणार आहे. फणसे यांस मुखत्यारीची वस्त्रें होणार आहेत, हा मजकुरही ऐकण्यांत आहे. जसें घडेल तसें लिहून कळवूं. चिरंजीव रामरावाचे इंदुरीं येण्याचे मानस. त्यास कळवूं त्यावेळीं येण्याचें घडावे. हल्लीं महाराज यांच्या प्रकृतींत विकृत असल्यानें कांहीं सूचत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**पळसीकर रेकार्ड**

No. 275 30-6-1841 A.D.

Narayanrao Palshikar's letter to his mother informing her of the promotion he received viz. Diwanship of the state, and of the general condition of the Maharaja and his court.

---

**अ. नं. २७६** **श्री**

ता. ३ जुलाई, इसवी सन १८४१

यादी. सरकारांत चिरंजीव राजश्री खंडेराव होळकर मांडीवर घेऊन पुत्रोत्सव केला. त्याप्रमाणें महालानिहाय जाहला पाहिजे सबब खर्चाची मंजुरी होऊन खालीलप्रमाणें पत्रें जारी करणें. छ.१३ जमादिलावल, आषाढ शुद्ध १५ एकंदर आकार रुपये १८३५ आठराशें पस्तीस, मंजूर केलेंप्रमाणें खाली लिहिल्यामहालीं उत्सव करणें : १ परगणे इंदूर, २ प्र.सावेर, ३ प्र.देपाळपूर व ४ प्र बेटमे, ५ हासलपूर, ६ सरकार बिजागड, ७ सं. महेश्वर, ८ तां. चोळी व ९ चिखलदे १० नागलवाडी, ११ ब्राह्मणगांव, १२ कायथे, १३ नेमावर, १४ सुंदरशी, १५ काटाफोड, १६ काटकूट, १७ तळेण लाटाहेडी १८ वाफगांव वगैरे १९ चांदवड, २० आलमपूर, २१ किल्ले हिंगलाजगड, २२ चंदवासा, २३ रायपूर, २४ संधारे, २५ सुनेलकोठडी, २६ जार्डा कंजार्डा, २७ नंदवाइ, २८ जिरापूर माचलपूर, २९ रामपुरा, ३०

नारायणगड, ३१ महतपूर, वगैरे.

येणेंप्रमाणें महालानिहाय उत्सव करणेस मामलेदारांस परवानगी पत्रें.

**सरकारी रेकार्ड**

No. 276 3-7-1841 A.D.

Festival was observed in Indore on the adoption of Khanderao Holkar by the Sarkar, Rupees 1,835/- are sanctioned for festivals in 31 Parganas, mentioned in the list, and Mamlatdars are ordered accordingly.

---

**अ. नं. २७७** **श्री म्हाळसाकांत**

इसवी सन १८४१

राजश्री मौलवी महमद सैयदखां गोसावी यांसी. स्नेहांकित हरीराव होळकर राम-राम. विशेष. फिर्यादी लोकांचा इनसाफ करणें व जुलमी लोकांस सजा देणें व रयतीचा इनसाफ व नेक बंदोबस्त शहरचा आम्हांस करणें जरुर आहे. जाणून तुम्हास कसबे इंदूर येथील अदालतीचे काम मुकरर करून दरमहा रुपये १०० शंभर हल्लीं शिक्का नेमून देऊन हे सनद सादर केली असे. तरी मुनासिब आहे कीं, तुम्ही अदालतीचें काम बहुत खबरदारीनें करीत जाऊन मुकदमे इनसाफ, आपले व दुसरें दोस्त दुष्मन यांस बरोबर समजून, फैसला वाजवी, इमानेंइतबारें करून शिफारस कोणाचीही न ऐकावी व आपले तनखेशिवाय कोणतीही गोष्टीची गरज ठेऊं नये. लिहिल्याअन्वयें अदालतीचें काम बहुत हुशारीनें व दुरस्त करीत जाणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 277 1841 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Maulvi Mohammad Sayyad Khan Adalatdar of Kasba Indore on a monthly salary of Rs. 100/-.

---

**अ. नं. २७८** **श्री**

इ.स.१८४१

श्रीमंत महाराज हरीराव होळकरांकडूनः मदारबक्षखांस. तुम्ही पुराणे चाकर व निमकहलाल व आपले कामांत बहुत हुशार, जाणोन कप्तानीचा ओहदा, तोफखाना व

जिनसी, ह दोन्ही तोफखान्याचे काम तुम्हाकडे सांगोन तुम्हास दरमहा हल्लीं शिक्का रुपये १०० शंभर मुकरर करून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही तोफखाना, बारुद, गोळा, शिपाई, गोलंदाज व घोडे हत्यार, वगैरे कारखाना दुरस्त राखून, हमेशा कवायत घेत जाऊन कवाईतीचा मामूल असा ठेवणें कीं, हप्त्यांतून दोन वेळां कवायत बरोबर घेत जावी. याची बहुतसी ताकीद जाणून लिहिल्याअन्वयें अंमल करून आपले तनखेखेरीज कोणतेही गोष्टी गरज, मतलब न ठेवितां कवाईतीचें काम इमानेंइतबारें व हुशारीनें करीत जाणे. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 278 1841 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Madarbax Khan as Captain of Artillery on a monthly salary of Rs. 100/-

---

**अ. नं. २७९** **श्री**

इसवी सन १८४१

श्रीमंत महाराज हरीराव होळकर यांजकडून : खुदाबक्ष कुंवर यांस. विशेष. तूं सरकारचा खैरख्वाह, निमकहलाल, जाणोन, कर्नेलीचे कामावर मुकरर करून दरमहा रुपये २०० दानशें नेमून हे सनद सादर केली असे. तरी कर्नेलीचे काम कारभाराची बहुत खबरदारी राखावी व शिपाई लोकांस वर्दी व हत्यारे दुरस्त राखून त्यांजला बहुत राजी व खुशी ठेऊन कवाईत हप्त्यांतून दोन वेळां करवीत जावी. शिवाय तनखेचे कोणतेही गोष्टीची गरज न ठेवितां सदरीं लिहिल्याप्रमाणें अंमल करून कर्नेलीचें काम बहुत खबरदारीनें करीत जाणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 279 1841 A.D.

Maharaja Harirao Holkar appoints Khudabax Kuwar as Colonel on a monthly salary of Rs. 200/-

---

**अ. नं. २८०** **श्री**

ता. २३ जानेवारी, इसवी सन १८४२

श्रीमंत हरीराव होळकर यांजकडूनः आबाजी बल्लाळ यांस विशेष. सरकार दिवाणगिरी ओहद्याचे काम इस्तकबील सन १२४७-४८ तागाईत फसली सन १२५० छ. १४

रमजानपावेतों तुम्हांकडे होते. त्याचा हिशेब वगैरे समजून घेण्यांत येऊन हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी सदरी ओहद्याचे कामाबद्दल तुम्हांकडे हिशेब वगैरे कांहीं एक सरकारचे घेणें राहिले नाहीं. रवाना छ १० जिल्हेज सुरुसन इसने आर्बेनमयातेन व आलफ हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 280 23-1-1842 A.D.

Abajee Ballal Kibe is informed by Maharaja Harirao that the accounts during his ministry are examined, and that he owes no amounts due.

---

## अ. नं. २८१ श्री म्हाळसाकांत

ता. १२ नोव्हेंबर, इसवी सन १८४३

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>हरीराव सुत खंडेराव होळकर |
|---|

वेदशास्त्रसंपन्न राजश्री बिहारीलाल बिन मनसाराम व्यास संदिपन पुराणिक, गोत्र वत्स, शाखा माध्यंदीनी वास्तव्य क्षेत्र अवंतिका स्वामींचे सेवेसीं. सेवक खंडेराव होळकर दंडवत, विनंती. उपरि शके १७६५ संमत १९०० आनंदनामा संवत्सरें तुम्ही इंदूर मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं, संस्थान अंगपात क्षेत्र मजकुर येथील अन्नछत्रासह संस्थानचें काम पूर्वीपासून म्हणजे कैलासवासी श्रीमंत यशवंतराव महाराज यांनीं आमचे तीर्थरूप वेदमूर्ती मनसाराम व्यास यांजकडे सांगून सन १२१० फसलीचे सालीं सनद करून दिली. त्याप्रमाणें हल्लीं वहिवाट चालत आहे. सरकारानीं पूर्वीची सनद पाहून संस्थानची वहिवाट वंशपरंपरा आम्हाकडे चालण्याविषयीं नूतन सनद कृपा करून दिली असतां, स्वस्थचित्तें क्षेत्रीं वास करून सरकार दौलतीचे अभीष्ट चिंतन करीत जाऊ म्हणोन. त्यावरून मनास आणितां तुम्ही बहुत सत्पात्र, संस्थानचे काम तुम्हाकडे राहिल्यानें संस्थानचा बंदोबस्त उत्तम प्रकारें राहून तुमचाही प्रपंच निर्वाह चालेल, यात सरकार-दौलतीस श्रेयस्कर जाणोन पूर्वीची सनद पाहून हे सनद लेखन केली असे. तरी संस्थानचे खर्चास ऐवज सालिना येणेंप्रमाणें.

१९८६ तुम्हांकडे इस्तमुरार हजारे देह २ आहेत, तो ऐवज संस्थानचे खर्चास द्यावयाचा बंदी शिक्का १४२५ मौजे तिंगजपूर, परगणे सुजालपुर; ५६१ मौजे ळेणी परगणे सुंदरसी. येकुण आकार रु.१९८६

४५० परगणे देपाळपूर येथें संस्थानचे खर्चाबद्दल नेमणुक महालचे बेहेड्यांत खर्ची पडून संस्थानचे खर्चाकडे ऐवज पावत आहे. ते सालिना हल्लीं शिक्का.

..........

२४३६

पैकीं वजा तुमचे नेमणुकीबद्दल पूर्वीचे सनदेअन्वयें हल्लीं शिक्का.

१०० श्रीजनार्दनजीचे मंदिरांत प्रत्यही पुराण होत आहे, त्याबद्दल नेमणूक सालिना.

२०० संस्थानचे काम तुम्हांकडे सांगण्यांत आले त्याजबद्दल वेतन सालिना.

........

३००

बाकी

बुंदी शिक्का १९८६, हल्लीं शिक्का १५०.

एकवीसशें छत्तीस शिक्केवार ऐवज लावून देण्यांत आला आहे. याप्रमाणें साल–दरसाल संस्थान खर्चास ऐवज घेतला जाऊन, देवस्थान, धर्मादाय, अन्नसत्र, वगैरे खर्च करीत जाऊन अखेरसालीं वहिवाटीचा हिशेब सरकारांत दाखल करीत जाणें. या शिवाय खर्चाचा ऐवज जास्त देणें निघाल्यास खासगीकडून देवविला जाईल संस्थानचे काम पुत्रपौत्रादि वंशपरंपरा करीत जाऊन, बंदोबस्त उत्तम प्रकारे ठेवीत जाणें. छ १९ सवाल, आर्बाअर्बेनमयातेनअलफ. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 281 12-11-1843 A.D.

Maharaja Khanderao Holkar passes a Sanad to Biharilal Vyas renewing the old grant of 2 Istmurar villages, and cash grant from Depalpur Pargana.

The grant is hereditary, and is meant for the general management of the Angapat Sansthan. He is to receive Rs. 300/- out of the income for his services mentioned in the Sanad.

---

**अ. नं. २८२** **श्री म्हाळसाकांत**

ता.६ डिसेंबर, इसवी सन १८४३

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
हरीराव सुत खंडेराव होळकर

राजश्री गंगादीन जमादार कमाविसदार प्रगणे नागलवाडी. गोसावी यांस स्नेहांकित खंडेराव होळकर दंडवत : प्रगणे मजकुर येथील साल मजकुर संमत १९०० चे सालचा ऐवज तुम्हाकडून सरकारांत येणें त्याप्रमाणें मार्गशीर्ष शुद्ध १५ चे दुसरें हप्त्याचा ऐवज हुजूर पोत्याकडे द्यावयाचेबद्दल यादी मखलासीची महाल चलणी रु. २६६ दोनशें सहासष्ट हल्लीं शिक्का तुम्हांकडोन घ्यावयाचे ठरोन हे वरात सादर केली असे. तरी तुम्ही परगणे मजकुर येथील साल मजकुरचे दुसरें तोजीबद्दल दोनशें सहासष्ट रु. हल्लीं इंदूर, उज्जेनी शिक्का हप्त्याचे मितीस हुजूर पोताकडे दाखल करून कबज घेणें. जाणिजे छ १ जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

२६६ सदरहू वरातीबद्दल रु. हुजूर खजिन्यांत जमा असे. मार्फत बापूजी नारायण निसबत दिवाण.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 282 6-12-1843 A.D.

Maharaja Khanderao Holkar orders Kamavisdar of Pargana Nagalwadi to pay Rs. 266/- being the second instalment of the year.

The amount is paid.

---

**अ. नं. २८३** **श्री**

शिक्का इंदूर रेसीडेन्सी ता. २७ डिसेंबर, इसवी सन १८४३

हुकूम इस्तिहार कर्नल सर कलाट मारटीन वेटसाहेब बहादूर रेसिडेंट इंदूरचे हुजुरहून : तहनाम्याप्रमाणें सरकार कंपनी इंग्रजबहादूर, बंदोबस्त होळकर सरकारचे राज्याच्या सुरक्षितेकरितां नबाब गव्हर्नर जनरलसाहेब बहादूर. मेहरबान खंडेराव महाराज होळकर ह्यांची लहान उमर असल्यानें संस्थानचे कामाची व्यवस्था रेसिडेंटसाहेब इंदूर हे पाहतील व इंग्रज सरकार हरप्रयत्नें करून उत्पन्न वाढविणें, प्रजा सुखी ठेवणें, सरकारी कामगारांचे हक्काचें रक्षण, याजबद्दल जास्त लक्ष पुरवितील व श्रीमंत होळकर सरकार यांजबद्दल जास्त लक्ष पुरवितील व श्रीमंत होळकर सरकार यांजबद्दल हमेशा आदर राहील. ज्यावेळीं महाराज खंडेराव बहादूर काम सांभाळण्याचे योग्य होतील त्यावेळीं सर्व अखत्यार संस्थानचे महाराजांचे सुप्रत करण्यांत येतील. याजकरितां जाहीर होणेकरितां हा इश्तिहार जारी केला आहे. तरी हुकूम केला जातों कीं,

सर्व वकील रेसिडेंटीतील हाजर रहाणारे आपआपले मालकांस इत्तल्ला देतील कीं, श्रीमंत होळकर सरकारचे अज्ञान स्थितींत आमचेकडे राज्याची व्यवस्था आहे. ता. २७ माहे डिसेंबर सन १८४३ इ. मि. पौष शुद्ध ७ संमत १९००.

**सरदार बुळे यांचे रेकार्ड**

No. 283 27-12-1843 A.D.

The British Resident informs the general public that the State management is undertaken by the East India Company during the minority of Khanderao Maharaja Holkar.

---

## अ. नं. २८४ श्री म्हाळसाकांत

(शिक्का) ता. ३० डिसेंबर, इसवी सन १८४३

इस्तिहार दरबार. श्रीमंत महाराज राजेश्री खंडेराव होळकर बहादुर. छ १५ माहे जिल्काद सन १२५९ हिजरी. ऐसा कीं, कसबी लोकांचे कामास इनसान स्त्रियांस (घरंदाज) कसबी कामास विकणें हे बेदस्तूर आहे. असे गोष्टीचा बंदोबस्त करणें सरकार मुनसफीनें जरुर आहे. या मुकदम्यांत, सरकारांतून रेसिडेंटीत कैफियत जाऊन जबाब छ १५ जमादिलाखर सन मजकुरचा, कसबी लोकांस लौंड्या (दासी) विकण्याविषयीं मनाई करण्याबद्दल हुकूम आल्यावरून हा इस्तिहार जारी केला जातो कीं, कोणी कसबी लोक, नायक, किंवा नायकिणीनें लौंड्या खरेदी केल्या तर त्याजबद्दल सरकारांत खबर कळल्यावर ती लौंडी (दासी) छिनाऊन घेतली जाईल. विकणार व घेणार मनुष्यांस अशी शिक्षा दिली जाईल कीं, त्या शिक्षेस पाहून लोकांत दहशत बसली पाहिजे. कारण हे लोक, लौंडी खरीदी करून तिचेकडून हरामखोरी करवितात. कांहीं तर विष खाऊन आत्महत्या करितात. तरी अशा प्रकारें कोणी जुलूम अन्याय करील तर, त्या दासीस नायकिणीपासून मुक्त करविणेकरितां प्रत्येक महालीं व शहरांत, अधिकाऱ्यास इतल्ला देत जाणें, म्हणजे अन्याय होणार नाहीं. जाणिजे. छ २८ जिल्काद. मोर्तब.

सदरहूच्या नकला तामीलीस्तव अदालत, कोतवाली, शहर इंदूर, महालनिहाय, मामलेदारांकडे एक एक नक्कल जाहीर ठिकाणीं लावण्याकरितां पाठविली जावी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 284 30-12-1843 A.D.

The Durbar promulgates orders against sale of girls for prostitution.

Copies of the order are despatched in Mahals.

---

अ. नं. २८५ **श्री**

इसवी सन १८४३

हुजूर रिपोर्ट. कमाविसदार चिखलदे, महिपतराव बल्लाळ व रंगो भोजराव विभूते कमाविसदाराकडून : विशेष. छ ६ जिलकादपावेतों सरकार कामीं हाजर असो. सरकारचा हुकूम छ २२ सवालचा आला तो छ ४ जिलकाद रोजीं पावला. मेहरबान बडेसाहेब बहादूर यांजकडून कैफियत आली त्याची नक्कल सरकारांतून पाठविली ती पावली. त्यातील हासील कीं, रांगडे व रजपुत लोक लडक्या (मुली) होतांच मारून टाकतात. यास्तव हा कार बंद होण्याबद्दल अहवाल लिहिला आहे. त्याप्रमाणें गांवगन्ना रांगडे व रजपूत, लोकांस ताकीद करून लडक्या (मुली) कोणी मारूं नयेत असा बंदोबस्त ठेवणेची आज्ञा त्याप्रमाणें सरकार आज्ञेनुसार गांववार आगाही देऊन तामील केली जाईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**महेश्वर येथील विठ्ठलराय कानगोचे रेकार्ड**

No. 285 1843 A.D.

The Kamavisdar of Chikhalda acknowledge receipt of the general order against infanticide (of girls), and promises prompt promulgation of the same under his Jurisdiction.

---

अ. नं. २८६ **श्री**

ता. २६ जानेवारी, इसवी सन १८४४

मेहरबान बडेसाहेब बहादूर यांनीं इंदूर संस्थानचे उपयोगी कायद्याची कलमें लिहून वजारत महासवाई राजोजीराव फणसे यांचे नांवें खलिता पाठविला. छ ७ मोहरम सन १२५३ फसली. ता. २६ जानेवारी इसवी सन १८४४.

१ मुनासिब आहे कीं, भाऊसाहेब फणसे व गोपाळरावबाबा यांनीं दोन प्रहर दिवस वाजल्यावर वाड्यांत येऊन सदर ठिकाणीं एकत्र होऊन कारभार, फौजदारी व दिवाणी व महालनिहाय आमदनी व खर्च रियासतीचा माफक शिरस्ते कदीम जैसा कीं, कैलासवासी श्रीमंत महाराज हरीराव होळकर साहेबांचे वेळेस करीत आले, त्याप्रमाणें करीत जावा.

१ दिवाण यांनीं उजवे बाजूस कचेरींत बसत जावें आणि फडणीस, चिटणीस व मुनशी यांनीं डावे बाजूस बसत जावें आणि तमाम कारकून व वकील दरबारांत हजर राहणारे यांनी कचेरी मुकररीचे एक घंटापूर्वी दरबारांत हजर होत जावें. कारण कीं, लोकांचे कामात हरकत न व्हावी.

१ कचेरीत बसावयाची जागा हरएकाची जी ठरविली आहे तेथेंच बसत जावें. दुसरें इसमाचे जागीं बसूं नये.

१ दिवाण यांनीं तमाम कागद परगण्याचे व मुकदम्याचे अदालत व कोतवालीचे भाऊसाहेब बहादूर व गोपाळरावबाबा यांजला देत जावे व दाखवीत जावे व भाऊसाहेब व गोपाळरावबाबा यांनी ते कागद सुनावणी करून त्यांपैकीं जे कागद इतलाई असतील ते कागद दाखलदप्तर करीत जावे व जे कागद कारवाईचे असतील, त्यांजवर हुकूम मुनासिब पाहून चढवून त्यात संगीन मुकदमे मोठे विचारानी निकाल व्हावयाचे असतील ते मुकदमे रेसिडेंटसाहेब बहादुरांस विचारून त्यांचे सल्लेनीं तजवीज करीत जावी व लिहिणारे लोकांस ताकीद करीत जावी कीं, जे जरुरी मुकदमे असतील ते तेच दिवशीं पाहून जबाब लिहीत जाणें व बाकी कागद कीं, ज्यांवर हुकूम होईल ते दुसरें दिवशीं जबाब लिहून देत जावे व दिवाण यांनीं वरदीरिपोर्ट तमाम मुकदम्यांचा फैसल झाल्याचा दोन प्रहरपूर्वी बडेसाहेब बहादुरांकडे देत जावा.

१ देवडीवाले यांस ताकीद असावी कीं, जे लोक फिर्यादी घेऊन येतील, त्यांस रोकू नये, कारण ते गरीब लोक समक्ष अर्ज करतील.

१ कोतवाल शहर इंदूर व नाजीम अदालत, यांनी दररोजचे अहवाल, दरबार-कचेरींत सादर करीत जावे व संगीन मुकदमे असतील ते हुकुमासाठीं पेश करीत जावे.

१ मुलखांत असा शिरस्ता आहे कीं, हप्त्यांत एक दिवस छुटी होत असावी, छुटीचा दिवस रविवारचा मुकरर होणें बेहत्तर आहे, कारण हा दिवस बडेसाहेबांस सोईस्कर आहे.

येणेंप्रमाणें सात कलमांचा अंमल होत जावा. फक्त तारीख मजकूर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 286 26-1-1844 A.D.

The Resident sends an order of seven items directing to the Diwan, Khasgi Diwan, Deodiwale, Kotwal and Nazim Adalat their respective work and despatch thereof;

Sunday to be a general holiday.

---

अ. नं. २८७ **श्री म्हाळसाकांत**

ता. २७ एप्रिल, इसवी सन १८४४

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>अहिल्याबाई कारकीर्द, कृष्णाबाई होळकर |
|---|

चिरंजीव राजश्री गंगादीन जमादार कमाविसदार परगणे नागलवाडी, सेंधवे. यांस कृष्णाबाई होळकर आशीर्वाद सु।। खमसआर्बेन मयातेन वआलफ चिरंजीव राजश्री तुकोजी होळकर यांजला गादीवर बसविण्याचा मुहूर्त आषाढ शुद्ध १२ गुरुवारीं नेमस्त करून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी तुम्ही प्रगणे मजकूर येथील कामाचा बंदोबस्त ठेऊन समारंभास हुजूर येऊन दाखल होणें. जाणिजे छ.८ जमादिलाखर बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 287 27-4-1844 A.D.

The Kamavisdar of Pargana Nagalwadi is ordered to be present at the installation ceremony of Tukojeerao Holkar on the 12th day of the bright half or Ashadha.

---

अ. नं. २८८ **श्री म्हाळसाकांत**

ता. २७ जून, इसवी सन १८४४

यादी. सरकार राजश्री तुकोजीराव होळकर गादीवर बसले सबब प्रथम दिवशीं व दुसरें दिवशीं साहेब लोक, यांस मेजवानी सरकारवाड्यांत झाली यामुळें आतषबाजी खरेदी (नळेचंद्र जोती वगैरे) गुजारत मालूभाई व गुलामहुसेन दारुवाला सु।। खमस आर्बेन मयातेन व आलफ १२५४ फसलीं माहे जमादिलाखर छ १०, १२ बरहुकुम यादी.

शागीर्दपेशाकडील नगवार तपसील.

१८७३-०-० दारुची झाडें सुमारीं : ७५५ खजूरीचीं ४५ दर १७, ८५० नारळाची ५० दर १७, ३४ ताडाचीं सुमारी २ दर १७, ४० सतारे ५ दर ८, जांबुझाडें १ दर १०, २८ हवई ४ दर ७, ९० चतरबुरुज ५ दर १८, ६६ नवीन तरहाचीं येकुण रुपये १८७३ व –

९८९-७-६  इतर सोडण्याची दारु, अनार, महताब, कोठी, गुबारे, बंबाचे गोळे, रावण, हरण, घोडा, हत्ती, वगैरे तरेतऱ्हेची दारुची वस्तू.

.................

२८६२-७-६

येकुण दोन हजार, आठशें बासष्ठ, साडेसात आणेची बारुद खरीद केली : पैकीं वजा अण्णीबद्दल रु.१७८-१५-६ बाकी रु.२६८३-८-० बोहरी यांस देणें :

**सरकारी रेकार्ड**

No. 288 27-6-1844 A.D.

Banquet was given to European officers in the Palace. Rs. 2,862/- were spent on Fireworks. Details are mentioned.

---

**अ. नं. २८९** **श्री**

ता. ९ नोव्हेंबर, इसवी सन १८४४

लाटसाहेब, गव्हर्नर जनरल यांजकडून खलिता : श्रीमंत महाराज राजराजेश्वर सवाई तुकोजीराव होळकर यांचे नांवें : आपले मेहरबानीचे पत्र ता.५ जुलाई सन १८४४ इसवीचे. त्यांत खबर, मजमून कीं, महाराज खंडेराव होळकर यांचे कैलासवासाची साहेब रेसिडेंट इंदूर यांचे मार्फत मालूम जहाली. त्यांत आणखीन मजमून होता कीं, कांहीं दिवसानंतर त्यांची क्रिया वगैरे केल्यावर व गम रंज होऊन गेल्यावर. तुमचें नसीब थोर, चांगले, तुम्हांस सरकार इंग्रज यांचे मेहरबानीनें चांगला योग पाहून रेसिडेंट इंदूर यांनीं उत्तम मुहूर्तावर गादीवर बसविलें व इंग्रज बहादुराकडील खिल्लत, वस्त्रें दिली. तुम्ही गादीवर बसून सर्व रयतीचे आराम व खातर ठेवणें मंजूर केलें, म्हणोन तुमचें खत आल्यावरून सारा हाल जाहीर झाला ऐसीयास.

१ महाराज खंडेराव यांची खबर ऐकून आमचे तबियतीस वाईट वाटलें कीं कमउमर असून ही गोष्ट जाहली. फार ताजूब आफसोस आहे व उम्मरही जवानींत आली नाही, ही गोष्ट मनांत येऊन दुःख झालें कीं, दुनियास त्यांनीं पाहिलें नाहीं आणि दुनियानीं त्यांस पाहिले नाहीं. असेवरून वाईट वाटलें. त्या गोष्टी आम्ही लिहूं शकत नाहीं. यामुळें गादी खाली होऊन, ऐसा कोणी सरकारचे घरांत नाहीं कीं, त्याजला गोदींत घ्यावे, सबब नबाब गव्हर्नर जनरलसाहेब बहादूर यांचे विचारांत असें आलें कीं :

१ या रियासतीचा बंदोबस्त करणें बहुत जरुर आहे, असें समजून गव्हर्नरसाहेबांनीं तजवीज केली कीं, सरदार, रयत, वगैरे लोकांस फायदा व सुख मिळोन रियासतीची इज्जत

व हुकमत बनली राहवी. याबद्दल रेसिडेंट साहेबांस इशारा तुम्हास गादीवर बसविणेचा केला व आम्हास खूप यकीन आहे कीं, तुम्ही आखत्यार हांसील होण्याची कदर समजून रियासतीचा कारभार चालविणेंत चांगलें चलण, आपले इज्जत मरातबाचे लायक बहुत कोशीस दिलापासून करावी. जेव्हां तुम्ही हुशार होऊन भलें वाईट समजाल, तेव्हां तुम्हांस रियासतीचा आखत्यार दिला जाईल. हें तुम्ही खचित समजावें की ही रियासत तुम्हास आमचे सरकारांतून दिली आहे. ही वंशपरंपरा, पुस्तदरपुस्त तुमचे अवलादिचे बेटे, खरेपणाचे होतील, त्यांजला हमेशा जारी बरकरार राहील. जोंपर्यंत तुम्ही हुशार न व्हाल तोपावेतों रियासतीचें काम हल्लीं होत आहे, त्याप्रमाणें तुमचेकडून नायब जे साहेब रेसिडेंटाचे हुकमांत आहे ते साहेबाचे सल्लेनें रियासतीचें काम करतील व साहेब रेसिडेंट तुमचे तालीमी (शिक्षणा) करितां अशी तजवीज करतील कीं, तुम्ही रियासत सांभाळण्याचे लियाकतीचे व्हाल व कौलकरार रियासतवाले यांसी महाराज हरीराव कैलासवासी कायम होते तोपावेतों चालत आले त्याप्रमाणेंच कायम राहतील. आपण आपले खुशखबरीचे चाहनेवाले समजावें. ता. ९ नोव्हेंबर सन १८४४ इसवी.

सही इंग्रजी लाटसाहेबाची.

दाखल तारीख १ जानेवारी सन १८४५ इसवी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 289 — 9-11-1844 A.D.

Kharita from the Viceroy of India to Shreemant Maharaja Tukojee Rao Holkar II :

(i) Regret is felt for the premature death of Maharaja Khanderao.

(ii) Your Highness is installed on the Gadi by the British Government. The grant is hereditary.

(iii) The present official arrangement will continue till your Highness education is completed.

---

**अ. नं. २९०** **श्री**

मुलकी नंबर १५८ — ता. २ जानेवारी, इसवी सन १८४५

राजोजीराव फणसे यांजकडूनः सदाशिव रामचंद्र खज्यांची यांस. विशेषः शहर इंदूर येथील ‘विद्याखातें’, पाठशाळेत विद्या पठविणार गुरुलोक वगैरे आहेत. त्यांचा पगार माहे डिसेंबर सन १८४४ इसवीचा एकमाही द्यावयाचा रुपये –

२५ नरसिंह शास्त्री — ५० सेवाराम सिंधाती.

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | आनंदराव बाळाजी दक्षिणी पढविणारे | २५ | हसनअली, फारसी पढविणारे. |
| | | १५ | श्रीधर शिवराम इंग्रजी पढविणारे. |
| २९ | किरकोळ. १० दप्तर खर्च : | २५ | प्रत, 'नांव लागले नाहीं,' रांगडी पढविणारे. |
| | ५ भिवाभट पाणक्या, | ...... | |
| | ५ रमजानखां भिस्ती, | ११५ | |
| | ५ रामा कामाठी, ४ जीवन भंगी | | |
| ....... | | ....... | |
| ७९ | | ११५ | |

येकुण रुपये १९४ एकशें चौऱ्याण्णव रुपये हल्लीं शिक्का पोतापैकीं द्यावयाचे ठरून मेहरबान बडेसाहेब बहादुर यांजकडे तारीख ३१ माहे डिसेंबरचे वर्दीबरोबर यादी जाऊन तिकडून मंजुरीशेरा आल्यावरून ही वरात तुम्हास लिहिली आहे. तरी पाठशाळेकडे सदरहू रुपये आनंदराव बाळाजीचे विद्यमानें देऊन पावती घेऊन, ऐवज खजिन्याचे वर्दीस खर्ची लिहिणें. ता.२ जानेवारी सन १८४५ इ. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

**सरकारी रेकार्ड**

No. 290 2-1-1845 A.D.

The Treasury Officer is ordered by Rajojirao Phanse to pay Rs. 194/- for salary and expenditure of the Indore School for the month of December 1844. The expenditure was first sanctioned by the Resident.

---

## अ. नं. २९१ श्री

ता. ७ जानेवारी, इसवी सन १८४५

१ जानेवारीस खलिता आला त्याचें उत्तर श्रीमंत कृष्णामासाहेबांकडून लाटसाहेबांस. महाराज खंडेराव होळकर कैलासवासी झाले बद्दल रंज, तसेच रियासतीची इज्जत, कदर राहणेकरितां आपण इंदूर रेसिडेंट साहेबांस तुकोजी होळकरांस गादीवर बसविण्याचा इशारा केला व महाराजांस शिक्षण व राज्यकारभार संबंधात व ही रियासत पुस्तदरपुस्त महाराजांचे खुद्द पोटचे खरेपणाचें पुत्र होतील त्यांजकरितां हमेशा जारी राहील. जोपर्यंत महाराज हुशार होणार नाहींत तोपावेतों, रेसिडेंटसाहेबाचे सल्लेनीं काम पाहणें, इतर रियासतीचे संस्थानिकांसीं, सरदारांशीं, कंपनी सरकारशीं कौलकरार जाहलेप्रमाणें जारी राहातील. म्हणोन वगैरे मजमुनी ता.१ जानेवारी सन १८४५ चा खलिता चांगले वेळीं, सुशफिक मेहरबान राबर्ट नार्थकोली हामीलटनसाहेब रेसिडेंट इंदूर यांचे विद्यमानें प्रविष्ट जाहला. मजकुर समजून

आमचे दिलांत खात्री व खुशी जाहली. आपण लिहिलें कीं, गव्हर्नर जनरल साहेबांचे तजविजींत असें आलें कीं, बंदोबस्त असा केला पाहिजे कीं, ज्यांत सरदार लोकांचा फायदा व रैयतीचा व रियासतीची इज्जतआबरु व महाराज हरीराव होळकर यांचे इलाख्याचे लोकांचे मर्जीमाफिक बंदोबस्त व्हावा म्हणोन लिहिलें. त्यास या गादीवर पहिले बसलेले होळकरांची व सरकार कंपनीसी दोस्ती बहुत मजबूत होती त्याहीपेक्षां जादा, रयत, सरदार, राजी राखणेची कदर व तसल्ली ठेवणें आम्हास व महाराजांस मंजूर आहे. दुसरें आपण लिहिलें कीं, महाराजांस मगदूरभर कदर, मुखत्यारी, ते हुशार झाल्यावर मिळेल. हा सल्ला आपण चांगला दिला हें महाराजांचे फायद्याचेंच आहे. ईश्वरापासी हेंच मागणें आहे कीं, 'महाराज चांगले चलणानें चालोत, अशी बुद्धी द्यावी.' शिवाय आपण गादीचा हक्क पुस्तदरपुस्त महाराजांचे अवलादीकरितां हक्क राहील. ही आपण मेहरबानी केल्यानें सर्व जगतांत कंपनी सरकारची नेकनामी राहील. सरकार कंपनी हमेश आपले दोस्तीची जागृती ठेवितात. त्यामुळें रियासतीचे महाराज कमउमर आहे तोंपावेतों रेसिडेंटसाहेब आपलेपणानीं निगराणी ठेवतील. आम्हीही रेसिडेंटसाहेबांचे सल्ल्याबाहेर नाहीं. महाराज अधिकार प्राप्त होईपर्यंत, शिक्षण वगैरे आपले सुचनेप्रमाणें करतील व वर्तणूक ठेवतील. आपण हमेश खैरआलफियतीचे पत्र पाठवीत असावें. ता. ७ जानेवारी सन १८४५ इसवी.

**सरकारी रेकार्ड**

No. 291 7-1-1845 A.D.

In reply to the Viceroy's Khalita, Shreemant Krishana Masaheb expresses her entire agreement to the details thereof, and prays to God to bless the young Maharaja with a righteous will.

---

**अ. नं. २९२** **श्री**

ता. १२ जानेवारी, इसवी सन १८४५

दफाते श्रीमंत होळकर सरकार :चिरंजीव राजश्री गणपतराव फणसे यांसी प्रती कृष्णाबाई होळकर आशीर्वाद. उपरी तुम्ही ता.११ जानेवारीची वर्दी व पत्र पाठविलें ते पावले. लिहिला मजकुर समजला. शहरांत व सरकारवाड्याची चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त दुरुस्त आहे, म्हणोन लिहिलें. पेशजी शहरचा व वाड्याचा बंदोबस्त गुदस्तअन्वयें हुशारीनें ठेऊन तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. रवाना ता.१२ जानेवारी सन १८४५ इसवी. बहुत काय लिहिणें हा आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 292 12-1-1845 A.D.

Srimant Krishnabai Masaheb Holkar orders Ganpatrao Phanse to keep the Palace and the city under proper guard and watch as before, and to keep regular correspondence under Her Highness service.

---

**अ. नं. २९३** **श्री**

मुलकी नंबर २०९, ता. १९ मार्च, इसवी सन १८४५

राजश्री सदाशिव रामचंद्र निसबत हुजूर खजाना गोसावी यांस अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित वजारत माहसवाई सरखेल राजोजीराव फणसे रावबहादूर रामराम विनंती उपरि. दरखदार वगैरे मंडळीकडे जिल्हेज ताा सफर अखेर तीनमाही दरमहा द्यावयाचा. याद पोतनिसाकडील रुपये :

१५०० रामराम नारायण दिवाण दरमहा रुपये ५०० प्रमाणें

६०० बळवंतराव मल्हार हुजूर फडणीस दरमहा रुपये २००

६०० गिरमाजी त्रिंबक हुजूर चिटणीस '' '' २००

७५ नागो बापूजी हुजूर शिक्केनवीस '' '' २५

३०० पोते जामदारखाना. ६० व्यंकट महादेव दरमहा रु.२०, ९० नारो बल्लाळ कारकून, १५० सदाशिवराव खजांची.

६०० हुजूर पागनीस ३०० दाजी रघुनाथ दरमहा रु.१०० व ३०० अमृतराव रघुनाथ दरमहा रु.१००

१२० रामराव भगवंत निसबत दिवाण दरमहा रु.६० प्रमाणें.

४७५ चिटणीसी दप्तरकडील कारकून :

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | सदाशिव गोविंद एकमाही. | २०० | विठ्ठल हरी माहे दोन दर १०० |
| २५ | शामराव कृष्ण माहे एक. | ७५ | श्रीपत चिमाजी तीन माह दर २५ |
| ७५ | रामचंद्र सखाराम तीन माह दर २५ | ५० | धोंडो हरबाजी तीन माहे. |

........ ........

४२७० ४७५

येकुण चार हजार दोनशें सत्तर रुपये हल्लीं शिक्का पोत्यापैकीं द्यावयाचे ठरून मेहरबान बडेसाहेब बहादुर यांजकडे यादी जाऊन, तिकडून रुपये द्यावे म्हणोन ता.१८ मार्च सन १८४५ इसवीचा शेरा होऊन आल्यावरून, हा हुकूम लिहिला जातो कीं, सदरहू बेचाळीसशें सत्तर रुपये हल्लीं शिक्का दरखदार वगैरे मंडळीकडे देऊन पावत्या घेऊन खजिन्याचे वर्दीत खर्ची लिहिणें. रवाना तारीख १९ माहे मार्च सन १८४५ इसवी. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 293 19-3-1845 A.D.

Sawai Sarkhel Rajojirao Phanse sends a bill of Rs. 4,270/- to the Huzur Treasury for payment to various officers and clerks. under the sanction of the Resident.

---

**अ. नं. २९४** **श्री**

ता. ३ जुलाई, इसवी सन १८४५

दफाते श्रीमंत होळकर सरकार. राजश्री भाऊ बिन बाबाजी आजे पाराजी होळकर वाफगांवकर, यांचे कनिष्ठ चिरंजीव मल्हारजी होळकर श्रीमंत मातोश्री कृष्णाबाई होळकर यांचे मांडीवर यथाशास्त्र दत्तविधान करून, आषाढ शुद्ध १२ गुरुवारीं गादीवर स्थापना करून यशवंतराव सुत तुकोजी होळकर नांव चालविलें. सबब मशारनिल्हे भाऊ होळकर यांचे चालविणें सरकारांत आवश्य जाणोन, मौजे ललेंडी परगणे इंदूर देह १ हा गांव इनामी दरोबस्त हकदार, सायरजकात, इनामदार, खेरीजकरून बाकी सरकारी अंमल दरोबस्त, जल, तरू , तृण, काष्ठ, पाषाण, निधीनिक्षेपसुद्धां वंशपरंपरा चालविणें साल मजकुर संमत १९०१ पासोन इनामी जागीर देण्याचा ठराव सन १२५४ फसली आषाढ मास.

**सरकारी रेकार्ड**

No. 294 3-7-1845 A.D.

Malharji son of Bhow Holkar Wafgaonkar was adopted by Shreemant Krishna Masaheb. He is named Tukojee Holkar son of Yeshwantrao. Mauza Lalendi (Pargana Indore) is granted hereditarily to Bhow Holkar as the Sarkar looks upon it as its duty to maintiain the dignity.

---

**अ. नं. २९५** **श्री**

आगस्ट, इसवी सन १८४५

यादी. चौथे मजल्यावरील नगदी शिल्लकीचा झाडा. इस्तकबील छ.११ माहे जिलकाद १२५५ ते माहे साबान अखेर जमा बरहुकुम मोजदाद, विद्यमान ईडनसाहेब बहादूर.

येकुण रुपये १३,१६,५४५-८-०

| | | |
|---|---|---|
| पैकीं वजा ताईसाहेबांकडे दिले, | रुपये, | ३३,०००-०-० |
| पैकीं दौलतीकडे खर्चास घेतले, | रुपये, | ९,७२,५८३-०-० |

बाळाजी नाईक यांजकडे हुंड्याखरीदी बद्दल रुपये १,५०,०००-०-०

येकुण शिल्लक चौथा मजला रु.४,६०,९६२-८-०

**सरकारी रेकॉर्ड**

No. 295 — August, 1845 A.D.

Rs. 13 lacs and odd were counted out of which, net cash in the treasury comes to 4 lacs and odd, after deducting various items marked in detail.

---

## अ. नं. २९६ — श्री म्हाळसाकांत

शिक्का — नंबर १५६, ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १८४५

वेदमूर्ती राजश्री गरीबदास बिन उमेदराम ब्राह्मण सनाड्य पुजारी छत्री आलमपूर वास्तव्य आलमपूर स्वामींचे सेवेसीं सेवक तुकोजीराव होळकर दंडवत संमत १९०२ चे साली तुम्ही हुजूर इंदूर मुक्कामीं येऊन अर्जी दिली कीं, आम्हांस प्रपंच निर्वाहास्तव सरकारांतून तालुके मजकुर येथील गांवगन्ना जमीन बिघे पासष्ट ६५ आहे. हल्लीं बंद आहे त्यास सरकारानीं कृपा करून चालविली पाहिजे. म्हणोन त्यावरून हुजूर चौकशी करितां तुमचे वडील उमेदराम यांजला संमत १८३९ चे सालीं श्रीमंत कै. थोरले सुभेदारसाहेबांची छत्रीची पूजा सांगोन प्रपंच निर्वाहास जमीन लावून दिली. कागदपत्र संमत १८७५ चे सालीं मार्गात लुटले गेले. मागील कागद राहिले नाहींत. सदरहू जमीन चालत आल्याप्रमाणें चालविण्याविषयीं श्रीमंत कै. दुसरें मल्हारराव महाराजांनीं सन १२२८ फसलीचे सालीं पत्र करून दिलें ते पाहण्यांत येऊन महाली दाखला पाहतां जमीन तुम्हाकडे चालत आलेप्रमाणें.

२५ बिघे, मौजे नवगांव, तालुके सालवण.

२५ बिघे, मौजे टालमा.

१५ बिघे, मौजे गलगेपुर, तालुके आलमपूर.

.....

६५

येकुण पासष्ट बिघे जमीन चालत आल्याप्रमाणें तुम्हाकडे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा चालवावयाची ठरून हे सनद सादर केली आहे. तरी तुम्ही सदरहू पासष्ट बिघे जमिनीचा अनुभव वंशपरंपरा घेत जाऊन कैलासवासीचे छत्रीची पूजा यथासांग करीत जाऊन

सरकार दौलतीचें अभीष्टचिंतन करीत जाणें. जाणिजे. ता. २९ माहे नोव्हेंबर इसवी सन १८४५. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 296 | 29-11-1845 A.D.

Maharaja Tukojeerao renews the grant of 65 Bighas of land to Garibdas Umedram hereditarily. Details are mentioned in the Sanad. The grantee is to worship the idol of the late Subhedar Malharrao Holkar I, and to pray for the welfare of the State.

---

**अ. नं. २९७** **श्री**

नंबर १४५, ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १८४५

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांजकडून. वे. धनीराम बिन महाराजभट सनावद, आलमपूर यांस. विशेष. संमत १९०२ तुम्ही इंदूर मुक्कामीं येऊन अर्जी दिली कीं, आम्ही अपंग पायाने पंगू , जाणोन सरकारांतून मौजे धनपिंपरी ताो सालवण येथें पंधरा बिघे जमीन दिली, ती हल्लीं बंद आहे. सरकारांनीं चालविली पाहिजे. म्हणोन त्यावरून चौकशी करितां, ब्राह्मण आपंग जाणोन पंधरा बिघे जमीन रावजी त्रिंबक यांचे पत्रावरून मामलेदार रामराव हरी यांनीं दिली व सरकार श्रीमंत मातुश्रीसाहेबांचें ताकीदपत्र आहे व महालीं दाखला पाहतां सदरहू जमीन बिघे १५ तुम्हाकडे चालत आहे, त्याप्रमाणें वंशपरंपरा चालविणें ठरून, हे सनद सादर केली असे. तरी पंधरा बिघे जमीनीचा अनुभव वंशपरंपरा घेत जाऊन प्रपंचाचा निर्वाह करून सरकार दौलतीचें अभीष्टचिंतन करीत जावें. जाणिजे. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 297 | 29-11-1845 A.D.

Maharaja Tukojeerao renew 15 bighas of land at Mauza Dhanpimpari to Dhaniram Bhat hereditarily. The said Bhat is lame. He is to pray for the welfare of the State.

---

**अ. नं. २९८** **श्री**

नंबर १५८, ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १८४५

श्रीमंत महाराज तुकोजीराव होलकर यांजकडून : वेदमूर्ती धनसिंग बिन मेघसिंग ब्राह्मण

सनावड, वस्ती मौजे भरुडा ताो सालवण यांसी तुम्ही इंदूर मुक्कामीं हुजूर अर्जी दिली कीं, मौजे भरुडा येथे जमीन बिघे ९ धर्मार्थ आहे, ती बंद झाली. ती चालविली पाहिजे. म्हणोन चौकशी करितां संपादक तुमचे तीर्थरुपास बुंधेले यांचे अंमलांत, श्री झाडखंडी वैजनाथास प्रतिवर्षी श्री गंगेची कावड हरिद्वारहून आणून अर्पण करीत जावी याबद्दल दिली. मागील दाखला पाहून, तुमचें चालविणें ठरून हे सनद सादर केली आहे. तरी तुम्ही बिघे ९ चा अनुभव वंशपरंपरें घेत जाऊन, प्रतिवर्षी एकवेळ हरिद्वारहून श्री गंगेची कावड झाडखिंडी वैजनाथजीस अर्पण करीत जाऊन सरकार दौलतीचे अभीष्टचिंतन करीत जावें. जाणिजे. ता.२९ नोव्हेंबर इसवी सन १८४५ मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 298 29-11-1845 A.D.

Vedamurti Dhansing resident of Maruda (Taluka Salwan) is re-granted 9 Bighas of land at Maruda on condition of his submitting annually one Ganga - Kawad from Hardwar to Shree Zadkhandi Vaijanath, and offering prayers for the welfare of the State.

---

## अ. नं. २९९ श्री म्हाळसाकांत

नंबर ३४५, ता. २७ डिसेंबर, इसवी सन १८४५

वेदमूर्ती राजश्री आत्माराम बिन बापूभट द्वितीय सरस्वत वास्तव्य क्षेत्र काशी हल्लीं वस्ती आलमपूर स्वामींचे सेवेसीं सेवक तुकोजीराव होळकर दंडवत विनंती उपरि. तुम्ही संमत १९०२ चे सालीं हुजूर इंदूर मुक्कामीं येऊन अर्जी दिलीं कीं, सरकारांतोन आमचे तीर्थरुपास संस्थान बुंदी येथील ऐवजी तीनशें रुपये ३६० वर्षासन करून दिले होते. ऐवज पदरी न पडे सबब शके १७३२ (इसवी सन १८१०) चे सालीं आमचे तीर्थरूप स्वारीत येऊन श्रीमंत कैलासवासी यशवंतराव महाराजांस विनंती केल्यावरून वर्षासनऐवजी दोनशें बिघे जमीन ताो सालवण येथील गांवगन्ना करून दिली ते कागदपत्र आहेत व त्याजवर श्रीमंत हरीराव महाराज यांचें पत्र जमीन चालवणेबद्दल सन १२४४ चे सालीं करून दिले ते हजर आहे. सदरहू जमीनीपैकीं १७१ बिघे चालत आहे. ते चालविले पाहिजे. म्हणोन त्यावरून मनास आणितां, महालीहून वहिवाटीचे कागद आले ते पाहतां जमीन येणेंप्रमाणें :

१०० बिघे मौजे नवगांव. २० मौजे बारका. ५१ मौजे करहरा. येकुण एकशें एकाहत्तर बिघे जमीन चालत आहे. त्याप्रमाणें चालविण्याची ठरून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही सदरहू एकशें एकाहत्तर बिघे जमीनीचा अनुभव वंशपरंपरा घेत जाऊन त्याचे उत्पन्नांत

आपला प्रपंचनिर्वाह करून सरकार दौलतीचें आभिष्टचिंतन करीत जाणें. ताा २७ माहे डिसेंबर इसवी सन १८४५ मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 299 27-12-1845 A.D.

Maharaja Tukojeerao re-news the grant of 171 Bighas of land to Atmaram Bapu Bhatt hereditarily, Details are mentioned in the Sanad.

---

## अ. नं. ३०० श्री म्हाळसाकांत

शिक्का नंबर ३४३, ता. २७ डिसेंबर, इसवी सन १८४५

राजश्री प्यारेलाल बल्द दुर्जनसिंग जमीदार कोचकर गोसावी यांसी. स्नेहांकित तुकोजीराव होळकर रामराम सु।। सीतआर्बेन मयातेनवआलफ संमत १९०२ तुम्ही हुजूर इंदूर मुक्कामीं येऊन अर्जी दिली कीं, तो आलमपुरास जमीन इनामी बिघे ६२५ सवासहाशें बिघे आम्हांकडे आहे. ती सरकारांतून मामलेदार महालीं आहेत त्यांनीं बंद केली. त्यास कृपावंत होऊन चालविली पाहिजे. म्हणोन चौकशी करितांना मूळ जमीन संपादक कानजी हजारी त्याचे नातू तुम्ही व संपादकाचे कनिष्ठ पुत्राचा वंश सरदारसिंग हल्लीं कायम आहे. उभयतां हरदु जमीन निमेनीम वहिवाट करीत आहांत. सदरहू जमीन संपादक कानजी हजारी याजला पूर्वी राजे पृथ्वीसिंग बुंदेले यांनीं कसबे आलमपुरास तमाम जमीन दिली होती, त्याजबद्दल कागदपत्र पूर्वी संपादन केलेले राहिले नाहींत. त्यावर श्रीमंत कैलासवासी थोरले सुभेदार यांजला देवआज्ञा संमत १८२२ चे सालीं (इसवी सन १७६६) झाल्यावर सर्व आलमपूर छत्रीकडे राजे यांनीं दिले. पुढें श्रीमंत कै. तुकोजीराव होळकर सुभेदार यांनीं पूर्वीचीच वहिवाट पाहून सन ११८१ चे सालीं जमीन कसबे आलमपूर येथें पांचशें बिघे व मौजे रजरापुर येथें शंभर बिघे येकुण सवासहाशें बिघे बद्दल जमिनीच्या सनदा करून दिल्या. पुढें श्रीमंत कैलासवासी मातुश्री बाईसाहेबांनीं जमीन चालविण्याबद्दल पत्र आनंदराव दिनकर याचे नांवें दिले व त्याच अन्वयें श्रीमंत यशवंतराव महाराज यांचे पत्रसनदा आहेत त्या पाहण्यांत येऊन महाली वहिवाट पाहतां जमीन तुम्हांकडे चालत आहे :

५२१ बिघे कसबे आलमपूर १०० बिघे मौजे रजरापुरा तालुका आलमपूर.

येकुण सहाशें एकवीस बिघे जमीन चालत आहे. त्याप्रमाणें वंशपरंपरा चालविणें ठरून हे सनद सादर केली असे. तरी जमिनीचा अनुभव वंशपरंपरा घेऊन ठरावाप्रमाणें कनिष्ठ पुत्राचे वंशीचे सरदारसिंग कायम आहेत त्यांजला निम्मे जमीन व निम्मे तुम्ही घेऊन निर्वाह करीत जाणें. जाणिजे ता. २७ डिसेंबर इसवी सन १८४५.

टीप : पत्रातील तिसऱ्या ओळीत दिलेली जमीन इनामी बिघे ६२५ आहे तर वहिवाटीची जमीन येकुण ६२१ बिघे आहे. ४ बिघे जमिनीबाबत पत्रांत कांहीं खुलासा नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 300 27-12-1845 A.D.

Maharaja Tukojerao re-news the grant of 621 Bighas of land (not 625 Bighas) to Pyarelal vallad Durjansingh Jamedar. he is to share the same with Sardarsing, of the second branch of his house.

---

**अ. नं. ३०१** **श्री**

नंबर ४४२, ता. ३१ डिसेंबर, इसवी सन १८४५

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांजकडून : तपोनिधी शिवजीराम जती, रामपुरा विशेष : तुम्हांकडून तुमचे चेले यांनी हुजूर इंदूर मुक्कामीं येउन अर्जी दिली की सरकारांतून मौजे पिंपळ्याप्रताप तालुके गरोठ हा गांव चंद्रावतांपासून आम्हाकडे धर्मार्थ जहागीर आहे. त्याजबद्दल श्रीमंत कैलासवासी थोरले सुभेदार व तुकोजी सुभेदार व यशवंतराव महाराज यांनीं सनदापत्रें गांव चालविण्याबद्दल करून दिलीं ती आम्हापाशीं आहेत. त्याप्रमाणें गांव चालला आहे. त्याचप्रमाणें सरकारानींही कृपा करून आपले नांवें सनद करून दिली पाहिजे. म्हणोन त्यावरून मनास आणितां तुम्ही थोर, सत्पात्र व तुम्हास कैलासवासी यांनीं पूर्वी सनदा करून दिल्याप्रमाणें पुढेंही शिष्यपरंपरा तुम्हाकडे चालवावयाचे ठरून हें पत्रलेखन केलें आहें. तरी तुम्ही मौजे पिंपळ्याप्रताप तालुके गरोठ येथील दरोबस्त सरकारी अंमलाची वहिवाट करीत जाऊन वंशपरंपरा अनुभवीत जाऊन सरकार दौलतीचें अभीष्टचिंतन करीत जावें. रवाना ता. ३१ डिसेंबर सन १८४५. मोर्तबसुद

**सरकारी रेकार्ड**

No. 301 31-12-1845 A.D.

Maharaja Tukojeerao re-news the grant of Mauza Pimplya Pratap to Taponidhee Shiwajiram Jati disciple by disciple.

---

**अ. नं. ३०२** **श्री**

ता. २८ जानेवारी, इसवी सन १८४६

श्रीमंत गंगाजळनिर्मळ मातोश्रीसमान कृष्णाबाईसाहेब होळकर साहेबांचे सेवेसीं. आज्ञा

पालिवत राजे गोपालसिंगजी संस्थान झाबवे, रामराम विज्ञापना येथील क्षेम तागाईत माघ शुद्ध १ पावेतों साहेबांचे कृपादृष्टी करून स्वस्ती क्षेम असो विशेष. पूर्वी सरकारांतोन लग्न चिठ्ठी श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबासाहेब होळकर यांचे लग्नाची आली होती. त्यावरोन हल्लीं येथून कोठारी वैजनाथ व मिठा बोहरा उभयतां समागमें खिल्लत देऊन सेवेसीं पाठविले आहे. हे समारंभात हजर होऊन नजर प्रविष्ट करतील. त्यांस सरकारानीं मेहरनजर करून कबूल करून, उत्तरास आज्ञा केली पाहिजे. ह्या रियासतीची परवर्ष हमेशपासून सरकारांतून होत आली त्याप्रमाणें सदोदीत सांभाळ होत असला पाहिजे. कळावे बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धी निरंतर असावी. सेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना.

पैवस्त छ ८ सफर. माघशुद्ध १० सन १२५५ फसली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 302 28-1-1846 A.D.

Raja Gopalsingjee of Sansthan Zabwa acknowledges receipt of the invitation letter for the marriage ceremony of Maharaja Tukkojeerao. He acknowledges the hereditary suzerainty and protection offered by the Holkar State and sends a deputation to attend the ceremony.

---

## अ. नं. ३०३ श्री म्हाळसाकांत

ता.५ एप्रिल, इसवी सन १८४६

श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांजकडूनः सखाराम गोविंद मामलेदार परगणे रायपूर यांसी. विशेष. तुम्ही हुजूर अर्ज केला कीं, प्रगणे मजकुर येथील मामल्याचें काम संमत १९०३ चे सालापासून पांचसाला मक्त्यानें सांगितले. फौजदारी कामाचा आखत्यार सरकारानीं दिल्यास हुक्माप्रमाणें बंदोबस्त राहील. म्हणोन त्याजवरोन महालीं फौजदारी कामाचा बंदोबस्त सरकार दस्तूर माफिक जारी राहिला पाहिजे यास्तव तुम्हावर मेहरबान होऊन तुम्ही हुशार व वाकबगार जाणून फौजदारी कामाचा अखत्यार तुम्हास द्यावयाचें ठरून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही प्रगणे मजकुर येथील फौजदारी, चोरी, धाडा, पराच, डाकिणीचा बंदोबस्त व दंगा, फिसाद, बंड, फितूर, रस्तालूट वगैरे कलमांचा देहायनिहायचे पाटील व जमीनदार व चौकीदार, यांजपासून हप्तेवार महिन्यांतून चार वेळां वर्दी रिपोर्ट घेत जाऊन फौजदारीत हप्ते तयार ठेऊन हप्त्याचे हप्त्यास नक्षा हुजूर पाठवून महालीं एखादा मोठा मुकदमा जाहल्यास त्याचा बंदोबस्त तात्काळ करीत जाऊन पाटील, जमीदार यांजकडून चोरटे, बदमाश लोकांचा सुराख पत्ता लावून कसा बंदोबस्त केला याचा रिपोर्ट हुजूर करीत जाणें. हुजूर मुकदमा जाहीर होऊन फैसल्याविषयीं मुनासिब नजरेस

आल्याअन्वयें तुमचे नांवें सरकारांतून हुकूम येतील त्याप्रमाणें वर्तणूक करून महालचा बंदोबस्त बहुत हुशारीने करणें. फौजदारी कामाची गैरहुशारी व गैरतरतूद किंवा सुस्ती, गफलत ठेविल्यास मामला तुम्हाकडून दूर केला जाईल. फौजदारी कामाबद्दल १५ पंधरा रुपयेपावेतों दंड घेण्यास व कैद ठेवण्यास तुम्हांस आखत्यार दिला आहे.

मोकदमा आल्यास वादी, प्रतीवादी, वगैरे लोकांची तरफदारी किंवा रियायत न करितां कामे कायद्याप्रमाणें इनसाफ करून, आपले आखत्यारींत मुकदमा आल्यास त्याचा फैसल करून कैसा फैसल केला त्याचा रिपोर्ट मिसलीचे कागदांसह, सरकारांत पाठवीत जाणें.

वर लिहिलेंअन्वयें हुशारीने कामाचा बंदोबस्त ठेऊन दप्तरचे कामास कारकुनाची नेमणूक सरकारांतून करून देण्यांत येईल. त्याप्रमाणें त्यांजकडून दप्तरचें काम घेत जाणें. जाणिजे ता. ५ एप्रिल इसवी सन १८४६. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 303

5-4-1846 A.D.

Sakharam Govind, Mamledar Pargana Raipur is granted special permission to try criminal cases. Minute instructions are given regarding the new work, its method and manner of general execution.

---

## अ. नं. ३०४ श्री म्हाळसाकांत

ता. ८ एप्रिल, इसवी सन १८४६

राजेश्री वर्तमान भावी कमाविसदार परगणे इंदूर गोसावी अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य. स्नेहांकित तुकोजीराव होळकर दंडवत सु।। सीतआर्बेन मयातेनवआलफ. संमत १९०२. राजश्री गणेश विठ्ठल किबे यांजला बागाकरितां कसबे इंदूर येथें अहिल्यापुऱ्याकडे व मालगंजाचे पिछाडीस गौरीकुंडाजवळ सन १२२८ संमत १८७५ चे सालीं सरकारांतून बिघे १५ आडान, बिघे १२५ माळेत्रु येकुण येकशें चाळीस १४० बिघे. सदरहू येकशें चाळीस बिघे जमीन तीर्थरूप कैलासवासी महाराज मल्हारबाबांनीं बाग लावण्याकरितां मशारनिल्हेचे तीर्थरूप कै.विठ्ठल महादेव यांस देऊन सनदापत्रें करून दिली. त्याप्रमाणें जमिनीची इस्तवारी करून अनुभव घेऊन त्यांचेमागें मशारनिल्हेनीं उपभोग घेत आले. हल्लीं कस्बे इंदूर येथील बाजारचे लोकांस जागेची अडचण जाणून सरकारांतून मल्हारगंज बसविण्याचा करार ठरून, त्यांचे बागापैकीं, पश्चिमचे बाजूची जमीन बिघे ८० ऐशी, गंज बसविण्याकरितां घेण्यांत आली व बागाईत जमीन आहे तेथें बावडी, श्री गणपतीचे मंदिर बांधले ती जागा मध्यें राहून त्याचे आसपास व खुंट बाजार करून सावकारांचीं दुकाने

बांधून यशवंतगंज करावयाचे ठरून बागाईती जमिनीपैकीं बावडीचे दक्षिण बाजूस जमीन बिघे सव्वाआठ, मशारनिल्हेकडेस कायम ठेऊन बाकीची जमीन गणेशाचे काकडेस देण्यांत येऊन त्याचे मोबदला मौजे पळाशाहन्ना परगणे मजकुरपैकीं जमीन माळेती बिघे १३१।।। येक्शेपावणे बत्तीस जमीन मशारनिल्हेकडेस पूर्वी जमिनीचे मोबदल्यास द्यावयाचें ठरून हे सनद सादर केली असे. तरी तुम्हीं सदरहू येकशें पावणेबत्तीस बिघे जमीन मौजे मजकुरपैकीं लायक जिराइत व माळेत्रु मशारनिल्हेकडेस दुमाला चतुःसीमापूर्वक करून देऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा वहिवाट चालवीत जाऊन, प्रतिवर्षी नवीन पत्रांचा आक्षेप न घेतां या सनदेची प्रती लिहून ही सनद भोगवटियासीं मशारनिल्हेसी परतोन माघारी देणें. जाणिजे. ता. ८ एप्रिल इसवी सन १८४६ बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत तुकोजी होळकर |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 304 8-4-1846 A.D.

Maharaja Tukojeerao Holkar grants 131 Bighas of land in Palasha to Ganesh Vithal Kibe in exchange of land granted to the late Vitthal Mahadeo. Portion of the granted old land is acquired for the purpose of settling Yashwant Ganj. The new grant is hereditary.

---

**अ. नं. ३०५** **श्री**

ता. ८ नोव्हेंबर, इसवी सन १८४६

राजश्री माधवराव विसाजी निसबत दिवाण, गोसावी यांसी. स्नेहांकित वजारत माह सवाई सरखेल राजोजीराव फणसे रावबहादूर, रामराम विनंती उपरि. पेशजी तुम्हांकडून पत्र आलें त्याचे जबाब रवाना झालेच आहेत. हल्लीं इकडील मजकुर, राजश्री नबाब गोषमहमदखां जावरेवाले, सरकारचे स्वारींत गंगराड मुक्कामापासून आजलग आहेत. हल्लीं त्यांचे घरगुती कामामुळें जाण्याची जलदी त्यांजला व त्यांजला टोंकेस ही जाणेची जरुरत विशेष. कराराप्रमाणें सरकार स्वारींत आले व या मुक्कामीं (देपालपुरास) राहिलेच होते. यास्तव त्यांनीं मातोश्रीसाहेबांपाशीं रुकसत मागितली. मातोश्रीसाहेबांनींही काम जरुरी समजून रुकसत देणें मंजूर करून नबाब याजला पांच वस्त्रें महमुद्या २ किनखाप १ शालजोडी १ पागोटें १ येणेंप्रमाणें वस्त्रें आजचे तारखेस त्यांस देऊन सरकारांतून रुकसत जाहली.

१ नबाबांनीं विनंती केली कीं, सोन्याची छडी सरकारांतून द्यावी, छडी मजपाशीं तयार आहे, सरकारानीं आपले हुजूर मजला दिली म्हणजे, सरकारांतून मिळाली असे होऊन

यांत सरकारचा लौकिक आहे व आजपावेतों परवर्ष सरकारचीच आहे. असें म्हणोन नबाबांनीं आपले येथील छडी सोन्याचांदीची, आपले येथील सरकारचे समक्ष ठेऊन '' विनंती केली कीं, आपले हातें चोपदारास द्यावी यात माझें भूषण आहे.'' असा अर्ज केल्यावरून मातोश्रीसाहेबांनीं व महाराजांनीं मंजूर केला. त्यांजला हल्लीं सासुरवाडीस टोंक नबाबांकडे जाणे आहे. उदईक नबाब हे कूच करून जातील.

१ नबाबांपाशीं घोडे चांगले आहेत. दोन घोडे महाराजसाहेबांचे स्वारीस घेण्याची महाराजांची मर्जी दिसली. त्याप्रमाणें नबाबांनींही कबूल करून एक घोडा पंचकल्याण, कुमेदरंगाचा तर आजच महाराजसाहेबांस त्यांनीं दिला. घोडा बहुतच नामी आहे व महाराजसाहेबही आजच त्यावर स्वार झाले. दुसरा घोडाही पाठवून देतील. याप्रमाणें सर्व मजकुर जमल्याचा इतल्ला, मेहरबान बडेसाहेब बहादुरांस द्यावा व महाराजसाहेबांचा सलाम बहुत बहुत सांगून खैरआफियत मातोश्रीसाहेबांकडून विचारावी व आमचाही सलाम बहुत बहुत साहेब बहादुरजीस सांगून, पत्राचें उत्तर पाठवावें. रवाना तारीख ८ नोव्हेंबर इसवी सन १८४६. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

(वरील पत्राचे उत्तर) आज्ञाधारक माधवराव विसाजी, विज्ञापना ता.१७-११-१८४६ पावेतों मुक्काम इंदूर येथें सरकार कामीं असो विशेष. सरकार आज्ञेप्रमाणें साहेबबहादुर यांस जबरेनबाबाचे छडी व घोड्याबाबत सुनावणी केली. साहेब बहादुरजीनीं 'उत्तम' म्हणोन जाब दिला तें श्रुत करीत आहें.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 305 8-11-1846 A.D.

Sarkhel Rajojirao Phanse informs Madhaorao Visajee (in the service of the Diwan) that the Nawab of Jaora attended the march of the Maharaja from Gangarad. the Nawab applied to be presented with a golden cane at the hands of the Maharaja. His request was granted. He presented an excellent horse to the Maharaja.

All this should be informed to the Resident.

In reply Madhaorao stated that the Resident was informed accordingly.

---

**अ. नं. ३०६** **श्री**

इसवी सन १८४७

यादी संस्थान देवळे प्रतापगड, झाबुवा, थांदले उमराव व केशवराव पाटण, वगैरे टाक्याचा व महालचा ऐवज कंटनजन्ट फौजेकडे खर्च लागला, त्याजबद्दल खर्चहिशेब

इस्तकबील ता.१ आक्टोबर सन १८४५ संमत १९०२ तागाईत माहे सप्टेंबर सन १८४७ संमत १९०४.

५४,०५६-१५-० बाकी ता.१ आक्टोबर सन १८४५ सप्टेंबर अखेर निघाली हल्लीं शिक्का.ती पेशजी दरबारांत पाठविली गेली.

२,३३,७७४-०-० जमा येकंदर सप्टेंबर सन १८४७ अखेर.

१,१६,८८७ किस्त, संमत १९०२ चे सालची. ५८,८८७ देवळे प्रतापगड, २८,००० थांदले पेटलावद पैकीं टाकेदार, ३०,००० केशवराय पाटण.

१,१६,८८७ किस्त संमत १९०३ तपशील वरप्रमाणें.

...............

२,३३,७७४

.....................

२,८७,८३०-१५-०

पैकीं वजा खर्च.

२,२६,३२० तनखा फौजेची माहे आक्टोबर सन १८४५ ता.सप्टेंबर १८४७ मुदत मास २४

१,५५७ टाका बखतगड सेलानी संमत १९०२, १९०३ दोनसाला.

४०० डॉक्टर डायरसाहेब. स्कूल महतपुरास आहे त्याचे खर्चाबद्दल तनखा जून १८४७ ते नोव्हेंबर १८४७ अखेर.

६२ कप्तान इडनसाहेब मार्फत, हत्ती, उंट व नवीन शिपायानिसबत.

१०४००-८-८ खर्च कंटन्जंट फौजेकडे, बैल खरेदी ५३१-९-०, बारुद व कुपी १००-१०-३, फौज. ले. गव्हर्नर ५०००, इंदूर मुक्कामी आले जाफत खर्च. ६८, कारतूस परंतालें खरीदी. महतपूर येथील मैदान साफ करविलें. ३३-२-१, तोफखाना मरामत, १००-४-६, जेलची मरामत, ५२-१३-७ व अस्पताल मरामत २७-८-०, घंटा नवा करविला १२६-१-११ व बंगला मरामत, तनखा कप्तान हरीस साहेब ६००, व मुनसी इलाहिबक्ष १५०, आबाजी रामचंद्र, ७५ व तोफखाना मैदान साफ करविलें ३५३५-७-४, मार्फत टाफ्रेसाहेब.

.....................

२,३८,७३९-८-८

बाकी रुपये ४९०९१-६-४

**सरकारी रेकार्ड**

No. 306 1847 A.D.

Income - Sheet of the tributes received from Deole Pratapgad, Zabwa, Thandale and Keshwaray Patan Rs. 2,87,830/-

Expenditure incurred on teh Contingent force Rs. 2,38,739/- Deatails are marked in the paper.

---

**अ. नं. ३०७** **श्री**

ता. २४ जानेवारी, इसवी सन १८४८

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>अहिल्याबाई कारकीर्द, कृष्णाबाई होळकर |
|---|

चिरंजीव गंगाभागिरथी भीमाबाई बुळे यांसी कृष्णाबाई होळकर अनेक आशीर्वाद उपरि. येथील कुशल ताा छ १५ मोहरमपावेतों यथास्तित असो विशेष. तुम्ही शुद्ध मितीचें पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव चिमाजी अप्पा यांजला श्री रामकृपेकरून शुद्ध ९ स मागील सहा घटका रात्रींस पुत्ररत्न प्राप्त जाहलें. तत्प्रीत्यर्थ शर्करा राजश्री रामराव व्यंकटेश यांज समागमें पाठविली, म्हणोन मजकुर पत्रीं लिहिला तो अवगत होऊन पुत्र झाल्याचें ऐकून बहुत आनंद जाहला. शर्करा तुमचेकडून आली ती पावली. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 307 24-1-1848 A.D.

Shreemant Krishna Masaheb Holkar acknowledges the receipt of the letter and Sugar sent by Srimant Bhimabai Bulye for the joyful event of a son born to Chimajee Appa.

---

**अ. नं. ३०८** **श्री**

बारनिशी सरकारी शिक्क्याची वरून नंबर १५९, ता. २१ एप्रिल, इसवी सन १८४८

राजेश्री उमेदसिंग मुनशी वस्ताद यांचे (नांवें) विशेष. तुम्ही आम्हांस लिहिणें, पहडणें व तालीम करणें, हे बहुतसी मेहनत व कोशिशीनें शिकविलें. त्यायोगें आम्हास विद्याची ताकद दिवसेंदिवस ज्यादा होत आहे. यामुळें तुमचा हक्क व खैरख्वाही चांगले प्रकारें आमचे सरकारवर शाबीत आहे. याकरितां तुमचे चांगले कोशिसीकरितां मौजे नयाबास, वगैरे देह ५ पांच परगणे शक्करपूर जिल्हे बुलंद शहर. जागीर निसबत कै. संताबाई (थोरले

सुभेदारांची लेक) हे गांव सरकार इलाख्यापैकीं आहेत. त्या गांवचे आमदनीपैकीं दरमहा १०० शंभर रु.तुमचे परवर्षीस व तुमचे वारीसदारास वंशपरंपरे मुकरर करून हे सनद सादर केली आहे. तरी तुम्ही दरमहा रु.१०० गांवचे आमदनीपैकीं हमेशा घेत जाऊन, कुटुंबाचे खर्चास लावीत जावे आणि सरकारदौलतीस हमेश दुवा करीत जाणें. ह्या नेमणुकीस कोणी पुढेंही हरकत करणार नाहीं. ता.२१ एप्रिल सन १८४८ बहुत काय लिहिणें हे विनंती. शिक्का इंग्रजी फारशीत आहे.

**दिवाणसाहेब यांचे रेकॉर्ड**

No. 308 21-4-1848 A.D.

Umedsingh Munshee is granted hereditarily monthly amount of Rs. 100/- out of the income of 5 villages (Jagir) of the late Srimant Santabai in the United Provinces. The grant is in recognition of the excellent training the Maharaja received at the hands of the Munshee.

---

**अ. नं. ३०९** **श्री**

ता. १ आक्टोबर, इसवी सन १८४९

(भाषांतर, खलिता, इसवी सन १८४९ नंबर १३७ हामिल्टन साहेबांकडून)

श्रीमंत ताईसाहेब होळकर यांसी : कृष्णाबाईसाहेब होळकर ह्या कैलासवासी झाल्यानीं आम्हांस व सर्व प्रजा व सर्व संस्थानिकांस दुःख होत आहे. कारण त्यांचें प्रजेवरील प्रेम व आदर जसें होते त्याजबद्दल कायमची स्मृती राहील. आम्हास उमेद आहे कीं, आपणही त्यांचे लौकिकाप्रमाणें खाजगी संस्थानचें काम सांभाळतील. कारण खाजगी संस्थानचीं सूत्रें आपले हातीं ठेवण्याचें ठरल्यानें आम्ही फार खुश जाहलों. तरी दिवाणी, फौजदारी, बंदोबस्त मुकदमे यांचा अंमल दौलत व खाजगीचा एकसूत्री ठेवणें श्रेयस्कर ठरविले आहे. आपण दौलतीचे खजिन्याप्रमाणें, खाजगीचा खजिना निराळा ठेवणें व उत्पन्न व खर्चाची वर्दी राजश्री बाबा गोपाळराव (गानू) यांचेपाशीं ठेवीत जाऊन वहिवाट करावी. दिवाण खाजगी गोपाळरावबाबा पूर्वीपासून खैरख्वाह आहेत. कै. मासाहेबांचाही त्यांजवर विश्वास पूर्ण होता. गोपाळरावबाबा मार्फत काम केल्यानीं, आम्हांस खाजगीचे कामाची माहिती नेहमी मिळत जाईल व आपले खाजगीचे अधिकार मामूलप्रमाणें अंमलात आणावे.

दुसरें, खाजगीचा शिक्का आपले पूर्वजांचे नांवाचा उल्लेख करून नवीन बाबा गोपाळराव यांचे मसुद्याप्रमाणें तयार करविला आहे. तो पाहून आपणासही आनंद जाहला असेल. कारण त्यात पूर्वजांचे नांवासह आपले नांव गुंफिलें आहे.

आम्ही इंदूर संस्थानचे सुरुपासून अत्यंत हितचिंतक आहोत व आम्ही संस्थानची तरक्की होत जाईल हेच नेहमी चाहत जाऊं. फक्त तारीख १ आक्टोबर इसवी सन १८४९

(नमुना शिक्का) ''सही इंग्रजीत हामीलटनसाहेब यांची''

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर अहिल्या स्वरूप<br>कृष्णाबाई स्नुषा गौतमाबाई होळकर |
|---|

**सरकारी रेकॉर्ड**

No. 309 1-10-1849 A.D.

Shreemant Taisaheb Holkar is informed by the Residant of his great grief at the sad news of the death of Shreemant Krishna Masaheb.

The Khasgi is, henceforth, handed over to Your goodself, Rajashree Ganu is an experinced officer and is, therefore, recommended. The Khasgi treasury should be kept apart from the Daulat. A new seal is prepared, according to Ganu's recommendation.

---

**अ. नं. ३१०** **श्री**

मुलकी नंबर ६, ता. १६ आक्टोबर, इसवी सन १८४९

राजश्री प्राणनाथ पंडित कायम मुक्काम आमीन प्रा॥ थांदले पेटलावद गोसावी यांस अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य. स्नेहांकित आहिल्यान दरबार सरकार होळकर रामराम विनंती उपरि परगणे थांदले ता॥ खवाशे येथील टाक्याचा वसूलबाकीबद्दल रिपोर्ट परगणे थांदलेकर शिवराम मोरेश्वर शिरस्तेदार व पेटलावदकर, धोंडो सदाशिव दरखी आमीन यांजकडून हुजूर आल्यावरून चौकशीविशीं सरकार हुकूम ऐसा कीं,

१ चौकशीकरतां, एकंदर सालवार खवाशे येथील टाक्याबद्दल सरकाराबाकी रुपये ९०५६-९-६ येणें आहे, म्हणोन हुजूर फडणिसीकडील रिपोर्ट आल्यावरुल खवासा येथील पूर्वीप्रमाणें दरसाल ठराव रुपये २५०० होता. दरम्यान गांवची जमा कमी पडल्यावरून पांचसाला पट्टाकरून दिला. तो पट्टा येणेंप्रमाणें : संमत १८७६, रु.६०१; संमत १८७७ रु. ८०१, संमत १८७८ रु.१००१, संमत १८७९ रु.१२०१, संमत १८८० रु.१५०१

येणेंप्रमाणें पांचसाला पट्टा दिल्यावर त्यात लिहिलें कीं, पांचसाल भुक्त झाल्यावर जमापासून पट्टा करून दिला जाईल. म्हणोन नंतर संमत १८८९ चे सालीं टाक्याचा ठराव रुपये २१०० चा जाहला, तदनंतर संमत १८९० चे सालीं ठराव रुपये २२०० चा जाहला. याप्रमाणें महालचे शिरस्तेदार, दरखदाराकडे जमा खर्च असतां, ठाकूर यानें दगाबाजीने संमत १८७६ चे

पट्यांत अखेर सालीं रु.१५०१ चा आख आहें, त्याप्रमाणें इस्तमुरारी पट्टा मिळावा म्हणोन कप्तान विल्कीसाहेब यांजकडे दरखास्त दिली व सरकारचा ऐवज बाकींत ठेवीत आला.

१ आजपर्यंत वहिवाट पाहतां एक आंख कायम करून फैसला केला नाहीं. वास्तविक आख रु. २५०० चा असून त्याप्रमाणें न देतां संमत १८९० चे सालीं २२०० चा आंख ठरावून घेतला. हा फरेब ठाकूर याचा जाहीर आहे. हल्लीं कप्तान फिनवीकसाहेब यांनीं चौकशी केली ती बरोबर आहे. यास्तव टाक्याचे रुपये बाकी राहिले ते किस्तबंदीनें सरकारांत दाखल करीत जाऊन, पुढें जो बावीसशेंचा आख मुकरर आहे त्याप्रमाणें सालदरसाल सरकारचा ऐवज बिनतक्रार ठाकूर यांनीं दाखल करावा व याजबद्दल कबुलायत लिहून महालीं सालदरसाल रुपया दाखल करीत जावा.

१ ह्यावर खलेल ऐवजास करतील तर त्यांजकडे गांव राहणार नाहीं. म्हणोन आमीनाचे नावें हुकुम जारी करावा.

१ ही दरबारची तजवीज ता.१२ आक्टोबर सन १८४९ नंबर ५२३ चे कलम बडेसाहेब बहादुर यांजकडेस वर्दीत लिहिलें जाऊन, तिकडून शेरा होऊन आला कीं, (दरबारची तजवीज मंजूर आहे. म्हणोन) पंडित प्राणनाथ आमीन यांस हुकुम द्यावा कीं ज्याप्रमाणे कप्तान फिनवीकसाहेबानीं फैसला केला त्याअन्वयें वसूल करीत जाणें म्हणोन हा हुकूम तुम्हांस लिहिला जातो कीं,

दरबारची तजवीज साहेब बहादुरांस मंजूर आहे. तरी अंमल करून इतला देणें हे विनंती.

**सरकारी रेकार्ड**

No. 310      16-10-1849 A.D.

The Amin of Pargana Thandle Petalwad is ordered to see that (i) the Thakur of Khawasa represented matters falsely to Captain Wilkee.

that (ii) Matters were now represented properly to Captain Finwik who has upheld the decision of the Sarkar.

that (iii) the Thakur is now to pay past amounts due to him by instalments, and henceforth he is to pay annually Rs. 2,200/- for Taka.

---

## अ. नं. ३११      श्री म्हाळसाकांत

ता. १२ जून, इसवी सन १८५०

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर अहिल्या स्वरूप
कृष्णाबाई स्नुषा, गौतमाबाई होळकर

चिरंजीव राजश्री गंगादीन जमादार, मामलेदार प्रगणे नागलवाडी यांसी गौतमाबाई होळकर आशीर्वाद. सुरुसन इहिदेखमसेनमयातेनव आलफ. श्री कुलस्वामी कृपे चिरंजीव राजश्री तुकोजीरावबाबा होळकर यांचे लग्नाचा निश्चय ज्येष्ठ शुद्ध ६ गुरुवारीं करून शरीरसंबंध राजश्री यशवंतराव खिल्लारी साकूरकर यांचे कन्येशीं नेमस्त होऊन हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी तुम्ही तुमचे महालचे कामाचा बंदोबस्त ठेऊन लग्नसमारंभास हुजूर येणें.

जाणिजे छ १ साबान बहुत काय लिहिणें. श्री मोर्तबसुद.

१ ह्या नमुन्याप्रमाणें लग्नचिठ्ठया प्रत्येक महालीं मामलेदार, दरखदार, जमीदार, मंडलोई यांचे नांवें पाठविल्या गेल्या.

**सरकारी रेकार्ड**

No. 311 12-6-1850 A.D.

Gangadin Jamadar, Mamledar of Pargana Nagalwadi is invited for the marriage ceremony of Maharaja Tukojeerao. The marriage was to take place on the 6th day the bright half of Jeshtha. The bride was daughter to Yeshwantrao Khillari of Sakur.

Invitations were sent round to mamledars, Darakdars, Jamedars and Mandlois etc.

---

**अ. नं. ३१२** **श्री**

ता. ४ डिसेंबर, इसवी सन १८५०

साहेबांचे सेवेसीं (राजेश्री पळसीकरांस) आज्ञाधारक आबाजी बळवंत वकील रामराम विज्ञापना. येथील कुशल मार्गशीर्ष वद्य १३ भौमवासर पावेतों कृपावलोकनेंकरून कुशलरूप असों विशेष. इकडील मजकुर येणेंप्रमाणें.

१ राजश्री दिवाण व दरखदार व इंगळे व बाळकृष्ण कर्नल, वगैरे सर्व मंडळी येथें इंग्रजी तारीख २८ शनिवारीं प्रहर दिवस चहडतां मुक्काम महेश्वरीं दाखल झाली.

१ श्रीमंत महाराजसाहेबांची स्वारी भानपूर मुक्कामींहून हस्तनापुरीं, समागमें उमेदसिंग मुनशी व खुमानसिंग बक्षी व चुनीलाल व भीमगीरबाबा याप्रमाणें समागमें पांच स्वार व भवानीसिंग जमादार, असे लोक आणि स्वारी, सांडणीवर स्वार होऊन कूच करून गेले. सांडण्या सुमारी सात गेल्या. तेथें पोहचून लाटसाहेबांची मुलाखात होऊन बंदोबस्त करून यावें, अशा हेतूनें गेली आहे म्हणोन ऐकण्यांत आहे.

१ बडेसाहेब बहादुर यांजकडे दिवाण यांनीं महतपूर मुक्कामींहून पत्र रवाना केलें कीं, त्यांत सरकार स्वारीचा मजकुर लिहिला आहे.

१ दिवाण आदिकरून मंडळी दरबारांत येत असतात. एकदोन रोजांत पगार चिठ्ठा वाटणें वगैरेची सुरुवात होणार आहे,

सदरहू प्रमाणें मजकुर मनन होऊन वरकड मजकुर साबक दस्तूर आहे. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 312 4-12-1850 A.D.

Abajee Balwant Vakil informs Diwan Palshikar that,

(i) The Maharaja accompanied by Umedsing Munshee, Khumansing Baxi and others left Bhanpura for Hastinapur, on a visit to the Viceroy, and that,

(ii) Diwan, Ingle and others reached Maheshwar on the 28th ultimo.

---

## अ. नं. ३१३ श्री म्हाळसाकांत

ता. २४ फेब्रुवारी, इसवी सन १८५२

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>अहिल्यास्वरूप कृष्णाबाई स्नुषा,<br>गौतमाबाई होळकर |

वेदमूर्ती रा.सनईराम बिन रामप्रसाद व ठाकूरदास बिन सुरतराम गौड ब्राह्मण उपनाम बाकोले गोत्र कौशिक सूत्र कात्यायन शाखा माध्यंदिनी वास्तव्य श्रीक्षेत्र हरिद्वार स्वामींचे सेवेसीं. सेवक गौतमाबाई होळकर दंडवत विनंती उपरि क्षेत्र मजकुरीं आम्ही सरकारचे पुरोहित पूर्वी सरकारांतोन नेमणूक होती. ती बंद झाल्यापासून कुटुंबाचे चरितार्थास आधार नाहीं आणि क्षेत्रीं सरकारी हवेली वाडे, धर्मशाळा वगैरे मकानें आमचे सुप्रत आहेत. त्यांची डागडुजी दरसाल करावी लागते, यास्तव सरकारांतून कृपा करून कांहीं नेमणुक करून देविली पाहिजे, म्हणोन तुम्ही इंदूर मुक्कामीं हुजूर विदित केलें. त्यावरून, तुम्ही सरकारचे पुरोहित जाणोन कुटुंबाचे उदरनिर्वाहास व सरकारी मकानाचे डागदुजीस मिळोन सालिना नेमणुक हल्ली शिक्का रुपये १५० दीडशें करून देऊन हे सनद लेखन केली असे. तरी सदरहू नेमणुकीचे रुपये दीडशें तुम्हास पुत्रपौत्रादि वंशपरंपरा हुजूर खासगी जामदारखान्यांतून

मिळत जातील, ते घेऊन कुटुंबाचा निर्वाह, मकानाची डागडुजी करीत जाणें. रवाना छ.३ जमादिलावल सुरुसन खमसेन मयातेन वआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. श्री मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 313 24-2-1852 A.D.

The Khasgi Department grants Rs. 150/- annually and herediarily to Sanairam and Thakurdas Purohits of Hardwar for their maintenance, and repairs to Government buildings.

---

**अ. नं. ३१४** **श्री**

ता.८ मार्च, इसवी सन १८५२

श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांचे अधिकार समारंभाबद्दल रोजनामा : दिनचर्या.

१ फाल्गुनाचे दिवसांतच हा समारंभ असल्यानें रंग गुलाल खेळणें जाहल्यावर स्नान करून पोशाख केल्यावर देवघरांत जाऊन नित्यनेम पूजा करून, देवघरातून झोपाळ्यावर येऊन बसले. ते वेळेस रंगरावभाऊ शागीर्दपेशा, यांजला बोलावून ताकीद केली कीं, आज तिसरें प्रहरीं दरबार आहे. बिछायत करवून दरोबस्त कचेरीचे लोकांस दिवाण, दरखदार, मानकरी, कारखानदार, मामलेदार, वकील वगैरेस बोलावणें करावें. त्याजवरून सर्वांस बोलवणें जाहलें.

१ नंतर भाऊ चिटणीस यांजला बोलावून, गांवें, जमीनी, वगैरे बक्षिसीबद्दल सनदा लिहिण्याविषयीं आज्ञा जाहली. त्याप्रमाणें चिटणिसांनीं आज्ञेप्रमाणें सनदा लिहिल्या. त्यांजवर तारीख होऊन शिक्के झाले.

१ मागील तिसरें प्रहर दिवसांत दरोबस्त कचेरीवाले, सरदार दरखदार, वगैरे लोक येऊन सभामंडपात दरबार भरला. श्रीमंत सरकार गादीवर येऊन बसले. सर्वांत्रांनीं मुजरे करून मिसलेनें बसले ते येणेंप्रमाणें.

१ गादीचे उजवे बाजूस जवळ मुनशी उमेदसिंग बसले. त्यांचे जवळ रामराव नारायण दिवाण बसले. त्यांचे जवळ गणेश विठ्ठल किबे व रामचंद्रभाऊ रेशीमवाले व त्यांचे जवळ खाजगीवाले बसले व त्यांजवळ बळवंतराव मल्हार हुजूर फडणीस व चिटणीस हुजूर व पागनीस, कापडनीस, बसले होते व त्यांजपाशीं बाजूने मानकरी लोक व त्यांचे मागें रिसालदार व पागेंतील, अलीगोलचे लोक, पलटणाचे लोक, उभे होते. याप्रमाणें पूर्वदिशा जाहली.

१ गादीचे पश्चिमेस डावे बाजूस दिवाण नाहरसिंग चंद्रावत वन्नातगाशावर व त्यांचे-जवळ कोठारी शिवचंद, रतनचंद व खेमचंद बसले. त्यांचेजवळ काशीरावदादा होळकर

व खुमानसिंग बक्षी व बाळकृष्ण कर्नेल व भीमगीर बुवा व त्यांचेजवळ कारखानदार लोक वगैरे बसले. याप्रमाणें पश्चिमदिशा.

१ गादीचे मागें दक्षिण दिशेस सरकारचे हुजरे लोक उभे होते व त्यांचे मागील बाजूस मामलेदार, आमीन, जमीदार, कारकून मंडळी बसली होती. दक्षिण दिशा जाहली.

१ गादीचे उत्तरेस समोर नाच उभा होता व आणखीन रामजण्या व भांड, गवई लोक होते व त्यांचे दोन्ही बाजूस खासबरदार वगैरे लोक उभे होते. याप्रमाणें उत्तरेची मिसल झाली.

सदरहू मिसलेवार दरबारांत लोक बसल्यावर श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांजला कलकत्याहून लाटसाहेब बहादुर यांजकडून आखत्यारीबद्दल खिल्लत व खलिता आला. त्याजवरून सरकारांत बहुत खुशी होऊन, जवळचे राहणारे व हुद्देदार लोक यांजला सरकार श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांनीं बक्षिसें मेहरबानी करून दिलीं ती येणेंप्रमाणें :

१ दिवाण नाहरसिंग चंद्रावत रामपुरेकर यांजला सरकारांतून बक्षीस दिले ते येणेंप्रमाणें :

चंद्रावताचे चिरंजिवाचे नांवें इनाम गांव मौजे अंबाखेडी प्रो. अंत्री पैकींचा व रामपुरा येथील बागाबद्दल सनद करून दिली. शिवाय दागिने कंठी मोत्याची व शिरपेंच, शिरपाववस्त्रें पारचे ९ शालजोडी, मंदील, पागोटें दुपट्टा, किमखाप महमुद्या दोन, रुमाल शाल जाम्याचे, कांचा. सदरहुप्रमाणें नाहरसिंग यांजला वस्त्रें पोशाख, रकमा दिल्या.

१ मुनशी उमेदसिंगजी यांजला सरकारांतून किताब मश्रुइलदौला, राय, उमेदसिंग बहादूर. असा देऊन इनामीगांवें दोन प्राो. देपाळपूर पैकीं दिलीं.

२ मौजे गिरोता व फुलाण. ह्या दोन्ही गांवच्या सनदा करून दिल्या व दागिने : कंठी मोत्यांची, शिरपेंच, पालखी, हत्ती, घोडा, आबदागिर, चवरी, वस्त्रें सुमारी सात ७ शालजोडी, मंदील, पागोटे, दुपट्टा, किनखाप, महमुद्या २.

१ रामराव नारायण दिवाण यांजला इनाम गांव मौजे आजनोदा प्रगणे बेटमे, हा गांव रु. १,५०० चा पुस्तदरपुस्त सनद करून दिला. शिवाय दागिने : कंठा, शिरपेंच, शालजोडी, महमुद्या वगैरे.

१ काशीरावदादा होळकर यांजला सरकारनीं बक्षिस दिले तें : मौजे शिवणीचा इस्ममुरारपट्टा करून दिला दागिने : कंठी मोत्यांची, शिरपेंच जडावाचे व पोशाख वगैरे.

१ खुमानसिंग बक्षी यांस पोशाख वस्त्रें व एक कंठी.

१ रामचंद्रभाऊ रेशीमवाले यांस पोशाख वस्त्रें व एककंठी.

ह्याप्रमाणें सनदा, वस्त्रें दिल्यानंतर फुलांचे हार घातले. नंतर सर्व सरदार, दरखदार मानकरी, कारखानदार, मामलेदार, अमीर लोक, शिरस्तेदार, अखबारनविस, जमीदार, कानगो लोकांनी नजरा, भेटी केल्या. एकंदर मोहरा ३५९ व पुतळ्याताट ९२ व नक्त रुपये येणेंप्रमाणें नजरा आल्या.

नंतर आप्पासाहेब बुळे यांजकडील खिल्लत सरकारांस आली ती सरकारांनीं घेतली. कंठी १, शिरपेंच १, मंदील १, दुपट्टा १, सदरहूप्रमाणें घेऊन मग गादीवरून

उठून मातोश्रीसाहेबांकडे गेले. तेथें मुनशी उमेदसिंग व दिवाण रामराव व रामचंद्रभाऊ रेशीमवाले खुमानसिंग बक्षी, कर्नल भीमगीर व काशीरावदादा भवानीसिंग वगैरे मंडळीनीं नजरा केल्यावर सरकार घोड्यावर स्वार होऊन महालवाड्यापुढें घोडे फिरवून, मग तिसऱ्या मजल्यावर जाऊन गादीवर बसले. सर्वत्रांचे मुजरे झाले. नंतर विडे दिले. त्यानंतर दरबारचे मंडळी घरी गेले.

**सरकारी रेकार्ड**

No. 314 | 8-3-1852 A.D.

An account of the Durbar held by the Maharaja, and of the Inams, Grants etc., declared on the Maharaja's installation day.

---

## अ. नं. ३१५ श्री म्हाळसाकांत

ता. १० मे, इसवी सन १८५२

श्रीम्हाळसाकांत चरणीं तत्पर अहिल्या स्वरूप
कृष्णाबाई स्नुषा, गौतमाबाई होळकर

राजश्री गोपाळराव गोविंदराव गानू, दिवाण खाजगी, गोत्र काश्यप, सूत्र हिरण्यकेशी, शाखा तैतिर्य, उपनाम गानू पाटील मौजे कलबस्ते तालुके संगमनेर प्रांत राजापूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित गौतमाबाई होळकर दंडवत विनंती उपरि तुम्ही इंदूर मुक्कामीं विनंती केलीं कीं, आम्ही वडिलोपार्जित सरकार चाकरी करीत आलो. कुटुंब मोठे आजपरियंत सरकार पालिग्रहण करीत आलें. श्रीमंत कैलासवासी बाईसाहेबांनीं संसाराचे बेगमीस मौजे बांगरदा परगणे सावेर हा गांव इनाम देऊन, श्रीमंत तुकोजीराव सुभेदार यांनीं शके १६९८ सालीं सनदा करून दिल्या. तो कितीक दिवस चालला. दरम्यान राज्यक्रांतीचे गर्दीमुळें सरकारजप्तीत राहिला. हल्लीं सरकारांनी कृपा करोन मोकळीक गांवची करून दिल्यास कुटुंबाचा निर्वाह होईल. म्हणोन त्यावरून मनांत आणिता तुम्ही पूर्वीपासोन सरकार नोकरी निमकहलालीनें करून आजपर्यंत जें काम केलें तें ज्यांत सरकार फायदा होत राहिला. चिरंजीव खंडेराव होळकर कैलासवासी जाहले तें वख्तीं तीर्थस्वरूप कैलासवासी आत्याबाईचे आज्ञेबरहुकुम सरकारचाकरी इमानेंइतबारें अदा केली. तेव्हां तुम्ही रियासतीचे खैरख्वाह तुमचें चालविणें सरकारास बहुत जरुर जाणोन तुमचा गांव इनामी सोडून देण्याचा विचार कैलासवासी आत्याबाईनें केला होता. त्याप्रमाणें पूर्वीच्या सनदा कैलासवासींनी करून दिलेल्या हल्लीं समक्ष पाहण्यांत येऊन तुमचा इनामी गांव मौजे बांगरदा परगणे सावेर हा सरकारांत

जप्त झालेला साल मजकुर सन १२६१ फसली संमत १९०८ चे सालापासून परत संसाराचे बेगमीस इनाम जहागीर द्यावयाचा ठरून ही सनद दिली असे. तरी मौजे मजकुर हा गांव हक्कदार, इनामदार, खेरीज करून बाकी जल, तरु, निधी, निक्षेप, काष्ठ, पाषाण, थलमोड, थलभरीत, कुलबाब, कुलकानु सरकार अंमल दरोबस्त तुम्ही आपले दुमाला करून घेऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा भोगवटा घेत जाणें. रााा छ १९ रजब सुरुसन इसनेखमसेन मयातेनआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 315 10-5-1852 A.D.

Mauza Bangarda, a former grant to the Ganu (Khasgiwale) family was, for some time, resumed by Sarkar.

The same village is now hereditarily re-granted to Gopalrao Ganu by the Khasgi Durbar.

---

**अ. नं. ३१६** **श्री**

डिसेंबर, इसवी सन १८५३

श्रीमंत सरदार बुळेसाहेबांकडील चांदभाई कारभारी यांचे पत्र इंदूर वकिलास : विशेष. श्रीमंत होळकर सरकार यांचे येथें बाळंतविडा आमचे सरदारीतील शुद्ध ९ शनिवारीं बारशाचे दिवशींच जाहला. दिवाण पळसीकर यांनीं मुद्दाम सांगून पाठविलें होतें कीं :

बारशाचे दिवशीं फक्त बडेसाहेबांकडील व बुळेसाहेबांकडील बाळंतविडे होतील. वरकड दुसरें दिवशीं होतील. त्यावरून मोसमाचेच दिवशीं मे. बडेसाहेबांकडील बाळंतविडा जाहला आणि साहेबांचे मौजुदगीतच बाबासाहेब बुळे वाड्यांत दाखल होऊन बाळंतविड्याच्या किस्त्या पुढें ठेविल्या त्या :

१. महाराजसाहेबांस व ताईसाहेबांस व सौ महाराणीसाहेबांस : पोशाख : किस्त्यांत कडी, वाकीं, वगैरे दागिने. सौ. राणीसाहेबांस पैठणी वस्त्रें व बाळंतविड्याचें साहित्य. श्रीमंत बुळेसाहेबांनीं महाराजसाहेबांस व बडेसाहेबांस अत्तर पानसुपारी, हार दिले.

१ दुसरें भीमाबाई बुळे यांसी मिरके दुसरें, चौथें दिवशीं येत होतें, परंतु आलीकडे फारच येत आहे. त्यांत लुगडीं, अंगवस्त्रें फाडून टाकितात. कोणी दुसरें माणूस जवळ जाऊं शकत नाहीं. त्यास मारतात.

१ शिवाय राजश्री दिनकरराव दिवाण व बाबासाहेब आपटे निसबत श्रीमंत शिंदे सरकार हे उभयतां छावणीत आले. त्यांनींही बाळंतविडा श्रीमंत होळकर

सरकारांत आणला. दिनकरराव दिवाणास महाराजसाहेब बोलले कीं तुम्ही फार चांगली दिवाणगिरी करितां, असे उपरोधिक बोलून पानसुपारी झाल्यावर परत छावणीत गेले. वगैरे मजकूर.

**सरदार बुळे यांचे रेकार्ड**

No. 316 December, 1853 A.D.

Karbhari of sardar Bulye writes to the Indore Vakil :

(i) Balant-Vida Ceremony was performed on the 12th day of delivery in the Royal House : presents from the Residency office and Sardar Bulye were submitted on one and the same day.

(ii) Srimant Bhimabai Bulye is mentally deranged.

(iii) Balant-Vida from the Gwalior Durbar came with Rao Raje Dinkarrao and Baba Saheb Apte.

---

**अ. नं. ३१७** **श्री**

(निवाडा) संमत १९१०, इसवी सन १८५३-५४

यादी इस्तमुरार टाकेवाले यांजकडे गांवें चालतात त्यांजबद्दल; महालवार व मौजेवार, इसमवार : संमत १९१० विक्रमी :

१३५८-२-० प्रगणे इंदूर हिंमतसिंग ठाकूर बढेकर यांजकडे इस्तमुरारदेह ५ मौजे बढ्याकिमा, १ मौ. दुधा, १ मौ. मुल्या, १ मौ. आला व १ मौ. भाल्याखेडी. येकुण देह पांचबद्दल ठराव :

१६६६-०-० प्रगणे देपालपूर टाकेदाखल मिलकी गांवांबद्दल ठराव :

४८० मीर कमरुदीन पीरजादे देह २, १ सातेर, १ पेमलपूर.

५८० छबू काजी यांजकडे देह २, १ बसांद्रा, १ फुलकराड्या.

१३५ मीर कडु यांजकडे देह १ मौजे मुंदीपूर बद्दल ठराव.

४७१ जसवंतसिंग ठाकूर मौजे बिलोदा गांवाबद्दल ठराव.

......

१६६६

६७६६-०-० प्रगणे रामपुरा.

९०२ रतनचंद कोठारी देह २, १ मौजे. जनोद, १ मौ.दुधलाई.

४०१ गंगाधर शास्त्री मौजे लसुरड्या धर्मादाय इस्तमुरार.

२५२ ब्रिजलाल हरनाथ देह २, १ मौ.जोडमी, १ मौ.गुणसर.
१२५२ जोरावरसिंग ठाकूर भाटखेडीकर १ मौ. भदाण्या, १ मौ. धामण्या.
४०१ भुदेलसिंग ठाकूर यांजकडे मौजे कुन्हा देह १
१०५ अनोप भारती यांजकडे मौजे जलालपुरा.
२७५ शेराजी ठाकूर यांजकडे मौजे शेहटा.
५०१ अंताजीपंत यांजकडे मौजे बत्तीसा.
७१५ शेख हाजम यांजकडे देह दोन १ मौ.कानपुरा, १ मौ. सोमखेडी अंत्रीपैकीं
६१ आमरसिंग ठाकूर यांजकडे मौजे ढाबलाखुर्द देह १
१८०१ जोरावरसिंग ठाकूर यांजकडे मौजे खजूरी देह १
४५ ब्राह्मण जेतलीकरास धर्मादाय इस्तमुरार मौ.जेतली.
५५ फतेसिंग ठाकूर मौजे आरण्या देह १

........

६७६६ येकुण देह १७

६२९७-०-० प्रगणे मनासा, पडदा.
२९९५ भेरुसिंग ठाकूर यांजकडे देह २, १ मौजे नळवा, १ मौजे देवरी.
१८०१ फौजसिंग ठाकूर यांजकडे मालाहेडा देह एक.
१२०० बहिरुसिंग ठाकूर, मौजे डांगरी देह एक.
३०१ अजितसिंग ठाकूर यांजकडे मौजे दातोली.

.........

६२९७

३७७-०-० प्रगणे सावेर कानुगो यांजकडे देह तीन १८५ प्रतापरायाकडे, उगमखेडी. १५१ गुलाबरायाकडे मौजे सुराखेडी. ४१ भानालालाकडे, मनोरखेडी. येकुण आकार रुपये ३७७ गांवे तीन.
३९०२-०-० प्रगणे चंदवासा पैकीं मौजे कुरावण (नांव लागू नाहीं).
६००-०-० प्रगणे काठाफोड रावछत्तरसिंग यांजकडे मौजे हिरापूर देह १
९००-०-० प्रगणे हासलपूर भिमानसिंग भूमिया यांजकडे मौजे खेडी.
८१०-०-० सरकार बिजागड.
११३ मोतीसिंग ठाकूर यांजकडे मौजे इदारतपूर प्र. खरगोण.
२५ हाटेसिंग ठाकूर, मौजे भानपूरिया, प्र. खरगोण.
८१ हामीरसिंग ठाकूर, मौजे आधावड.
१८१ सालमसिंग मंडलोई, मौजे गुजारी.
१०१ हाटेसिंग मंडलोई, मौजे सेलाणी.

३०९ हमीरसिंग व दौलतसिंग रावत, मौजे दोडवा.

.........

८१०

८५७५-०-० प्रगणे गरोठ.

३११ लक्ष्मणसिंग चौधरी यांजकडे देह ६,१ चांदखेडी, १ बोरखेडी, सकरियाखेडी १,१ मौ.कंथारिया, १ मौ. कराडया, १ ढाब.

७२६ आंबादास रामचन्द्र यांजकडे मौजे बढा देह १

४०१ धीराजी ठाकूर, मौजे बणजारी.

४२५ तक्ताजी ठाकूर, मौजे डेरिया.

७५ भारु चौधरी, मौजे घट्या.

५२५१ शिवचंद कोठारी यांजकडे देह दोन, सगोरिया व खजूरी.

१३८६ लखमीचंद चौधरी देह तीन. बिसन्या, गोपाळपुर व छाबडी.

..........

८५७५

८५८२-०-० परगणे संस्थान भानपुरा.

२७७७ तालुके हवेली भानपुरा.

५०१ बापूजी नारायण, मौजे. खडावदा.

२७५ केशवरावभाऊ, मौजे मीटणखेडी.

१०१ जिवनरावजी, मौजे धावद.

३० दौलाजी ठाकूर, मौजे हामीरपूर.

५९५ दाजी गोविंद, मौजे तोरण्या.

२५ प्रतापजी ठाकूर, मौजे रायपुरिया.

५२५ भिलाजी ठाकूर, मौजे आनसर.

४२५ मेघजी ठाकूर, मौजे तसाई.

३०० भवानीसिंग ठाकूर, मौजे बडोद्या.

........

२७७७

५८०५-०-० तालुके खडावदा.

१५५२ साहेबसिंग ठाकूर देह २ रळायती १३५१, आमली २०१ मिळून.

१४०१ रावधीरतसिंग, मौजे बाळोदा.

८७५ लक्ष्मणसिंग, मौजे बरामा.

१००१ यादवराव लाड, मौजे देवरिया.

४०१ मल्हारराव बल्लाळ, मौजे दाण्याखेडी.

५७५ ठाकूरसिंग, मौजे लखमणखेडी.

........
५८०५
.................
८५८२-०-०

२४८०-०-० ताो जार्डा, कंजार्डा व जामुण्या.

३० ताो जार्डा. ठाकूर पलासीकर, मौ.पळासादेह १

२४५० ताो जामुण्या. रणजीतसिंग ठाकूर यांजकडे देह ५
१ लुबडी, १ चुकणी, १ खलेडी, १ दुर्गापुर, १ तिनसा.

.........
२४८०

५२१६-०-० प्रगणे नारायणगड विजेसिंग ठाकूराकडे देह चार.

१ कनगटी, १ खेडा, १ सुपडा, १ ककराई, येकुण देह चार.

६५८४-०-० प्राो चंदवासाबद्दल ठराव.

२७५ खुमानसिंग ठाकूर हताई देह १

१८२९ गिरवरसिंग ठाकूर बघुणेकर देह तीन. १ बघुण्या, १ दसरिया व मौजे घड्या.

२४७८ देवीसिंग जमीदार देह तीन, १ पिछला, १ घटया, १ गरदा.

५०१ जमीदार प्रगणे मजकुराकडे मौ. आकली देह १

१५०१ बापू होळकर यांजकडे मौ. बर्ड्या देह १

.........
६५८४

३७२-०-० प्राो सुनेल कोठडी.

१५१ देवीसिंग, नाथाजी मौजे नानगांव.

१५१ भगाजी व सुरजमल मौ, गुलदी देह १

३५ गोदडजी कानगो मौ. भटखेडा.

३५ कसबेकर मंडलोईकडे मौ. चंद्रपुरा.

........
३७२

५८०-०-० प्राो चिखलदे. बरहु।। ठराव.

४५० राजे जालमसिंग यांजकडे मौजे दहीपलवाडा देह.

१३० हाटेसिंग बरखेडा भुमिया यांजकडे देह ७ सात. १ उखलदा, १ उमरवणछोटी, १ जामण्या, १ सोंदुल, १ कछादड, १ कलालद व १ चौकी.

......
५८०

१२०९२-०-० प्रां जिरापूर, माचलपूर, बरहुा ठराव.

१७५० ठाकूर सुरजमल गांगुरणीकर देह चोवीस २४
२६११ गोपालसिंग यांजकडे देह ११
२१६५ सौभागसिंग ठाकूर यांजकडे झाडमहू वगैरे देह ९
६७१ समुद्रसिंग रुपखेडेकर देह तीन.
८०५ सोहनसिंग ठाकूर बागपुरा देह २
५२१ भीमसिंग ठाकूर खाडाखेडेकर देह २
३६१ रामसिंग ठाकूर मौ. सिरपोई देह १
३६१ गोपालसिंग ठाकूर मौ. आरण्या देह १
४१३ ठाकूर लक्ष्मणपुरकर. देह १

.........

९६५८

३१९६ प्रगणे माचलपूर पैकीं.

१२७५ गुलाबसिंग ठाकूर मौजे रामगड देह १
२९५ बुरलसिंग ठाकूर मौजे राजपूर देह १
२५१ रोडसिंग ठाकूर मौजे मेवड्या देह १
१३७५ ढोकलसिंग ठाकूर मौजे लखोनी देह १
जिरापूर, माचलपूर मिळून देह ५८

.........

३१९६

.........

१२०९२

२५००-०-० प्रगणे संधारा राजसिंग ठाकूर मौजे ढाबळा देह १

१५८४७-०-० प्रगणे थांदले, पेटलावद व राजे गोपाळसिंग झाबवेकराकडून :

४२२२ राजे गोपाळसिंग झाबवेवाले यांजकडोन देह ३६ बद्दल.

२२२१-१२-० तालुके खवासा देह १२
४३८-००-० तालुके काल्यापिटोल देह ६
४१७-०-० तालुके सुरोड्या देह ६
११४५-४-० तालुके कल्याणपुरा देह १२

..............

४२२२-०-०

३१०१ तालुके झकणावदा देह १५ बख्तावरसिंग ठाकूर.
१४८० '' उमरकोट देह ९ उमेदसिंग ठाकूर.
११९३ '' करवड देह ८ तेजसिंग ठाकूर.

| | | |
|---|---|---|
| ९९६ | '' | जामली देह १२ बेरीसाल ठाकूर. |
| ९६६ | '' | सारंगी देह ५ ठाकूर मोहनसिंग. |
| १०६५ | '' | रायपुरा देह ६ ठाकूर पिरथीसिंग. |
| ५२४ | '' | बडबेल देह ३ ओंकारसिंग ठाकूर. |
| १२२ | | देह १ ठाकूर गोपाळसिंग. |
| १०३ | | मौजे कोदली, मोतीसिंग ठाकूर. |
| १९३ | | तालुके नवगांव, भवानीसिंग ठाकूर देह २ |
| १५८ | | मौजे उदेपुरा, ठाकूर देवीसिंग देह १ |
| ५८३ | | प्रतापसिंग ठाकूर यांजकडे देह ५ |
| ११४१ | | तालुके पाराबोरी देह १२ |

....................

१५८४७-०-०

...............

८५५०४-२-० येकुण देह ११६

येणेंप्रमाणें इस्तमुरार गांवांचा ठराव असे फक्त. फसली १२६३

**सरकारी रेकॉर्ड**

No. 317 1853-54 A.D.

A full list of Istamurardaars, with their grants (of villages) and the Takas.

---

## अ. नं. ३१८ श्री म्हाळसाकांत

ता. १९ जुलाई, इसवी सन १८५५

राजश्री आबासाहेब गोसावी यांसी. स्नेहांकित तुकोजीराव होळकर रामराम विनंती उपरि. येथील कुशल तागाइत शुद्ध ५ पावेतों मुक्काम महेश्वर येथें यथास्थित असो. विशेष.

१ आपण बडेसाहेब बहादुरजीकडे जाल तेव्हां आमच्याकडून फारफार सलाम सांगून मिजाजाची खबर पुसावी व साहेबबहादुरांचा पाय आतां कसा आहे हेही विचारून लिहिणें.

१ मेहरबान बडेसाहेबांस थांदल्याबद्दल कैफियत लिहिणें आहे. त्यांस त्यांजकडून मसोदा देण्याबद्दल स्मरण द्यावे, म्हणजे ते मसोदा देतील तो इकडेस पाठवून देणें. आणखीन साहेबजीस हेही सांगणे कीं, आम्ही हा मुकदमा आपले स्वाधीन केला आहे. पाहिजे तसे करणें व ज्यात सरकारची नुकसानी न होईल ते करतील. सर्व संस्थानची इभ्रत ठेवणें आपले हाती आहे. शिवाय हेही सुचवावे की प्रतिवादीने हे न समजावे कीं, आम्ही होळकर

सरकारास शिकस्त दिली. याप्रमाणें त्यांचे मनात गोष्ट न ये तें करतील. बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 318 19-7-1855 A.D.

Maharaja Tukojeerao asks Abasaheb to see the Resident, and request him to prepare the note connected with Thandala. Delicate instructions are hinted with the message.

---

**अ. नं. ३१९** **श्री म्हाळसाकांत**

ता. २९ जुलाई, इसवी सन १८५५

हुजूर हुकूम श्रीमंत महाराज राजराजेश्वर तुकोजीराव बाबासाहेब होळकर यांचा राजश्री धोंडो सदाशिव दरखी आमीन थांदले, पेटलावद यांचे नांवें ता. ९ जुलाई रोजीं झाला कीं, (झाबवेवाले व होळकरांचा संबंध पूर्वापार कशा प्रकारे आहे) याजबद्दल हुजूर सविस्तर खुलासा करणें वगैरे. त्यावरून :

१ हुजुर हुकमांत खुलासा कीं, मेहरबान हेचिनसन साो. एजंट भोपावर यांजकडून बडेसाहेब बहादुरांकडे चिठ्ठी इंग्रजींत आली कीं, उमराव झाबवेवाल्यासुद्धां टांका रुपये ३५००० पस्तीस हजार असल्याबद्दल लिहिलें असल्यानें पूर्वी सर जान मालकमसाहेबाचे वेळीं तुमचे विद्यमानें काय ठराव झाला ? याचा सविस्तर रिपोर्ट पेश करावा म्हणोन : त्यावरून :

१ प्रथम ह्या मुलखांत आपले राज्य झाले, ते वेळेस झाबवेवाल्याचे संस्थान थांदले येथें होतें. राजे अनुपसिंग त्यावेळीं होते. ते हुशार नसून थोडे वेडसर होते त्यामुळें सलाणा, रियासत रतलाम येथील राजांनी फौजबंदी करून थांदले येथें आपलें ठाणें बसविलें व राजे अनेपसिंग तेथून परागंदा झाले. ते भिल्लांचे आश्रयाखालीं जाऊन राहिले. सिवगडकर महंत हुशार असल्यानें ते माळव्यांत मराठ्यांच्या फौजा आल्या असल्यानीं महंत माखणगीर हे होळकर मल्हारजी व बुळे विठुजीस जाऊन भेटले व त्यांची मदत मागितली की सलाणेकरांचें ठाणें उठवून द्यावे. आम्ही झाबवेवाल्यांकडून टाका ठरवून देऊं. फौज खर्च कबूल करून विठुजी बुळे यांचे सह फौज घेऊन सलाणेकराचें ठाणें हुसकून लाविले. त्यावरून टाक्याचा करार करतों म्हणून राजे अनुपसिंगाकडून माखणगीर सांगत राहिले. जप्तीवर विठुजी बुळें यांनी माधवराव कारकून ठेऊन ते परत माळव्याचे बंदोबस्तासाठीं सुभेदार मल्हारजींकडे गेले.

१ इकडे कारकुन मजकूर वाटणी, किंवा टाका करून देण्याबदल म्हणत राहिला. परन्तु रांगडेभाई दुःख विसरून, जप्तीचे कारकुनास उठवून दिलें. ही बातमी विठूजीस जाहुर मुक्कामीं कळल्यावर, त्यांनीं पांचशें स्वारानिशीं थांदल्यावर स्वारी केली. लढाई होऊन महाल जप्त केला. राजे अनुपसिंग मृत्यू पावले.

१ राजे अनुपसिंगाचें कुटुंब राणी बनाबाई गरोदर होती. पुत्र जाहला त्याचें नांव सिबसिंग ठेविले. विसाजीपंत हे होळकरांकडून जप्तीवर होते, त्यांनीं होळकरांची कचेरी निराळी स्थापून राज्यकारभार पाहूं लागले. राणी बनाबाई खबरदार होती ती निघोन सुभेदार मल्हारजींकडे जाऊन वर्षभर राहिली व हुकूम आणिला कीं, प्रगण्याचे उत्पन्न होईल त्यातून चौथाई, राजास देत जावी. त्याप्रमाणें १०-१२ वर्षे चौथान झाबवे राजास मिळत होती.

१ राजे शिवसिंगही मैयत झाले. त्यांचे चुलत बंधु बहादुरसिंगास गादीवर बसविले. त्यांनीं होळकर सरकारांतून हुकूम आणोन चौथाई बंद करून गांवांची वाटणी करून घेतली. बारा वर्षे राज्य करून तेही मैयत जहाले. त्यांचे पुत्र भीमसिंग गादीवर आले. होळकरांचा जोर पाहून झाबव्यास राज्य स्थापिलें.

१ भीमसिंगजी भाग्यवान व कर्तबगार होते. त्यांनीं साठ वर्षे राज्य केलें. स्नेह, जरब, द्रव्यलालूच, इजारे, मत्ते करून हरप्रयत्नें जागा वाढविली. इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर १०-१२ वर्षांनीं मैयत झाले. राजे बहादुरसिंगाचे वाटणीप्रमाणें उमराव ठाकूर लोक हे सरकारचे वाटणीत असून, उमराव टाकेवाल्यांकडून फक्त राजाची भेट सायरीसह रुपये २२२४ आहे. वरकड सर्व अखत्यार सरकारचा आहे. संमत १८७४ चे सालीं इंग्रजी अंमलदारी झाली.

१ इंग्रजी अंमलदारीत मेहरबान सर जान मालकमसाहेब यांनीं नालछे मुक्कामीं संमत १८७७ चे साली राजे भीमसिंगजीस बोलाविले, होळकर सरकारांतर्फे वकील ब्रह्मगीर निंबाजी, लाला किसनप्रसाद व महालीहून आम्हास (धोंडो सदाशिव दरखदार) हाजर राहण्याचा हुकुम असल्यानें गेलों. नालछा मुक्कामचे ठरावाची कलमबंदी अलाहिदा पूर्वी पेश केलीच आहे. त्यांतही टाक्याचा जिकर नाहीं. टाक्याचे बोलणें राजाजी करते तर, तालुके कल्याणपुरा, काल्यापिटोलचे उमरावास टाक्याचा पट्टा त्यांचे नांवाचा, आमचे हातचा व कबुलायत त्यांचे स्वदस्तूरची, साहेबाचे तस्दीकी कशास करून देते ? मतलब कीं राजाचे मुलखाची वाटणी व उमराव लोकांचा प्रत्येक ठिकाणचा टाका याशिवाय राजासी टाक्याचा जिकरच नाहीं.

१ सर जान मालकमसाहेब गेलेवर, मे. बडेसाहेब वेलस्लीसाहेब बारा वर्षे इंदुरास होते. एक वेळ वेलस्लीसाहेब झाबव्यास आले त्यावेळीं राजे प्रतापसिंगानीं सर्व उमरावांस एकत्र करून त्यांजकडून लिहून घेतलें कीं, आम्हांस गनीमांचे

दुःख आहे, तरी महाल राजाजीकडे पूर्ववत कायम व्हावा. गनीम म्हणजे (होळकर) त्यावरून साहेबबहादुरानीं आम्हास विचारले कीं, या महालची वाटणी मातोश्री अहिल्याबाईंचे वेळीं झाली आहे काय ? आम्ही अर्ज केला की बाईसाहेब राज्यकारभार पहाणेचे पूर्वीपासून वाटणी जाहली आहे. त्यावरून बडेसाहेबांनीं राजाचे कारभाऱ्यास जाब दिला कीं कदीम शिरस्ता तोडूं चाहत नाहीं.

१ हल्लीं उमराव लोक टाका देतात. याजबद्दल विचारणा तर त्यांची नांवनिसीं सरकारी झडतींत दरसाल लिहिलीच जात आहे. ते लोक आपले स्वतःचे ठिकाणाबद्दल टाका देतात त्यात झाबवेवाले राजातर्फेनें कांहीं नाहीं. थेटपासून तीन हिश्शे आपले सरकारचे वाटणी असल्यानें, सर्व वहिवाट, आबादी, इस्तवारी, उमरावांचा टांका उत्पन्नावर कमी जास्त करणे, ऐवज न पटल्यास जागा खालसे करणें व आबाद करून परत पट्टा करून देणें, हे अखत्यार आपले सरकारचे आहेत. फक्त हे लोक राजाजीचे जातभाई असल्यानें दसऱ्यास रामरामीस जातात व भेटीचे रुपये २२२४ राजास देतात. याशिवाय कच्चा अंमल सरकारचाच आहे. त्याप्रमाणें उमराव ठाकूर सरकार चाकरीस हाजर होत गेले आहेत. आजपर्यंत टाक्याचा ठराव कोणी केला नाहीं. राजापासीं दस्ताऐवज असल्यास त्यांनीं पेश करावा.

१ श्रीमंत कै. यशवंतराव महाराजांचे कारकीर्दीत, एकवेळ राजे भीमसिंगजीनें महालचा इजारा संमत १८५७ ( इ. स. १८००) चे सालीं केला. तो इजारा शेठ बालचंद सुरजमल यांजकडे महालीची देखरेख असल्याने त्यांनीं रु.३५००० व महाल खर्च रु.१३००० असा ठराव करून राजाजीस महालची सोप केली होती व शेठजी यशवंतराव महाराजा समागमें फौजेंत गेले. राजाजींनीं ऐवज १-२ वर्षे दिला. पुढें पैसा भरला नाहीं.

१ महाल बुळे यांजकडून श्रीमंत यशवंतराव महाराजांनीं जप्त केलें, कारण, बुळ्यास भेटीस बोलविले व ते गेलें नाहींत. यास्तव तिन्ही महाल, चिखलदे, नरसिंगगड व झाबवे खालसा करून बालचंदजीचे निगराणींत ठेविलें होते. ह्या इजारयाचे ३५००० पस्तीस हजार टाक्याची उपमा राजे झाबवे देत आहेत.

१ इजारयाचे रुपये राजाकडून येईनासे झाल्यावर, होळकरांकडून महिपतराम याचे आधिपत्याखालीं फौजापलटणी पाठवून झाबव्यास वेढा देऊन राजास कैद करून हत्ती, तोफा, सरकारांत पावत्या केल्या. बाकी ऐवजाकरितां राजाजी सरकार कैदेत होते. तो श्री भीमाबाईचे लग्न होऊन महाल परत बुळेसाहेबांस जहागीर दिला. त्यांजकडून दाजी दिनकर कामावर आले. राजाकडून ओलिस, पासवान व दोघे चिरंजीव ठेऊन राजे कैदेतून सुटले. इजारेआखांस झाबवेवाले टाका संबोधून चालले आहेत. हे लक्षांत येईलच.

१ यापुढें संमत १८९० सालीं श्रीमंत हरीराव महाराज गादीवर आले व अप्पासाहेब बुळे यांस अखत्यार दिला. एक-दोन वर्षे सुरळीत चालले. पुढें झाबवेकर मोतीकुंवर, उमरावगीर यांनी दंगा केला. वसूल सुरळीत येईना. तेव्हां बंदोबस्तासाठीं बोर्तिकसाहेब आले. मोतीसिंग समजेना, सबब कैद करून अशेरगडास पाठविले. झाबवेराजे यांनीं साहेबास उलटसुलटे समजाविलें कीं, हा फितूर सर्व बुळेसाहबांचा आहे. महाल आमचेच वहिवाटीत रहावा. तेव्हां साहेबानीं श्रीमंत हरीराव महाराजांकडे कारवाई करून, महाल थांदले-पेटलावदचा इजारा पांच साल करारानीं रुपये ३५०० हजार साल व धर्मादाय रु. १५२४ प्रमाणें पट्टा करून राजास महाल इजारे दिला.

१ पुढें श्रीमंत महाराज हरीराव यांसीं कळून आलें कीं, महाल हातचा जातो तेव्हां पट्याचा करार पुरा होतांच, महाल ताब्यांत घेण्याचा हुकुम दिला परंतु यावेळीं फणसेसाहेब कारभारी, यांस साहेबांस राजी राखणें प्राप्त परंतु आम्ही इकडून श्रीमंत सरकारांस वेळोवेळीं विनंती करून परत महाल इजारे होऊं दिला नाहीं.

इजारे आखांस राजाजीचे समजावणीनें साहेब टाका म्हणत असतील तर त्यांची मर्जी. एरव्ही टाक्याचा ठराव मुळी झालाच नाहीं. झाबवेकराकडील तीन हिस्से वाटणी सरकारची असून उमराव, ठाकूरांकडील टाक्याचा कच्चा अंमल होळकर सरकारचा आहे यात शंका नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ती. रुजु धोंडो सदाशिव दरखी अमीन थांदले पेटलावद. ता. २९ जुलाई इसवी सन १८५५.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 319 29-7-1855 A.D.

An Account of the relations of Sansthan Zabwa with the Holkar Government form time to time.

---

**अ. नं. ३२०** **श्री**

ता. १० आगस्ट, इसवी सन १८५५

रामराव नारायण दिवाण व खुमानसिंग बक्षीकडून : श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबासाहेब होळकर यांचे सेवेसीं. विशेष. आज तिसरें प्रहरीं खुमानसिंग बक्षी व मी छावणींत बडेसाहेब बहादुरचे मुलाखतीस गेलों आणि सरकार हुकमाप्रमाणें सर्व मजकूर जाहीर केला व साहेबानीं ज्याप्रमाणें जबाब दिलें तें येणेंप्रमाणें :

१ थांदले पेटलावदबद्दल सरकारचा हुकुम कीं, साहेबांस सांगांवे कीं, आम्ही हा मुकदमा आपल्या स्वाधीन केला. पाहिजेल तसें करणें व ज्यांत सरकारची नुकसानी न होय, ते करतील व इज्जत सरकारची ठेवणें आपले हातीं आहे. ऐसियासी. सरकार आज्ञेप्रमाणें सर्व मजकूर साहेबांस निवेदन केला, त्याजवरून साहेबांनीं सांगितलें कीं, मसुदा आम्ही लिहित आहोंत, अद्याप तयार झाला नाहीं. तयार झाला की पाठवून देऊं. दुसरें असेंही सांगितलें कीं, कांहीं टाका मुकरर करून झाबवेवाल्याकडून घेत जाणें. यात सरकारची हुकमतही त्यांजवर बनली राहील. बाकीचे गांव घेऊन घ्यावे. परंतु गांवें देण्यास झाबव्याराणी राजी नाहीं. पेश्तर राजी होती. दोन चार दिवसांत हेचिनसाहेब येणार आहेत, ते आलेवर माहीत पडेल. दुसरें त्यांचें म्हणणें हे आहे कीं, थांदल्यास आमचे कुलदेवतेचे मंदिर आहे, त्यास हमेशा जावें लागतें, यास्तव थांदला कस्बा देऊं शकत नाहीं. पेटलावद आपलेकडे राहील. याप्रमाणें साहेब बोलले. दुसरें हेंही सांगितले कीं, हा मुकदमा जमीनीचा आहे तेव्हां यांत जलदी होऊं शकत नाहीं.

१ तालुके नंदवाई येथील मौजे ताजपुरा याची बेगूवालेचे काकड झगड्याप्रकरणीं पूर्वी लेख आला होता त्याप्रमाणें साहेबांस मजकुर जाहीर केला. त्याजवरून साहेबांनीं सांगितलें कीं, कैफियत आली त्यावरून कर्नल लारेन्ससाहेबांस लिहिलें आहे. तिकडून अद्यापी जाब आला नाहीं. आम्ही सांगितलें कीं, जोपर्यंत फैसल होत नाहीं तोपर्यंत आपलेकडील चपराशी तेथें ठेवावा. त्याजवरून साहेबांनीं सांगितले कीं, आम्ही चपराशी पाठविला तर संडीससाहेब महतपूरचे व कर्नेलसाहेब लारेन्स, यांजला वाईट लागेल. त्यास महतपुराहून चपराशी तेथें जाईल, याजबद्दल संडीससाहेबांस चिठ्ठीही पाठविली आहे.

१ अकबरपूरचे घाटाबद्दल सांगितले कीं, सेक्सपीयरसाहेब यांनीं आमच्या नावा, आमचे सुप्रत करून धरमपुरीहून नावा आणून तेथें चालवितात, त्यास असा शिरस्ता नाहीं कीं, जेथें एक घाट आहे तेथें दुसरा घाट मुकरर होईल, असें नसावें. त्याजवर साहेबानीं सांगितलें कीं, तुम्ही तुमच्या नावा चालवाव्या. सेक्सपीयरसाहेब धरमपुरीची नाव चालविणार नाहींत. याप्रमाणें मजकुर आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 320 10-8-1855 A.D.

Report to the Maharaja of the interview which the Diwan and Baxi had with the Resident regarding -

(i) The Thandla Petlawad dispute,
(ii) Tajpura Boundary dispute, and
(iii) The Akbarpur ferry.

---

**अ. नं. ३२१** **श्री**

ता. १४ आगस्ट, इसवी सन १८५५

फडणीस दप्तराकडून हुजूर रिपोर्ट सन १२६५ फसली. काकडझगडे प्रकरणी. रियासतींत प्रगणेवार गांवांसी काकडझगडे किती आहेत, त्याजबद्दल फेरिस्त, नक्षे सरकारांत पुराणे दाखल्याचे पुराव्यावे कागदपत्रासह समजलें पाहिजे. ते दाखल करण्याविषयीं महालवार सरक्युलर ता.१९ जून १८५५ एक महिन्याचे मुदतीचे परंतु मामलेदार लोकांकडून अद्याप जाब आले नाहींत. त्याबद्दल अलाहिदा याद पेश केली आहे. पाहून हुकूम होणें तो व्हावा. ता. १४ आगस्ट इसवी सन १८५५.

**हुजूर हुकूम**

हा रिपोर्ट इंदुरास दिवाणसाहेबांकडे पाठवावा व दिवाणसाहेबानीं महालवार वकिलांस जमा करून मुदतीवर जितके दिवस होऊन चुकले, तितके दिवसाचे दररोज रुपया १ प्रमाणें दंडाबद्दल घेऊन जाब घेणें, अशी ताकीद द्यावी. जर हुकुमाप्रमाणें पुढें वर्तणूक न झाल्यास त्या वकिलास दरबार बंद होईल.

**सरकारी रेकार्ड**

No. 321 14-8-1855 A.D.

The Maharaja ordered reports from Mahals, in connection with boundary disputes. The Diwan is ordered to fine those Vakils who failed to submit the reports in time.

---

**अ. नं. ३२२** **श्री**

ता. २३ आगस्ट, इसवी सन १८५५

माधवराव विसाजी कडून रामराव नारायण दिवाण यांस : श्रावण शुद्ध ११ गुरुवार पावेतों मुक्काम महेश्वर येथें सुखरूप असो विशेष : ता. २२ चें आपलें पत्र सरकारसाहेबांस दाखवून आज्ञा जाहली तो मजकूर :

१ थांदले पेटलावद बद्दल मजकुर साहेबांनीं सांगितला कीं, बारा हजार रुपये पावेतों टाका झाबवेवाल्यावर कायम करावा व अठरापैकीं सहा हजारांची गांवे घेणें

व झाबवेवाल्यावर तुमची हुकमत राहील व थांदला कसबा ते देत नाहीं कारण त्यांचे कुलदैवत तेथें असून हमेश जावें लागतें. सबब पेटलावद तुमचेकडे राहील. हेचिनसनसाहेब येणार आहेत आल्यावर तजवीज-मुकरर करूं, म्हणोन बोलण्याचा आशय. त्यास बारा हजार टाक्याचे मुकरर करून झाबव्यावर आपली हुकमत राहण्याचे साहेब म्हणतात. ती हुकमत कोणे प्रकारची ? याची उमज पडली नाहीं. जशी बारा हजार, तसेच अठरा हजार कायम करणेस साहेबांस अशक्य नाहीं. तरी साहेब म्हणतात, हुकमत कायम राहील, ह्याचाही काय भरवसा ? कारण पूर्वी कांहींएक वेळ ठराव झाले, परंतु ते बदलून परत फिसाद आहेच. भोपावर मुक्कामीं आपले सहीचा फैसला करून दिला. त्याप्रमाणे झालें न झालें हे साहेब जाणतच आहेत. सबब असा फैसल व्हावा कीं, पुन्हा कोणेविशीं त्यांचे आपले, कारण न पडे. साहेब करतील तेंही सरकारहक्काचे नीटच करतील. कुलस्वामींचे मंदिराबद्दल त्यांचा बहाणा आहे. कारण ज्या ठिकाणीं मंदिर बांधले त्या ठिकाणीं कुलस्वामी होतात. हा शिरस्ता आहे. आपले येथें मातोश्रीसाहेबांची छत्री मुख्य ठिकाणीं लहान, दुसरी छत्री शहरानजीक केली आहे. तशांत झाबवेवाल्यांचे कुलदैवत खरे पाहूं गेल्यास मारवाडांत. इकडे आल्यावर मंदिर केलें, तसें झाबव्यास केल्यासही होऊं शकेल. पेटलावद तालुक्याची जागा असून थांदला कसबा ठाण्यायोग्य आहे. त्यांस तर खुद्द झाबवा मुख्य जागा आहेच.

१ असा हा सारा मजकुर साहेबांस युक्तीनें बोलून त्यांचे मनातील हरद्र काय हे बोलण्यावरून व चेहऱ्यावरून पाहून लिहावें. हेचिसनसाहेब आलियावर साहेबांचा हाच विचार कायम राहिलसें दिसत नाहीं. त्यांचे तजविजीवर धोरण जाईल. ते आल्यावर सरकारचा सलाम सांगून खैरियत विचारावी आणि त्यांचे व साहेबांचे कसे काय विचार होतात हे शोध ठेवून लिहावें. येविषयीं मुनशीजी उमेदसिंगजीसही शोध विचारीत जावा. येविशीं सरकारांनीं मुनशीजींसही चिठ्ठी लिहिली आहे.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 322 23-8-1855 A.D.

Madhavrao Visajee communicates Maharaja's desires to Ramarao Diwan Regarding :

(i) Thandla - Petlawad dispute, and

(ii) The location of Kulswami temple of the Zabwewalas.

---

**अ. नं. ३२३** **श्री**

इसवी सन १८५५

**(सरकारी कापड जामदारखाना दप्तरचे रेकॉर्ड वरून)**

श्रीछत्रपती सातारकर यांचा मुक्काम इंदुरास झाला असताना सरकारांतून मेजवानी, बहुमान झाला त्याजबद्दल.

१ श्रीमंत महाराज शाहू राजे काशीक्षेत्रीं होते तेथून माघारे संस्थान साताऱ्यास जाणेकरितां इंदूरमार्गे आले. त्यांचा मुक्काम इंदूर येथे गोपाळबागेंत होऊन वाड्यांत मेजवानी झाली. त्यांजकडे कापड वगैरे :

५२ खाशाकडे :

१९ खुद्द शाहूराजे छत्रपती : १ मंदील, १ तिवट, १ कांच्या, १ शालजोडी, गुलबन्द, १ पायजमा, १ दुपटा, शालनामी, बादली, १ पटका, किनखाप, खेस, महमुद्या, १ मलमल, १ फुलकारी, १ जामदानी, १ मश्रु, वगैरे १९

१८ मातोश्रीकडे : पातळ चंदेरी, १ पातळ महेश्वरी, १ पैठणीं, २ लुगडें, १ शाल १ दुलाई, १ किनखाप, १ महमुदी, १ जामदानी, १ गुलबदन, १ बनारसी खण वगैरे.

११ सौभाग्यवती राणीसाहेब (छत्रपती, यांचे कुटुंब धार संस्थानचें,) : १ पैठणी, १ पातळ, १ शालू, १ लुगडें, १ शालजोडी, १ खेस, १ दुपटा, ४ खण, वगैरे.

२ मावशीकडे :१ पैठणी, १ खण येकुण दोन.

२ सासूबाईकडे : १ पैठणी, १ खण, असे २

....

५२

१५३ सेनापती दुरगसिंग यांजकडे ९ व त्यांचे कुटुंब व मातोश्रीकडे १२, आश्रित मंडळीस १४ व दरखदार, मानकरी, वगैरे बरोबरील सर्वत्रांस मिळोन ११८ वस्त्रें दिली :

० ह्या शिवाय दागिने : खुद्द १ कंठी मोत्याची, १ शिरपेंच, १ ढाल, १ तरवार, व मातोश्रीस दाळपाटल्या जडाइ जोड व मोत्याचे पेंडे १ व सौ. राणीसाहेबांस जडावाच्या पाटल्या जोड १ याप्रमाणें.

८ शाहू राजे छत्रपती कडून आबदागिरी व हत्ती, घोडे, आले. जे इसम ह्या वस्तू घेऊन आले त्यांस सरकारांतून तिवट, दुपटे देण्यांत आले.

**हुजूर चिटणीसी रेकॉर्ड**

No. 323 1855 A.D.

Banquet to and reception of, the Chhatrapati of Satara at Indore.

Return of presents from the Chhatrapati to Maharaj Tukojirao 11. Gifts are given to all the attendants of the Chhatrapati.

---

अ. नं. ३२४

## श्री म्हाळसाकांत

इसवी सन १८५६
संमत १९१३, फसली सन १२६६

**ठराव**

नगदी नेमणुकीबद्दल ठराव जाहला तो येणेंप्रमाणें :

१ देवस्थान नेमणुकी हल्लीं चालत आहे ती सनदी बिनसनदी सर्व चालविली जाऊन हल्लीं इतकेंच पाहिलें जाईल कीं जी नेमणुक ज्या शर्थीवर करून दिली, त्याप्रमाणें वहिवाट चालत आहे किंवा नाहीं.

१ सरकारी नगदी नेमणुक हल्लीं चालत आहे त्याप्रमाणें पुढेंही चालेल व बादशाही व पेशवे सरकार व अवंतर सरकार अंमलापूर्वी झाल्या असतील ते व शिंदे सरकार व चंद्रावतांची सनद असून हल्लीं वहिवाट चालत आहे त्याप्रमाणें कायम राहील आणि ह्या लोकांस नवीन सनदा करून दिल्या जातील.

१ विठ्ठल महादेव (तात्या जोग) यांनीं ज्यांचे बंदोबस्त करून दिले आहेत, त्यांचा दाखला पाहून त्याप्रमाणें निभावलें जाऊन त्यांजला नवीन सनदा करून दिल्या जातील.

१ बिनसनदी वहिवाट चालत आहे त्याचा ठराव धर्मादाय, रोजीनदार, महिनमाह व सालियाना, नेमणूक पावत आहे त्यांबद्दल :

१ बारा वर्षांचे आंत ज्या इसमांची नेमणूक चालू झाली त्यांजला जीवमानपावेतों सनद निम्मेची मिळेल.

१ तीस वर्षांपावेतों ज्याची नेमणूक चालत आली असेल त्या इसमास निम्मे वर्षासन मिळेल व त्याची सनदही सरकारांतून दिली जाईल. अथवा एक वर्षाआड घेण्याचें तो इसम मंजूर करील तर हल्लीं पावत आहे ती नेमणुक त्याजला एक साल आड मिळेल.

१ तीस वर्षांपासून साठ वर्षांपावेतों ज्याची वहिवाट असेल त्याजला एक हिस्सा वजा करून तीन हिस्से नेमणूक त्यांजकडे चालेल व त्याची सनदही दिली जाईल.

१ साठ वर्षांवर ज्याची वहिवाट असेल, त्याप्रमाणें सनदी, बिनसनदी बरोबर चालविली जाईल.

सदरहू कलमांबद्दल वहिवाटीचा दाखला मात्र मुस्तकीम पाहिला जाईल. मध्यंतरीं कांहीं कारणाने नेमणूक पावली नसल्यास तितके दिवस, वा महिने, वा साल, वहिवाटींत गणतींत मानले जाणार नाहींत.

१ कोणास योगक्षेमार्थ वर्षासन करून दिलें असोन ज्याचे वंशजाकडेस ते चालत आहे व पुढें त्या वंशजानीं मंदिर बांधले तर ते वर्षासन देवस्थानाकडे न समजले जातां, धर्मादायांत समजले जाईल आणि धर्मादायास जी ठरावाची कलमें लागू आहेत ती सर्व कलमें सदरहू तऱ्हेच्या धर्मादायास लागू होतील.

१ सरकार इलाख्याबाहेर जीं देवस्थानें आहेत यांजबद्दल सरकारांतून सरकारी, अथवा शिंदे सरकार, या चंद्रावत, या बादशाही, अथवा कमाविसदारी सनदेअन्वयें जी नेमणूक चालत असेल, ज्या सनदेंत अमुक देवस्थानाकडेस नेमणूक आशीं अक्षरें लिहिली असतील ती सनद मान्य होऊन त्याअन्वयें नेमणूक चालविली जाईल. सनदेखेरीज नेमणूक चालविली जाणार नाहीं परंतु धर्मादायाच्या कायद्याप्रमाणें अशा नेमणुकीबद्दल ठराव केला जाईल.

१ प्राचीन सनदा कोणतेही सरकारच्या सन १८१८ इसवीचे सालापूर्वीच्या कोणी पेश करील त्या सनदेत लिहिल्याप्रमाणें त्यांजकडे वहिवाट चालू नसेल त्या सनदा अगदींच मानल्या जाणार नाहींत. सदरील सालापुढील ज्या सनदा आणि त्यांची वहिवाट जारी नसेल तर वहिवाट जारी न होणेचे कारण सनदेच्या मालकास विचारलें जाईल आणि कारण समजल्यावर, मुनासिब दिसेल तसा फैसला केला जाईल.

१ कमाविसदारी सनदा बिलकूल मानल्या न जातां, धर्मादायाप्रमाणें कमाविसदारी सनदाही कायद्यानें लागू करणेंसारख्या असल्यास लागू केल्या जातील.

सदरहू यादीचा ठराव ज्या इसमाची वहिवाट चालत असेल त्याजला लागू होईल. ज्याची वहिवाट चालत नसून सरकारी सनद अथवा दुसरी कोणाचीही सनद ज्या इसमाजवळ असेल तरी चालविली जाणार नाहीं. हा ठराव सदर हुसाली झाला असे. करितां या सालपासून वहिवाटीची तादाद समजली जाईल. या सालापुढें कोणी नेमणूक करून दिली असल्यास ती चालविली जाणार नाहीं. सदरहू ठरावाच्या प्रती तामिलीस्तव सरकार बिजागड व जिल्हेनिहायचे सुभे यांजकडे पाठविल्या जाव्यात.

ताजा कलम

१ कलम १ प्राो नगदीं नेमणूक व इनाम जमीन बिनसनदी ज्या इसमाकडे चालत

असेल आणि तो इसम अंध, अपंग, अथवा विधवा स्त्री असेल, त्यांचे गुजारे-माफिक नगदी नेमणूक किंवा इनामजमीन त्यांजकडे कायम राहील. बाकी सर्व नगदी नेमणूक, जमीन सरकारखालसा करून घेतली जाईल. याप्रमाणें, लिहिल्याअन्वयें विधवेचे पोटीं पुत्र असल्यास व बाई मैयत झाल्यास व पाठीमागें मुलाचें वीस वर्षांचें वय होईपावेतों, गुजाऱ्यापुरती नेमणूक, या जमीन कायम राहील.

१ योगक्षार्थ नगदी नेमणुक अथवा इनामजमीन सरकार सनदी असून त्याजबद्दल त्या इसमाचे पोटी वंशज नसल्यामुळें दुसरें कोणास जमीन विकण्यास व गहाण ठेवण्यास अधिकार नाहीं. करितां सरकार हुकूमाशिवाय कोणी नगदी नेमणूक, अथवा इनामजमीन गहाण ठेवील अथवा तहहयात याप्रमाणें दोन्ही कलमास सदरहू ठराव लागू केला जाईल.

१ सरकार सनदी इनाम जमीन ज्या इसमास मिळाली त्या दिवसापासून तो इसम त्याच गांवीं राहत असोन इनाम जमीनही त्या गांवीं आहे ती जमीन त्यानें पडित ठेऊन त्या जमीनीत इनामदाराने आंब्याचे झाडे वगैरे लावून उत्तम उत्पन्न घेतलें अथवा दुसरा कोणी ती जमीन हाकत करील, ते वेळीं जमीन माझी आहे, हरकत करून कबजा ठेवील अथवा ही जमीन त्या इसमाबद्दल नामें दिली असा दाखला महालचे जमीदार, दरखदार व गांवचे पटवारी यांचे कागदी खर्ची पडल्याचा निघेल तो दाखला सरकारी सनदेप्रमाणें असल्यास मानला जाईल. कोणतेही प्रकारें वहिवाट जारी ठेविली असेल ती जमीन पडित असली तर त्यांजकडे चाललेप्रमाणें वहिवाट न ठेवितां पडित जमिनीवर हल्लीं वारसा करील तर ती जमीन त्याजकडे चालविली जाणार नाहीं व असे प्रकारची बिनवहिवाटी जमीन माफीकडील कारकुनानें चौकशीचे कागदीं दाखल करूं नये व हुजूर फडणीस व मामलेदार, यांनीं कलमवार ठरावावर नजर ठेऊन एकंदर कागद तयार करीत जावे.

**हुजूर फडणीसी रेकार्ड**

No. 324 1856 A.D.

The Holkar Government orders on Dharmadaya and other Sanads granted in past times by Mogul Emperors, Peshwas and other Governments.

---

**अ. नं. ३२५** **श्री**

(शिक्का अष्टपैलू) ता. ८ जुलाई, इसवी सन १८५७

अहिल्यान दरबार

राजश्री गंगादीन जमादार मामलेदार प्रगणे नागलवाडी सेंधवे गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित अहिल्यान दरबार सरकार होळकर रामराम विनंती उपरि. या दिवसात बदमाश लोकांनीं छावणी रेसिदेंटींत वारदात केल्यामुळें बदहवा होऊन राहिली याकारणानें हा सरक्युलर हुकुम तुम्हास लिहिला जातो कीं, सरकार-कंपनीसी जी दोस्ती पूर्वीपासून चालत आली त्याप्रमाणेंच आइंदे दोस्ती व सलूक कायम आहे. कोणी लोकांनीं हल्लीं मुलखाचे हवेवर ख्याल करून सरकारकंपनीचे हरएक लोकांस मदत देण्यांत व सलूख ठेवण्यांत, कोताई केल्यास तो भारी गुन्हा समजला जाऊन नसियत दिली जाईल. हें समजून कंपनी सरकारचे हरएक लोकांस जी ज्यावेळीं मदत लागेल ती देत जाऊन कोणेही प्रकारें त्यांस तकलीफ न होय अशी वहिवाट करीत जाणें. स्वतः साहेबलोक अथवा त्यांजकडील अहेलकार ज्यावेळेस जें काम सांगतील तेच वेळेस त्यांचे सांगण्याप्रमाणें पूर्वीचे सिरस्तेअन्वयें तामील करीत जाणें. रवाना तारीख ८ जुलाई ती इसवी सन १८५७ हे विनंती मोर्तबरुजू गिरमाजी त्रिंबक चिटणीस हुजूर सन १२६७ फसली.

**सरकारी रेकार्ड**

No. 325 8-7-1857 A.D.

Gangadin Jamadar, Mamledar Pargana Nagalwadi is ordered to render every aid to the Company Government in the present times of disaffection.

---

**अ. नं. ३२६** **श्री**

ता. ५ मार्च, इसवी सन १८५९

श्रीमंत मातोश्री गौतमाबाईसाहेब होळकर विद्यमान राजश्री चिमाजी नाईक, खासगी संस्थान महेश्वर : शुभचिंतक सखाराम विठ्ठल उपासनी आशीर्वाद ऐसीजे कीं, संस्थान मजकुरीं श्री काशीविश्वेश्वराची नेमणूक मजकडे सरकारांतून आहे. हल्लीं वेदमूर्ती राजश्री भास्करभट जोशी यांजला ठेविलें आहे. हे बरोबर वेळशीर पूजा वगैरे चाकरी करतील. बंदोबस्त ठेवतील. कोणे गोष्टीविषयीं कमजास्त पडल्यास त्याचा जाब मशारनिल्हे करतील. आमचेकडून पूजेबद्दल मुखत्यार आहेत. तनखेचे रुपयेही यांजजवळ देत जावे. हा मुखत्यारनामा लिहून दिला. सही. मिती फाल्गुन शुद्ध १ संमत १९१५ शके १७८०.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 326 5-3-1859 A.D.

The Manager of Khasgi at Maheshwar is informed by Sakharam Upasani that the latter has appointed Bhaskarbhatt Joshi as his agent for the worship of Shree Kashi Vishweshwar at Maheshwar.

---

अ. नं. ३२७

## श्री शंकर

मे, इसवी सन १८५९

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत तुकोजी होळकर |
|---|

वज्रचुडेमंडित सौभाग्यवती मतप्रणितभार्या भागीरथी यांसी प्रती : तुकोजीराव होळकर आशीर्वाद उपरि. दक्षिण प्रांतीं जिल्हे पुणें, नगर व खानदेश व सोलापूर, जिल्हे सातारा व मोगलाई इलाख्यांत सरकारी वतनबाब व बाग आंबराई व कुरणें व इनाम जमिनी व शहर पुणें येथें सरकारी वाडा, घरवाडे, इमला, खुली जागा कुव्वे बावड्या व मिरासी जमिनी व चांदवड, वाफगांव मांडवगण येथील सरकारी वाडे व वाफगांवचे देवस्थानचे पूजेबद्दल सोने चांदीचे उपकरणीं व तांबेपितळेचीं भांडी व सोन्याचे टांक, श्री मार्तंडजीचे वगैरे किल्ल्यांतील जकीरा व संस्थान जेजुरी येथील सरकारी बाग व जागा वगैरे वतनबाब दक्षिण प्रांतीं असून मोबदल्यांत हल्लीं दिले नाहींत व आइंदे दिले जाणार नाहीं. तें सर्व उत्पन्न व वतनबाब, घरवाडे, इनाम जमीन मिरासी वगैरे सदरीं लिहिलेंप्रमाणें खाजगी इलाख्यांत देण्यांत आलेचा ठराव करून बरहुकुम यादी मखलसीची झाल्याअन्वयें हें पत्र सादर केलें असे. तरी या उत्पन्नाची वहिवाट तुम्ही करीत जावी व दक्षिण प्रांतीं देवस्थानें श्रीजेजूरी व वाफगांव व चांदवड वगैरे ठिकाणीं आहेत त्यांजकडे धर्मादाय वगैरे नेमणुकी पूर्वीपासून चालू आहेत त्याप्रमाणें खर्च करीत जाऊन सदरहू उत्पन्न तुम्ही आपल्या खासगीकडे जमा करीत जावें आणि या उत्पन्नाची वहिवाट ज्याप्रमाणें हल्लीं सरकारांतून दक्षिण प्रांतीं आहे त्याचप्रमाणें तुम्हींही ठेवावी व लक्षांत असों द्यावे कीं, ही देणगी वरकड जहागिरीपेक्षां वेगळे शिरस्त्याची आहेः म्हणजे राजकीय शक्ती जी हल्लीं सरकारांस आहे त्यासुद्धां हे देहणगी दक्षिण प्रांतांतील वतनबाब वगैरेची तुम्हास देण्यांत आली आहे. तरी तुम्ही याप्रमाणें अंमल ठेवणें. हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 327 May, 1859 A.D.

H. H. Maharaja Tukojeerao grants a Sanad passing all the property in the Deccan, to the Khasgi under his consort Maharani Bhagirathibai.

The Maharaja passes the possessions with political powers held by His Highness.

---

**अ. नं. ३२८** **श्री**

ता. ३ जून, इसवी सन १८६०

ठाकूर मोतीसिंग खवाशेवाले यांजकडून : श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबासाहेब होळकर यांचे सेवेसीं विशेष. अर्ज लिहिण्यास कारण कीं, आम्हांस एक मुलगा जाहला होता, परंतु दैवयोगे न वांचून मैयत जाहला. पुढें मुलगा नाहीं जाणोन आमचे भाऊबंदाचा मुलगा मौजे तलावली येथील नामें रघुनाथसिंग याजला चार वर्षें जाहले ओटींत दिला. तेव्हां त्या मुलास आमचे जवळच आजवर ठेविले. हा मजकुर सर्वत्रास ह्या प्रांतीं जाहीर आहे. पुढें आमचे मनांत ही लालसा बहुत होती कीं चिरंजीवास एकवेळ हुजूरचे चरणांजवळ घेऊन जाऊन भेट करवावी आणि कांहीं कामकाजासंबंधीं अर्ज करणें तोही समक्ष करावा. असें बेतांत, परंतु वृद्धापकाळामुळें दिवसेंदिवस शरीर परस्वाधीन होत गेलें. त्यामुळें मनांतच राहून गेलें. मध्यंतरीं कांहीं रोज झाबवे मुक्कामीं मुलीचे लग्नाकरितां गेलों, परंतु बिमारी मनस्वी जाहली, तेव्हां आज रोजीं थांदले मुक्कामीं आलो. येथे रा. शिवराम मोरेश्वर शिरस्तेदार व धोंडो सदाशिव विभूते दरखीआमीन यांजला रुबरु भेटीत सर्व मजकूर श्रुत केला ते हुजूर खुलासा जाहीर करतीलच.

१ आम्ही सरकारपदरचे उमराव जसी मनापासोन चाकरी केली तसी ह्याप्रसंगीं सरकारांनीं सर्वस्वी चिरंजीव रघुनाथसिंग यांजवर निगे ठेऊन हरएकविसीचा सांभाळ केला पाहिजे. आमचे भाऊबंदांपैकीं कोणी अडचण पाडतील ती पडणार नाहीं व जागेवर कायम राहून सरकारचाकरींत हाजर राहून जागाठिकाणा बनला राहील. यापुढें सरकार मालक आहेत. वरकड मजकुर सर्व आमीन, शिरस्तेदार, यांचे रिपोर्टावरून जाहीर होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

(सही) हिंदीत, महाराज मोतीसिंग, खवासा.

ह्याजवर हुजूर हुकूम नंबर २७ ता.१७-१२-१८६० चा जाहला कीं, तूर्त कांहीं काम नाहीं, काम लागेल त्यावेळीं बोलावून घेण्यांत येईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 328 3-6-1860 A.D.

Thakur Moti Sing Khawasewalla submits an application to His Highness that his adopted son Raghunathsing should be taken in service.

The reply was that it would be done at the proper time.

---

**अ. नं. ३२९** **श्री म्हाळसाकांत**

फसली १२७०, इसवी सन १८६०

यादी श्रीमंत महाराज सरकार तुकोजीराव बाबासाहेब होळकर बहादुर ह्यांची स्वारी सन १२७० फसलींत जबलपूर मुक्कामीं मेहरबान लाट क्यानिंगसाहेब यांचे भेटीस गेली, ते समयीं लाटसाहेबांकडून खिल्लत आली तिचा तपशील :

१७५०० दागिने. कंठी मोत्याची, आकार रुपये ११००० व सिरपेच रु.६५००.

५२६० हत्यारें. पेशकस जडावाचे जवाहीराची एक तलवार, चांदीचे मुठीची ढाल, एक चांदीचे फुलेवार.

९७० भांडी विलायती चांदीची वजन भार. झारी एक वजन २९५, तबक वजन भार ३३९ प्याला वजन एक.

याशिवाय बिनआकारी जिनसा कापड वगैरे लवाजमा.

१ हत्ती, १ बग्गी, घोडे रास दोन. घोड्याचें सामान चांदीचें व सोन्याचें.

४८ कापडपांचें कापड जामदारखान्याकडे दिले त्याचा तपशील. ४ शालजोड्या, १ जामेवार जरीकोर, १ तास सोनेरी बुटीचा, २ रुमाल, १ चुग्गा सफेद, १ चुग्गा बनारसी, १ चुग्गा लाल जरीचा, १ चुग्गा मखमाल १ रुमाल शाल नामीजरीची, १० दुपट्टे बनारसी, २ रुमाल बनारसी १ पटका बनारसी, २ मंदील, दोन, २० किनखाप

येकुण नग अठ्ठेचाळीस.

१ झाड विलायती फानस सुद्धां काचेची जोडी.

येणेंप्रमाणें खिल्लतीचा तपशील असे.

**सरकारी रेकार्ड**

No. 329 1860 A.D.

List of present, Arms and clothes made to His Highness Maharaja when the latter paid visit to the Viceroy Lord Canning at Jabalpore.

---

**अ. नं. ३३०** **श्री**

ता. २२ मे, इसवी सन १८६१

गणपतराव सीताराम वकील यांस हुजूर हुकमाअन्वयें वासुदेव महादजी मुळे यांजकडून मुक्काम महेश्वर :

१ झाबवा, खवाशाचे मुकदम्यांत बडेसाहेबाशीं बोलण्याची कलमें.

१ आणखीनही टाकेदार नरसिंहगड, पाटण, देवळेप्रतापगड, वगैरे दरबार इलाख्याचे. तसेच सीतामहू, सलाणा, वगैरे शिंदे सरकारचे टाकेदार त्यांची जामनी सरकार इंग्रजीची असून, टाका येत आहे व त्या लोकांवर बादशाही हक्क शिंदे सरकार व आमचे सरकारचा इंग्रज सरकाराने कायम ठेविला आहे. इतकें साहेबांनीं लक्षांत घेतले म्हणजे झाबवा, खवासा येथील आमचे हक्काबद्दल सहजी साहेबांचे लक्षांत येऊन निकाल लागेल. म्हणोन साहेबांस बोलावें. फक्त.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 330 22-5-1861 A.D.

In imparting instructions to the Holkar ambassador with the British Resident he is informed of the Holkar relations upheld by the British Government over Narsingagad etc., The same should hold regarding Zabwa and Khawasa.

---

**अ. नं. ३३१** **श्री**

ता. २३ जुलाई, इसवी सन १८६१

महाराज तुकोजीराव होळकरांकडून : नारायण खंडेराव गुमास्ते देशमुखी चांदवड विशेष. चांदवड महालीं सरकारी साहनकी जहागिरी नवगांव आहेत. ते गांव सरकार इंग्रजीकडे देऊन त्याचे बदला या प्रांतीं नेमावर, सत्वास वगैरे हे परगणे इंग्रजी सरकारचे हिश्याचें घेण्याचे ठरून ता. २३ जुलाई सन १८६१ रोजीं नेमावर व सत्वास व पाणी बिजबाड व हरणगांव, सरकार इंग्रजीकडून सुप्रत जाहले ते सरकारकबजा करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असें. तरी सरकारांत घेतले ऐवजीं चांदवड येथील साहनकी जहागिरी नवगांवे सरकार इंग्रजीचे सुप्रत कलेक्टर अहमदनगर याचे विद्यमानें करावयाचे ते येणेंप्रमाणें :

१ मौजे ओझर, १ मौजे नांदूर मध्यमेश्वर, १ मौजे उगांव, १ मौजे बेरडे, १ सिवडी, १ वडालीभोई, १ पिंपळवास, १ वडनेर व १ मौजे तीसगांव. येकुण ९ गांवे. नवगांव जहागीर सरदेशमुखी बाबत वगैरे जे कांहीं अंमल आहे ते देशमुखी व इनामी जहागीरी घरवाडे वगैरे वतनबाब खेरीज करून बाकी दरोबस्त अंमल सरकार इंग्रजीचे सुप्रत करून द्यावें आणि हुजूर इत्तला करावा. कळावे मोर्तबसुद.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 331 23-7-1861 A.D.

The Agent at Chandwad is ordered to hand over 9 villages (mentioned in the order) to the British Government in exchange of Nemawar, Satwas etc. received from that Government by His Highness in Central India.

Deshmukhi and certain other privileges are precluded from the exchange.

---

**अ. नं. ३३२** **श्री म्हाळसाकांत**

ता. २४ जून, इसवी सन १८६३

हुजूर हुकमाचे टिप्पणः यादी ता.२४ माहे जून सन १८६३ इ. रोजीं दरबारांत अहलकार हाजर जाहल्यावर सरकार आज्ञा जाहली कीं, सरकार रियासतीत पार्लमेंट सभा मुकरर होऊन, सभेचे मेंबर नेमले जातील. त्यांचे सल्ल्यानीं काम व्हावें. त्याजवरून सर्वांची सम्मती हेच कीं :

पार्लमेंट आजच होऊं शकणार नाहीं. करितां हल्लीं कौन्सिल मुकरर करून कौन्सिलचे सल्लेनी रियासतीचें काम व्हावें. त्यावरून सरकार आज्ञा जाहली कीं, कौन्सिलविषयीं सर्वांनीं सल्ला दिल्ही ती मंजूर आहे.

**कौन्सिलांतील सभासद**

| | |
|---|---|
| १ रामराव नारायण दिवाण | १ काशीराव दादासाहेब होळकर |
| १ दाजीसाहेब किबे | १ खुमानसिंग बक्षीसाहेब |
| १ राव रामचंद्रराव भाऊसाहेब रेशीमवाले | १ विनायकराव गोपाल |
| १ भवानीसिंग सरनौबत | १ भीमगीर बाबा |
| १ ठाकोरप्रसाद कर्नेल | १ माधवसिंग ठाकूर |
| १ बेनर्ड फिनवीकसाहेब | १ गणेश सिताराम सुभे |
| १ रामचंद्र विठ्ठल व्यास वकील | १ माधवराव विसाजी |
| १ गोविंदराव खजांची | ० लंग |
| ...... | ....... |
| ८ | ७ |

येकुण १५ सभासद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 332 24-6-1863 A.D.

The Holkar Government nominates a Sate-Council of 15 Members to aid the Government in administration. The nominees are mentioned.

---

**अ. नं. ३३३** **श्री म्हाळसाकांत**

नंबर ३६६, ता. १ फेब्रुवारी, इसवी सन १८६५

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत तुकोजी होळकर |

हरिभक्त परायण वेदमूर्ती राजश्री गोपालजी बिन मनसाराम बिन जयराम खेडावाल ब्राह्मण वास्तव्य कसबे महेश्वर. सेवक तुकोजीराव होळकर दंडवत विनंती उपरि शके १७८६ धाता नाम संवत्सरे रेवातीरे. आपण फारसत्पात्र व श्री गोपालकृष्णाचे चरणीं दृढभाव असून कुटुंबवत्सल आहांत. आपले घरीं चिरंजीव राजश्री शिवाजीरावबाबा यांचा जन्म होऊन पांच वर्षांचें वय होईपर्यंत राहिले. आपण त्यांचे पुत्रवत् लालनपालन केलें व सुमूहूर्ते महोत्सव केला. याकरितां आपले कुटुंबनिर्वाहास मौजे सोमाखेडी तालुकेचोळी प्रगणे महेश्वर हे गांव इनाम जहागीर देण्याचा ठराव बरहुकुम यादी मखलीसीची. गांवचा कुल रकबा जमीन बिघे सुमारें १०४८.२ लायक, बागाईत, जिराईत व पडित सुद्धां एकन्दर एक हजार अठ्ठेचाळीस बिघे दोन विश्वे जमीन यापैकीं हक्कदार व नामदार व सरदेशमुखी व सरकारीबाग, बावडी व गढी, उभा मार्ग, दिवाणी फौजदारी अंमलखेरीज करून बाकी दरोबस्त अंमल जल, तृण, काष्ट, पाषाण, निधीनिक्षेप सुद्धां इनामी जहागीर देण्याचा ठराव करून हें पत्र लेखन केलें असे. तरी साल मजकुर सन १२७४ फसली सालपासून आपले दुमाला करून गांवचा उपभोग निर्वेधपणें पुत्र-पौत्रादि वंशपरंपरा घेऊन सरकार दौलतीचें अभीष्टचिंतन करीत जाणें. रवाना चंद्र ४ माहे रमजान संमत १९२१ बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**जहागिरदाराचे दप्तर**

No. 333 1-2-1865 A.D.

H. H. Maharaja Tukojeerao grants Mauza Somakhedi (Pargana Maheshwar) hereditarily to Gopaljee Khedawal Bramhin as in the latter's house Prince Shivajirao was born, and brought up for 5 years with great care and diligence.

---

**अ. नं. ३३४** **श्री म्हाळसाकांत**

(श्रीमंतांचा शिक्का) मुलकी नंबर ७१, ता. २९ सप्टेंबर, इसवी सन १८६५

राजश्री खुमानसिंग बक्षी गोसावी यांसी. स्नेहांकित अहिल्यान दरबार सरकार होळकर रामराम विनंती उपरि. बिजागडचा मामला आपलेकडे इजारा होता, सरकारखालसा केला जाऊन पट्याची मियाद पुरी होईपावेतों दोनशें रुपये दरमाह खजिन्यांतून सरकार बिजागडचे नांवें लिहून आपल्यास दिला जात होता. परंतु आपण सरकार नोकरी चांगली बजावून, सरकारांत सल्ला विचाराचें काम देत आहां आणि हमेशा हुजूर हाजर राहून सरकारी कामावर चांगलें रितीनें आपलें लक्ष आहे. यास्तव सरकार-मर्जी प्रसन्न होऊन सदरहू हमेशाकरितां आपल्यास सरदारी लवाजम्याबद्दल देण्याचा ठराव करून हें पत्र लिहिण्यात येतें कीं, सन १२७५ फसली अव्वल सालापासून दोनशें २०० रुपये दरमाह सरकार बिजागडचे नावें न लिहितां जंत्रीचे ठरावावर लागू करून घेऊन आपल्यास देत जाणेंविषयीं खजिन्यास हुकूम झाला आहे. रवाना ता.२९ सप्टेंबर सन १८६५ इसवी. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

रुजु गिरमाजी त्रिंबक चिटणीस हुजूर.

**सरकारी रेकार्ड**

No. 334

29-9-1865 A.D.

His Higness Maharaja Tukojeerao, was pleased to grant a monthly allowance of Rs. 200/- to Sardar Khuman Singh Baxi for Lavajama, in recognition of his conscientious and diligent service to the Sarkar.

---

**अ. नं. ३३५** **श्री शंकर**

ता. ३० सप्टेंबर, इसवी सन १८६५

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>यशवंतराव सुत तुकोजी होळकर |
|---|

वज्रचुडे पंडित सौभाग्यवती मतप्रणित भार्याभागीर्थी यांसी प्रती. तुकोजी होळकर आशीर्वाद उपरि. तालुके गांगुरणी प्रगणे जिरापूर माचलपूर पैकीं देह. ३२ हा तालुका तुम्हांस जहागीर देऊन खासगी इलाख्यांत लावून देण्यांत आला आहे व या जहागिरीची वहिवाट आहे त्या शिरस्त्याप्रमाणें वहिवाट ठेवावी व लक्षांत असूं द्यावें कीं, ही जहागीर वरकड

जहागिरदारांपेक्षा वेगळ्या शिरस्त्याची आहे व राजकीय शक्ती आमची जी आहे त्यासुद्धां ही जहागीर तुम्हास देण्यांत आली आहे. फक्त परराज्याविषयीं जें काम पडेल तें दरबारचे मार्फत होत जातील आणि कोणत्याही तऱ्हेचा उपसर्ग सरकारकडून लागणार नाहीं. तुम्ही आपली स्वतंत्र वर्तणूक या जहागिरीवर ठेवावी. सुरुसन १२७५ फसली. संमत १९२२ मिती आश्विन शुद्ध १० शके १७८७ बहुत काय लिहिणें हा आशीर्वाद. श्रीमोर्तबसुद.

**हुजूर फडणीसी रेकार्ड**

No. 335 30-9-1865 A.D.

His Highness Maharaja Tukojeerao grants Taluka Gangurni (Pargana Jirapur Machalpur) under Khasgi to his consort, Her Highness Saubhagyawati Maharani Bhagirthibai Saheb, with political powers that the Maharaja himself holds.

---

**अ. नं. ३३६**

## श्री शंकर

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर अहिल्या स्वरूप
कृष्णाबाई स्नुषा सौभाग्यवती भागीरथीबाई होळकर

ता. १ डिसेंबर, इसवी सन १८६५

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बिहारीलाल बिन मनसाराम व्यास सांदिपन गोत्र वत्स शाखा माध्यंदिनी वास्तव्य श्रीक्षेत्र अवंतिका स्वाो सेवक सौभाग्यवती भागीरथीबाई होळकर दंडवत विनंती उपरि. कैलासवासी म्हाळसाबाईसाहेब यांनीं श्री लीलापुरुषोत्तमाचें मंदिर क्षेत्र मजकुरीं बांधून श्रीची स्थापना सन १२७२ फसली संमत १९१९ चे सालीं केली. तेथील श्रीची पूजाअर्च्या यथासांग आम्ही करीत जाऊं म्हणून सरकारांत विदीत-केल्यावरून, तुम्ही सत्पात्र, श्रीचीपूजा यथासांग कराल, असे ध्यानास येऊन श्रीचे पूजानैवेद्यानिमित्य नेमणूक सालिना खर्चाकरितां रु.४०० चारशें संमत १९२२ चे सालपासून देण्याचे ठरून खर्चाचा ब्याडा :

| | | | |
|---|---|---|---|
| ४८ | नित्यनैवेद्याकडे दरमहा रु.४ प्राो. | १२ | फुलें हार तुळसी दरमहा १ |
| १२ | नित्यप्रसाद दोन वेळां द.१ प्राो. | ९ | धूपदीप कापूर दरमहा बारा आणे. |
| ७० | जन्मअष्टमी पोशाख व उत्सवाबद्दल. | ४५ | तेल रोशनाईकडे. |
| २५ | अन्नकोट ५, ५ कोजागिरी, ५ वसंतपंचमी, ५ डोलग्यारस, ५ रामनवमी बद्दल उत्सव खर्च.... | १५ | मरामत खर्च. |
| | | ...... | |
| | | ८१ | |

१६४ बद्दल मुशाहिरे खर्च पुजारी दर ६० दरमहा ५
व शिपाई २, ९६ दरमहा ४ प्रो. मोलकरीण, ६
भंगी रु.२, येकुण १६४

……

३१९

येकुण ४००

सदरहुप्रमाणें दरसाल नेमणूक करून देऊन श्रीचीपूजा ठरावाप्रमाणें जोंपर्यंत तुम्हांकडून व तुमच्या वंशजांकडून यथासांग होत जाईल तोंपावेतों ह्या संस्थानाची वहिवाट चालविणें ठरवून ही सनद सादर केली असे. तरी सदरीं लिहिलेंले नेमणुकीप्रमाणें ४०० खाजगी जामदारखान्याकडून वंशपरंपरा दरसाल घेत जाऊन श्रींची पूजा, खर्च यथासांग करून सरकारदौलतीचें अभीष्टचिंतन करीत जाणें. रवाना छ११ रज्जब. सीतसीतेन मयातेन व अल्लफ हे विनंती मोर्तबसुद.

**व्याससांदिपन दप्तर.**

No. 336 1-12-1865 A.D.

A Sanad is passed by the "Khasgi" granting hereditarily Rs. 400/- annually to Biharilal Vyas for the worship etc., of Shree Lila Purushottam whose temple was built at Ujjan by the late Mhalsabai Saheba.

---

**अ. नं. ३३७** **श्री**

मुलकी नंबर ३४, ता.४ मार्च, इसवी सन १८६९

साहेबांचे सेवेसीं आज्ञाधारक सदाशिव तुकदेव गुमास्ते निसबत देशमुखी परगणे चांदवड. कृतानेक रामराम विज्ञापना. सरकार कामावर हजर असो. विशेष. कसबे सिवून, धोंधलगांव, वेरुळ, ही गांवे जहागीर कैलासवासी श्रीमंत मातोश्री अहिल्याबाईसाहेब यांस निजाम सरकारांतून दिपवाळीनिमित्य चोळीखर्चास मिळाली असोन वहिवाट पस्तीस, चाळीस, वर्षे जाहली. त्याचे वहिवाटीबद्दल कागदपत्र मिळावे व पाटीलकीबद्दल वहिवाटीचे कागदपत्र मिळाल्याबद्दल रिपोर्ट मु. नंबर ७ चा केला आहे. त्यांत हैदराबादचे रेसिडेंटाचे नांवें चक्ती व कागदपत्र मिळण्याबद्दल मजकुर आहे. परंतु सदरहू जहागीर वहिवाटीबद्दल झडत्या व ताळेबंद व सरकारी हुकूम याप्रमाणें कागद मौजे बोरसर प्रगणे वैजापूर इलाखा मोगलाई येथील कुळकर्णी यांजपाशीं निघाले आहेत. त्यांजपाशी मागतां, शंभर रुपये मजला द्याल तर हे कागद तुम्हास देईन. याप्रमाणें म्हणणें आहे. हे कागद घेतल्यास पुराव्याचे उपयोगी असोन उपयक्त दिसते. जाणोन जाहीर केलें आहे. सरकारांत सदरहूसंबंधीं पुराव्याचे कागदपत्र

असल्यास तपास होऊन आम्हास मिळावे. सारांश रेसिडेंटाकडील चक्ती हैदराबादचे रेसिडेंटाचे नांवें एकंदर मोगलाई इलाख्यांत वतनबाबीचे कामीं व जहागीरचे कामी, माझे नांवें (सदाशिव तुकदेव) मुखत्यारपत्र रेसिदेंटाकडे पाठविण्याची तजवीज व्हावी. म्हणजे मौजे बाभूळगांव, जामगांव, गांडापूर, कसबे वेरुळ, मौजे पारनेर परगणे अंबाड, वगैरे महालानिहाय पाटीलक्यासंबंधीं कारवाई करण्यास सोईस्कर होणार आहेः कारण मोगलाई इलाख्यांतील कामदार लोक निजाम सरकारचे हुकूमाचा आक्षेप घेतात. तरी माझे नांवचे मुखत्यारपत्राचा इतल्ला त्यांजकडेही होणें योग्य आहे. ह्याप्रमाणें व्यवस्था जाहली म्हणजे आम्ही हैदराबादेस जाऊन एकंदर कामाची तजवीज पाहून, होईल तो मजकुर सरकारांत जाहीर करूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 337 4-3-1869 A.D.

The Agent at Chandwad request His Highness to supply him with "Letters of Authority" so that he will be enabled to make search of past papers in the Nijam's territory. Important privileges are held by the Holkar Sarkar in that territory.

---

## अ. नं. ३३८ श्री शंकर

(शिक्का) नंबर ९६, ता. १४ आक्टोबर, इसवी सन १८६९

वेदमूर्ती राजश्री मल्हारभट बिन गोविंदभट इबिन पुरूषोत्तमभट उपनाम मुळे गोत्र काश्यप सूत्र कात्यायन शाखा माध्यंदिन राहणार संगमनेर, हल्लीं वस्ती संस्थान महेश्वर स्वामींचे सेवेशी सेवक तुकोजीराव होळकर दंडवत विनंती उपरि शके १७९१ नर्मदा उत्तर तीरः तुम्ही सरकारांत विदीत केलें कीं, आमचे पूर्वजांस पूर्वी सरकारांतून दक्षिण प्रांतीं मौजे जळगांव जिल्हा अहमदनगर हा गांव जहागीर देऊन वंशपरंपरेची सनद करून दिली. पुढें महतपूरची लढाई जाहल्यावर तिकडील सर्व मुलूख इंग्रज सरकारांत गेला. त्यामुळें त्यांचे कायद्यामुळें वसूल वासलातीस हरकत होते. करितां मोबदल्यात दुसरा गांव मिळावा म्हणोन; त्यावरून मनास आणितां. तुम्ही पूर्वीपासून सरकारचे आश्रयानें निर्वाह करीत आले व आपलीही हीच इच्छा. सबब गांव बदल्यात घेणें दुसरेंही जहागिरदारें कबूल केलें. हे काम बदल्याचे कामांत मदत दिल्यासारखे होऊन, पूर्वीप्रमाणें जहागिरदार आपले इलाख्यांत राहावे. हें काम सरकार मर्जीनुरूप केल्यावरून, मौजे जळगांव याचे मोबदल्यांत मौजे मातमूर प्रा॰ महेश्वर हा गांव इनाम जहागीर वंशपरंपरा चालविण्याचा ठराव झाला. त्यावरून जळगांव येथील जमा बदल्याचे आकारांत लागू झाली. मातमूरचा आकार पैमाशीअन्वयें किती झाला

याजबद्दल फर्द आमीन प्राो मजकूर यांजकडून आला तो हुजूर पाहण्यांत येऊन, त्या आकारासी रुजु मुबादला करूं पाहतां त्याचा तपशील येणेंप्रमाणें :

| | | | |
|---|---|---|---|
| ६१९-१०-९ | मौजे जळगांव प्राो चांदवड, हा गांव इंग्रज सरकारांत मोबदला दिला. जहागीर अंमल, बदला वसूल मोबदल्याचे बेरजेंत जमा : | १ | मौजे मातमूर प्र.महेश्वर हा गांव जळगांवचे ऐवजी मोबदला. जमेचा तपशील २०८६-८-६ कुल रखबा बिघे वजा इनाम जमीन धर्मादाय वगैरे सरदेशमुखी २५ मिळून ९२-१४. |
| २४४-१३-६ | जास्ती सरकारांतून देण्याचा ठराव. त्या प्राो नांदुर मध्यमेश्वरचे जमिनीबद्दल : दोन अण्णी | १ | नदीनाला, खराब, पडित, वजा करून, बाकी जमीन बिघे ५२०।३ यांसी रीतवारी सनदेंत लिहिलें प्राो दामीमेट वजा होऊन बाकी निव्वळ वसूल बेरीज ९५३-९-३ |

...............

८६४-९-३

सदरहूप्रमाणें जमा, रकबा, असोन जळगांवचे बदला मौजे मातमूर हा गांव तुम्हास इनाम जहागीर द्यावयाचा ठरून बरहु यादी मखलसीची. अलाहिदा वर्तमान भावी कमाविसदारांचे नांवें पत्र करून देण्यांत येऊन, हे सनद सादर केली आहे. तरी तुम्हांकडे बदल्यांत जमा लागू झाली व सरकारांतून जास्ती दोनअण्णी, वगैरे मुजरा दिल्या त्या सुद्धां रु.८६४-९-३ त्याचे मोबदला मातमूर जमा रु. ९५३-९-३ त्याजवरून पाहतां रुपये ८९ बागाचे जमीन महसुलाचे ३० व आंबराइचे ५९. येकुण ८९ हल्लीं एकवीस साला पट्टेबंदी ठराव झाला. त्याची मियाद सन १२९६ फसली, संमत १९४३ पावेतों तुम्हांपासून ठरावप्राो घेतले जातील. पट्ट्याची मियाद पुरी झालेवर सदरहू बाग, आमराई सरकारांत खालसा केलें जातील. बाग आमराई गांवचे पट्ट्यात लागू असलेमुळें मियादीपैकीं बाग आमराइचे रुपये तुम्हांपासून घेतले जातील. जसे तुम्हांस जहागीर गांवची जमा वाढविण्याचा अखत्यार आहे, त्या प्राो बाग आमराईची जमा वाढविण्याचा अखत्यार सरकारचा आहे व सरदेशमुखीची इनाम जमीन बिघे २५ मुकरर करून दिली. त्याची वहिवाट सरकारांतून केली जाईल व दामीसरदेशमुखी दरसदे ७ मुकरर करून दिली आहे, भेटीचे ५ दरसाल तुम्ही देत जाऊन सदरहू लिहिल्याअन्वयें प्राो मौजे मातमूर हा गांव मुबादल्यांत दिला गेला तरी सरदेशमुखी, सायर, जकात व उभा मार्ग, कलाली, इनाम, हक्कदार, दिवाणी फौजदारी अंमल खेरीजकरून बाकी सरकारी अंमल ऐनकाळी, थळमोड, थळभरित, आमराई वगैरे जल, तरू, सुद्धा गांवमजकुर तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा उत्पन्नाचा उपभोग घेत जावून, स्वस्थचित्ते स्नान-संध्या करून सरकार दौलतीचें अभीष्टचिंतन करीत जाणें आणि हल्लीं

हा गांव तुम्हास जहागीर दिला. या गांवांत स्वारीभेट, बेगारीची तोशीस कांहीं न लागतां मामुली भेट कमाविसदार, सिरस्तेदार व जमीदार वगैरेच्या लागत आहेत त्या मात्र घेतल्या जातील. कदाचित या गांवचे जमीनीत हर कोठें खदान निघल्यास जितके जमीनीत खदान निघेल तितकी जमीन घेतली जाऊन, त्याचे मोबदला दुसरी जमीन दिली जाईल आणि कारणपरत्वें सरकारांत गादीनशीन निमित्य किंवा पुत्रोत्साह निमित्य, अगर लग्नसमारंभानिमित्य, नजराणा घेणेंचा ठराव झाल्यास सर्वांचे शिरस्ते तुम्हांपासून घेतला जाईल. रवाना छ ८ रजब सन १२७९ ता.१४ आक्टोबर सन १८६९ इ.हे विनंती. मोर्तबसुद.

**जहागिरदार दप्तर.**

No. 338 14-10-1869 A.D.

H. H. Maharaja Tukoji Rao grants Mauza Matmur (Pargana Maheshwar) hereditarily to Malharbhatt Mulye in exchange of Mauza Jalgaon (District Ahmednagar) held by him formerly.

---

## अ. नं. ३३९ श्री शंकर म्हाळसाकांत

नंबर ३५९, ता. २२ मार्च, इसवी सन १८७१

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
यशवंतराव सुत तुकोजी होळकर

वेदमूर्ती राजश्री दामोदरभट बिन बाळकृष्णभट ईबिन रामचन्द्रभट उपनाम शौचे गोत्र वात्सायन शाखा माध्यंदिन, वास्तव्य जेतापूर प्रांत बागलान हल्लीं वास्तव्य मुक्काम इंदूर स्वाो सेवेसीं सेवक तुकोजीराव होळकर दंडवत विनंती उपरि शके १७९३ सुभानुनाम संवत्सरे नर्मदा उत्तरेतीरे तुम्ही हुजूर विदीत केलें कीं, पूर्वी कैलासवासी यशवंतराव महाराज यांनीं आमचे आजे रामचन्द्रभटजी यांजला शके १७३१ सालीं मौजे सरवाले तर्फे निझर प्राो नंदुरबार हा गांव जहागीर देऊन वंशपरंपरेची सनद करून दिली. पुढें महतपूरची लढाई जाहलेवर तिकडील सर्व मुलूख इंग्रज सरकारांत दिला. त्यात मौजे मजकुर हा गांव जहागीर चालून सरकारी अंमल असेल तो घेत जावा म्हणोन तहनाम्यांत ठराव जाल्यामुळें हा गांव इंग्रज सरकारचे हद्दीत असल्यानें वसूलवासलात सुरळीत येत नसून दिक्कत पडत आहे. तरी सरकारांनीं सदरहू गांव मोबादल्यांत लावून देऊन त्याचे मोबादला सरकार-इलाख्यांत दुसरा गांव मिळावा म्हणोन कळवून सोडचिठ्ठी दिली. त्यावरून मनास आणितां तुम्ही इमानदारीनें पूर्वीपासून वडील सरकारआश्रयाने निर्वाह करीत आले. गांवाचे बदल्यामुळें मोबादल्याचे कामांत

मदत केल्यासारखें आहे. सबब मौजे सरवाले हा गांव मोबादल्यांत देऊन मौजे बिजेपूर प्राो बेटमा हा गांव जहागीर वंशपरंपरेने देण्याचा ठराव झाला. त्याचा आकार पैमाशीप्रमाणें किती आहे याजबद्दल आमीन परगणे बेटमा यांजकडून संमत १९२५ चे सालीं जमाबंदीपत्रक हुजूर आले त्या बेरजेसीं मुकाबला पाहतां तुम्हाकडे जहागीर गांव चालत होता त्याची जमा बदल्यांत किती लागू जाहली व त्याजबद्दल परवर्षी होऊन जास्त जमा लागू करून घेतलीं त्याचा तपशील :

१ मौजे सरवाळे प्रांत बागलान मोबादल्याचें बेरजेत जमा केलें ते बिघे पांचशें त्र्याहत्तर, चौदा विस्वे : जास्त सरकारांतून देण्याचा ठराव जाहला. गांव खर्चा बाा, ८०-२-२ दोनअण्णी बाा ८१-११-० अज्जीजास्त ३४ १०-३ येकुण १९६-७-५.

१ मौजे बिजेपूर प्राो बेटमा हा गांव तुम्हास इनाम जहागीर दक्षिणचे मोबादल्यांत देणें ठरलें. त्याचा रकबा संमत १९२५ चे जमाबंदी प्राो जमीन बिघे १६३५-४ महाल शिरस्ते अठरा विश्वेचे मानानें बिघे १८६२ बिघे सवातेरा विश्वे पैकीं वजा इनाम जमीन १६१-१३-४ सरदेशमुखीकडे २५ अवंतर लोकांकडे १३६-१३-४ नदीनाला खराब ८४८-१६-३ पडित जमीन २०२. मौजे मोहनाकडे काकडझगड्यांत जमीन दिली. ५-११-३ येकुण १२१८-२-९ बाकी विहीत कीर्दसार जमीन बिघे ६४४-१०-६ आकार रु. ७६९-१५.

सदरहू प्राो गांवची जमा व रकबा वगैरे असोन मौजे बिजेपूर देण्याचा ठराव याद मखलीसीची होऊन सरहद्दीचा नकाशा दिला आहे. त्याप्रमाणें सायर जकात, सरदेशमुखी, उभामार्ग, इनामदार, हक्कदार, दिवाणी फौजदारी अंमल खेरीज करून बाकी सरकारी अंमल ऐनकाळीं व थलमोड, थलभरीत आंबराई तुलाई, वगैरे जल, तरू सुद्धां गांव मजकुर तुम्ही आपले दुमाला करून उत्पन्नाचा उपभोग पुत्रपौत्रादि वंशपरंपरे घेत जाऊन, स्वस्थपणें स्नानसंध्याकरून सरकारदौलतीचें अभीष्ट चिंतन करीत जाणें. ह्या गांवांत बेगारीची तोशीस कांहीं न लागतां, मामुलीभेटी कमाविसदार, सिरस्तेदार, जमीदाराच्या लागत आहेत त्या घेतल्या जातील. सरदेशमुखीची वहिवाट सरकारांतून केली जाऊन, दामी सरदेशमुखीची शेकडा, ७-५ तुम्हांकडून घेतले जातील. कलाली ठेवली जाऊं नये. दुसरें कोणतेही प्रकारची खदान निघाल्यास ती जमीन सरकारांत घेतली जाऊन त्याबदला दुसरी जमीन दिली जाईल. कारणपरत्वें गादीनशीन, पुत्रोत्साह, लग्न समारंभानिमित्य नजराण्याचा ठराव जाहल्यास सर्वांचे सिरस्तेप्रमाणें तुम्हांपासूनही घेतला जाईल. रवाना छ ३० जिल्हेज सन १२८० फसली. ता. २२ मार्च इसवी सन १८७१ बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**जहागिरदार दप्तर**

No. 339 22-3-1871 A.D.

H. H. Maharaja Tukojeerao grants Mauza Bijepur (Pargana Betma)

hereditarily to Damodarbhatt Shauche in exchange of Mauza Sarwale (Pargana Nandurbar) held by his ancestors formerly.

---

अ. नं. ३४०

**श्री**

ता. २४ आगस्ट, इसवी सन १८७३

श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबासाहेब होळकरसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक दरयावसिंग वल्द भीमानसिंग ठाकूर हिंदोला बारा. कृतानेक रामराम विज्ञापना आयसाके मैं सरकारपल्लोका टाकेदार होकर मेरे तमाम गांवकी दिवाणी, फौजदारी, मुलकीं, वगैरा कामकी वर्दी रिपोर्ट अव्वल से परगणे चिखलदे कचेरी में व लवाणी थाने में होकर इधर से हुकुम होवे, इसमाफिक काम होता था और हाल में वहिवाट चालू होते, अब एजंट साहेब भोपावर इन्होंने हमारेपर सुप्रदंटी कारकून रखके दिवाणी, फौजदारी, मुलकी कामसुद्धां बंदोबस्त किया है. इस बाबत मैंने अर्जी रेसिदेंटसाहेब छावणी इंदौर, इनके नाम कीं भेजी है. एजंट साहेब तरफ सुप्रदंटी रखने में हमारी खुशी नहीं है. अव्वल से वहिवाट हमारे मालक होळकर सरकार है. सो इनके तरफ से एक मुत्सदी रहने से चिखलदे तरफ से हमारा सबतरेसे बंदोबस्त रखके, दिवाणी, फौजदारी, काम का इत्तला चिखलदे कचेरी में देते आये, माफिक हालमें भी वहिवाट चालू है उसमाफिक चालू रहेगा. इसमें हम खुशी हैं. वास्ते अर्ज है कि :

हमारे यहां एजंट साहेब की दखल रहनेसे हाम लोगोंकु बडी तकलीफ है. हमारी माजी व सबके सल्ला से अर्ज गुजराई है के सुप्रदंटी उठाकर सरकार तरफ से कारकून रहने से हामकु निहायत खुशी है. इसका बंदोबस्त सरकार तरफ से होवेगा ऐसी मनशा होने से आरजी लिखी है. सो ध्यान से लाके बंदोबस्त करना मालक समर्थ है. मैं सरकार-पल्लोका टाकेदार हूं. मि.भादवा सुदी २ संमत १९३० हस्ताक्षर आनंदराव परशराम कारकून.

निशानी चुडी (बंगडी) तकतबाई व सकरबाई
ठकरानी, मवास हिंदोला, निमखेडा

**लवाणी रेकार्ड**

No. 340 24-8-1873 A.D.

The Thakur of Hindola applies that the Holkar Sarkar, having been authority over his Sansthan for a long time, should supervise, and not the Agent-Bhopawar,

---

**अ. नं. ३४१** **श्री शंकर म्हाळसाकांत**

(शिक्का) नंबर ३०, ता.५ आक्टोबर, इसवी सन १८७३

अजसरकार राजश्री तुकोजीराव होळकर ताह कनीराम वल्द दयाराम आजे लालजी जात नामदेव छिपे राहणार कसबे महेश्वर. तुम्ही हुजुर इंदूर मुक्कामीं अर्ज केला कीं, आम्हांस अजितपूर हा गांव इनाम जहागीर आहे. परंतु यांत आमचे प्रपंचाचा निर्वाह होत नाहीं. सबब त्याऐवजीं दुसरा गांव मौजे मेहतवाड प्रगणे महेश्वर याजबद्दल सनद मिळावी. म्हणौन त्याजवरून मनास आणितां तुमची स्त्री धात्री नामें पानबाई इजला चिरंजीव राजश्री शिवाजीराव बाबा यांचा जन्म झाल्यावर धात्री ठेविली होती. तिनें एकनिष्ठें चिरंजीवाची सुश्रुशा करून उत्तम प्रकारें लालनपालन केलें, सबब तुम्हावर कृपाळू होऊन अजितपूरची सनद संमत १९२१ साली करून दिली होती. परंतु तुमचे अर्जावरून परत अजितपूर सरकारांत घेऊन त्याऐवजीं मेहतवाडा हा गांव सन १२८३ फसली सालपासून तुम्हाकडे इनाम जहागीर चालवावयाचा ठरून याद मखलिसीची बिघे ७४२ पैकीं वजा इनाम सरदेशमुखी, होऊन ६९६-१३ बागाइत, जिराइत, लायक, पडित, बीड, चरणोई, मिळून सहाशे शाहन्नव बिघे, तेरा विस्वे जमीन गांवचा रकबा, देवस्थान, धर्मादाय, हक्कदार, इनामदार, सायर जकात, सरदेशमुखी, उभामार्ग, कलाली, दिवाणी, फौजदारी, अंमल खेरीज करून दरोबस्त इनाम जहागीर द्यावयाचें ठरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी पुत्रपौत्रादि वंशपरंपरा उपभोग घेत जाणें.

१ मौजे मजकुरचे हद्दीत कोणतेही धातुची खाण निघाल्यास ती जमीन सरकारांत घेऊन त्याचे मुबादला दुसरी जमीन दिली जाईल जाणिजे. छ.१२ साबान सन १२८३ फसली ता. ५ आक्टोबर इसवी सन १८७३. मोर्तबसुद.

**जहागीर दप्तर**

No. 341 5-10-1873 A.D.

H. H. Maharaja Tukojirao passes a Sanad granting Mauza Mehatwada (Pargana Maheshwar) to Kaniram Dayaram hereditarily in recognition of the services rendered by his wife as wet nurse to Prince Shivajirao.

The old grant of Mauza Ajitpura is revoked at his request.

---

**अ. नं. ३४२** **श्री**

ता. ४ आक्टोबर, इसवी सन १८७५

श्रीमंत महाराज सरकार तुकोजीराव बाबासाहेब होळकर बहादुर यांचे सेवेसीं.

आज्ञाधारक शिवराम धोंडदेव विभूते दरखी आमीन परगणे थांदले पेटलावद कृतानेक रामराम विज्ञापना तागाइत मजकुरपावेतों सरकारकामीं हजर असों. विशेष :

१ मजला समक्ष हुकुम लालबागेंत जाहला कीं जमाखर्चाचा दाखला अमीन लोक बरोबर ठेवीत नाहींत त्यामुळें दाखला मिळण्यास घोटाळा पडतो, याजबद्दल वाजवी रीतीनें दाखले ठेऊन कमीजास्तीचा इतल्ला देत जावा ऐसियास : दाखला ठेवण्याचें काम आमचें पूर्वापार असून, मध्यंतरी संमत १९२५ चे सालीं दरखीआमीनाने चिटणिशीचें काम करीत जावें. त्याअन्वयें तामील होत आहे. त्यामुळें दाखले ठेवण्यास वेळ मिळत नाहीं व महालचे आमीन लोक दाखले वक्तसीर देत नाहींत व कारण सरकार विचारतात, त्यावेळीं नाईलाज होतो. याकरितां चिटणिसीचें कामांतून अलाहिदा करून पूर्वीप्रमाणें दरखी आमीनाचें कर्तव्य कीं सर्व कामावर देखरेख व सरकार नफानुकसानीचीं कामें पाहून परभारे सरकारांत इतल्ला करणें; वगैरे कामे घेणेचा हुकूम जे अमीन लोक मुकरर होऊन येतात त्यांस व्हावा. पूर्वापार दरखी आमीनाचीं कामे खाली नमूद केल्याप्रमाणें आहेत.

१ नित्य जमाखर्चाची तारीख बंद जाहली कीं, त्याजवर रुजुची सही करणें व महिनमाह, बारमाही जाणारे कागदांवर तपासणी होणें. म्हणजे त्यामुळें गैरवहिवाटीचें काम चालणार नाही.

१ सरकारांतून ठाकूर, टाकेदार वगैरे ऐवजाबद्दल पावती होते, ती दरखी आमीनाचे रुजुवातीशिवाय होऊं नये. अलीकडे राजश्री भाऊ सिद्धेश्वर अमीन आल्यापासून त्यांनीं पूर्वीचा कार सर्व बंद केला. तो सुरू होणें म्हणजे जबाबदारी वहिवाटीची आमचेवर येईल. झाबवेवाले राजे व ठाकूर उमराव यांचे हक्क सरकारासी कसे काय आहेत, यांची वहिवाट बंद झाली तर सरकारहक्काचें नुकसान होणारे आहे. तरी योग्य मुलाहिजा होऊन हुकूम होणें तो व्हावा. श्रुत होय हे विज्ञापना.

(सही मोडीत) शिवराम धोंडदेव
दरखी आमीन थांदले पेटलावद.

## श्री शंकर

हुजूर हुकूम नंबर ९६१ ता. ३ डिसेंबर, इसवी सन १८७५

दरखी आमीन हे पूर्वींपासून जमाखर्चाचा दाखला ठेवीत होते, ते वेळेस कागदांवर सह्या यांच्या होत असत, त्याप्रमाणें आतांही दाखले ठेवण्याचा हुकूम दिला आहे. रिपोर्टांत लिहिल्याप्रमाणें व्यवस्था ठेवणेबद्दल, आमीन थांदले पेटलावद यांस हुकुम खुलासेवार जारी करावा. दस्तूर. बळवंतराव त्रिंबक निस्बत दिवाण.

**सरकारी रेकार्ड**

No. 342 4-10-1875 A.D.

The Darkhi Amin of Pargana Thandla - Petlawad submitted a report on the duties of Darkhi Amin as in vogue in past times. The Maharaja approved of the same, and passed orders accordingly.

---

अ. नं.३४३ **श्री**

ता. १ जानेवारी, इसवी सन १८७७

बक्षी खुमानसिंगजी लिहितात कीं, ता. १ जानेवारी रोजीं इंग्लंडचे राणीनें हिंदुस्थानचे बाहशाहीनचा किताब घेतला. सबब आज राजवाड्यांत दरबार झाला. १०१ तोफा सलामीच्या झाल्या. श्रीमंत सरकार दरबारांत येतांच २१ तोफा होऊन परत जातांना सलामीच्या २१ तोफा जाहल्या.

१ वाड्यांत रात्रीं रोशनाई खूब झाली. श्रीमंत महाराजसाहेबानीं दरबारचे वेळेस उत्तम भाषण केलें. त्यातील प्रमुख भाग येणेंप्रमाणें :"बादशाहजादी हिंदुस्थानचे डेरियाचा एक खांब आहे आणि रहीस (संस्थानिक) हे डेरियाच्या मेखा आहेत. मेखा जर मजबूत नसल्या तर, खांब उभा राहणार नाहीं " वगैरे.

१. ता.१९ जानेवारीस डेकोरेशनचा दरबार सबब बडेसाहेबांनीं श्रीमंत सरकारांस बादशहाजादीची तसबीर दिली. त्यावेळीं सलामीच्या तोफा बादशहाजादी बद्दल १०१ जाहल्या. धारचे राजेसाहेब दरबारास हजर होते.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 343 1-1-1877 A.D.

H. H. Maharaja's speech on the Day of Her Majesty the Queen of England assuming the title of Empress of India. The relation between the Empress and Indian Rulers regarding the Indian Empire is expressed by the illustration of tent and its pegs.

---

अ. नं. ३४४ **श्री**

ता. ९ नोव्हेंबर, इसवी सन १८८१

इंतजाम, व्यवस्था. श्रीमंत सरकार साहेबांची स्वारी प्रगणे थांदले पेटलावद महालीं येणार. त्यांचे दोन रोजापूर्वी, उमराव टाकेदार यांनीं पेटलावदेस येऊन दाखल जाहलें पाहिजे.

याजकरितां तालुकेनिहाय ठाकूर यांजला पत्रें लिहिणें. त्याजबद्दल विद्यमान बळवंतराव वामन बापट आमीन सुरू सन १२९१ फसली मिती कार्तिक वद्य ३ बुधवार संमत १९३८.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ताो | झकणावदा, ठाकूर जवानसिंग | १ | ताो | रायपुरा, ठाकूर बळवंतसिंग |
| १ | '' | करवड, ठाकूर प्रतापसिंग | १ | '' | सारंगी ठाकूर खुमानसिंग |
| १ | '' | जामली ठाकूर अमरसिंग | १ | '' | पाराबोरी, ठा.कुबेरसिंग |
| १ | '' | बडबेट ठाकूर दौलतसिंग | १ | '' | बोडायता, ठा.भोपतसिंह |
| १ | '' | खवासा, महाराज रघुनाथसिंग | १ | '' | घुगरी, ठाकूर गंभीरसिंग |
| १ | '' | बावडी ठाकूर ओंकारसिंग | १ | मौजे | कोदली ठाकूर माधवसिंग |
| १ | '' | नोगांवा, ठाकूर गोविंदसिंग | १ | '' | अंतरवेला, ठा.भेरुसिंग |
| १ | मौजे | हणमंत्या गोसावी रतीगीर | १ | '' | उमरकोठ, ठाकूर |
| १ | '' | गेहेंडी, ठाकूर नाथसिंग | ० | '' | लंग |

येकुण सतरा जागेचे टाकेदार उमरावलोक यांजला पत्रें लिहिली गेली ता.९ माहे नोव्हेंबर सन १८८१ इसवी. सदरहू परवाने दफाते बारनिशींत नंबर १५ चे लिहिलें गेले. दस्तुर गोपाळ हिरालाल जमीदार.

रुजू शिवराम धोंडदेव दरखी आमीन परगणे पेटलावद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 344 9-11-1881 A.D.

Orders were issued to 17 Takedars (mentioned in the list) to present themselves before the Maharaja when the latter was to visit Paragana Thandla Petlawad.

---

## अ. नं. ३४५ श्री शंकर म्हाळसाकांत

ता. १० जानेवारी, इसवी सन १८८४

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
यशवंतराव सुत तुकोजी होळकर

मश्रुल अनाम, मनवरखां व एहमदखां वल्द महमदखां जामेदार नारायणगड यांसी विशेष. तुम्ही मौजे नेऊगुराडे मुक्कामीं सरकारस्वारी असतां येऊन अर्ज केला कीं, मौजे भीलखेडी परगणे नारायणगड हा गांव आमचेकडे इनामी जहागीर चालत असतां सदरहू गांवची सनद आमचेपाशीं नाहीं. असे हुजूर जाहीर जाहल्यावरून गांवचे जप्तीचा हुकूम

झाला. त्याजवरून सदरहू गांवाबद्दल कैलासवासी मल्हारराव महाराज यांनी मंघाजी व संक्राजी बारगळ यांजला संमत १८७८ चे सालीं चंद्र १२ मोहरमचे ताकीदपत्र करून दिलें. तें अस्सलपत्र आमचे भाऊबंद मल्हारगडास राहत आहे, त्यापाशीं असलेले, हुजूर दाखविण्यांत आलें आहे. तरी सदरहू ताकीदपत्र पाहण्यांत येऊन, गांव आमचे सुप्रत व्हावा आणि सनदही मिळावी, म्हणोन दिल्यावरून. तुमचेपाशीं असलेले कागदपत्र पाहतां गांव तुमचेकडे जहागीर चालविणें योग्य जाणून तुमचेकडे गांव वंशपरंपरा चालविण्याचा ठराव करण्यांत येऊन गांव तुमचे सुप्रत करून देण्यांत येऊन चकनामे पाठविणेंविषयीं अमीन नारायणगड यांस हुकूम झाला आहे. त्याप्रमाणें गांवचे जप्ती होते वेळीं गांवास ज्या गांवचे काकड लागले असतील त्या गांवचे वतनदार पाटील, पटवारी वगैरे व महालचे दरखदार, वतनदार यांचे समोर तुम्ही आपलें कुराण घेऊन व ईश्वरास स्मरून जो वास्तविक कदीमी काकड असेल तो शपथ घेऊन काकडावर चलावें, त्याप्रमाणें गांवचे हदबंदीचा चकनामा तयार होऊन आल्यावर तुम्हास सनद दिली जाईल. तुम्ही जहागिरदार असून सरकार जमिनीचें संरक्षण करणारे आहात व याचकरितां तुम्हास वतन आहे. सबब सदरहू जहागीर गांवांत सरकारी जमीन किंवा इतर इनामदार वगैरे जमीन सामील करणेची कल्पना तुम्ही व तुमचे वंशजानीं आयंदेकरितां मनांत वागवूं नये. अवंतर इनामदार व जहागिरदार यांजलाही असें करू देऊं नये. याजवर चांगली नजर ठेवावी व सरकार नोकरी इमानदारीनें तुम्ही व तुमचे ''वंशजानीं करीत जाणें. या उद्देशानीं तुम्हास ह्या गांवची सनद करून देण्यांचा हुकूम देण्यांत आला आहे. जाणिजे चंद्र १० रविलावल संमत १९४० ता. १० जानेवारी इसवी सन १८८४ मोर्तबसुद.

**जहागीर दप्तर**

No. 345 | 10-1-1884 A.D.

Maharaja Tukojeerao re-grants Mauza Bhikhedi (Pargana Narayangarh) to Manvarkhan and Ahmadkhan Jamedar as old Papers pertaining thereto were newly discovered.

---

**अ. नं. ३४६** **श्री**

ता. २७ नोव्हेंबर, इसवी सन १८८५

सीताराम सदाशिव अभ्यंकर रोजनामचेनवीस कडून : दिवाणसाहेबांचे सेवेसीं. सरकार स्वारी समागमें मुक्काम बिजासनी. बिजासनी कडील तोफखान्यांत सरकार कामीं हजर असो विशेषः श्रीमंत सरकारसाहेबांची तब्येत चांगली आहे. स्वारींतील हकीगत येणेंप्रमाणें:

१ ता.२५ मिनहु रोजीं अस्तमानीं स्वारी मेहरबान बडेसाहेब यांचे भेटीस कोठीवर

गेली होती. नायब चिटणीस, शामरावजी व फ्रांकसाहेब बरोबर होते. साहेब बग्गीपर्यंत पेशवाईस येऊन, आनंदयुक्त गोष्टी जाहल्या. आज रात्रीं साडेनऊ वाजतां बडेसाहेब, छोटेसाहेब व धर्मनारायण मुनशी, रेलमार्गे लष्करांत लाटसाहेबांचे दरबाराकरितां गेले. महाराजांकडून साहेब बहादुरजीस डाली पोंहचविली. डाली पाहून साहेब फार खुश जाहले व म्हणाले कीं, महाराज साहेबांचे बोलणे ह्या डालीपेक्षांही गोड आहे.

१ उदईक मदरशाची परीक्षा किल्ल्यावर आहे. स्वारी सात वाजतां जाईल. उद्यां व परवा दोन दिवस परीक्षा आहेत.

२ नायब फडणीस व गोविंदरावजी हे उभयतां रोजगुदस्त रात्रौपासून येथेंच मुक्कामास आहेत.

१ प्रातःकाळीं कचेरी जाहली. पंचेचाळीस कागदांची पेशी होऊन सह्या जाहल्या.

येणेंप्रमाणें हकीगत आहे. याशिवाय किरकोळ कामें बरीचशीं जाहलीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापनाः

**दिवाण पळसीकर रेकार्ड**

No. 346 27-11-1885 A.D.

A page in the Diary of the Maharaja. The Maharaja was to conduct examination of pupils in the Madarasa for two days etc. etc.

# संदर्भग्रंथ सूची


१. होळकरशाहीचा इतिहास, भाग १ व २
संपादक : वा. वा. ठाकूर (इ. स. १९४४/१९४५)

२. होळकर राज्याचे सरकारी रेकॉर्ड

३. हुजूर फडणीसी रेकॉर्ड

४. जहागीर दप्तर

५. दिवाण पळसीकर दप्तर

६. पळसी संस्थानचे दप्तर

७. सरकार बुळे यांचे दप्तर

८. कोटा येथील गुलगुले दप्तर

९. श्रीहरी नरहर जोशी, महेश्वर यांचे दप्तर

१०. व्यासंदीपन दप्तर

११. सरदार खाजगीवाले यांचे दप्तर

१२. चंद्रचूड दप्तर

१३. जेजुरी उपाध्ये यांचे दप्तर

१४. लवाणी रेकॉर्ड

१५. विभूते दरखी अमीन, पेटलावद यांचे दप्तर

१६. पेशवे रेकॉर्ड

१७. पंढरपूर येथील एकनाथ गोविंद उत्पात यांचे दप्तर

१८. वा. वा. खरेकृत ऐतिहासिक लेखसंग्रह

१९. इतिहासाचार्य राजवाडे यांचे ऐतिहासिक ग्रंथ, खंड २, खंड ३, खंड ६

२०. पुणे एलिनेशन रेकॉर्डपैकी सरंजाम, झाडे, राजमंडळ, स्वारीचे हिशोब वगैरे

२१. श्री. अ. ना. भागवत यांनी संशोधन केलेले कागदपत्र

२२. उर्दू-मराठी शब्दकोश - संपादक : श्रीपाद जोशी, प्रा. एन्. एस्. गोरेकर,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, मुंबई, १९६८

२३. आदर्श मराठी शब्दकोश - डॉ. प्र. न. जोशी
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, २००७


●

# शब्दार्थ / टीपा

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| ८ | ७ | **उफाटे** - उफराटे, विरुद्ध |
| ९ | ८ | **उपसर्ग** - त्रास, उपद्रव |
| | | **घरू** - घरगुती |
| १६ | १६ | **रोजमरा / रोजमुरा** - एका दिवसाचा पगार वा वेतन |
| १९ | १८ | **फरांसिस** - फ्रेंच |
| २३ | २० | **दामीदस्तुर** - कर आकारणीचा हक्क |
| २४ | २१ | **खलेल** - दंगा, दांडगाई (मूळ अरबी शब्द खलल) |
| २५ | २२ | **खिस्सा** - कमीपणा<br>*आपसांत झगडण्यात घरचा खिस्सा आणि बदनामी आहे.* |
| ४३ | ३३ | **अस्तमानीं** - मावळतीच्या वेळी |
| ४७ | ३६ | **लेश आहेत** - तयार आहेत<br>*तिन्ही कंपू लढाईस लेश आहेत.* |
| ६० | ४३ | **वाच्चाई** - गवगवा, वाच्यता |
| ६७ | ४८ | **गौरबरदास्त** - पूर्ण विचार |
| ७० | ५१ | **निसरसांड** - विचार, काळजी |
| ७१ | ५२ | **मवकुफ/मवसुफ (मोकुफ/मोसुफ)** - उपर्युक्त, वर दर्शविलेले, मशारनिल्हे |
| ,, | ५३ | **इस्तहारनामा** - जाहीरनामा, सविस्तर वृत्तांत |
| | | **रजाबंदी** - मर्जी, खुषी, रजामंदी |
| | | **मुजाहिम** - अडथळा, आडकाठी |
| ७३ | ५५ | **रबाब** - धाक, दरारा<br>**रफीक** - मित्र<br>**किलाफ** - संशय<br>**रहास** - रहिवास, निवास<br>**पक्काई** - हुशारी, परिपूर्णता |
| ,, | ५६ | **वाज खाल्ला** - धसका घेतला<br>**पगडीबंद** - पगडीची अदलाबदल करून निर्माण झालेले बंधुभावाचे नाते |
| ७४ | ५८ | **पोख्त** - पुरेशी |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| ८० | ६३ | **आद्योपांत** - अथपासून इतिपर्यंत, साद्यंत |
| | | **पैरवी** - विचार, व्यवस्था |
| | | *कित्येक पैरवीच्या गोष्टी बोलणेंत आल्या.* |
| ८३ | ६४ | **मुजरद आजुरदार** - खास जासूद |
| | | *तुम्ही मुजरद आजुरदारा समागमें पत्रें पाठविली, ती पावली.* |
| ८८ | ६९ | **निगेबानी** - देखभाल, निगराणी |
| | | **आसबाब** - मालमत्ता |
| ९० | ७१ | **ओहदा** - हुद्दा, अधिकाराचे स्थान |
| ९४ | ७४ | **बरेवजेनें** - तातडीने. |
| | | *सरंजाम पाठवून पारिपत्य बरेवजेनें करावें.* |
| १०९ | ८४ | **इतल्ला** - खबर, सूचना |
| ११३ | ८७ | **इस्तबारी / इस्तवारी** - वाढता सारा देण्याची पद्धत |
| ११९ | ९१ | **तलब** - तनखा, पगार |
| | | **गंगाकुराण होणें** - वादविवाद होणे |
| | | *त्यांनी पलटणांत पैगाम लावल्यामुळें त्यांची आपसांत गंगाकुराण होऊन गरोठचे मुक्कामीं पलटणाची तयारी केली.* |
| | | **तरहा करणें** - प्रयत्न करणे |
| | | *त्याची तोडजोड समजूत पाडण्याची तरहा केली होती.* |
| १२१ | ९४ | **कमबेश** - कमीअधिक |
| १२६ | ९८ | **रूकसत** - रजा |
| १२८ | १०० | **फडफर्मास** - रयतेकडून घेतलेली भेटवस्तू, फळफळावळ इत्यादि. |
| १४४ | १११ | **कोचवण करणें** - अडचणीत आणणे |
| १५१ | १२० | **वारापाणी होणें** - अंदाधुंदी माजणे |
| १५२ | १२१ | **पुस्तदरपुस्त** - वंशपरंपरा, पिढ्यानपिढ्या |
| १५६ | १२३ | **इस्तमुरारी** - कायमधारा पद्धतीने (मूळ अरबी शब्द इस्तिमरार) |
| १६२ | १२९ | **बहद्यामुळें** - त्रासामुळे |
| १६५ | १३० | **पाळा** - विहीर |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| १७२ | १४२ | **इजाफत** - इनाम<br>*रुपये १०० इजाफत जमा.* |
| १८१ | १४६ | **हदहदुद** - चारी बाजुची हद्द, सीमा<br>**चकनामा** - दस्तऐवज, करारनामा<br>*जमीन चतुःसीमा हदहदुद मोजून चकनामा करून देणें.* |
| १८२ | १४६ | **इस्तवारी** - वाढता सारा देण्याची पद्धत<br>*हरदू गांवी इस्तवारी करून वस्ती करणें.* |
| १८७ | १५१ | **लिखतंग** - कागदपत्र, करार |
| १९३ | १५७ | **महजद** - मशीद |
| २०९ | १६७ | **टाळा देणें** - गुंगारा देणे |
| २१२ | १७४ | **घर्म** - घाम |
| २३१ | १९२ | **कुव्वा** - विहीर |
| २६२ | २१६ | **मांडवा** - मांडव परतणी, लग्नानंतर वधू पक्षाने वर पक्षाला दिलेली जेवणावळ वा मेजवानी |
| २६७ | २१८ | **परवर्षी करणें** - परामर्श करणे, आश्रय देणें |
| २७४ | २२२ | **मुनासिब** - उचित, योग्य<br>*तुम्हास मुनासिब आहे कीं फौजेची तनखा वाटणी, स्वारांचे वर्दी, हत्यारांची पहाणी व कवायत घेत जाणें.* |
| २७५ | २२३ | **इतबार** - विश्वास |
| २७८ | २२६ | **ओहदा** - हुद्दा |
| २८० | २२७ | **इस्तकबील** - पासून पुढे |
| २८३ | २२९ | **इस्तिहार** - जाहिरात |
| २८६ | २३२ | **इतलाई** - कार्यवाही झालेले<br>*जे कागद इतलाई असतील ते दाखलदप्तर करावे.* |
| २८९ | २३४ | **मजमून** - महत्त्वाचा मजकूर<br>**खिल्लत** - मानाचा पोशाख<br>**ताजूब** - अकल्पित, आश्चर्य |
| ,, | २३५ | **लियाकत** - योग्यता<br>*तुम्ही रियासत सांभाळण्याचे लियाकतीचे व्हाल तोपर्यंत नायब तुमचेकडून रियासतीचे काम करतील.* |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
| --- | --- | --- |
| ३०३ | २४६ | **रियायत** - कुणा एकाची बाजू न घेता, सूट न देता<br>*मोकदमा आल्यास लोकांची तरफदारी वा रियायत न करतां कायद्याप्रमाणें इन्साफ करावा.* |
| ३०५ | २४७ | **आजलग** - जवळपास |
| ३०९ | २५१ | **खैरख्वाह** - हितेच्छू |
| ३१६ | २५९ | **किस्त्या** - भेटीच्या याद्या<br>**मिरके** - फेफरे, भोवळ येणे |
| ३१९ | २६८ | **इजारा** - भाडेपट्टा<br>**इजारे आंख** - भाडेपट्ट्याची रक्कम<br>**टाका** - ठराविक कर |
| ३२२ | २७२ | **हरद्र** - मनाचा कल, अभिप्राय |
| ३२३ | २७३ | **किनखाप –** सोनेरी, रुपेरी जारीच्या वेलबुट्टीचे काम केलेले रेशमी कापड<br>**जामदानी –** बेलबुट्टीचे कापड<br>**मश्रु –** गर्भरेशमी कापड<br>**महमुदी –** मलमलचे तलम कापड<br>**मंदील –** जरीकाठ असलेले पागोटे |
| ३२५ | २७७ | **अहेलकार** - कारकून |
| ३२९ | २८० | **खिल्लत –** सन्मानाचा पोशाख |
| ३३८ | २८९ | **खदान** - खाण |
| ३३९ | २९० | **कलाली** - कपटी, मतलबी हेतु<br>*कुठल्याही प्रकारची कलाली ठेवली जाऊं नये.* |

●

# सूची

(टीप : सूचीतील अनुक्रमांक पत्रांचे आहेत.)


### अ

अबदुल रहिमानखां : २६८

अब्दुल रहिमानखां : २६८

अवचितराव वाघमारे : ९७

अवंतिका : २८१

असालतखान (रामपुर, टोंक) : २९

अहमदखान जामेदार : ३४५

अहिल्यान दरबार : ३२५, ३३४

अहिल्याबाई ग्रंथसंग्रह : १

अहिल्याबाई होळकर : २२, १६८

अंबाराम शास्त्री : १०८

अंबोजी इंगळे : ६२, ८२

### आ

आक्टर लोणी : १४३

आत्माराम बापू भट (वेदमूर्ती) : २९९

आप्पाजी कृष्णराव : १९२, २४३

आबाजी खंडेराव : १३, ११९, १२०

आबाजी बल्लाळ किबे (कमाविसदार) : २०५, २५५, २६१, २६४, २८०

आबाजी बळवंत वकील : ३१२

आबाजी रणछोड : १३, १४

आबासाहेब गोसावी : ३१८

आमदन्यारखां : २६६

आलमपूर : २९९

### इ

इंग्रज व यशवंतराव तहनामा : ७१, ७६

इंग्लंडची राणी : ३४३

इंदूर : ५, २३, १५९, १७५, २०७, २१६, २२३, २३५, २४७, २५८, २८१, २८३, २८६, ३०४, ३४१

### ई

ईस्ट इंडिया कंपनी : १४७, २०९, २४५

### उ

उज्जनीची लढाई : ४६

उमराव टाकेदार : ३४४

उमेदसिंग कानुगो (परगणा चोळी) : १८२

उमेदसिंग मुनशी : ३०८

### क

कनीराम दयाराम : ३४१

कनीराम दयाराम : ३४१

कप्तान इसपीअरसाहेब : १८७

कानुगो (महेश्वर) : ८७

काशीराव होळकर : ५, ६, ११, २५, ३७, ४०, ४२

किफायत खान : २९

कृष्णराव माधव भुसकुटे : १३३

कृष्णाजी मुकुंद : २०८

कृष्णाजी विठ्ठल (कमाविसदार) : १५७

कृष्णाजी विठ्ठल : १५७

कृष्णाबाई होळकर (मासाहेब) : १६८, १७७, २०६, २१९, २८७, २९१, २९२, २९४, ३०७, ३०९

केशवराव राम : १३४

## ख


खुदाबक्ष कुंवर : २७९

खुमानसिंग बक्षी : ३१२, ३२०, ३३४, ३४३

खंडेराव बळवंत (कमाविसदार) : २३०, २३१

खंडेराव होळकर : १९, २९, २७६, २८१, २८२, २८४, २९१

खंडो पांडुरंग, २२७

खंडो महादेव : १०२, १०५, १०६, १०८, १०९, १२१

खासगी जमाखर्चाची यादी : १५

खंडेराव होळकर यांची छत्री (कुंभेरी) : १८८


## ग


गणपतराव फणसे : २३७, २५२, २५४, २९२

गणपतराव सीताराम वकील : २४५

गणेश विठ्ठल किबे : ३०४

गफूरखां : १०४

गरीबदास उमेदराम : २९६

गोपालजी खंडावाल (वेदमूर्ती) : ३३३

गोपालसिंग (झाबवा) : ३०२

गोपाळ कृष्ण (कमाविसदार) : २४७

गोपाळ त्रिंबक : १८७

गोपाळभट पृथ्वीराजभट (वेदमूर्ती) : २११

गोपाळराव गोविंद गानू (खासगीवाले) : ५७, २१३, २१७, २२४, २२५, २५६, ३१५

गोपाळराव भगवंत : १५९

गोविंदराव बुळे : १३०, १३२

गोविंदराव रघुनाथ गानू : ३१, ३३, ३४

गौतमाबाई होळकर (कृष्णाबाई स्नुषा) : ३११, ३१३, ३१५, ३२६

गंगादीन जमादार (कमाविसदार) : २७१, २८२, २८७, ३११, ३२५

गंगाधर शिवराम : २६१


## च


चिटको बल्लाळ (कमाविसदार) : १९६, २२९

चिमणराय साहेबराय : २४०

चिमणाजी कृष्ण : ८१

चिमाजी नाईक : ३२६

चिमाजीराव बुळे : २२१, २२२, २२८, २४५, २५०, २५९

चांदभाई कारभारी : ३१६

चांदवड : ३२७

चांदवड : ३३१, ३३७


## ज


जगन्नाथ पुरी : १८८

जगन्नाथ राजाराम : ११०

जनार्दन मोरेश्वर : २१८

जेजुरी : २१३

ज्योती नाईक : १४१

जेतकर्ण मंडलोई : २३


## ठ


ठाकूर मोतीसिंग : ३२८


## त


तहनामा : १४७, १६६

ताईसाहेब होळकर : ३०९

तुकोजीराव होळकर : २८८, २८९, २९४, २९६, २९७, २९८, २९९, ३००, ३०१, ३०३, ३०४, ३१४, ३१८, ३१९, ३२०, ३२७, ३२८, ३२९, ३३१, ३३३, ३३५, ३३८, ३३९, ३४०, ३४१, ३४२, ३४४, ३४५, ३४६

तुळसाबाई होळकर : ९९, ११४, १२५, १३४, १३६, १४४

तेजकर्ण मंडलोई : २५८

तुळजापूर : १८

### त्र

त्रिंबक गिरमाजी : २७०
त्रिंबकरावजी : १९२

### द

दरयावसिंग भीमानसिंग : ३४०
दामोदरभट बाळकृष्णभट : ३३९
दिवाण पळसीकर : ९०, ९१, ३१२, ३१६
दुदरनेक फरांसीस : ५
देवीदास सावकार : ८, २६
देशमुख देशपांडे (खानदेश) : २४
दौलतराव शिंदे : २४, २५, २८, ७३
दौलतसिंग (ओंकारमांधाता) : २४९

### ध

धनसिंग मेघसिंग : २९८
धनीराम महाराज भट : २९७
धोंडो जर्नादन (कमाविसदार) : २०४
धोंडो विश्वनाथ : २६५
धोंडो सदाशिव (अण्णा) थांदले : २५०, २५९, ३१९

### न

नगदी नेमणुकीबद्दल ठराव : ३२४
नरसिंगगड : २१८
नबाब मीरखान : १२२, १४८
नाना फडणवीस : २२
नारायण खंडेराव : ३३१
नारायणराव राम पळसीकर : २७३, २७५
नारो खंडेराव : ३
निहालचंद सावकार : ८, २६
नारोबा (बातमीदार) : ९१

### प

पद्मसी तिलोकसी सावकार : ५
पद्मसी राजसी सावकार : ६
पाराजी होळकर : २९४
पाराशर दादाजी : ५७
पार्लमेंट सभा : ३३२
पीतांबर शास्त्री : २०२
प्यारेलाल दुर्जनसिंग जमीदार : ३००
प्राणनाथ पंडित : ३१०
प्रतापसिंगजी (झाबवा) : २१६
पुणे : ७, ८, १७, २५, १५४

### फ

फूलण फरांसीस : १९

### ब

बजाजी गणेश (कमाविसदार) : १७८, १९७, १९८, २०१, २०३, २१३
बनारसीदास शेठ : ८, २६
बळवंतराव गोविंद : ५८
बाजी यशवंत : १५३
बाजीराव पेशवे (दुसरें) : २४, २८, ३२
बापूजी रघुनाथ : १४३
बापूजी शिंदे : ११
बाबाजी : २, ३, ४, ७, ८, ९, १०
बाबाजी अनंत : १४
बालाजी : २, ३, ४
बाळकृष्ण वासुदेव (कमाविसदार) : ७५, ९६, १०३, १११, १२९
बाळकृष्णभट रामचंद्रभट : ३३९
बाळा नाईक : २७२

बाळाजी कृष्ण : २१, ४१
बाळाजी नारायण : २, ३
बाळाजी भास्कर : ६२
बाळाजी यादव : १४५
बाळाजी रामचंद्र : २४०, २४१
बाळारामशेट अगरवाल : ७६, ७८, १०७, १६०
बाळोजी कुंजर : ७९
बिहारीलाल मनसाराम व्यास : २८१, ३३६
बुलंद शहर : ३०८
बुळे यांच्याबाबत करार : २४५
बेलीसाहेब : १३०
ब्ल्याक साहेब : २४५

**भ**

भवदेव मिश्र : ७९
भवानीराम कोठारी (कमाविसदार) : १९३
भाऊ बाबाजी होळकर : २९४
भागीरथीबाई होळकर : ३२७, ३३५, ३३६
भानपुरा : ११५, १८५, २३५, ३१२
भारमलदादा होळकर : २०, २१, २३, २७, ३०, ३३, ३४, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५९, ६०, ६१, ६३, ६४, ६५, ६६, ६९, ७०, ७२, ८५, ८९, ९३, ९४, ९८, ९९, १००, १०२, १०४, ११२, ११३, ११४, ११६, ११७, ११८, १२५, १२६, १३९, १४०, १४१, १४५, १४९, १५१
भिकणदास : ३७
भीमगीर बाबा : ३१२
भीमसिंग (संस्थान झाबवे) : १६२, १६६
भीमाबाई बुळे : ६८, ९२, १२६, १३९, १४४, १५५, १६६, ३०७, ३१६

**म**

मदारबक्षखां : २७८
मनवरखां जामेदार : ३४५
मल्हारभट गोविंदभट : ३३८
मल्हारराव होळकर (तृतीय) : ११६, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२७, १२८, १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३७, १३८, १४०, १४२, १४३, १४५, १४७, १४९, १५२, १५३, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६२, १६३, १६७, १६९, १७०, १७१, १७२, १७३, १७५, १७७, १७८, १७९, १८०, १८५, १८६, १८८, १९१, १९३, १९४, १९५, १९६, १९७, १९८, २००, २०१, २०२, २०३, २०४, २०७, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१३, २१४, २१५, २१६, २१८, २२०, २९४
महमद सैयदखां : २७७
महानुभाव महंत (कारळ) : २०६
महिपतराव बल्लाळ : २८५
महेश्वर : ४, २३, ६२, ६४, १४५, १८२, १९१, २२४, २३७, ३१८, ३४१
माखनलाल जोशी (कमाविसदार) : १३१, १४२
माधवराव गणेश (कमाविसदार) : २१५
माधवराव मल्हार : १८९, २१७, २२५
माधवराव यशवंत : ८९
माधवराव विसाजी : ३०५, ३२२
मारहीन वेट साहेब : २२२
मार्तंडराव होळकर : २२६
मिश्रीप्रसाद इसरीप्रसाद (कमाविसदार) : २६४

मीरखां पठाण : १६, १४८
मैनाबाई पवार : ९४
मैनाबाई होळकर : १३५
मैराळ गणेश : १०
मोघाजी संक्राजी बारगळ : १२४
मोरोपंत दादा गोसावी : १८
मंडलोई (महेश्वर) : ६८

## य

यशवंतराव होळकर : १०, १४, १८, २०, २२, २३, २७, ३०, ३१, ३२, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४२, ४३, ४४, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ९२, ९५, ९६, ९७, ९८, १०१, १०३, १०५, १०६, १०७, १०९, ११०, १११, ११२, ११३, ११५
येसोबा (बातमीदार) : ९१

## र

रख्मादास आगरवाले : २५१
रघुजी होळकर : ४५
रघुनाथ महादेव : २३५
रघुनाथ हरी : ८१
रतनचंद कोठारी : १७९, २६७
रतनसिंगजी (झाबवा) : २६०, २६२
राजोजी फणसे : २३९, २५३, २८६, २९०, २९३, ३०५
रामचंद्र कृष्ण : २१४
रामचंद्र पंडित नरसिंगपूरकर : १७१
रामचंद्र बल्लाळ काकीर्डे : २५६
रामचंद्र भगवंत : ९५
रामचंद्रराव पवार : ९३
रामपुरा : २१०, २११, २३८
रामराव अप्पाजी : ४, ७, ९, १२
रामराव नारायण दिवाण, ३२०, ३२२
रावजी गोविंद (कमाविसदार) : ११९, १२०, १३८
रावजी त्रिंबक : १८६
रावत सामंतसिंग : ८४
रावसाहेब शिंदे : १७
रंगो भोजराव विभूते : २८५

## ल

लक्ष्मण मल्हार : ४१
लक्ष्मण सदाशिव (कमाविसदार) : २१२
लक्ष्मीबाई होळकर : १२
लाटसाहेब : १९०, २२१, २२२, २२३, २२४, २८९, २९१, ३२९
लाडाबाई होळकर : ९९, ११४, १२५
लाला लडेतीलाल : २३३, २४६

## व

वाफगांव : १७८, १९८, ३२७
वासुदेव रघुनाथ : ६७
विठूजी बुळे : १००
विठोजी होळकर : ३२, ३३, २६३
विठ्ठल महादेव : १४८, १५१, १५२, १६३, १६४, १६५, १६७, १७०, १७२, १८१, १८२, १८३, १८४
विनायक मोरेश्वर फडके : २४४
विश्वासराव (वकील, हैदराबाद दरबार) : १७

विश्वेश्वर शास्त्री (काशी) : १८५
व्यंकटराव कृष्ण : ८३

## श

शाळिग्राम मंत्री : २३४
शाहू राजे छत्रपती (सातारा) : ३२३
शिलालेख : २१९
शिवजीराम जती (रामपुरा) : १०१, ३०१
शिवराम धोंडदेव विभूते : ३४२
शिवलाल (कमाविसदार) : १२७
शिवाजीराव होळकर : ३३३
शेख हबीबुल्ला : ७६
शंकर त्रिंबक : १९१

## स

सखाराम जगजीवन : १०८, १२१
सखाराम विठ्ठल उपासनी : ३२६
सदाशिव गोविंद : ३०३
सदाशिव तुकदेव : ३३७
सदाशिव रामचंद्र : २९०, २९३
सदाशिव शंकर : १९४
सनईराम रामप्रसाद : ३१३
सर जान मालकम : ७६, १५५, १६७, १६९, १७४, ३१९
सरकार बिजागड : १२३, १५८, ३३४
सरदार बुळे : ३१६
सर्जेराव घाडगे : २८
सागर : २२१, २२२, २२३, २२४
सालमसिंग ठाकूर : १५६
सावतसिंग गिराशे : १५७
सिदो बापूजी बेलसरे (श्री क्षेत्र जेजुरी) : ८८
सीताराम सदाशिव अभ्यंकर : ३४६
संताजी होळकर : ८, १४
संस्थान नरसिंगगड : १६१, १७३, २१८

## ह

हणमंतसिंगजी (संस्थान नरसिंगगड) : २३२, २५७
हरनाथ होळकर : ७४
हरीपंत तात्या फडके : २४४
हरीबाबा आकुलनेरकर : १३६
हरीराव होळकर : २२७, २२८, २२९, २३०, २३१, २३३, २३४, २३५, २३६, २३७, २३८, २३९, २४०, २४१, २४३, २४४, २४६, २४७, २४८, २४९, २५०, २५१, २५२, २५३, २५४, २५५, २५७, २५८, २५९, २६०, २६२, २६३, २६५, २६६, २६७, २६८, २६९, २७०, २७१, २७२, २७३, २७४, २७७, २७८, २७९, २८०
हाफीजखां (बक्षी) : २६९, २७४
हुजूर हकूमाचे टिप्पण : ३३२
हेन्री पाटिंजर (कलेक्टर अहमदनगर) : १५४
होळकर मुलुखाची जमाबंदी : १५०
हामिल्टन साहेब : ३०९
हेडेकर शिलेदार : १६
हरसिद्धी मंदिर (इंदूर) : २४७
हरिद्वार : १८८
हरीबादादा : १३५

●

## संपादक परिचय

### डॉ. देवीदास पोटे

- जन्म : डुबेरे, ता. सिन्नर, जि. नाशिक
  ७ मे १९५०
- निवृत्त सहाय्यक विक्रीकर आयुक्त
- संतसाहित्य अभ्यासक, अहिल्याचरित्र आणि इतिहास अभ्यासक, लेखक, कवी, संपादक.
- सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
- ''युगबोध'' आणि ''मुक्त आनंदघन'' या संत साहित्यविषयक दिवाळी विशेषांकांचे संपादन : १९९३ ते आजपर्यंत. या अंकांना विविध मान्यवर संस्थांचे पन्नासहून अधिक पुरस्कार प्राप्त.
- अहिल्याबाई चरित्रविषयक 'महेश्वरच्या घाटावरून' आणि 'युगप्रवर्तक अहिल्याबाई' या ग्रंथांचे लेखन. तसेच होळकर रियासतीचा सांस्कृतिक इतिहास, अ.. अहिल्याबाईंचा, अहिल्यायन, शिवयोगिनी, ती एक अहिल्या होती या ग्रंथांचे संपादन. यापैकी दोन ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार.
- गंधयात्रा, प्रवासाचे क्षण, शब्द, मन, प्रेम, टिंब टिंब, मांदियाळी, दिंडी चालली आदि कवितासंग्रह प्रकाशित.
- संत साहित्यविषयक भारतीय संत कवयित्री, कैवल्याचे लेणे, चैतन्याचा ज्ञानदीप, कबीर चिंतन, श्रीकृष्ण : एक अभ्यास, महान भारतीय संत, अवघाचि विठ्ठल या ग्रंथांचे संपादन.
- वारी, अद्वितीय युगप्रवर्तक : संत तुकाराम, संतशब्दांचा परिमळु, कबीरायन, अवघाचि राम, अहिल्यानीती हे आगामी ग्रंथ प्रकाशनाधीन.
- अनेक सामाजिक / सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध पदांची जबाबदारी. साहित्यिक / सांस्कृतिक / सामाजिक कामाबद्दल महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रातील विविध मान्यवर संस्थांचे वीसहून अधिक पुरस्कार.
- भ्रमणध्वनी : ९८२०३ ३२१२८, Email : dspote7@gmail.com

'होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें' हा दोन खंडांतील पत्रसंग्रह आहे. या ग्रंथांमध्ये अकरा होळकर राज्यकर्त्यांच्या कारकीर्दी समाविष्ट आहेत. त्यातील प्रमुख कारकीर्दी म्हणजे थोरले मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, प्रथम तुकोजीराव होळकर, यशवंतराव होळकर, द्वितीय मल्हारराव होळकर, हरीराव होळकर आणि द्वितीय तुकोजीराव होळकर यांच्या आहेत. या पत्रसंग्रहांत मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आदी राज्यकर्त्यांना आलेली श्रीमंत पेशवे, सरदार, कमाविसदार, कारभारी, पुजारी, भारमलदादा होळकर, गोविंदराव गानू आणि इतर अनेकांनी लिहिलेली पत्रे आहेत. इ. स. १७२० ते १८८५ या होळकर रियासतीच्या प्रदीर्घ कारकीर्दीतील प्रशासन, सैन्य, शेती, शिक्षण, व्यापार, उद्योग, पर्यावरण, टपालव्यवस्था, न्यायदान, लग्न समारंभ, धार्मिक विधी आदी अनेक प्रशासकीय आणि कौटुंबिक विषयांबाबतचा पत्रव्यवहार यात आला आहे. होळकर राज्यकर्त्यांचा प्रगतीशील आणि लोकाभिमुख विचार आणि कर्तृत्व यांचा आलेख या पत्रांमधून आपल्यासमोर उलगडत जातो.

अहिल्याबाई म्हणजे होळकरशाहीचा कळसाध्याय. त्यांचे राज्य हा आदर्श राज्याचा सर्वोत्तम नमुना होता. ते आधुनिक काळातले रामराज्यच होते. प्रशासन, युद्धनीती, परराष्ट्रधोरण, शेती, व्यापार, दळणवळण, स्त्रीहक्कविषयक निर्णय, न्यायदान, लोकहितकारी कामे या सर्व बाबतीत त्यांनी केलेल्या कामांचे स्वरूप या पत्रसंग्रहात प्रतिबिंबित झाले आहे. राज्यपद असूनही साधी, सात्त्विक राहणी आणि 'इदं न मम' या भावनेने राज्यकारभार सांभाळणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष अनेक प्रसंगांतून प्रत्ययाला येतात.

या पत्रसंग्रहातील पत्रे म्हणजे इतिहासाच्या एका कालखंडाची अनेकस्पर्शी स्पंदने आहेत. मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आणि द्वितीय तुकोजीराव यांच्या यशस्वी कारकीर्दीतील अनेक बाबी यात बारकाव्यांसह आल्या आहेत. मराठेशाहीच्या वा होळकरशाहीच्या अभ्यासाच्या दृष्टीने या पत्रांचे ऐतिहासिक मोल निर्विवाद आहे.

एकशे पासष्ट वर्षांच्या कालखंडातील राजकीय, प्रशासनिक, सामाजिक आणि कौटुंबिक अनुबंधांचे अनेक चढउतार, विविध वळणे यांचे दर्शन या पत्रसंग्रहांतून घडते.